म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क. ११६०



REFBK-0009787
REFBK-0009787

# स्वामी विवेकानंदांच्या सहवासांत

# स्वामी विवेकानंदांच्या सहवासांत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम ...................... वि:
क्रमांक ...................... नों: दि: .......

श्री. शरच्चंद्र चक्रवर्ती

REFBK-0009787

श्रीरामकृष्ण आश्रम,
नागपूर

प्रकाशक—
स्वामी भास्करेश्वरानंद,
अध्यक्ष, श्रीरामकृष्ण आश्रम,
धंतोली, नागपूर-१

श्रीरामकृष्ण-शिवानंद-स्मृतिग्रंथमाला
पुष्प १९ वें

( श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर द्वारा सर्वाधिकार सुरक्षित )

किंमत ४ रु ५० न. पै.

मुद्रक—
डी. पी. देशमुख,
बजरंग मुद्रणालय,
कर्नलबाग, नागपूर-२.

## प्रास्ताविक—

स्वामी विवेकानंदांचा सर्वसाधारणत: आपल्याला परिचय आहे-- त्यांच्या व्याख्यानांतून, त्यांच्या लिखाणांतून, आणि त्यांच्या जनसेवेच्या कार्यांतून. प्रस्तुत पुस्तकाचें एक अनन्य-साधारण वैशिष्टच हें की, त्यांत आपल्याला स्वामी विवेकानंदांचें दर्शन घडतें—त्यांच्या वैयक्तिक सहवासांतून. स्वामी विवेकानंदांचे एक शिष्य श्री शरच्चन्द्र चक्रवर्ती यांना स्वामीजींच्या निकट सहवासाचें भाग्य लाभलें होतें. नाना प्रसंगीं स्वामी विवेकानंदांशीं त्यांचीं जीं संभाषणें होत तीं त्यांनी "स्वामीशिष्य-संवाद" नामक बंगाली पुस्तकाच्या रूपाने प्रसिद्ध केलीं होतीं. प्रा. वि. शं. बेनोडेकर, एम्. ए. यांनी मूळ बंगालींतून त्याचा केलेला अनुवाद "स्वामी विवेकानंदांच्या सहवासांत" या प्रस्तुत ग्रंथाच्या रूपाने वाचकांच्या हातीं देतांना अत्यंत आनंद होत आहे.

वेदान्त तत्त्वज्ञान, ध्यान-जप, साधना, मुक्ति इत्यादि आध्यात्मिक विषयांसंबंधीच नव्हत, तर, भारताचें पुनरुत्थान, समाजसुधारणा, नीति, शिक्षण, स्त्री-जीवन, कला, संगीत इत्यादि विभिन्न जीवन-क्षेत्रांतील नाना महत्त्वाच्या आणि जिव्हाळ्याच्या मुद्यांवरील युगाचार्य स्वामी विवेकानंदांचे असंदिग्ध, ऊर्जस्वल आणि स्फूर्तिदायी सिद्धान्त या ग्रंथांत वाचावयास मिळतात.

प्रत्येक अध्यायाच्या शिरोभागीं त्या त्या अध्यायांतील विवेचनाचे मुख्य मुद्दे देण्यांत आल्यामुळे वाचन अधिक सोयीचें आणि आनंददायक होईल अशी आशा आहे. मूळ बंगालीवरून प्रथमच मराठींत केला गेलेला हा अनुवाद वाचकांना आवडेल अशी खात्री आहे.

१।१२।५८

—प्रकाशक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
२८०००
वि: ...
क्रमांक ... ११६७० नों: दि: ...

# अनुक्रमणिका


अध्याय १

स्थळ :— कलकत्ता, कै. प्रियनाथ मुखोपाध्याय यांचें घर, बागबाजार.

वर्ष :— इ. स. १८९७ पृष्ठ

विषय :— स्वामीजींशीं शिष्याचा (श्री. शरच्चंद्र चक्रवर्ती यांचा) प्रथम परिचय—'मिरर' पत्राचे संपादक श्री. नरेन्द्रनाथ सेन यांच्याबरोबर संभाषण—इंग्लंड व अमेरिका यांची तुलना—पाश्चिमात्य देशांत भारतवासीयांनी केलेल्या धर्मप्रचाराचें भवितव्य—धर्म व राजकारण यांपैकी भारताचें कल्याण कशांत ? गोरक्षण- प्रचारकाबरोबर बोलणें—मनुष्यरक्षण हें आद्य कर्तव्य. १

अध्याय २

स्थान—कलकत्ता ते काशीपूरचा रस्ता व कै. गोपाललाल सील यांची बाग.

वर्ष—इ. स. १८९७.

विषय— जीवनसंग्रामांतील पटुता हेंच चैतन्याचें लक्षण— मानवजातीच्या जीवनशक्तीची पारख करण्यासाठीहि हाच नियम—स्वतःला शक्तिहीन समजणें हेंच भारताच्या जडमूढतेचें कारण—प्रत्येकांत अनंत शक्तीची खाण असा आत्मा विद्यमान—हें दाखवून समजावून देण्यासाठीच महापुरुषांचें आगमन—धर्म हा अनुभूतीचा विषय—तीव्र व्याकुलताच धर्मलाभाचा एकमात्र उपाय—सद्यःपरिस्थितींत गीतोक्त कर्माची आवश्यकता—गीतेचा उद्घोष करणाऱ्या श्रीकृष्णाच्या पूजनाची निकड—देशांत रजोगुण उद्दीपित करण्याचें प्रयोजन. ११

अध्याय ३

स्थान— काशीपूर; कै. गोपाललाल सील यांचा बगीचा.

वर्ष—इ. स. १८९७.

विषय—स्वामीजींत अद्भुत शक्तीचा प्रकाश—स्वामीजींच्या दर्शनासाठी कलकत्त्यांतील बडाबाजार नामक मोहोल्ल्यांतील हिंदुस्थानी २१

पृष्ठ

पंडितांचें आगमन--त्या पंडितांबरोबर स्वामीजींची संस्कृतांतून शास्त्रचर्चा-- स्वामीजींबद्दल पंडितांचें मत-- स्वामीजींवरील त्यांच्या गुरुबंधूंचें प्रेम-- सभ्यता कशाला म्हणतात-- प्राचीन भारतीय सभ्यतेचें वैशिष्टय--श्रीरामकृष्णांच्या आगमनाबरोबरच पाश्चिमात्य आणि पौर्वात्य सभ्यतांच्या संमीलनाने नवयुगाला आरंभ-- धार्मिक व्यक्तींच्या बाह्य आचरणासंबंधी पाश्चात्य लोकांची धारणा--भावसमाधि व निर्विकल्प समाधि यांच्यामधील भेद--श्रीरामकृष्ण हे भावराज्याचे अधिराज--ब्रह्मज्ञ पुरुष हेच खरे लोकगुरु--कुलगुरु-प्रथेंतील दोष--श्रीरामकृष्णांचें आगमन धर्मग्लानि दूर करण्यासाठी-- पाश्चात्य देशांत स्वामीजींनी ठाकुरांचा प्रचार कसा केला. २१

अध्याय ४

**स्थान-- श्री. नवगोपाल घोष यांचें घर, रामकृष्णपूर, हावरा.**

**वर्ष--इ. स. १८९७ (जानेवारी, फेब्रुवारी)**

**विषय**--नवगोपाल बाबूंच्या घरीं श्रीरामकृष्णांच्या मूर्तीची स्थापना-- स्वामीजींचा विनीत भाव--नवगोपाल बाबूंच्या गृहपरिवारांतील सार्‍यांची श्रीरामकृष्णांबद्दल भक्ति-- श्रीरामकृष्णांना उद्देशून रचलेला प्रणाम-मंत्र. २९

अध्याय ५

**स्थान--दक्षिणेश्वर येथील कालीमंदिर आणि आलमबाजार मठ.**

**वर्ष--इ. स. १८९७. (मार्च)**

**विषय**--दक्षिणेश्वर येथील ठाकुरांचा अखेरचा जन्मोत्सव--धार्मिक जीवनांत उत्सव-पर्वादिकांचें महत्त्व--अधिकारभेदानुसार सर्व लोकव्यवहाराची आवश्यकता--स्वामीजींचा धर्मप्रचारामागील उद्देश, नवीन संप्रदाय स्थापन करणें नव्हे. ३३

अध्याय ६

**स्थान--आलमबाजार मठ. वर्ष-- इ. स. १८९७ (मे)**

**विषय**-- स्वामीजीद्वारा शिष्याची दीक्षा--दीक्षेपूर्वीचे प्रश्न--यज्ञो- ४२
पवीताच्या उत्पत्तीसंबंधी वेदांतील माहिती--आपला मोक्ष व

पृष्ठ

जगताचें कल्याण या विचारांत मनाला सतत निमग्न ठेवण्याचें नांवच दीक्षा--क्षुद्र अहंभावांतूनच पाप-पुण्याची उत्पत्ति--क्षुद्र अहंकाराचा त्याग म्हणजेच आत्मप्रकाश--मनाच्या लोपांतच यथार्थ 'अहं'चा प्रकाश--आणि यथार्थ 'अहं'चें तेंच वास्तव स्वरूप--'कालेनात्मनि विन्दति--' ४२

**अध्याय ७**

**स्थान--कलकत्ता. वर्ष--इ. स. १८९७.**

**विषय**--श्रीरामकृष्णभक्तांना निमंत्रित करून कलकत्त्याला स्वामीजींद्वारा 'रामकृष्ण मिशनची' स्थापना—श्रीरामकृष्णांचा उदार भाव प्रसृत करण्याबाबत विचारविनिमय—श्रीरामकृष्ण स्वामीजींकडे कोणत्या दृष्टीने पाहत असत--स्वामीजींचा श्रीरामकृष्णांबद्दल काय दृष्टिकोन होता—याबाबत श्रीयोगानंद स्वामीजींचें मतप्रदर्शन—आपल्या ईश्वरावतारत्वाबाबत श्रीरामकृष्णांचीं वचनें--अवतारत्वावर विश्वास ठेवणें ही अत्यंत कठीण गोष्ट--डोळयांनी सारें पाहूनहि विश्वास बसत नाही--हा विश्वास निर्माण होणें त्यांच्या कृपेवरच अवलंबून--कृपेचें स्वरूप व कोणत्या महाभागांना ती लाभते--स्वामीजी व गिरीशबाबू यांचें संभाषण. ५०

**अध्याय ८**

**स्थळ--कलकत्ता. वर्ष--इ. स. १८९७.**

**विषय**-- स्वहस्तें स्वयंपाक करून शिष्य स्वामीजींना जेवूं घालतो—ध्यानाचें अवलंबन व स्वरूप --बाह्य अवलंबन घेऊन देखील मन एकाग्र होऊं शकतें--मन एकाग्र झाल्यावर देखील पूर्वसंस्कारांमुळे साधकाच्या मनांत वासनेचा उदय होणें शक्य आहे -मन एकाग्र झाल्याने त्यांत ब्रह्माचें प्रतिबिंब पडतें व विभिन्न विभूतिलाभाचा साधकाचा मार्ग मोकळा होतो--या समयीं कोणत्याहि वासनेच्या आहारीं गेल्यास त्याला ब्रह्मज्ञान होणें शक्य नाही. ६३

**अध्याय ९**

**स्थान--कलकत्ता. वर्ष--इ. स. १८९७. (मार्च-एप्रिल)**

**विषय**--स्त्रीशिक्षणासंबंधी स्वामीजींचें मत--महाकाली पाठशाळेला ६९

पृष्ठ

भेट व तिची प्रशंसा--अन्य देशांतील स्त्रियांच्या तुलनेने भारतीय स्त्रियांचें वैशिष्टय--स्त्री व पुरुष दोघांनाहि शिक्षण द्यावयास हवें– कोणताहि सामाजिक नियम जुलूमजबरदस्तीने मोडावयाची गरज नाही--शिक्षणाचा प्रसार होतांच लोक आपोआपच वाईट गोष्टी टाकून देतील. ६९

अध्याय १०

स्थळ-- कलकत्ता. वर्ष-- इ. स. १८९७.

**विषय--** शिष्याचें स्वामीजींच्या देखरेखीखाली वेदाध्ययन— मॅक्समुलरविषयी स्वामीजींना वाटणारा अद्भुत विश्वास-- वेदमंत्रांच्या आधारें ईश्वराने सृष्टि केली या वैदिकमत्राचा अर्थ --वेद शब्दात्मक-- 'शब्द' पदाचा प्राचीन अर्थ-- नादापासून शब्द व शब्दापासून स्थूल जग विकसित होत असल्याचा समाधींत अनुभव-- अवतारादि पुरुषांना हा विषय समाधिकालीं कसा प्रतिभात होतो-- स्वामीजींची सहृदयता-- ज्ञान व प्रेम यांच्या अविच्छेद्य सबंधाबाबत शिष्य व गिरीश घोष यांचें बोलणें--गिरीशबाबूंचा सिद्धान्त शास्त्राला अविरोधी-- गुरुभक्तीच्या बळावरच गिरीशबाबूंना सत्य सिद्धान्ताचा लाभ न समजतां, न उमजतां कुणाचेंहि अनुकरण करणें दोषास्पद— ज्ञानी व भक्त विभिन्न स्थानांवरून बोलत असल्याने त्यांच्या उद्गारांत तफावत असल्यासारखें वाटतें-- सेवाश्रम स्थापण्याबाबत स्वामीजींचे विचार. ७८

अध्याय ११

स्थळ-- आलमबाजार मठ. वर्ष— इ. स. १८९७.

**विषय--** मठांतील कांही जण स्वामीजींजवळून संन्यास घेतात-- संन्यासधर्मासंबंधी स्वामीजींचा उपदेश-- मानवी जीवनाचें उद्देश्य त्याग-- 'आत्मनो मोक्षार्थं जगत्-हिताय च' या हेतूने सर्वस्वाचा त्याग म्हणजेच संन्यास-- संन्यासग्रहणासाठी वर्ज्यावर्ज्य वेळ नाही-- 'यदहरेव विरेजत् तदहरेव प्रव्रजेत्'-- संन्यासाचे चार प्रकार-- भगवान् बुद्धदेवानंतरच विविदिषा संन्यासाची वाढ-- ९०

पृष्ठ

बुद्धदेवापूर्वी संन्यासाश्रम होता, पण त्याग-वैराग्यच मानवी जीवनाचें ध्येय आहे असें मानलें जात नसे-- कर्महीन संन्यासी देशाला कांहीहि उपयोगी नाहीत वगैरे प्रवादांचें खडन-- यथार्थ संन्यासी तर अखेर आपल्या मुक्तीचीहि उपेक्षा करून जगाचें कल्याण साधन करतो. ९०

अध्याय १२

स्थळ-- कलकत्ता, बलरामबाबूंचें घर. वर्ष-- इ. स. १८९८.

विषय-- गुरु गोविंद शिष्यांना कशा प्रकारें शिक्षण देत-- त्यांनी त्या वेळीं पंजाबांतील सर्वसाधारण समाजांत एका विशिष्ट भावनेची प्रेरणा निर्माण केली होती-- सिद्धींमुळे होणारे अपाय-- स्वामीजींनी आपल्या जीवनांत अनुभवलेल्या दोन घटना-- शिष्यांना उपदेश-- "सदोदित भूतपिशाच्चादिकांच्या चिंतनाने माणूस भूतच होतो व सदोदित 'मी नित्य मुक्त बुद्ध आत्मा' या चिंतनाने तो ब्रह्मज्ञ होतो." १०२

अध्याय १३

स्थळ-- बेलूर येथील भाड्याने घेतलेला मठ. वर्ष--इ. स. १८९८.

विषय-- मठांतील श्रीरामकृष्णदेवांची जन्मतिथिपूजा-- स्वामीजीं-द्वारा ब्राह्मणेतर जातीच्या लोकांना यज्ञोपवीत प्रदान-- मठांत श्री. गिरीशचंद्र घोष यांचें स्वागत-- कर्मयोगाने वा परार्थ कर्म केल्याने आत्मदर्शन निश्चित होतें-- हा सिद्धांत तर्कयुक्तीद्वारा स्वामीजी समजावून देतात. ११०

अध्याय १४

स्थळ--बेलूर येथील भाड्याने घेतलेली मठाची जागा.
वर्ष--इ. स. १८९८.

विषय-- मठाच्या नवीन जागेंत ठाकुरांची स्थापना-- आचार्य शंकरांची अनुदारता-- बौद्धधर्माच्या पतनाच्या कारणाचा निर्देश--तीर्थमाहात्म्य--'रथे च वामनं दृष्ट्वा--' या श्लोकाचा अर्थ-- भावाभावाच्या अतीत ईश्वर-स्वरूपाची उपासना. १२०

अध्याय १५

स्थळ— बेलूर येथील भाडयाने घेतलेली मठाची जागा.

वर्ष— इ. स. १८९८ (फेब्रुवारी) पृष्ठ

विषय— स्वामीजींच्या बाल्य व यौवन कालांतील कांही घटना व १३० दर्शनें— अमेरिकेंत आविर्भूत झालेल्या विभूतींचें वर्णन— सांगावयाच्या गोष्टींच्या राशीच्या राशी कुणी आंत रचतो आहे अशी अनुभूति— अमेरिकेंतील स्त्री-पुरुषांचे गुणदोष— द्वेषाने अंध झालेल्या पाद्रयांचे अत्याचार— जगांतील कोणतेंहि मोठें काम चलाखीने साधतां यत नाही— ईश्वरावर निर्भरता— नागमहाशयांसंबंधी कांही गोष्टी.

अध्याय १६

स्थळ— बेलूर येथील मठाची भाडयाने घेतलेली जागा.

वर्ष— इ. स. १८९८ (नोव्हेंबर)

विषय— काश्मीरमधील अमरनाथदर्शन— क्षीरभवानी मंदिरांत १४० दैवीवाणीचें श्रवण व मनांतील सर्व संकल्पांचा त्याग— भूतयोनीचें अस्तित्व— भूत-प्रेतादि दर्शनाची वासना मनांत वागविणें अयोग्य— स्वामीजींना झालेलें भूत-दर्शन व श्राद्धसंकल्पाद्वारा त्यांनी त्याचा केलेला उद्धार.

अध्याय १७

स्थळ— बेलूर येथील मठाची भाडयाने घेतलेली जागा.

वर्ष— इ. स. १८९८ (नोव्हेंबर)

विषय— स्वामीजींनी रचलेलीं संस्कृत स्तोत्रें— श्रीरामकृष्णांच्या १४५ आगमनाने भाव व भाषेंत नवीन प्राणसंचार— भाषेंत ओज कसें आणावें— भयत्याग करावयास हवा— पाप व दुर्बलता हीं भयमूलकच— साऱ्याच अवस्थांत अविचल असावयास हवें— शास्त्रपाठापासून लाभ— पाणिनिकृत अष्टाध्यायीचें स्वामीजीकृत अध्ययन— ज्ञानाचा उदय झाला की कोणताहि विषय मग अद्‌भुत वाटेनासा होतो.

**अध्याय १८**

**स्थळ--बेलूर येथील भाड्याने घेतलेली मठाची जागा.**

**वर्ष--इ. स. १८९८.** **पृष्ठ**

**विषय**--स्वामीजींच्या निर्विकल्प समाधीचा वृत्तान्त--ह्या अवस्थेंतून कोण संसारांत परत फिरतात--अवतारांच्या अद्‌भुत शक्तींचें विवरण व प्रमाण--शिष्याद्वारें स्वामीजींचें पूजन. १५४

**अध्याय १९**

**स्थळ--बेलूर येथील भाड्याची जागा. वर्ष--इ. स. १८९८.**

**विषय**-- स्वामीजी शिष्याला व्यापारउदीम करावयास उत्साहित करतात--श्रद्धा व आत्मविश्वास यांच्या अभावानेच या देशांतील मध्यमवर्गांतील लोकांना दुर्दशा प्राप्त झाली आहे--इंग्लंडमध्ये नोकरीला हीन मानून लोक नोकऱ्यांना कमी लेखतात--भारतांतील सुशिक्षित लोकांची निष्क्रियता--वास्तविक शिक्षण कशाला म्हणतात--अन्य देशांतील लोकांची कार्यतत्परता व आत्मनिष्ठा--भारतांतील सभ्य लोकांपेक्षा भारतांतील इतर जातींत आता जास्त जागृति होत असून सभ्य समाजाकडून त्या आपलें ऋण वसूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत--सभ्य समाजाने जर त्यांच्या या उत्थानाला हात लावला तर भविष्यकालांत त्यामुळे उभयतांचेंहि कल्याण होईल--इतर जातींना गीतोक्त मार्गाने शिक्षण दिल्यास त्या आपलें जातीय कर्म टाकून देणें तर दूरच राहो, उलट मोठ्या अभिमानाने तें करतील--सभ्य समाजाने जर अन्यजातीयांना आता मदत केली नाही तर भविष्यकाल बिकट. १६२

**अध्याय २०**

**स्थळ--बेलूर येथील मठाची भाड्याची जागा. वर्ष--इ. स. १८९८.**

**विषय**-- उद्‌बोधन मासिकाची सुरवात--या मासिकासाठी स्वामी त्रिगुणातीतानंदांनी घेतलेला दगदगीचा व कष्टांचा भार--हें मासिक काढण्याचा स्वामीजींचा हेतु--श्रीरामकृष्णांच्या संन्यासी-संतानगणांचा त्याग--गृहस्थांच्या कल्याणासाठीच मासिक व अन्य प्रचार--उद्‌बोधन मासिक चालविण्याची रूपरेषा--उच्चभावाने १७२

पृष्ठ
जीवन व्यतीत करण्यासाठीं मार्ग दाखविणें-- कुणाची घृणा करणें नको किंवा कुणाला भय दाखवावयास नको-- घृणा व भय यांच्यामुळेच भारताचें पतन झालें--शरीर सुदृढ करणें. १७२

अध्याय २१

स्थळ—कलकत्ता. वर्ष--इ. स. १८९८.

विषय--सिस्टर निवेदितासह स्वामीजींची अलिपूर येथील पशुसंग्रहालयाला भेट--केन्द्र पाहतेवेळच्या गोष्टी व विनोद--पाहणें झाल्यावर तेथील अधिकारी बाबू रामब्रह्म संन्याल यांचेकडे चहा व उत्क्रांतिवादासंबंधी चर्चा— उत्क्रांतीचें कारण म्हणून पाश्चात्य पंडित जी मीमांसा करतात ती अखेरची नाही— याविषयी महामुनि पतंजलींचें मत-- बागबाजारांत घरीं परत आल्यावर स्वामीजींनी उत्क्रांतीसंबंधी पुन्हा केलेली चर्चा— पाश्चात्त्य पंडितांनी क्रमविकासाचीं म्हणून सांगितलेलीं कारणें मानवेतर प्राणिजगताला लागू पडत असलीं तरी मानवाच्या परिणतीचीं कारणें संयम व त्याग हींच होत— सर्वांनी शरीर सुदृढ करावें या स्वामीजींच्या आदेशामागील हेतु. १८०

अध्याय २२

स्थळ—बेलूर येथील मठाची भाड्याची जागा. वर्ष—इ. स. १८९८.

विषय-- श्रीरामकृष्ण-मठाला एका अद्वितीय मक्षेत्रांत परिणत करण्याची स्वामीजींची इच्छा--मठांतील ब्रह्मचाऱ्यांना कसल्याप्रकारें शिक्षण देण्याचा संकल्प होता--अन्नछत्रें व सेवाश्रम स्थापन करून ब्रह्मचाऱ्यांना संन्यासासाठी व ब्रह्मविद्यालाभासाठी सुयोग्य करण्याचा मानस--यामुळे सामान्य जनांचा काय लाभ होणें शक्य आहे— परार्थ केलेलें कर्म बन्धनकारक होत नाही— मायेचें आवरण दूर झाल्यावरच जीवांचे ठिकाणीं ब्रह्मविकास--या ब्रह्मविकासामुळेच सत्यसंकल्पत्व लाभतें— मठाला सर्वधर्मसमन्वयकेन्द्रांत परिणत करणें--शुद्धाद्वैताचा व्यवहार संसारांतील सर्व अवस्थांत करतां येतो हें दाखविण्यासच स्वामीजींचें आगमन--वेदान्तवाद्यांपैकी एका पंथाचें मत असें की संसारांतील सर्वजण १८९

पृष्ठ
जोंवर मुक्त होत नाहीत तोंवर तुम्हांला मुक्ति नाही--ब्रह्मज्ञान झाल्यावर स्थावर-जंगमात्मक समग्र जग, सारे जीव आपणच आहोंत अशी अनुभूति—अज्ञानाचा अवलंब केल्यानेच जगांतील सारे व्यवहार चालतात—अज्ञानाचा आदि व अन्त—शास्त्रें सांगतात की प्रवाहरूपाने अज्ञान नित्यसें भासतें पण तें आहे सान्तच- सारें ब्रह्माण्ड हें ब्रह्मावरील एक अध्यास--जें पूर्वी कधी पाहिलें नाही त्याचा अध्यास होतो वा नाही--ब्रह्मतत्त्वास्वादन मूकास्वादनाप्रमाणे आहे. १८९

अध्याय २३

स्थळ--बेलूर मठ (बांधणीचा काळ). वर्ष—इ. स. १८९८.

विषय—भारताच्या उन्नतीचा उपाय काय ? परार्थ कर्म वा कर्मयोग. २०२

अध्याय २४

स्थळ—बेलूर मठ (बांधणीचा काळ). वर्ष—इ. स. १८९८.

विषय-- ज्ञानयोग व निर्विकल्प समाधि--अभीः--सर्वांनाच एक दिवस ब्रह्मवस्तूचा लाभ होईल. २०९

अध्याय २५

स्थळ—बेलूर मठ (बांधणीचा काळ). वर्ष इ. स. १८९८.

विषय-- 'शुद्ध ज्ञान व शुद्ध भक्ति एक' -पूर्ण ज्ञान असल्याखेरीज प्रेमानुभूति असंभव--यथार्थ ज्ञान वा भक्ति जोंवर लाभत नाही तोंवरच विवाद-- धर्मराज्यांत वर्तमानकालीं भारतांत कशा प्रकारचें धर्माचरण ठेवावयास हवें--श्रीरामचंद्र, महावीर व गीताकार श्रीकृष्ण यांच्या पूजनाचा प्रसार करणें आवश्यक-- अवतार-महापुरुषांच्या आविर्भावाचा हेतु व श्रीरामकृष्णमाहात्म्य. २१७

अध्याय २६

स्थळ—बेलूर मठ (बांधणीचा काळ). वर्ष—इ. स. १८९८.

विषय—धर्मलाभ करण्यासाठी कामकांचनासक्तीचा त्याग करणें गृहस्थ व संन्यासी या दोघांनाहि सारखेंच आवश्यक--कृपासिद्ध कोणाला म्हणतात --देश-काल-निमित्तांच्या अतीत असलेल्या साम्राज्यांत कोण कुणावर कृपा करणार ? २२४

अध्याय २७

स्थळ—बेलूर मठ (बांधणीचा काळ). वर्ष—इ. स. १८९८. पृष्ठ

विषय-- खाद्याखाद्य विचार कसा करायला हवा--मांसाहार कुणी कुणी करावा--भारतांतील वर्णाश्रमधर्माची कशा प्रकारें पुन्हा स्थापना व्हावयास हवी. २३०

अध्याय २८

स्थळ--बेलूर मठ (बांधणीचा काळ). वर्ष—इ. स. १८९८.

विषय--भारताच्या दुर्दशेचें कारण--ती दूर करण्याचे उपाय-- वैदिक साच्यांत घालून देशाला पुन्हा घडविणें व मनु, याज्ञवल्क्यादिकांप्रमाणे पुरुष तयार करणें. २३७

अध्याय २९

स्थळ-- बेलूर मठ (बांधणीचा काळ). वर्ष-- इ. स. १८९८.

विषय— स्थल-कालादिकांच्या शुद्धतेचा विचार कोठवर ?--आत्मप्रकटनाच्या मार्गांतील विघ्नाचा नाश करते तीच साधना-- 'ब्रह्मज्ञानांत कर्माचा लवलेश मात्र नाही' या शास्त्रवाक्याचा अर्थ-- निष्काम कर्म कशाला म्हणतात ?-- कर्माद्वारें आत्मलाभ होत नाही, तरीहि स्वामीजी देशांतील लोकांना कर्मप्रवृत्त करतात तें कां ?-- भारताचा भावी काल कल्याणमय आहे हें निश्चित. २४५

अध्याय ३०

स्थळ-- बेलूर मठ (बांधणीचा काळ). वर्ष-- इ. स. १८९९.

विषय--ब्रह्मचर्यरक्षणाचे कठोर नियम-- सात्त्विक प्रवृत्तीचे लोकच ठाकुरांचा भाव घेऊं शकतील-- फक्त ध्यानधारणादिकांतच मग्न राहणें हा या युगाचा धर्म नव्हे-- आता गरज आहे त्यांच्या जोडीला गीताप्रणीत कर्मयोगाची. २५३

अध्याय ३१

स्थळ-- बेलूर मठ. वर्ष— इ. स. १८९९, सुरवातीचा काळ.

विषय-- स्वामीजी व नागमहाशय यांची भेट— परस्परांची परस्परांबद्दल उच्च धारणा. २५७

राजा ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.

अनुक्रम ............ वि. ............
क्रमांक
अध्याय ३२............ नोंः दिः ............

स्थळ-- बेलूर मठ. वर्ष-- इ. स. १८९९ पृष्ठ

विषय-- ब्रह्म, ईश्वर, माया व जीव यांचें स्वरूप-- सर्वशक्तिमान व्यक्तिविशेष म्हणून ईश्वराची धारणा करून साधनेंत प्रगति केल्यास क्रमाने त्याचें यथार्थ स्वरूप समजू शकतें— 'अहं ब्रह्म' हा बोध न झाल्यास मुक्ति नाही— कामकांचनभोगाची स्पृहा सोडल्याखेरीज व महापुरुषांच्या कृपेचा वरदहस्त न लाभल्यास हा बोध होणें शक्य नाही-- आंतरिक व बाह्य संन्यासानेच आत्मज्ञानलाभ-- 'होईल, पुढे पाहूं' असला ढिलेपणाचा भाव सोडून द्यावयास हवा— कशा प्रकारच्या विचाराने आत्मज्ञान-लाभ होतो-- मनाचें स्वरूप, मनःसंयम कशा प्रकारें करावयास हवा-- ज्ञानमार्गी साधकाने आपल्या यथार्थ स्वरूपालाच ध्यानाचा विषय म्हणन स्वीकारावयास हवें— अद्वैतावस्थालाभानंतर अनुभव-- ज्ञान, भक्ति, योग वगैरे साऱ्याच मार्गांचें उद्दिष्ट, जीवाला ब्रह्मज्ञ करणें-- अवतारतत्त्व-- आत्मज्ञानलाभासाठी प्रोत्साहन-- आत्मज्ञ पुरुषाचें कर्म 'जगत्-हिताय' असतें. २६३

अध्याय ३३

स्थळ— बेलूर मठ वर्ष— इ. स. १९०१

विषय— कलकत्ता येथील ज्युबिली आर्ट ॲकॅडेमींतील अध्यापक श्री. रणदाप्रसाद दासगुप्त यांच्याबरोबर स्वामीजींचें शिल्पकलेसबंधी बोलणें-- कृत्रिम पदार्थांद्वारा मनोभावना व्यक्त करणें हेंच शिल्पकलेचें उद्दिष्ट असावयास हवें-- भारतांतील बुद्धयुगीन शिल्प या बाबतींत जगांत सर्वोत्कृष्ट-- फोटोग्राफीचें साहाय्य घेतल्याने युरोपमधील शिल्पाची भावप्रकटनाबाबत झालेली अवनति-- भिन्न भिन्न जातींच्या शिल्पाचें वैशिष्टच असतें-- जडवा ी युरोपच्या व अध्यात्मवादी भारताच्या शिल्पांतील वैशिष्टच-- शिल्पाची वर्तमान भारतांत झालेली अवनति— देशांतील सर्वच विद्यांत व भावांत प्राणसंचार करण्यासाठीच श्रीरामकृष्णांचें आगमन. २७६

अध्याय ३४

स्थळ— बेलूर मठ. वर्ष— इ. स. १९०१ पृष्ठ

विषय— श्रीरामकृष्णांच्या शक्तींचा स्वामीजींत संचार -- पूर्वबंगाल-संबंधी बोलणीं -- नागमहाशयांच्या घरीं स्वामीजींना पाहुण-चार— आचार व निष्ठा यांचें प्रयोजन -- कामकांचनासक्तीचा त्याग केल्याने आत्मदर्शन. २८५

अध्याय ३५

स्थळ— बेलूर मठ. वर्ष-- इ. स. १९०१

विषय— स्वामीजींचा मनोनिग्रह -- स्त्रियांसाठी मठ स्थापण्या-संबंधी शिष्याशीं बोलणें -- एकच चितसत्ता स्त्री-पुरुषांत समभावें विद्यमान — प्राचीनकालीं स्त्रीला शास्त्रांत कितपत अधिकार होता -- स्त्रीच्या यथोचित गौरवाखेरीज कोणत्याहि देशाची उन्नति होणें शक्य नाही -- तंत्रोक्त वामाचाराचा दूषित भावच फक्त त्याज्य; एरव्ही त्यांतील स्त्रीजातीचा सन्मान व पूजाभाग ग्राह्य व अनुष्ठेय -- भावी स्त्री-मठाची नियमावली -- या मठां-तील शिक्षित ब्रह्मचारिणींद्वारा समाजाचें कसें अपूर्व कल्याण साधेल -- परब्रह्माच्या ठिकाणीं स्त्री-पुरुष भेद नाही — हा भेद आढळतो फक्त 'मी-तूं'च्या राज्यांत - म्हणूनच स्त्रिया ब्रह्मज्ञ होणें अशक्य नाही -- प्रचलित स्त्री-शिक्षणांत अनेक दोष जरी असले तरी तें संपूर्ण टाकाऊ नाही -- शिक्षणाचा पाया म्हणून धर्म योजावयास हवा -- मानवाच्या आंतरिक ब्रह्मविकासाला साहाय्यक कार्यच सत्कार्य -- वेदान्त-प्रतिपादित ब्रह्मज्ञानांत कर्माचा संपूर्ण अभाव असला तरी तें मिळविण्यासाठी कर्माचा उपयोग गौरवास्पद, कारण कर्मामुळेच चित्तशुद्धि शक्य होते व चित्तशुद्धि झाल्याखेरीज ज्ञान अशक्य. २९५

अध्याय ३६

स्थळ-- बेलूर मठ. वर्ष— इ. स. १९०१

विषय-- स्वामीजींचा असाधारण इंद्रियसंयम-- त्यांचें शिष्यप्रेम व ३०८

पृष्ठ

असाधारण मेधा-- राय गुणाकार भारतचंद्र व मायकेल मधुसूदन दत्त यांच्यासंबंधी त्यांचें मत. ३०८

अध्याय ३७

स्थळ-- बेलूर मठ. वर्ष-- इ. स १९०१

विषय-- आत्मा इतका जवळ असूनहि त्याची अनुभूति- सहजा-सहजी होत नाही असें कां ?-- अज्ञान अपसारित झालें, ज्ञानोदय झाला की जीवाच्या मनांत नाना प्रकारचे संशय, प्रश्न उत्पन्न होणें थांबतें-- स्वामीजींची ध्यानतन्मयता. ३१४

अध्याय ३८

स्थळ-- बेलूर मठ. वर्ष-- इ. स. १९०१

विषय-- आपल्या इच्छेनुसार कार्य होत नाहीसें पाहून स्वामीजींना झालेलें दु:ख-- प्राप्त परिस्थितींत देशासमोर कोणता आदर्श ठेवणें कल्याणप्रद होईल-- महावीराचा आदर्श-- देशांत वीरांच्या कठोरजीवनाला उपयुक्त अशा साऱ्या गोष्टींबद्दल आदर प्रचलित व्हावयास हवा-- कोणत्याहि स्वरूपांतील दुर्बलतेचा त्याग करावयास हवा-- स्वामीजींच्या वाणींतील अद्भुत शक्तीचा प्रत्यय-- लोकशिक्षणार्थ शिष्याला प्रोत्साहन-- सर्वांची मुक्ति झाल्याखेरीज व्यक्तीला सुटका नाही या मताची आलोचना-- सतत जगाची कल्याणकामना करून जगत्कल्याण साधणें. ३२०

अध्याय ३९

स्थळ-- बेलूर मठ. वर्ष-- इ. स. १९०१

विषय-- मठासंबंधी कर्मठ हिंदूंच्या पूर्वकल्पना-- मठांत साजरा झालेला दुर्गोत्सव व या कल्पनांचें खंडन-- आपल्या जन्मदात्या आईसह स्वामीजींनी घेतलेलें कालीघाट-दर्शन व त्या ठिकाणीं असलेल्या उदार भावासंबंधी त्यांनी व्यक्त केलेलें मत-- स्वामीजींसारखे ब्रह्मज्ञ पुरुष देवदेवीपूजन करतात ही विचारांत घेण्यासारखी गोष्ट-- धर्मरक्षणासाठीच महापुरुषांचें जन्मग्रहण-- देवदेवतांचें पूजन करूं नये असें कुणी प्रतिपादिल्यास स्वामीजी तें ३३१

पृष्ठ

कधीहि मान्य करीत नसत— स्वामीजींसारखा सर्वगुणसंपन्न ब्रह्मज्ञ महापुरुष या युगीं अन्य झाला नाही-- त्यांनी दर्शविलेल्या मार्गाने जाण्यांतच जीवांचें व देशाचें कल्याण होणार हें निश्चित. ३३१

अध्याय ४०

स्थळ-- बेलूर मठ. वर्ष-- इ. स. १९०२

विषय-- भविष्यकालीं ठाकुरांचा जन्मोत्सव कशाप्रकारें साजरा होणें उचित-- शिष्याला दिलेला आशीर्वाद-- 'इथे ज्या अर्थी येऊन पोहोचला आहेस त्या अर्थी निश्चित ज्ञानलाभ होईलच'-- गुरु शिष्याला कितपत व कोठवर साहाय्य करूं शकतात— अवतारपुरुष एका क्षणांत जीवाचीं सारीं बंधनें तोडून, खंडून टाकूं शकतात-- कृपातत्त्व-- ठाकुरांनी शरीर सोडून दिल्यानंतर त्यांचें झालेलें दर्शन-- पवहारी बाबा व स्वामीजी यांचा संवाद. ३४१

अध्याय ४१

स्थळ-- बेलूर मठ. वर्ष -- इ. स. १९०२

विषय-- जीवनाच्या शेषभागीं स्वामीजी कोणत्या भावाने मठांत राहत असत-- त्यांची दरिद्रनारायणसेवा-- देशांतील दुःखी गरीबांबद्दल त्यांना वाटणारी ज्वलंत सहानुभूति. ३५१

अध्याय ४२

स्थळ-- बेलूर मठ. वर्ष— इ. स. १९०२ (सुरवातीचा काळ)

विषय-- श्रीरामकृष्णांच्या संन्यासी शिष्यांची वराहनगर मठांतील साधना-- मठाच्या प्रारंभीचा काल— स्वामीजींच्या जीवनांतील कांही दुःखकष्टांचे दिवस-- संन्यासाचे कठोर नियम. ३५८

अध्याय ४३

स्थळ— बेलूर मठ. वर्ष-- इ. स. १९०२

विषय-- बेलूर मठांतील ध्यान-जप-अनुष्ठान-- विद्यारूपिणी कुलकुंडलिनीचें जागरण झाल्यावर आत्मदर्शन-- मनाची सविकल्प व निर्विकल्प अवस्था-- कुलकुंडलिनीच्या जागृतीचा उपाय— ३६४

पृष्ठ

भावसाधनेच्या मार्गांतील अडथळे — कीर्तनादिकानंतर अनेकांत पाशवी प्रवृत्ति प्रबळ झालेल्या दिसतात असें कां ?— ध्यानाचा आरंभ कसा करावयास हवा-- ध्यानादिकांबरोबरच निष्काम कर्माचें अनुष्ठान करण्याचा उपदेश. ३६४

अध्याय ४४

स्थळ—बेलूर मठ. वर्ष--इ. स. १९०२.

विषय-- मठांत कठोर नियमांची स्थापना--'आत्माराम-कुंभ' व त्याच्या शक्तीची पारख--स्वामीजींच्या माहात्म्याबाबत शिष्याचें स्वामी प्रेमानंदांबरोबर बोलणें-- पूर्वबंगालमध्ये अद्वैतवादाचा प्रसार करण्यासाठी स्वामीजींनी शिष्याला दिलेलें प्रोत्साहन व तो विवाहित असूनहि त्याला धर्मलाभ होईल असें त्यांनी त्याला दिलेलें अभयदान —ठाकुरांच्या संन्यासी शिष्यवर्गाबद्दल स्वामीजींच विश्वास--नागमहाशयांचा सिद्ध-संकल्प. ३७०

अध्याय ४५

स्थळ--कलकत्ता ते मठ, नौकेंत. वर्ष--इ. स. १९०२.

विषय-- स्वामीजींची निरभिमानता--कामकांचनाचा त्याग केल्याखेरीज ठाकुरांना समजणें अशक्य--ठाकुरांचे अन्तरंग भक्त कोण--सर्वस्वत्यागी संन्यासी भक्तांनीच नेहमी अवतारांच्या भावांचा प्रचार केलेला आहे--गृहस्थ भक्त ठाकुरांबद्दल जें म्हणतात तेंहि कांही अंशीं सत्यच —महान् ठाकुरांच्या बिंदुमात्र भावानेहि माणूस धन्य होतो— संन्यासी भक्तांना ठाकुर विशेष उपदेश देत - कालांतराने सारी पृथ्वी ठाकुरांचा उदार भाव स्वीकारील---ठाकुरकृपेला पात्र झालेल्या साधूंची सेवा केल्यास मानवांचें कल्याण होईल. ३७९

अध्याय ४६

स्थळ--बेलूर मठ. वर्ष--इ. स. १९०२.

विषय--आपला देशीय आहार, पोषाख व आचार सोडणें दूषणा- ३८७

पृष्ठ

स्पद-- कुणाहिपासून विद्या शिकतां येते, पण ज्या शिक्षणाने ३८७
देशीय वैशिष्टचें लोपतात तें शिक्षण सर्वथा परित्याज्य --
स्वच्छतेसंबंधी शिष्याशीं बोलणें—ध्यान-एकाग्रता लाभावी म्हणून
शिष्याची स्वामीजींना प्रार्थना--स्वामीजींनी शिष्याला दिलेला
आशीर्वाद--निरोप.

---



स्वामी विवेकानन्द

अनुक्रम ........ वि: ..........
क्रमांक .............................. नों: दि: ..........
दा. क्र. ८७८८

# स्वामी विवेकानंदांच्या सहवासांत

## प्रथम अध्याय

### प्रथम दर्शन

स्थळ :— कलकत्ता, कै. प्रियनाथ मुखोपाध्याय यांचें घर, बागबाजार.

वर्ष :— इ. स. १८९७

विषय :— स्वामीजींशीं शिष्याचा (श्री. शरच्चंद्र चक्रवर्ती यांचा) प्रथम परिचय—'मिरर' पत्राचे संपादक श्री. नरेन्द्रनाथ सेन यांच्या-बरोबर संभाषण—इंग्लंड व अमेरिका यांची तुलना—पाश्चिमात्य देशांत भारतवासीयांनी केलेल्या धर्मप्रचाराचें भवितव्य—धर्म व राजकारण यांपैकी भारताचें कल्याण कशांत? गोरक्षण-प्रचारका-बरोबर बोलणें—मनुष्यरक्षण हें आद्य कर्तव्य.

परदेशांतील प्रचार संपवून प्रथमच भारतांत येऊन कलकत्त्यांत पदार्पण करण्याला स्वामीजींना तीनचार दिवस झाले आहेत. अनेक दिवसांनंतर त्यांचें पुण्यदर्शन झाल्याने श्रीरामकृष्णभक्तमंडळींच्या आनंदाला आता जणु सीमाच नाही. भक्तमंडळींपैकी सुखवस्तु लोक मोठ्या आदराने स्वामीजींना आपल्या घरीं बोलावून स्वतःला धन्य व कृतार्थ मानताहेत. आज दुपारीं बागबाजारांतील राजवल्लभ आळींत राहणाऱ्या श्रीरामकृष्णभक्त श्रीयुत प्रियनाथ मुखोपाध्याय यांचे येथे स्वामीजींना निमंत्रण आहे. ही बातमी कळल्याने अनेक भक्त त्यांच्या घरीं उपस्थित झाले आहेत. शिष्य (श्री. शरच्चंद्र चक्रवर्ती) देखील लोकांच्या तोंडून ही बातमी कळल्याने दुपारीं अडीचच्या सुमाराला त्यांच्या घरीं हजर झाला. स्वामीजींशीं अद्यापहि त्याचा प्रत्यक्ष परिचय झालेला नाही. याच वेळीं

स्वामीजींचें प्रत्यक्ष दर्शन होण्याची संधि प्रथमच त्याच्या जीवनांत त्याला लाभली होती.

शिष्य येतांच स्वामी तुरीयानंदांनी त्याला स्वामीजींकडे नेऊन त्याचा त्यांच्याशीं परिचय करून दिला. मठांत आल्यानंतर शिष्याने रचलेलें स्तोत्र वाचून यापूर्वीच स्वामीजींनी त्याच्या-संबंधी माहिती ऐकिली होती. श्रीरामकृष्णांचे भक्तवरिष्ठ नागमहाशय यांच्याकडे त्याचें जाणेंयेणें आहे ही गोष्टहि स्वामी-जींच्या कानीं गेली होती.

स्वामीजींना प्रणाम करून त्यांच्याजवळ बसतांच त्यांनी शिष्याला नागमहाशयांसंबंधी संस्कृतांत कुशल प्रश्न विचारले, व नागमहाशयांचा अलौकिक त्याग, प्रबल भक्तिप्रेम व दीनता वगैरेंचा उल्लेख करून ते म्हणाले, "वयं तत्त्वान्वेषान्मधुकर हतास्त्वं खलु कृती"—सत्य काय हें जाणून घेण्याच्या व्यर्थ शोधांतच आम्ही हैराण झालों आहोंत, पण याउलट यश मिळाल्याने, हे मधुकरा ! तूं मात्र कृतार्थ झाला आहेस. आपलें हें म्हणणें नागमहाशयांना कळविण्यास त्यांनी शिष्याला सांगितलें. नंतर येणाऱ्याजाणाऱ्यांच्या वाढत्या गर्दीने मनमोकळें बोलतां येणार नाही असें पाहून त्याला व स्वामी तुरीयानंदांना पश्चिमेच्या बाजूस असलेल्या लहान खोलींत ते घेऊन गेले व शिष्याला उद्देशून त्यांनी विवेकचूडामणींतील पुढील श्लोक म्हटला--

मा भैष्ट विद्वन् तव नास्त्यपायः<br>
संसारसिन्धोस्तरणेऽस्त्युपायः ।<br>
येनैव याता यतयोऽस्य पारं<br>
तमेव मार्गं तव निर्दिशामि ॥

--"हे सुजाणा ! भयाचें कांहीहि कारण नाही. विनाशाचें

तुला भय नाही. हा संसारसागर तरून जाण्यालाहि उपाय आहेच. त्याचाच अवलंब करून वीतराग, शुद्धसत्त्व योगीगण हा संसारसागर तरून गेले आहेत. तोच सर्वश्रेयस्कर मार्ग मी तुला दाखवितों." त्यांनी त्याला आचार्य शंकरांचा विवेकचूडामणि हा ग्रंथ वाचण्यास सांगितलें.

हें ऐकून मंत्रदीक्षा घेण्याबाबत तर स्वामीजी सुचवीत नाहीत ना असा एक विचार शिष्याच्या मनांत येऊन गेला. हा वेळपर्यंत तो अत्यंत कांटेकोरपणें आचारविचार पाळणारा कर्मठ व वेदान्तमतवादी होता. गुरु करण्याबाबत अद्यापहि त्याचें निश्चित कांहीच ठरलें नव्हतें. आणि वर्णाश्रमव्यवहारपालनाबाबत तो फार आग्रही होता.

अशा प्रकारें नाना विषयांवर बोलणीं चाललीं असतांनाच 'मिरर' पत्राचे संपादक श्रीयुत नरेन्द्रनाथ सेन हे बाहेर आल्याची कुणीं तरी वर्दी दिली. त्यांना आंतच घेऊन यावयास स्वामीजींनी सांगितलें. नरेन्द्रबाबूहि त्या लहान खोलींत येऊन बसले, व अमेरिका आणि इंग्लंडबद्दल त्यांनी स्वामीजींना अनेक प्रश्न विचारावयास सुरवात केली. त्यांच्या प्रश्नांना उत्तर देतांना स्वामीजी म्हणाले की, "अमेरिकन लोकांप्रमाणे सहृदय, उदारचरित, अतिथिसत्कारपरायण व नवनवीन भाव ग्रहण करण्यासाठी समुत्सुक असलेली जात जगांत अन्यत्र आढळून येत नाही. अमेरिकेंत जें कांही कार्य झालें तें माझ्या बळावर नाही. अमेरिकन लोकच मुळांत सहृदय असल्याने त्यांनी हा वेदान्तमतवाद स्वीकारला." इंग्लंडबद्दल बोलतांना स्वामीजी म्हणाले, "इंग्रज लोकांइतकी सनातनी वृत्तीची, रूढिप्रिय जात जगांत नाही. कोणत्याहि नवीन मताला ते सहजींच मान्यता देतील हें शक्य नाही. पण सायासपूर्वक एकदा का त्यांना एखादें नवीन

मत पटवून दिलें, तर मग मात्र ते तें मत सोडतील असें होणार नाही. अशा प्रकारचा दृढनिश्चय अन्य कोणत्याहि लोकांत आढळत नाही. म्हणूनच संस्कृति आणि बलशालीत्वांत त्यांना आज साऱ्या जगांत अग्रपूजेचा मान मिळतो आहे."

योग्य प्रचारक मिळाल्यास अमेरिकेपेक्षा इंग्लंडमध्ये वेदान्त-कार्य अधिक स्थायी होण्याची शक्यता आहे असें सांगून ते म्हणाले, "मीं फक्त पायाभरणीचें काम मात्र केलें आहे. यानंतर जाणाऱ्या प्रचारकांनी जर अशाच रीतीने काम पुढे चालूं ठेविलें तर कालान्तराने खूपच कार्य होईल."

नरेन्द्रबाबू:-- अशा प्रकारच्या धर्मप्रचाराचें भविष्यकालांत आम्हांला काय फळ मिळेल ?

स्वामीजी:-- आमच्या देशाजवळ आहे काय तो फक्त हा वेदान्तधर्म. पाश्चिमात्य संस्कृतीच्या तुलनेने आपल्यापाशी दुसरें जवळजवळ कांहीच नाही. पण जो साऱ्या मतांच्या, साऱ्या पंथांच्या लोकांना धर्मलाभाचा समान अधिकार देतो, त्या या विश्वधर्म वेदान्ताचा प्रचार झाल्यास पाश्चात्य संस्कृतींतील लोकांना कळून येईल की या भारतवर्षांत एकेकाळीं केवढ्या एका अद्‌भुत धर्मभावाचें स्फुरण झालें होतें आणि अद्यापहि होत आहे. वेदान्ताच्या या प्रचारानेच पाश्चिमात्यांना आमच्याबद्दल श्रद्धा, सहानुभूति वाटूं लागेल. त्यांच्यांत या भावनांचा उदय झाल्याचें तर आताच दिसून येत आहे. या तऱ्हेने त्यांची यथार्थ श्रद्धा व सहानुभूति आपण संपादन करूं शकल्यास त्यांच्याजवळून भौतिक विज्ञानादिकांचें शिक्षण घेऊन हा जीवनसंग्राम आपण अधिक योग्य प्रकारें लढूं शकूं. मोबदल्यांत ते आपल्यापासून हा वेदान्त ग्रहण करतील व त्यायोगें पारमार्थिक कल्याण साधून घेण्यास समर्थ होतील.

नरेन्द्रबाबू:--अशा प्रकारच्या देवाणघेवाणीने आपल्या राजकीय उन्नतीची कांही आशा आहे का ?

स्वामीजी:--हे पाश्चात्य लोक म्हणजे महापराक्रमी विरोचनाचे वंशज. आपल्या बाहुबलावर ते पंचमहाभूतांकडून कळसूत्री बाहुलीप्रमाणे कामें करून घेतात. त्यांच्याबरोबरच्या झगडयांत या स्थूल भौतिक शक्तींच्या जोरावर आपण एक ना एक दिवस स्वतंत्र होऊं अशी जर आपली धारणा असेल तर ती साफ चुकीची आहे. बलाच्या दृष्टीने विचार केल्यास हिमालयासमोर ठेवल्याने अति क्षुद्र दिसणाऱ्या लहानशा गोटयासारखी आपली अवस्था आहे. माझी काय कल्पना आहे माहीत आहे ? आम्ही वेदान्तोक्त धर्माचें गूढ रहस्य पाश्चात्य जगांत प्रसारित करून त्या अमितबलसंपन्न लोकांची श्रद्धा व सहानुभूति संपादन करूं शकूं व अशाने धर्माच्या बाबतींत त्यांचें गुरुत्व प्राप्त करून घेऊं आणि याउलट ऐहिक विषयांच्या बाबतींत ते आपले गुरु होतील. ज्या दिवशीं धर्मकर्माच्या साऱ्या गोष्टी भारतवासी लोक पाश्चिमात्यांच्या हातीं सोपवून देऊन धर्मरहस्य समजून घेण्यासाठी त्यांच्या पायाशीं बसून त्यांच्या तोंडाकडे पाहतील, त्या दिवशीं या अधःपतित देशाची राष्ट्रीय अस्मिता निःशेष नष्ट होईल. 'हें द्या', 'तें द्या' अशी सदोदित रात्रंदिवस भीक मागून कांहीहि होणें शक्य नाही. या आदानप्रदानाने दोघांमध्ये श्रद्धा-सहानुभूतीचा एक प्रेमळ ऋणानुबंध निर्माण झाल्यावर केविलवाण्या स्वराने सारखी भीक मागत राहण्याचें कांही कारणच उरणार नाही. आपण होऊनच ते साऱ्या गोष्टी करतील. माझा तर ठाम विश्वास आहे की वेदान्तप्रचाराने या व पाश्चिमात्य देशांचा उभयपक्षीं लाभच होईल. माझ्या दृष्टीने वेदान्ताच्या तुलनेने राजकारण हा गौण उपाय ठरतो. माझा हा विश्वास

कार्यान्वित करण्यांतच मी माझें जीवन वेचीन. अन्य कोण्या मार्गानें भारताचें कल्याण होईल असें तुम्हांला वाटत असल्यास तुम्ही त्या मार्गाने जा.

स्वामीजींच्या विधानांशीं आपली संपूर्ण संमति दाखवन कांही वेळाने नरेन्द्रबाबू निघून गेले. स्वामीजींचें सारें बोलणें ऐकून शिष्य तर अगदी थक्क होऊन गेला व स्वामीजींच्या तेजोद्दीप्त मुखाकडे अनिमेष नेत्रांनी पाहत राहिला.

नरेन्द्रबाबू निघून गेल्यावर गोरक्षण मंडळाचा एक प्रचारक स्वामीजींच्या भेटीला आला. पूर्ण जरी नसला तरी त्याचा वेष कांहीसा संन्याशासारखा होता. डोक्याला भगव्या रंगाचा फेटा. चेहरा पाहतांच तो हिंदुस्थानी असल्याची खात्री पटे. तो आल्याचें कळतांच स्वामीजी समोरच्या खोलींत आले. स्वामीजी येतांच त्यांना वंदन करून त्याने गाईचें एक चित्र स्वमीजींना दिलें. जवळच बसलेल्या माणसाच्या हातीं तें चित्र देऊन स्वामीजींनी त्याच्याशीं बोलावयास सुरवात केली.

स्वामीजी:--आपल्या या मंडळाचा उद्देश काय ?

प्रचारक:--आम्ही देशांतील गाईंची कसायांच्या हातून सुटका करतों. जागोजाग गोशाळा बांधून तेथे रोगी, दुर्बल आणि कसायांच्या हातून सोडविलेल्या गाईंचें पालनपोषण करतों.

स्वामीजी:--फार चांगलें काम आहे आपलें हें. हा खर्च चालवायला पैशांची काय व्यवस्था करतां तुम्ही ?

प्रचारक:--आपल्यासारखे उदार लोक दयाबुद्धीने जें कांही देतात त्यांतूनच हा खर्च आम्ही चालवितों.

स्वामीजी:--आतापावेतो आपल्यापाशी किती पैसा जमला आहे ?

प्रचारक:--मारवाडी व्यापारी लोक या कामांत सढळ

हाताने पैसा ओततात. त्यांनी या कामासाठी बराच पैसा दिलेला आहे.

स्वामीजी:--मध्यभारतांत भयंकर विक्राळ दुष्काळ पडला आहे. खुद्द सरकारने नऊ लाख लोक ‘अन्न अन्न’ करीत मेल्याचें आपल्या रिपोर्टांत जाहीर केलें आहे. आपल्या मंडळाने या भुकेलेल्यांना मदत करण्यासाठी कांही करण्याचें ठरविलें आहे काय ?

प्रचारक:--असल्या दुष्काळाबिष्काळाच्या कामांत आम्ही भाग घेत नाही. गोमातेचें रक्षण करण्याच्या हेतूनेच आमचें हें मंडळ स्थापन झालें आहे.

स्वामीजी:--लाखोंच्या संख्येने ‘अन्न अन्न’ करून आपल्या-सारखींच माणसें दुष्काळांत मरत असतांना या वेळीं शक्य असूनहि त्यांना पोटाला अन्न देऊन मदत करणें तुम्हांला योग्य वाटत नाही काय ?

प्रचारक:--नाही. हा दुष्काळ म्हणजे त्यांच्या कर्माचें, पापाचेंच फल होय. जसें करावें तसें भरावें. जसें कर्म तसें फळ.

प्रचारकाचें तें उत्तर ऐकून स्वामीजींचें मुखमंडल अगदी लाल झालें आणि त्यांच्या त्या विशाल डोळ्यांतून जणु आग बाहेर पडूं लागली. पण संतापाची ती ऊर्मि आंतल्या आंत दाबून ते म्हणाले, “ज्या सभा, जीं मंडळें माणसासारख्या माणसाकडे सहानुभूतीच्या दृष्टीने पाहत नाहीत, आपलेच बंधुबांधव उपासमारीने तडफडत मरत असल्याचें पाहूनहि त्यांचे प्राण वांचविण्यासाठी एक मूठ धान्य न देतां पशुपक्ष्यादिकांचें प्राण वांचविण्यासाठी धान्याचे ढीगचे ढीग वांटण्याकरता जे पुढे सरसावतात, त्यांचेबद्दल मला काडीचीहि सहानुभूति वाटत नाही. अशांच्याकडून समाजाचा कांही विशेष फायदा होणें

सर्वथा अशक्य असें माझें मत आहे. माणूस आपल्या कर्मानें मरतो असें म्हणून कानावर जर हात ठेवले तर जगांत प्रयत्नाला कांही अर्थच राहणार नाही. आणि मग गाईंना वांचविण्याच्या तुमच्या या धडपडीला तरी काय अर्थ ? आपल्या कर्मांनीच गाई कसायाहातीं पडतात आणि मरतात. आम्ही त्यांच्यासाठी अंग मोडून काम करण्याला कांही अर्थच नाही.

प्रचारक तर हें ऐकून किंचित् हादरलाच. पण स्वत:ला सावरून तो म्हणाला, "आपण म्हणतां तें तर खरेंच. पण शास्त्रांत सांगितलें आहे, 'गाय आपली आई.'"

यावर किंचित् हसून स्वामीजी म्हणाले, 'हो, गाय आपली आई हें तर उघडच दिसतें आहे. एरवी असली अलौकिक प्रजा आणखी कुणापोटीं बरें निपजणार ?' स्वामीजींनी मारलेला हा टोमणा त्या प्रचारकाच्या लक्षांतच आला नसावा असें दिसतें! अधिक चर्चा न करतां स्वामीजींनी या कार्याला कांही मदत करावी अशी त्याने विनंती केली.

स्वामीजी:--हें बघा, मी तर हा असा संन्यासी, फकीर. तुम्हांला द्यावयाला माझ्यापाशी कुठून बरें पैसा येणार ? आणि यदाकदाचित् माझ्या हातीं पैसा आलाच तर तो मी आधी माणसांच्या सेवेसाठी खर्च करीन. प्रथम वांचवावयाला हवा माणूस--आधी त्याला द्यावयाला हवें अन्नदान, विद्यादान, धर्मदान. हें सारें करून जर माझ्या हातीं कांही शिल्लक राहिलें तर मी तुमच्या संस्थेला कांही देऊं शकेन.

स्वामीजींचें बोलणें ऐकून त्यांना नमस्कार करून तो प्रचारक निघून गेला. तो गेल्यावर स्वामीजी पुढे म्हणाले, "काय पण बोलला ! म्हणे की माणूस मरतो आपल्या कर्मांनी, त्याला दया दाखवून काय होणार ? देशाचा अध:पात झाल्याचें ह्याच्या-

इतकें दुसरें स्पष्ट प्रमाण नाही. हिंदुधर्मातील तुमचा कर्मवाद कुठल्या अधोगतीला जाऊन पोहोचला आहे हें पाहिलें? माणसासारखा माणूस असूनहि माणसासाठी ज्याचें हृदय द्रवत नाही, त्याला काय माणूस म्हणायचें?" हें बोलत असतां स्वामीजींचें सारें अंग क्षोभ, आणि दुःख यांनी थरारून गेलें. नंतर त्यांनी शिष्याला पुनः भेटावयास येण्याबद्दल सांगितलें.

शिष्यः––आपण उतरणार आहांत कुठे? बहुतेक उतरणार असाल एखाद्या मोठ्या माणसाकडे. ते काय मला तेथे येऊं देतील?

स्वामीजीः––सध्या तर मी सील यांच्या काशीपूरच्या उद्यानगृहांत राहणार आहें. तुम्ही तेथे या.

शिष्यः––महाराज, अगदी आपल्या एकट्याशींच बोलण्याची माझी फार इच्छा आहे.

स्वामीजीः––ठीक आहे. तसें असेल तर मग एखादे दिवशीं रात्रीं या. खूप बोलूं वेदान्तावर मग.

शिष्यः––महाराज, आपल्याबरोबर कांही इंग्रज व अमेरिकन लोक आल्याचें मीं ऐकलें आहे. माझ्या वेषाने, आचार-व्यवहाराने वा बोलण्याने त्यांना कांही त्रास तर होणार नाही ना?

स्वामीजीः––तींहि तर माणसेंच आहेत ना? त्यांतूनहि ते सारे लोक आहेत वेदान्तधर्मनिष्ठ. तुमच्याशीं बोलून तर त्यांना उलट आनंदच होईल.

शिष्यः––महाराज, वेदान्ताच्या अधिकाऱ्याची म्हणून सांगितलेलीं सारीं लक्षणें आपल्या ह्या पाश्चात्य शिष्यांत आलीं कोठून? शास्त्रें सांगतात, 'अधीत वेदवेदान्त, कृतप्रायश्चित्त, नित्यनैमित्तिक कर्मानुष्ठानकारी, युक्ताहारविहारी व विशेषतः चतुःसाधनसंपन्न झाल्याशिवाय वेदान्ताचा अधिकारी होतां येत नाही.'

आपले पाश्चात्य शिष्य हे आधीच तर अब्राह्मण. त्यांत पुनः खाण्यापिण्याच्या बाबतींत त्यांना कांही विधिनिषेध नाही. अशांना कसा काय समजणार आहे वेदान्त ?

स्वामीजीः--त्यांच्याशीं बोला तर खरें आधी एकदा. म्हणजे कळेल मग त्यांना वेदान्त समजला आहे की नाही तें.

शिष्य म्हणजे एक कर्मठ आचारप्रिय हिंदु आहे ही गोष्ट आतापावेतो स्वामीजींच्या लक्षांत आली असावी.

यानंतर स्वामीजी श्रीरामकृष्णांच्या कांही भक्तांबरोबर बागबाजारांतील श्री. बलराम बोस यांच्या घरीं गेले आणि शिष्यहि वटतला मोहोल्ल्यांतून विवेकचूडामणीची एक प्रत घेऊन दर्जीपाडयांतील आपल्या घरीं परतला.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २७५०० वि: १० ७ ६
क्रमांक ११८० नों: दि: ७।३।५८

# अध्याय २ रा

**स्थान — कलकत्ता ते काशीपूरचा रस्ता व कै. गोपाललाल सील यांची बाग.**
**वर्ष—इ. स. १८९७.**

**विषय**— जीवनसंग्रामांतील पटुता हेंच चैतन्याचें लक्षण—– मानवजातीच्या जीवनशक्तीची पारख करण्यासाठीहि हाच नियम—स्वत:ला शक्तिहीन समजणें हेंच भारताच्या जडमूढतेचें कारण—प्रत्येकांत अनंत शक्तीची खाण असा आत्मा विद्यमान—– हें दाखवून समजावून देण्यासाठीच महापुरुषांचें आगमन— धर्म हा अनुभूतीचा विषय—– तीव्र व्याकुलताच धर्मलाभाचा एकमात्र उपाय—सद्य:परिस्थितींत गीतोक्त कर्माची आवश्यकता—गीतेचा उद्‌घोष करणाऱ्या श्रीकृष्णाच्या पूजनाची निकड—– देशांत रजोगुण उद्दीपित करण्याचें प्रयोजन.

आज दुपारच्या वेळीं स्वामीजी श्री. गिरीशचंद्र घोष * यांचे घरीं आराम करीत होते. शिष्याने येऊन प्रणाम केल्यावर त्याला आढळून आलें की स्वामीजी गोपाललाल सील यांच्या उद्यानगृहाकडे जाण्याच्या तयारींत आहेत. दारीं गाडी तयार होती. ‘चल माझ्याबरोबर’ असें ते शिष्याला म्हणाले. शिष्याने निघण्याची तयारी दाखवितांच स्वामीजी त्याच्यासह गाडींत बसले व गाडी सुरू झाली. चितपूर रस्त्याला गाडी येऊन गंगादर्शन होतांच स्वामीजी ‘गंगा-तरंग-रमणीय-जटा-कलापम्’ इत्यादि श्लोक आपल्याशींच गुणगुणूं लागले. मंत्रमुग्धाप्रमाणे शिष्य त्या अलौकिक स्वरलहरी स्तब्धपणें ऐकूं लागला. असा कांही वेळ जात असतांनाच एक रेल्वे एंजिन चितपूर हैड्रॉलिक ब्रिजकडे जातांना पाहून स्वामीजी म्हणाले, “बघ, कसें एखाद्या सिंहासारखें जात आहे तें.” यावर शिष्य म्हणाला, “तें तर जड

---

* बंगालचे सुविख्यात नट व नाटककार, श्रीरामकृष्णभक्ताग्रणी कै. गिरीशचंद्र घोष.

आहे. त्यामागे मानवी चेतनशक्ति कार्य करीत आहे म्हणूनच तें चालतें ना ? असल्या त्याच्या या गतीला काय महत्त्व ? यांत त्याची कसली बहादुरी ? ”

स्वामीजी:--सांग पाहूं तूं म्हणतोस त्या चैतन्याचें लक्षण.

शिष्य:--कां बरें ? बुद्धिपूर्वक क्रिया हें चैतन्याचें लक्षण आहे.

स्वामीजी:-- प्रकृतीविरुद्ध जें जें म्हणून बंड करून उठतें, तेंच चेतन. तेथेच विकास झालेला असतो चैतन्याचा. बघ ना, एखाद्या क्षुद्र मुंगीला चिरडण्याचा प्रयत्न कर, ती देखील प्राण-रक्षणासाठी झगडण्याचा प्रयत्न करील. जेथे प्रयत्न आहे, जेथे म्हणून झुंजण्याची ईर्ष्या आहे, तेथे तेथे जीवनाचें चिन्ह असतें, तेथेंच चैतन्याचा विकास झालेला असतो.

शिष्य:-- हाच नियम काय मानवाला, मानवसमाजांनाहि लावतां येईल ?

स्वामीजी:--जरा डोळसपणें जगाचा इतिहास वाच आणि मग पाहा हा नियम लावतां येतो की नाही तें. तुम्ही हतभागी लोक सोडल्यास बाकी साऱ्यांनाच हा नियम लागूं पडत असल्याचें तुला आढळून येईल. सध्या साऱ्या जगांत तुम्हीच एक काय ते जडवत् पडून आहांत. तुमच्यावर जणु संमोहिनी विद्येचा प्रयोग करण्यांत आला आहे. फार दिवसांपासून अन्य लोक तुम्हांला सांगत आले की, ‘तुम्ही दीन आहांत, कसलीच ताकद नाही तुमच्यांत, तुम्ही दुबळे’—आणि तें ऐकून आज हजार वर्षे होत आलीं तुम्हांलाहि वाटूं लागलें आहे की, ‘आम्ही हीन – सर्व बाबतींत अगदी नादान आहोंत.’ तीच भावना सतत उराशीं बाळगल्याने आज झालां आहांत तसेच. (स्वतःकडे बोट दाखवून) हा माझाहि देह घडला आहे तुमच्याच देशाच्या मातीने ना ? पण तसले विचार कधी चुकूनहि माझ्या मनांत

आले नाहीत, व यामुळेच ना त्या भगवंताच्या दयेने, जे सदान्‌कदा आम्हांला तुच्छ समजतात त्यांनीच मला देवतुल्य मानलें व आजहि मानतात ? तुम्ही देखील 'आपल्यांत अनंत शक्ति निहित आहे, अपरंपार ज्ञान साठविलें आहे, अदम्य उत्साह रसरसतो आहे' असें चिंतन कराल, आणि त्याबरोबरच जर या अंतःस्थ शक्तीला जागे करूं शकाल तर तुम्हीहि माझ्यासारखे व्हाल.

शिष्यः--अशाप्रकारची भावना करण्याची शक्ति कुठे आहे महाराज ? आणि अगदी बाळपणापासून या गोष्टी सांगेल, समजावून देईल असा शिक्षक वा उपदेशक तरी कुठे आहे ? आजकाल शिक्षण म्हणजे नोकरीचें साधन हीच एक गोष्ट सर्वांपासून ऐकत आलों आहोंत आणि ऐकत आहोंत.

स्वामीजीः-- एवढ्यासाठीच तर त्या उलट शिकवावयाला, दाखवावयाला आम्ही आलों आहोंत. तुम्ही लोक आमच्याजवळून हीं तत्त्वें शिका, समजावून घ्या, त्यांचा अनुभव घ्या आणि नंतर शहराशहरांतून, गावागावांतून, खेड्यापाड्यांतून त्यांचा प्रचार करा. साऱ्यांपाशी जाऊन त्यांना उच्चरवाने सांगा, 'उठा, जागे व्हा. आता झोपून चालावयाचें नाही, सारा अभाव सारें दुःख समूल नष्ट करण्याची शक्ति तुमच्यांतच आहे. यावर दृढ विश्वास ठेवा म्हणजे ती शक्ति आपोआपच जागृत होईल.' या गोष्टी सतत साऱ्यांच्या कानींकपाळीं ओरडून सांगा, आणि याबरोबरच अगदी साध्या, सरळ, सोप्या भाषेंत सायन्स, तत्त्वज्ञान, भूगोल आणि इतिहासादिकांचीं मूलतत्त्वें आम जनतेंत प्रसृत करा. कांही अविवाहित तरुणांसाठी एक शिक्षणकेंद्र उघडून तेथे त्यांना सुरवातीला या गोष्टी शिकवाव्या आणि त्यांच्याच द्वारें पुढे हें कार्य करून घ्यावें असा माझा मानस आहे.

शिष्य:--पण महाराज, या आहेत साऱ्या पैशाच्या गोष्टी. हा पैसा कुठून आणणार आहांत आपण ?

स्वामीजी:-- अरें, हें तूं काय बोलतो आहेस ? माणूसच तर पैसा निर्माण करतो ना ? पैशांनी माणसें निर्माण झाल्याचें का कधी कुठे ऐकलें आहेस ? तूं जर आपलें मन आणि मुख एक करूं शकशील, बोलल्यासारखें वागूं शकशील तर पैसा तुझ्या पायाशीं पाण्यासारखा वाहत येईल.

शिष्य:-- बरें, तें असो महाराज, आपण म्हणतां त्याप्रमाणे समजा पैसा जमला आणि हें आपलें सत्कार्य सुरूहि झालें. पण म्हणून काय ? यापूर्वीहि अनेक थोर महापुरुषांनी कितीतरी सत्कार्यें केलीं. पण आज कुठे त्यांचा मागमूस तरी दिसतो काय ? आपण म्हणतां त्या कार्याचेंहि काळाच्या ओघांत अखेर हेंच होणार हें निश्चित. तेव्हा असल्या या प्रयत्नांची तरी काय आवश्यकता ?

स्वामीजी:--पुढे काय होणार या विचारानेच जे हैराण होतात त्यांच्या हातून कांहीहि कार्य होणें शक्य नाही. जें सत्य म्हणून उमगलें तें तात्काळ कृतींत उतरवावयास हवें. पुढे काय होणार या विचाराची गरजच काय ? दो घडींचें तर हें जीवन. त्यांतच जर क्षणोक्षणीं नफानुकसानीचा हिशोब करीत बसलों तर कांही तरी साधतां येणें शक्य आहे काय ? फलाफल देण्याचा एकमात्र अधिकारी भगवान. त्याला वाटेल तें तो करील. त्यासाठी डोकें तापविण्याचें तुला काय कारण ? तिकडे नजर न देतां तुला जें करावयाचें आहे तें कर.

याप्रमाणे बोलणें चाललें असतांनाच गाडी उद्यानगृहाजवळ येऊन पोहोचली. स्वामीजींच्या दर्शनासाठी अनेक लोक कलकत्त्याहून त्या बगीचांत आले होते. गाडींतून उतरून स्वामीजी खोलींत येऊन बसले व जमलेल्या मंडळींशीं बोलूं

लागले. मूर्तिमंत सेवास्वरूप असणारे स्वामीजींचे इंग्रज शिष्य गुडविन्साहेब जवळच उभे होते. त्यांच्याशीं आधीच परिचय झालेला असल्याने शिष्य त्यांचेजवळ गेला व त्या दोघांत स्वामीजींसंबंधी नानाविध गोष्टी सुरू झाल्या.

सध्याकाळच्या वेळीं स्वामीजींनी शिष्याला बोलावून "तूं कठोपनिषद् पाठ केलें आहेस काय" म्हणून विचारलें.

शिष्य:--नाही महाराज. शांकरभाष्यासहित तें मीं वाचलें मात्र आहे.

स्वामीजी:-- साऱ्या उपनिषदांमध्ये असें सुंदर उपनिषद् दुसरें नाही. जमल्यास तें तूं पाठ करून टाक. नचिकेत्याप्रमाणे श्रद्धा, साहस, विवेक व वैराग्य जीवनांत आणण्याचा प्रयत्न कर. तरच कांही लाभ. तें नुसतें वाचून काय होणार आहे ?

शिष्य:-- या दासाला त्या साऱ्या अनुभूति उपलब्ध होतील अशी कृपा करा.

स्वामीजी:--ठाकुरांचें * तें वचन लक्षांत आहे ना ? ते म्हणत, 'कृपासमीरण तर सदाच वाहतो आहे. तूं तुझ्या नावेचें शीड फक्त मोकळें कर.' कोणासाठीहि कांही करून देण्याचें कोणाला तरी शक्य आहे का बाबा ? आपलें नशीब आपल्या हातीं. गुरु केवळ हें पटवून देतात, इतकेंच काय तें. बीजांत निहित असलेल्या शक्तीनेच झाड होतें. पाणी, हवा या साऱ्या गोष्टी केवळ साहाय्यक असतात, इतकेंच.

शिष्य:-- पण असल्या बाह्य साहाय्याची तर आवश्यकता असते ना महाराज ?

स्वामीजी:-- ती तर असतेच. पण असल गोष्ट काय ती माहीत आहे ? मुळांत आंतच जर कांही सार नसेल तर बाहेरून

---

* भक्तमंडळींत भगवान श्रीरामकृष्णांचें प्रचलित असलेलें नांव.

मिळणाऱ्या शेकडो साहाय्यांचाहि कांही उपयोग होत नाही. असें असलें तरी प्रत्येकाचा आत्मानुभूतीचा काल येतोच. कारण मुळांत सारेच ब्रह्मस्वरूप आहेत. उच्चनीच अशा प्रकारचा भेद करावयाचा तो केवळ या ब्रह्माच्या कमीअधिक प्रकाशामुळे. योग्य समयीं सर्वांतच तें पूर्ण प्रकाशित वा अभिव्यक्त होणार. म्हणूनच शास्त्रें म्हणतात, 'कालेनात्मनि विन्दति.'

शिष्य:-- हें सारें होणार तरी केव्हा महाराज ? शास्त्रांतून तर वाचतों की आमचे कितीतरी जन्म गेले आहेत अज्ञानांतच.

स्वामीजी:-- पण म्हणून भिण्याचें काय कारण ? इथे ज्या अर्थी तूं येऊन पोहोचला आहेस, त्या अर्थीं या खेपेस साऱ्या गोष्टी खात्रीने साध्य होतील. मुक्ति, समाधि या साऱ्या गोष्टी म्हणजे ब्रह्माभिव्यक्तीच्या मार्गांतील अडथळे दूर करणें. एरवी आत्मा म्हणजे सूर्याप्रमाणे नित्यच प्रकाशमान. अज्ञानाच्या ढगाने तो आच्छादिला गेला आहे एवढेंच. तो मेघ दूर सारून देणें आणि सूर्य प्रकाशणें, दोन्ही एकच. लगेच 'भिद्यते हृदयग्रन्थि:' ह्या अवस्थेची प्राप्ति. सारे धर्ममार्ग याच ब्रह्माभिव्यक्तीच्या मार्गांतील अडथळे दूर करण्याचा उपदेश देत असलेले आढळतील. ज्याला ज्या मार्गाने आत्मानुभूति होते, त्याच मार्गाचा तो उपदेश देत असतो. सर्वांचा उद्देश्य मात्र एकच आत्मज्ञान--आत्मदर्शन. या बाबतींत सर्व जातींना,--जीवमात्राला अगदी समान अधिकार. हें सर्वच पक्षोपपक्षांना सम्मत असें मत आहे.

शिष्य:--महाराज, शास्त्रांतून या गोष्टी जेव्हा वाचतों किंवा ऐकतों, तेव्हा अद्यापहि आत्मवस्तूचा लाभ झाला नाही या विचाराने चित्तांत भयंकर अशांति उत्पन्न होते.

स्वामीजी:-- यालाच म्हणतात व्याकुळता. ही ज्या प्रमाणांत वाढेल त्या प्रमाणांत प्रतिबंधस्वरूप असणारे ढग विरून जातील,

त्याच प्रमाणांत श्रद्धेचें समाधान लाभेल. आत्मा हळूहळू करतलामलकवत् प्रत्यक्ष होईल. अनुभूतिच धर्माचा प्राण. कांही आचारनियम तर सारेच पाळूं शकतात, कांही विधिनिषेधांचें पालनहि सारेच करूं शकतात. पण असल्या अनुभूतीसाठी किती लोकांचे प्राण व्याकुळ होतात ? व्याकुळता--ईश्वरलाभासाठी किंवा आत्मज्ञानासाठी अगदी वेडे होऊन जाणें म्हणजेच खरी धर्मप्रवणता. भगवान् श्रीकृष्णांसाठी गोपी ज्याप्रमाणे वेडचा होऊन गेल्या होत्या, त्याप्रमाणे व्हावयास हवें, तशी व्याकुळता आत्मदर्शनासाठी हवी असते. गोपींच्या मनांतदेखील थोडचाफार प्रमाणांत का होईना स्त्रीपुरुष भेदाची अस्पष्ट जाणीव होती. यथार्थ आत्मज्ञानांत लिंगभेदाचा लेशमात्र मागमूसहि असत नाही.

बोलण्याच्या ओघांत स्वामीजींनी जयदेवाच्या 'गीतगोविंदा'बद्दल गोष्ट काढली. ते म्हणाले, " जयदेवच संस्कृतांतील शेवटचा कवि. पण अनेक ठिकाणीं अर्थापेक्षा शब्दलालित्याकडेच जयदेवाने अधिक लक्ष पुरविल्याचें आढळून येतें. पाहा बरें, गीतगोविन्दांत 'पतति पतत्रे' वगैरे श्लोकांत अनुराग-व्याकुलतेची काय पराकाष्ठा कवीने दाखवून दिली आहे ती. आत्मदर्शनासाठी अशाच प्रकारचा अनुराग हवा. पंचप्राण अगदी व्याकुळ व्हावयास हवेत. परंतु, कृष्णाची वृंदावनलीला बाजूस सारून त्याच्या कुरुक्षेत्रावरील स्वरूपाकडे पाहा. किती आकर्षक दृश्य ! असल्या भयंकर युद्धकोलाहलामध्ये देखील कृष्ण कसा अगदी स्थिर, गंभीर, शांत ! युद्धाच्या या धुमश्चक्रींत देखील भगवान् अर्जुनाला गीता सांगताहेत,--क्षत्रियाचा स्वधर्म जें युद्ध तें करावयास भगवान् अर्जुनाला उद्युक्त करीत आहेत. या भयानक युद्धाचे ते परिचालक असूनदेखील पुनः किती कर्महीन !--हातीं शस्त्र

धरलें नाही ! कोणत्याहि दृष्टिकोनांतून पाहा, भगवान् श्रीकृष्णांचें चरित्र सर्वांगपूर्ण. ज्ञान, कर्म, भक्ति, योग—साऱ्यांची ते जणु साकार मूर्तिच. श्रीकृष्णचरित्राच्या याच बाजूचा आज अधिक विचार व्हावयास हवा. वृंदावनांत मुरली वाजविणाऱ्या कृष्णालाच केवळ स्वीकारून आज चालणार नाही, त्याने जीवांचा उद्धार होणार नाही. आज अत्यावश्यक आहे गीतारूपी सिंहनाद करणाऱ्या श्रीकृष्णांची पूजा, धनुर्धारी राम, महावीर हनुमान कालीमाता यांची पूजा ! तेव्हाच कुठे लोक मोठ्या उत्साहाने कर्म करून शक्तिसंपन्न होतील. खूप विचाराअंतीं अखेर माझें तर मत झालें आहे की जे लोक या देशांत आज धर्म धर्म करून आरडाओरड करतात, त्यांच्यांतील बरेचसे आहेत विकृत, डोक्याचे हलके आणि धर्मान्ध. आत्यंतिक रजोगुणाची कास धरल्याखेरीज तुम्हांला आता न इहलोकाची आशा, न परलोकाची. सारा देश तमोगुणाने कुंद होऊन गेला आहे. आणि फलहि तसेंच मिळत आहे--इहलोकीं गुलामी, परलोकीं नरक.

शिष्य:-- पाश्चात्यांमधील रजोगुणाचा आविष्कार पाहून हळूहळू ते सात्त्विक होतील अशी आशा वाटते का आपल्याला ?

स्वामीजी:--अगदी खात्रीने. महारजोगुणसंपन्न असलेले ते लोक आज भोगाच्या अगदी चरम सीमेवर येऊन पोहोचले आहेत. योग त्यांना साधणार नाही, तर काय उपाशीपोटीं, पोटाची खांच भरण्यासाठी पोट बडवत दारोदार हिंडणाऱ्या तुम्हांला साधेल ? त्यांचें सर्वोत्कृष्ट भोगांनी भरलेलें तें जीवन पाहून माझ्यापुढे तर मेघदूतांतील 'विद्युद्वन्तं ललितवसना:' वगैरे चित्र उभें राहतें. आणि तुमचे भोग म्हणजे घाणेरड्या खोल्यांत फाटक्यातुटक्या वाकळीवर हाडांचीं काडें टाकून डुकरांप्रमाणे वंशवृद्धि करणें !—भुकेलेल्या भिकाऱ्यांची आणि गुलामांची

पैदास करणें. म्हणूनच म्हणतों की आता निकड आहे लोकांना रजोगुणाने उद्दीपित करून कर्मप्रवण करण्याची. कर्म--कर्म--कर्म, या खेरीज आज 'नान्यः पन्था विद्यतेऽयनाय'--उद्धाराचा अन्य मार्ग नाही.

शिष्यः--महाराज, आमचे पूर्वज काय रजोगुणसंपन्न होते?

स्वामीजीः--मग काय ते नव्हते? इतिहास तर हेंच सांगतो की त्यांनी देशविदेशीं वसाहती स्थापन केल्या--तिबेट, चीन, सुमात्रा येथेच काय पण त्याहिपलीकडे असणाऱ्या जपानपर्यंत त्यांनी धर्मप्रचारक पाठविले. रजोगुणांतून गेल्याखेरीज उन्नति होण्याची कांही शक्यता तरी आहे?

बोलण्याच्या भरांत रात्र झाली. तेवढ्यांतच मिस मूलर तेथे येऊन पोहोचल्या. त्या इंग्रज असून स्वामीजींवर त्यांची श्रद्धा अगदी अपरंपार. स्वामीजींनी शिष्याचा त्यांच्याशीं परिचय करून दिला. थोडेसें बोलणें होतांच त्या वर निघून गेल्या.

स्वामीजीः--पाहिलेंस, काय बलशाली आहे या लोकांची जात? कुठे हिचें घरदार, त्यांत पुनः थोरामोठ्यांची मुलगी. पण धर्मलाभाच्या आशेने कुठल्या कुठे येऊन पोहोचली.

शिष्यः--तें तर खरेंच आहे. पण आपल्या देखील साऱ्या गोष्टी अद्‌भुतच वाटतात. कितीतरी पाश्चात्य स्त्रीपुरुष आपल्या सेवेला सर्वदा उत्सुक असतात. आजकालच्या जमान्यांत तर ही गोष्ट म्हणजे फारच आश्चर्यकारक.

स्वामीजीः--(स्वतःच्या देहाकडे बोट करून) हें शरीर जर टिकून राहिलें तर आणखी कितीतरी अद्‌भुत गोष्टी पाहावयाला सापडतील. कांही निष्ठावान् व उत्साही तरुण मला हाताशीं सापडले तर साऱ्या देशांत मी उलटापालट करून टाकीन. असली कांही मंडळी मद्रासमध्ये आढळली. पण माझे डोळे विशेष

करून लागले आहेत बंगालकडे. अशा तल्लख मेंदूचे लोक अन्यत्र नाहीत. पण हे लोक शरीराने दुर्बळ आहेत. शरीर आणि बुद्धीची सारखीच वाढ व्हावयास हवी. पोलादी शरीर आणि सुतीक्ष्ण बुद्धि असल्यास सारें जग तुमच्या पायाशीं लोळण घेईल.

स्वामीजींचें जेवण तयार असल्याचा निरोप आला. "चल माझ्याबरोबर, माझें, जेवण पाहायला" असें स्वामीजी शिष्याला म्हणाले. जेवतांना ते म्हणाले, "फार तेलकट, तुपकट पदार्थ खाणें चांगलें नाही. तळल्या पुऱ्यांपेक्षा पोळचा बऱ्या. पुऱ्या म्हणजे रोग्यांचें अन्न. ताजा भाजीपाला जेवणांत असावा. गोड कमीच." हें बोलणें चाललें असतां मधेच 'काय रे किती पोळचा घेतल्या मीं? आणखी घेऊं की काय?' असें त्यांनी विचारलें. किती खाल्लें इकडेहि लक्ष नाही. आणि भूक भागली किंवा नाही याचेंहि भान नाही! बोलण्यांत गुंतल्याने शरीराची जाणीव जणु नाहीशी झाली होती त्यांची.

आणखी थोडें खाऊन स्वामीजींनी जेवण संपविलें. शिष्यहि परवानगी घेऊन कलकत्त्याला निघाला. गाडी न मिळाल्याने त्याला पायींच जावें लागत होतें. जातांना, उद्या पुनः केव्हा स्वामीजींचें दर्शन होईल हा एकच विचार त्याच्या मनांत वारंवार येत होता.

---

## अध्याय ३ रा

**स्थान-- काशीपूर; कै. गोपाललाल सील यांचा बगीचा.**
**वर्ष-- इ. स. १८९७**

**विषय**—स्वामीजींत अद्‌भुत शक्तीचा प्रकाश--स्वामीजींच्या दर्शनासाठी कलकत्त्यांतील बडाबाजार नामक मोहोल्ल्यांतील हिंदुस्थानी पंडितांचें आगमन--त्या पंडितांबरोबर स्वामीजींची संस्कृतांतून शास्त्रचर्चा—स्वामीजींबद्दल पंडितांचें मत--स्वामीजींवरील त्यांच्या गुरुबंधूंचें प्रेम— सभ्यता कशाला म्हणतात—प्राचीन भारतीय सभ्यतेचें वैशिष्टय-- श्रीरामकृष्णांच्या आगमनाबरोबरच पाश्चिमात्य आणि पौर्वात्य सभ्यतांच्या संमीलनाने नवयुगाला आरंभ--धार्मिक व्यक्तींच्या बाह्य आचरणासंबंधी पाश्चात्य लोकांची धारणा--भावसमाधि व निर्विकल्प समाधि यांच्यामधील भेद--श्रीरामकृष्ण हे भावराज्याचे अधिराज—ब्रह्मज्ञ पुरुष हेच खरे लोकगुरु--कुलगुरु-प्रथेंतील दोष--श्रीरामकृष्णांचें आगमन धर्मग्लानि दूर करण्यासाठी--पाश्चात्य देशांत स्वामीजींनी ठाकुरांचा प्रचार कसा केला.

विलायतेहून परत आल्यानंतर सुरवातीला कांही दिवस स्वामीजी कै. गोपाललाल सील यांच्या काशीपूर येथील बगीचांत राहिले. शिष्य दररोज तेथे जात असे. फक्त शिष्यच काय पण इतरहि अनेक उत्साही तरुण त्यांच्या दर्शनासाठी तेथे गर्दी करीत असत. प्रारंभीं मिस् मूलरहि स्वामीजींबरोबर येथे येऊन राहिल्या होत्या. शिष्याचे गुरुबंधु गुडविन साहेब हेहि स्वामीजींसह त्या उद्यानगृहांत राहत असत.

स्वामीजींची कीर्ति त्या वेळीं भारतांत प्रांतोप्रांतीं पसरली होती. तेव्हा कांही लोक कुतूहलाने, कांही तत्त्वचर्चा करण्याच्या हेतूने, तर कांही स्वामीजींच्या ज्ञानाची परीक्षा पाहण्याच्या बुद्धीने तेथे येत. प्रश्नकर्ते स्वामीजींच्या तोंडन शास्त्रविवरण ऐकून मुग्ध झाल्याचें, व त्यांची सर्वतोगामी प्रतिभा पाहून मोठ-

मोठे तत्त्वज्ञानी व विश्वविद्यालयाचे प्रसिद्ध प्रोफेसर चूप होऊन गेल्याचें शिष्याने पाहिलें आहे. सरस्वती जणु नेहमी स्वामीजींच्या कंठीं विराजमान असे. ते या बागेंत असतांनाच त्यांच्या अलौकिक योगदृष्टीचेंहि प्रत्यंतर वेळोवेळीं येत असे. *

कलकत्त्याच्या बडाबाजार या विभागांत अनेक पंडित राहत असत. श्रीमत मारवाडी लोक त्यांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था करीत. या वेदज्ञ व दार्शनिक पंडितांच्या कानीं स्वामीजींची कीर्ति गेली होती. त्यांचेपैकी कांहीजण वाद करण्याच्या बुद्धीने एक दिवस स्वामीजींकडे आले. शिष्य त्या वेळीं तेथे हजर होता. आलेले सारे पंडित अस्खलितपणें संस्कृत बोलूं शकत होते. भेटीला आलेल्या लोकांच्या गराड्यांत बसलेल्या स्वामीजींना नमस्कार करून पडितांनी त्यांच्याशीं संस्कृतांत बोलावयाला सुरवात केली. स्वामीजीहि त्यांना संस्कृतांत उत्तर देऊं लागले. वाद कोणत्या विषयावर चालला होता हें शिष्याला आता स्मरत नाही. पण सारे पंडित एकदमच गोंगाट करून तत्त्वज्ञानांतील गूढ प्रश्न स्वामीजींना संस्कृतांत विचारीत होते, व स्वामीजीहि प्रशांत गंभीरपणें हळूहळू आपले तर्कसंगत सिद्धान्त त्यांना पटवन देत होते एवढें मात्र त्याच्या चांगलें स्मरणांत आहे. आणि स्वामीजींची भाषा ऐकायला पडितांच्या भाषेपेक्षा गोड व अधिक सुललित होती हेंहि नक्की आठवतें. पुढे त्या पंडितांनीहि ही गोष्ट मान्य केली.

* या बागेंत राहत असतांना स्वामीजींना एक दिवस एक छिन्नमस्तक भूत दिसलें. तें जणु त्या दारुण कष्टप्रद अवस्थेंतून मुक्त करण्यासाठी स्वामीजींना विनवीत होतें. तपासाअंती स्वामीजींना असें आढळून आलें की खरोखरच त्या बागेंत एका ब्राह्मणाचा अपघाताने मृत्यु झाला होता. ही गोष्ट पुढे त्यांनी आपल्या गुरुबंधूंना सांगितली होती.

स्वामीजींचें त्या दिवशींचें संस्कृतांतील अस्खलित वक्तृत्व ऐकन त्यांचे गुरुबंधुहि आश्चर्यचकित झाले. गेलीं पांचसहा वर्षे युरोप व अमेरिकेंत गेल्याने स्वामीजींचा संस्कृतशीं विशेष संबंध नाही ही गोष्ट सगळयांना माहीत होती. शास्त्रदर्शी पंडितांबरोबरचें स्वामीजींचें त्या दिवशींचें बोलणें ऐकून त्या प्रसंगीं स्वामीजीमधे अद्‌भुत शक्तीचें स्फुरण होत असल्याचे त्यांच्या ध्यानांत आलें. त्या दिवशींच्या त्या बैठकींत स्वामी रामकृष्णानंद, योगानंद, निर्मलानंद, तुरीयानंद व शिवानंद वगैरे मंडळी हजर होती.

त्या दिवशींच्या त्या वादांत आलेल्या पंडितांनी पूर्वपक्ष व स्वामीजींनी सिद्धान्तपक्ष मांडला. बोलण्याच्या भरांत स्वामीजींच्या तोंडून चुकून 'अस्ति' चे जागीं 'स्वस्ति' असा शब्दप्रयोग झाल्याने सारे पंडित हसले ही गोष्ट शिष्याला चांगली आठवते. पण स्वामीजी लागलीच म्हणाले, 'पंडितानां दासोऽहं क्षन्तव्यम् एतत् स्खलनम्'--'मी पंडितांचा दास, माझी ही चक पदरीं घ्या.' स्वामीजींच्या या विनयाने पंडितहि मुग्ध झाले. बराच वेळ वाद घातल्यानंतर स्वामीजींच्या सिद्धान्तपक्षाचें म्हणणें मान्य करून ते लोक जावयास निघाले. हजर असलेल्या लोकांतील दोनचारजण त्या पंडितांबरोबर बाहेर पडले व 'स्वामीजींबद्दल काय वाटतें ?' असा प्रश्न त्यांनी त्यांना विचारला. यावर त्यांच्यांतील एक वयोवृद्ध पंडित म्हणाला, "ते व्याकरणांत व्युत्पन्न नसले तरी शास्त्राचें गूढ मर्म त्यांना अवगत झालें आहे. आपल्या मताचें विवरण करण्यांत तर ते अद्वितीय आहेत. प्रतिपक्षाचे मुद्दे खोडून काढण्यांत त्यांनी अलौकिक प्रतिभा व असामान्य पांडित्य दाखविलें."

स्वामीजींवर त्यांच्या गुरुबंधूंचें कोण अलौकिक प्रेम दिसून येत असे ! स्वामीजी पंडितांशीं वाद करण्यांत गुंतले असतां

दिवाणखान्याला लागून असलेल्या उत्तरेकडील खोलींत स्वामी रामकृष्णानंद जप करीत बसले असल्याचें शिष्याला आढळून आलें. पंडितगण निघून गेल्यानंतर त्या जपाचें कारण त्यांना विचारलें असतां, स्वामीजींना वादांत जय मिळावा एवढ्यासाठी श्रीरामकृष्णांच्या पादपद्मीं आपण व्याकुळ होऊन विनवणी करीत होतों असें त्यांनी सांगितलें.

पंडितलोक निघून गेल्यावर स्वामीजींकडून शिष्याला कळलें की, पूर्वपक्ष करणारे ते पंडित पूर्वमीमांसाशास्त्रांत चांगलेच अभिज्ञ होते. स्वामीजींनी उत्तरमीमांसापक्षाचा अवलंब करून त्यांच्यापुढे ज्ञानकांडाची श्रेष्ठता प्रतिपादन केली, व पंडितांनाहि स्वामीजींचे सिद्धान्त मान्य करणें भागच पडलें.

व्याकरणाची चूक झाल्याने पंडितांनी त्यांचें जें हसें केलें त्याबद्दल, अनेक वर्षें संस्कृतांत बोलण्याचा सराव नसल्याने आपली अशी चूक झाली असें ते म्हणाले. पण पंडितांना कोणत्याहि प्रकारचा दोष त्यांनी दिला नाही. तथापि, पाश्चात्य देशांत वादाचा मूळ मुद्दा सोडून भाषेंतील असल्या सामान्य चुकांकडे दोषदृष्टीने पाहणें हें असभ्यपणाचें समजतात, एवढें मात्र ते म्हणाले. सुसंस्कृत समाजांतील लोक अशा वेळीं मूळ मुद्यावरच दृष्टि ठेवतात. भाषेकडे कोणी लक्षहि देत नाही. "तुमच्या देशांत मात्र फोलपटें घेऊनच डोकें फोडाफोडी चालते. आंतील सार वस्तूकडे कोणाचें लक्षहि नसतें." या बोलण्यानंतर त्या दिवशीं स्वामीजी शिष्याशीं संस्कृतांत बोलूं लागले. शिष्यहि मोडक्यातोडक्या संस्कृतांत त्यांना उत्तरें देऊं लागला ! तरीहि त्याला प्रोत्साहन देण्यासाठी स्वामीजींनी त्याची स्तुतिच केली. या दिवसानंतर स्वामीजींच्या सांगण्यावरूनच शिष्यहि अधूनमधून त्यांच्याशीं संस्कृतांत बोलत असे.

'सभ्यता' कशाला म्हणतात या प्रश्नाला उत्तर देतांना स्वामीजी म्हणाले की, जो समाज वा जी जात आध्यात्मिक भावांत जेवढी अग्रसर, तेवढा तो समाज वा ती जात सभ्य होय. नाना प्रकारच्या यंत्रांची वा कारखान्यांची वाढ करून ऐहिक सुखाची समृद्धि केली आहे एवढयानेच एखादी जात सभ्य झाली असें म्हणतां येणार नाही. सध्याच्या पाश्चात्य सभ्यतेमुळे लोकांत हाहाकार आणि अभाव यांचीच दिवसानुदिवस वाढ झालेली दिसते. परंतु भारतीय प्राचीन सभ्यता सर्वसाधारण लोकांना आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवून लोकांतील ऐहिक अभाव समूळ नष्ट जरी नाही तरी बराच कमी करूं शकली होती ही गोष्ट निःसंदेह होय. वर्तमानकालीं या दोन्ही संस्कृतींचा समन्वय करण्यासाठीच भगवान श्रीरामकृष्णांनी जन्म ग्रहण केला आहे. आता लोकांना एकीकडे जसें कर्मतत्पर व्हावें लागेल, तसेंच दुसरीकडे त्यांना गभीर अध्यातमज्ञान प्राप्त करून घ्यावें लागेल. अशा रीतीने भारतीय व पाश्चात्य संस्कृतींच्या अन्योन्य समन्वयाने जगांत नव्या युगाचा अभ्युदय होणार आहे ही गोष्ट स्वामीजींनी त्या दिवशीं नीट समजावून सांगितली. ही गोष्ट समजावून देत असतांना ते म्हणाले, "आणखी एक गोष्ट-- पाश्चात्यांची कल्पना अशी असते की, माणूस जितका धर्मपरायण होईल तितकी त्याची वागणूक गंभीर व्हावयास हवी. त्याने तोंडावाटें अन्य कोणती गोष्टहि काढणें अयोग्य. त्यांच्यांतील धर्मगुरु माझ्या तोंडून उदार धर्ममतें ऐकून एकीकडे जितके आश्चर्यचकित होत, तितकाच व्याख्यान संपल्यानंतर मीं केलेला मित्रांबरोबरचा विनोद ऐकून त्यांना विस्मय वाटे. पुष्कळदा तर ते मला अगदी तोंडावर म्हणत, "स्वामीजी, आपण धर्मगुरु आहांत. सामान्य लोकांप्रमाणे हसणेंखिदळणें आपल्याला शोभत

नाही. असला अवखळपणा आपल्याला उचित नव्हे.' मीहि त्यांना सांगत असे, We are children of bliss—why should we look morose and sombre?'—'आम्ही म्हणजे आनंदाचे वारसदार. आम्हीं काय म्हणून आंबट, सुतकी चेहरे करून बसावें?' माझ्या उत्तराचें मर्म त्यांच्या लक्षांत येई किंवा नाही याची शंकाच आहे."

त्या दिवशीं स्वामीजींनी भावसमाधि व निर्विकल्प समाधि यांच्याबद्दल अनेक गोष्टी सांगितल्या. त्यांपैकी जेवढ्या लक्षांत आहेत तेवढ्या पुढे देतों.

"असें समजा की एखादा माणूस हनुमानाप्रमाणे भक्तिभावाने ईश्वरप्राप्तीची साधना करतो आहे. हा भक्तिभाव ज्या प्रमाणांत प्रगाढ होत जाईल, त्या प्रमाणांत त्या साधकाचें चालणेंबोलणें, हावभाव, इतकेंच काय पण त्याच्या शरीराची ठेवण देखील ठीक तशीच होत जाईल. 'जात्यंतर परिणाम' अशाच तऱ्हेने होतो. अशा प्रकारें एखादा भाव घेऊन साधक हळूहळू तदाकार होतो. अशा कोणत्याहि प्रकारच्या भावाच्या चरमावस्थेला भावसमाधि असें म्हणतात. आणि 'मी देह नाहीं', 'मी मन नाहीं', 'बुद्धि नाहीं' अशा प्रकारें नेति नेति करीत करीत ज्ञानी साधक चिन्मात्रसत्तेंत जेव्हा अवस्थित होतो, तेव्हा त्याला निर्विकल्प समाधीचा लाभ होतो. (भक्तिशास्त्रांतील) असा एकाददुसरा भाव घेऊन त्यांत सिद्धि मिळविण्यास वा त्याच्या चरम सीमेपर्यंत पोहोचण्यासच कितीतरी जन्माचे प्रयास लागतात. भावराज्याचे अधीश्वर आमच्या ठाकुरांनी (श्रीरामकृष्णांनी) मात्र असल्या अठरा भावांत सिद्धिलाभ करून घेतला होता. 'भावमुखीं जर राहिलों नसतों तर शरीर टिकलें नसतें.' असेंहि ते म्हणत."

भारतांत आपण यापुढे कसें काय कार्य करणार आहोंत याबद्दल बोलतांना त्या दिवशीं स्वामीजी म्हणाले की, मद्रास आणि कलकत्ता येथे दोन केंद्रें उघडून सर्वप्रकारें लोककल्याण साधण्यासाठी नवीन प्रकारचे साधुसन्यासी तयार करण्याचा माझा विचार आहे. विध्वंसक रीतीचा अवलंब करून जुन्या रूढी-रीती उगाच खंडीत बसल्याने समाजाची वा देशाची उन्नति करतां येणें शक्य नाही. सर्व काळीं, सर्व वेळीं रचनात्मक रीतीं-नीच, प्राचीन रूढी-रीतींना नवीन आकार देऊनच उन्नति साधतां येणें शक्य असते. गतेतिहासांत भारतांतील साऱ्याच धर्मप्रचार-कांनी अशा प्रकारें कार्य केलें आहे. फक्त बुद्धदेवांचाच धर्म विध्वंसक, प्राचीन रीतीनीतींचा विनाश करणारा होता: आणि यामुळेच भारतांतून बुद्धधर्माचें उच्चाटन झालें.

एका जरी व्यक्तींत ब्रह्माचा पूर्ण विकास वा अभिव्यक्ति झाली, तरी त्या प्रकाशांत हजारो लोक आपला मार्ग चाखाळू शकतात, असेंहि बोलण्याच्या भरांत स्वामीजींनी सांगितल्याचें शिष्याला स्मरतें. ते म्हणाले की, फक्त ब्रह्मज्ञ पुरुषच लोकगुरु होत. हें विधान सर्व शास्त्रांना व तर्कबुद्धीला संमत आहे. अवैदिक, अशास्त्रीय कुलगुरूंची प्रथा या देशांत स्वार्थी लोकांनीच सुरू केली. म्हणूनच साधना करूनहि सिद्धि वा ब्रह्मज्ञान लोकांना आज प्राप्त होत नाही. धर्माची ही ग्लानि दूर करण्यासाठीच शरीर धारण करून भगवान् श्रीरामकृष्ण वर्तमान युगांत अवतीर्ण झाले आहेत. त्यांनी प्रदर्शित केलेल्या सार्वजनीन मताचा प्रचार झाल्यास जगाचें व जीवांचें मंगल होईल. त्यांच्यापूर्वी भारते-तिहासांत कैक शतकांतहि असला अलौकिक महासमन्वयाचार्य अवतीर्ण झाल्याचें आढळत नाही.

यावर त्यांच्या एका गुरुबंधूंनी येथे त्यांना प्रश्न विचारला,

"पाश्चात्य देशांत, ठाकुर अवतार होते असा प्रचार तुम्हीं उघडपणें नेहमी कां केला नाही ?"

स्वामीजी:-- त्यांना त्यांच्या विज्ञान-तत्त्वज्ञानाची फार घमंड आहे. म्हणून अगोदर त्यांची ज्ञानाची ही घमंड बुद्धिवाद करून, विज्ञानाचा आश्रय घेऊन आणि तत्त्वज्ञानाचा अवलंब करून नष्ट केल्याखेरीज कुणालाहि तेथे कांहीहि करतां यावयाचें नाही. तर्क करकरून गोते खात खात हातीं कांहीच न लागल्याने जे यथार्थ तत्त्वजिज्ञासु होऊन माझ्याकडे येत, त्यांच्याजवळ मी ठाकुरांबद्दल बोलत असे. एरवी एकदमच जर मी अवतारवादाबाबत गोष्टी त्यांच्याशीं बोललों असतों तर ते म्हणते, 'अं, यांत तुम्हीं आणखी नवीन तें काय सांगितलें ? आमच्यांतहि आमचे प्रभु येशु आहेतच की ?'

अशा प्रकारें मोठ्या आनंदाने तीनचार तास त्यांचे सहवासांत घालवून शिष्य इतर भक्तमंडळींबरोबर कलकत्त्यास परत फिरला.

## अध्याय ४ था

**स्थान— श्री. नवगोपाल घोष यांचें घर, रामकृष्णपूर, हावरा.**
**वर्ष— इ. स. १८९७ (जानेवारी, फेब्रुवारी)**

**विषय**— नवगोपाल बाबूंच्या घरीं श्रीरामकृष्णांच्या मूर्तीची स्थापना— स्वामीजींचा विनीत भाव--नवगोपाल बाबूंच्या गृहपरिवारांतील साऱ्यांची श्रीरामकृष्णांबद्दल भक्ति—श्रीरामकृष्णांना उद्देशून रचलेला प्रणाम-मंत्र.

श्रीरामकृष्णांचे परम भक्त श्रीयुत बाबू नवगोपाल घोष यांनी गंगेच्या पश्चिम तीरावर हावरा विभागांतील रामकृष्णपुरांत नवें राहतें घर बांधलें होतें. या घरासाठी जागा विकत घेतेवेळीं गावाचें नांव 'रामकृष्णपूर' असल्याचें ऐकून त्यांना फार आनंद झाला होता, कारण या नांवाबरोबरच त्यांच्या इष्टदेवतेचें नांव सतत त्यांच्या स्मरणांत राहणार होतें. हें घर बांधून झाल्यानंतर थोडयाच दिवसांत स्वामीजी विलायतेहून पहिल्यानेच कलकत्त्याला परत आले. स्वाभाविकच स्वामीजींच्या हस्तें घरांत श्रीरामकृष्णांच्या मूर्तीची प्रतिष्ठा व्हावी अशी त्यांची व त्यांच्या पत्नीची आंतरिक इच्छा होती. एवढयासाठी घोष महाशयांनी मठांत जाऊन आपली ही इच्छा स्वामीजींना कळविली. स्वामीजींनीहि त्यांच्या या सूचनेला मान्यता दिली. त्याच निमित्ताने आज नवगोपाल बाबूंच्या घरीं उत्सव होता व त्यासाठी मठांतील संन्यासी व बाहेरील रामकृष्णांचे गृहस्थ-भक्त या साऱ्यांना त्यांनी आदराने निमंत्रित केलें होतें. घर गुढयातोरणांनी सुसज्जित, समोरच्या फाटकाशीं शुभसूचक जलपूर्ण कुंभ, कर्दळीचे खांब उभे केलेले व देवदाराचीं व आंब्याच्या पानांचीं तोरणें बांधलेलीं. सारें रामकृष्णपूर 'जय रामकृष्ण' या जयघोषाने भरून गेलें होतें. मठापासून तीन

नावा भाड्याने करून स्वामीजी मठांतील साऱ्या संन्यासी व ब्रह्मचारी मंडळींना घेऊन मोठ्या उत्साहाने रामकृष्णपूरच्या घाटावर उतरले. स्वामीजींनी भगव्या रंगाचे कपडे घालून डोक्याला फेटा बांधला होता. त्यांच्या पायांत कांहीच नव्हतें. रामकृष्णपूरच्या घाटावरून ते ज्या रस्त्याने नवगोपाल बाबूंच्या घरीं जाणार होते, त्या रस्त्याच्या दुतर्फा असंख्य लोक उत्सुकतेने त्यांचें दर्शन घेण्यासाठी उभे होते. घाटावर उतरून 'दुःखी ब्राह्मणीच्या अंकावर निजून चतुर्दिशा तेजोद्भासित करणारा तो कोण आहे? कोण तो दिगंबर या कुटीरांत आला आहे?' हें गाणें स्वामीजींनी गावयास सुरवात केली, व त्याबरोबरच स्वतः मृदंग वाजवीत वाजवीत ते हळूहळू पुढे चालूं लागले. त्यांच्याबरोबरच आणखी तीनचार मृदंग वाजावयास सुरवात झाली आणि बरोबर असलेले लोक समसुरांत तें गाणें गात गात त्यांच्या मागून चालूं लागले. जातां जातां ही सारी मंडळी डॉ. रामलाल बाबूंच्या घराजवळ थोडा वेळ थांबली. रामलाल बाबूदेखील मोठ्या तत्परतेने बाहेर आले व या मंडळीबरोबर हळूहळू पुढे जाऊं लागले. लोकांची कल्पना होती की, स्वामीजी मोठ्या टापटिपीच्या पोषाखांत खूप बडिवारासह येतील. पण जेव्हा इतर मठवासी साधूंप्रमाणेच अगदी साध्या वेषांत मृदंग वाजवीत वाजवीत उघड्या पायांनीच येतांना त्यांनी त्यांना पाहिलें, तेव्हा अनेकांना तर ते ओळखतांच आले नाहीत. आणि दुसऱ्यांना विचारून ते कोण आहेत हें कळल्यावर ते आश्चर्यचकित होऊन म्हणूं लागले, "हेच का ते विश्वविजयी स्वामी विवेकानंद?" स्वामीजींची ही अद्भुत लीनता पाहून साऱ्यांनी एकमुखाने त्यांची प्रशंसा केली व 'जय रामकृष्ण' अशा ललकाऱ्यांनी तो रस्ता त्यांनी अगदी गर्जून सोडला.

गृहस्थांना आदर्शवत् असणाऱ्या नवगोपाल बाबूंचे प्राण आनंदाने आज अगदी भरून गेले होते. ठाकुर व त्यांच्या भक्तमंडळींच्या सेवेसाठी त्यांनी खूप मोठ्या प्रमाणावर तयारी केली होती. सतत इकडे तिकडे फिरून ते जातीने साऱ्या गोष्टींकडे लक्ष पुरवीत होते. ते इकडे तिकडे फिरत असतां त्यांचे मुखांतून 'जय राम', 'जय राम' असा घोष सतत ऐकूं येत होता.

सारी मंडळी नवगोपाल बाबूंच्या दारीं येतांच घरांतून मंगलसूचक शंखघंटादिकांचा मंजुळ ध्वनि सुरू झाला. मृदंग बाजूला ठेवून कांही वेळ स्वामीजींनी बैठकींत बसून विश्रांति घेतली व नंतर ते देवघर पाहावयास वरच्या मजल्याकडे जाण्याकरता निघाले. देवघर संगमरवरी होतें. मध्यभागीं सिंहासनावर ठाकुरांची चिनीमातीची मूर्ति होती. हिंदु पद्धतीने पूजेला लागणाऱ्या साऱ्या उपकरणांची व वस्तूंची जय्यत तयारी होती. ती पाहून स्वामीजींना खूप आनंद झाला. नवगोपाल बाबूंची पत्नी इतर स्त्रियांसह आली व स्वामीजींना साष्टांग नमस्कार करून तिने त्यांना पंख्याने वारा घालावयास सुरवात केली.

साऱ्या गोष्टींची स्वामीजींनी केलेली तारीफ ऐकून ती त्यांना म्हणाली, "ठाकुरांची सेवा करण्याची आमची काय ताकद ? हें लहानसें घर--गांठीं पैसाहि थोडा--आज आपण स्वहस्तें ठाकुरांची येथे स्थापना करून आम्हांला कृतार्थ करा."

यावर थोडेसें हसून किंचित् विनोदाने ते म्हणाले, "तुमच्या श्रीरामकृष्णांच्या चवदा पिढ्यांनील तरी कुणी अशा संगमरवरी घरांत राहिला नाही ! खेड्यांनील गवती झोपडींत त्यांचा जन्म. कसें तरी करून दिवस घालविले त्यांनी. इथे असल्या उत्तम उपचार-सेवेंत ते जर राहणार नाहीत, तर मग राहतील तरी कुठे ?" स्वामीजींच्या या उत्तराने सारेच जण

हसूं लागले. नंतर भष्मभूषित स्वामीजी साक्षात् महादेवाप्रमाणे पूजकाच्या आसनावर बसून ठाकुरांचें आवाहन करूं लागले.

स्वामी प्रकाशानंद स्वामीजींच्याजवळ बसून मंत्रोच्चारण करीत होते. यथोपचार पूजा संपली व नंतर आरतीसाठी शंखघंटा वाजूं लागल्या. आरती संपल्यावर देवघरांत बसले असतांनाच स्वामीजींनी श्रीरामकृष्णांना उद्देशून पुढील श्लोक रचला--

स्थापकाय च धर्मस्य सर्वधर्मस्वरूपिणे ।
अवतारवरिष्ठाय रामकृष्णाय ते नमः ।।

हा मंत्र म्हणून साऱ्यांनी ठाकुरांना प्रणाम केला. नंतर शिष्यानेहि श्रीरामकृष्णांना उद्देशून रचलेलें एक स्तोत्र म्हटलें. अशा रीतीने पूजाविधि संपला. आलेल्या मंडळींचा फराळ आटोपल्यावर कीर्तनास प्रारंभ झाला. स्वामीजी वरच थांबले होते. घरांतील स्त्रिया स्वामीजींना प्रणाम करण्यास आल्या. त्यांनी स्वामीजींना धर्मविषयक अनेक प्रश्न विचारले व त्यांचा आशीर्वाद ग्रहण केला.

या परिवारांतील साऱ्यांची ठाकुरांच्या ठिकाणीं असलेली निष्ठा पाहून शिष्य अगदी मुग्ध झाला, त्यांच्या संगतीने आपला नरजन्म सफल झाला असेंच त्याला वाटलें.

नंतर साऱ्यांनी प्रसाद घेतला व खाली येऊन सर्वजण विश्रांति घेऊं लागले. हळूहळू संध्याकाळ होत आल्याने भक्तमंडळी लहान लहान गटांनी आपापल्या घरीं परत फिरली. शिष्यहि स्वामीजींबरोबर रामकृष्णपूरच्या घाटावर आला व नंतर आनंदाने बोलत बोलत नावेंतून बागबाजाराकडे निघाला.

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २२७०० दि: १७.५.६५
क्रमांक ....... दि: .......

# अध्याय ५ वा

**स्थान--दक्षिणेश्वर येथील कालीमंदिर आणि आलमबाजार मठ.**
**वर्ष--इ. स. १८९७ ( मार्च )**

विषय-- दक्षिणेश्वर येथील ठाकुरांचा अखेरचा जन्मोत्सव-- धार्मिक जीवनांत उत्सव-पर्वादिकांचें महत्त्व — अधिकारभेदानुसार सर्व लोकव्यवहारांची आवश्यकता-- स्वामीजींचा धर्मप्रचारामागील उद्देश, नवीन संप्रदाय स्थापन करणें नव्हे.

इंग्लंडहून स्वामीजी परत आले त्या सुमारास आलमबाजारांतील श्रीरामकृष्ण मठ स्थापन झाला होता. मठाची ही जागा 'भुताचा वाडा' म्हणून प्रसिद्ध होती. पण संन्यासी मंडळींच्या पावन संघाने हा भुतांचा वाडा श्रीरामकृष्ण-तीर्थस्थानांत परिणत झाला होता तेथे किती साधनभजन, किती जप-ध्यान, किती शास्त्रचर्चा व किती नामसंकीर्तनें झालीं असतील याची कांही गणती नाही. कलकत्त्यांतील राजोचित सन्मान स्वीकारून झाल्यानंतर स्वामीजी याच मोडक्यातोडक्या वाड्यांतील मठांत येऊन राहूं लागले. तसेंच, कलकत्त्यांतील लोकांनी त्यांच्यावरील श्रद्धेमुळे त्यांच्या निवासासाठी कलकत्त्याच्या उत्तरभागांतील काशीपूरमध्ये गोपाललाल सील यांचें जें उद्यानगृह घेऊन ठेवलें होतें, तेथेहि ते अधूनमधून येऊन राहत आणि दर्शनोत्सुक मंडळींशीं धर्मचर्चा करून त्यांची दर्शनकामना पूर्ण करीत.

श्रीरामकृष्णांचा जन्मोत्सव जवळ आलेला. दक्षिणेश्वरयेथील राणी रासमणीच्या कालीमंदिरांत या वेळीं उत्सवाची फार मोठ्या प्रमाणावर तयारी झाली होती. श्रीरामकृष्ण-भक्तमंडळींची तर गोष्टच नको-- पण अन्यहि धर्मपिपासु मंडळींच्या आनंदाला, उत्साहाला जणु सीमाच नव्हती; कारण विश्वविजयी स्वामीजी श्रीरामकृष्णांची भविष्यवाणी सुफलित करून यंदा परत

स्वदेशीं आले होते. त्यांचा गुरुबंधुगण त्यांच्या भेटींत जणु श्रीरामकृष्णसहवाससुखाचा अनुभव घेत होता. कालीमंदिराच्या दक्षिणेकडील विशाल स्वयंपाकघरांत नैवेद्याची तयारी होत होती. ९-१० च्या सुमारास आपल्या कांही गुरुबंधूंना बरोबर घेऊन स्वामीजी तेथे आले. त्यांच्या पायांत कांही नाही, माथ्यावर भगवा फेटा. त्यांचें तें अलोकसामान्य रूप पाहतां यावें म्हणून, त्यांच्या पादपद्मांना स्पर्श करण्याच्या हेतूने व त्यांच्या श्रीमुखांतून निघालेली अग्नीसमान उज्ज्वल, तेजस्वी वाणी ऐकून धन्य व्हावें म्हणून सारे लोक अगदी अधीर होऊन इकडे तिकडे धांवपळ करीत होते. स्वामीजींना आज अगदी क्षणाचीहि उसंत नाही. कालीमातेच्या मंदिरासमोर असंख्य लोक जमले आहेत. कालीमातेला स्वामीजींनी साष्टांग प्रणाम केला. उपस्थित हजारो लोकांनी मातेला वंदन केलें. नंतर श्रीराधाकांतजीच्या मूर्तीला प्रणाम करून ते आता ठाकुरांच्या (श्रीरामकृष्णांच्या) खोलीकडे जावयास निघाले. या खोलींत तर मुंगी रिघावयालाहि जागा नाही. 'जय रामकृष्ण' ध्वनीने कालीमंदिराचा कोपरान् कोपरा भरून गेला. शेकडो भाविकांना भरभरून आणण्यासाठी होरमिलर कंपनीचें जहाज सारखें फेऱ्या घालीत होतें. सनईच्या मंजुळ सुरावर सुरधुनी गंगा जणु नृत्य करीत होती. रामकृष्ण-भक्तांच्या रूपाने उत्साह, आकांक्षा, धर्मपिपासा व भक्तिप्रेम हीं जणु मूर्तिमंत साकार झालीं होतीं. या वेळचा हा उत्सव मनःप्राणांनी अनुभवण्यासारखाच होता— शब्दांनी त्याचें वर्णन करतां येणें शक्य नाही.

स्वामीजींबरोबर आलेल्या दोन इंग्रज महिला उत्सव पाहावयास आल्या होत्या. शिष्याचा त्यांच्याशीं परिचय नव्हता. त्यांना बरोबर घेऊन स्वामीजी पावन पंचवटीचें व बिल्वतरूचें

दर्शन घेत होते. स्वामीजींचा खास असा परिचय नसतांहि शिष्य त्यांच्या मागोमाग गेला व उत्सवावर रचलेलें संस्कृत स्तोत्र त्यानें त्यांना दाखविलें. तें वाचतां वाचतांच स्वामीजी पंचवटीच्या दिशेने पुढे जात होते. शिष्याकडे वळून ते म्हणाले, "सुरेख साधलें आहे, आणखीहि लिहीत चल."

पंचवटीच्या एका बाजूला ठाकुरांचे गृहस्थभक्त जमले होते. गिरीशबाबू (महाकवि गिरीशचंद्र घोष) उत्तरेकडे गंगेच्या दिशेने तोंड करून बसले होते, व ठाकुरांचें गुणगान व वचनामृत ऐकण्यांत दंग असलेला भक्तवृंद त्यांना घेरून बसला होता. इतक्यांत मंडळींनी वेढलेले स्वामीजी गिरीशबाबूजवळ येऊन, 'अरे ! हे तर घोष,' असे उद्गारले व त्यांनी त्यांना नमस्कार केला. गिरीशबाबूंनीहि विनम्रभावाने प्रतिनमस्कार केला. गिरीशबाबूंना पूर्वकालाची आठवण देऊन स्वामीजी म्हणाले, "घोष महाशय, तेव्हाचे ते दिवस तसे, अन् आजचा हा दिवस !" संमतीच्या सुरांत गिरीशबाबू म्हणाले, "तें तर खरेंच; पण अजूनहि इच्छा आहे की आणखीहि पाहतां यावें !" यानंतर त्या दोघांत ज्या गोष्टी झाल्या त्यांचें मर्म अनेकांच्या लक्षांत आलें नाही. थोडा वेळ बोलणें झाल्यानंतर स्वामीजी पंचवटीच्या उत्तरपूर्व बाजूस असलेल्या बिल्ववृक्षाकडे गेले. स्वामीजी निघून गेल्यावर भोवती बसलेल्या मंडळींना उद्देशून गिरीशबाबू म्हणाले, "एक दिवस हरमोहन (मित्र) कुठलंसं एक वर्तमानपत्र वाचून येऊन मला सांगूं लागला की स्वामीजींच्या नांवाने अमेरिकेंत कांही निंदास्पद लोकप्रवाद प्रसृत झाले आहेत. तेव्हा मी त्याला म्हणालों, "प्रत्यक्ष मीं माझ्या डोळ्यांनी जरी नरेन्‌ला कांही कुकर्म करतांना पाहिलें तरी मी म्हणेन तो माझ्या डोळ्यांचाच दोष--मी माझे डोळे काढून टाकीन ! ते म्हणजे जणु सूर्योदयापूर्वी काढलेलें शुद्ध लोणी,--

तें काय पुन्हा पाण्यांत मिसळणें शक्य आहे ?-- त्यांचे दोष जे कोणी काढतील तेच नरकांत जातील." अशा या गोष्टी होत असतांनाच स्वामी निरंजनानंद गिरीशबाबूंजवळ आले आणि त्यांनी कोलंबोपासून कलकत्त्यापर्यंत भारतांतील भिन्न भिन्न प्रान्तांतील लोकांनी स्वामीजींचें जें अभूतपूर्व स्वागत केलें व स्वामीजींनी आपल्या वक्तृत्वांतून त्यांना जो उपदेश केला त्याची त्रोटक माहिती त्यांना वर्णन करून सांगितली. ऐकतां ऐकतां गिरीशबाबू तर अगदी स्तंभित झाले.

त्या दिवशीं दक्षिणेश्वर-मंदिरांत सर्वत्रच एक दिव्यभावाचें तुफान उठलें होतें. आता तो सारा जनसमुदाय स्वामीजींचें व्याख्यान ऐकण्यासाठी उत्सुक झाला होता. पण लोकांच्या त्या कोलाहलांतून स्वामीजींचा आवाज ऐकूं येणें शक्य नव्हतें. तेव्हा बोलण्याचा प्रयत्न अर्थातच सोडून देणें भाग पडल्याने ते त्या दोन इंग्रज महिलांना ठाकुरांची साधनास्थानें दाखविण्यास व ठाकुरांच्या शिष्यांशीं व इतर अंतरंग भक्तांशीं त्यांचा परिचय करून देण्याच्या हेतूने बरोबर घेऊन निघाले. धर्मलाभासाठी त्या दोघी त्यांच्याबरोबर इतक्या दूर आल्याचेंच अनेकांना आश्चर्य वाटल्यानें स्वामीजींच्या अद्‌भुत प्रभावशक्तीचें ते आपआपसांत कौतुक करूं लागले.

तीन वाजण्याच्या सुमारास स्वामीजी शिष्यास म्हणाले,— "एखादी गाडी मिळाल्यास पाहा बरें ! आता मठांत जावें लागेल." आलमबाजारापर्यंत जाण्यासाठी दोन आणे भाडें ठरवन शिष्य गाडी घेऊन आल्यावर एका बाजूस स्वामीजी व दुसऱ्या बाजूस शिष्य व स्वामी निरंजनानंद बसले व सगळे मोठ्या आनंदाने आलमबाजाराकडे जाण्यास निघाले. जात असतां ते शिष्याला म्हणाले, "नुस्त्या अमूर्त कल्पना उराशीं बाळगून

निष्क्रिय पडून राहिल्याने काय साधणार ? येवढ्याचसाठी या असल्या उत्सवादिकांची आवश्यकता असते. यांच्या द्वारांच हे सारे भाव सर्वसामान्य जनतेंत हळूहळू प्रसृत होतील. हिंदूंच्या या पर्व-पर्वण्यांचा अर्थच मुळी हा की धर्माचीं थोर थोर तत्त्वें क्रमशः लोकांत प्रसृत करणें. यामुळे एक तोटाहि होतो. साधारण लोकांच्या लक्षांत या साऱ्या उत्सवांमागील मूळ मुद्दा येत नाही, ते या उत्सवांतच मग्न असतात--उत्सव संपला की त्यांची सारी कथा आपली मूळ पदावर येते पुन्हा—पुन्हा आपले जैसे थे ! या साऱ्या गोष्टी म्हणजे धर्माचें बाह्य आवरण,- वास्तविक धर्म-स्वरूपाला-आत्मज्ञानाला-त्या झाकून टाकतात हें अगदी सत्य.

पण ज्यांना धर्म काय, आत्म्याचें स्वरूप काय, वगैरे कांहीच कळत नाही ते या उत्सवादिकांच्या आनंदांतूनच हळूहळू धर्मस्वरूप उमगूं शकतात. हेंच पाहाना की आज जो हा ठाकुरांचा जन्मोत्सव झाला व त्यासाठी जे हे लोक आले ते एकदा ना एकदा जरूर ठाकुरांबद्दल विचार करतीलच. ज्यांच्या नांवावर आज इतके लोक एकत्रित झाले ते कोण ? त्यांच्याच नांवावर ही एवढी यात्रा कां लोटली, ह्या गोष्टी त्यांच्या मनांत खात्रीने येतीलच. ज्यांच्या मनांत हेहि विचार येणार नाहीत ते निदान या यात्रेंत भजन-कीर्तन ऐकतील, वर्षांतून निदान एकदा तरी प्रसाद घेतील व ठाकुरांचे भक्तमंडळ डोळ्यांनी पाहतील. या योगेंहि झाला तर त्यांचा फायदाच होईल--तोटा खासच होणार नाही."

शिष्य:-- पण महाराज हे उत्सव, हीं कीर्तनें म्हणजेच सारें कांही अशी जर कुणी समजूत करून घेतली तर काय त्याची उन्नति होणें शक्य आहे ? आपल्या देशांत अगोदरच षष्ठीपूजा, मंगलचंडीपूजा वगैरे उत्सव नित्य-नैमित्तिक स्वरूपांत पक्के

झाले आहेत. हाहि उत्सव अखेर त्यांच्यांतलाच एक होणार. मरेपावेतों लोक यासारखेच उत्सव करीत असतात, पण त्यांच्यांतून कांही कुणी ब्रह्मज्ञ झाल्याचें दिसत नाही.

स्वामीजी:-- कां बरें? भारतांत हे जे इतके धर्मवीर निपजले ते तरी निदान या गोष्टींच्याच आश्रयाने इतके उन्नत झाले ना? यांचा आश्रय घेऊन जेव्हा साधना करतां करतां त्यांना आत्मसाक्षात्कार होतो, तेव्हा नंतर मग ते या गोष्टींवर विशेष भर देत नाहीत. पण तरीहि अवतारतुल्य महापुरुषहि लोकसंग्रहासाठी या गोष्टींचें पालन करतात.

शिष्य:-- लोकांना दाखविण्यासाठी ते कदाचित् या गोष्टींचें पालन करीतहि असतील. पण आत्मज्ञान झाल्यावर हा संसारच सारा जिथे इंद्रजालाप्रमाणे मिथ्या म्हणून प्रतीत होतो तिथे, त्यांना हे बाह्यलोकाचार सत्य म्हणून कसे वाटतील?

स्वामीजी:-- कां नाही वाटूं शकणार? सत्य सत्य म्हणून आम्ही जें समजतों तेंहि तर सापेक्षच--देशकालपात्रभेदाने भिन्न भासणारेंच ना? म्हणूनच अधिकारभेदानुसार साऱ्याच व्यवहारांचें प्रयोजन असतें. ठाकुर म्हणत असत की आई जशी एखाद्या मुलाला पुलावा करून देते, तर एखाद्या मुलाला साबुदाण्याची खीर, हेंहि तसेंच.

स्वामीजींचा मुद्दा लक्षांत येतांच शिष्य एकदम चुप झाला. पाहतां पाहतां गाडी आलमबाजार मठापाशी आली. गाडीभाडें देऊन शिष्य स्वामीजींबरोबर मठांत प्रविष्ट झाला. तहान लागल्याचें म्हटल्यावरून त्याने स्वामीजींस पाणी आणून दिलें. पाणी पिणें झाल्यानंतर स्वामीजींनी अंगांतील सदरा काढून टाकला. जमिनीवर टाकलेल्या सतरंजीवर ते किंचित् लवंडले. बाजूला बसलेले स्वामी निरंजनानंद म्हणाले, "उत्सवाच्या वेळीं

असली गर्दी कधी पाहिली नव्हती. जणु सारें कलकत्ता शहर लोटलें होतें तिथे !"

स्वामीजी:-- कशी नाही होणार गर्दी ? आणखी काय काय होईल तें तर सारें आता यानंतरच पाहाल.

शिष्य:-- महाराज, प्रत्यक धर्मसंप्रदायांत कोणत्या ना कोणत्या प्रकारचा बाह्य उत्सव असल्याचें आढळून येतें. पण या बाबतींत कोणत्याहि एका पंथाची दुसऱ्या पंथाशीं एकवाक्यता असल्याचें दिसून येत नाही. महंमदाचा धर्म मोठा उदार म्हणून म्हणतात. पण ढाक्यांत (डाक्क्यांत) पाहिलें की त्यांच्यांतहि शिया आणि सुन्नी पंथाचे लोक लठ्ठालट्ठी करून आपसांत डोकेफोडी करीत असतात.

स्वामीजी:-- संप्रदाय म्हटला की या गोष्टी थोडचाबहुत प्रमाणांत होणारच. पण आमचा भाव काय हें माहीत आहे तुला ? तो आहे संप्रदायविहीनता. ही संप्रदायविहीनता दाखविण्यासाठीच तर आमच्या ठाकुरांचा अवतार. ते सारेच भाव, सारेच पंथ सारखेच मानीत. ते पुढे असेंहि म्हणत की ब्रह्मज्ञानाच्या दृष्टीने पाहिलें असतां हे सारेच मिथ्या, मायामात्र.

शिष्य: — आपलें म्हणणें कांही माझ्या लक्षांत येत नाही. कधी कधी तर मला वाटतें की आपणहि अशा प्रकारच्या उत्सवप्रचारादीद्वारा श्रीरामकृष्णांच्या नांवावर एखादा नवीन संप्रदाय सुरू करण्याच्या विचारांत आहांत. नाग महाशयांच्या तोंडून मीं ऐकलें आहे की श्रीरामकृष्ण कुठल्याहि एका पंथाचे नव्हते. शाक्त, ब्राह्म, वैष्णव, ख्रिश्चन, मुसलमान वगैरे साऱ्याच पंथोपपथांना ते बहुमान देत.

स्वामीजी:-- साऱ्या धर्मपथांना आम्ही त्यांच्याचप्रमाणे बहुमान देत नाही हें तुला कसें काय उमगलें ?

असें म्हणून हसत हसत स्वामी निरंजनानंदांना उद्देशून स्वामीजी म्हणाले, 'अरे, पाहा हा बांगाल * काय म्हणतो तें ?'

शिष्यः — महाराज, कृपा करून ही गोष्ट मला समजावून सांगा.

स्वामीजीः-- तूं माझीं व्याख्यानें तर वाचलीं आहेस ? त्यांतून कुठे मीं ठाकुरांच्या नांवाचा सांप्रदायिक भावाने प्रचार केला आहे ? अगदी बावनकशी उपनिषदान्तर्गत धर्मच तर जगभर सांगत फिरलों.

शिष्यः-- तें तर खरें. पण आपल्याशीं परिचय झाल्यानंतर मला आढळून आलें की ठाकुर म्हणजे आपले प्राणसर्वस्व. ठाकुरांना जर आपण भगवान् मानीत असाल, तर मग आपण साऱ्या लोकांत तसा प्रचार कां करीत नाही ?

स्वामीजीः-- जें मला समजलें, तेंच तर मी लोकांना सांगतों. वेदान्ताचें अद्वैत मत म्हणजेच यथार्थ धर्म असें जर तुला वाटत असेल तर तूं कां नाही तो साऱ्या लोकांना समजावून देत ?

शिष्यः— अगोदर मला त्याची अनुभूति होऊं द्या, मग मी तें सांगीन. वेदान्ताचीं मीं नुसतीं पुस्तकें वाचलीं आहेत.

स्वामीजीः-- तर मग आधी अनुभूति घे आणि मग लोकांना समजावून दे. प्रत्येकच जण सध्या कुठल्या तरी एखाद्या मतावर विश्वास ठेवून चालला असतो. त्या बाबतींत तुला बोलायचा कांही अधिकार नाही. कारण तूंहि देखील त्यांच्याचप्रमाणे कुठल्या तरी एका धर्ममतावर विश्वास ठेवून चालण्याखेरीज दुसरें तर कांही करीत नाहीस ?

शिष्यः-- तें खरें आहे. मी एका मार्गावर विश्वास ठेवून

---

* पश्चिम बंगालचे लोक पूर्व बंगालच्या लोकांना थट्टेने व अमळ उपहासाने 'बांगाल' असें म्हणत असतात.

चालतों हें खरें. पण माझ्या या विश्वासाला प्रमाण आहे शास्त्र. शास्त्रविरोधी मत मला मान्य नाही.

स्वामीजी:-- बरें शास्त्र म्हणजे जर उपनिषद्-प्रामाण्य असेल तर मग तेंच प्रामाण्य बायबल किंवा झेंदावेस्ता यांना कां असूं नये ?

शिष्य:-- या साऱ्या ग्रंथांचें प्रामाण्य मान्य केलें तरी ते सारे वेदांसारखे कांही प्राचीन ग्रंथ नाहीत. आत्मतत्त्वविचार जसा वेदांत आहे तसा अन्यत्र कोठेंहि नाही.

स्वामीजी:-- बरें, तूं म्हणतोस तें समजा मान्य केलें; तरी पण वेदांखेरीज अन्यत्र कोठेंहि सत्य नाही असें म्हणावयाचा तुला काय अधिकार ?

शिष्य:-- वेदांखेरीज इतरहि धर्मग्रंथांत सत्य असूं शकेल. त्याबाबत विरुद्ध असें मला कांहीच म्हणावयाचें नाही. मी मात्र उपनिषद् मतच प्रमाण मानून चालणार. माझा त्यांवर खूप विश्वास आहे.

स्वामीजी:-- वाटल्यास तूं खुशाल तसें कर. पण दुसऱ्या कोणाचा जर याचप्रमाणे अन्य कुण्या मतावर 'खूप' विश्वास असेल तर त्यालाहि मात्र त्याच्या विश्वासाप्रमाणे चालण्याची सवलत असूं दे. पुढे आढळून येईल तुला की तो आणि तूं,-तुम्ही दोघे एकाच जागीं पोहोचलां आहांत म्हणून. महिम्न स्तोत्र तूं काय वाचलें नाहीस--त्वमसि पयसां अर्णव इव ?

# अध्याय ६ वा

स्थळ— आलमबाजार मठ,
वर्ष-- इ. स. १८९७ (मे)

विषय--- स्वामीजीद्वारा शिष्याची दीक्षा-- दीक्षेपूर्वीचे प्रश्न-- यज्ञोपवीताच्या उत्पत्तीसंबंधी वेदांतील माहिती-- आपला मोक्ष व जगताचें कल्याण या विचारांत मनाला सतत निमग्न ठेवण्याचें नांवच दीक्षा--- क्षुद्र अहंभावांतूनच पाप-पुण्याची उत्पत्ति— क्षुद्र अहंकाराचा त्याग म्हणजेच आत्मप्रकाश— मनाच्या लोपांतच यथार्थ 'अहं'चा प्रकाश – आणि यथार्थ 'अहं' चें तेंच वास्तव स्वरूप-- 'कालेनात्मनि विन्दति--'

दार्जिलिंगहून स्वामीजी कलकत्त्यास परत आले आहेत. सध्या ते राहाताहेत आलमबाजार मठांतच. गंगातटाकीं कुठेतरी मठ हलविण्याच्या गोष्टी बोलल्या जात आहेत. शिष्य तर आजकाल दररोजच मठांत त्यांच्याकडे जात असतो, आणि अनेकदा तो रात्रीहि तेथेच राहतो. शिष्याच्या जीवनांतील प्रथम मार्गदर्शक श्रीनागमहाशय यांनी त्याला मंत्रदीक्षा दिलेली नाही आणि दीक्षेची गोष्ट त्यांच्याजवळ काढतांच स्वामीजींकडे बोट दाखवून ते त्याला म्हणत, 'एक स्वामीजीच जगद्गुरु होण्यास योग्य!' म्हणून दीक्षा घेण्याचा आपला निश्चय शिष्यानं पत्र लिहून स्वामीजी दार्जिलिंगला असतांना त्यांना कळविला होता. स्वामीजींनी उत्तरांत लिहिलें होतें, 'नागमहाशयांची हरकत नसल्यास मोठ्या आनंदाने मी तुला दीक्षा देईन.' तें पत्र अद्यापहि शिष्याच्या संग्रहीं आहे.

बंगाली सनाप्रमाणे आज १३०३ सालच्या वैशाख महिन्याची १९वी तिथि. आज शिष्याला दीक्षा देण्याचें स्वामीजींनी मान्य केलें आहे. शिष्याच्या जीवनांतील आजचा हा अनन्य-

साधारण दिवस. मोठ्या पहाटेसच गंगास्नान आटोपून व लिचूचीं कांही फळें व इतर सामग्री बरोबर घेऊन शिष्य सकाळीं ८ च्या सुमारास मठांत हजर झाला. शिष्याला पाहून हसत हसत, 'आज तुझें बलिदान करावयाचें--असेंच ना ?' असें ते म्हणाले. शिष्याशीं असें बोलून ते हसतमुखानेच इतरांशीं अमेरिकेबद्दल नाना गोष्टी बोलूं लागले. धर्मजीवनाची साधना करतांना कशा-प्रकारची एकनिष्ठता हवी, गुरूवर कशाप्रकारचा दृढविश्वास व भक्तिभाव असावयास हवा, गुरुवाक्याबद्दल किती आस्था हवी व गुरूंसाठी प्राणहि पणाला लावण्याची कशी सिद्धता पाहिजे वगैरे गोष्टींहि बोलण्याच्या भरांत ते सांगत होते. नंतर कांही प्रश्न विचारून ते शिष्याचें अंतरंग पारखून पाहू लागले. त्यांनी विचारलें, "मी तुला जेव्हा जें काम सांगेन तेव्हा तें तूं करूं शकशील तर ? गंगेंत उडी मारण्याने किंवा गच्चीवरून खाली अंग झोकून देण्याने तुझें कल्याण होणार आहे असें वाटून जर मीं तुला तसें करावयास सांगितलें तर किंचित्हि मागेपुढे न पाहतां तसें करावयाची तुझी तयारी राहील ना ? काय तो विचार आताच कर; नाही तर उगाचच मला गुरु करून घ्यायला पाय पुढे टाकूं नकोस." अशा प्रश्नांनी शिष्याच्या मनाची दौड कितपत आहे याची स्वामीजी कल्पना करून घेऊं लागले. शिष्यानेहि नतमस्तक होऊन त्यांच्या प्रत्येक प्रश्नाला 'हो' असेंच उत्तर दिलें.

स्वामीजी पुढे म्हणाले, "जे ही संसार-मोह-माया नाहीशी करून भवसागराच्या पलीकडे घेऊन जातात, कृपान्वित होऊन जे साऱ्या मानसिक आधीव्याधींचा विनाश करतात तेच यथार्थ 'गुरु' होत. पूर्वी 'समित्पाणि' होऊन शिष्य गुरूंच्या आश्रमीं जात. गुरुहि त्यांचा अधिकार पाहून त्यांना दीक्षा देत, त्यांच्या-

कडून वेद-पठन करवीत व कायामनोवाक्य-नियमनरूप व्रताचें चिन्ह म्हणून तिहेरी मौंजी-मेखला त्यांच्या कमरेला बांधून देत असत. या मौंजी-मेखलेलाच ते आपली कौपीन बांधीत असत. या मौंजी-मेखलेचीच जागा पुढे यज्ञोपवीताने--जानव्याने घेतली.

शिष्यः-- तर मग काय महाराज, आतासारखें सुती जानवें घालण्याची ही चाल काय वैदिक नाही ?

स्वामीजी:-- वेदांत कोठेहि सुती जानव्यांचा उल्लेख नाही. स्मृतिपंडित रघुनंदन म्हणतो, 'अस्मिन्नेव समये यज्ञसूत्रं परिधापयेत् ।' सुती जानव्यांचा उल्लेख गोभिल गृह्यसूत्रांतहि नाही. गुरुसमीप होणाऱ्या या प्रथम वैदिक संस्काराचाच शास्त्रांत 'उपनयन' म्हणून उल्लेख आढळतो. पण आज या देशाची काय दुरवस्था झाली आहे पाहा. शास्त्रमार्ग राहिला दूर, अन् त्याच्या नांवावर सारा देश भरून गेला आहे फक्त कांही देशाचार, लोकाचार व स्त्री-आचार यांनी. म्हणूनच तर माझें तुम्हांला सांगणें आहे की तुम्ही प्राचीनकालाप्रमाणेच शास्त्रमार्गाचें अनुसरण करा. स्वतः श्रद्धासंपन्न व्हा व सारा देशहि श्रद्धावान करा. नचिकेत्याप्रमाणे हृदयीं दृढ श्रद्धा बाणवा. प्रसंगीं नचिकेत्याप्रमाणे यमलोकीं प्रवेश करा--आत्मतत्त्व जाणून घेण्यासाठी, आत्मोद्धारासाठी, या जनन-मरण-समस्येची यथायोग्य मीमांसा करण्यासाठी. मृत्युमुखीं जाण्याने जर सत्यलाभ होणार असेल तर खुशाल अकुतोभयवृत्तीने मृत्युमुखीं प्रवेश करावयास हवा. भय म्हणजेच तर मृत्यु हें भयच ओलांडून जावयास हवें. या क्षणापासूनच भयशून्य व्हा. या, पुढे सरसावून--आपल्या मोक्षलाभासाठी, परकल्याणार्थ देहपात करण्यासाठी. मूठभर हाडामांसाचा हा बोजा नुसता वाहून राहून काय साधणार आहे ? ईश्वरलाभासाठी सर्वस्व-त्यागरूप मंत्राची दीक्षा घेऊन दधीचि

मुनींप्रमाणे परकल्याणार्थ अगदी हाडांमांसाचेंहि दान करा. ज्यांनी वेद-वेदान्ताचें अध्ययन केलें आहे, जे ब्रह्मज्ञ आहेत, दुसऱ्यांना भयाच्या पलीकडे नेण्याचें सामर्थ्य ज्यांच्या ठायीं आहे तेच यथार्थ गुरु होत असें शास्त्रें सांगतात. अशांचा आश्रय लाभतांच त्यांच्याजवळून दीक्षा घ्या—'नात्र कार्या विचारणा'—अशा वेळीं विचार करण्याची कांही गरजच नाही—पण याच तत्त्वाची आज काय परिणति झाली माहीत आहे ?--'अंधेनैव नीयमाना यथान्धाः।'--आंधळयामागून चाललेली आंधळयांची एक माळ !--

९ वाजावयाची वेळ झाली. गंगेवर न जातां आज स्वामीजींनी मठांतच स्नान केलें. स्नानानंतर एक नवीन भगवें वस्त्र परिधान करून ते मंदधीर गतीने देवघरांत गेले व पूजेसाठी मांडलेल्या आसनावर बसले. देवघरांत एकदमच न जातां शिष्य कांही क्षण बाहेर--दारींच--वाट पाहत उभा राहिला. स्वामीजींनी बोलावतांच आंत जावयाचें. स्वामीजी ध्यानस्थ बसले. मुक्तपद्मासन घातलेलें, डोळे किंचित् मिटलेले--जणु देहमनप्राण सारें स्पंदनहीन. ध्यान संपवून स्वामीजी हांक मारून म्हणाले--'ये बाबा !'--स्वामीजींच्या त्या प्रेमळ हांकेने शिष्य मुग्ध झाला व अगदी भारल्याप्रमाणे त्याने देवघरांत प्रवेश केला. तो देवघरांत येतांच स्वामीजींनी शिष्याला दार बंद करून घेण्यास सांगितलें. दार बंद झाल्यावर ते शिष्याला म्हणाले, "माझ्या डाव्या बाजूस बैस." स्वामीजींच्या आज्ञेनुसार शिष्य आसनावर बसला. त्याचें हृदय कसल्याशा अनिर्वचनीय व अपूर्व आनंदाने कंपित होऊं लागलें. त्यानंतर आपलें करकमल शिष्याच्या मस्तकीं ठेवून त्यांनी शिष्याला कांही अगदी खाजगी गोष्टी विचारल्या. शिष्याने यथाशक्य उत्तरें दिल्यावर त्यांनी महाबीज-

मंत्राचा त्याच्या कानांत त्रिवार उच्चार केला व मग शिष्यालाहि त्याचें त्रिवार उच्चारण करण्यास त्यांनी सांगितलें. नंतर साधनेसंबंधी शिष्याला कांही उपदेश करून ते अगदी एकटक नजरेने थोडा वेळ शिष्याच्या डोळ्यांकडे पाहत राहिले. शिष्याचें मन या क्षणीं अगदी निष्कंप व एकाग्र झाल्याने तो एक अनिर्वचनीय भावांत स्थिर झाला होता. असा किती वेळ गेला कांही उमजलें नाही. मग स्वामीजी म्हणाले, "आण, गुरु-दक्षिणा दे." 'काय देऊं?' असें शिष्याने विचारतांच ते म्हणाले, "जा कोठीघरांतून एखादें फळ घेऊन ये." धांवतच जाऊन शिष्याने कांही लिचूचीं फळें आणलीं. तीं फळें स्वामीजींनी ग्रहण केलीं, व ते म्हणाले, "जा, मिळाली तुझी गुरुदक्षिणा." आंत शिष्याची दीक्षा होत असतांनाच मठांतील आणखी एकजण दीक्षा घेण्याच्या निश्चयाने बाहेर उभा होता. स्वामी शुद्धानंद तेव्हा ब्रह्मचारी म्हणून मठांत राहत असूनहि त्यांची यथाविधि दीक्षा झाली नव्हती. आज शिष्याची अशाप्रकारें दीक्षा होतांना पाहून त्यांनाहि हुरूप आला व दीक्षा घेऊन शिष्य देवघराबाहेर येतो न येतो तोंच ते देवघरांत स्वामीजींजवळ गेले व आपली आंतरिक इच्छा त्यांनी स्वामीजींना सांगितली. शुद्धानंदांची प्रबळ इच्छा पाहून स्वामीजींनीहि त्यांच्या म्हणण्याला मान्यता दिली व ते पुन्हा पूजेच्या आसनावर जाऊन बसले.

शुद्धानंदांना दीक्षा दिल्यावर कांही वेळाने स्वामीजी बाहेर आले व जेवण झाल्यानंतर विश्रांतीसाठी म्हणून त्यांनी कांही वेळ अंग टाकलें. शिष्यानेहि शुद्धानंदांबरोबर स्वामीजींच्या ताटांतील उच्छिष्टाचा प्रसाद मोठ्या प्रेमाने ग्रहण केला, व मग स्वामीजींच्या पायथ्याशीं येऊन बसून त्याने त्यांचे पाय चेपून देण्यास सुरवात केली.

कांही वेळ वामकुक्षी झाल्यावर स्वामीजी वर बैठकींत जाऊन बसले. हीच वेळ योग्य आहे असें पाहून शिष्याने त्यांना प्रश्न केला, 'महाराज, पापपुण्याच्या कल्पनेचा उदय कसा झाला?'

स्वामीजी:-- बहुत्वबोधांतूनच या साऱ्या गोष्टींचा उगम होत असतो. माणूस जितका एकत्वाकडे जातो तितकी त्याची, जिच्यापासून सारे धर्म, पापपुण्य इत्यादि द्वंद्वभाव उत्पन्न होतात, ती 'मी-तूं पणा'ची जाणीव कमी होते. माझ्यापासून अमुक एक गोष्ट भिन्न आहे ही भावना मनांत येतांच इतर साऱ्या द्वंद्वभावांचा उद्भव व विकास होतो. आणि एकत्वाच्या संपूर्ण अनुभूतींत माणसाच्या शोक मोह वगैरेंचा समूळ नाश होतो-- 'तत्र को मोहः कः शोकः एकत्वमनुपश्यतः ।--एकत्वाच्या संपूर्ण जाणीवेने मनुष्यांत मोहशोकादिकांना जागाच राहत नाही.'

कुठल्याहि दुबळेपणाच्या अनुभूतीलाच पाप म्हणतात. या दुर्बलतेंतूनच हिंसाद्वेषादिकांचा जन्म होतो म्हणून दुर्बलता पाप, दुर्बलता म्हणजेच पाप. नित्य ज्योतिस्वरूप आत्मा अंतरीं सदैव प्रकाशमान. तिकडे लक्षच नाही—हाडामासांच्या या अद्‌भुत पिंजऱ्याकडे, या जड शरीरावरच सारें लक्ष केन्द्रित करून 'मी, मी' करीत असतात सगळे. सगळ्या प्रकारच्या दुर्बलतेचें मूळ आहे इथे. याच मीपणाच्या जाणीवेंतून जगांतील साऱ्या व्यावहारिक भावनांचा उदय झाला आहे. परमार्थभाव हा साऱ्या द्वंद्वांच्या अतीत असतो.

शिष्य:-- तर मग ही व्यावहारिक सत्ता काय सत्य नाही अजीबात?

स्वामीजी:-- 'मीपणा'चा बोध जोंवर आहे तोंवर ती सत्य. पण ज्या क्षणीं 'मी आत्मा' या बोधाची अनुभूति होते त्या क्षणीं

ही व्यावहारिक सत्ता मिथ्या. लोक पाप, पाप म्हणून जें म्हणतात तो दुबळेपणाचाच परिणाम; --‘ मी देह ’ या अहंभावनेचेंच रूपान्तर. जेव्हा ‘ मी आत्मा ’ हा बोध अंतरीं स्थिर होईल तेव्हा तूं पाप-पुण्य, धर्म-अधर्म वगैरे साऱ्या द्वंद्वांच्या अतीत होशील. ठाकुर म्हणत, ‘ मी-पण मेल्यानेच साऱ्या जंजाळाचा, साऱ्या कटकटींचा अंत.’

शिष्यः-- महाराज, हा ‘मी’ तर मरूनहि मरत नाही. याला मारणें कर्म महाकठीण.

स्वामीजीः-- हें एका दृष्टीने कठीण पण तितकेंच दुसऱ्या दृष्टीने पाहतां सोपें आहे. हा ‘मी’ कुठे आहे सांगूं शकशील ? जी वस्तु मुळांतच नाही तिला मरणें-मारणें तरी कुठलें ? मीपणाच्या एका मिथ्या जाणिवेने मनुष्य मोहिनीनिद्रेचा प्रयोग झाल्याप्रमाणे मंत्रमुग्ध झाल्यागत वावरत असतो. हें भूत उतरलें की सारें स्वप्न अपसारित होतें व एकच आत्मा चोहोकडे ओतप्रोत भरून असल्याचा अनुभव येतो. हेंच उमगायला, अनुभवायला हवें. साऱ्या साधन-भजनादिकांचा उद्देश मुळी हाच--हें आवरण दूर सारणें. तें आपसारित झाल्यावर चित्सूर्य स्वतेजाने स्वयंप्रकाशित होत असल्याचें पाहशील. कारण एकमात्र आत्माच स्वयंज्योति, स्वयंवेद्य. जी वस्तु मुळांतच स्वयंवेद्य ती दुसऱ्या कशाच्या साह्याने कशी आकलन होणार ? म्हणूनच तर श्रुतीने म्हटलें आहे, “ विज्ञातारम् अरे केन विजानीयात् । ” तूं जें काय जाणतोस तें मनरूप साधनाच्या साह्यानेच. पण मन तर जड— त्या मागे शुद्ध आत्मा विराजमान असल्यानेच तें कार्य करूं शकतें. तेव्हा या मनाच्या मदतीने कसें काय तुला त्या आत्म्याचें स्वरूप कळणार ? पण एवढें मात्र कळूं शकतें की मन व बुद्धि त्या शुद्ध आत्म्यापर्यंत पोहोचूं शकत नाहीत. व्यावहारिक ज्ञानाची

दौड फक्त सापेक्ष जगतापर्यंतच. पण मन जेव्हा विकल्प वा वृत्तिहीन होतें तेव्हा मनाचा लोप होतो--तेव्हाच होतो आत्म-साक्षात्कार. याच अवस्थेचें वर्णन भाष्यकार शंकराचार्यांनी 'अपरोक्षानुभूति' म्हणून केलें आहे.

शिष्यः-- पण महाराज, मन म्हणजेच तर 'मी'. त्या मनाचाच जर लोप झाला तर 'मी हि राहणें शक्य नाही.

स्वामीजीः-- ती जी अवस्था तीच 'मी'पणाचें यथार्थ स्वरूप. तेव्हा जो मी उरेल तोच सर्वभूतस्थ, सर्वग, सर्वान्तरात्मा, जसें घट भंगल्याने घटाकाशच महदाकाश होतें. घट भंगल्याने त्या-मधील आकाश काय नाश पावतें की काय रे? ज्या क्षुद्र 'मी'ला तूं देहबद्ध म्हणून मानीत होतास तोच विस्तृत होऊन 'सर्वगत मी' किंवा आत्मारूपाने अनुभवास येतो. म्हणून मन राहिलें काय किंवा गेलें काय, त्याचें या यथार्थ 'मी'ला वा आत्म्याला काय?

आता मीं जें हें सांगितलें तें कालान्तराने तुझ्या अनुभवास येईल. 'कालेनात्मनि विन्दति।' श्रवण मनन करतां करतां कालान्तराने या गोष्टींची धारणा होईल--आणि तूं मनाच्या पलीकडे जाशील. तेव्हा मग या असल्या प्रश्नांना जागाच राहणार नाही.

या गोष्टी ऐकून शिष्य अगदी स्तब्ध झाला. शिष्याची ती अवस्था बघून स्वामीजी पुढे म्हणाले, "ही अगदी साधी, सरळ अन् सोपी गोष्ट समजावून देण्यासाठी किती शास्त्रें लिहिलीं गेलीं असतील, पण तरी कांही लोकांना अजूनहि उमगत नाही. क्षणसुखदायी चांदीसोन्यासाठी आणि कामिनीच्या क्षणभंगुर रूपा-वर लुब्ध होऊन हा दुर्लभ मनुष्य-जन्म ते कसा व्यर्थ खर्ची घाल-तात पाहा? महामायेचा काय हा विलक्षण पगडा? मा! मा!!"

---

# अध्याय ७ वा

**स्थान— कलकत्ता.**

**वर्ष-- इ. स. १८९७**

**विषय—** श्रीरामकृष्णभक्तांना निमंत्रित करून कलकत्त्याला स्वामीजींद्वारा 'रामकृष्ण मिशनची' स्थापना— श्रीरामकृष्णांचा उदार भाव प्रसृत करण्याबाबत विचारविनिमय-- श्रीरामकृष्ण स्वामीजींकडे कोणत्या दृष्टीने पाहत असत-- स्वामीजींचा श्रीरामकृष्णांबद्दल काय दृष्टिकोन होता-- याबाबत श्रीयोगानंद स्वामीजींचें मत-प्रदर्शन-- आपल्या ईश्वरावतारत्वाबाबत श्रीरामकृष्णांचीं वचनें— अवतारत्वावर विश्वास ठेवणें ही अत्यंत कठीण गोष्ट-- डोळ्यांनी सारें पाहूनहि विश्वास बसत नाही— हा विश्वास निर्माण होणें त्यांच्या कृपेवरच अवलंबून-- कृपेचें स्वरूप व कोणत्या महाभागाना ती लाभते— स्वामीजी व गिरीशबाबू यांचें संभाषण.

कांही दिवसांपासून स्वामीजी बागबाजारांतील कै. बलराम बोस यांच्या घरीं राहत आहेत. परमहंसदेवांच्या गृहस्थ भक्तांना त्यांनी निमंत्रण दिलें असल्याने ३ वाजतां ते सारे या घरीं येऊन दाखल झाले. स्वामी योगानंदहि तेथे उपस्थित आहेत. साऱ्यांना बोलावण्यांत स्वामीजींचा उद्देश आहे एक संस्था स्थापण्याचा. सर्वजण आपआपल्या जागीं बसल्यावर स्वामीजी म्हणाले--

"नाना देश-विदेश फिरून पाहिल्याने माझी तर ठाम समजूत झाली आहे की संघटित संस्थेखेरीज कोणतेंहि मोठें कार्य पार पाडतां येणें शक्य नाही. पण आपल्या देशासारख्या या देशांत अगदी सुरवातीलाच लोकमतानुवर्ती संस्था काढणें वा सार्वमत घेऊन काम करणें तितकेसें लाभदायक होईल असें वाटत नाही. पाश्चात्य देशांतील स्त्री-पुरुष एकतर आपल्यापेक्षा अधिक सुशिक्षित आहेत आणि दुसरें म्हणजे आपल्यासारखे व्यक्तिगत

दा. क्र. ८७८८

हेवेदावे त्यांच्यांत नाहीत. गुणांची त्यांना कदर आहे. हेंच पाहा ना की माझ्यासारख्या एका सामान्य माणसाला केवढा मोठा सन्मान त्यांनी दिला! शिक्षणाच्या वाढत्या प्रसाराबरोबर लोक जेव्हा अधिक उदार व सहानुभूतिसंपन्न होतील, पक्षोपपक्षांतील मतप्रणालींच्या संकुचित मर्यादा ओलांडून त्यांचे विचार जेव्हा उदार होतील तेव्हाच लोकमतानुवर्ती संस्थांचें कार्य या देशांत चालूं शकेल. एवढ्याचसाठी या संस्थेंत एकजण सर्वाधिकारी नेमणें उचित होईल. सर्वांनी त्याच्या आज्ञेनुसार चालावयास हवें. पुढे कालान्तराने सार्वमत घेऊन काम करावें.

"ज्यांच्या नांवावर आम्ही संन्यासी झालों आहोंत, ज्यांना जीवनांत आपला आदर्श मानून आपण सारे या संसाराश्रमांत काम करीत आहांत, ज्यांच्या देहावसानानंतर वीसच वर्षांच्या कालावधींत पौर्वात्य पाश्चिमात्य साऱ्याच देशांत ज्यांचें नांव व अद्भुत जीवन-कार्य यांचा आश्चर्यकारक रीतीने प्रसार झाला आहे, त्यांचेंच नांव या संस्थेला देण्यांत यावें. प्रभूचे दास सारे आपण -- आपण साऱ्यांनीच या कार्याला हातभार लावावा."

श्री. गिरीशचंद्र घोष वगैरे प्रमुख उपस्थित गृहस्थभक्तांनी या सूचनेला अनुमोदन दिल्यानंतर रामकृष्ण मिशनच्या भावी कार्यप्रणालीवर चर्चा सुरू झाली. संस्थेचें नामकरण करण्यांत आलें 'रामकृष्ण-संघ' संघाचें उद्दिष्ट वगैरे गोष्टी आम्ही त्याच्या छापील पत्रकावरून पुढे देत आहोंत:—

उद्दिष्ट:-- मानवाच्या कल्याणासाठी श्रीरामकृष्णांनी जीं तत्त्वें सांगितलीं व आपल्या जीवनांत उतरविलीं, त्यांचा प्रसार आणि मनुष्याची शारीरिक, मानसिक व पारमार्थिक उन्नति

होण्यासाठी हीं तत्त्वें जास्तीत जास्त उपयोगी होतील असा प्रयत्न करणें हा या संघाचा उद्देश आहे.

व्रतः-- जगांतील भिन्न भिन्न धर्म, पंथ हे सारे एकाच अक्षय सनातन धर्माचीं भिन्न भिन्न रूपें होत अशा भावनेने वेगवेगळ्या धर्मांतल्या लोकांत प्रेम निर्माण करण्यासाठी श्रीरामकृष्णांनी जें कार्य केलें, त्याचा प्रसार करणें हें या संघाचें व्रत होय.

कार्यप्रणाली:-- मानवाच्या ऐहिक आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी उपयुक्त ज्ञान देण्यासाठी लोक सुशिक्षित करणें, शिल्पादि श्रमोपार्जनावर उपजीविका करणाऱ्यांना प्रोत्साहन देणें आणि वेदान्त आणि इतर अन्यान्य धर्मभाव श्रीरामकृष्णांच्या जीवनांत ज्या स्वरूपांत व्यक्त झाले, त्यांचा सामान्य जनतेंत प्रसार करणें.

भारतवर्षीय कार्य:-- भारतांत गावोगावीं आचार्यपद चालविण्यासाठी गृहस्थ व संन्यासी यांना शिक्षण देण्याकरिता आश्रम स्थापन करणें व ज्यायोगें हे लोक देशदेशांतराला जाऊन लोकांना शिक्षित करूं शकतील अशा गोष्टींसाठी उपाययोजना करणें.

विदेशीय कार्यविभाग:— भारताबाहेरील देशांत 'व्रतधारी' प्रचारक पाठविणें, भारतांतील व भारताबाहेरील आश्रमांत प्रेमाचे व सहानुभूतीचे घनिष्ठ संबंध स्थापणें व वाढविणें आणि नवनवीन आश्रमांची स्थापना करणें.

स्वामीजी या संघाचे (मिशनचे) अध्यक्ष झाले. स्वामी ब्रह्मानंद कलकत्ता केन्द्राचे अध्यक्ष नेमले गेले व स्वामी योगानंदांची त्यांचे मदतनीस म्हणून नेमणूक झाली. ॲटर्नी बाबू नरेन्द्रनाथ मित्र सेक्रेटरी, डॉ. शशीभूषण घोष व शरच्चंद्र सरकार हे दुय्यम

सेक्रेटरी झाले. शिष्याची नेमणूक शास्त्रशिक्षक म्हणून झाली. याबरोबरच असेंहि ठरलें की संघाची सभा दर रविवारीं दुपारीं चार वाजतां कै. बलराम बाबू यांच्या घरीं भरत जाईल. या सभेनंतर तीन वर्षें रामकृष्ण संघाची बैठक दर रविवारीं ठरल्याप्रमाणे बलरामबाबूंच्या घरीं भरत असे. स्वामीजी दुसऱ्यांदा परदेशीं जाईपर्यंत सवडीनुसार या बैठकींना हजर असत व कधी उपदेशपर भाषण करून तर कधी आपल्या देवदुर्लभ किन्नरसदृश मधुर आवाजांत गाऊन उपस्थितांना मोहून टाकीत, हें येथे सांगावयास हवेंच असें नाही.

सभा संपून सर्व लोक निघून गेल्यावर स्वामी योगानंदांना उद्देशून स्वामीजी म्हणाले, " हें कार्य अशा रीतीने एकदा सुरू तर झालें. श्रीरामकृष्णांच्या कृपेने कसें काय यशस्वी होतें तेंच आता पाहावयाचें."

स्वामी योगानंदः-- तुमचें हें सारें काम पाश्चात्य वळणावर चाललें आहे. असें करण्याचा ठाकुरांचा आदेश होता काय ?

स्वामीजीः-- ठाकुरांना हें अभिमत नव्हतें हें तुला कसें कळलें ? अनंत भावमय ठाकुरांना तुम्ही काय आपल्या संकुचित मर्यादांनी जखडून टाकणार आहांत ? मी या साऱ्या मर्यादा भंगून टाकून त्यांचा भाव साऱ्या विश्वांत प्रसृत करून जाईन. आपल्या पूजाअर्चेचा प्रचार करण्याचा उपदेश ठाकुरांनी मला कधीच दिला नाही. साधनभजन, ध्यानधारणा व अन्य उच्च धर्मभावांसंबंधी त्यांनी जो उपदेश दिला, त्याचा आधी अनुभव घेऊन नंतर त्याची सर्वत्र शिकवण द्यावयास हवी. मतें तर अनंत आहेत, व मार्गहि पण अनंत आहेत. संप्रदायांनी भरलेल्या या जगांत आणखी एका संप्रदायाची भर घालण्याकरिता कांही माझा जन्म झाला नाही. प्रभुपदकमलांच्या आश्रयाने आम्ही धन्य

झालों आहोंत. त्यांचीच भावराशि सर्वत्र वितरित करण्यासाठीच आमचा जन्म.

स्वामीजींचें म्हणणें खोडून काढण्यासाठी स्वामी योगानंदांनी एक अक्षरहि न काढल्याने स्वामीजी पुढे म्हणाले, "प्रभुकृपेची प्रसादचिन्हें माझ्या या जीवनांत अनेकदा प्रत्ययास आलीं आहेत. तेच मागे उभे राहून माझ्याकडून हीं सारीं कामें करवून घेतात. भुकेने व्याकुळ होऊन झाडाखाली जेव्हा पडून राहत होतों, कौपीन नेसायला म्हणून देखील कापडाची बोटभर चिंधी जेव्हा जवळ नसे, हातीं एक पैसाहि नसतांना जेव्हा पृथ्वीपर्यटनाचा निश्चय केला तेव्हा ठाकुरांच्या कृपेनेच साऱ्या बाबतींत मला मदत मिळत गेली. याउलट या विवेकानंदाला नुसतें एकदा पाहावयाला मिळावें म्हणून शिकागोच्या रस्त्यांतून लोटलेल्या गर्दींत लठ्ठालट्ठी व्हायची; ज्या सन्मानाच्या शतांशाचा एकांश मिळाला तरी सामान्य माणसाचें डोकें फिरून जाईल तो तसला सन्मानहि ठाकुरांच्या कृपेने विनायास पचवून टाकूं शकलों--प्रभुकृपेने सर्वत्र विजयी झालों. आता या देशांत कांही कार्य करून जाईन. साऱ्या शंका-कुशंका सोडून माझ्या या कार्याला तुम्ही हातभार लावा, पाहाल त्यांच्या कृपेने साऱ्या गोष्टी पूर्णपणें साध्य होतील.

योगानंद:-- तुमच्या इच्छेप्रमाणेच साऱ्या गोष्टी होतील. आम्ही तर नेहमीच तुमच्या सांगण्याप्रमाणे वागत आलों आहोंत. वेळोवेळीं हें तर मला अगदी स्पष्ट दिसतें की ठाकुरच साऱ्या गोष्टी तुमच्या करवीं करवून घेत आहेत. पण काय असेल तें असो, एखादवेळीं कुठे तरी कांही तरी खटकतें--ठाकुरांची अन्यरूप असलेली कार्यप्रणाली पाहिली आहे की नाही!--म्हणून असेल कदाचित्. कधी कधी वाटतें की, त्यांचें म्हणणें

मराठी ग्रंथ संग्रहालय अनुक्रम २७६०० दि: १९५५ ७१६० नों: दि:

बाजूला ठेवून आपण भलतीकडेच तर जात नाही ना ? याच हेतूने मधून मधून सावधगिरीचा इशारा देतों.

स्वामीजी:-- असल गोष्ट काय आहे ठाऊक आहे ? सामान्य भक्तांना रामकृष्णांचें स्वरूप जेवढें उमगलें तेवढेंच कांही तें नाही. ते आहेत अनंतभावमय. ब्रह्मज्ञानाला एकवेळ मर्यादा घालतां येईल पण श्रीरामकृष्णांच्या अगम्य भावांना मात्र सीमा नाही. त्यांच्या एका कृपाकटाक्षाने लाखो विवेकानंद क्षणमात्रांत निर्माण होतील. पण तसें न करतां मुद्दामच या वेळीं माझ्या करवीं, मला यंत्र करून ते या साऱ्या गोष्टी करवून घेत आहेत त्याला मी काय करूं सांग ?

हें बोलणें झाल्यावर कांही कामासाठी स्वामीजी तेथून दुसरीकडे निघून गेले. स्वामी योगानंद शिष्याला म्हणाले, "पाहिलास नरेन्‌चा विश्वास ? म्हणाला की ठाकुरांच्या कृपा-कटाक्षाने लाखो विवेकानंद निर्माण होतील. काय ही विलक्षण गुरुभक्ति ! तिचा एक कण जरी लाभला तर धन्य होऊन गेलों असतों."

शिष्य:— महाराज, श्रीरामकृष्ण स्वामीजींबद्दल काय म्हणत असत ?

योगानंद:—ते म्हणत, 'या युगीं असला दुसरा आधार झाला नाही.' कधी म्हणत, 'नरेन् पुरुष, मी प्रकृति,'—'नरेन् माझी सासुरवाडी,'--कधी म्हणत, 'अखंडाच्या श्रेणीपैकी'—कधी म्हणत, 'अखंडाच्या राज्यांत जेथे देवदेवता आपलें अस्तित्व ब्रह्मा-पासून वेगळें राखूं शकत नाहीत--विलीन होऊन जातात. तेथे सात ऋषि आपापलें अस्तित्व वेगळें राखून ध्यानांत निमग्न असल्याचें पाहिलें. नरेन् त्यांच्यापैकीच एकाचा अंशावतार.' 'जगत्पालक नारायणाने नर व नारायण नांवाने ऋषिरूप धारण

करून जगाच्या कल्याणार्थ तपश्चर्या केली. नरेन्द्र म्हणजे त्यांपैकी नराचाच अवतार'-- असेंहि कधी ते सांगत असत. कधी म्हणत -' नरेन् अगदी शुकदेवांसारखा, माया त्याला कदापिहि स्पर्श करूं शकली नाही.'

शिष्य:-- ह्या साऱ्या गोष्टी काय खऱ्या आहेत ? की भावावस्थेंत असतांना एकेका वेळीं अशी एक एक गोष्ट ते सांगत ?

योगानंद:— त्यांच्या साऱ्याच गोष्टी सत्य. त्यांच्या श्रीमुखांतून कधी चुकूनहि मिथ्या गोष्ट बाहेर येत नसे.

शिष्य:— मग वेगवेगळया वेळीं अशा भिन्न भिन्न गोष्टी ते कां सांगत ?

योगानंद:-- मी काय म्हणतों तुला कळलेंच नाही. या साऱ्या गोष्टी नरेन्‌मधे एकाधारें व्यक्त झाल्या आहेत असें ते म्हणत. नरेन्‌मधे ऋषींचें वेदज्ञान, शंकराचार्यांचा त्याग, बुद्धदेवांचें हृदय, शुकदेवांची मायामोहशून्यता व ब्रह्मज्ञानाचा पूर्ण विकास हीं सारीं एकाच आधारें असल्याचें तुला दिसत नाही का ? म्हणूनच ठाकुर वेळोवेळीं अशा नाना प्रकारच्या गोष्टी त्याच्याबद्दल सांगत. जें सांगत तें सारें खरेंच होतें.

हें ऐकून शिष्य अगदी मुग्ध झाला. इतक्यांत स्वामीजी पुन्हा परत आले व त्यांनी शिष्याला विचारलें, "तुमच्या त्या भागांत ठाकुरांबद्दल लोकांना विशेष माहिती आहे की नाही ?"

शिष्य— महाराज, आमच्या भागांतून एकटे नागमहाशयच काय ते श्रीरामकृष्णांकडे आले होते--त्यांच्या तोंडून ऐकूनच आता पुष्कळांना श्रीरामकृष्णांबद्दल जिज्ञासा उत्पन्न झाली आहे. पण ठाकुर म्हणजे ईश्वरावतार या गोष्टीची त्या लोकांना जाणीवहि नाही; आणि पुष्कळांचा तर या गोष्टीवर सांगूनहि विश्वास बसणार नाही.

स्वामीजीः--त्या गोष्टीवर विश्वास बसणें काय इतकी सोपी गोष्ट आहे ? आम्हीं त्यांना हातींपायीं पारखून पाहिलें. त्यांच्याच तोंडून ही गोष्ट वारंवार ऐकली, रात्रंदिवस त्यांच्या बरोबर राहिलों, तरी देखील वेळप्रसंगीं आमच्याहि मनांत जर संशय--शंकाकुशंका--उत्पन्न होतात, तर मग इतरांची काय कथा?

शिष्यः—'आपण पूर्ण ब्रह्मावतार भगवान् आहोंत' ही गोष्ट आपल्या तोंडाने त्यांनी तुम्हांला कधी सांगितली होती काय ?

स्वामीजीः--किती तरी वेळा ! आम्हां साऱ्यांनाच त्यांनी तसें सांगितलें. तेव्हा ते होते काशीपूर बागेंत. शरीर आता अगदी जातें की राहतें अशी त्यांची अवस्था झालेली. असाच एक दिवस त्यांच्या बिछान्यापाशी बसलों असतां माझ्या मनांत आलें, "हे जर आता म्हणतील 'मी भगवान्', तर खरें वाटेल की हे खरोखरीच भगवान् आहेत." त्यांचें शरीर जाण्याच्या दोनच दिवस आधीची ही गोष्ट. तत्क्षणीं माझ्याकडे वळून ते म्हणाले, "जो राम, जो कृष्ण तोच आता या शरीरीं रामकृष्ण. नुसत्या वेदान्तदृष्टीने नाही—अगदी साक्षात्." तें ऐकून तर मी अगदी थक्क झालों. साक्षात् प्रभूच्या श्रीमुखानेच वारंवार ही गोष्ट ऐकूनहि आमचाच जिथे पूर्ण विश्वास नाही; संशय, निराशादिकांनी आमचींच मनें जिथे विचलित होतात तिथे दुसऱ्यांची काय गोष्ट ? आपल्याचसारख्या एखाद्या माणसाला ईश्वर मानावयाचें व त्यावर तसा विश्वास ठेवायचा ही अत्यंत कठीण गोष्ट आहे. फारच फार तर आपण त्याला सिद्ध ब्रह्मज्ञ पुरुष म्हणून मान्य करूं ! येवढ्याचसाठी त्यांना तुम्ही कांहीहि म्हणून संबोधा, त्यांना कांहीहि माना--त्यांना महापुरुष म्हणा वा ब्रह्मज्ञ म्हणा—त्यांत कांही क्षिति नाही. पण श्रीरामकृष्णां-

सारखा असा पुरुषोत्तम या भूतलावर यापूर्वी कधीच झाला नाही हें मात्र पक्कें लक्षांत ठेव. घोर अंधाराने व्यापलेल्या या संसारांत आता हाच महापुरुष ज्योतिस्तंभरूप. त्याच्याच प्रकाशांत माणूस या संसार-सागरापलीकडे जाऊं शकेल.

शिष्यः-- महाराज, मला तर वाटतें की कांही विशेष चमत्कार वगैरे पाहिल्या-ऐकल्याखेरीज यथार्थ विश्वास बसणें कठीण. असें ऐकतों--मथुरबाबूंनी ठाकुरांच्या बाबतींत अशा किती तरी गोष्टी पाहिल्या होत्या.

स्वामीजीः-- मुळांतच ज्याचा विश्वास नाही त्याचा कांही ऐकून-पाहूनहि विश्वास बसणें शक्य नाही. अशा माणसाला वाटतें की, हा भ्रम तर नसेल ? स्वप्न तर नसेल ? कृष्णाचें विश्वरूप दुर्योधनानेहि पाहिलें, अर्जुनानेहि पाहिलें. अर्जुनाचा त्यावर विश्वास बसला, दुर्योधनाला उलट वाटलें की हा कांही तरी जादूटोणा असावा ! भगवंतानेच समजावून न दिल्यास कांही सांगणें समजणें कुणालाच शक्य नाही. कांहीहि न पाहतां, कांहीहि न ऐकतां, कांहींचा अगदी सोळाआणे विश्वास जडून जातो, उलट सतत बारा वर्षें अगदी समोर वावरून, नाना दैवी शक्तींचा प्रभाव स्वतःच्या डोळ्यांनी पाहूनहि एखाद्याचा विश्वास बसत नाही. तेव्हा असल गोष्ट आहे भगवंताची कृपा. तरीहि चिकाटीने प्रयत्न हा करायलाच हवा, तरच त्याची कृपा होणार.

शिष्यः-- महाराज, या भगवत्कृपेचे काय कांही नियम आहेत ?

स्वामीजीः-- आहेतहि आणि नाहीतहि.

शिष्यः-- हें कसें काय ?

स्वामीजीः-- जे तनमनवचनाने सदा पवित्र असतात, ज्यांच्या

ठिकाणीं अनुराग-भक्ति प्रबल असते, जे नित्य सदसत्‌विचार करतात व ध्यानधारणादिकांत सदैव मग्न असतात, अशांवरच प्रभुकृपा होत असते. पण भगवान प्रकृतीच्या साऱ्या नियमांच्या अतीत आहेत. कुठलाहि नियम त्यांना बद्ध करूं शकत नाही; ठाकुरांनी म्हटल्याप्रमाणे 'भगवंताचा स्वभाव एखाद्या बालकाप्रमाणे असतो'—म्हणूनच आपण पाहतों की कोटि कोटि जन्म प्रार्थना करूनहि एखाद्याला त्याचा सुगावाहि लागत नाही. आणि याउलट ज्याला आपण पापी, पतित म्हणतों, नास्तिक म्हणतों त्याला अगदी एकदमच अंतरीं चित्प्रकाशाचा लाभ होतो. अगदी अयाचित भावाने भगवान त्याच्यावर कृपा करतात. त्याच्या पूर्वसुकृताने त्याला ती लाभली असावी असें फार तर तुम्ही म्हणूं शकाल. पण हें गूढ आकलन होणें फार कठीण. ठाकुरच कधी म्हणत, "भगवंतावर सारा भार घालून राहा—सुकलें पान वाऱ्या हातीं सारें सोपवून तो नेईल तिकडे जसें जातें तसें राहा."--याउलट तेच कधी कधी सांगत--'भगवन्ताचा कृपासमीरण तर नित्य वाहातोच आहे, तुम्ही आपल्या नावांचीं शिडेंच काय तीं तेवढीं मोकळीं करा."

शिष्य:-- ही तर अति कठीण गोष्ट वाटते महाराज! कुठल्याहि प्रकारच्या बुद्धिवादाला येथे जागाच नाही राहत.

स्वामीजी:-- देश-काल-निमित्तांनी बद्ध असलेल्या मायेच्या राज्यांतच बुद्धि-विचारादिकांची क्रिया असते. भगवान तर या देशकालनिमित्तादिकांच्या अतीत. त्यानेच नियम केले आहेत पण तो मात्र साऱ्या नियमांच्या पलीकडचा. तोच ज्यांना आपण नियति-नियम म्हणतों ते करतो--स्वतःच तो ते नियम होतो आणि तरीहि तो त्यांच्या पार असतो. तो ज्यांच्यावर कृपा करतो ते तत्क्षणींच त्या नियमांच्या बंधनमर्यादांतून मुक्त होतात.

म्हणूनच त्या प्रभुकृपेसंबंधी कांही आखीव बांधीव नियम सांगतां येत नाही. हें सारें विश्वब्रह्मांडच त्याची लीला--'लोकवत्तु लीलाकैवल्यम्।" आपल्या इच्छामात्रेंकरूनच जो हें विश्वब्रह्मांड रचूं आणि मोडूं शकतो त्याला काय कृपाबलाने एखाद्या महापाप्याला मुक्ति देतां येणार नाही ? तरीहि कांही लोकांकडून तो साधनभजन करवून घेतो व कांहींना कांहीहि करावयास लावत नाही--ही सारी त्याची इच्छा--त्याची सारी लीला.

शिष्य:-- यांतलें कांहीच लक्षांत येत नाही.

स्वामीजी:-- आणि नुसतें समजून तरी काय होणार ? साधेल तितकें आपलें मन त्याच्या चरणीं लाव. त्यायोगेंच हें जगत्--हें इंद्रजाल आपोआप वितळून जाईल; पण यासाठी चिकाटीने मन लावायला मात्र हवें. काम-कांचनादिकांची वासना मनांतून काढून टाकावयास हवी, नित्य सदसत् विचार करावयास हवा; मी देह नव्हे अशा ठाम समजुतीने विदेहभावाने व्यवहार करावयास हवा. मी सर्वगत आत्मा हा अनुभव घ्यावयास हवा. सतत चिकाटीने या गोष्टी करणें म्हणजेच पुरुषकार--प्रयत्न, साधना. या साधनांच्या साहाय्यानेच संपूर्ण निर्भरतेचा भाव उत्पन्न होईल; यालाच म्हणतात परम पुरुषार्थ.

स्वामीजी पुढे म्हणाले, "त्याची कृपा तुमच्यावर जर नसती तर तुम्ही येथे आलेच तरी कसे असतां ? ठाकुरांचें म्हणणें असें की ज्यांच्यावर ईश्वराची कृपा झाली ते येथे येतीलच येतील; ते कुठेहि राहोत, कांहीहि करोत, येथल्या गोष्टींचा, येथल्या भावांचा त्यांच्यावर प्रभाव पडेलच पडेल. तुझा तूंच विचार करून पाहा ना--जे कृपासिद्ध, प्रभुकृपा ज्यांना यथार्थ उमगली त्या नागमहाशयांचा संगतिलाभ काय ईश्वरकृपेशिवाय झाला तुला ? 'अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम्--' जन्म-

जन्मान्तरींचें सुकृत गाठीं असल्यास अशा महापुरुषाचें दर्शन लाभतें. उत्तम भक्तीचीं शास्त्रांत सांगितलेलीं सारीं लक्षणें नागमहाशयांत परिपूर्ण रूपांत आढळतात. 'तृणादपि सुनीचेन' असें जें म्हणतात तें एकमात्र नागमहाशयांतच आढळून येतें. तुमचा पूर्वबंगाल देश धन्य--नागमहाशयांच्या पावन पदस्पर्शानें तो पुनीत होऊन गेला आहे."

बोलतां बोलतां स्वामीजी महाकवि गिरीशचंद्र घोषांच्या घराकडे फिरावयास जाण्यासाठी म्हणून निघाले. शिष्य व योगानंद हे त्यांच्याबरोबर होते. गिरीशचंद्रांच्या घरीं येऊन बसल्यावर स्वामीजी म्हणाले, "जी. सी. * ! आजकाल सदान्-कदा मनांत येतें हें करावें, तें करावें--त्यांच्या (ठाकुरांच्या) मंगलमय वाणीने सारें जग भरून टाकावें. पुन्हा मनांत शंका येते--अशाने भारतांत एखादा नवीन संप्रदायच तर नाही ना स्थापन होणार ? यामुळे मोठें सांभाळून काम करावें लागतें. पुष्कळदा वाटतें--नवीन संप्रदाय झाला तरी हरकत नाही--त्याचें काय मोठेंसें ?--पण लागलीच पुन्हा वाटतें—नको, त्यांनी कधीहि कुणाचाहि भाव नष्ट केला नाही; समदृष्टि, समदर्शन हाच होता त्यांचा भाव. याच विचाराने मनांतील भाव मी नेहमी दाबून टाकतों. यावर आता तुमचें काय मत आहे ?

गिरीशबाबू:-- यांत मी तें काय सांगूं शकणार बरें ? तुम्ही त्यांच्या हातांतील साधन. ते जें करवून घेतील तेंच तुम्हांला करावें लागणार. मला कांही या साऱ्या भानगडी उमगत नाहीत. पण हें मात्र मला स्पष्ट दिसतें की प्रभूची शक्ति तुमच्या द्वारें कार्य करवून घेत आहे. अगदी उघडया डोळयांनी मला हें स्पष्ट दिसत आहे.

---

* गिरीशचंद्र घोष यांच्या नांवाची ही इंग्रजी आद्याक्षरें घेऊनच स्वामीजी अनेकदा त्यांना संबोधीत असत.

स्वामीजीः-- आणि मला दिसतें की आपण आपल्या मतानुसार काम करतों आहोंत. तरी आपत्ति-विपत्तींत, अभाव-दारिद्र्यांत ते दर्शन देऊन ठीक रस्त्याने नेतात, योग्य मार्गदर्शन करतात हेंहि मला दिसतें. पण तरी अद्याप प्रभूच्या शक्तिमाहात्म्याचें कांहीहि आकलन मला झालेलें नाही.

गिरीशबाबूः— ते म्हणत असत, "सगळेंच समजल्यावर साऱ्याच गोष्टी संपून जातील." मग कोण काय करणार व कोण कोणाकरवीं कांही करवून घेणार ?

हीं बोलणीं झाल्यावर अमेरिकेबद्दल गोष्टी निघाल्या. जणु मुद्दामच गिरीशबाबूंनी स्वामीजींचें मन दुसरीकडे वळविलें. या वेळीं असें करण्याचें कारण विचारलें असतां त्यांनी पुढे एकदा सांगितलें होतें--"श्रीरामकृष्णांच्या तोंडून आम्हीं ऐकलें होतें की अशा प्रकारच्या गोष्टी फार वेळ बोलल्याने स्वामीजींच्या ठिकाणीं जर संसार-वैराग्य व ईश्वरभावोद्दीपन झालें व त्यांना जर आपण कोण याची जाणीव झाली तर एक क्षणभरहि ते देह ठेवणार नाहीत." याकरिताच स्वामीजींचे गुरुबंधु ते सारखे रामकृष्णांबद्दल बोलूं लागल्यास त्यांचें मन दुसरीकडे वळवीत असत. हें मीं पाहिलें आहे. तें कसेंहि असो, अमेरिकेबद्दल बोलतांना त्या गोष्टींत स्वामीजी अगदी रंगून गेले, व त्या देशांतील समृद्धि, स्त्री-पुरुषांचे गुणावगुण, भोगविलासादिकांचें ऐश्वर्य वगैरे गोष्टींचें सविस्तर वर्णन करण्यास त्यांनी प्रारंभ केला.

---

## अध्याय ८ वा

**स्थळ— कलकत्ता**

**वर्ष-- इ. स. १८९७**

विषय-- स्वहस्तें स्वयंपाक करून शिष्य स्वामीजींना जेवूं घालतो-- ध्यानाचें अवलंबन व स्वरूप-- बाह्य अवलंबन घेऊन देखील मन एकाग्र होऊं शकतें-- मन एकाग्र झाल्यावर देखील पूर्वसंस्कारांमुळे साधकाच्या मनांत वासनेचा उदय होणें शक्य आहे-- मन एकाग्र झाल्याने त्यांत ब्रह्माचें प्रतिबिंब पडतें व विभिन्न विभूतिलाभाचा साधकाचा मार्ग मोकळा होतो-- या समयीं कोणत्याहि वासनेच्या आहारीं गेल्यास त्याला ब्रह्मज्ञान होणें शक्य नाही.

गेल्या कित्येक दिवसांपासून स्वामीजी बागबाजारांतील कै. बलराम बोस यांच्या घरीं राहत आहेत. सकाळ, दुपार, संध्याकाळ केव्हाहि पाहा त्यांना क्षणाचीहि उसंत नाही. उत्साही तरुण, कॉलेजचे विद्यार्थी हे ते कोठेहि असोत सारखे त्यांच्याकडे येत असतात. स्वामीजीहि त्या सर्वांना मोठ्या प्रेमाने धर्म आणि तत्त्वज्ञान यांतील गहन मुद्दे सोप्या भाषेंत समजावून देत. स्वामीजींच्या अलौकिक प्रतिभेनें ते सारे जणु मुग्ध होऊन जात व स्तब्ध बसत.

आज खग्रास सूर्यग्रहण. ग्रहण पाहण्याला म्हणून लोक नाना ठिकाणीं गेले आहेत. धार्मिक स्त्री-पुरुष गंगास्नानासाठी दूरदूरच्या स्थानांहून येऊन मोठ्या उत्कंठेने ग्रहण लागण्याची वाट पाहत आहेत. स्वामीजींना मात्र या ग्रहणाबाबत कांही विशेष औत्सुक्य नाही. शिष्य आज आपल्या हाताने स्वयंपाक करून स्वामीजींना जेवूं घालणार आहे. स्वामीजींचा हुकूमच आहे तसा ! स्वयंपाकाला लागणारें साहित्य घेऊन आठाच्या सुमारास तो बलरामबाबूंच्या घरीं येऊन हजर झाला. स्वामीजी त्याला म्हणाले,

" तुमच्या तिकडे करतात तस्सा झाला पाहिजे अगदी सैपाक. आणि ग्रहणाच्या आधीच आटोपलें पाहिजे जेवणखाण."

बलरामबाबूंच्या मंडळींपैकी कुणीहि या वेळीं कलकत्त्यांत नाही; म्हणूनच सारें घर अगदी रिकामें आहे. स्वयंपाकघरांत जाऊन शिष्य आपल्या कामाला लागला. श्रीरामकृष्णांच्या निस्सीम भक्त 'योगेन मा' जवळ उभ्या राहून शिष्याला सारें सामानसुमान जमवून देत होत्या. मधून मधून स्वयंपाकांतहि त्यांचें सूचना देणें चालूंच होतें. स्वामीजीहि अधून मधून येत, त्याचें काम पाहत व त्याला उत्साहित करीत. सारा स्वयंपाक तयार होत आला होता. तेवढ्यांत स्वामीजी स्नान आटोपून आले, व स्वतःच पाटपाणी घेऊन जेवावयास बसले. सैपाक थोडा व्हायचा आहे हें सांगूनहि त्यांनी कांही ऐकलें नाही. एखाद्या हटवादी मुलासारखे म्हणाले, " जें झालें असेल तेंच आण आता लवकर. आता कांही मला धीर धरवत नाही. पोटांत अगदी आग पडली आहे भुकेने !" तेव्हा अगदी अशक्यच झाल्याने शिष्यानें घाईघाईने स्वामीजींना वाढलें व त्यांनीहि लागलीच जेवावयास आरंभ केला. नंतर बाकीच्या जिनसा वाटच्यांतून स्वामीजींना आणून दिल्यावर शिष्याने योगानंद, प्रेमानंद व इतर संन्यासी-भक्तांना वाढावयास सुरवात केली. शिष्य पाक-कलेंत कांही मोठासा कुशल नव्हता. पण आज त्याच्या स्वयं-पाकाची स्वामीजी खूपच स्तुति करूं लागले. नंतर दही व संदेश (एक प्रकारची मिठाई) घेऊन त्यांनी जेवण आटोपलें, व हात धुणें झाल्यावर ते घरांत खाटेवर येऊन बसले. शिष्य स्वामीजींच्या समोरील दालनांत जेवावयास बसला. स्वामीजी म्हणाले— 'पाहा, ज्याला चांगलासा सैपाक येत नाही, तो चांगला साधु होणें कांही शक्य नाही. मन शुद्ध जर नसेल ना तर रुचकर

सैपाक साधणें कठीण." कांही वेळाने चोहीकडून शंखघंटादिकांचा निनाद येऊं लागला. स्त्रियांच्या कंठांतून निघणाऱ्या मंगलसूचक ध्वनींनी वातावरण भरून गेलें. तेव्हा स्वामीजी म्हणाले, 'अरे, ग्रहण लागलें. मी झोपतों आता. तूं पाय दाबून दे माझे.' असें म्हणून ते किंचित् लवंडले. त्यांचे पाय दाबतांना शिष्याच्या मनांत आलें, "या पवित्र क्षणीं गुरुचरणसेवाच माझें गंगास्नान आणि जपजाप्य." या विचारासरशीं शिष्य शांत मनाने त्यांचे पाय दाबूं लागला. ग्रहण खग्रास असल्यामुळे चाऱ्ही बाजूंना सायंकालप्रमाणे अंधार पसरला.

ग्रहण सुटायला १५।२० मिनिटांचा अवधि असतांना स्वामीजींनी उठून, हाततोंड धुऊन थट्टेने शिष्याला म्हटलें, "लोक म्हणतात ग्रहणांत जो जें करतो त्याचें फळ त्याला पुढे कोटयवधि प्रमाणांत मिळतें. तेव्हा विचार केला की महामायेने या शरीराला सुनिद्रा घेण्याचें भाग्य तर दिलें नाही—आता ग्रहणांत जर झोपून घेतलें तर निदान पुढे तरी चांगली गाढ झोप मिळायचें भाग्य लाभेल! पण तेंहि कांही नशीबीं दिसत नाही. जुलूमजबरदस्तीने फारच फार तर १५ मिनिटें झोप झाली असेल."

नंतर स्वामीजींभोवती सारेजण जमल्यावर स्वामीजींनी शिष्याला उपनिषदांसंबंधी कांही बोल म्हणून फर्मावलें. स्वामीजींसमोर बोलण्याचा शिष्याला यापूर्वी कधी प्रसंग आला नव्हता. त्याची तर छातीच धडधड करायला लागली. पण इकडे जरी कांहीहि असलें तरी स्वामीजी कांही आपलें सोडणाऱ्यांपैकी नव्हते. तेव्हा अखेर उठून 'पराञ्चिखानि व्यतृणत् स्वयंभूः' या श्लोकाचें विवरण करावयास त्याने सुरवात केली. नंतर गुरुभक्ति व त्याग यांचा महिमा वर्णन करून व ब्रह्मज्ञानच परमपुरुषार्थ होय असें प्रतिपादन करून तो खाली बसला.

स्वामीजींनी सारख्या टाळ्या वाजवून शिष्याला प्रोत्साहन देण्यासाठी म्हटलें, "वा! काय सुंदर बोललास!"

स्वामी शुद्धानंद व प्रकाशानंद यांनाहि मग स्वामीजींनी बोलावयास सांगितलें. स्वामी शुद्धानंदांनी आपल्या ओजस्वी भाषेंत 'ध्याना'संबंधी एक छोटेसें भाषण केलें. प्रकाशानंद वगैरेंचीं भाषणें आटोपल्यावर स्वामीजी उठून येऊन बाहेरच्या बैठकींत बसले. संध्याकाळ व्हायला अद्यापहि एका तासाचा अवधि आहे. सर्व मंडळी बाहेर येऊन बसल्यावर कुणाला कांही विचारावयाचें असल्यास विचारा असें स्वामीजींनी सुचविलें.

शुद्धानंद:-- 'ध्यान' म्हणजे काय महाराज?

स्वामीजी:--कुठल्याहि एका वस्तूवर मन एकाग्र करण्यालाच ध्यान म्हणतात. कोणत्याहि एका वस्तूवर एकाग्र झालेलें मन मग दुसऱ्या कोणत्याहि वस्तूवर आपोआपच एकाग्र करतां येतें.

शुद्धानंद:— सविषय व निर्विषय अशा दोन ध्यान-प्रकारांचा उल्लेख शास्त्रांत आढळतो. त्यांचा अर्थ काय? व त्यांतील श्रेष्ठ कोणतें?

स्वामीजी:-- समोर कुठला तरी एखादा विषय ठेवून सुरवातीला ध्यानाचा अभ्यास करावयाचा असतो. एका काळ्या बिंदूवर मी माझें मन केन्द्रित करीत असे. अखेर तो बिंदु दिसतच नसे--तो समोर आहे याचीहि माझी जाणीव हरपत असे. मन अमन होऊन जाई, कुठल्याच वृत्तीचा तरंग उद्‌भवत नसे;— वारा पडल्याने शांत झालेल्या समुद्रासारखें तरंगहीन होऊन जात असे मन. या अवस्थेंत अतींद्रिय सत्यांचा कांहीसा आभास मला मिळे. म्हणून मला वाटतें की कोणत्याहि सामान्य बाह्य विषयाच्या आश्रयाने ध्यानाचा अभ्यास केल्यास मन एकाग्र होतें—ध्यान साधतें. त्यांतहि मनाची ओढ असणाऱ्या गोष्टींवर

जर मन केन्द्रित करण्याचा प्रयत्न केला तर ध्यानाच्या या अभ्यासांत मन लवकरच एकाग्र होतें. यासाठीच आपल्या देशांत नाना देव-देवतांची पूजा प्रचलित आहे. या देव-देवतांच्या पूजनांतूनच केवढी अलौकिक कला उदयाला आली. पण आता येथे तो मुद्दा बाजूला ठेवूं. येथे मुद्दा हा की ध्यानाचा सर्वांचा विषय एकच असूं शकत नाही. ज्यांनी ज्या विषयाचा ध्यानासाठी आधार घेऊन सफलता प्राप्त करून घेतली त्यांनी त्या विषयाचाच प्रचार केला. कालान्तराने हे बाह्य विषय म्हणजे मन स्थिर करण्याचीं साधनें मात्र होत ही गोष्ट लोकांच्या स्मरणांतून गेली व या बाह्य विषयांचाच गाजावाजा पुढे होऊं लागला. ध्येय बाजूला ठेवून साधनांवरच लोक लक्ष ठेवूं लागले. मनाला वृत्तिशून्य करणें हा आहे मूळ उद्देश, आणि एखाद्या विषयावर मन एकाग्र (तन्मय) केल्याखेरीज तो साधणें शक्य नाही.

शिष्य:-- मनोवृत्ति जर विषयाकार झाली तर त्या मनाने ब्रह्मधारणा होणें कसें शक्य आहे ?

स्वामीजी:-- मनोवृत्ति सुरवातीला जरी विषयाकार झाली तरी पुढे त्या विषयाचें ज्ञान उरत नाही. उरतो शुद्ध 'अस्तिबोध.'

शिष्य:-- मन एकाग्र झाल्यावरहि कामना-वासनांचा उद्भव कां म्हणून होतो ?

स्वामीजी:-- पूर्वसंस्कारांमुळे त्या गोष्टी होतात. बुद्धदेव अगदी समाधिस्थ होण्याच्या क्षणीं माराचा उदय झाला. मार म्हणून कांही कोणी बाहेरची व्यक्ति नव्हती. माराच्या रूपाने मनांतील पूर्वसंस्कारच जणु प्रतिबिंबरूपाने बाहेर व्यक्त झाले.

शिष्य:-- असें सांगतात की सिद्ध होण्यापूर्वी अनेक भयानक अनुभव येतात; ते सारे काय मनःकल्पित ?

स्वामीजी:-- नाही तर काय मग ? साधकाला मात्र त्या

अवस्थेंत उमजत नाही की हे सारे आपल्याच मनाचे खेळ आहेत म्हणून. बाहेर त्यांतलें कांहीच नसतें. हें जें जगत् पाहतोस बाहेर, त्यालाहि अस्तित्व नाही. सारा मनाचाच खेळ. मन वृत्तिशून्य झाल्यावर त्यांत ब्रह्माचें प्रतिबिंब पडतें. तेव्हा, 'यं यं लोकं मनसा संविभाति' त्या त्या लोकाचें दर्शन होऊं शकतें. जो संकल्प करावा तो पूर्ण होतो. ही सत्यसंकल्प अवस्था प्राप्त होऊनहि जो जागरूक राहतो, कुठल्याहि वासनेचा पगडा आपल्यावर बसूं देत नाही त्यालाच ब्रह्मज्ञान लाभतें. उलट ही अवस्था लाभल्यावर जो विचलित होतो त्याला अनेक सिद्धि लाभतात व तो परमार्थापासून भ्रष्ट होतो.

येवढें सांगून झाल्यावर स्वामीजी 'शिव, शिव,' असें नामोच्चारण करूं लागले. पुढे ते पुन्हा म्हणाले, "एका त्यागाखेरीज ह्या जीवन-समस्येचें गूढ उकलण्याचा दुसरा कोणताहि मार्ग नाही. 'त्याग, त्याग, त्याग' हाच होऊं द्या तुमच्या जीवनाचा मूलमंत्र—सर्वं वस्तु भयान्वितं भुवि नृणां वैराग्यमेवाभयम् ।"

---

# अध्याय ६ वा

स्थान—कलकत्ता.

वर्ष— इ. स. १८९७ (मार्च–एप्रिल)

विषय-- स्त्रीशिक्षणासंबंधी स्वामीजींचें मत — महाकाली पाठशाळेला भेट व तिची प्रशंसा-- अन्य देशांतील स्त्रियांच्या तुलनेने भारतीय स्त्रियांचें वैशिष्टय— स्त्री व पुरुष दोघांनाहि शिक्षण द्यावयास हवें-- कोणताहि सामाजिक नियम जुलूमजबरदस्तीने मोडावयाची गरज नाही-- शिक्षणाचा प्रसार होतांच लोक आपोआपच वाईट गोष्टी टाकून देतील.

अमेरिकेहून परत आल्यावर कांही दिवस झालेत, स्वामीजी कलकत्त्यांतच असून त्यांचें वास्तव्य आहे कै. बलराम बोस यांच्या घरांत. मधून मधून अन्य परिचित लोकांकडेहि जाणें येणें चालूंच आहे. आज शिष्य स्वामीजींना भेटायला आला तेव्हा ते बाहेर जाण्याच्याच तयारींत होते. ते शिष्याला म्हणाले, 'चल माझ्याबरोबर,' आणि हें म्हणतच ते खाली उतरूं लागले. शिष्यहि त्यांच्या मागून निघाला. भाडयाच्या एका गाडींत ते व शिष्य दोघेहि बसले. गाडी दक्षिणेच्या बाजूने निघाली.

शिष्य:-- कुठे निघालां आहांत महाराज ?

स्वामीजी:-- चल माझ्या बरोबर म्हणजे दिसेलच.

कुठे जायचें तें शिष्याला कांहीच न सांगतां, गाडी बिडन-स्ट्रीटवर जेव्हा आली तेव्हा बोलण्याच्या ओघांत ते म्हणाले, "तुमच्या या देशांत स्त्रियांच्या शिक्षणासाठी कांहीच प्रयत्न होत नाहीत. शिकल्यासवरल्याने स्वत: तुम्ही मात्र माणसांत येतां, पण तुमच्या सुखदु:खाच्या ज्या वांटेकरणी, प्राण पणाला लावून ज्या तुमची सेवा करतात त्या स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी, त्यांची उन्नति करण्यासाठी तुम्ही काय करतां ?"

शिष्य:— कां बरें ? आजकाल केवळ स्त्रियांसाठी म्हणूनच किती तरी शाळा निघताहेत, कॉलेजेस् आहेत— त्यांत शिक्षण घेऊन किती तरी स्त्रिया बी.ए., एम्. ए. होऊन बाहेर पडत आहेत.

स्वामीजी:-- ते झाले सारे विलायती चाळे. तुमच्या धर्मशास्त्रांना अनुसरून, या देशाच्या रिवाजांना धरून चालणाऱ्या कितीशा शाळा आहेत ? अशा प्रकारचें शिक्षण या देशीं तर पुरुषांनाहि मिळत नाही, मग स्त्रियांबद्दल तर बोलणेंच नको. सरकारी आकडेवारीप्रमाणे भारतांत शेकडा १०-१२ टक्के लोकच शिक्षित आहेत, स्त्रियांच्या बाबतींत मला वाटतें हें प्रमाण शेकडा एक टक्का देखील भरणार नाही.

"असें नसतें तर काय देशाची ही असली दुर्दशा झाली असती? शिक्षणाचा प्रसार, ज्ञानाची वाढ या साऱ्या गोष्टी झाल्याखेरीज देशाची उन्नति होणार कशी ? तुम्ही मूठभर लोक शिकून तयार झालां आहांत, तुम्ही देशाचे आधारस्तंभ आहांत, पण तुमच्यांतहि तर मुळी या बाबतींत कांही हालचाल दिसत नाही. पण लक्षांत ठेव— सर्वसामान्य लोकांत, अगदी स्त्रियांपर्यंत जोंवर शिक्षणाचा प्रसार होत नाही तोंवर कांहीहि साधणें शक्य नाही. म्हणूनच कांही ब्रह्मचारी व कांही ब्रह्मचारिणी शिकवून तयार करण्याची माझी इच्छा आहे. हे ब्रह्मचारी अर्थातच पुढे संन्यास घेतील व देशभर गावोगावीं हिंडून सर्वत्र सामान्य लोकांपर्यंत शिक्षणाचा प्रसार करतील. याचप्रमाणे या ब्रह्मचारिणीहि स्त्रियांमध्ये शिक्षणाचा फैलाव करतील. पण हें कार्य आपल्या देशाच्या पद्धतीनुसार व्हावयास पाहिजे. पुरुषांच्या शिक्षणाची जशीं केंद्रें उघडण्यांत येतील, तशींच स्त्रियांच्याहि शिक्षणासाठी उघडावयास हवींत. सुशिक्षित व सच्चरित्र ब्रह्मचारिणी या

केंद्रांतील स्त्रियांच्या शिक्षणाचा भार घेतील. पुराण, इतिहास, गृहकृत्यें, कुटुंब चालविण्याचे नियम व आदर्श चारित्र्य घडविण्याला साहाय्यक असणारे नीतिनियम आधुनिक विज्ञानाच्या मदतीने शिकवावयास हवेत. धर्मपरायणता, नीतिपरायणता विद्यार्थिनींच्या अंगीं बाणावयास हवी. त्या सुगृहिणी होतील असे कसून प्रयत्न करावयास हवेत. अशाच सुगृहिणींचीं मुलेंबाळें पुढे या बाबतींत अधिक उन्नति करूं शकतील. सुशिक्षित आणि नीतिपरायण मातांच्या पोटींच थोर लोक जन्माला येतात. आज पाहावें तर तुम्हीं स्त्रियांना कामें करणारें यंत्र करून ठेविलें आहे. अरे राम! तुमच्या शिक्षणाचें अखेर हेंच का फळ? आधी स्त्रियांचा उद्धार करावयास हवा. सर्वसामान्य लोकांत जागृति उत्पन्न करावयास हवी, तरच देशाचें-- भारतवर्षाचें कल्याण होईल."

गाडी कॉर्नवॉलिस स्ट्रीटवरील ब्राह्मसमाज ओलांडून पुढे निघालीसें पाहून ते गाडीवाल्याला म्हणाले, "चोरबाजाराच्या रस्त्याने गाडी घे." या रस्त्याला गाडी लागल्यानंतर महाकाली पाठशाळेच्या संस्थापिका तपस्विनी माता यांनी त्यांची शाळा पाहण्यासाठी बोलाविल्याचें स्वामीजींनी शिष्याला सांगितलें. ही शाळा तेव्हा चोरबाजारांतील कै. राजेन्द्र मल्लिक यांच्या घराच्या किंचित् पूर्वेला एका दुमजली भाड्याच्या घरांत होती. गाडी शाळेसमोर थांबतांच दोनचार गृहस्थांनी पुढे येऊन त्यांना नमस्कार केला, व ते स्वामीजींना घेऊन वर गेले. तपस्विनी माताजींनी उभे राहून स्वामीजींचें स्वागत केलें. थोड्याच वेळांत त्यांनी स्वामीजींना आपल्याबरोबर एका वर्गांत नेलें. मुलींनी उभे राहून स्वामीजींचें स्वागत केलें. नंतर माताजींच्या सांगण्यावरून त्या साऱ्यांनी मिळून समसुरांत 'शिवध्यान' गाऊन

दाखविलें. शाळेंत पूजादिकांचें शिक्षण कशा प्रकारें दिलें जातें तें स्वामीजींनी विचारल्यावरून त्या मुलींनी प्रात्यक्षिक करून दाखविलें. मोठ्या कुतुहलाने त्या साऱ्या गोष्टी पाहून नंतर स्वामीजी दुसऱ्या वर्गाकडे वळले. वृद्ध माताजींना स्वामीजीं-बरोबर जातीने सर्वत्र फिरणें शक्य नसल्याने त्यांनी शाळेंतीलच दोनतीन शिक्षकांना स्वामीजींना सर्व वर्ग नीट दाखविण्यास सांगितलें. सर्व वर्ग पाहून झाल्यावर स्वामीजी माताजींकडे परत आले. माताजींनी एका मुलीला बोलावून कालिदासाच्या रघुवंशांतील तिसऱ्या सर्गाच्या पहिल्या श्लोकाचें विवेचन करावयास सांगितलें. मुलीनेहि संस्कृतांतून त्या श्लोकाचें विवेचन केलें. स्वामीजींनीहि तें ऐकून संतोष व्यक्त केला आणि स्त्रीशिक्षणाच्या प्रसारासाठी माताजींनी चिकाटीने व प्रयत्नपूर्वक केलेल्या गोष्टींचें तें फळ पाहून ते त्यांची खूप प्रशंसा करूं लागले. माताजी नम्रतापूर्वक म्हणाल्या, "देवीज्ञानाने मी या विद्यार्थिनींची सेवा करतें. एरवी ही शाळा स्थापन करण्यांत कीर्ति वा अन्य कोणताहि माझा हेतु नाही."

विद्यालयासंबंधी बोलणें संपल्यानंतर स्वामीजी परत जावयास निघाल्याचें पाहून माताजींनी व्हिजिटर्स बुक आणवून त्यांत स्वामीजींना त्यांचें मत लिहिण्यास सांगितलें. या वहींत आपलें मत स्वामीजींनी विस्तृतपणे लिहिलें. त्यांच्या लिहिण्यांतलें "हें कार्य अगदी योग्य दिशेने चाललें आहे" हें शेवटचें वाक्य शिष्याच्या अजूनहि स्मरणांत आहे.

नंतर माताजींना नमस्कार करून स्वामीजी शिष्यासह पुन्हा गाडींत येऊन बसले व गाडी बागबाजाराकडे चालूं लागल्यावर त्यांनी शिष्याशीं स्त्री-शिक्षणाबद्दल बोलणें सुरू केलें. त्यांतलाच कांही भाग पुढे देतों.

स्वामीजी:-- माताजींचा जन्म कुठला ! - सर्वस्वाचा त्याग त्यांनी केला असला तरी लोककल्याणासाठी केवढ्या कळकळीने प्रयत्न करीत आहेत ! शिक्षण देणाऱ्या असल्या स्त्रिया नसल्यास मुलींचें काय अशा प्रकारें शिक्षण होणें शक्य आहे ? मी साऱ्या गोष्टी अगदी मन लावून पाहिल्या. कांही गृहस्थ माणसें शिक्षक म्हणून लावल्याचें मात्र मला तितकेसें पटलें नाही. शिक्षित विधवा किंवा ब्रह्मचारिणींवरच शाळेंतील शिक्षणाचा सारा भार असावयास हवा. कन्या-शाळांशीं पुरुषांचा कुठल्याहि प्रकारचा संपर्क आपल्या देशांत असणें योग्य नाही.

शिष्य:-- पण महाराज, गार्गी, खना, लीलावती वगैरें-सारख्या गुणवान शिक्षित स्त्रिया या देशांत आता आढळतात कुठे ?

स्वामीजी:— या देशांत अशा प्रकारच्या स्त्रिया काय आजच्या घटकेला नाहीत ? हा सीता-सावित्रींचा देश. पुण्यक्षेत्र भारतवर्षांत याहि घडीला स्त्रियांमध्ये जें चारित्र्य, जो सेवाभाव, जसा स्नेह, जशी दया, तुष्टि आणि भक्ति वगैरे गोष्टी आढळून येतात तशा साऱ्या पृथ्वीच्या पाठीवर अन्यत्र मला आढळल्या नाहीत. पाश्चात्य देशांत अनेकदा तर स्त्रियांकडे पाहून ह्या स्त्रिया आहेत असें मला वाटेच ना ! ठीक अगदी जणु पुरुष. गाड्या चालवतात, ऑफिसांत जातात, शाळांतून नोकरी करतात, प्रोफेसर्स आहेत. एकमात्र भारतवर्षांतच स्त्रियांमधील लज्जा, विनय वगैरे गुण पाहून डोळे कसे निवतात ! असला सुयोग्य आधार त्यांच्या रूपाने समोर असूनहि तुम्ही त्यांची उन्नति करूं शकलां नाही. त्यांच्या हृदयांत ज्ञानदीप प्रज्वलित करण्याचा प्रयत्न तुम्हीं केला नाही. योग्य प्रयत्न झाले तर या म्हणजे आदर्श स्त्रिया होतील.

शिष्यः-- महाराज, या माताजी ज्या प्रकारचें शिक्षण विद्यार्थिनींना देताहेत त्याने काय तुम्ही म्हणतां तसलें फळ हातीं पडेल ? या साऱ्या विद्यार्थिनी अल्पावधींतच विवाह करतील अन् बाकी चार बाया जशा असतात तशाच याहि होतील. मला तर वाटतें की यांना जर ब्रह्मचर्यव्रताची दीक्षा देणें शक्य झालें तरच या समाजाच्या व देशाच्या उन्नतीसाठी आत्मबलिदान करूं शकतील आणि मगच शास्त्रोक्त उच्च आदर्श त्यांना लाभूं शकेल.

स्वामीजीः-- क्रमाक्रमाने या साऱ्या गोष्टी होतील. देशांत अद्यापहि असे शिक्षित लोक निर्माण झालेले नाहीत की जे समाज-शासनाचें भय न बाळगतां आपल्या मुलीबाळी अविवाहित ठेवावयास तयार होतील. हेंच पाहा ना ! आजहि मुलगी १२-१३ वर्षांची होते न होते तोंच लोकनिंदेला भिऊन समाजप्रवादाच्या भयाने लोक आपल्या मुलींचीं लग्नें घाईघाईने उरकून घेतात. संमतीवयाचें बिल पुढे येतांच समाजधुरीणांनी लाखो लोक जमवून हलकल्लोळ माजविला की आम्हांला हा कायदा नको. दुसऱ्या देशांत ही विरोधी सभासंमेलनें होण्याचें तर बाजूलाच राहो, लोकांनी घराचीं दारें लावून घेऊन हा कलंक अद्याप आपल्या समाजांत आहे म्हणून शरमेने माना खाली घातल्या असत्या.

शिष्यः-- पण संहिताकारांनी काय कांही विचार न करतांच या बालविवाहाचें मंडन-समर्थन केलें असेल ? खात्रीने त्यांच्या या करण्यामागे कांही गूढ अर्थ असलाच पाहिजे.

स्वामीजीः-- असा कोणता गूढ अर्थ असणार आहे ?

शिष्यः-- बालवयांतच लग्न झाल्यास मुली पतिगृहीं जाऊन अगदी लहानपणापासूनच कुलधर्म शिकूं शकतात. सासरीं सारीं गृहकृत्यें त्यांच्या अंगवळणीं पडूं शकतात. वाढत्या वयाच्या मुली

पितृगृहीं उच्छृंखल होण्याची शक्यता असते. बालपणीं विवाह झाल्यास ही शक्यता राहत नाही. उलट लज्जा, नम्रता, सहिष्णुता, कष्टाळूपणा वगैरे स्त्री-सुलभ गुणांचा त्यांच्या ठिकाणीं विकास व्हायला मदतच होते यामुळे.

स्वामीजी:-- याउलट दुसऱ्या बाजूने म्हणतां येईल की बालविवाहाने बहुसंख्य स्त्रिया अकालीं प्रजोत्पादन करावें लागून मृत्युमुखीं पडतात. त्यांची संततीहि अल्पजीवी निपजते व देशांतील भिकारवाढीला मदत करते! आईबाप सुदृढ व बलसंपन्न नसतील तर निरोगी प्रजा जन्मणार तरी कशी? थोडेंफार शिकून वयांत आल्यावर लग्न झाल्यास त्याच स्त्रियांना जी संतति होईल तिच्याद्वारें देशाचें केव्हाहि कल्याणच होईल. तुमच्या घराघरांतून विधवांची ही भरती दिसते तिचें कारण आहे हा बालविवाह. बालविवाह कमी झाल्यास विधवांची संख्याहि आपोआप कमी होईल.

शिष्य:— मला तर वाटतें महाराज, की वय वाढल्यावर लग्न झाल्यास स्त्रिया गृहकृत्यांत तितकेसें लक्ष घालूं शकणार नाहीत. मीं तर ऐकलें आहे की कलकत्त्यांत अनेक कुटुंबांतून सासवा सारें सैपाकपाणी उरकतात आणि शिकल्यासवरलेल्या सुना पाय रंगवून चैनींत बसून राहतात. आमच्या पूर्वबंगालमध्ये ही गोष्ट होणें शक्यच नाही.

स्वामीजी:-- चांगलें आणि वाईट हें तर सर्वत्रच आहे. माझ्या मतें तर कुठल्याहि देशांतल्या समाजाची घडण आपोआपच होत असते. म्हणून बालविवाह-बंदी, विधवाविवाह वगैरे भानगडी करून व्यर्थ डोकें शिणवण्यांत कांही अर्थ नाही. आपलें काम म्हणजे समाजातील साऱ्या स्त्री-पुरुषांना शिक्षण देणें. हित-अनहित काय हें त्यांचें त्यांनाच या शिक्षणामुळे कळूं लागेल

आणि अहितकर गोष्टींचा ते आपणहून त्यागहि करतील. मग जुलूमजबरदस्तीने समाजांत कोणत्याहि गोष्टी मोडाव्या किंवा घडवाव्या लागणार नाहीत.

शिष्यः-- आजच्या स्त्रीला कसल्या प्रकारचें शिक्षण देणें तुम्हांला इष्ट वाटतें ?

स्वामीजीः-- धर्म, कला, विज्ञान, गृहविज्ञान, पाकशास्त्र, शिवणकला, आरोग्यशास्त्र वगैरेंसारख्या विषयांचीं मूलतत्त्वें तरी त्यांना शिकवावयास हवींत. कथा-कादंबऱ्या तर मुळीच त्यांच्या हातीं लागूं देऊं नयेत. महाकाली पाठशाळा बऱ्याच अंशीं योग्य मार्गाने चालली आहे; पण नुसती पूजा-पद्धति शिकवूनच कांही काम भागण्यासारखें नाही. शिक्षणाने साऱ्याच बाबतींत डोळसपणा यायला हवा. आदर्शभूत स्त्रियांचीं चरित्रें सतत विद्यार्थिनींसमोर ठेवून उच्च त्यागरूप व्रताबद्दल त्यांच्या मनांत अभिरुचि उत्पन्न करावयास हवी. सीता, सावित्री, दमयंती, लीलावती, खना, मीरा वगैरेंचीं जीवन-चरित्रें स्त्रियांना समजावून देऊन त्याच आदर्शानुसार तुमचीं जीवनें तुम्ही घडवा हें त्यांच्या मनावर ठसवावयास हवें.

बलराम बोसांच्या दाराशीं गाडी येऊन पोहोचली. गाडींतून उतरून स्वामीजी वर गेले व त्यांच्या दर्शनासाठी म्हणून जमलेल्या लोकांना त्यांनी महाकाली पाठशाळेचा वृत्तान्त आरंभापासून अखेरपर्यंत सांगावयास सुरवात केली.

त्यानंतर, नवीनच स्थापन झालेल्या 'रामकृष्ण मिशनच्या' सदस्यांनी कोणतीं कामें हातीं घ्यावींत याबद्दल सांगतांना 'विद्यादान' व 'ज्ञानदान' यांचें महत्त्व ते प्रतिपादन करूं लागले. शिष्याला अनुलक्षून ते म्हणाले, "शिक्षण द्या, शिक्षण द्या. नान्यः पन्था विद्यतेऽयनाय--" शिक्षणदानाला विरोधी अस-

णाऱ्या गटाला उद्देशून ते म्हणाले, " पाहा, प्रल्हादाच्या टोळक्यांत सामील नका होऊं बरें !" या म्हणण्याचा अर्थ काय म्हणून विचारतांच त्यांनी स्पष्टीकरण केलें, " ठाऊक नाही ? 'क' म्हणतांच भावविव्हलतेने प्रल्हादाच्या डोळचांत (कृष्णस्मृतीने) पाणी येई;——मग शिकणेंसवरणें कुठलें गेलें व्हायला ? प्रल्हादाचे डोळे भरून येत अर्थात् प्रेमविव्हलतेने, पण मूर्खांच्या डोळचांत पाणी येतें तें मात्र भयाने ! भक्तमंडळींतहि पुष्कळसे लोक हे असेच आहेत !" स्वामीजींच्या या विधानाने सारे लोक हसूं लागले. स्वामीजींचें हें बोलणें ऐकून स्वामी योगानंद म्हणाले, "जेव्हा जें तुमच्या मनांत येईल, तेव्हा तें करून टाकेपर्यंत तुम्हांला कांही चैन पडत नाही. आताहि तुमच्या जें मनांत आहे तें शेवटीं होणारच !"

---

मराठी ग्रंथ सं. ग्र. ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २४७०० विः
क्रमांक ११२७० नोंः दिः

# अध्याय १० वा

**स्थळ– कलकत्ता**

**वर्ष–– इ. स. १८९७.**

**विषय**–– शिष्याचें स्वामीजींच्या देखरेखीखाली वेदाध्ययन — मॅक्समुलर-विषयी स्वामीजींना वाटणारा अद्‌भुत विश्वास–– वेदमंत्रांच्या आधारें ईश्वराने सृष्टि केली या वैदिकमंत्राचा अर्थ–– वेद शब्दात्मक –– 'शब्द' पदाचा प्राचीन अर्थ–– नादापासून शब्द व शब्दापासून स्थूल जग विकसित होत असल्याचा समाधींत अनुभव–– अवतारादि पुरुषांना हा विषय समाधिकालीं कसा प्रतिभात होतो––स्वामीजींची सहृदयता—ज्ञान व प्रेम यांच्या अविच्छेद्य संबंधाबाबत शिष्य व गिरीश घोष यांचें बोलणें––गिरीशबाबूंचा सिद्धान्त शास्त्राला अविरोधी–– गुरुभक्तीच्या बळावरच गिरीशबाबूंना सत्य सिद्धान्ताचा लाभ–– न समजतां, न उमजतां कुणाचेंहि अनुकरण करणें दोषास्पद––ज्ञानी व भक्त विभिन्न स्थानांवरून बोलत असल्याने त्यांच्या उद्‌गारांत तफावत असल्यासारखें वाटतें––सेवाश्रम स्थापण्याबाबत स्वामीजींचे विचार.

स्वामीजींबरोबर सायणाचार्यांचें ऋग्वेदावरील भाष्य शिष्य आज दहा दिवसांपासून वाचतो आहे. बागबाजारांतील कै. बलराम बोस यांच्या घरींच स्वामीजींचें राहणें. मॅक्समुलरांचे ऋग्वेदावरील खंड एका मोठ्या माणसाकडून आणले आहेत. आधीच नवा ग्रंथ, त्यांत भाषा पुन्हा वैदिक–– त्यामुळे 'बांगाल' म्हणून त्याची प्रेमळ थट्टा करायलाहि स्वामीजींना फावतें ! पण अडल्या शब्दांचें उच्चारण व पाठ ते त्याला सांगतात. वेदांचें अनादित्व सिद्ध करण्यासाठी जें अलौकिक युक्तिकौशल्य सायणांनी दाखविलें तें स्पष्ट करतांना स्वामीजी त्या भाष्यकारांची मुक्त-कंठाने प्रशंसा करीत; उलट केव्हा केव्हा प्रमाण देऊन याच पदाच्या गूढ अर्थासंबंधी आपलें भिन्न मत नमूद करून मौजेने ते सायणांची थट्टाहि करीत.

अशा रीतीने कांही काळ ग्रंथावलोकन झाल्यावर स्वामीजींनी मॅक्समुलरबद्दल बोलणें काढलें व म्हटलें, "मला तर वाटतें की सायण स्वतःच आपल्या भाष्याचा उद्धार करण्यासाठी मॅक्स-मुलरच्या रूपाने आला असावा माझी ही धारणा पुष्कळ दिवसापासूनची आहे. मॅक्समुलरांच्या प्रत्यक्ष भेटीने माझी ही धारणा आणखी दृढ झाली. अशा चिकाटीचा, वेदवेदान्तांत अशी गति असलेला पंडित आपल्या देशांतहि आढळत नाही! त्यांतच ठाकुरांवर काय त्यांची गाढ भक्ति!! त्यांना ते अवतार मानतात. पाहुणा म्हणून त्यांच्या घरीं होतों तेव्हा काय आदरातिथ्य केलें माझें! त्या वृद्ध पतिपत्नीकडे पाहून वाटे जणु वशिष्ठ-अरुंधती संसार करताहेत. मला निरोप देतांना वृद्धाच्या डोळ्यांतून आसवें गळलीं!

शिष्यः-- सायणच जर मॅक्समुलर म्हणून आले असतील तर त्यांनी ही पवित्र भारतभूमि सोडून म्लेंच्छ म्हणून कां बरें जन्म घेतला?

स्वामीजीः-- अज्ञानामुळेच माणस, 'मी आर्य, तो म्लेंच्छ,' अशी भावना करतो--असे भेद पाडतो. पण वेदांचे भाष्यकार ज्ञानाचे जणु ज्वलन्त सूर्यच होत. त्यांना या वर्णाश्रमांचें वा जातिभेदाचें काय वावडें? त्यांच्या दृष्टीने त्या साऱ्याच निखा-लस अर्थशून्य गोष्टी. विशेषतः ज्या देशांत विद्या व धन यांची सांगड आहे तो देश सोडून जर ते जन्म घेते तर हीं प्रचंड पुस्तकें छापायला पैसा तरी कुठून मिळाला असता त्यांना? ईस्ट इंडिया कंपनीनेच तर हे ग्रंथ छापायला नगद नऊ लाख रुपये दिले होते! तोहि पैसा कमीच पडला. या भारतांतीलच शेकडो वैदिक पंडितांना मासिक पगारावर या कामीं नेमण्यांत आलें होतें. विद्या-ज्ञानादिकांसाठी असा प्रचंड खर्च, अशी तळमळ

आजच्या जमान्यांत या देशांत कुठे कधी दिसली आहे ? स्वतः मॅक्समुलरनेच या ऋग्वेद-प्रस्तावनेंत म्हटलें आहे की नुसतीं हस्तलिखितें तयार करावयाला पंचवीस वर्षें लागलीं व नंतर तीं छापावयास लागलीं वीस वर्षें. सतत प्रदीर्घ पंचेचाळीस वर्षें एकच ग्रंथ घेऊन चिकाटीने असलें काम करणें हें कांही सामान्य माणसाचें काम नव्हे. यांतच काय तें समज. उगीचच नाही कांही त्यांना सायण म्हणत मी.

मॅक्समुलरबद्दल हें बोलणें झाल्यावर पुन्हा अध्ययनाला सुरवात झाली. वेदांचें अवलंबन करूनच सृष्टीचा विकास झाला आहे ह्या सायणांच्या मताचें आता स्वामीजी मोठ्या आवेशाने समर्थन करूं लागले. ते म्हणाले, " वेद म्हणजे अनादि सत्यांचा समूह. वेदज्ञ ऋषींनी हीं सारीं सत्यें प्रत्यक्ष अनुभविलीं. अतींद्रियदर्शी नसलेल्या आपल्यासारख्या सामान्य लोकांना त्यांचा अनुभव येणें शक्य नाही. म्हणूनच वेदांत ऋषि शब्दाचा अर्थ आहे मंत्रद्रष्टा; जानवें घालणारा ब्राह्मण असा नाही. ब्राह्मणादि जातिभेद तर पुढे आले. वेद शब्दात्मक अर्थात् भावात्मक वा अनंत भावराशींची समष्टि मात्र होत. जो पुढे आपल्याला स्थूल स्वरूपांत प्रत्ययास येतो असा सूक्ष्म भाव म्हणजेच शब्द, असा शब्द या पदाचा प्राचीन वैदिक अर्थ आहे. म्हणून जेव्हा प्रलय होतो तेव्हा भावी सृष्टीचीं सारीं सूक्ष्म बीजें वेदांतच अंतर्निहित असतात. म्हणूनच पुराणान्तरीं प्रथमच मत्स्यावतारांत वेदांचा उद्धार झाल्याचें आढळून येतें. प्रथमावतारांतच वेदांचा उद्धार झाला व या वेदांपासून क्रमाने पुढे साऱ्या सृष्टीचा विकास होऊं लागला. म्हणजेच वेदनिहित शब्दांच्या आधारें विश्वांतील सारे स्थूल पदार्थ एकामागून एक तयार होऊं लागले, कारण साऱ्याच स्थूल पदार्थांचें सूक्ष्म रूप म्हणजे शब्द किंवा भाव. कल्पकल्पान्तरींहि सृष्टिक्रम

हा असाच होता. या गोष्टींचा उल्लेख वैदिक संध्यामंत्रांतच आहे "सूर्याचंद्रमसौ धाता यथापूर्वमकल्पयत् दिवञ्च पृथिवीं चान्तरीक्षमथो स्वः।" समजलें ?

शिष्य:-- पण महाराज, कोणतीहि वस्तुच जेव्हा नसेल तेव्हा कशाला उद्देशून शब्दयोजना केली जाईल ? आणि पदार्थांचीं नांवेंहि कशीं तयार होतील ?

स्वामीजी:— वरवर पाहतां ठीक असेंच वाटतें. पण असें पाहा की हा घट फुटला असतां 'घटत्वाचा' नाश होतो काय ? नाही. कां नाही ? कारण घट म्हणजे स्थूल वस्तु. पण घटत्व म्हणजे घटाचें सूक्ष्म रूप वा त्याची शब्दावस्था. अशा प्रकारें सर्व पदार्थांची शब्दावस्था म्हणजे त्या साऱ्या पदार्थांची सूक्ष्मावस्था. आणि आपण ज्या पाहतों, ऐकतों, समजतों, स्पर्श करतों त्या साऱ्या जिनसा या सूक्ष्म वा शब्दावस्थेंत असलेल्या पदार्थांचा स्थूल विकास. जसें कार्य आणि कारण. जगाचा कल्पान्तीं नाश झाल्यानंतरहि जगत्बोधात्मक शब्द, म्हणजेच साऱ्या स्थूल पदार्थांचा सूक्ष्मस्वरूपसमूह ब्रह्मांत कारणरूपाने असतो. सृष्टि-निर्मितीच्या पूर्वी सूक्ष्मस्वरूपसमूहांत एकीभूत असलेले हे पदार्थ स्पंदित होऊन, त्यांचाच मूलभूत असा शब्दगर्भात्मक अनादि ॐकार ध्वनि आपोआप ध्वनित होऊं लागतो. पुढे क्रमाने या समष्टींतूनच एकेक विशिष्ट विशिष्ट पदार्थ प्रथम सूक्ष्म वा शाब्द स्वरूपांत व नंतर स्थूल स्वरूपांत व्यक्त होतो. हा शब्द म्हणजेच ब्रह्म--शब्द म्हणजेच वेद. हाच सायणाचार्यांचा अभिप्राय आहे. आलें तुझ्या ध्यानांत ?

शिष्य:— नीटसें कांही समजलें नाही महाराज.

स्वामीजी:— जगांत जितके म्हणून घट आहेत ते सारे नष्ट झाले तरी 'घट' हा शब्द राहूं शकेल हें तर समजतें ? तर मग

जगाचा ध्वंस झाल्यावरहि किंवा ज्या साऱ्या वस्तूंचें हें जग बनलें आहे त्या साऱ्या तुटून, फुटून चूर्ण होऊन गेल्यावरहि त्या वस्तूंचे वाचक शब्द कां नाही राहणार? आणि त्यांच्यापासून पुन्हा सृष्टीची उत्पत्ति न व्हायला तरी काय झालें?

शिष्यः— पण नुसतें 'घट, घट' म्हणून आरडाओरड करीत राहून तर कांही घट नाही तयार व्हायचे?

स्वामीजीः— तूं किंवा मी आरडाओरड करून कांहीच होणार नाही हें खरें, पण सिद्धसंकल्प ब्रह्मांत घटकल्पना उदय पावतांच घट व्यक्त होईल. सामान्य साधकाच्या देखील इच्छा-मात्रेंकरून कितीतरी अकल्पनीय घटना घडून येतात; मग सिद्धसंकल्प ब्रह्माबद्दल तर बोलायलाच नको. सृष्टीपूर्वी प्रथम ब्रह्म शब्दात्मक असतें व मग तेंच ॐकारात्मक वा नादब्रह्म होतें. नंतर पूर्वकल्पांतील भूः भुवः स्वः किंवा गाय, मनुष्य, घट, पट इत्यादि शब्द वा कल्पना या ॐकारामधूनच अभिव्यक्त होऊं लागतात व अशा क्रमानेच हें जड जगत् विकसित होतें. शब्दच सृष्टीचें मूळ कसें हें आता तरी समजलें?

शिष्यः— हो, समजल्यासारखें तर वाटतें थोडेंफार; पण या कल्पनांची नीट धारणा कांही होत नाही.

स्वामीजीः— ठीक धारणा होणें, प्रत्यक्ष अनुभूति होणें या काय तोंडच्याच गोष्टी आहेत रे बाबा? मन जसें ब्रह्मावगाही होऊं लागतें तसें एकानंतर एक अशा क्रमाने या साऱ्या अवस्थांतून जाऊन अखेर निर्विकल्प अवस्थेप्रत पोहोचतें. समाधि लागतांना, तींत प्रवेशाच्या सुरवातीस जगत् शब्दमय आहे ही अनुभूति येते व नंतर मग गभीर ॐकार ध्वनींत सारें विलीन होऊन जातें. त्यानंतर तोहि राहत नाही—तो आहे किंवा नाही असा बोध

होतो, हीच अनादि नादाची अनुभूति. यानंतरची म्हणजे मन ब्रह्मलीन होण्याची अवस्था. येथे सारें शान्त.

स्वामीजींचें हें विवेचन ऐकून शिष्याला निश्चित जाणवलें की या साऱ्या अवस्थांतून जाऊन त्यांना अनेकदा समाधिलाभ झाला असला पाहिजे. एरवी या गोष्टी अशा स्पष्टपणें ते कसे समजावून देऊं शकतील ? शिष्य स्तब्ध झाला. स्वतः अनुभवल्या-खेरीज अशा रीतीने समजावून सांगणें कुणालाहि शक्य नाही.

स्वामीजी पुढे म्हणाले, "अवतारतुल्य महापुरुष समाधि-भंगानंतर जेव्हा 'मी-माझें'च्या प्रदेशांत उतरून येऊं लागतात तेव्हा प्रथम अव्यक्त नादाचाच त्यांना अनुभव येतो--हळूहळू तो नाद सुस्पष्ट होत गेल्याने ते ॐकाराचा अनुभव घेतात. ॐकारानंतर त्यांना शब्दमय जगताचीं प्रचीति येते व सर्वांत शेवटीं प्रतीत होतें जड जगत्. पण सामान्य साधकांनी मोठ्या कष्टाने कसें तरी करून नादापलीकडे जाऊन जर साक्षात् ब्रह्मानुभूति उपलब्ध करून घेतली तर ते मग जेथे हें स्थूल जगत् प्रत्यक्ष अनुभवास येतें त्या निम्नभूमीवर पुन्हा उतरूं शकत नाहीत. ते ब्रह्मपदीं लीन होऊन जातात--क्षीरे नीरवत्--।"

या साऱ्या गोष्टी चालल्या असतांनाच महाकवि गिरीशचंद्र घोष तेथे आले. मोठ्या प्रेमाने कुशल प्रश्नादि विचारून स्वामी-जींनी त्यांची चौकशी केली व ते शिष्याला पुन्हा पुढे समजावून सांगूं लागले. गिरीशबाबू तें सारें एकचित्ताने ऐकूं लागले, व स्वामीजींनी सुस्पष्टपणें केलेलें वेदांचें तें विवेचन ऐकून ते मुग्ध झाले.

चालू विषयाला धरून स्वामीजी पुढे म्हणाले, "लौकिक (नित्योपयोगांत असणारे) व वैदिक असे शब्दांचे दोन भाग नैय्यायिकांच्या 'शब्दशक्तिप्रकाशिकेंत' माझ्या पाहण्यांत आले.

तेथील तें विवेचन खरोखरच सखोल विचारांचें निदर्शक आहे, पण त्यांची ती परिभाषा वाचून मात्र डोकें अगदी भणाणून जातें !"

नंतर गिरीशबाबूंकडे वळून ते म्हणाले, "हें सारें तुम्हीं तर कांही पाहिलें देखील नाही--फक्त कृष्ण, विष्णु कर-करूनच तर जन्म घालवला !"

गिरीशबाबू:-- मी काय वाचून करणार ? एक तर वेळ नाही, अन् बुद्धिहि नाही तितकी की त्या साऱ्या भानगडी समजतील ! पण ठाकुरांच्या कृपेने तो सारा वेद-वेदान्त नुसता माथीं घेऊनच मी हा जन्म तरून जाईन. तुमच्या करवीं त्यांना खूप काम करून घ्यावयाचें आहे म्हणूनच ते हें सारें अध्ययन करवून घेताहेत. आम्हांला त्या साऱ्यांची कांही गरज नाही. असें म्हणून 'जय वेदरूपधारी श्रीरामकृष्ण की जय' असा जयजयकार करीत ते त्या प्रचंड ऋग्वेदसंहितेला पुनः पुनः नमस्कार करूं लागले. वाचकांना आम्हीं इतरत्र सांगितलेंच आहे की स्वामीजी जेव्हा ज्या विषयाचा उपदेश करीत तेव्हा त्याचा असा खोल ठसा श्रोत्यांच्या मनावर उमटे की हाच विषय सर्वापेक्षा अधिक महत्त्वाचा आहे असें त्यांना वाटूं लागे. ब्रह्मज्ञानासंबंधी बोलत तेव्हा वाटे तें मिळविणें म्हणजेच जीवनाची सार्थकता. भक्ति वा कर्मासंबंधी किंवा देशाच्या प्रगतीसारख्या इतर विषयांवर जेव्हा ते बोलत तेव्हा तो तो विषय श्रोत्यांच्या मनांत अग्रस्थान प्राप्त करून घेई व त्या गोष्टी करण्यासाठी ते उत्सुक होऊन जात. आताहि वेदाबद्दल बोलतांना त्यांनी शिष्य व इतरांचीं मनें वेदोक्त ज्ञानमहिम्याने अगदी भारून टाकलीं. इतकीं की त्याइतकी महत्त्वाची वा प्रयोजनीय अन्य कोणतीहि गोष्ट त्यांना शोधूनहि सापडली असती किंवा

नाही याची शंकाच आहे. गिरीशबाबूंनी ही गोष्ट बरोबर ताडली; आणि स्वामीजींचें अत्यंत थोर हृदय व त्यांची शिकवण्याची ही पद्धत आधीपासूनच माहीत असल्याने शिष्यादि उपस्थित मंडळींना स्वामीजींनी ज्ञान, भक्ति, कर्म यांचें सारखेंच महत्त्व पटवून द्यावें म्हणून त्यांनी ( गिरीशबाबूंनी ) एक युक्ति योजली.

स्वामीजींची दुसरीकडेच लय लागल्याचें पाहून गिरीशबाबू एकदम म्हणाले, " नरेन्-- आता मी काय म्हणतों तेंहि थोडें ऐका, वेद-वेदान्त तर खूप झाला वाचून; पण देशांत हा जो घोर हाहाकार माजला आहे, अन्नाचें दुर्भिक्ष, व्यभिचार, भ्रूणहत्या वगैरे महापातकें डोळ्यासमोर हा जो राजरोस धुडगूस घालताहेत त्यांच्यावर कांही उपाय त्या तुमच्या वेदांत आढळला का तुम्हांला कुठे ? एकेवेळीं जिच्या घरीं पांचपन्नास माणसें पंगतीला असत त्या अमक्या बाईच्या घरीं आज तीन दिवस झाले चूल पेटली नाही, त्या घरच्या कुलस्त्रीला गुंडांनी अत्याचार करून ठार मारलें, ह्या घरीं काय तर भ्रूणहत्या झाली, त्याने काय तर लांडीलबाडी करून विधवेचें सर्वस्व अपहरण केलें, या असल्या साऱ्या शोचनीय गोष्टींना पायबंद घालण्याचा कांही उपाय आहे का तुमच्या वेदांत ? " गिरीशबाबूंनी लोकांच्या दुरवस्थेचें असलें भयंकर चित्र आपल्या नाटयमय वाणीने रंगवायला सुरवात केल्यावर स्वामीजी तर अगदी चुप बसले. त्या साऱ्या दु:खकष्टादिकांच्या नुसत्या विचारानेच स्वामीजींचे डोळे पाण्याने भरून आले. आपली ही अवस्था कुणाच्याहि नजरेला पडूं नये म्हणून ते लागलीच त्या बैठकींतून उठून गेले.

तेवढ्यांत गिरीशबाबू शिष्याला म्हणाले, " पाहिलेंस का ? केवढें करुणापूर्ण उदार हृदय आहे यांचें !-- मी तुमच्या या

स्वामीजींना मानतों तें कांही ते वेदज्ञ पंडित आहेत म्हणून नव्हे, तर हे जे ते जीवांच्या दुःखाने व्याकुळ होऊन डोळ्यांतून पाणी गाळीत बाहेर उठून गेले त्या त्यांच्या उदार हृदयासाठी. हे तर उघडचा डोळ्यांनी पाहिलेंस ना की मानवाच्या दुःखकष्टांच्या आर्त गोष्टी ऐकतांच त्यांचें हृदय अगदी पिळवटून निघालें, हा सारा वेद-वेदान्त कुठल्याकुठे वाहून गेला ?

शिष्यः-- महाशय, आमचा आपला छान वेदाभ्यास चालला होता-- आपण उगीचच या मायाराज्यांतील व्यर्थ दुःखकष्टांच्या गोष्टी सांगून स्वामीजींचें मन व्याकुळ केलेंत.

गिरीशबाबूः-- जगांत दुःखकष्टांचा हा आर्त डोंब उठलेला अन् तिकडे न पाहतांच म्हणे येथे स्वस्थपणें केवळ वेदाध्ययन करताहेत--गुंडाळून ठेव बाजूला तुझा हा वेदवेदान्त एका कोपऱ्यांत.

शिष्यः-- स्वतः आपण भावनाप्रधान आहांत की नाही, म्हणून आपणांस ही भावनांची भाषाच प्रिय वाटते. ज्यांच्या अध्ययनाने या साऱ्या जगाचा विसर पडतो त्यांबद्दल कांही तुम्हांला आदर दिसत नाही. नाहीतर खात्रीने तुम्ही हा असा रंगभंग केला नसता.

गिरीशबाबूः-- मी म्हणतों ज्ञान आणि प्रेमांत फरक काय आहे तो तर जरा एकदा समजावून सांग ? तुझे गुरु स्वामीजीच पाहाना-- जसे ज्ञानी तसेच प्रेमिकहि आहेत. 'सत्-चित्-आनंद' ह्या तिन्ही एकच वस्तु असें तुझे वेदच नाही का सांगत ? स्वामीजी हें एवढें पांडित्य दाखवीत होते, पण जगाच्या दुःखाची नुसती वार्ता कानीं येतांच जीवांच्या दुःखाने दुःखी होऊन आसवें ढाळूं लागले. ज्ञान व प्रेमांत या वेद-वेदान्तांत भेद मानला असेल तर त्यांना माझा दुरूनच नमस्कार असो !

गिरीशबाबूंचें म्हणणें वेदांविरुद्ध तर मुळीच नाही या विचाराने शिष्य चुप बसला.

इतक्यांत स्वामीजी परत आले व 'तुमचें काय बोलणें चाललें आहे' असें त्यांनी शिष्याला विचारलें.

शिष्य:-- आमचें बोलणें चाललें होतें वेदांबद्दलच. यांनी कांही ग्रंथ वाचले नाहीत पण आश्चर्य हें की यांतील सारे सिद्धान्त यांना पुरेपूर अवगत आहेत !

स्वामीजी:--गुरुभक्तीच्या जोरावर हे सारे सिद्धान्त आपोआप अनुभवास येतात. ग्रंथपठनाची, श्रवणाची मग कांही गरजच नाही उरत. पण असला भक्ति-विश्वास जगांत अत्यंत दुर्लभ. यांच्यासारखी भक्ति, विश्वास ज्यांचा असेल त्यांना शास्त्राध्ययनाची कांही आवश्यकता नाही. पण यांचें जर कुणी अनुकरण करूं जाईल तर त्याचा निखालस सर्वनाश होईल. त्यांचें म्हणणें ऐकावें— त्यांचें अनुकरण मात्र कधीहि करूं नकोस.

शिष्य:-- ठीक आहे.

स्वामीजी:-- नुसतें 'ठीक' म्हणून डोकें हलवून नाही चालणार. मी सांगतों तें सारें नीट समजावून घे. मूर्खासारखा साऱ्या गोष्टींना मान नको हलवूस आपला ! मी सांगतों म्हणूनच कोणत्याहि गोष्टीवर विश्वास ठेवूं नकोस. नीट समजावून घे— मगच विश्वास ठेव. आपल्या साऱ्या गोष्टी नीट पारखूनच स्वीकारायला ठाकुर मला नेहमी सांगत. युक्ति, तर्क व शास्त्र यांच्या साह्यानेच आपला मार्ग आक्रमावयास हवा. सतत विचारानेच बुद्धि शुद्ध होते, व तींतच ब्रह्म प्रकाशित होऊं शकतें. समजलें ना मी काय म्हणतों तें ?

शिष्य:-- समजलों तर सारेंच— नाना लोकांचीं मतें ऐकून डोकें अगदी फिरून जातें. एकजण (गिरीशबाबू) म्हणतो 'हें

सारें वाचून काय होणार आहे ?' लागलीच आपण म्हणतां— 'वाचा, विचार करा.' अशा वेळीं आम्हीं काय करावें ?

स्वामीजी:-- आम्हीं दोघांनीहि सांगितलेल्या गोष्टी खऱ्याच आहेत. फरक येवढाच की त्या दोन भिन्न दृष्टिकोनांतून सांगितल्या गेल्या आहेत. एक अवस्था अशी येते की जेव्हा युक्ति, तर्क या साऱ्या गोष्टी अगदी चुप होऊन जातात-- 'मूकास्वादनवत्--।' आणखी एक अवस्था अशी आहे की जींत वेदादिशास्त्रग्रंथांचें आलोचन, अध्ययन-अध्यापन या गोष्टी करतां करतांच सत्यवस्तूचा प्रत्यक्ष लाभ होतो. तुला स्वतःला मात्र या साऱ्या अध्ययन-अध्यापनांतूनच जावें लागणार आहे. तोच तुझा सत्यलाभाचा मार्ग. लक्षांत ठेव.

स्वामीजींचा हा आदेश मिळाल्याने गिरीशबाबू हरले असें वाटून भोळसटपणें शिष्य त्यांना म्हणाला, "ऐकलेंत महाशय, स्वामीजींनी मला वेदवेदान्त वाचायला, तर्कविचारांचा अवलंब करायला सांगितलें तें ?"

गिरीशबाबू:-- तर मग तूं तेंच कर. स्वामीजींच्या आशीर्वादाने तुझें त्यानेच कल्याण होईल.

येवढ्यांत स्वामी सदानंद तेथे आले. त्यांना पाहून स्वामीजी म्हणाले, "अरे ! जी. सी. च्या तोंडून देशाची दुरवस्था ऐकल्याने माझे प्राण अगदी व्याकुळ झाले आहेत. देशासाठी कांहीतरी करण्याची आहे तुझी तयारी ?

सदानंद:-- महाराज, आपण हुकूम द्या, बंदा तें करायला तयार आहे.

स्वामीजी:-- सुरवातीला लहान प्रमाणावर सेवाश्रम काढा. त्यांत गरीब, दुःखीकष्टी लोकांना साहाय्य मिळण्याची व्यवस्था राहील, रोग्यांची शुश्रूषा करण्यांत येईल. अनाथ, अपंग, असहाय

लोकांची जाति-वर्ण निरपेक्ष सेवा करण्यांत येईल. आलें ध्यानांत मी काय म्हणतों तें ?

सदानंदः-- अगदी आपल्या आज्ञेबरहुकूम करूं हें.

स्वामीजीः-- जीवांच्या सेवेपरता दुसरा कोणताहि मोठा धर्म नाही. सेवाधर्माचें यथायोग्य पालन झाल्यास संसारबंधन अगदी सहज तुटून जातें.—'मुक्तिः करफलायते ।'

मग गिरीशबाबूंना उद्देशून स्वामीजी म्हणाले, "पाहा गिरीशबाबू, मनांत येतें की जगाचें हें दुःख कमी करण्यासाठी हजारों जरी जन्म घ्यावे लागले तरी मी ते घेईन. असें करण्याने एखाद्याच माणसाचें थोडें जरी दुःख कमी होत असेल तर तें मी खात्रीने करीन. वाटतें, फक्त माझीच मुक्ति घेऊन मी काय करूं ? साऱ्यांनाच या मार्गावरून न्यावयास हवें. कां म्हणून हा भाव माझ्या मनांत असा प्रबळ होत आहे ?"

गिरीशबाबूः-- असें जर नसतें तर कशाला श्रीरामकृष्णांनी तुम्हांला सर्वांत मोठा आधार म्हणून गौरविलें असतें.

असें म्हणून कामानिमित्त दुसरीकडे जाण्यासाठी गिरीशबाबू निघून गेले.

# अध्याय ११ वा

स्थळ — आलमबाजार मठ.

वर्ष— इ. स. १८९७.

विषय — मठांतील कांही जण स्वामीजींजवळून संन्यास घेतात — संन्यासधर्मासंबंधी स्वामीजींचा उपदेश— मानवी जीवनाचें उद्देश्य त्याग— 'आत्मनो मोक्षार्थं जगत्-हिताय च' या हेतूने सर्वस्वाचा त्याग म्हणजेच संन्यास—संन्यासग्रहणासाठी वर्ज्यावर्ज्य वेळ नाही— 'यदहरेव विरेजत् तदहरेव प्रव्रजेत्'— सन्यासाचे चार प्रकार— भगवान् बुद्धदेवानंतरच विविदिषा संन्यासाची वाढ — बुद्धदेवांपूर्वी संन्यासाश्रम होता, पण त्याग-वैराग्यच मानवीजीवनाचें ध्येय आहे असें मानलें जात नसे— कर्महीन संन्यासी देशाला कांहीहि उपयोगी नाहीत वगैरे प्रवादांचें खंडन— यथार्थ संन्यासी तर अखेर आपल्या मुक्तीचीहि उपेक्षा करून जगाचें कल्याण साधन करतो.

पहिल्यानेच स्वामीजी विलायतेहून कलकत्त्यास परत आल्यावर त्यांच्याकडे पुष्कळ उत्साही तरुण मंडळी येत हें आम्हीं आधी सांगितलेंच आहे. स्वामीजी त्या अविवाहित युवकांना ब्रह्मचर्य व त्यागाचा उपदेश देत व संन्यासासाठी— आपल्या मुक्तीकरिता व जगाचें कल्याण साधण्यासाठी म्हणून— सर्वस्वाचा त्याग करण्यास त्यांना प्रोत्साहित करीत. संन्यास घेतल्याखेरीज यथार्थ आत्मज्ञान होणें शक्य नाही, येवढेंच नव्हे तर बहुजनहितकर, बहुजनसुखकर कोणतेंहि ऐहिक कार्य करणें व त्यांत यशस्वी होणें हेंहि संन्यासाखेरीज शक्य नाही असें ते म्हणत. उत्साही तरुणांसमोर ते त्यागाचा आदर्श नेहमी ठेवीत व कोणी संन्यास घेण्याची इच्छा व्यक्त केल्यास त्याला प्रोत्साहन देऊन त्यावर कृपा करीत. त्यांच्याच प्रोत्साहनाने कांही भाग्यवान तरुणांनी संसारत्याग करून त्यांच्याकडूनच संन्यास-

दीक्षा घेतली. त्यांच्यापैकी ज्या चार जणांना स्वामीजींनी प्रथम संन्यास दिला त्यांच्या संन्यासदीक्षेच्या दिवशीं शिष्य आलमबाजार मठांत हजर होता. तो दिवस अद्यापहि शिष्याच्या चांगला स्मरणांत आहे.

स्वामी नित्यानंद, विरजानंद, प्रकाशानंद व निर्भयानंद म्हणून आज रामकृष्ण मिशनमध्ये परिचित असलेल्या मंडळींनीच त्या त्या दिवशीं संन्यास घेतला. त्यांच्यापैकी एकाला संन्यास देऊं नये असें स्वामीजींच्या गुरुबंधूंनी त्यांना वारंवार आग्रहानें सांगितल्याचें शिष्यानें मठांतील अनेक सन्यासी मंडळीकडून ऐकलें आहे. त्यांना उत्तर देतांना स्वामीजी म्हणाले, "आम्हींच जर पापी, तापी, दीन, दुःखी, पतितांचा उद्धार करण्यांत पाय मागे घेतले तर त्यांच्याकडे इतर कोण पाहणार ? तुमच्यापैकी कुणीहि या बाबतींत माझ्या आड येऊं नये." अखेर स्वामीजींचीच प्रबल इच्छा पूर्ण झाली. अनाथशरण स्वामीजींनी आपल्या कृपाबलानें त्याला संन्यास देण्याचा संकल्प केला.

आज दोन दिवस झाले, शिष्य मठांतच राहतो आहे. स्वामीजी शिष्याला म्हणाले, "तूं तर ब्राह्मण भिक्षुक. उद्या तूंच त्यांचा श्राद्धविधि कर, परवा मी त्यांना संन्यास देईन. आज पोथ्यापुस्तकें काय पाहावयाचीं असतील तीं सारीं नीट पाहून ठेव." शिष्यानें स्वामीजींची आज्ञा मान्य केली.

संन्यास घेण्याचें ठरविलेल्या या चार ब्रह्मचाऱ्यांनी संन्यासाच्या आदले दिवशीं मुंडन केलें. मग गंगास्नानानंतर पांढरीं वस्त्रें धारण करून स्वामीजींच्या पादपद्मांना वंदन करून व त्यांचा स्नेहमय आशीर्वाद घेऊन ते श्राद्धविधीसाठी तयार झाले.

शास्त्रानुसार जे संन्यास घेतात त्यांना त्या वेळीं स्वतःचें श्राद्ध स्वतःलाच उरकून घ्यावें लागतें. कारण संन्यासानंतर त्यांना

लौकिक किंवा वैदिक कोणत्याच बाबतींत कांही अधिकार पुढे राहत नाही हें येथे सांगितल्यास वावगें होणार नाही. पुत्र-पौत्रांनी केलेलें श्राद्ध किंवा पिंडदानादि क्रियांचें फळ त्यांना स्पर्शूं शकत नाही. म्हणूनच संन्यास घेण्यापूर्वी स्वतःचेंच श्राद्ध स्वतःस करावयाचें असतें, आपल्याच पायीं पिंड अर्पण करून संसाराचा, इतकेंच काय पण स्वतःच्याच देहाच्या पूर्व संबंधांचाहि संकल्प सोडून संपूर्ण लोप करावयाचा असतो. यालाच संन्यासाची अधिवासक्रिया म्हणतात. स्वामीजींचा या साऱ्या वैदिक कर्म-कांडावर ठाम विश्वास होता. शास्त्रानुसार या साऱ्या क्रिया न झाल्यास ते अत्यंत नाराज होत हें शिष्याने पाहिलें होतें. भगवे कपडे घालून घराबाहेर पडले की झाली संन्यासदीक्षा ही आजकालची भावना स्वामीजींच्या ठिकाणीं नव्हती. अनादि-कालापासून चालत आलेले, ब्रह्मविद्यासाधनभूत गुरुपरंपरागत संन्यासव्रत घेण्यापूर्वी करावयाचे सारे नैष्ठिक संस्कार ते ब्रह्म-चाऱ्यांकरवीं व्यवस्थितपणें करवून घेत. श्रीरामकृष्णांच्या शरीर-त्यागानंतर उपनिषदादि शास्त्रग्रंथांत संन्यास घेण्याची जी विधिबद्ध पद्धत आहे ती मिळवून श्रीरामकृष्णांच्या फोटोसमोर स्वतः स्वामीजींनी आपल्या गुरुबंधूसह वैदिक पद्धतीने संन्यास घेतल्याचें आमच्या ऐकिवांत आहे.

आलमबाजार मठांत दुसऱ्या मजल्यावर पाणी ठेवण्याची जी जागा होती त्या खोलींत श्राद्धोपयोगी सारी सामुग्री ठेवली होती. स्वामी नित्यानंदांना वडिलांच्या श्राद्धाचा अनुभव असल्याने आवश्यक असणाऱ्या गोष्टी जमविण्यांत कांही चूक झाली नव्हती. स्नान आटोपल्यावर शिष्य स्वामीजींच्या आज्ञेने पौरोहित्य करावयास सिद्ध झाला. स्वामीजी अधून मधून येऊन पाहून जात. श्राद्धक्रिया आटोपल्यावर या चौघाहि ब्रह्मचाऱ्यांनी

आपापले पिंड आपापल्या पायीं अर्पण केल्याने जगरहाटीच्या दृष्टीने ते मेल्यासारखेच झाले. त्या वेळीं शिष्याचें हृदय त्या कल्पनेने अगदी व्याकुळ होऊन संन्यासाच्या कठोर जाणिवेने तो अत्यंत विव्हल झाला. पिंड घेऊन ते जेव्हा गंगेवर गेले तेव्हा शिष्याची ही व्याकुळता पाहून स्वामीजी त्याला म्हणाले, "हें सारें पाहून तुला काय भय वाटतें की काय रे ?" मान खाली घालून जेव्हा शिष्याने होकार दिला तेव्हा ते म्हणाले, "जगाच्या दृष्टीने आजपासून हे मेल्यासारखेच आहेत. उद्यापासून त्यांना नवीन देह, नवीन विचार, नवीन वस्त्रप्रावरणें मिळतील. ब्रह्मवीर्याने प्रदीप्त होऊन ते ज्वलन्त अग्नीप्रमाणे विराजतील--'न धनेन न चेज्यया त्यागेनैकेन अमृतत्वमानशुः।'"

स्वामीजींचें बोलणें ऐकून शिष्य अगदी निःशब्द झाला. संन्यासव्रताच्या कठोरतेने त्याची बुद्धि स्तंभित झाली. शास्त्रज्ञानाचा त्याचा गर्व अगदी गळून पडला. करणींत अन् बोलण्यांत केवढा हा फरक असतो असा विचार त्याच्या मनांत आला. श्राद्ध आटोपून गंगेंत पिंड अर्पण करून ते चौघेहि ब्रह्मचारी परत आले व त्यांनी स्वामीजींच्या पादपद्मांना वंदन केलें. त्यांना मनःपूर्वक आशीर्वाद देऊन स्वामीजी म्हणाले, "मानवजीवनांतील सर्वश्रेष्ठ व्रत घेण्यास तुम्ही सिद्ध झाला आहांत. धन्य तुमचा जन्म, धन्य तुमचा वंश, धन्य तुमची जन्मदात्री माता--'कुलं पवित्रं जननी कृतार्था।--'"

त्या दिवशीं रात्रीं जेवणानंतर स्वामीजी फक्त संन्यासधर्मासंबंधीच बोलत होते. संन्यासदीक्षा घेण्यास उत्सुक असलेल्या ब्रह्मचाऱ्यांना उद्देशून ते म्हणाले, "आत्मनो मोक्षार्थं जगद्धिताय च। हाच आहे संन्यासाचा वास्तविक हेतु. संन्यास न झाल्यास कोणीहि केव्हाहि ब्रह्मज्ञ होऊं शकत नाही, ही गोष्ट वेद-वेदान्त

घोषणा करून सांगतात. संसारहि करूं अन् ब्रह्मज्ञहि होऊं असें जे म्हणतात त्यांच्या बोलण्याकडे लक्षहि देण्याची गरज नाही. तीं सारीं झालीं आडून भोग भोगणाऱ्यांची भ्रमपूर्ण आत्मवंचानेचीं बोलणीं. एवढीशी का होईना, कामना ज्याला असेल त्याचा या दुर्गम मार्गाच्या विचारानेच थरकांप उडतो. म्हणूनच आपलें कसें तरी भाबडें समाधान करून घेण्यासाठी ते सांगत हिंडतात, "प्रपंच आणि परमार्थ दोन्ही साधायला हवींत !" तीं सारीं बोलणीं म्हणजे वेडयांची बडबड, उन्मत्तांचे स्वैर प्रलाप—अशास्त्रीय व संपूर्णतया अवैदिक मत. त्यागाशिवाय मुक्ति अशक्य. पराभक्तीचा लाभ त्यागाशिवाय होत नाही. त्याग--त्याग--'नान्यः पन्था विद्यतेऽयनाय ।' गीतेंतहि सांगितलें आहे 'काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयोः विदु ।'

"संसाराच्या या कटकटी सोडल्याखेरीज कुणालाहि मुक्ति लाभत नाही. संसाराश्रमांत राहणें हेंच आपण कुठल्या ना कुठल्या वासनेचे गुलाम आहोंत या गोष्टीचें प्रमाण होय. असें नसल्यास कुणी संसारबंधनांत राहीलच कशाला ? कुणी कामिनीचा दास, तर कुणी धनाचा, कुणी मानाचा तर कुणी यशाचा, विद्येचा वा पांडित्याचा. अखेर सारे कशाचे ना कशाचे दासच. या साऱ्या दासत्वबंधनांतून मोकळे झाल्यानेच मुक्तीच्या मार्गानें पुढे जातां येते. कुणी कितीहि बकबक करो ना, मला येवढें समजतें की हें सारें सोडल्याखेरीज, संन्यास न घेतां जीवाला परित्राणाचा अन्य कोणताहि मार्ग नाही--इतर कशानेहि ब्रह्मज्ञानलाभ होण्याची शक्यता नाही."

शिष्यः-- महाराज, संन्यास घेतल्यानेच काय सिद्धिलाभ होतो ?

स्वामीजीः— सिद्धिलाभ होतो किंवा नाही ही तर फार

दूरची गोष्ट, तूं जोंपर्यंत या भयंकर संसाराच्या कचाटयांतून बाहेर पडत नाहीस, जोंपर्यंत वासनांचें दास्य झुगारून देत नाहीस, तोंपर्यंत तुला भक्तीचा काय किंवा मुक्तीचा काय कसलाच लाभ होणें शक्य नाही हें अगदी निश्चित. ब्रह्मज्ञांना ऋद्धिसिद्धि म्हणजे अगदी तुच्छ गोष्टी.

शिष्यः-- महाराज, संन्यासासाठी कांही योग्य अयोग्य काल आहे काय? किंवा संन्यासाचे कांही भिन्न भिन्न प्रकार असतात का?

स्वामीजीः-- संन्यासासाठी योग्य अयोग्य अशी कोणतीहि वेळ कांही ठरलेली नसते. 'यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेत्'-- वैराग्याचा उदय होतांक्षणींच संन्यास घ्यावा असाच श्रुतींचा आदेश आहे.

युवैव धर्मशीलः स्यात् अनित्यं खलु जीवितम् ।
को हि जानाति कस्याद्य मृत्युकालो भविष्यति ॥

जीवित अनित्य असल्याने तरुणपणींच धर्मप्रवण व्हावें. कुणाला ठाऊक मृत्यूचा घाला कुणावर केव्हा येईल तें? शास्त्रांत चार प्रकारचे संन्यास सांगितले आहेत. (१) विद्वत् (२) विविदिषा (३) मर्कट (४) आतुर. एकाएकीच तीव्र व यथार्थ वैराग्याचा उदय होऊन घर सोडून बाहेर पडला—ही गोष्ट कांही पूर्वजन्मींच्या संस्कारांशिवाय होत नाही,--यालाच म्हणतात विद्वत् संन्यास. आत्मतत्त्व जाणण्याच्या प्रबळ इच्छेने शास्त्राध्ययन व साधनादिद्वारा स्व-स्वरूप जाणून घेण्यासाठी एखाद्या ब्रह्मज्ञ पुरुषापासून संन्यास घेऊन स्वाध्याय व साधनभजन करण्याला म्हणतात विविदिषा संन्यास. स्वजनवियोग वा यासारख्या अन्य सांसारिक त्रिविध तापांनी पोळून निघून कांही लोक त्रस्त होऊन घर सोडून संन्यास घेतात, पण हें स्मशान-वैराग्य कांही टिकाऊ

नसतें. म्हणूनच संन्यासाच्या या प्रकाराला म्हणतात मर्कट संन्यास. ठाकुर गोष्ट सांगत ना एक--"वैराग्याच्या भरांत एकजण पश्चिम देशांत गेला अन् अखेर नोकरी मिळवली त्याने एक. नंतर काय तर म्हणे बायकोला बोलावन घेतलें किंवा पुन्हा लग्न करून व्यवस्थित संसार थाटला !" संन्यासाचा आणखी एक प्रकार म्हणजे अगदी मरायला टेकला, वांचायचें कांहीच लक्षण नाही, अशा वेळीं एखाद्याला संन्यास देतात. अशा वेळीं जर तो मेला तर पवित्र संन्यासव्रत घेऊन मेला असें मानतात. पुढील जन्म चांगला मिळेल अशी एक भावना असते असें करण्यामागे. त्यांतूनहि जर कुणी वांचला तर मग पुन्हा संसारांत न पडतां ब्रह्मज्ञानलाभाच्या प्रयत्नांत संन्यासीरूपांत कालक्रमणा करावयाची असते त्याने. तुझ्या काकांना शिवानंद स्वामींनी आतुर संन्यास दिला होता. ते तर तेव्हा वारले पण त्या संन्यासदीक्षेने त्यांना पुढे चांगला जन्म लाभेल. संन्यास घेतल्या-खेरीज मात्र आत्मज्ञान होण्याचा दुसरा उपाय नाही.

शिष्य:-- मग गृहस्थांसाठी कांही उपायच नाही का महाराज ?

स्वामीजी:-- त्यांच्या सुकृताने त्यांच्यांत कोणत्या ना कोणत्या जन्मीं वैराग्याचा उदय होईलच. असें वैराग्य निर्माण झालें की काम भागलें; जन्ममृत्यूच्या गुंतावळ्यांतून सुटायला मग उशीर नाही. पण साऱ्याच नियमांना एखाददुसरा अपवाद असतोच. गृहस्थाश्रमाचें सुयोग्य पालन केल्याने एखादा माणस मुक्त झाल्याचेंहि आढळतें. उदाहरणच द्यायचें झालें तर नागमहाशयांचें देतां येईल.

शिष्य:-- वैराग्य व संन्यासासंबंधी उपनिषदादि ग्रंथांतून तर कांही उल्लेख--उपदेश--आढळत नाही महाराज ?

स्वामीजी:-- एखाद्या पागलासारखा काय बडबडतोस ?

वैराग्यच तर उपनिषदांचा प्राण. विचारजनित प्रज्ञा हेंच तर उपनिषद्ज्ञानाचें चरम लक्ष्य आहे. मला असें खात्रीने वाटतें की भगवान बुद्धदेवांनंतरच भारतवर्षांत या त्यागव्रताचा विशेष प्रचार झाला असावा. त्यानंतरच वैराग्य व विषयवितृष्णा ह्या गोष्टी धर्माचें चरम लक्ष्य म्हणून मानण्यांत आल्या असाव्यात. बुद्धधर्मातील त्याग-वैराग्याचा हा आदर्श पुढे हिंदुधर्माने आत्मसात्--absorb--करून टाकला. भगवान बुद्धदेवांसारखा त्यागी महापुरुष या अवनीतलावर अन्य कुणी झाला नाही.

शिष्यः-- तर मग काय बुद्धदेवांपूर्वी देशांत त्यागवैराग्यादि भावना अल्प प्रमाणांत होत्या? देशांत संन्यासी नव्हते?

स्वामीजीः— तें कोण कसें सांगूं शकणार? संन्यासाश्रम होता, पण संन्यास हेंच जीविताचें अंतिम ध्येय ही जाणीव बहुजनसमाजांत नव्हती. वैराग्याला तेवढें महत्त्व नव्हतें व सदसद्विवेकनिष्ठा ही तेवढीशी प्रबळ नव्हती. म्हणूनच किती तरी योग्यांपाशी, साधूंपाशी जाऊनहि बुद्धदेवांना शान्ति लाभली नाही. नंतरच 'इहासने शुष्यतु मे शरीरम्' असा दृढ संकल्प करून ते आत्मज्ञानासाठी स्वतःच पुढे झाले व प्रबुद्ध होऊनच अखेर आसनावरून उठले. भारतांत आज हे जे संन्याशांचे मठ वगैरे दिसतात ते सारे बुद्धधर्माच्या कक्षेंतच होते. हिंदूंनी आता त्या साऱ्यांना आपल्या रंगांनी रंगवून आत्मसात् करून टाकलें आहे. बुद्धदेवांपासूनच यथार्थ संन्यासाश्रमाचा पाया रचला गेला. त्यांनीच मृत संन्यासाश्रमाच्या सांगाड्यांत प्राण ओतले.

स्वामीजींचे गुरुबंधु स्वामी रामकृष्णानंद म्हणाले, "बुद्धदेवांच्याहि पूर्वी चार आश्रम भारतांत असल्याला संहितापुराणादि ग्रंथ प्रमाण आहेत."

स्वामीजीः-- मन्वादि संहिता, सारीं पुराणें व महाभारताचा

अधिकांश भाग हीं तर परवा परवा रचलेलीं शास्त्रें होत. भगवान् बुद्ध या साऱ्यांच्या फार पूर्वी होऊन गेले.

स्वामी रामकृष्णानंदः— असें असतें तर वेदांत, उपनिषदांत, संहितांतून, पुराणांतून या बुद्धधर्माचा उल्लेख खात्रीने आढळला असता. या प्राचीन ग्रंथांत बुद्धधर्माचा उल्लेख ज्या अर्थी आढळत नाही त्या अर्थी बुद्धदेव त्यांच्या पूर्वी होऊन गेले असें तुम्ही कशावरून म्हणतां ? चारदोन प्राचीन पुराणांतून बौद्धमतांचा उल्लेख थोडा फार आढळतो, पण त्यावरून हें सिद्ध होऊं शकत नाही की हिंदूंच्या संहिता, पुराणें हीं सारीं आधुनिक आहेत म्हणून.

स्वामीजीः-- इतिहास जरा वाचून पाहा ना ! तुला आढळून येईल की बुद्धदेवांच्या साऱ्या कल्पना पचवून टाकूनच हिंदुधर्म येवढा थोर झाला आहे !

रामकृष्णानंदः— त्याग वैराग्य वगैरे गोष्टी जीवनांत योग्यपणें आचरून हिंदुधर्मांतील भाव ते सजीव करून गेले असावेत असें मला वाटतें.

स्वामीजीः--- या गोष्टीला मात्र कांही प्रमाण नाही. कारण बुद्धजन्मापूर्वीचा कांहीहि प्रमाणभूत इतिहास आज उपलब्ध नाही. इतिहासालाच प्रमाण मानल्यास हें मात्र कबूल करावयास हवें की प्राचीन घोर अंधकारमय कालांत एक बुद्धदेवच मात्र उज्ज्वल ज्ञानप्रभेने चमकून गेले.

नंतर मग पुन्हा संन्यासाबद्दल गोष्टी सुरू झाल्या.

स्वामीजीः— संन्यासाची उत्पत्ति कशीहि का होईना, मानवजीविताचें सार्थक आहे या त्यागव्रताचें अवलंबन करून ब्रह्मज्ञ होण्यांत. संन्यास घेणें हाच परमपुरुषार्थ. वैराग्य अंगीं बाणून जे संसाराविषयी वीतराग होतात ते खरोखरच धन्य होत.

अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

शिष्य:-- त्यागी संन्याशांची संख्या वाढल्याने देशाच्या ऐहिक उन्नतीला बाध येतो असें आजकाल अनेक जण म्हणतात. उपजीविकेसाठी गृहस्थांवर अवलंबून राहून कांहीहि काम न करतां साधु हिंडत फिरतात म्हणून कांहींचें म्हणणें असें की समाज व स्वदेशाच्या उन्नतीला त्यांचा काडीचाहि उपयोग नाही.

स्वामीजी:— लौकिक वा ऐहिक उन्नतीचा अर्थ तर एकदा सांग नीट समजावून.

शिष्य:-- पाश्चात्य देशांत जसें विद्येच्या जोरावर अन्नवस्त्रादिकांचे प्रश्न सोडवितात, विज्ञानाचें बळावर देशांत त्यांनी जशी व्यापारवाढ केली आहे, कला, कपडेलत्ते, आगगाड्या, तारायंत्रें वगैरेंची त्यांनी जी वाढ केली आहे ती म्हणजेच ऐहिक उन्नति.

स्वामीजी:-- माणसांत रजोगुणाचा उदय झाल्याखेरीज का या गोष्टी होणें शक्य आहेत? सारा भारतवर्ष हिंडून पालथा घातला पण रजोगुणाचें कुठे नांव नाही आढळलें. सारा बहुजनसमाज घोर--घोरतर तमोगुणांत निश्चेष्ट पडला आहे. फक्त संन्याशांतच रजोगुण, सत्त्वगुण असल्याचें दिसलें. तेच तर भारताचा आधार. यथार्थ संन्यासी हे गृहस्थांना शिकविणारे, उपदेश देणारे होत. त्यांच्याच तर शिकवणुकीने ज्ञानप्रकाश लाभून पूर्वी अनेकदा गृहस्थलोक संसारसंग्रामांत कृतकार्य झाले. संन्याशांनी दिलेल्या ज्ञानोपदेशाच्या मोबदल्यांतच गृहस्थलोक त्यांना अन्नवस्त्र देतात. हें आदान-प्रदान नसतें तर भारतांतील लोक अमेरिकेंतील रेडइंडियन लोकांप्रमाणे आतापर्यंत समूळ नष्ट होऊन गेले असते. संन्याशांना दोन मुठी पोटाला देतात म्हणूनच गृहस्थलोक उन्नतीच्या मार्गावर आहेत. निरुद्देश आळशीपणा हें संन्याशांचें जीवन नव्हे. वास्तविक तेच तर आहेत कर्ममयतेचे मूलस्रोत. त्यांना सारे उच्च आदर्श जीवनांत व कार्यांत उतरव-

तांना पाहून व त्यांच्या जवळूनच सारे उच्च भाव घेऊन गृहस्थ कर्मक्षेत्रांत जीवनसंग्राम करण्यास समर्थ झाले व आजहि होत आहेत. पवित्र संन्याशांकडे पाहूनच गृहस्थ सारे पावनभाव जीवनांत उतरवितात आणि यथार्थतेने कर्मतत्पर होतात. संन्यासी ईश्वरलाभासाठी व जगाच्या कल्याणासाठी सर्वस्वत्यागरूप व्रताचें आपल्या जीवनांत पालन करतात व गृहस्थांना सर्व बाबतींत प्रोत्साहन देतात. याच्या मोबदल्यांतच गृहस्थलोक त्यांना दोन मुठी अन्न पोटाला देतात. तें अन्न उत्पन्न करण्याची प्रवृत्ति व क्षमता देखील सर्वत्यागी संन्याशांच्या प्रेमळ आशीर्वादानेच देशांतील लोकांत उत्पन्न होते. कांही न करतांसवरतांच लोक संन्यासआश्रमाची निंदा करतात. इतर देशांत कांहीहि असो, आपल्या देशांत मात्र संन्याशांच्या हातींच सुकाणु असल्याने संसारसागरांत गृहस्थांची नाव बुडत नाही.

शिष्यः-- लोककल्याणासाठी तत्पर असणारे यथार्थ संन्यासी कितीसे आढळून येतात महाराज ?

स्वामीजीः-- हजारों वर्षांत रामकृष्णांसारखा एखादा संन्यासी महापुरुष झाला तरी मी म्हणतों पुष्कळ झालें. ते जे सारे आदर्श व भाव देऊन जातात ते त्यांच्या जन्मानंतर हजारो वर्षें लोकांचें मार्गदर्शन करतात. सन्यासाश्रम देशांत होता म्हणूनच तर त्यांच्यासारखे महापुरुष या देशांत जन्म घेतात. तरतमभावाने दोष तर सर्वच आश्रमांत दाखवतां येतील. पण दोष असूनहि आजपावेतों हा आश्रम इतर सर्व आश्रमांच्या अग्रस्थानीं गौरवाधिकाराने उभा आहे याचें कारण काय ? कारण हेंच की यथार्थ संन्यासी वेळीं आपल्या मुक्तीचीहि उपेक्षा करतात. जगाच्या मंगलासाठीच त्यांचा जन्म. अशा या संन्यासाश्रमाबद्दल तुम्ही जर कृतज्ञता दाखविणार नाही तर, शतवार धिक्कार असो तुम्हांला !

हें बोलत असतांना स्वामीजींचें मुखमंडल आरक्त झालें. संन्यासाश्रमाचें गौरवगान गातांना ते जणु मूर्तिमान संन्यासच असल्याचा शिष्याला भास झाला.

नंतर या आश्रमाची महती प्राण प्राण अनुभवीत असतांनाच अंतर्मुख होऊन ते आपले आपल्याशींच अत्यंत मधुर स्वरांत गुणगुणूं लागले--

> वेदान्तवाक्येषु सदा रमन्तः
> भिक्षान्नमात्रेण च तुष्टिमन्तः।
> अशोकमन्तःकरणे चरन्तः
> कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः।

ते पुढे म्हणाले, 'बहुजनहिताय बहुजनसुखाय' च संन्याशांचा जन्म. संन्यास घेऊन जो हें ध्येय विसरतो त्याचें जीवन व्यर्थ होय;--वृथैव तस्य जीवनम्। दुसऱ्यांकरिता प्राण देण्यासाठी, कष्टी जीवाचें गगनभेदी करुण आक्रंदन थांबविण्यासाठी, विधवांचे अश्रु पुसण्यासाठी पुत्रवियोगानें विव्हळ झालेल्यांना शांति देण्यासाठी, अज्ञानांत असलेल्या बहुजन-समाजाला जीवनसंग्रामार्थ समर्थ बनविण्यासाठी, शास्त्रोपदेशाचा प्रचार करून त्याच्या द्वारें साऱ्याचें ऐहिक व पारमार्थिक मंगल साधण्यासाठी व सर्वांमध्ये प्रसुप्त असलेल्या ब्रह्मसिंहावर ज्ञानालोक टाकून त्याला जागृत करण्यासाठीच या जगांत सन्याशांचा जन्म असतो." आपल्या गुरुबंधूंना उद्देशून ते म्हणाले, "आत्मनो मोक्षार्थं जगद्धिताय च आमचा जन्म. नुसते बसून काय करतां आहांत ? उठा. जागे व्हा. स्वतः जागे व्हा व बाकी साऱ्यांना जागे करा; नरजन्माचें सार्थक करा.--उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत।--"

## अध्याय १२ वा

स्थळ-- कलकत्ता, बलरामबाबूंचें घर.

वर्ष-- इ. स १८९८.

विषय-- गुरु गोविंद शिष्यांना कशा प्रकारें शिक्षण देत-- त्यांनी त्या वेळीं पंजाबांतील सर्वसाधारण समाजांत एका विशिष्ट भावनेची प्रेरणा निर्माण केली होती-- सिद्धींमुळे होणारे अपाय-- स्वामीजींनी आपल्या जीवनांत अनुभवलेल्या दोन घटना-- शिष्यांना उपदेश-- "सदोदित भूतपिशाच्चादिकांच्या चिंतनाने माणूस भूतच होतो व सदोदित 'मी नित्य मुक्त बुद्ध आत्मा' या चिंतनाने तो ब्रह्मज्ञ होतो."

आज दोन दिवसांपासून स्वामीजी बागबाजारांतील कै. बलराम बोस यांच्या घरींच आहेत. हें शिष्याला फार सोईचे असल्याने तो दररोज तेथे जात येत असतो. आज संध्याकाळच्या थोडा वेळ आधी स्वामीजी घराच्या गच्चीवर फिरत आहेत. बरोबर शिष्य व इतर चारपांच लोक. गरमी खूप जाणवते आहे. स्वामीजींच्या अंगावर कांहीच नाही. दक्षिणवारा मंद मंद वाहतो आहे. बोलण्यांत गुरु गोविंदसिंगांची गोष्ट काढून त्यांच्या त्याग, तपस्या व प्राण पणाला लावून केलेल्या परिश्रमाने शीख जातीचें कसें पुनरुत्थान झालें, धर्म बदलून मुसलमान झालेल्या व्यक्तींना पुन्हा हिंदु करून घेऊन त्यांना शीख पंथांत त्यांनी कसें स्थान दिलें, व नर्मदा-तटाकीं त्यांचा कसा अंत झाला वगैरे गोष्टी आपल्या ओजस्वी वाणीने ते सांगूं लागले. गुरु गोविंदसिंगांपासून दीक्षा घेतलेल्या लोकांत त्या वेळीं कसल्या विलक्षण शक्तीचें स्फुरण होई तें सांगून, शिखांत प्रचलित असलेला एक दोहा त्यांनी म्हटला--

सवा लाख से एक लढाऊँ
जब गुरु गोविन्द नाम सुनाऊँ

—गुरु गोविंदांपासून दीक्षा घेतलेला एकच माणूस सवा लाख लोकांवर मात करूं शकतो. त्यांच्याकडून दीक्षा घेतल्याने त्यांच्या शक्तीने जीवनांत यथार्थ धर्मप्राणता बाणून गुरु गोविंदांच्या प्रत्येक शिष्याचें अंतरंगांत अशा अद्‌भुत वीरश्रीचा संचार होई की तिच्या योगाने तो सवा लक्ष परधर्मीयांना हरविण्यास समर्थ होत असे. धर्मगौरव सुचविणारी ही गोष्ट सांगतांना स्वामीजींच्या उत्साहोत्फुल्ल नयनांतून तेज जणु ओसंडून बाहेर पडूं लागलें. श्रोतृवृंद सचकित नयनांनी स्वामीजींच्या मुखमंडलाकडे पाहूं लागला. काय अद्‌भुत उत्साह व सामर्थ्य होतें स्वामीजींत! जेव्हा ज्या गोष्टीबद्दल बोलत तेव्हा असे तन्मय होऊन बोलत की ऐकणाऱ्याला वाटावें ही एकच गोष्ट जणु त्यांना जगांत सर्वांत महत्त्वाची वाटत आहे--ती मिळविणें हेंच जणु त्यांच्या दृष्टीने मानवजातीचें चरम लक्ष्य. कांही वेळाने शिष्य म्हणाला, "महाराज, गुरु गोविंद हिंदु व मुसलमान या दोघांनाहि आपल्या धर्मांत सामील करून घेऊन त्यांना एकाच ध्येयाने परिचालित करूं शकले ही मात्र अत्यंत आश्चर्याची गोष्ट वाटते. भारतीय इतिहासांत या गोष्टीला कुठेहि तोड नाही."

स्वामीजी:-- एकाच समान ध्येयाने प्रेरित झाल्याखेरीज लोकांना एकाच सूत्राने निबद्ध करतां येत नाही. समान लक्ष्य जर नसेल तर सभा, समित्या स्थापून व व्याख्यानें देऊन लोकांना एक करतां येत नाही, त्यांच्यांत ऐक्य भावना आणतां येत नाही. त्या वेळीं हिंदु काय किंवा मुसलमान काय सारेच घोर अत्याचार-अविचारांत भरडून निघत असल्याचें गुरु गोविंदसिंगांनी बरोबर हेरलें होतें. गुरु गोविंदांनी समान ध्येयाची नव्याने निर्मिति केली नाही, बहुजन समाजाला त्यांनी त्याची जाणीवच फक्त करून दिली. म्हणूनच हिंदु-मुसलमान सारेच त्यांचें अनुसरण

करूं लागले. भारतीय इतिहासांत या अशा घटना अगदी विरळच.

रात्र होत आहेसें पाहून सर्वांबरोबर स्वामीजी खालच्या मजल्यावरील बैठकींत येऊन बसले. ते बसतांच सारे जण त्यांच्या भोवती जमले. या वेळीं चमत्कारांबद्दल बोलणीं निघालीं.

स्वामीजी:-- "अति सामान्य मनःसंयमाने देखील सिद्धि हस्तगत करतां येतात." शिष्याला त्यांनी विचारलें, "काय तुला दुसऱ्यांचे विचार जाणून घेण्याची विद्या शिकावयाची आहे? फार तर चार पांच दिवसांत तुला ही विद्या शिकवून देतों."

शिष्य:-- त्यामुळे काय लाभ होईल?

स्वामीजी:-- का बरें? दुसऱ्यांच्या मनांतील गोष्टी समजूं शकतील तुला.

शिष्य:-- ब्रह्मविद्यालाभाला कांही मदत होणार आहे का त्या योगें?

स्वामीजी:-- मुळीच नाही.

शिष्य:-- मग मला त्या विद्येशीं कांहीहि कर्तव्य नाही. पण आपण सिद्धींसंबंधी अनुभविलेल्या वा ऐकल्या-पाहिलेल्या गोष्टी मात्र ऐकायची इच्छा आहे माझी.

स्वामीजी:-- हिमालयांत हिंडत असतां एका रात्रीं मी एका पाहाडी गावांत राहिलों. संध्याकाळ टळून गेल्यावर थोड्याच वेळांत या गावांतून ढोलक्यांचा खूप आवाज ऐकूं येऊं लागल्याने घरवाल्याकडे चौकशी केल्यावर कारण कळलें की एका माणसाच्या अंगांत देवी आली आहे. घरमालकाने आग्रह केल्यावरून व स्वतःलाहि कुतूहल असल्यानें ही सारी भानगड आहे तरी काय तें पाहायला म्हणून मी गेलों. जाऊन पाहतों तों ही गर्दी झालेली. एका उंच्यापुऱ्या व लांबकुरळ्या केसांच्या पाहाडी माणसाकडे बोट दाखवून मला सांगण्यांत आलें की त्याच्याच

अंगांत देवी आली होती. पाहतों तो त्याच्याजवळच एक कुऱ्हाड आगींत तापत ठेवलेली दिसली. कांही वेळाने त्या लाल तापलेल्या कुऱ्हाडीने त्याच्या अंगाला डाग देण्यांत आले व त्याच्या केसांवरूनहि ती फिरविण्यांत आली! पण आश्चर्य हें की त्या कुऱ्हाडीने त्याचें अंग डागलें गेलें नाही की केसहि जळले नाहीत-- त्याच्या तोंडावर दु:खाकष्टाची किंचित् छटा देखील कुठे आढळली नाही. मी तर तें पाहून अगदी थक्क झालों तितक्यांत गावचाप्रमुख माझ्यापाशी येऊन हात जोडून म्हणाला, "महाराज, कृपा करून याला त्या भुताच्या तावडींतून सोडवा." मी मोठ्या पेचांत पडलों. काय करावें कांही कळेना. साऱ्यांच्या आग्रहावरून त्या झपाटलेल्या 'झाडा'पाशी जाणें मला भागच होतें. जाऊन ती तापली कुऱ्हाड एकदा पारखून पाहावी असा विचार मनांत आला. ती जों हातीं धरतों तों सारा हात पोळून निघाला. तरी बरें झालें की कुऱ्हाड थड होऊन काळवडली होती हाताच्या वेदनेने तर माझे प्राण अगदी व्याकुळ झाले. सारे माझे तर्ककुतर्क पार कुठल्या कुठे पळाले. करणार काय? हाताची आग होत असतांनाच त्या माणसाच्या डोक्यावर हात ठेवून थोडा वेळ जप केला. आश्चर्य असें की १०-१५ मिनिटांतच तो माणूस शान्त झाला. त्यामुळे गावच्या लोकांची माझ्यावर जी भक्ति जडली तिला सीमा राहिली नाही. मी जणु त्यांना साक्षात् भगवान् वाटूं लागलों मला स्वत:ला मात्र काय झालें तें मुळीच उमगलें नाही. अखेर कांहीएक न बोलतांच मी आमच्या घरमालकाबरोबर घरीं परत फिरलों. तेव्हा रात्रीचे १२ वाजले असतील. आलों आणि झोपून राहिलों पण हाताच्या पीडने व घडलेला प्रकार काय तें कांहीच न समजल्याने डोक्यांत काहूर उठलें आणि झोप कांही आली नाही. जळत्या कुऱ्हाडीनेहि

माणसाचें शरीर डागल्या गेलें नाहीसें पाहून माझ्या मनांत आलें--"There are more things in heaven and earth, than are dreamt of in your philosophy !" — तत्त्वज्ञानाला ज्याची स्वप्नांत देखील जाणीव होणार नाही असल्या किती तरी गोष्टी या विश्वांत आहेत.

शिष्य:-- पुढे कधी या गोष्टीचा कांही तर्कसंगत उलगडा आपल्याला झाला का ?

स्वामीजी:-- नाही. आज बोलण्याच्या भरांत गोष्ट आठवली म्हणून तुम्हांला सांगितली.

ते पुढ म्हणाले, "ठाकुर मात्र या साऱ्या सिद्धींची खूप निंदा करीत. ते म्हणत, 'या शक्तींच्याकडे एकदा मन गेलें की परमार्थाकडे मग जाणें होत नाही.' पण माणसाचें मनच असें दुर्बळ की गृहस्थांची तर गोष्ट सोडा, साधूंपैकी रुपयांत चौदा आणे लोक या सिद्धींच्या मागे असतात. असल्या सिद्धींचे चमत्कार पाहून पाश्चात्य लोक अगदी थक्क होतात. सिद्धिलाभ एक वाईट गोष्ट आहे, धर्ममार्गांतील अडथळा आहे हें ठाकुरांनी कृपा करून पटवून दिलें म्हणूनच समजूं शकलों. म्हणनच तुम्हीं पाहिलें असेल की ठाकुरांच्या संतानांपैकी कुणीहि या दिशेला नजरहि टाकीत नाही."

"मद्रासमध्ये तुमची त्या पंचाक्षऱ्याशीं झालेली भेट सांगाना यांना" असें स्वामी योगानंदांनी स्वामीजींना सुचविलें.

या सबंधांत शिष्याने पूर्वी कांहीच ऐकलें नव्हतें. म्हणून ती हकीगत सांगा असा हट्ट त्याने स्वामीजींपाशी धरला. मग स्वामीजींनी सांगावयास सुरवात केली.--"मद्रासला मन्मथबाबूंकडे * राहत असतां एकदा मला स्वप्न पडलें की माझी

* कै. महेशचंद्र न्यायरत्न यांचे ज्येष्ठ चिरंजीव कै. मन्मथनाथ भट्टाचार्य.

जन्मदाती आई वारली. माझें मन अत्यंत खिन्न झालें. त्या वेळीं मी मठांतील लोकांनाहि पत्र लिहीत नसे मग घरीं लिहिणें तर दूरच राहो. मन्मथला स्वप्न सांगतांच बातमी काढण्यासाठी म्हणून त्याने कलकत्त्याला तार केली. स्वप्नामुळे मन असें उद्विग्न झालेलें, त्यांतच मद्रासच्या मंडळींनी सारी जमवाजमव करून अमेरिकेला जाण्यासाठी माझ्यामागे खूप तगादा लावला होता. आणि आईची कांही बातमी कळल्याखेरीज कुठे जाण्याची तर माझी इच्छा नव्हती. माझी ही अवस्था लक्षांत आल्याने मन्मथने सुचविलें की "गावापासून थोडचाच अंतरावर एक पिशाच्चसिद्ध माणूस राहतो. तो सिद्धीच्या जोरावर माणसांचें शुभाशुभ भूत-भविष्य वर्तमान सांगूं शकतो. त्याच्याकडे चला." मन्मथचा आग्रह पडल्याने व स्वतःच्या मनाची उद्विग्नता दूर होईल म्हणून मी त्या माणसाकडे जावयास कबूल झालों. मन्मथबाबू, मी, आलासिंगा व आणखी एक जण असे आम्ही चौघे थोडें अंतर रेल्वेने जाऊन नंतर पायीच चालत त्याच्यापाशी पोहोचलों. जाऊन पाहतों तों स्मशानाच्या बाजूनेच एक धिप्पाड, काळाढुस्स माणूस बसला होता. त्याच्या शिष्याने कांही 'रुंडुगुंडु' करून मद्रासी भाषेंत समजावून सांगितलें की तोच तो पिशाच्चसिद्ध पुरुष. सुरवातीला तर त्याने आमची कांहीच दखल घेतली नाही. नंतर कंटाळून आम्ही जेव्हा अगदी परत फिरायला निघालों तेव्हा त्याने आम्हांला कांही वेळ थांबायला सांगितलें. आमच्या बरोबरचे आलासिंगा दुभाषाचें काम करीत होते. त्यांनी आम्हांला त्याने थांबायला सांगितल्याचें कळविलें. नंतर एक पेन्सिल घेऊन त्याने कांही वेळ कांही आकृत्या काढल्या व मग मात्र मला त्याचें मन संपूर्ण एकाग्र झाल्याचें दिसलें. हें झाल्यावर त्याने आधी माझें नांव, गोत्र व मग आमच्या चौदा पिढ्यांतील

माणसांची माहिती सांगितली. हेंहि सांगितलें की श्रीरामकृष्ण माझ्याबरोबर सर्वत्र असतात व माझ्या आईचेंहि कुशल आहे. धर्मप्रचार करण्यासाठी लवकरच मला खूप दूर जावें लागणार आहे असेंहि त्याने त्याच वेळीं सांगितलें. आईबद्दल हा कुशल समाचार ऐकून मन्मथबरोबर आम्ही सारे घरीं परत आलों. परत येऊन पाहतों तों आईचें कुशल कळविणारी कलकत्त्याची तार येऊन पाहोचली होती.

योगानंदांना उद्देशून स्वामीजी म्हणाले, "बेट्याने जें जें सांगितलें तें तें ठीक अगदी तस्सें झालें. मग तें काकतालीय न्यायान असो वा कसेंहि असो."

योगानद:-- तुम्ही या साऱ्या गोष्टींवर पूर्वी विश्वास ठेवीत नव्हता म्हणूनच तो अनुभव तुम्हांला येण्याची आवश्यकता होती.

स्वामीजी:-- मी काय कांही न पाहतां न ऐकतां कशावरहि विश्वास ठेवायचा ? मी कांही असला मूर्ख नाही. महामायेच्या राज्यांत येऊन या जगत्-जादूगिरीबरोबरच किती इंद्रजाल-चमत्कार मीं पाहिलेत याला कांही सीमा नाही. माया ! माया ! ! रामराम ! आज या काय साऱ्या व्यथ भाकडकथा निघाल्यात ? भुतांचा विचार करतां करतां लोक स्वत:च भुतें होऊन जातात. अन् जो कळत न कळत रात्रंदिवस म्हणत असतो 'मी नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त आत्मा ' तो ब्रह्मज्ञ होतो.

मोठ्या स्नेहार्द्र दृष्टीने शिष्याकडे पाहून ते म्हणाले, "या साऱ्या व्यर्थ गोष्टींना मनांत मुळीच स्थान देऊं नकोस. फक्त सदसत् विचार कर, आत्मोपलब्धीसाठी प्राण पणाला लावून प्रयत्न कर. आत्मज्ञानापेक्षा श्रेष्ठ या जगांत अन्य कांहीच नाही. बाकी सारी माया—जादुगिरी. एक प्रत्यगात्माच फक्त नित्य सत्य. येवढेंच मला कळलें व तेंच तुम्हांला सांगण्याचा मी प्रयत्न

करतों;--'एकमेवाद्वयं ब्रह्म, नेह नानास्ति किंचन।' (या विश्वब्रह्मांडांत एकमेव ब्रह्मच आहे, नानात्व मुळीच नाही.)

बोलण्याच्या भरांत रात्रीं अकरा वाजून गेले. नंतर जेवण आटोपून स्वामीजी विश्रांति घेण्यासाठी निघून गेले. स्वामीजींना नमस्कार करून शिष्यहि परत निघाला. स्वामीजींनी विचारलें, "उद्या येणार आहेस ना?"

शिष्यः-- येणार आहे यांत काय विचारावयाचें? दिवसभऱ्यांत आपल्याला न पाहिल्यास मन व्याकुळ होतें.

स्वामीजी:-- तर मग आता जा. फार रात्र झाली आहे.

स्वामीजींबद्दल विचार करीत करीत रात्रीं १२ वाजतां शिष्य घरीं परत आला.

---

## अध्याय १३ वा

स्थळ— बेलूर येथील भाडयाने घेतलेला मठ.

वर्ष— इ. स. १८९८.

विषय— मठांतील श्रीरामकृष्णदेवांची जन्मतिथिपूजा-- स्वामीजींद्वारा ब्राह्मणेतर जातीच्या लोकांना यज्ञोपवीत प्रदान-- मठांत श्री. गिरीशचंद्र घोष यांचें स्वागत-- कर्मयोगाने वा परार्थ कर्म केल्याने आत्मदर्शन निश्चित होतें— हा सिद्धांत तर्कयुक्तीद्वारा स्वामीजी समजावून देतात.

ज्या वर्षी स्वामीजी इंग्लंडहून परत आले त्या वर्षी दक्षिणेश्वरीं राणी रासमणीच्या कालीमंदिरांत श्रीरामकृष्णांचा जन्मोत्सव साजरा झाला. पण नानाविध कारणांमुळे त्याच्या पुढील वर्षी दक्षिणेश्वरचा उत्सव बंद झाला. बेलूरला गंगातटाकीं श्रीयुत नीलाम्बर मुखोपाध्याय यांचें उद्यानगृह भाडयाने घेऊन आलमबाजारांतील मठहि तेथे आणण्यांत आला. त्यानंतरच कांही दिवसांनी सध्याच्या मठाची जागा विकत घेण्यांत आली. पण त्या वर्षी जन्मोत्सव मात्र या नवीन जागीं झाला नाही. मठाच्या जागीं अद्यापहि जंगलच होतें; आणि बऱ्याच ठिकाणीं ती जमीन सपाट देखील नव्हती. म्हणून त्या वर्षीचा श्रीरामकृष्ण जन्मोत्सव दाँबाबूंच्या देवघरांत झाला. या उत्सवाचें अगदी आधी फाल्गुन द्वितीयेला नीलाम्बर बाबूंच्या बागेंतच जन्मतिथिपूजा झाली. व जन्मतिथिपूजेनंतर दोन तीन दिवसांनी एका शुभ-मुहूर्तावर श्रीरामकृष्णांची मूर्ति वगैरे सामान मठासाठी विकत घेतलेल्या जागेंत नेऊन पूजा-होमादि विधि करून ठाकुरांची तेथे प्रतिष्ठापना करण्यांत आली. तिथिपूजेसाठी फार मोठ्या प्रमाणावर तयारी करण्यांत आली होती. स्वामीजी वर उल्लेखिलेल्या नीलांबरबाबूंच्या बगीचांतच राहत होते. स्वामीजींच्या आदेशानुसारच

देवघर उत्कृष्ट द्रव्य-सामुग्रीने परिपूर्ण ठेवण्यांत आलें होतें. त्या दिवशीं स्वत: स्वामीजी जातीने फिरून सार्‍या गोष्टींचा बंदोबस्त करीत होते.

तिथिपूजेच्या मंगल प्रात:कालीं सर्वच जण आनंदांत होते. श्रीरामकृष्णांच्या गोष्टींखेरीज इतर कोणतीहि गोष्ट भक्तांच्या तोंडीं नव्हती. देवघरासमोर उभे राहून स्वामीजी आता पूजेची तयारी पाहूं लागले. पूजेच्या सार्‍या तयारीची पाहणी करून झाल्यावर स्वामीजींनी शिष्याला विचारलें, "जानवीं तर आणलीं आहेस ना ?"

शिष्य:-- होय. आपल्या सांगण्याप्रमाणे सारी तयारी आहे. पण इतकीं जानवीं कशाला आणविलींत तें कांही कळत नाही.

स्वामीजी:-- प्रत्येक द्विजातिमात्राला उपनयनाचा अधिकार आहे. या गोष्टीला प्रमाण म्हणजे स्वयं वेदच. आज ठाकुरांच्या जन्मदिवशीं जे सारे येथे येतील त्यांना मी हीं जानवीं घालावयास देणार आहें. हे सारे संस्कारपतित--व्रात्य--झाले आहेत. प्रायश्चित्त घेतल्यावर या व्रात्यांना पुन्हा उपनयनसंस्काराचा अधिकार मिळतो असा शास्त्राधार आहे. आज ठाकुरांचा मंगल जन्मदिवस आहे. त्यांचें नांव घेतल्याने सारेच शुद्ध होतील. म्हणून आज येणार्‍या भक्तमंडळींना मी जानवीं देणार आहे. समजलें ?

शिष्य:-- आपल्या सांगण्याप्रमाणे मी पुष्कळ जानवीं घेऊन आलों आहें. पूजा आटोपल्यानंतर आपल्या अनुमतीने आलेल्या भक्तांना तीं देईन.

स्वामीजी:-- ब्राह्मणेतर भक्तांना हा असा गायत्री मंत्र दे. (येथे स्वामीजींनी क्षत्रियादि द्विजातींना द्यावयाचा गायत्री मंत्र शिष्याला सांगितला.) हळूहळू देशांतील सार्‍याच लोकांना ब्राह्मण पदवीला घेऊन जावयास हवें, ठाकुरांच्या भक्तांबद्दल तर मग

बोलावयासच नको. सारेच हिंदु परस्परांचे बंधु होत. 'शिवूं नका. शिवूं नका,' असें म्हणून म्हणून आपणच त्यांना हीन करून टाकलें आहे. याचमुळे तर सारा देश हीनता, भीरुता, मूर्खपणा आणि वीर्यहीनतेच्या अगदी चरमसीमेला जाऊन पोहोचला आहे. त्या साऱ्यांना सांगावयास हवें, 'तुम्हीहि आमच्यासारखींच माणसें आहांत. तुम्हांलाहि आमच्यासारखेच अधिकार आहेत.' आलें ना लक्षांत मी काय म्हणतों तें ?

शिष्य:— होय महाराज.

स्वामीजी:-- आता जे लोक यज्ञोपवीताचा स्वीकार करण्यासाठी येतील, त्यांना आधी गंगास्नान करून यावयास सांगा. नंतर ठाकुरांना प्रणाम केल्यावर त्यांना ही जानवीं घालावयास दे.

स्वामीजींच्या आज्ञेनुसार आलेल्या भक्तांपैकी जवळपास चाळीस पन्नास लोकांनी गंगास्नान करून आल्यावर शिष्यापासून गायत्री मंत्र घेतला, व ते जानवीं घालूं लागले. साऱ्या मठांत मोठी गडबड मचली. जानवी घातल्यानंतर त्या भक्तमंडळींनी ठाकुरांना व स्वामीजींना वंदन केलें. त्यांना पाहून स्वामीजींचें मुखकमल शतगुणांनी प्रफुल्ल झालें. नंतर थोड्याच वेळाने गिरीशचंद्र घोष हेहि मठांत येऊन हजर झाले.

आता गाण्याची तयारी सुरू झाली. मठांतील मंडळींनी आज स्वामीजींना अगदी इच्छेप्रमाणे सजवायचें ठरविलें होतें. त्यांच्या कानांत शंखांची कुंडलें, सर्वांगावर भस्माचे कर्पूरधवल पट्टे, माथ्यावर आपादलंबित जटाजूट, डाव्या हातीं त्रिशूळ, दोन्ही हातीं रुद्राक्षमाला, गळ्यांत पायापर्यंत लोंबणारी तिपेडी रुद्राक्षमाळ वगैरे गोष्टींनी स्वामीजींचें शरीर विभूषित करण्यांत आलें. या साऱ्यांमुळे स्वामीजींच्या रूपाला जी अवर्णनीय शोभा आली ती सांगून संपण्या-समजण्यासारखी नाही. त्या दिवशींचें त्यांचें

रूप ज्यांनी ज्यांनी पाहिलें त्या साऱ्यांनी स्वामीजींच्या रूपाने जणु साक्षात् कालभैरवच अवतीर्ण झालेसें वाटतें असें एकमुखाने म्हटलें. स्वामीजींनीहि बाकी सर्वांच्या अंगाला भस्म लावून दिलें. त्या साऱ्यांनी चोहोबाजूंनी स्वामीजींना भैरवगणांप्रमाणे घेरून टाकून साऱ्या मठाला कैलासाची शोभा आणली ! त्या दृश्याच्या नुसत्या स्मरणाने आजहि देखील मन आनंदित होतें.

आता पश्चिमास्य होऊन मुक्तपद्मासनावर आरूढ झालेल्या स्वामीजींनी 'कूजन्तं रामरामेति' हें स्तवन अत्यंत मृदुमधुर स्वरांत म्हणावयास सुरवात केली. स्तवाच्या शेवटीं 'राम राम श्री राम राम' हा मंत्र ते उच्चारूं लागले. अक्षराअक्षरामधून जणु अमृतधारा स्त्रवत होत्या. स्वामीजींचे नेत्र किंचित् मिटलेले--हाताने तंबोऱ्याच्या तारा छेडताहेत. 'राम राम श्री राम राम' या मंत्रध्वनीशिवाय मठांत कांही वेळपर्यंत दुसरा शब्दच ऐकूं येत नव्हता. अर्धा तास असा निघून गेला, तरीहि कुणी अन्य कांहीच बोलत नव्हते. स्वामीजींच्या कंठांतून निघालेली रामनाम-सुधा प्राशन करून सारेजण जणु उन्मत्त झाले होते. खरोखरच का आज स्वामीजी शिवभावाने तन्मय होऊन रामनाम गात आहेत ?--असा एक विचार शिष्याच्या मनांत आला. स्वामीजींची स्वाभाविक गंभीरता आज शतगुणांनी वर्धित झाली होती. अर्धनिमीलित नयनांतून बालार्काची प्रभा जणु ओसंडून बाहेर येत होती, आणि गंभीर उन्मादनेच्या भरांत त्यांचें सारें पुष्ट शरीर डुलत होतें. तें रूप वर्णन करतां येण्यासारखें नाही, समजावून सांगतां येणें शक्य नाही. तो म्हणजे एक अनुभवाचाच विषय. सारे प्रेक्षक अगदी चित्राप्रमाणे तटस्थ झाले होते.

रामनामसंकीर्तन संपल्यावर पूर्ववत् तंद्रेंतच स्वामीजी गाऊं लागले, 'सीतापति रामचंद्र रघुपति रघुराई.' साथीदार चांगला

नव्हता म्हणून स्वामीजींचा विरस होऊं लागला. मग स्वामी सारदानंदांना गावयाला सांगून ते स्वतः पखवाज वाजवावयाला बसले. 'एक रूप अरूप नाम वरण' हें गाणें सुरवातीला स्वामी सारदानंदांनी गायला सुरवात केली. मृदंगाच्या स्निग्धगंभीर ध्वनीने गंगा जणु उचंबळून येत होती; स्वामी सारदानंदांच्या सुमधुर आलापांनी सारी बैठक भरून गेली. नंतर श्रीरामकृष्ण जीं गाणीं गात तीं क्रमाने म्हणावयास सुरवात झाली.

यानंतर स्वामीजींनी एकदमच आपली सारी वेषभूषा उतरून टाकून तिनेच गिरीशचंद्रांना सजवावयास सुरवात केली. आपल्या हातांनीच त्यांनी गिरीशचंद्रांच्या विशाल देहाला भस्म चर्चिलें, व कानीं कुंडलें, माथीं जटासंभार, हातीं व गळचांत रुद्राक्षमाला घालून द्यावयास सुरवात केली. या साऱ्या आभूषणांनी गिरीशबाबूंचें तर जणु रूपान्तरच झालें. त्यांचें तें रूपांतर पाहून सारे जण निःशब्द होऊन गेले. मग स्वामीजीच म्हणाले, "श्रीरामकृष्ण म्हणत की हे भैरवाचा अवतार. आमच्यांत यांच्यांत कांहीच भेद नाही." एक शब्दहि न बोलतां गिरीशबाबू स्वस्थ बसून होते. त्यांच्या संन्यासी गुरुबंधूंना त्यांना जसें सजवावेसें वाटलें तसें त्यांनी स्वतःला सजवूं दिलें. अखेर एक भगवें वस्त्र आणवून तें गिरीशबाबूंना नेसावयास देण्यांत आलें. गिरीशबाबूंनी कांहीहि हरकत घेतली नाही. आपल्या गुरुबंधूंच्या हातीं जणु त्यांनी आपलें शरीर सोपवून दिलें होतें. हें सारें आटोपल्यावर स्वामीजी म्हणाले, "जी. सी., तुम्ही आज आम्हांला ठाकुरांबद्दल कांहीतरी सांगा. (सर्वांना उद्देशून) तुम्ही यांचें बोलणें आता अगदी लक्षपूर्वक ऐका." तरीहि गिरीशबाबूंनी तोंडून एक शब्दहि काढला नाही. ज्यांच्या जन्मोत्सवासाठी आज सारेजण जमले होते त्यांच्या लीलादर्शनाने व त्यांच्याच सहचरगणांचा आनंद पाहून

ते आनंदाने अगदीं जडवत् होऊन गेले होते. अखेर ते म्हणाले, "दयामय ठाकुरांबद्दल मी तें काय सांगणार आहें? तुमच्या-सारख्या कामकांचनत्यागी बालसंन्याशांसह बरोबरीच्या नात्याने बसायचा अधिकार त्यांनी या माझ्यासारख्या अधमाला दिला यांतच त्यांच्या अपार करुणेचा प्रत्यय येतो." हें सांगतां सांगतांच त्यांचा गळा भावनावेगाने दाटून आला व त्या दिवशीं ते यापरतें विशेष कांहीच बोलूं शकले नाही.

मग स्वामीजींनी 'प्रभु मेरे अवगुण चित न धरो' वगैरे कांही हिंदी गाणीं गायिलीं. शिष्याचें संगीतज्ञान होतें शून्य, त्यामुळे तो फक्त स्वामीजींच्या मुखमंडलाकडे अनिमेष नेत्रांनी पाहत राहिला. पूजा संपल्यानंतर सान्यांना प्रसादग्रहणासाठी बोलाविण्यांत आलें. प्रसाद घेणें आटोपल्यावर स्वामीजी खालच्या बैठकींत येऊन बसले. आलेले भक्तहि त्यांच्याभोवती जमा झाले. नव्यानेच यज्ञोपवीत धारण केलेल्या एका गृहस्थाला उद्देशून ते म्हणाले, "तुम्ही सारे आहांत द्विजाति, पण दीर्घ कालापासून झालां आहांत 'व्रात्य.' आजपासून पुन्हा तुम्ही द्विजातींत आलांत. आता दिवसांतून निदान शंभरदा तरी गायत्रीमंत्राचा जप करीत जा. राहील ध्यानांत?" 'होय' म्हणून त्याने स्वामीजींची आज्ञा शिरसामान्य केली. इतक्यांत महेन्द्रनाथ गुप्त *--मास्तर महाशय--तेथे आले. स्वामीजींनी मोठ्या प्रेमादराने त्यांचें स्वागत केलें. प्रणाम करून महेन्द्रबाबू एका कोपऱ्यांत उभे होते. बसा म्हणून वारंवार स्वामीजींनी सांगितल्यावर ते तेथेच एका बाजूला बसले.

स्वामीजी:-- मास्तर महाशय, आज ठाकुरांचा जन्मदिवस. आपण आज आम्हांला त्यांच्यासंबंधी कांही तरी सांगा

---

* श्रीरामकृष्ण-वचनामृत या ग्रंथाचे कर्ते--मास्तर महाशय--'एम्'.

मास्तर महाशय नतमस्तक होऊन मृदु हास्य करीत स्वस्थ बसले. अगदी याच वेळीं मुर्शिदाबादहून स्वामी अखंडानंद जवळ जवळ १॥ मण वजनाचे दोनच प्रचंड गुलाबजाम (पांतोआ) घेऊन आल्याचें कळलें. ते दोन प्रचंड गुलाबजाम पाहण्यासाठी साऱ्यांची धांवपळ उडाली. स्वामीजींना दाखवून झाल्यावर ते देवघरांत नेऊन ठेवण्यांत आले.

स्वामी अखंडानंदांना अनुलक्षून स्वामीजी शिष्याला म्हणाले, "पाहिलेंस, कसा कर्मवीर आहे हा ? कष्ट, मृत्यु कशाचीच पर्वा नाही. अगदी एकनिष्ठ चित्ताने कर्म करीत असतो 'बहुजनसुखाय, बहुजनहिताय--'

शिष्य:-- किती तपश्चर्येच्या बळाने त्यांच्यांत ही शक्ति आली आहे !

स्वामीजी:— तपस्येचें फळ म्हणून ही शक्ति लाभते हें खरेंच आहे. पण परहितार्थ कर्म केलें की तपस्या केल्यासारखेंच आहे. कर्मयोगी कर्मालाच तपस्येचें एक अंग मानतात. तपस्या करतां करतां परहितेच्छा प्रबळ होऊन साधकाला जशी कर्म करावयास लावते, तसेंच परहितार्थ कर्म करतां करतां तपस्येचें फळ जें चित्तशुद्धि व परमात्मदर्शन त्यांचा लाभ होतो.

शिष्य:— पण अगदी सुरवातीपासून प्राण पणाला लावून परहितार्थ कर्म करणें किती जणांना साधतें ? जिच्या बळावर स्वसुखेच्छेचा बळी देऊन परार्थ जीवन वेचतां येईल अशी मनाची उदारता येईलच कशी ?

स्वामीजी:-- आणि तपस्या करण्याचें तरी किती लोकांच्या मनांत येतें ? कामकांचनाचें प्रबळ आकर्षण असल्याने भगवान-लाभाची आकांक्षा तरी किती जणांच्या मनांत उत्पन्न होते ? तपस्या जितकी कठीण--निष्काम कर्महि तितकेंच कठीण. म्हणून

परहितार्थ कर्म करण्याला जे उद्युक्त होतात त्यांच्या विरुद्ध बोलण्याचा तुला अधिकार नाही. तुला तपस्या आवडते, ती तूं कर; पण दुसऱ्या कुणाला जर कर्म आवडत असेल तर त्याचा निषेध करण्याचा तुला काय अधिकार ? तूं धरून चलतो आहेस की कर्म म्हणजे तपस्या नव्हे.

शिष्य:-- होय महाराज, अगदी या क्षणापावेतों तपस्येबद्दल माझी वेगळीच कल्पना होती.

स्वामीजी:-- अभ्यासपूर्वक साधनभजन केल्याने क्रमाने जशी दृढता उत्पन्न होते त्याचप्रमाणे सुरवातीला अनिच्छेने का होईना पण निष्काम कर्म आरंभिल्यास आपोआप हृदय त्यांत मग्न होऊं लागतें. मगच हळूहळू परहितार्थ कर्म करण्याची प्रवृत्ति होते. कळलें ? अनिच्छेने का होईना, एकदा परसेवा करून पाहा ना तपस्येचें फळ मिळतें की नाही तें. परहितार्थ केलेल्या कर्माने मनाची सारी स्वार्थी वक्रता नष्ट होते व मग माणूस निष्कपट मनाने परहितार्थ प्राणहि वेचावयास हळूहळू सज्ज होतो.

शिष्य:-- पण परहित साधण्याची, मी म्हणतों, मुळांत आवश्यकताच काय ?

स्वामीजी:-- स्वहित साधण्यासाठी. अहंकाराने ज्या देहाचा आपण अभिमान बाळगतों तो हा आपला देह आपण परहितार्थ अर्पण करीत आहोंत या विचाराने त्या अहंकाराचाहि विसर पडतो, व अखेर विदेहबुद्धीचा उदय होतो. ज्या प्रमाणांत एकाग्र मनाने परहितचिंतन करशील त्या प्रमाणांत स्वार्थी ममत्व बुद्धि तूं विसरशील. अशा निष्काम कर्माने हळूहळू जेव्हा चित्तशुद्धि होईल, तेव्हा तुझाच आत्मा सर्व जीवांचे ठिकाणीं, सर्व वस्तुजाताचे ठिकाणीं व्यापून भरला आहे हें तत्त्व तूं अनुभवशील. म्हणूनच परहितसाधन हा आहे आत्मविकासाचा एक उपाय,

एक मार्ग. हीहि एक ईश्वरसाधनाच आहे हें लक्षांत ठेव. याहि साधनेचा हेतु आहे आत्मविकास. ज्ञान, भक्ति वगैरे साधनांनी ज्याप्रमाणे आत्मविकास होतो त्याचप्रमाणे परहितार्थ कर्म केल्यानेहि तो होतो.

शिष्य:— पण मी जर दिवसरात्र दुसऱ्यांबद्दल विचार करूं लागलों तर आत्मचिंतन केव्हा करूं? कोणत्याहि एका विशेष भावाचें चिंतन सतत करूं लागल्यास त्या भावातीत, अविषय आत्म्याचा साक्षात्कार होणार कसा?

स्वामीजी:— आत्मज्ञानलाभ हाच साऱ्या साधनांचा, साऱ्या मार्गांचा हेतु आहे. सेवापरायण झाल्याने चित्तशुद्धि होऊन सर्वांनाच जर तूं आत्मवत् दृष्टीने पाहूं शकलास तर आत्मदर्शन व्हायला बाकी तें काय राहिलें? आत्मदर्शन होणें म्हणजे तुझ्या मतें काय या भिंतीप्रमाणे किंवा एखाद्या लाकडाच्या ओंडक्या-प्रमाणे निश्चेष्ट होऊन जडवत् पडून राहणें का आहे?

शिष्य:— तसें जरी नसलें तरी सर्ववृत्तींच्या व कर्मप्रवृत्तींच्या निरोधनालाच तर शास्त्राने आत्म्याचें स्वस्वरूपावस्थान म्हटलें आहे.

स्वामीजी:— शास्त्रांत समाधि म्हणून जी अवस्था सांगितली आहे, ती तर कांही इतक्या सहज रीतीने लाभणें शक्य नाही. आणि समजा ती यदाकदाचित् कोणाला लाभलीच, तर फार काळ टिकणें शक्य नाही. अशा वेळीं तो कशाच्या आधाराने जीवन व्यतीत करणार? म्हणून ही शास्त्रोक्त अवस्था लाभल्या-नंतर साधक भूतमात्रांचे ठिकाणीं आत्मदर्शन करून अभिन्न ज्ञानाने सेवापरायण होऊन प्रारब्ध कर्माचा क्षय करतात. शास्त्र-कारांनी या अवस्थेलाच जीवन्मुक्ति म्हणून संबोधिलें आहे.

शिष्य:— याचा तर अर्थ हा झाला की जीवन्मुक्ति लाभेपर्यंत परहितार्थ कर्म करतां येणें शक्य नाही.

स्वामीजी:-- शास्त्रांत ही गोष्ट सांगितली आहे. पण शास्त्रांत हेंहि सांगितलें आहे की परसेवातत्पर होत होतच साधकाला जीवन्मुक्ति अवस्था प्राप्त होते. एरव्ही कर्मयोगाचा एक वेगळा साधनमार्ग म्हणून उपदेश करण्याचें शास्त्रांना कांही प्रयोजन नव्हतें.

स्वामीजींचा मुद्दा लक्षांत आल्याने शिष्य चुप बसला. स्वामीजींनीहि हा मुद्दा सोडून देऊन आपल्या किन्नरमधुर कंठाने श्रीरामकृष्णांच्या जन्माला उद्देशून एक गाणें गावयास सुरवात केली.

गिरीशबाबू व इतरहि भक्तांनी त्यांच्याबरोबर हें गाणें म्हणावयास सुरवात केली. 'अवनीतल त्रस्त झाल्याचें पाहून करुणाकातर होऊन हा आला की काय?' हें गाणें पुन:पुन: गाइलें जात होतें. नंतर 'माझ्या मन-भ्रमरा कालीपद-नील-कमलाचे ठायीं मत्त हो,' 'अगणित भुवनभारधारी--' इत्यादि पदें गाऊन झाल्यावर तिथिपूजेच्या नियमानुसार एक जिवन्त मासा वाजत गाजत नेऊन गंगेच्या पाण्यांत सोडून देण्यांत आला. अखेर प्रसादग्रहण करण्यासाठी भक्तांत खूप गडबड उडाली.

# अध्याय १४ वा

**स्थळ-- बेलूर येथील भाड्याने घेतलेली मठाची जागा.**

**वर्ष-- इ. स. १८९८.**

**विषय**-- मठाच्या नवीन जागेंत ठाकुरांची स्थापना-- आचार्य शंकरांची अनुदारता-- बौद्धधर्माच्या पतनाच्या कारणाचा निर्देश-- तीर्थ-माहात्म्य-- 'रथे च वामनं दृष्ट्वा—' या श्लोकाचा अर्थ--भावाभावाच्या अतीत ईश्वर-स्वरूपाची उपासना.

आज नवीन जागीं होम करून स्वामीजींनी ठाकुरांची स्थापना केली. आदल्या रात्रीपासूनच शिष्य मठांत आहे. श्रीरामकृष्णांची स्थापना पाहावयास सापडावी हीच इच्छा मठांत राहण्याचें कारण.

प्रातःकालीं गंगास्नान आटोपून स्वामीजींनी देवघरांत प्रवेश केला. नंतर पूजकाच्या आसनावर बसून परडींत जेवढीं म्हणून बेल-फुलें होतीं तेवढीं सारीं एकदमच ओंजळींत घेऊन श्रीरामकृष्ण-पादपद्मीं त्यांनी अर्घ्य प्रदान केला व ते गभीर ध्यानांत मग्न झाले. काय अपूर्व दृश्य होतें तें! त्यांच्या धर्मप्रभामंडित स्निग्धोज्ज्वल कांतीने सारें मंदिर एका अलौकिक तेजाने भरून गेलें होतें. स्वामी प्रेमानंद वगैरे मंडळी देवघराच्या दाराशीं बाहेरच उभी होती.

ध्यान व पूजा संपल्यानंतर आता मठाच्या नवीन जागीं जाण्याची तयारी सुरू झाली. श्रीरामकृष्णांचे अस्थिभस्मावशेष जपून ठेवलेलें ताम्रपात्र उजव्या हातीं घेऊन स्वामीजी पुढे निघाले. इतर संन्यासीमंडळींबरोबरच शिष्य त्यांच्या मागून निघाला. शंखघंटादिकांच्या आवाजांनी सारी तटभूमि निनादली आणि गंगा जणु त्या तालावर नृत्य करूं लागली. जात असतां रस्त्यांत स्वामीजी शिष्याला सांगत होते, "ठाकुरांनी मला सांगितलें होतें, 'तूं खांद्यावरून नेऊन मला जेथे ठेवशील तेथे मी राहीन--

मग तूं मला झाडाखाली ठेव की झोपडींत ठेव--' म्हणूनच आज मी स्वत: त्यांना माझ्या माथीं वाहून नवीन मठभूमीकडे नेत आहें. तूं हें निश्चित लक्षांत ठेव की दीर्घकालपर्यंत 'बहुजन-हिताय' ठाकुर या जागीं अवस्थान करतील."

शिष्य:-- ठाकुरांनी हें आपल्याला केव्हा सांगितलें होतें ?

स्वामीजी:-- ( मठांतील साधूंकडे अंगुलिनिर्देश करून ) यांच्या तोंडून तें तूं ऐकलें नाहीस ? काशीपूरबागेंत त्यांनी मला हें सांगितलें होतें.

शिष्य:-- हो हो--आणि तेव्हाच मला वाटतें त्यांच्या सेवेचा अधिकार कुणाकडे असावा या मुद्यावर त्यांच्या संन्यासी व गृहस्थ-भक्तांत वाद उत्पन्न होऊन दोन तट पटले होते.

स्वामीजी:-- अगदी दोन तटच पडले होते अशांतला भाग नाही, पण कांही गैरसमज झाला होता इतकेंच. जे रामकृष्णांचे भक्त, ज्यांना त्यांची यथार्थ कृपा लाभली आहे, मग ते गृहस्थ असोत वा संन्यासी असोत, त्यांच्यांत हे तटफट असण्याचें मुळी कांही कारणच नाही—असणें शक्यच नाही हें तूं पक्कें ध्यानांत ठेव. मग त्या थोडयाफार तरी गैरसमजाचें कारण काय, माहीत आहे ? ठाकुरांचा प्रत्येक भक्त त्यांना आपल्या बुद्धीच्या रंगाने रंगवतो--प्रत्येक जण त्यांना आपल्या दृष्टिकोनांतून पाहतो--समजावून घेतो. ते जणु महासूर्य आणि आपल्यापैकी प्रत्येकच जण जणु एकेका रंगीत कांचेंतून त्याकडे पाहतो व तो सूर्य अमक्या ह्याच रंगाचा असें म्हणतो. अर्थात् हें तर खरेंच की यांतूनच पुढे नाना पंथोपपंथ उत्पन्न होतात. तरीहि महाभाग्याने अवतारपुरुषांचा प्रत्यक्ष सहवास ज्यांना लाभला असतो ते असे-पावेतों हे पंथोपपंथ निर्माण होत नाहीत. त्या आत्माराम पुरुषाच्या दिव्य तेजाने त्यांचे डोळे दिपून गेलेले असतात--अहंकार,

अभिमान, हीन बुद्धि यांना वावच नसतो. त्यामुळे असले पंथभेद करायला त्यांना सवडच होत नाही. प्रत्येक जण आपल्या आंतरिक भावनेने त्यांची पूजा करीत असतो.

शिष्यः-- महाराज, अवताराच्या साऱ्या भक्तांनी त्यांना भगवान् मानल्यानंतरहि ते त्या एकाच भगवानाला भिन्न भिन्न भावांनी पाहतात व म्हणूनच संकुचित दृष्टीमुळे त्या शिष्य-प्रशिष्यांत पुढे लहानमोठे पंथोपपंथ होतात असेंच ना?

स्वामीजीः— यामुळे कालांतराने संप्रदाय हे होणारच. हेंच पाहा ना--चैतन्यदेवांच्या भक्तांतच आता दोन तीनशे संप्रदाय झाले आहेत. येशूंच्या अनुयायांत तर हजारो भेद आहेत. पण हे सारे उपपंथ व संप्रदाय चैतन्यांना व येशूंना मानतातच.

शिष्यः-- श्रीरामकृष्णांच्या भक्तांमध्येहि कालांतराने असे पंथभेद पडतील, नाही?

स्वामीजीः-- तें तर होणारच. तरी आता आम्ही हा जो मठ बांधतों आहोंत त्यांत ह्या साऱ्या मतमतान्तरांचा विरोध शमेल. ठाकुरांच्या उदार समन्वयमतांचा हें स्थल केंद्रस्थान होईल. येथून महासमन्वयाचीं जीं तेजस्वी प्रकाशकिरणें निघतील त्यांनी सारें जग उजळून निघेल.

हें बोलणें होत असतांच सर्वजण मठाच्या जागीं येऊन पोहोचले. स्वामीजींनी माथीं वाहून आणलेलें तें ताम्रपात्र जमिनीवर आंथरलेल्या विस्तीर्ण आसनावर ठेवून त्याला प्रणाम केला. साऱ्या उपस्थित जनांनीहि त्या पावन अस्थिकुंभाला वंदन केलें.

नंतर स्वामीजी पुन्हा पूजेला बसले. त्यांनी पूजा संपल्यावर यज्ञाग्नि प्रज्वलित करून होम केला व संन्यासी गुरुबंधूंच्या मदतीने स्वहस्तें पायस (खीर) तयार करून त्याचा ठाकुरांना नैवेद्य दाखविला. असें स्मरतें की याच दिवशीं याच जागीं त्यांनी

कांही गृहस्थांना मंत्र-दीक्षाहि दिली. तें असो. पूजा संपल्यावर मोठ्या आदराने उपस्थित मंडळींना उद्देशन स्वामीजी म्हणाले, "आपण सारे आज कायामनोवाचेंकरून युगावतार ठाकुरांच्या पादपद्मीं प्रार्थना करूं की ते आजपासून सुदीर्घकालपर्यंत बहुजन-हिताय बहुजनसुखाय या पावन जागीं अधिवास करून या स्थानाला सर्वधर्मांच्या अपूर्व समन्वय-केन्द्रांत परिणत करोत." साऱ्यांनी तदनुसार प्रार्थना केली. पूजा संपल्यावर शिष्याला बोलावून आणून स्वामीजी म्हणाले, "आज आम्हीं ठाकुरांना येथे आणून बसविलें आहे, त्यांना येथून हलविण्याचा आज आम्हांपैकी कुणालाहि अधिकार नाही. म्हणून तूं आज हा ताम्र-कुंभ माथीं घेऊन नीलांबरबाबूंच्या बागेंत नेऊन ठेव." त्या कुंभाला स्पर्शहि करण्यास शिष्य मागेपुढे पाहतो आहे हें लक्षांत येतांच स्वामीजी म्हणाले, 'भिऊं नकोस, माझीच आज्ञा आहे तुला तो नेण्याबद्दल.' मग मात्र मोठ्या हृष्ट चित्ताने गुरुआज्ञे-नुसार शिष्याने तो ताम्रकुंभ शिरावर घेतला व श्रीगुरूंच्या कृपेनेच त्या पावनतम अस्थिकुंभाला स्पर्श करण्याचा अधिकार लाभला म्हणून स्वतःला धन्य मानून तो पुढे निघाला. मागे स्वामीजी व त्यांच्या मागून अन्य भक्तमंडळी येत होती. रस्त्यांत स्वामीजी शिष्याला म्हणाले, "ठाकुर आज तुझ्या मस्तकीं अवस्थान करून तुला आशीर्वाद देत आहेत. यापुढे आता सावधान राहा. कोणत्याहि अनित्य वस्तूच्या ठिकाणीं मन गुंतून पडूं देऊं नकोस." रस्त्यांतला एक लहानसा पूल ओलांडून जाण्यापूर्वी स्वामीजी पुन्हा एकवार म्हणाले, 'पाहा, सांभाळ. आता अत्यंत सावधगिरीने चालावयास हवें !'

अशा रीतीने निर्विघ्नपणें मठांत येऊन पोहोचल्यावर साऱ्यां-नाच आनंद झाला. गोष्टींच्या ओघांत स्वामीजी शिष्याला

म्हणाले, ‘ठाकुरांच्या इच्छेने त्यांची आज धर्मक्षेत्रीं स्थापना झाली. बारा वर्षें सतत मीं माथीं वाहिलेल्या चिंतेचा भार आज उतरला. माझ्या मनांत आज काय येतें ठाऊक आहे ? हा मठ होईल विद्या व साधना यांचें केंद्रस्थान. तुमच्यासारखी गृहस्थ-मंडळी या मठाचे भोवताली घरें करून राहतील, आणि मध्यभागीं राहतील त्यागी संन्यासी. मठाच्या या दक्षिणेकडील भागीं इंग्लंड-अमेरिकेंतील भक्तांचीं राहतीं घरेंदारें असतील. असें जर वास्तवांत उतरलें तर कसें दिसेल सांग पाहूं ?

शिष्य:— ही तर एक अद्‌भुत कल्पना आहे आपली.

स्वामीजी:-- कल्पना काय म्हणतोस नुसती ? यथाकाल पाहशील, या साऱ्या गोष्टी होतील. मी तर नुसता पाया घातला आहे. थोडेंफार मी उरकून जाईन. बाकी साऱ्या गोष्टी तुमच्या हातीं सोपवीन. त्या तुम्ही पुढे प्रत्यक्षांत आणा. मोठें तत्त्व नुसतें ऐकून ठेवल्याने काय होणार ? तें प्रत्यक्ष कृतींत उतरवायला हवें. शास्त्रांतील मोठमोठ्या गोष्टी वाचून नुसत्या ठेवून दिल्याने काय होणार ? त्या साऱ्या गोष्टी आधी नीट समजावून घ्यावयास हव्यात व मग त्यांचें प्रत्यक्षांत आचरण करावयास हवें. समजलें ? यालाच म्हणतात व्यवहार्य धर्म.

गोष्टींच्या भरांत शंकराचार्यांबद्दल बोलणें निघालें. शिष्य शंकराचार्यांचा खूपच अभिमानी होता; त्यांच्या बाबतींत त्याला एकांगी म्हटलें तरी चालण्यासारखें होतें. आचार्यप्रणीत अद्वैत-मताला तो तत्त्वज्ञानाचा मुकुटमणि मानी व आचार्यमतांवर कुणीं दोषारोप केल्यास त्याच्या हृदयाला जणु सर्पदंश झाल्यागत वेदना होत. स्वामीजींना हें माहीत होतें व असला आंधळेपणा कोणाचाहि व कुणाच्याहि बाबतींत असणें त्यांना पसंत नसे. कुणाचाहि कोणत्याहि बाबतींत आंधळेपणा पाहिला की ते त्या-

विरुद्ध बाजू घेत व आपल्या आश्चर्यकारक व अमोघ तर्क-बुद्धीने त्याच्या या आंधळेपणाचे संकुचित बांध छिन्नविच्छिन्न करून टाकीत.

स्वामीजी:— शंकरांची बुद्धि वस्तऱ्याच्या धारेप्रमाणे तीक्ष्ण होती. ते खूप बुद्धिमान-विचारी होते, पंडित होते; पण त्यांची उदारमतवादिता तेवढी सखोल नव्हती. त्यांचे हृदयहि तसेंच असावेंसें वाटतें. ब्राह्मण्याचा त्यांचा अभिमानहि खूप होता, एखाद्या दक्षिणी भटजीचा असावा तसाच म्हणा ना ! (एक दक्षिणी भटजी तर ते होतेच ना ! ) ब्राह्मणेतर जातींना ब्रह्मज्ञान होणार नाही ही गोष्ट वेदान्तसूत्र-भाष्यांत काय ठामपणें मांडली आहे त्यांनी ! हें सिद्ध करायला दिलेलीं कारणें तर विचारायलाच नकोत. विदुराचा उल्लेख करून त्यांनी लिहिलें आहे की त्यांना ब्रह्मज्ञान झालें, कारण पूर्वजन्मीं ते ब्राह्मण होते ! मी विचारतों, आज जर अशाप्रकारें एखाद्या शूद्राला ब्रह्मज्ञान झालें तर तुझ्या शंकराच्या मताप्रमाणे मत देऊन असें म्हणावें का की पूर्वजन्मीं तो ब्राह्मण होता म्हणूनच झालें त्याला ब्रह्मज्ञान ? ब्राह्मण्याची ही ओढाताण करायची गरजच काय रे बाबा आज ? वेदांनी तर प्रत्येक त्रैवर्णिकाला वेदपठणाचा व ब्रह्मज्ञानाचा अधिकार दिला आहे. शंकराचार्यांना हा विषय घेऊन वेदांच्या बाबतींत इतकें ज्ञान प्रकट करायची वास्तविक पाहतां कांही गरज नव्हती. आणि हृदयाची उदारता तर अशी की वादांत हरवून किती तरी बुद्ध श्रमणांना त्यांनी जाळून मारलें. आणि त्या बौद्ध श्रमणांच्या अकलेची तरी शर्थच की नाही ? वादांत हरले म्हणून त्यांनी स्वत:ला जाळून घेतलें ! शंकरांच्या या कार्याला, मतांधतेखेरीज दुसरें काय नांव देतां येईल ? याउलट बुद्धदेवांच्या हृदयाची श्रीमंती पाहा— ‘बहुजनहिताय बहुजन

सुखाय'ची तर गोष्ट राहोच, सामान्य एखाद्या बकऱ्याचा जीव वांचविण्यासाठी देखील आपले प्राण खर्ची घालायची त्यांची सदा तयारी असायची. काय त्यांची ही उदारता! केवढी ही दया!

शिष्य:— बुद्धदेवांच्या या दयेला अन्य दृष्टीने काय वेडपट मतांधता ठरवतां येणार नाही? काय तर म्हणे एखाद्या पशूसाठी आपली मान कापून घ्यायला निघाले!

स्वामीजी:-- पण त्यांच्या या वेडपट मतांधतेने जगाचें केवढें कल्याण झालें तें पाहाना एकदा? किती आश्रम बांधण्यांत आले, किती शाळा-विद्यालयें स्थापन करण्यांत आलीं, किती सार्वजनिक दवाखाने, पशु-संरक्षण संग्रहालयें अस्तित्वांत आलीं, स्थापत्य, शिल्पादि विद्यांचा केवढा विकास झाला ह्याचा तर एकदा विचार कर? बुद्धदेवांच्या पूर्वी होतें तरी काय या देशांत? भूर्जपत्रांवर लिहून बांधून ठेवलेल्या पोथ्यांतील कांही धर्मतत्त्वें!-- अन् तींहि सारीं निवडक मूठभर लोकांनाच फक्त काय तीं माहीत असलेलीं. बुद्धदेवांनी तीं तत्त्वें व्यवहारांत उतरविलीं, लोकांनी दैनंदिन जीवनांत तीं कशीं उतरवायचीं तें त्यांना दाखवून दिलें. एका अर्थी तर तेच वेदान्ताची उज्ज्वल मूर्ति होते.

शिष्य:-- पण महाराज, वर्णाश्रमधर्म मोडून भारतांत हिंदुधर्मांत गोंधळहि त्यांनीच उत्पन्न केला. म्हणूनच त्यांच्या धर्माची भारतांतून हकालपट्टी झाली ही गोष्ट खरी वाटते.

स्वामीजी:-- बुद्धधर्माची ही अवदशा त्यांच्या शिकवणीमुळे झाली नाही, ती झाली त्यांच्या अनुयायांच्या दोषांमुळे. तत्त्वज्ञानाचा अत्यधिक विचार करकरून ते तर्ककर्कश झाले व त्यांची उदार सहृदयता लोपली. नंतर वामाचारांतील व्यभिचाराने

त्या धर्मांत प्रवेश केला, व अखेर त्यामुळे बौद्धधर्म गारद झाला. तसल्या प्रकारचा बीभत्स वामाचार आजच्या कुठल्याहि तंत्रांतून आढळणार नाही ! जगन्नाथक्षेत्र हें बौद्धधर्माचें एक प्रधान केंद्र होतें, त्या मंदिरशिखरांवर काढलेलीं व खोदलेलीं बीभत्स चित्रें एकदा जाऊन पाहून आल्यास मी म्हणतों ती गोष्ट उमजेल तुला. जगन्नाथाचें हें पुरुषोत्तम क्षेत्र रामानुज व चैतन्य यांच्या वेळेपासून वैष्णवांच्या आधिपत्याखाली आलें. त्यांच्यासारख्या महापुरुषांच्या प्रभावाने आज त्या क्षेत्राला एक नवीनच घाट आला आहे.

शिष्यः— शास्त्रांत नाना प्रकारचें तीर्थस्थान-माहात्म्य सांगितलेलें आढळतें. तें कितपत सत्य असतें ?

स्वामीजीः-- सारें ब्रह्माण्डच जर नित्य आत्मा जो ईश्वर त्याचें विराट स्वरूप आहे तर असलें स्थानमाहात्म्य असतें यांत आश्चर्य तें काय ? विशेष जागीं कोठे स्वयंभू रीतीने तर कोठे शुद्धसत्त्व साधकांच्या व्याकुळ आवाहनाने भगवानाचा आविर्भाव होत असतो. साधारण माणूस व्याकुळ भावाने जर अशा जागीं गेला तर त्याला सहजच लवकर सिद्धिलाभ होतो. म्हणूनच तीर्थादिस्थानांचा आश्रय घेतल्यास कालान्तराने आत्मविकास होऊं शकतो. पण हें मात्र पक्कें लक्षांत ठेव की या मानवदेहासारखें श्रेष्ठ तीर्थस्थान अन्य कोणतेंहि नाही. या नरदेहक्षेत्रीं आत्म्याचा जसा विकास होतो तसा इतरत्र कोठेहि होत नाही. हा जगन्नाथाचा रथ तरी काय ? तो म्हणजे या नरदेहरथाचेंच एक स्थूल प्रतीक मात्र होय. या देहरथांतच आत्मदर्शन घ्यावयास हवें. तुझ्या तर वाचनांत असेल ना ?-- 'आत्मानं रथिनं विद्धि--' 'मध्ये वामनमासीनं विश्वे देवा उपासते ।' हें वामनरूपी आत्मदर्शन हेंच खरें जगन्नाथदर्शन. तें जे म्हणतात

की-- ‘रथे च वामनं दृष्ट्वा पुनर्जन्म न विद्यते--’ याचा अर्थ हाच की तुझ्यामध्ये जो आत्मा आहे, ज्याची पूर्ण उपेक्षा करून तूं या अद्‌भुत जड देहालाच सदान्‌कदा मी-माझें म्हणून कवटाळून बसतोस त्या आत्म्याचें दर्शन घेऊं शकलास तरच पुनर्जन्म खंडून जाईल. एरव्ही लाकडी रथांतील देवमूर्ति पाहूनच जर मुक्ति मिळणार असती तर दर वर्षी रथयात्रेला येणारे कोटद्यानुकोटी लोक मुक्त झाले असते. त्यांतच पुन्हा आजकाल आगगाडीने रथयात्रेला जाण्यायेण्याची सोय झाली आहे. असें जरी असलें तरी श्रीजगन्नाथाबद्दल सर्वसामान्य भक्तांच्या श्रद्धा-विश्वासाला मी ‘तें म्हणजे कांहीच नाही, तें सारें मिथ्या आहे,’ असें म्हणून उडवून देत नाही. असेंहि कांही लोक आहेत की जे या मूर्तीच्या आश्रयानेच हळूहळू उच्च उच्चतर अवस्था प्राप्त करून घेतात. म्हणूनच या मूर्तीच्या आश्रयाने भगवंताचा विशेष आविर्भाव झाला आहे यांत शंका नाही.

शिष्य:--तर मग मूर्खांचा धर्म वेगळा व जाणत्यांचा वेगळा असें का म्हणावयाचें महाराज ?

स्वामीजी:-- अगदी बरोबर बोललास. आणि असें जर नसतें तर तुमच्याच शास्त्रांनी अधिकारभेद स्पष्ट दाखविण्याचा येवढा खटाटोप तरी कशाला केला असता ? सारें असतें सत्यच, पण सापेक्ष सत्यांचे स्तर असतात. माणूस सत्य म्हणून जें जें स्वीकारीत असतो त्या साऱ्यांचें स्वरूप असतें हें असेंच. एखादें असतें कमी सत्य तर एखादें असतें त्यापेक्षा अधिक सत्य —निखालस, नित्य सत्य असतो एकमात्र भगवान. जड वस्तूंत हाच आत्मा संपूर्ण निद्रित असतो, जीवनधारी मानवांत तो सोपाधिक का होईना पण जाणिवेने युक्त असतो, व शंकर, बुद्ध, रामकृष्णादिकांत मात्र तोच Superconscious stage मध्ये--पूर्ण जागृत अवस्थेमध्ये असतो.

या नंतरच्याहि कांही अवस्था आहेत पण त्या वाणी वा विचारांनी व्यक्त करतां येणें शक्य नाही--अवाङ्‌मनसगोचरम् ।

शिष्य:-- महाराज, कांही कांही भक्तिसंप्रदायांचें सांगणें आहे की भगवन्ताशीं कुठलें तरी नातें कल्पून वा अन्य कुठल्याहि भावाने संबद्ध होऊन साधना करावयास हवी. आत्म्याच्या महिमा-गौरवादिकांच्या गोष्टी त्यांना कांहीकेल्या उमजत नाहीत, समजावून सांगण्याचा प्रयत्नच जर कुणीं केला तर ते म्हणतात--'ही सारी चर्चा सोडून देऊन कुठल्यातरी भक्तिभावांत सदैव मग्न असणेंच योग्य.'

स्वामीजी:-- ते जें सांगतात तें त्यांच्यापरीने सत्यच आहे. असें करतां करतांच एक दिवस त्यांच्या ठिकाणचा ब्रह्मभाव जागृत होईल. आम्ही संन्यासी जें करतों तोहि एक प्रकारचा भावच आहे. आम्हीं संसारत्याग केला आहे, मग आई, वडील, स्त्री-पुत्र इत्यादिकांसारखे सांसारिक संबंध भगवन्तावर आरोपित करून आम्हांला या भावांनी साधना कशी करतां येईल ? आमच्या दृष्टीने हे सारे सांसारिक भाव क्षुद्र वाटतात. अर्थात् सर्व भावातीत दृष्टीने भगवन्ताची उपासना करणें अत्यंत कठीणच काम आहे. पण याचा अर्थ मात्र हा नाही की अमृत लाभत नाही म्हणून विष प्यावयाला सुरवात करावयाची ! या आत्म्याबद्दलच सर्वदा चर्चा करावयास हवी, श्रवण करावयास हवें, चिन्तन करावयास हवें. असें करतां करतांच तुला आढळून येईल की तुझ्यांतील ब्रह्मसिंह जागृत झाला आहे. या साऱ्या भावना-कल्पनादिकांच्या अगदी अतीत होऊन जा. ऐक, कठोपनिषदांत यम काय म्हणतो तें--

'उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत ।'

येथेच त्या दिवशींचें बोलणें संपलें. मठांत भोजनाची घंटा झाली. बरोबरीच्या सर्व मंडळींसह स्वामीजी प्रसाद घ्यावयास निघाले.

---

# अध्याय १५ वा

**स्थळ—बेलूर येथील भाड्याने घेतलेली मठाची जागा.**
**वर्ष—इ. स. १८९८ (फेब्रुवारी)**

**विषय**—स्वामीजींच्या बाल्य व यौवन कालांतील कांही घटना व दर्शनें—अमेरिकेंत आविर्भूत झालेल्या विभूतींचें वर्णन—सांगावयाच्या गोष्टींच्या राशीच्या राशी कुणी आंत रचतो आहे अशी अनुभूति—अमेरिकेंतील स्त्री-पुरुषांचे गुणदोष—द्वेषाने अंध झालेल्या पाद्र्यांचे अत्याचार—जगांतील कोणतेंहि मोठें काम चलाखीने साधतां येत नाही—ईश्वरावर निर्भरता—नागमहाशयांसंबंधी कांही गोष्टी.

श्रीयुत नीलांबरबाबूंच्या बेलूर येथील उद्यानगृहांत आलमबाजारांतून मठ हालविण्यांत आला आहे. मठ हालविण्यांत आला असला तरी अजून सामानाची जुळवाजुळव नीटशी झालेली नाही. तें अद्यापहि अस्ताव्यस्त पडलें आहे. या नवीन निवासस्थानीं आल्यापासून स्वामीजी खूप आनंदांत आहेत. शिष्याला येतांना पाहतांच स्वामीजी म्हणाले, "बघ, गंगा कशी वाहते आहे—घरहि कसें सुरेख आहे! मठाला अशी जागा नसेल तर मन काय प्रसन्न राहील?" आता दुपार होऊन गेली होती.

संध्याकाळ टळून गेल्यावर शिष्याची स्वामीजींशीं वरच्या मजल्यावर जेव्हा भेट झाली तेव्हा नानाविध विषयांवर त्यांचें बोलणें सुरू झालें. मठांत त्या वेळीं इतर कुणीहि नव्हतें. अखेर प्रश्नांच्या ओघांत स्वामीजींचें बालपण जाणून घेण्याची इच्छा शिष्याने प्रकट केली. स्वामीजी म्हणाले, "अगदी लहानपणापासून मी हा असाच बेफाम धाडशी होतों; अन् तसा नसतों तर काय मग हातीं एक फुटकी कवडीहि नसतां अगदी निराधारपणें एकट्याने असा जग हिंडून येऊं शकलों असतों रे?"

अगदी लहानपणापासून त्यांना रामायण ऐकण्याची मनस्वी

आवड होती. घराच्या जवळपास कुठे रामायणपाठ होत असल्यास खेळणें-वगैरे सारें सोडून देऊन ते तें रामायण ऐकण्यास धांव घेत. त्यांनी सांगितलें की एखाद्या एखाद्या दिवशीं तर रामायण ऐकतांना ते असे तन्मय होऊन जात की घरदार इत्यादींचा पार विसर पडून जाई. रात्र झाली आहे, घरीं परत जावयास हवें वगैरे कुठल्याच गोष्टीचें भान त्यांना उरत नसे. एकदा त्यांनी ऐकलें की हनुमान केळीच्या वनांत असतात. या गोष्टीवर त्यांचा इतका विश्वास बसला की त्या दिवशीं रामायण ऐकून झाल्यावर घरीं परत न जातां घराजवळीलच एका बागेंत जाऊन ते एका केळीच्या झाडाखाली हनुमानाचें दर्शन होईल या आशेने बऱ्याच रात्रीपर्यंत बसले !

रामायणांतील इतर व्यक्तींपेक्षा स्वामीजींची हनुमानावर विशेष भक्ति होती. संन्यासी झाल्यानंतरहि अनेकदा महावीर हनुमानाच्या गोष्टी निघाल्यास ते अगदी तन्मय होऊन जात व पुष्कळदा मठांत हनुमानाची एखादी सुरेख मूर्ति स्थापन करण्याच्याहि गोष्टी करीत.

विद्यार्थीदशेंत सारा दिवस ते समवयस्क मुलांबरोबर थट्टामस्करी करून खेळण्यांत घालवीत. रात्रीं मात्र खोलीचीं सारीं दारें बंद करून घेऊन अभ्यास करीत. ते अभ्यास केव्हा व कसा करीत याचा कुणाला कधी पत्ताहि लागत नसे.

* * * *

शिष्याने कुतूहलाने विचारलें, 'आपण विद्यार्थी असतांना आपल्याला कधी दिव्य-दर्शनें वगैरे होत असत का महाराज ?"

स्वामीजी:-- शाळेंत शिकत असतां एक दिवस रात्रीं दारें बंद करून घेऊन ध्यान करायला बसलों असतां मन खूप तन्मय होऊन गेलें. अशा तऱ्हेने ध्यान करण्यांत किती वेळ गेला हें

कांही लक्षांत आलें नाही. ध्यान संपवून मी माझ्या आसनावरच बसलों असतां खोलीच्या दक्षिणेकडील भिंतींतून एक ज्योतिर्मय मूर्ति बाहेर आली व माझ्यासमोर उभी राहिली. त्या मूर्तीचें मुखमंडल एका अलौकिक तेजाने उजळलें होतें, पण कसल्याहि भावनेची किंचितहि छटा तेथे दिसत नव्हती. महाशान्त गंभीर संन्यासी मूर्ति-- मस्तक मुंडित, हातीं दंडकमंडलु. माझ्याकडे क्षणकाल ती अगदी एकटक पाहत राहिली. तिला जणु मला कांही सांगावयाचें होतें. मीहि अगदी निःशब्द व आश्चर्यचकित होऊन तिच्याकडे अनिमिष नेत्रांनी पाहत राहिलों. मग मात्र मनांत कसलीशी अनामिक भीति वाटूं लागली व म्हणून मोठ्या घाईने दार उघडून मी लगबगीने खोलीबाहेर आलों. पुढे मात्र मला खंत वाटूं लागली की काय मी एखाद्या मूर्खासारखा तेथून भिऊन पळालों; कदाचित् ती ज्योतिर्मय मूर्ति माझ्याशीं कांही बोलली असती. त्यानंतर मात्र ती दिव्यमूर्ति पुढे मला पुन्हा कधीच दिसली नाही. पुष्कळ दिवसांपासून मला नेहमीच वाटतें की ती मूर्ति जर पुन्हा मला कधी दिसली तर मात्र मी पुनः भयाने पळणार नाही-- तिच्याशीं खासच भाषण करीन. पण तिच्या दर्शनाचा योग अद्याप कांही पुन्हा आला नाही.

शिष्यः-- ती मूर्ति कुणाची वगैरे बाबतींत तुम्हीं कधी विचार नाही का केलांत ?

स्वामीजीः-- खूप विचार करून बघितला, पण कांही उलगडा होत नाही. आताशा मात्र मला वाटतें की भगवान् बुद्धदेवांचें दर्शन मला झालें असावें.

कांही वेळाने स्वामीजी म्हणाले, “मन शुद्ध झाल्यास, काम-कांचनादिकांची स्पृहा संपूर्णतया निघून गेल्यास किती अद्भुत अद्भुत Visions (दर्शनें) होतात माणसाला. पण सदासर्वदा

त्यांच्याकडे लक्ष देऊं नये. दिवसरात्र त्याचें चिंतन करीत राहिल्याने साधनामार्गाने साधक पुढे जाऊं शकत नाही. माहीत आहे ना, ठाकुर म्हणत असत, '(माझ्या) भगवती मातेच्या दारीं किती तरी माणिकमोतीं विखरून पडलेलीं आहेत !' आत्मदर्शन घ्यावयास हवें, बाकी साऱ्या व्यर्थ गोष्टींकडे लक्ष देऊन काय लाभ होणार आहे ?"

बोलतां बोलतां कशाचा तरी अगदी तन्मयतेने विचार करीत असतां ते अगदी चुप झाले. मग पुन्हा म्हणाले, "पाहा, मी अमेरिकेंत असतां कितीतरी अलौकिक शक्तींचा माझ्यामध्ये त्या वेळीं विकास झाला होता. कुणाच्याहि नजरेला नजर लागतांच एका क्षणांत त्याच्या मनांत काय चाललें आहे हें मला समजत असे. दुसऱ्यांच्या मनांतील भावना-विचार करतलामलकवत् मला स्पष्ट दिसत. अनेकांना मी हे त्यांच्या मनांतील विचार सांगून टाकीत असे. ज्यांना मी सांगत असे त्यांच्यापैकी बरेचसे लोक पुढे माझें शिष्यत्व पत्करीत असत, आणि येणाऱ्यांपैकी जे कोणी स्वार्थी हेतूने माझ्याकडे येत त्यांना माझ्या या शक्तीची चाहूल लागतांच ते पुन्हा कधी चुकूनहि माझ्याकडे येत नसत.

"शिकागो व इतर शहरीं व्याख्यानें द्यावयास सुरवात केल्यावर अनेकदा तर मला आठवडयांतून १२–१५ किंवा कधी कधी अधिकहि व्याख्यानें द्यावीं लागत. अत्यधिक शारीरिक व मानसिक परिश्रमांनी मी अगदी थकून जात असे. व्याख्यानांचे सारेच विषय जणु संपून जात. चिंता वाटे की उद्या आता पुन्हा नवीन गोष्टी कुठून सांगूं ? नवीन विचार कांही केल्या मनांत येतच ना. एक दिवस व्याख्यान आटोपून असाच पडलों असतां मनांत विचार आला की आता पुढे काय करावयाचें ? अशा फिकिरींत असतांनाच मला किंचित् तंद्रा आली. त्या अवस्थेंत असतां मला

स्पष्ट ऐकूं येऊं लागलें की कुणी तरी अगदी माझ्या बाजूला उभें राहून व्याख्यान देत आहे,--किती अद्‌भुत विचार, अद्‌भुत भाव, अद्‌भुत गोष्टी होत्या त्या ! या जन्मीं तरी मीं त्या कधी ऐकल्या नव्हत्या--त्या कधी माझ्या मनांत आल्या नव्हत्या. ती तंद्रा संपल्यावर त्या सार्‍या गोष्टी नीट लक्षांत ठेवल्या व पुढे व्याख्यानांत त्याच सांगितल्या. असें हें इतक्यांदा झालें की त्याची कांही मोजदाद करतां येणें शक्य नाही. निजल्या निजल्या असलीं व्याख्यानें तर कितीदा तरी ऐकलीं. कित्येकदा तर हीं व्याख्यानें येवढ्या मोठ्याने होत की बाजूच्या खोल्यांतील लोकांना तीं ऐकूं जात व दुसर्‍या दिवशीं ते मला विचारीत, 'स्वामीजी, काल येवढ्या रात्रीं आपण कुणाशीं इतक्या जोराने बोलत होतां ?' मी त्यांचे ते प्रश्न कसे तरी उडवून लावीत असे. काय अद्‌भुत गोष्टी होत्या त्या सार्‍या !"

शिष्य तर स्वामीजींच्या या गोष्टी ऐकून अगदी स्तब्ध झाला. नंतर बराच वेळ विचार करून तो त्यांना म्हणाला, 'मला तर असें वाटतें महाराज की आपणच सूक्ष्म देहाने तीं व्याख्यानें देत असावेत व स्थूल देहांत अनेकदा त्यांचा प्रतिध्वनि होत असावा.'

स्वामीजीः— हो, तसेंहि शक्य आहे.

मग अमेरिकेबद्दल बोलणीं निघालीं. स्वामीजी म्हणाले, 'त्या देशांत स्त्रियाच पुरुषांपेक्षा अधिक शिक्षित आहेत. विज्ञान-तत्त्वज्ञानांत त्यांची खूप गति असे व म्हणूनच त्यांना माझें म्हणणें मोलाचें वाटे व त्या माझा मान-सन्मान करीत. पुरुषमंडळी दिवसरात्र खपत—त्यांना विश्रांति घ्यायला फुरसत नसे. उलट स्त्रिया शाळांतून, कॉलेजांतून शिकून-शिकवून विदुषी झालेल्या. अमेरिकेंत कुठेहि नजर टाकल्यास स्त्रियांचा प्रभाव सर्वत्र असल्याचें दिसून येईल.

शिष्य:— संकुचित दृष्टीच्या व स्वमतांध असलेल्या ख्रिश्चन लोकांनी आपल्याशीं कांही वादविवाद नाही का घातला महाराज?

स्वामीजी:-- नाही कसा ? आणि लोक जेव्हा माझा मानसन्मान करूं लागले तेव्हा तर ह्या पाद्रयांनी माझा अगदी पिच्छाच पुरवला. माझ्याबद्दल अत्यंत गलिच्छ निंदाव्यंजक प्रवाद त्यांनी वर्तमानपत्रांतून प्रसृत करावयास सुरवात केली. कितीतरी लोक मला तें सारें खोडून काढावयास सांगत. पण त्यांचें म्हणणें मीं कधी कानीं घेतलें नाही. माझा असा दृढ विश्वास आहे की कपट-चलाखी करून जगांत कोणतेंहि महत्कृत्य साधतां येत नाही. म्हणूनच मी त्या साऱ्या ग्राम्य कुचाळक्यांकडे दुर्लक्ष करून आपलें काम करीत राहिलों. पुढे अनेकदा असें आढळून आलें की ज्यांनी माझी बदनामी करून मला शिव्या-शाप दिले होते तेच पश्चात्तापदग्ध होऊन माझ्या पायीं आश्रयास येत आणि स्वतःच प्रसिद्ध केलेल्या ग्राम्य कुचाळक्या वर्तमानपत्रांतूनच खोडून काढून ते माझी क्षमा मागत. कित्येकदा असें होई की एखाद्या घरीं मला निमंत्रित केलें आहे असें पाहून कुणी तरी माझ्याबद्दल प्रसिद्ध झालेली मिथ्या निंदा निमंत्रकांना जाऊन सांगे. ती ऐकून ज्यांनी मला निमंत्रण दिलेलें असे ते दारांना कडचाकुलुपें लावून कुठे तरी निघून जात ! मी निमंत्रणानुसार तेथे जाऊन पाही तों सारें सामसूम. घरांत चिटपाखरू देखील नाही. घरदार सारें कडचाकुलुपें लावून बंद ! कांही काळ गेल्यानंतर सत्य परिस्थिति लक्षांत आल्याने त्यांना खेद व पश्चात्ताप होई व ते माझ्याकडे येऊन माझें शिष्यत्व पत्करीत. काय समजलास बाबा, हा संसार म्हणजे सारा दुनियादारीचा व्यवहार ! पण जे खरोखरीच सन्मार्गगामी, ज्ञानी व विवेकी असतात ते या साऱ्या नीच दुनियादारी व्यवहाराने कधी तरी फसणें शक्य आहे काय ? ‘जग

फालतूसारखे काय वाटेल तें बको, मी आपलें कर्तव्यकर्म धीर भावाने करीनच करीन' हा असतो वीरांचा मार्ग. एऱ्ही हा काय म्हणतो, तो काय म्हणतो, तमक्याने काय लिहिलें ह्या भानगडी घेऊनच जर रात्रंदिवस डोकें तापविलें तर जगांत कोणतेंच थोर कृत्य साधतां येणार नाही. हा श्लोक तर माहीत आहे ना ? --

निन्दन्तु नीतिनिपुणा यदि वा स्तुवन्तु
लक्ष्मीः समाविशतु गच्छतु वा यथेष्टम् ।
अद्यैव वा मरणमस्तु युगान्तरे वा
न्याय्यात् पथः प्रविचलन्ति पदं न धीराः ॥

लोक तुझी निंदा करोत, स्तुति करोत; लक्ष्मीची तुझ्यावर कृपा होवो वा न होवो, या क्षणींच वा युगान्तीं मरण येवो--न्याय्य मार्ग सोडून भ्रष्ट मात्र होऊं नकोस, येवढेंच ठीक सांभाळ. मोह-संकटांचीं केवढालीं वादळें पार करावींत तेव्हा कुठे शान्ति-समाधानाचा किनारा गवसतो. माणूस जितका मोठा तितक्या कठोर व दारुण परीक्षांतून त्याला पार व्हावें लागत असतें. परीक्षांच्या कठीण कसोटीवर अशा माणसांचें जीवन घासून पारखून घेऊनच मग जग त्यांना महत्पदवी अर्पण करीत असतें. जे पुरुषार्थहीन, भित्रे असतात तेच सागराच्या गरजत्या लाटांना भिऊन आपल्या होड्या जागच्या जागीं नांगरून बसतात. धीरहृदयी वीर ह्या क्षुद्र गोष्टींकडे कधी नजर तरी टाकील काय ? जें व्हायचें असेल तें होवो, मी माझें इष्ट साध्य करीनच करीन, अशालाच म्हणतात पुरुषपराक्रम. असल्या पौरुषपूर्ण पराक्रमाखेरीज दैवाचें केवढेंहि साह्य तुमची जडता दूर सारूं शकणार नाही.

शिष्यः-- तर मग दैवावर भार टाकून राहणें ही काय दुर्बलता आहे ?

स्वामीजी:-- यथार्थ निर्भरता या गुणाचा शास्त्रांनी पंचम पुरुषार्थ म्हणून गौरव केला आहे. पण आपल्या देशांतील लोक ज्याला दैव म्हणून मानतात तें म्हणजे मृत्यूचेंच एक लक्षण, महान् भित्रेपणाचा परिणाम, ईश्वराची कांहीतरी निराधार, विलक्षण, अद्‌भुत कल्पना करून घेऊन त्याच्या माथीं आपल्या साऱ्या दोषांचें खापर फोडण्याचा एक प्रयत्न! ठाकुरांनी सांगितलेली ती गोहत्या-पातकाची गोष्ट ठाऊक आहे ना ? त्या गोहत्येचें पातक अखेर त्या मालकाला भोगावें लागलें. आजकाल सारेच 'यथा नियुक्तोऽस्मि तथा करोमि' म्हणून आपलें पापपुण्य सारें त्या देवाच्या माथीं मारतात. स्वतः जणु कमलपत्रांवर पडलेल्या जलबिंदूप्रमाणे अगदी निर्लिप्त! हे लोक तिन्ही त्रिकाळ, सदा-सर्वदा जर याच भावाने राहत असतील तर ते तर मुक्तच म्हणावयाचे ! पण तसें नाही. भल्याच्या वेळीं 'मी-माझें' अन् बुऱ्याच्या वेळीं मात्र सारें 'तूं-तुझें !' धन्यच म्हणावी लागेल या असल्या तुमच्या दैव-निर्भरतेची ! पूर्ण प्रेम (भक्ति) वा ज्ञान असल्याखेरीज यथार्थ शरणागतीचा--निर्भरतेचा--उदय होणें शक्यच नाही. ज्याच्या ठिकाणीं यथार्थ शरणागतीची वृत्ति बाणली त्याच्या ठिकाणीं भलेंबुरें ही भेदबुद्धि राहतच नाही. आमच्यापैकी ज्यांच्यांत या निर्भरतेचा उदय झाला आहे अशांचें उज्ज्वल उदाहरण द्यावयाचें तर सध्या तें नागमहाशयांचें देतां येईल.

यावरून मग नागमहाशयांबद्दल गोष्टी निघाल्या.

स्वामीजी:— त्यांच्यासारखा अनुरागी भक्त अन्य कुणी आढळेल ? अहाहा ! कधी त्यांची माझी पुन्हा भेट होईल ?

शिष्य:-- ते लवकरच आपल्या दर्शनासाठी कलकत्त्याला येणार असल्याचें माताजींनी (श्रीनागमहाशयांच्या पत्नींनी) मला लिहिलें आहे.

स्वामीजी:-- ठाकुर त्यांची राजा जनकाशीं तुलना करीत. अशा अलौकिक इंद्रियजयी पुरुषाचें दर्शन तर दूरच राहो, नांव-सुद्धा कधी कुठे ऐकूं येत नाही. तूं त्यांच्या सत्संगतीचा सतत फायदा घे. ते ठाकुरांचे एक अंतरंग भक्त होते.

शिष्य:-- महाराज, आमच्या त्या भागांत पुष्कळ लोक तर त्यांना वेडेच समजतात. मीं मात्र अगदी पहिल्या भेटीपासूनच त्यांना महापुरुष म्हणून ओळखलें. त्यांचें माझ्यावर खूप प्रेम आहे--खूप कृपा आहे त्यांची माझ्यावर.

स्वामीजी:-- अशा महापुरुषाच्या संगतीचा लाभ तुला झाला आहे. आता तुला चिंतेचें काय कारण? जन्मजन्मान्तरींच्या कठोर तपस्येचें फळ गाठीं असल्यासच अशा थोर महापुरुषांच्या सत्संगतीचा लाभ होतो. नागमहाशयांचा घरचा आयुष्यक्रम कसा काय आहे?

शिष्य:-- महाराज, कामधंदा तर ते कांहीच करीत नाहीत. सदासर्वदा अतिथिसेवेंतच मग्न असतात. पालबाबूंकडून येणाऱ्या पैशाखेरीज जीवननिर्वाहासाठी त्यांना अन्य उत्पन्न नाही. पण तरीहि त्यांचा खर्च असतो थोरामोठ्यांच्या तोडीचा. स्वतःच्या निमित्ताने ते कधी फुटकी कवडीहि खर्च करीत नाहीत. हा सारा अवाढव्य खर्च होतो तो सारा केवळ अतिथिसेवेसाठी. सेवा, एकमात्र सेवा हेंच जणु त्यांच्या जीवनाचें महाव्रत असावेसें वाटतें. वाटतें की भूतमात्रांच्या ठिकाणीं आत्मदर्शन करून ते अभेदबोधाने जगाची सेवा करण्यांत गुंतले असावेत. सेवा करतांना त्यांना आपल्या शरीराचेंहि शरीर म्हणून भान राहत नाही. जणु अगदी बेहोष होतात ते. आणि त्यांना खरोखरच शरीराची जाणीव तरी आहे किंवा नाही याची मला शंकाच वाटते. आपण जिला ज्ञानातीत अवस्था म्हणून संबोधितां त्याच अवस्थेंत ते सर्वकाळ असावेत असें मला वाटतें.

स्वामीजी:-- असें कां नसेल ? ठाकुरांचें त्यांच्यावर केवढें अगाध प्रेम होतें. तुमच्या पूर्वबंगालमध्ये तेच एक श्रीरामकृष्णांचे सहचर जन्माला आले होते. त्यांच्या उज्ज्वल दीप्तीने सारा पूर्वबंगाल उद्भासित झाला आहे.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

## अध्याय १६ वा

**स्थळ-- बेलूर येथील मठाची भाड्याने घेतलेली जागा.**

**वर्ष-- इ. स. १८९८ (नोव्हेंबर).**

**विषय--** काश्मीरमधील अमरनाथदर्शन— क्षीरभवानी मंदिरांत दैवी-वाणीचें श्रवण व मनांतील सर्व संकल्पांचा त्याग-- भूतयोनीचें अस्तित्व-- भूत-प्रेतादि दर्शनाची वासना मनांत वागविणें अयोग्य-- स्वामीजींना झालेलें भूत-दर्शन व श्राद्धसंकल्पाद्वारा त्यांनी त्याचा केलेला उद्धार.

आज दोनतीन दिवस झाले स्वामीजी काश्मीरहून परत आले आहेत. त्यांची प्रकृति तितकीशी बरी नाही. शिष्य मठांत येतांच स्वामी ब्रह्मानंद त्याला म्हणाले, "काश्मीरहून आल्यापासून स्वामीजी कुणाशीं एक अक्षरहि बोलत नाहीत. तूं त्यांच्याशीं गप्पागोष्टी करून त्यांचें मन लौकिक गोष्टींकडे वळविण्याचा प्रयत्न कर."

शिष्याने वर स्वामीजींच्या खोलींत जाऊन पाहिलें--स्वामीजी पूर्वाभिमुख होऊन मुक्तपद्मासन घालून बसले आहेत. जणु गभीर ध्यानांत मग्न. मुखमंडलावर हास्याची छटाहि नाही, दीप्तिमान नयनांत बहिर्गामी दृष्टीचा संपूर्ण अभाव, दृष्टि अंतर्यामीं खिळलेली-- जणु अंत:स्थित कांही न्याहाळताहेत. शिष्याला पाहतांच, "आलास बाबा ? बैस," येवढेंच म्हणाले. स्वामीजींच्या डाव्या डोळ्यांतला आंतील भाग लाल झाल्याचें पाहून शिष्याने विचारलें, 'आपला डोळा लाल कशाने झाला ?' 'तें कांही विशेष नाही' असें म्हणून स्वामीजी पुन्हा स्तब्ध बसले. पुष्कळ वेळ झाला तरी स्वामीजी कांहीच बोलत नाहीत असें पाहून त्यांच्या पादपद्मांना किंचित् स्पर्श करून शिष्याने अधीरतेने विचारलें, 'महाराज, आपण अमरनाथला जें कांही पाहून आलांत तें मला सांगणार नाही का ?' शिष्याच्या त्या स्पर्शाने त्यांची लागलेली ती लय किंचित् खंडली, बाह्य

गोष्टींकडे दृष्टि वळल्यासारखी दिसली. ते म्हणाले, “अमरनाथचें दर्शन घेतल्यापासून शिव जणु कांही रात्रंदिवस माझ्या मस्तकीं बसून आहेत असें वाटतें--कांहीकेल्या ते खाली उतरत नाहीत.” हें ऐकून शिष्य तर अगदी स्तब्ध झाला.

स्वामीजी:-- अमरनाथच्या व नंतर क्षीरभवानीच्या देवळांत खूप तपस्या केली, सारें कांही सांगतों.

हळहळू स्वामीजी सांगू लागले, ‘अमरनाथला जातेवेळीं पहाडाचा एक उभा चढ मी चढून गेलों. त्या रस्त्याने यात्रेकरू कुणी जात नाही. फक्त पाहाडी लोकांचेंच त्या मार्गाने दळणवळण असतें. कां कुणास ठाऊक पण मला आपलें वाटलें की जायचें तर तें याच रस्त्याने. जायचें म्हणजे जायचें ! त्या कष्टांनीच शरीर अगदी गळून गेलें आहे. तेथे थंडीहि अशी भयंकर की अंगाला सहस्र सुया टोंचताहेत असें वाटावें.

शिष्य:-- मीं ऐकलें आहे की अगदी नग्न होऊन अमरनाथचें दर्शन घ्यावें लागतें ? खरें आहे का हें ?

स्वामीजी:-- हो, मीं फक्त एक कौपीन नेसून व साऱ्या अंगाला भस्म चर्चून त्या गुहेंत प्रवेश केला. गेलों तेव्हा तर गरमी-थंडी कांहीच जाणवलें नाही. पण देवळांतून जेव्हा बाहेर आलों तेव्हा थंडीने अगदी गारठून गेलों होतों.

शिष्य:-- तिथे आपल्याला कांही कबूतरें दिसलीं का ? मीं असें ऐकलें आहे की तिथल्या त्या थंडींत कोणीहि जीवजंतु तग धरून राहिलेला दिसत नाही. फक्त कोठून तरी येऊन एक पांढऱ्या कबूतरांचा कळप कधी कधी तेथे राहतो.

स्वामीजी:-- हो, तीनचार पांढरीं कबूतरें मीं पाहिलीं. पण तीं त्या गुहेंत राहतात की जवळपासच्या पर्वतावर हें मात्र कांही समजूं शकलें नाही.

शिष्य:-- महाराज, असें सांगतात की गुहेंतून बाहेर आल्यावर जर एखादें पांढरें कबूतर दिसलें तर खरोखरच शिवदर्शन झालें असें मानतात.

स्वामीजी:-- असेंहि ऐकलें की कबूतर पाहिल्यावर जी इच्छा करावी ती पूर्ण होते.

नंतर स्वामीजींनी सांगितलें की परत येतेवेळीं ज्या रस्त्याने सारे यात्रेकरू जातात त्याच रस्त्याने ते श्रीनगरला गेले. परत आल्यावर थोडयाच दिवसांनंतर ते क्षीरभवानी देवीच्या दर्शनासाठी गेले, व सात दिवस तेथे राहून त्यांनी देवीची पूजा केली आणि खिरीचा नैवेद्य करून देवीला उद्देशून एक होमहि त्यांनी केला. दररोज ते एक मण खिरीचा नैवेद्य दाखवीत व होम करीत. एक दिवस पूजा करतां करतां त्यांच्या मनांत आलें,-- "भवानी माता खरोखरच किती कालापासून येथे आविर्भूत होऊन विराजत आहे! यवनांनी येऊन तिचें हें मंदिर पूर्वी उध्वस्त केलें आणि तरीहि येथील लोकांनी त्याच्या रक्षणासाठी कांहीहि केलें नाही. मी जर त्या वेळीं असतों तर कधीहि तो ध्वंस स्वस्थ बसून पाहिला नसता." या विचारांनी त्यांचें मन जेव्हा दु:खक्षोभाने अत्यंत पीडित झालें तेव्हा त्यांना अगदी स्पष्टपणें देवी बोलतांना ऐकूं आलें, "माझ्याच इच्छेने यवनांनी या मंदिराचा विध्वंस केला. माझीच इच्छा की मी या जीर्ण मंदिरांतच राहीन. मला वाटलें तर मी काय त्या ठिकाणीं सोन्याचें सातमजली देऊळ या क्षणीं उभारूं शकत नाही ? तूं काय करूं शकणार ? मी तुझें रक्षण करावयाचें की तूं माझें ?" स्वामीजी म्हणाले, "ती दैवी वाणी ऐकल्यापासून माझ्या मनांत मीं कुठलाच संकल्प ठेवला नाही. मठ वगैरेहि करण्याचा संकल्प मीं सोडून दिला आहे. मातेची जशी इच्छा असेल तसें होईल."

तें ऐकून स्तब्ध झालेल्या शिष्याच्या मनांत आलें की यांनीच ना मला एक दिवस सांगितलें, "जें कांही पाहतोस ऐकतोस तें केवळ तुझ्या अंतःस्थित आत्म्याचा प्रतिध्वनि होय. बाहेर कांहीच नाही." नंतर तो स्वामीजींना म्हणाला, "महाराज, आपणच तर म्हणत होतां की या साऱ्या दैववाणी वगैरे गोष्टी आपल्यांतच असलेल्या भावना-विचारांचे प्रतिध्वनि होत." अत्यंत गंभीर होऊन स्वामीजींनी उत्तर दिलें, "ती आन्तरिक असो वा बाह्य असो, तूं जर आपल्या कानांनी माझ्यासारखी अशी अशरीरी वाणी ऐकलीस तर काय ती तूं मिथ्या म्हणूं शकशील? देववाणी खरोखरच ऐकतां येते. आपण जसें बोलणें ऐकतों आहोंत अगदी तशी."

शिष्य यावर कांही बोलला नाही. स्वामीजींचें म्हणणें त्याने मान्य केलें. स्वामीजींच्या बोलण्यांत अशी अद्‌भुत शक्ति होती की त्यांचें बोलणें न मानून चालतच नसे. तर्क, युक्ति वगैरे कोठल्या कोठे लोपून जात. शिष्याने नंतर भूतांसंबंधी बोलणें काढलें. त्याने विचारलें, "महाराज, या ज्या भूतप्रेतादि योनींच्या गोष्टी आपण ऐकतों, शास्त्रेंहि ज्यांचें वेळोवेळीं समर्थन करतात, त्या साऱ्या खरोखरीच सत्य आहेत काय?"

स्वामीजीः-- खात्रीने त्या साऱ्या सत्य आहेत. तूं जें पाहिलें नाही तें सारें काय तेवढ्यासाठीच खरें नाही? तुझ्या दृष्टीच्या पलीकडे सुदूर अंतरावर कोटि कोटि ब्रह्मांडें फिरताहेत. तूं तीं पाहूं शकत नाहीस म्हणून काय त्यांना अस्तित्व नाही? पण या साऱ्या भुताखेतांच्या गोष्टींत तूं मन घालूं नकोस. भुतें-प्रेतें असतील, असोत, असें मानून या साऱ्या गोष्टी तूं सोडून दे. तुझें कर्तव्य म्हणजे या शरीरांत असलेल्या आत्म्याची अनुभूति करून घेणें. या अनुभूतीनंतर तीं भुतेंखेतें तुझे दास होतील.

शिष्यः— पण महाराज, त्यांना पाहूं शकल्यास पुनर्जन्मा-

दिकांवर विश्वास दृढ होऊन परलोकांबद्दल असणारा अविश्वास दूर होईल असें वाटतें.

स्वामीजी:-- तुम्ही तर सारे महावीर ! भुतेंखेतें पाहून का तुम्ही परलोकावरील विश्वास दृढ करणार ? इतकीं शास्त्रें वाचलींस, विज्ञानाचें येवढें अध्ययन केलेंस, या विराट विश्वांतील किती तरी गूढ रहस्यें आकलन केलींस आणि आता येवढचा-नंतरहि काय आत्मज्ञानलाभ भुतेंप्रेतें पाहून करणार आहेस ? केवढी शरमेची गोष्ट आहे ही !

शिष्य:-- बरें महाराज, आपण स्वत: कधी भूतप्रेत पाहिलें आहे काय ?

यावर स्वामीजींनी सांगितलें की त्यांच्या नातेवाइकांपैकीच कोणीतरी एक जण भूत होऊन कधी कधी त्यांना दिसत असे. कधी कधी दूरदूरच्या बातम्या तें आणून देई. पण त्या बातम्या पारखून पाहिल्यानंतर आढळून आलें की त्याच्या साऱ्याच गोष्टी नेहमीच कांही खऱ्या नसत. पुढे कुण्या एका तीर्थाच्या ठिकाणीं 'तो मुक्त होवो ' अशी स्वामीजींनी प्रार्थना केल्यानंतर तें त्यांना पुन्हा कधी दिसलें नाही. श्राद्धादिकांनी मृतात्म्यांची तृप्ति होते किंवा नाही असा शिष्याने प्रश्न केल्यावर स्वामीजी म्हणाले, "तें कांही अशक्य नाही." याला प्रमाण काय ? असें शिष्याने विचारलें असतां ते म्हणाले, "एखादे दिवशीं तुला हें सारें मी नीट समजावून देईन. श्राद्धादि क्रियांद्वारें मृतात्म्यांची तृप्ति होते याबाबत कांही न खोडून काढतां येण्यासारखीं प्रमाणें आहेत. पण आज माझी प्रकृति ठीक नाही. पुन्हा एखादे दिवशीं तें मी तुला समजावून सांगेन." परंतु या जीवनांत तरी निदान स्वामी-जींना तो प्रश्न पुन्हा विचारण्याची संधि शिष्याला मिळाली नाही.

## अध्याय १७ वा

**स्थळ-- बेलूर येथील मठाची भाड्याने घेतलेली जागा.**

**वर्ष-- इ. स. १८९८ (नोव्हेंबर).**

**विषय--** स्वामीजींनी रचलेलीं संस्कृत स्तोत्रें-- श्रीरामकृष्णांच्या आगमनाने भाव व भाषेंत नवीन प्राणसंचार-- भाषेंत ओज कसें आणावें-- भयत्याग करावयास हवा-- पाप व दुर्बलता हीं भयमूलकच-- साऱ्याच अवस्थांत अविचल असावयास हवें-- शास्त्रपाठापासून लाभ-- पाणिनिकृत अष्टाध्यायीचें स्वामीजीकृत अध्ययन-- ज्ञानाचा उदय झाला की कोणताहि विषय मग अद्‌भुत वाटेनासा होतो.

मठ अद्यापहि बेलूरला नीलांबरबाबूंच्या उद्यानगृहांतच आहे. हा नोव्हेंबर महिना. या सुमारास स्वामीजी बहुतेक संस्कृतशास्त्राध्ययन व विवेचन यांत मग्न आहेत. या कालांतच त्यांनी, 'आचंडालाप्रतिहतरयः' या स्तोत्राच्या दोन श्लोकांची रचना केली. आज 'ॐ ऱ्हीं ऋतम्' या स्तोत्राची रचना करून तें शिष्याच्या हातीं देत स्वामीजी त्याला म्हणाले, "पाहा बरें तपासून त्यांत कांही छंददोष आहेत की काय तें." शिष्याने तें मान्य करून तें स्तोत्र उतरवून घेतलें.

ज्या दिवशीं स्वामीजींनी हें स्तोत्र रचलें त्या दिवशीं सरस्वतीदेवी जणु त्यांच्या जिव्हाग्रीं अवतरली होती. कुठेहि मधे न अडखळतां अगदी सुललित संस्कृतांत जवळपास दोन तास ते शिष्याशीं बोलत होते. अशी सुललित भाषा मोठमोठ्या ख्यातनाम पंडितांच्याहि तोंडून शिष्याने कधी ऐकली नव्हती.

तें असो. शिष्याने स्तोत्राची नक्कल करून घेतल्यावर स्वामीजी त्याला म्हणाले, 'हें बघ, भावांत अगदी तन्मय होऊन लिहीत असतां एखादे वेळीं माझ्या व्याकरणाच्या चुका होतात. म्हणूनच लिहिलेलें मी तुम्हां लोकांना दाखवून देत असतों.

शिष्यः-- महाराज, आपल्यासारख्यांच्या लिखाणांत आढळतात त्या चुका चुका नव्हतच; ते सारे म्हणावे लागतील आर्ष प्रयोग.

स्वामीजी:— तूं एक तसें मानशील; पण लोक काय म्हणून तसें म्हणतील ? त्या दिवशीं मीं 'हिंदुधर्म' या विषयावर एक लेख बंगालींतून लिहिला. तो वाचून तुमच्यापैकीच कांही जण म्हणाले की हें कसलें क्लिष्ट बंगाली ? मला तर वाटतें की इतर साऱ्या गोष्टींप्रमाणे भाषा आणि भाव वा विचार हे सारे कालान्तराने निर्जीव होऊन जातात. सध्या आपल्या देशांतहि असेंच झालें असावें. श्रीरामकृष्णांच्या आगमनाबरोबरच भाव व भाषेचा एक स्रोत पुन्हा नव्याने सुरू झालेला आहे. साऱ्याच गोष्टी आता या नवीन साच्यांत घालून घडवून घ्याव्या लागतील. या नवीन प्रतिभेचा शिक्कामोर्तब करूनच साऱ्या गोष्टींचा प्रसार करावा लागेल. हेंच पाहाना— पुरातनकालीन संन्यासी जीवनाची सारी धाटणी भग्न होऊन तीच आता एका नवीन साच्यांत घालून काढल्याप्रमाणे कशी भिन्न होत आहे. समाज या साऱ्याला विरोधहि करतो आहे, पण त्याचा उपयोग होतो आहे का कांही ? की आम्हांला त्याचें कांही भय वाटतें ? मुळीच नाही. आता या साऱ्या संन्याशांना दूर दूर देशविदेशीं प्रचारकार्य करावयास जावें लागेल. अंगाला भस्म फासून, अर्धनग्न अवस्थेंत प्राचीन संन्याशांच्या वेषभूषेंत जर ते गेले तर आधी त्यांना कुणी जहाजांवर पायच ठेवूं देणार नाही; आणि अशा वेषांत मोठ्या मुष्किलीने ते परदेशांत जाऊन जरी पोहोचले तरी त्यांची रवानगी होईल कारागृहांत. स्थळकाल, संस्कृति यांच्या अनुसार साऱ्याच गोष्टींत समयोचित बदल करून घ्यावयास हवा. यापुढे आता बंगालींतूनच लिखाण करावें असें

मला वाटतें. सध्याचे साहित्यसेवक तें लिखाण वाचून कदाचित् शिव्याशाप देतील मला ! खुशाल देवोत ! मी मात्र बंगाली-भाषेंत एक नवी शैली आणण्याचा प्रयत्न करणारच. आजकालचे बंगाली लेखक लिहावयास बसले की क्रियापदांची अगदी खैरात करतात. भाषेंतील सारा जोर त्यामुळे निघून जातो. विशेषणां-द्वारा क्रियापदांचा अर्थ व्यक्त केल्यास भाषा ओजस्वी होते. यापुढे अशा तऱ्हेने लिहिण्याचा तूं प्रयत्न कर. अशा शैलींतच उद्‌बोधन मासिकांतील लिखाण तूं करून पाहा. भाषेंत अधिक क्रियापदांचा उपयोग करणें म्हणजे काय हें माहीत आहे ? त्यांनी विचारांना एक प्रकारें विराम मिळतो. म्हणूनच भाषेंत अधिक क्रियापदें वापरणें हें लवकर लवकर श्वासोच्छ्‌वास करण्याप्रमाणेच दुर्बलतेचें एक लक्षण आहे. असें केल्याने भाषेंत कांही दम नाही असें वाटूं लागतें. यामुळेच बंगालींत चांगलें प्रभावी व्याख्यान देतां येत नाही. भाषेवर ज्यांचें प्रभुत्व असतें ते अशा लवकर लवकर रीतीने आपले विचार थांबवीत नाहीत. डाळभात खाऊन झालेल्या ढिल्याढाल्या शरीराप्रमाणेच तुमची भाषा सैल व मेणचट झाली आहे. खाणेंपिणें, चालचलणूक, भाव-भाषा या साऱ्यांत खूप तेजस्विता असावयास हवी. सर्व बाजूंनी या गोष्टींत प्राण ओतावयास हवा, सर्वच नसाधमन्यांतून रक्त खेळवायला हवें की ज्यामुळे सर्व बाबतींतच जिवंतपणाचा अनुभव येऊं लागेल. तरच या भयंकर विक्राळ जीवनसंग्रामांत देशवासी लोक टिकूं शकतील. नाहीतर लवकरच हा देश, हा मानववंश मृत्यूच्या छायेंत पार लोपून जाईल.

शिष्यः-- महाराज, सुदीर्घ कालापासून देशांतील लोकांची ही अशी घडण झाली आहे. ती का इतक्या लवकर बदलण्याची शक्यता आहे ?

स्वामीजी:-- जुना जीवनक्रम अयोग्य असें जर तुला पटलें असेल तर सांगतों त्या नवीन मार्गानें चालावयास शीक ना. तुझें पाहूनच आणखी दहा लोक तसें वागूं लागतील. त्यांचेंच अनुकरण देशांतील आणखी पन्नास माणसें करतील. अशा रीतीनेच साऱ्या जातींत या अभिनव भावाचा उदय होईल. पण समजून-उमजूनहि जर तुम्ही त्याप्रमाणे वागणार नाही, प्रत्यक्ष कार्य करणार नाही तर ध्यानांत ठेवा, तुमचें शौर्य नुसतें तोंडांतच आहे असें म्हणावें लागेल.

शिष्य:-- आपलें हें बोलणें ऐकून अंगांत प्रबळ साहसाचा संचार होतो; उत्साह, बल व तेज यांनी हृदय भरून जातें.

स्वामीजी:-- क्रमाक्रमाने हृदय असेंच बलसंपन्न करावयास हवें. एक यथार्थ 'माणूस' तर तयार होऊं शकला तर लाखो व्याख्यानांचें काम झाल्यासारखें होईल. मन-मुख एक करून ह्या कल्पना जीवनांत उतरवावयास हव्यात. यालाच ठाकुर म्हणत, 'भावनांच्या घरीं चोरी न होऊं देणें.' सर्व दृष्टींनीच आपले विचार कृतींत यावयास हवेत. केवळ तत्त्वांच्या वा प्रमेयांच्या मागे लागून सारा देश उत्सन्न झाला आहे. जो स्वतःला ठाकुरांचें यथार्थ संतान म्हणवीत असेल तो साऱ्या धर्मभावांची व्यवहार्यता लोकांपुढे ठेवील, धर्म प्रत्यक्षांत कसा आणतां येतो हें दाखवील. लोक वा समाज काय निंदा-स्तुति करतो याकडे लक्षहि न देतां एकाग्र चित्ताने आपलें कार्य करून जाईल.

हाथी चले बजार में कुत्ता भौके हजार।
साधुन को दुर्भाव नहीं, निन्दे चाहे संसार॥

अशाच वृत्तीने नेहमी राहावयास हवें. लोकांच्या भल्याबुऱ्या प्रवादांकडे लक्ष देत बसल्यास जीवनांत कोणतेंहि महत्कार्य साधतां येणें शक्य नाही. 'नायमात्मा बलहीनेन लभ्यः।

शरीरांत, मनांत जर बल नसेल तर आत्मलाभ अशक्य. पौष्टिक आहाराने आधी शरीर सुदृढ करावयास हवें, तेव्हा कुठे मन शक्तिसंपन्न होईल. मन हें शरीराचाच एक सूक्ष्मांश. मन आणि वाणी हीं अत्यंत प्रभावी असावयास हवींत. 'मी हीन, मी दीन' असें सतत घोकत राहिल्यानेच माणूस हीन दीन होऊन जातो. शास्त्रेंहि म्हणूनच सांगतात--

मुक्ताभिमानी मुक्तो हि बद्धो बद्धाभिमान्यपि।
किम्वदन्तीति सत्येयं या मतिः सा गतिर्भवेत् ॥

ज्याची मुक्तीची भावना सतत जागरूक असते तो मुक्त होतो, जो सदान्कदा 'मी बद्ध, मी बद्ध' असें उगाळीत बसतो तो जन्मजन्मान्तरीं बद्धच राहतो. ऐहिक असो वा पारमार्थिक असो, साऱ्याच बाबतींत हेंच तत्त्व सत्य आहे हें लक्षांत ठेव. ऐहिक जीवनांत जे नेहमी हताशचित्त असतात, नेहमी कपाळाला हात लावून बसतात, त्यांच्याकडून कुठलेंच कार्य होत नाही. ते जन्मोजन्मीं 'हाय, हाय' करीत ऊर पिटीत येतात व जातात. 'वीरभोग्या वसुंधरा'-- वीरच या वसुंधरेचा उपभोग घेतात, ही गोष्ट अगदी अटळ सत्य आहे. वीर व्हा. नेहमी म्हणत जा 'अभीः अभीः' मला भय नाही, मी अकुतोभय-- निर्भय आहें. साऱ्यांना गर्जून सांग 'मा भैः मा भैः' भिऊं नका. भय म्हणजेच मृत्यु, भय हेंच पाप, भय म्हणजेच नरक, भय म्हणजेच अधर्म, भय म्हणजेच व्यभिचार. जगांत जे जे म्हणून असद्विचार आहेत ते सारे या भयरूपी सैतानापासूनच निर्माण झाले आहेत. या भयानेच सूर्याला, वायूला, यमाला त्यांच्या त्यांच्या स्थानीं सुदृढपणें निबद्ध करून टाकलें आहे, आपलें स्थान व कार्य सोडून तें कुणालाहि रेसभर इकडे तिकडे हलूं देत नाही. म्हणूनच श्रुतीने म्हटलें आहे--

भयादस्याग्निस्तपति भयात् तपति सूर्यः ।
भयादिन्द्रश्च वायुश्च मृत्युर्धावति पंचमः ।।

ज्या क्षणीं इंद्र, चंद्र, वायु, वरुण हे भयशून्य होतील त्या क्षणीं ते ब्रह्मरूप होतील-- हा सारा सृष्टिरूप अध्यास त्याच क्षणीं जागचे जागीं विरून जाईल. म्हणूनच मी म्हणतों 'अभीः अभीः ।'

बोलण्याच्या आवेशांत स्वामीजींचे नेत्र आरक्त झाले. जणु मूर्तिमान 'निर्भयता' स्वामीजींच्या रूपाने शिष्यासमोर उभी होती. त्यांची ती अभय मूर्ति पाहून शिष्याला वाटलें की यांच्या सान्निध्यांत, यांचें बोलणें ऐकत असतां साक्षात् मृत्युभयहि कुठल्याकुठे पळून जातें.

स्वामीजी पुढे म्हणाले, "हा देह धारण केल्याने सुखदुःखांच्या, आपत्तिविपत्तींच्या लाटांनी तूं सतत विताडित होशील, पण लक्षांत ठेव की या साऱ्या गोष्टी केवळ क्षणभरच टिकणाऱ्या. त्यांच्याकडे लक्षच देऊं नकोस. 'मी अजर, अमर, चिन्मय आत्मस्वरूप' हा भाव हृदयांत अत्यंत दृढपणें ठसवून जीवन घालवावयास हवें. 'मला जन्म नाही, मृत्यु नाही, मी निर्लिप्त आत्मा' या भावनेशीं अगदी तन्मय होऊन जा. असा अगदी पूर्ण तन्मय होऊं शकलास तर दुःखकष्टांच्या वेळीं हा भाव आपोआप मनांत जागृत होईल, प्रयत्न करून तो मनांत आणावा लागणार नाही. नुकताच मी वैद्यनाथ-देवघर येथील प्रियनाथ मुकर्जींच्या घरीं पाहुणा म्हणून गेलों होतों. तेथे असतांना दम्याची अशी ढास लागली की वाटलें आता प्राण जातो. पण प्रत्येक श्वासाबरोबर आंतून गंभीर ध्वनि येत होता, 'सोऽहं, सोऽहम् ।' उशीचा आधार घेऊन आता प्राण केव्हा जातो याची वाट पाहत होतों, अन् ऐकत होतों आंतून ध्वनि निनादत आहे, 'सोऽहं, सोऽहम्'; ऐकूं येत होतें फक्त--'एकमेवाद्वयं ब्रह्म नेह नानास्ति किंचन ।'"

शिष्य मुग्ध होऊन म्हणाला, 'महाराज, आपल्याबरोबर बोलल्यावर व आपल्या साऱ्या अनुभूति ऐकल्यावर शास्त्राध्ययनाची गरज नाही असें मला वाटतें.'

स्वामीजीः— असें नाही बाबा. शास्त्रें ही अभ्यासावयास हवींच. ज्ञानलाभासाठी शास्त्राध्ययन अत्यंत आवश्यक आहे. मी लवकरच मठांत एक वर्ग उघडणार आहें. त्यांत वेद, उपनिषदें, गीता-भागवतादिकांचा अभ्यास होईल. मी त्यांत पाणिनीची अष्टाध्यायी शिकवीन.

शिष्यः-- पाणिनीच्या अष्टाध्यायीचा अभ्यास केला आहे महाराज आपण ?

स्वामीजीः-- जयपूरला असतांना एका महावैय्याकरणी गृहस्थाशीं माझा परिचय झाला. त्यांच्याजवळ व्याकरण शिकावें अशी मला इच्छा झाली. व्याकरणाचे महापंडित असूनहि त्यांना तें शिकविण्याचें तेवढेसें अंग नव्हतें. सतत तीन दिवस त्यांनी मला प्रथमसूत्रावरील भाष्य समजावून सांगितलें. पण मला मात्र तें कांहीकेल्या कळेना. चवथ्या दिवशीं चिडून जाऊन अध्यापक महाशय मला म्हणाले, "स्वामीजी, या तीन दिवसांत मी आपल्याला प्रथमसूत्रावरील भाष्य कांही समजावून देऊं शकलों नाहीं; यावरून मला तरी वाटतें की माझ्या शिकवण्यापासून निदान आपल्याला तरी कांही लाभ होणार नाही." त्यांचें तें बोलणें ऐकून मीं स्वतःचाच धिक्कार केला, मला फार वाईट वाटलें. खाणेंपिणें, झोप, सारें सोडून देऊन प्रथमसूत्रावरील भाष्य स्वतःच समजून घेण्याच्या उद्योगाला मी लागलों. तीनच तासांत ह्या सूत्रभाष्याचा अर्थ मला अगदी स्वच्छ समजला व मग मी त्यांच्याकडे जाऊन तो त्यांना सांगितला. ते म्हणाले, "तीन दिवसांच्या माझ्या प्रयत्नांनी मला जें साधलें नाही तें

आपण तीन तासांत इतक्या उत्कृष्ट रीतीने कसें समजावून घेतलें?" मग मी सपाटचाने अध्यायामागून अध्याय अभ्यासून काढले. मनाच्या एकाग्रतेने काय वाटेल तें साध्य होऊं शकतें-- अगदी सुमेरु पर्वताचें देखील चूर्ण करून टाकतां येईल त्या एकाग्रतेने.

शिष्यः-- आपल्या साऱ्याच गोष्टी अद्‌भुत आहेत महाराज.

स्वामीजी:-- जगांत अद्‌भुत असें कांहीच नाही. अज्ञान हाच अंधार. त्याच्या आवरणाखाली झाकल्या गेल्याने साऱ्या गोष्टी अद्‌भुत वाटतात. ज्ञानालोकाने हें आवरण दूर झाल्यावर अद्‌भुत असें मग कांहीच उरत नाही. अघटनघटनापटीयसी ही माया देखील ज्ञानालोकाने अपसारित (दूर) होते. ज्याला जाणण्याने सारें ज्ञात होतें त्याला जाणून घे, त्याचेंच चिंतन कर, त्या आत्म्याचा साक्षात्कार झाल्यावर शास्त्रार्थ करतलामलकवत् स्पष्ट होईल. पुरातन ऋषिमुनींना जें साधलें तें काय आपल्याला साधणार नाही? आपणहि तर माणसेंच आहोंत ना? एकाच्या जीवनांत जें साधलें तें प्रयत्न केल्यास दुसऱ्यालाहि त्याच्या जीवनांत साधतां येईलच. History repeats itself (इतिहासाची पुनरावृत्ति होत असते.) हा आत्मा सर्व भूतांच्या ठिकाणीं समभावानेच असतो. प्रत्येक भूतमात्राच्या ठिकाणीं त्याचा प्रकाश कमी अधिक असतो येवढाच काय तो फरक. ह्या आत्म्याचा विकास साधण्याचा प्रयत्न कर. मग पाहशील की बुद्धि सर्व विषयांत प्रवेश करूं शकते. अनात्मदर्शी माणसाची बुद्धि एकांगी असते. आत्मज्ञ पुरुषाच्या अकुंठित बुद्धीला अविषय कांहीच नाही-- ती सर्वस्पर्शी असते. आत्मप्रकाश लाभल्यास पाहशील की तत्त्वज्ञान-विज्ञान सारें कांही हस्तगत करतां येते. सिंहगर्जनेने आत्म्याचा गौरव उद्‌घोषित कर. जीवमात्रांना

अभय देऊन सांग, Arise ! Awake ! and stop not till the goal is reached. (उठा, जागे व्हा, आणि ध्येयाप्रत पोहोचेपर्यंत थांबू नका.)

---

## अध्याय १८ वा

**स्थळ-- बेलूर येथील भाड्याने घेतलेली मठाची जागा.**

**वर्ष-- इ. स. १८९८.**

**विषय**-- स्वामीजींच्या निर्विकल्प समाधीचा वृत्तान्त-- ह्या अवस्थेंतून कोण संसारांत परत फिरतात-- अवतारांच्या अद्‌भुत शक्तींचें विवरण व प्रमाण-- शिष्याद्वारें स्वामीजींचें पूजन.

बेलूर येथील उद्यानगृहांतच शिष्य आज दोन दिवसांपासून स्वामीजींबरोबर राहत आहे. कलकत्त्याहून पुष्कळच उत्साही तरुण या सुमारास सतत स्वामीजींकडे येणेंजाणें करीत असल्याने मठांत जणु सारखाच उत्सव सुरू आहे. किती धर्मचर्चा, किती साधनभजन, हीनदीनांचें दुःखमोचन करण्याच्या किती तरी उपायांची तेथे सारखी चर्चा होत असते. महादेवाच्या गणांप्रमाणेच परम उत्साही संन्यासीगण स्वामीजींची आज्ञा पालन करण्यासाठी सदैव तत्पर आहेत. स्वामी प्रेमानंदांनी ठाकुरांच्या पूजेचा भार आपल्याकडे घेतला आहे. मठांत पूजा व प्रसाद यांची मोठी तयारी असते. आलेल्या भक्तांना देण्यासाठी प्रसाद सदैव तयार असतो.

स्वामीजींनी आज शिष्याला स्वतःच्या खोलींत राहण्याची परवानगी दिली आहे. स्वामीजींची सेवा करण्याचा अधिकार मिळाल्याने शिष्याच्या आनंदाला आज पारावार नाही. प्रसाद घेणें आटोपल्यावर तो स्वामीजींचे पाय दाबून देत असतांना स्वामीजी त्याला म्हणाले, "ही असली जागा सोडून काय तर म्हणे तूं कलकत्त्याला निघून जातोस ! काय म्हणावें तुला ? येथील भाव किती पवित्र, गंगा कशी वाहते आहे ! साधूंची सत्संगति कशी लाभते येथे ! असली जागा काय कुठे शोधून तरी सापडेल ?

शिष्यः-- महाराज, अनन्त जन्मींच्या तपस्येचें फळ म्हणून आपल्या शुभसंगतीचा हा लाभ झाला आहे. आता पुन्हा मायामोहबंधांत जेणेंकरून पडावें लागणार नाही असा आशीर्वाद द्या. प्रत्यक्ष अनुभूतीसाठी आताशी मन व्याकुळ होतें.

स्वामीजी:-- माझीहि कितीदा तरी अशी अवस्था होत असे. काशीपूरबागेंत एक दिवस खूप व्याकुळ होऊन ठाकुरांजवळ अत्यंत काकुळतीने प्रर्थना केली. त्यानंतर संध्याकाळीं ध्यानाला बसलों असतां देहाचेंहि भान हरपलें, त्याच्या अस्तित्वाची जाणीवसुद्धा लोपली. चंद्र, सूर्य, देश, काल, आकाश हीं सारीं एकीभूत होऊन जणु कुठे लोप पावलीं. देहादि बुद्धिहि लोपली, माझा लोपच झाला होता म्हणेनास का. 'अहं'ची, 'मीपणा'ची किंचित् जाणीव शिल्लक होती म्हणूनच मी पुन्हा त्या समाधींतून खाली आलों. अशा समाधिकालींच 'मी' व 'ब्रह्म' यांतील भेद मावळतो, सारें एकांत विलीन होऊन जातें-- जणु महासमुद्र, पाणीच पाणी, दुसऱ्या कशाचेंहि अस्तित्व शिल्लक राहत नाही; भाव आणि भाषा समाप्त होऊन जातात,-- अवाङ्मनसगोचरम् या अवस्थेची ठीक उपलब्धि या क्षणीं होते. एरव्ही मी आणि ब्रह्म असें साधक जेव्हा म्हणतो वा चिंतितो तेव्हा मी व ब्रह्म या वस्तु भिन्न असतात. द्वैतबोध त्यांत विद्यमान असतो. तो समाधि-अनुभव पुन्हा लाभावा म्हणून मीं पुढे खूप प्रयत्न केले. पण तो मला लाभला नाही. ठाकुरांना सांगितल्यावर ते म्हणाले, 'रात्रंदिवस तूं त्या अवस्थेंत राहिल्यास जगन्मातेचें कार्य साधणार नाही म्हणून तुला तो अनुभव पुन्हा आता लाभणार नाही. तिचें कार्य संपल्यावर त्याची तुला पुन्हा अनुभूति येईल.

शिष्य:— अद्वैत वा निर्विकल्प समाधि लाभल्यावर काय कुणी

पुन्हा ‘अहं’बोधाचा आश्रय घेऊन द्वैताच्या अधिराज्यांत-- या संसारांत-- परत फिरतच नाही ?

स्वामीजी:-- ठाकुर म्हणत की एकमात्र अवतारपुरुषच जीवहितकामनेने प्रेरित होऊन या समाधींतून खाली येऊं शकतात. साधारण जीवांचें या अवस्थेंतून व्युत्थान होऊं शकत नाही. एकवीस दिवसांनंतर त्याचें शरीर या संसारवृक्षापासून सुकल्या पानाप्रमाणे गळून पडतें.

शिष्य:-- मन विलुप्त झाल्यानंतर जेव्हा समाधि लाभते तेव्हा मग विक्षेपाची, पुन्हा अहंकाराचा आश्रय घेऊन संसारांत परत फिरण्याची, शक्यताच कुठे राहते ? मनच जिथे नाही तिथे कोण, कशानिमित्त समाधि अवस्था सोडून या द्वैतराज्यांत येईल ?

स्वामीजी:-- वेदान्तशास्त्राचा अभिप्राय हा आहे की निःशेष निरोध समाधिलाभानंतर पुन्हा व्युत्थान नाही-- ‘अनावृत्तिः शब्दात् ।’ पण अवतारपुरुष एखादी सामान्य वासना जीवहितासाठी बाळगतात. तिच्याच आश्रयाने ते ज्ञानातीत अद्वैतभूमीवरून ‘मी-तूं’ ज्ञानमूलक द्वैतभूमीवर येतात.

शिष्य:-- पण महाराज, या अवस्थेंत एखादी जरी सामान्य वासना राहत असेल तरी मग या अवस्थेला निःशेष निरोध समाधि म्हणायचें तरी कसें ? कारण शास्त्रें सांगतात की निःशेष निर्विकल्प समाधींत मनाच्या साऱ्या वृत्तींचा, साऱ्या वासनांचा समूळ निरोध वा ध्वंस होऊन जातो.

स्वामीजी:-- महाप्रलयानंतर पुन्हा मग सृष्टि तरी कशी होते ? महाप्रलयकालींहि तरी सारेंच ब्रह्मांत लीन होऊन जातें ना ? पण त्यानंतरहि पुन्हा सृष्टि होत असल्याचें आपण शास्त्रांत वाचतों,—सृष्टि आणि प्रलय एखाद्या प्रवाहाप्रमाणे अविरत चालूं राहतात. महाप्रलयानंतर होणाऱ्या सृष्टि व

प्रलयांच्या पुनरावर्तनाप्रमाणेच अवतारी पुरुषांचे निरोध व व्युत्थान हे अशक्य कसे असतील ?

शिष्यः— पण मीं जर म्हटलें की, प्रलयकालीं भावी सृष्टीचीं बीजें ब्रह्मांत लय पावलेलीं असतात, व ही म्हणजे महाप्रलयाची वा निरोध (निर्विकल्प) समाधीची अवस्था नसून आपण म्हणतां त्याप्रमाणे सृष्टीच्या बीजांचें व शक्तीचें केवळ अव्यक्त रूप धारण करणें होय, तर ?

स्वामीजीः— यावर मी विचारतों की ब्रह्मांत कोणत्याहि गुणांचा आभासहि नसतां, तें अगदी निर्लेप-निर्गुण असतां, त्याच्यापासून सृष्टि कशी निर्माण होते ? ह्याचें उत्तर दे मला.

शिष्यः-- ती निर्मिति तर वास्तव निर्मितिच नव्हे. ती म्हणजे आभासात्मक निर्मिति (Seeming Projection). या प्रश्नाचें उत्तर देतांना शास्त्र सांगतें की ब्रह्मापासून होणाऱ्या सृष्टीचा हा विकास वाळवंटांतील मृगजलाप्रमाणे केवळ भासतो मात्र. पण वस्तुतः ही सृष्टि वगैरे कांहीच नाही. सदा विद्यमान अशा ब्रह्माच्या अभावामुळे, म्हणजेच मायेमुळे हा भ्रम निर्माण झालेला असल्यामुळे तो खोटा आहे.

स्वामीजीः-- सारी सृष्टिच जर मिथ्या असेल तर जीवाचा निर्विकल्प समाधिलाभ व त्या समाधींतून व्युत्थान या साऱ्यांनाहि तूं मिथ्या मानूं शकतोस. जीवच तर ब्रह्म, त्याला पुन्हा कुठली ही बंधनाची अनुभूति. तूं जी 'मी आत्मा' ही अनुभूति व्हावी म्हणून म्हणतोस तीहि मग भ्रमच ठरली. कारण शास्त्रें सांगतात —'तूं नित्य ब्रह्मच आहेस'. म्हणून 'अयमेवहि ते बन्धः समाधिमनुतिष्ठसि--' समाधि लाभावी ही तुझी इच्छाच तुझें बंधन होय.

शिष्यः— हें तर महाकठीण कर्म झालें. मी जर नित्य ब्रह्मच आहें तर मला सतत तशी अनुभूति कां होत नाही ?

स्वामीजीः-- ही अनुभूति 'मी-तूं' जाणिवेच्या या द्वैतभूमीवर तुला घ्यावयाची असेल तर ज्याच्या द्वारा ही अनुभूति घ्यावयाची असें एखादें साधन (some instrumentality) हवें. हें साधन म्हणजे आपलें मनच होय. पण मन आहे जडवस्तु. मनामागे असलेल्या आत्म्याच्या प्रभेनेच तें चेतन म्हणून प्रतिभात होतें. म्हणूनच पंचदशीकारांनी म्हटलें आहे 'चिच्छायावेशतः शक्तिः चेतनेव विभाति सा।' चित्स्वरूप आत्म्याच्या छाया वा प्रतिबिंबाच्या प्रभावानेच शक्ति चैतन्यमयी म्हणून भासते. व म्हणूनच मन चेतन असावेसें वाटतें. यामुळे 'मनानें' शुद्धचैतन्यस्वरूप आत्म्याला जाणतां येणार नाही हें निश्चित. त्याकरता मनाच्या अतीत जावयास हवें. मनाच्या अतीत तर आता कोणतेंहि साधन राहिलें नाही, आहे काय तो एक आत्मा. म्हणजे ज्याला जाणावयाचें तोच आता साधन होण्याची वेळ आली. कर्ता, कर्म, करण हीं तिन्ही आता एक झालींत. म्हणूनच श्रुति म्हणते, 'विज्ञातारमरे केन विजानीयात्।' या साऱ्याचें सार हें की द्वैतभूमीपलीकडे अशी एक अवस्था आहे की जेथे कर्ता, कर्म, करणादि द्वैत बोध नाही. मनाचा निरोध झाल्यास त्या अवस्थेचा प्रत्यय येतो--ती प्रत्यक्ष प्रत्ययास येते. दुसरा योग्य शब्द नसल्याने या ठिकाणीं 'प्रत्यक्ष' हा शब्द लावला आहे. एरव्ही ही अवस्था भाषेद्वारा व्यक्त करण्यासारखी नाही. शंकराचार्यांनी तिला 'अपरोक्षानुभूति' म्हणून संबोधिलें आहे. ही प्रत्यक्षानुभूति वा अपरोक्षानुभूति झाल्यावरहि अवतारादि पुरुष द्वैतभूमीवर उतरून इतरांना तिचा आभास देतात. म्हणूनच म्हणतात की आप्तपुरुषांच्या अनुभवांतूनच वेदादिशास्त्रांची उत्पत्ति झाली आहे. सामान्य माणसाची अवस्था मात्र समुद्राची खोली मोजायला जाऊन विरघळून जाणाऱ्या बाहुलीप्रमाणे असते. समजलें ?

ठोकळमानाने सांगावयाचें झाल्यास 'तूं नित्य ब्रह्म आहेस' हें तूं 'जाणावयास' हवें असें म्हणतां येईल. तूं सदा आहेस तें ब्रह्मच, पण तरीहि मध्ये एक जड मन आल्याने (यालाच शास्त्रांत माया म्हणतात) तें कळत नाही. तो सूक्ष्म-जडरूप उपादानाने बनलेला मनरूप पदार्थ प्रशमित झाल्यावर आत्मा स्वप्रभेने उद्भासित होतो. ही माया वा हें मन मिथ्या आहे याला प्रमाण हेंच की मन स्वतः जड व अंधकारस्वरूप असतें, त्यामागे असलेल्या आत्म्याच्या दीप्तीनेच तें चेतन असल्याप्रमाणे भासतें. ह्याचा अनुभव जेव्हा येईल तेव्हा एका अखंड चेतनेंत मनाचा विलय होऊन जाईल---तेव्हाच अनुभूति येईल 'अयमात्मा ब्रह्म' अशी.

कांही वेळाने 'तुला झोप येते आहे वाटतें ? मग जा नीज आता,' असें स्वामीजी शिष्याला म्हणाले. स्वामीजींच्या बाजूनेच असलेल्या बिछान्यावर शिष्य जाऊन झोपला. रात्रीं नीट झोप न आल्याने स्वामीजी मधून मधून उठूं लागले, तेव्हा शिष्यहि उठून त्यांची आवश्यकतेनुरूप सेवा करूं लागला. अशा तऱ्हेने रात्र संपली व रात्रीच्या शेवटच्या प्रहरीं एक अद्‌भुत स्वप्न पाहिल्याने शिष्याने मोठ्या आनंदाने शय्यात्याग केला. सकाळीं गंगास्नान करून येऊन पाहतो तों स्वामीजी मठाच्या खालील मजल्यावर एका बाकावर पूर्वाभिमुख होऊन बसले असल्याचें त्याला आढळलें. आदल्या रात्रीचें स्वप्न आठवून स्वामीजींची पाद्यपूजा करण्यासाठी त्याचें मन आतुर झालें व आपला हेतु सांगून स्वामीजींना त्याने तसें करूं देण्याबद्दल परवानगी मागितली. त्याचा खूपच आग्रह पाहून स्वामीजींनी त्याला संमति दिली. नंतर त्याने पुष्कळशीं धोत्र्याचीं फुलें आणून स्वामीजींची शिवज्ञानाने विधिवत् पूजा केली.

त्याची पूजा आटोपल्यावर स्वामीजी त्याला म्हणाले, 'तुझी

पूजा तर आटोपली. पण आता इतक्यांत बाबूराम (प्रेमानंद) येऊन तुला खाऊं की गिळूं करून टाकील. तूं ठाकुरांच्याच पूजापात्रांत माझे पाय ठेवून माझी पूजा केलीस!' हें बोलणें संपतें न संपतें तोंच स्वामी प्रेमानंद तेथे आल्याचें पाहून स्वामीजी त्यांना म्हणाले, 'अरे! पाहा बरें याने आज ही काय भानगड करून ठेवली ती! ठाकुरांचें सारें पूजासाहित्य आणून याने माझी पूजा केली!' यावर प्रेमानंद महाराज हसून म्हणाले, 'झालें तें ठीकच झालें! तुम्ही आणि ठाकुर काय भिन्न आहांत?' त्यांचें तें उत्तर ऐकून शिष्याचा जीव भांड्यांत पडला.

शिष्य एक कट्टा हिंदु होता. अखाद्य खाणें तर दूरच राहो, कुणीं शिवलेला पदार्थ देखील तो खात नसे. येवढ्याचमुळे स्वामीजी कधी कधी त्याला 'भटजी' म्हणून संबोधीत असत. सकाळच्या न्याहारीच्या वेळीं विलायती बिस्कुटें खात असतां स्वामीजी सदानंदाला म्हणाले, 'जा बरें, त्या भटजीबुवाला धरून घेऊन ये.' तो आल्यावर स्वामीजींनी आपल्या फराळाच्या वस्तूंपैकी कांही त्याला प्रसाद म्हणून खावयास दिल्या. कांहीहि अडचण-सबब न सांगतां त्याने त्या खाल्ल्याचें पाहून स्वामीजी थट्टेने म्हणाले, 'आज तूं काय खाल्लेंस माहीत आहे? ते सारे पदार्थ कोंबडीचीं अंडीं घालून तयार केलेले होते!' यावर शिष्याने उत्तर दिलें, 'तें कांहीहि असो. तें समजावून घेण्याची माझी इच्छा नाही. आपल्या हातून मिळविलेलें हें प्रसादरूप अमृत खाऊन मी आज अमर झालों.' हें ऐकून स्वामीजी म्हणाले, "आजपासून तुझा जात्यभिमान, वर्ण, कुलीनपणा, पाप, पुण्य वगैरेंचा सारा अभिमान कायमचा नष्ट होवो असा मी तुला आशीर्वाद देतों."

स्वामीजींच्या त्या दिवशींच्या अयाचित, अपार दयेचें स्मरण होऊन आपला मानवजन्म सार्थकीं लागला असें शिष्याला वाटतें.

दुपारीं श्री. मन्मथनाथ भट्टाचार्य, अकाउंटंट जनरल, हे स्वामीजींच्या भेटीस आले. अमेरिकेला जाण्यापूर्वी मद्रासला स्वामीजी बरेच दिवस त्यांच्या घरीं पाहुणे म्हणून राहिले होते. तेव्हापासूनच त्यांची स्वामीजींवर विशेष भक्ति-श्रद्धा होती. भट्टाचार्यांनी स्वामीजींना पाश्चात्य देश व भारतवर्ष यांच्याबद्दल अनेक गोष्टी विचारल्या. त्यांच्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन व अन्यहि गोष्टींनी त्यांना संतुष्ट करून स्वामीजी म्हणाले, 'एखादा दिवस येथेच राहून जा ना?' 'आणखी कधी तरी येऊन राहीन' असें आश्वासन देऊन मन्मथबाबू जाण्यासाठी निघाले. जिना उतरत असतां ते एकाजणाला म्हणाले, 'हे जगांत असें कांही अद्‌भुत कार्य करतील असें ते मद्रासला असतांनाच आमच्या लक्षांत आलें होतें. असली सर्वगामी प्रतिभा मानवांत कधी आढळून येत नाही.'

मन्मथबाबूंना पोहोचविण्यासाठी स्वामीजी गंगाकिनाऱ्यापर्यंत गेले व नमस्कार करून त्यांनी त्यांना निरोप दिला. त्यानंतर कांही वेळ मैदानांत पाय मोकळे करून ते विश्रांति घेण्यासाठी म्हणून वर निघून गेले.

---

# अध्याय १९ वा

**स्थळ— बेलूर येथील भाडयाची जागा.**

**वर्ष-- इ. स. १८९८.**

**विषय**-- स्वामीजी शिष्याला व्यापारउदीम करावयास उत्साहित करतात— श्रद्धा व आत्मविश्वास यांच्या अभावानेच या देशांतील मध्यमवर्गांतील लोकांना दुर्दशा प्राप्त झाली आहे-- इंग्लंडमध्ये नोकरीला हीन मानून लोक नोकऱ्यांना कमी लेखतात-- भारतांतील सुशिक्षित लोकांची निष्क्रियता-- वास्तविक शिक्षण कशाला म्हणतात-- अन्य देशांतील लोकांची कार्यतत्परता व आत्मनिष्ठा-- भारतांतील सभ्य लोकांपेक्षा भारतांतील इतर जातींत आता जास्त जागृति होत असून सभ्य समाजाकडून त्या आपलें ऋण वसूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत-- सभ्य समाजाने जर त्यांच्या या उत्थानाला हात लावला तर भविष्यकालांत त्यामुळे उभयतांचेंहि कल्याण होईल— इतर जातींना गीतोक्त मार्गाने शिक्षण दिल्यास त्या आपलें जातीय कर्म टाकून देणें तर दूरच राहो, उलट मोठ्या अभिमानाने तें करतील-- सभ्य समाजाने जर अन्यजातीयांना आता मदत केली नाही तर भविष्यकाल बिकट.

शिष्य आज सकाळींच मठांत आला. स्वामीजींना वंदन करून तो उभा राहतांच ते त्याला म्हणाले, “अशीच नोकरी करीत राहिल्याने तुला काय लाभ होणार आहे आयुष्यांत ? त्यापेक्षा तूं दुसरा कांही व्यापारधंदा कर.” शिष्य त्या वेळीं एके ठिकाणीं खाजगी शिक्षकाचें काम करीत असे. संसारपरिवाराचा भार अद्यापहि त्याच्या माथीं पडला नव्हता. आनंदाने त्याचे दिवस जात. शिक्षकाच्या कामासंबंधी त्याने विचारल्यावर स्वामीजी म्हणाले, “सतत शिक्षकाचें काम करीत राहिल्याने माणसाची बुद्धि मठ्ठ होते. त्याच्या ज्ञानाचा कधी विकासच होत नाही.

रात्रंदिवस मुलाबाळांतच राहिल्याने तो अगदी जडबुद्धि होऊन जातो. यापुढे तूं मास्तरकी करूं नकोस."

शिष्य:-- तर मग काय करूं ?

स्वामीजी:-- कां बरें ? जर तुला संसारच करावयाचा आहे, पैसा मिळवण्याची इच्छा आहे, तर मग जा अमेरिकेस. धंदा मी शिकवतों तुला. पाहशील पांच वर्षांत कितीतरी पैसा कमावूं शकशील.

शिष्य:-- कसला व्यापार करूं ? आणि त्या व्यापाराला लागणारा पैसा तरी कुठून आणूं ?

स्वामीजी:-- एखाद्या पागलासारखी काय बडबड करतो आहेस ? तुझ्यांत अदम्य शक्ति आहे. फक्त 'मी म्हणजे कुणी नाहीं' असा विचार करकरूनच तू असा वीर्यहीन झाला आहेस. फक्त तूंच का ? सारा समाजच्या समाज तसा झाला आहे. जरा एकदा जग हिंडून ये म्हणजे भारतेतर देशांतील लोकांत जीवनप्रवाह कसा आवेग-आनंदाने वाहतो आहे, कसा प्रबल आहे तें तुला दिसून येईल. आणि तुम्ही काय करतां ? इतकें शिकून सवरून, येवढी विद्या कमावून दुसऱ्यांच्या दारीं भिकाऱ्यांसारखे 'नोकरी द्या, नोकरी द्या' म्हणून केकाटतां आहांत ! जोडे खाऊन खाऊन, गुलामी करकरून तुम्ही काय आता माणसें राहिलां आहांत ? एखाद्या फुटक्या कवडीइतकीहि तुमची किंमत नाही. जेथे निसर्ग अन्य साऱ्या देशांपेक्षा कोटिकोटि पटींनी अधिक अन्नधान्य उत्पन्न करतो अशा सजल, सुफल देशांत जन्माला येऊनहि तुमच्या पोटीं अन्नाचा कण नाही, अंगाला वस्त्र नाही. अन्नपूर्णेचा वरदहस्त असणाऱ्या ज्या या देशांतील धनधान्याने इतर साऱ्या देशांत संस्कृतीचा विस्तार केला, त्या या देशांत तुमची अशी घोर दुरवस्था असावी ना ? एखाद्या

कुत्र्यापेक्षाहि तुमची अधिक दुर्दशा झाली आहे ! आणि तरीहि तुम्ही आपल्या वेदवेदान्ताची घमेंड मारतां ! जी जात अत्यंत सामान्य अन्नवस्त्राचीहि आपली गरज भागवूं शकत नाही, त्यासाठी जिला दुसऱ्यांच्या तोंडाकडे पाहून आपलें जीवित कंठावें लागतें, त्या जातीने वर असली घमेंड मारावी ! धर्मकर्म सारें गंगेंत बुडवून आधी आता जीवनसंग्रामांत पुढे व्हा. भारतांत किती विविध वस्तु होतात. परदेशी लोक तो सारा कच्चा माल नेऊन त्याच्या साह्याने सोनें पिकवतात, आणि तुम्ही भारवाही गाढवांप्रमाणे त्यांनी आणलेला माल उरींपोटीं वाहून मरतां. भारतांत जो कच्चा माल उत्पन्न होतो तो देशविदेशींचे लोक नेतात, आपली बुद्धि चालवून त्यांतून नानाप्रकारच्या वस्तु तयार करतात व मोठे होतात; आणि तुम्ही आपली बुद्धि गाडून टाकून घरांतलें धन दुसऱ्यांना वांटून देऊन 'अन्न, अन्न' करून भीक मागत हिंडतां आहांत.

शिष्य:— कोणत्या उपायाने ही अन्नसमस्या सुटूं शकेल महाराज ?

स्वामीजी:— उपाय तर तुमच्या हातीं आहे. डोळ्यांवर पट्टया बांधून तूं म्हणतोस, 'मी आंधळा, मला कांहीहि दिसत नाही.' डोळ्यांवरची ती पट्टी फाडून फेक म्हणजे दिसेल की मध्याह्नीच्या सूर्यप्रकाशाने सारें जग प्रकाशित झालें आहे. जहाजावर एखादी नोकरी धरून परदेशांत जा. देशी कापड, पंचे, सुपें, झाडण्या डोक्यावर घेऊन युरोपच्या, अमेरिकेच्या रस्त्यांवरून हिंड विक्री करीत, पाहशील की अजूनहि भारतांत तयार झालेल्या वस्तूंचें काय मोल आहे तें. अमेरिकेंत हुगळी जिल्ह्यांतील कितीतरी मुसलमान अशा तऱ्हेने फेरीवाल्यांचा धंदा करून श्रीमंत झालेले दिसतात. त्यांच्यापेक्षाहि काय तुमची

बुद्धि, विद्या कमी आहे ? हेंच पाहा ना, या देशांत जी बनारसी साडी होते, तसलें उत्कृष्ट कापड साऱ्या पृथ्वीच्या पाठीवर इतर कुठेहि तयार होत नाही. तूं हेंच कापड घेऊन अमेरिकेला जा. तेथे या कापडाचे झगे करून वीक, पाहशील कसा पैसा मिळतो तें.

शिष्य:-- पण महाराज, बनारसी साड्यांचे झगे ते काय म्हणून घालतील ? मीं तर ऐकलें आहे की असलें रंगीबेरंगी कापड त्या देशांतील स्त्रियांना पसंत नसतें म्हणून ?

स्वामीजी:-- त्या तें कापड घेतील किंवा नाही हें मी पाहीन. तूं काम करावयाची तयारी ठेव आणि त्या देशांत जा. त्यांच्यासाठी मी तुझ्याजवळ परिचयपत्रें देतों. हें कापड सुरवातीला आपापसांत घेण्यासाठी मी त्यांना विनंती करीन. मग पाहशील किती लोक त्यांचें अनुकरण करतात तें. मालाच्या मागणीचा पुरवठा करतां करतां तुझी मुष्कील होऊन जाईल.

शिष्य:-- हा धंदा सुरू करायला सुरवातीलाच भांडवल कुठून आणायचें ?

स्वामीजी:-- सुरवातीला कसें तरी करून मी तुझें काम सुरू करून देईन. पुढे मात्र तुला आपल्या प्रयत्नांवर अवलंबून राहावें लागेल. 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।' या प्रयत्नांत अखेर तूं पुरा गारद जरी झालास तरी हरकत नाही-- तुझें पाहून आणखी दहा लोक पुढे येतील. याउलट यशस्वी जर झालास तर सुखासमाधानाने आयुष्य घालवूं शकशील.

शिष्य:-- तें ठीक आहे. पण कांहीकेल्या हिंमत होत नाही.

स्वामीजी:-- म्हणूनच तर मी म्हणतों की तुमच्यांत श्रद्धा नाही बाबा, तुमच्यांत आत्मप्रत्ययच नाही मुळी. कसें होईल तुमचें कुणास ठाऊक ? न तुमच्याने होणार संसार, न साधणार तुम्हांला धर्मकर्म. एक तर मी म्हणतों त्याप्रमाणे उद्योगधंदा

करून यशस्वी हो, नाही तर मग सारें सोडून देऊन आमच्या पावलांवर पाऊल टाकून आमच्या मार्गाने ये, देश-विदेशींच्या लोकांना धर्मोपदेश करून त्यांचें कल्याण कर. असें करशील तरच ना तुला आमच्यासारखी भिक्षा मिळूं शकेल ? देवाणघेवाण, आदानप्रदान असल्याखेरीज कुणी कुणाकडे ढुंकूनहि पाहत नाही. आम्ही चारदोन धर्मकथा सांगतों म्हणून गृहस्थलोक आम्हांला पोटाला दोन मुठी अन्न देतात हें तर तूं पांहतोसच ना ? तुम्ही करणारच जर कांही नाही तर लोक तरी तुम्हांला फुकट काय म्हणून पोसतील ? नोकरी-चाकरींत, त्या गुलामगिरींत इतकें दु:ख पाहूनहि तुमच्यांत कांही चेतना उत्पन्न होत नाही ! म्हणूनच दुःखकष्टहि तुमचा पिच्छा सोडीत नाही. हा खरोखर गुणमयी दैवी मायेचाच खेळ म्हटला पाहिजे. त्या देशांत जे दुसऱ्यांची चाकरी करतात त्यांचें पार्लमेंटमध्ये बसण्याचें स्थान अगदी मागे असतें. ज्यांनी स्वत:च्या प्रयत्नाने, विद्याबुद्धीने वा अन्य प्रकारें नांवलौकिक मिळविला असतो त्यांच्यासाठीच समोरच्या जागा राखून ठेविल्या असतात. त्यांच्या देशांत जातपातीची भानगडच नसते. उद्यम व परिश्रमामुळे भाग्यलक्ष्मी ज्यांच्यावर संतुष्ट असते तेच देशाचे नेते व नियंते म्हणून मानले जातात. आणि तुमच्या देशांत तुम्ही जातीची बढाई करकरूनच अखेर अन्नाला मोताद झालां आहांत. एक सुई करायची म्हटलें तर अक्कल नाही आणि इंग्रजांवर टीका करायला धावतां ! त्यांच्या पायाशीं बसून जीवनसंग्रामाला उपयुक्त विद्या, कला, विज्ञान, कर्मतत्परता वगैरे गोष्टी शिका. जेव्हा जीवनसंग्रामांत लायक ठराल, तेव्हाच कुठे तुम्हांला मानसन्मान मिळेल पुन्हा. मगच तेहि तुमचें म्हणणें ऐकून घेतील. कशाचा कशाला कुठे पत्ता नाही--केवळ कांग्रेस स्थापून, आरडाओरड करून काय लाभ होणार आहे ?

शिष्य:-- पण देशांतील सारे शिक्षित लोक तींत भाग घेतात ना ?

स्वामीजी:-- कुणी कांही परीक्षा दिल्या, वा व्याख्यानांची आतषबाजी केली की झाला तो तुमच्या दृष्टीने शिक्षित ! ज्या शिक्षणाच्या उन्मेषाने बहुजनसमाज जीवनसंग्रामार्थ बद्ध-परिकर होऊं शकत नाही, जें शिक्षण चारित्र्यबल, परसेवातत्परता व सिंहसदृश साहसशक्ति निर्माण करूं शकत नाही त्याला काय शिक्षण म्हणायचें ? ज्या शिक्षणबलाने माणूस जीवनांत आपल्या पायांवर उभा राहूं शकतो तेंच खरें शिक्षण. जें शिक्षण तुम्ही आज शाळाकॉलेजांमधून घेतां त्यामुळे तुमची एक अजीर्णाच्या रोग्यांची जातच जणु तयार होत आहे. किल्ली दिलेल्या एखाद्या यंत्रागत तुमची कष्टमय अवस्था, 'जन्मले आणि मेले' या विधानाचें तुम्ही जणु मूर्तिमंत प्रतीकच. शेतकरी, चांभार, भंगी यांची देखील कर्मप्रवणता व आत्मनिष्ठा तुमच्यांतील अनेकांपेक्षा अधिक श्रेष्ठ मानावी लागेल. अनादिकालापासून ते अगदी चुपचाप काम करीत आले आहेत, देशासाठी तेच धनधान्यांची पैदास करताहेत— पुन्हा कुठे तक्रार नाही की कांही नाही. हेच लोक तुम्हांला मागे टाकतील. पैसा, भांडवल त्यांच्या हातीं जात आहे व गरजांच्या भाराखाली ते कांही तुमच्यासारखे दबलेले नाहीत. सध्याच्या शिक्षणाने तुमची फक्त बाह्य पोशाखी राहणीच बदलली पण नवनवीन गोष्टींच्या निर्माणक्षमतेच्या अभावीं तुम्हांला अर्थोत्पादनाचे अन्य उपाय कांही गवसत नाहीत. आजपावेतों तुम्ही या सहनशील, पददलित जमातींना पायदळीं तुडविलें, पण आता मात्र ते लोक या साऱ्यांचा नक्कीच कडकडून सूड उगवतील. आणि तुम्हांला मात्र 'नोकरी, नोकरी' करूनच प्राण सोडावा लागेल.

शिष्य:-- इतर देशांच्या मानाने आमच्यांतील नव-निर्माण-क्षमता जरी कमी पडत असली तरी भारतांतील साऱ्या जाती आमच्याच बुद्धिबलावर विसंबून आहेत. अशा स्थितींत ब्राह्मण-कायस्थादि उच्चवर्णीयांना जीवनसंग्रामांत पराजित करण्याची क्षमता वा शिक्षण या जातींत कोठून येईल ?

स्वामीजी:-- त्यांनी कदाचित् तुमच्यासारखीं पुस्तकें वाचलीं नसतील; कोट, बूट, पँट घालून ते लोक कदाचित् तुमच्यासारखे दिखाऊ सभ्य बनले नसतील हें खरें ! पण या साऱ्यांचा वास्तविक उपयोग तरी काय ? ते कांहीहि असो पण तेच आहेत साऱ्या राष्ट्राचे आधारस्तंभ-- अगदी सर्व-- देशांत. या साऱ्या हलक्या समजल्या जाणाऱ्या जातींच्या लोकांनी जर काम बंद केलें तर तुम्हांला अन्नवस्त्र तरी कोठून मिळेल ? अगदी एखादाच दिवस जरी कलकत्त्यांत भंग्यांनी काम केलें नाही तर कोण कल्लोळ माजतो, त्यांनी फक्त जरी तीनच दिवस काम केलें नाही तरी सारें शहर साथीच्या रोगांनी उजाड होऊन जाईल ! श्रमजीवी लोकांनी काम करण्याचें नाकारलें तर अन्नवस्त्रांची तुमची सारी रसद आता एका क्षणांत बंद पडते. ही वस्तुस्थिति असूनहि तुम्ही त्यांना हलक्या जातीचे मानतां ! स्वत:ला शिक्षित समजून घमेंड मारतां !

जीवनसंग्रामार्थ लढण्यांत सतत व्यग्र राहिल्याने या लोकांत ज्ञानाचा उदय झाला नाही. मानवी बुद्धीने नियंत्रणा-खाली ठेवलेल्या यंत्राप्रमाणे ते सारखे राबत आले आणि बुद्धिमान चतुर लोकांनी त्यांच्या परिश्रमाचें व उपार्जनाचें सार तेवढें आपण लाटलें. सर्व देशांत हेंच झालें. पण आता मात्र काळ पालटला आहे. आस्ते आस्ते या अन्य जातींना ही गोष्ट उमजत आहे. त्या एकत्र येऊन संघटित रीतीने विरुद्ध उभ्या

राहून आपले न्याय्य हक्क मिळविण्यासाठी दृढप्रतिज्ञ होत आहेत. युरोप-अमेरिकेंतील ह्या जमातींनी तर जागृत होऊन आधीच लढ्याला सुरवात करून दिली आहे. भारतांतहि ह्या नवजागृतीचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. ह्या लोकांनी आजकाल पाळलेले हरताळ हेंच त्या जागृतीचें प्रमाण. आता कितीहि आटापिटा केला तरी उच्चवर्णीय लोक या लोकांना दडपून ठेवूं शकणार नाहीत. या लोकांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देण्यास मदत करण्यांतच आता उच्चवर्णीयांचें कल्याण आहे.

येवढ्याचसाठी या सर्वसाधारण जनतेमध्ये शिक्षणाचा प्रसार करावयास लागा असें माझें सांगणें आहे. त्यांना समजावून सांगा, नीट पटवून द्या की आपण त्यांचे भाऊ, ते जणु आपल्याच शरीराचा एक भाग, आपल्या मनांत त्यांच्याबद्दल प्रेमच आहे, घृणा नाही. तुमच्या अशा सहानुभूतीने ते शतगुणित उत्साहाने कार्यतत्पर होतील. आधुनिक विज्ञानाच्या मदतीने त्यांच्या ज्ञानाची वाढ करा. इतिहास, भूगोल, विज्ञान, साहित्य व यांच्या बरोबरच धर्मांतील गूढ तत्त्वें ह्या साऱ्यांचें त्यांना शिक्षण द्या. या शिक्षणाच्या मोबदल्यांत शिक्षकांचें दारिद्र्य धुऊन निघेल. या आदानप्रदानानेच या उभयतांत मैत्रीचें प्रेमळ नातें निर्माण होईल.

शिष्य:-- पण महाराज, त्यांच्यांत जर शिक्षणाचा प्रसार झाला तर कालान्तराने तेहि आमच्यासारखेच सुपीक डोक्याचे पण निरुद्योगी व आळशी होतील आणि त्यांच्यापेक्षा हलक्या लोकांच्या परिश्रमाचें फळ लुबाडतील.

स्वामीजी:-- काय म्हणून होईल असें? शिकूनसवरूनहि कुंभार कुंभारच राहील, कोळ्यांत कांही बदल होणार नाही आणि शेतकरीहि शेतीच करतील. आपले जन्मजात उद्योगधंदे ते काय म्हणून सोडतील? ‘सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न

त्यजेत्—' या भावनेने जर त्यांना शिक्षण मिळालें तर ते आपापले जन्मजात व्यवसाय सोडतीलच कशाला? शिक्षणाने आपला जन्मजात धंदा अधिक चांगल्या रीतीने करण्याचा प्रयत्न ते करतील. कालांतराने त्यांच्यातूनहि दहापांच प्रतिभाशाली लोक निघतीलच. त्यांना तुम्ही उच्चवर्णीयांनी आपल्यांत सामावून घ्यावयास हवें. तेजस्वी विश्वामित्राचा ब्राह्मणांनी ब्राह्मण म्हणून स्वीकार केल्याने सारी क्षत्रिय जात ब्राह्मणांना कशी कृतज्ञ झाली आहे बरें? असल्या सहानुभूतीने आणि साहाय्याने माणसच तर काय पण पशुपक्षी देखील आपलेसे होतात.

शिष्य:-- आपण म्हणतां तें खरें. पण मला वाटतें की उच्चवर्णीयांत व इतर लोकांत अद्यापहि फार अंतर आहे. या उच्चवर्णीय लोकांत सहानुभूतीची भावना निर्माण करणें फार कठीण काम आहे.

स्वामीजी:-- पण असें जर झालें नाही तर तुम्हां उच्चवर्णीय लोकांची कांही धडगत नाही. आजपर्यंत आपसांत भांडणतंटे, मारामाऱ्या ह्या ज्या भानगडी तुम्ही करीत आलांत त्याच करीत राहून तुमचा नाश होईल. हा उच्चवर्णीयेतर बहुजनसमाज जेव्हा जागा होईल व तुम्ही त्यावर करतां ते अत्याचार जेव्हा त्याला कळूं लागतील तेव्हा त्याच्या भयंकर फुत्कारांनीच तुम्ही कुठल्या कुठे उडून जाल. त्याच लोकांनी तुमची संस्कृति घडवली, पण पुढे ती सारी तेच मातींत मिळवतील. एवढी मोठी रोमन संस्कृति पण गॉल लोकांच्या हातीं पडतांच कशी मातीस मिळाली, विचार करून पाहा एकदा जरा! म्हणून मी वारंवार सांगतों की या साऱ्या हलक्या जातींना विद्यादान, ज्ञानदान देऊन त्यांना या सुदीर्घ निद्रेंतून जागे करण्याचा प्रयत्न करा. ते जेव्हा जागे होतील--आणि ते जागे होणारच यांत शंका नाही--तेव्हा

ते देखील तुम्ही केलेले उपकार विसरणार नाहीत. कृतज्ञताच बाळगतील ते तुमच्याबद्दल.

हें सारें बोलणें झाल्यावर स्वामीजी शिष्याला म्हणाले, "त्या साऱ्या भानगडी आता राहूं दे. तूं काय करावयाचें ठरविलें आहेस तें सांग. भानगडी बाकीच्या कशाहि असोत पण तूं मात्र कांही तरी कर. कांही व्यापारधंदा कर एकतर, नाही तर आम्हां लोकांप्रमाणे 'आत्मनो मोक्षार्थं जगत्-हिताय च' अशा यथार्थ संन्यासमार्गाचा अवलंब कर. या दोहोंत हा अखेरचा मार्ग अर्थात् सर्वांत श्रेष्ठ मार्ग. संसारी होऊन काय होणार आहे माती ? विचार करकरून तर पाहिलेंस की सारें क्षणिक--'नलिनीदलगतजलमतितरलं तद्वत् जीवितमतिशयचपलम्।'--म्हणून आत्मज्ञान मिळविण्याचा कांही उत्साह असेल तर आता अधिक वेळ व्यर्थ दवडूं नकोस. याच क्षणीं पुढे ये. यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेत्। परहितार्थ आपलें बलिदान देऊन दारोदार जाऊन अभयवाणी ऐकव साऱ्यांना--"उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत।'"

## अध्याय २० वा

**स्थळ-- बेलूर येथील मठाची भाड्याची जागा.**
**वर्ष-- इ. स. १८९८**

**विषय**— उद्बोधन मासिकाची सुरवात-- या मासिकासाठी स्वामी त्रिगुणातीतानंदांनी घेतलेला दगदगीचा व कष्टांचा भार-- हें मासिक काढण्याचा स्वामीजींचा हेतु-- श्रीरामकृष्णांच्या संन्यासी-संतानगणांचा त्याग-- गृहस्थांच्या कल्याणासाठीच मासिक व अन्य प्रचार-- उद्बोधन मासिक चालविण्याची रूपरेषा-- उच्चभावाने जीवन व्यतीत करण्यासाठी मार्ग दाखविणें-- कुणाची घृणा करणें नको किंवा कुणाला भय दाखवावयास नको-- घृणा व भय यांच्यामुळेच भारताचें पतन झालें-- शरीर सुदृढ करणें.

आलमबाजारांतून बेलूर येथील नीलांबरबाबूंच्या उद्यानगृहांत मठ आल्यानंतर कांही दिवसांनी स्वामीजींनी आपल्या गुरुबंधूंसमोर ठाकुरांचा भाव बहुजनसमाजांत प्रसृत करण्यासाठी बंगालींत एक मासिक काढण्याचा प्रस्ताव मांडला. सुरवातीला एक दैनिक वर्तमानपत्र काढण्याची कल्पना त्यांनी मांडली. पण त्याला खर्च फार लागेल असें दिसल्याने एक पाक्षिक काढावें असें अखेर ठरलें. स्वामी त्रिगुणातीतानंदांवर हा सारा कारभार सोपविण्यांत आला. स्वामीजींनी दिलेले हजार रुपये व ठाकुरांच्या भक्तांपैकी एकाने दिलेले कर्जाऊ हजार रुपये असे मिळून दोन हजार रुपयांनी या कार्याचा आरंभ झाला. एक छापखाना घेऊन तो शामबाजारांतील रामचंद्र मैत्र यांच्या गल्लींत श्री. गिरीशनाथ बसक यांच्या घरीं ठेवण्यांत आला. त्रिगुणातीतानंदांनी या कार्याची जबाबदारी स्वीकारून बंगाली सन १३०५ च्या माघ महिन्याच्या प्रथम दिवशींच या पत्राचा पहिला अंक काढला. स्वामीजींनी या पत्राचें नांव 'उद्बोधन' असें ठेवून त्याचा उत्कर्ष

व्हावा म्हणून आशीर्वाद दिला. न थकतां न शिणतां स्वामी त्रिगुणातीतानंदांनी या पत्राच्या छपाई व प्रचारासाठी जे परिश्रम केले त्याला तोड नाही. कधी गृहस्थांच्या घरीं मिळणाऱ्या भिक्षेवर राहून, कधी उपाशीपोटीं तर कधी छापखाना व मासिक यांच्या कामासाठी ५-५ मैल अंतर तंगडचा तोडीत जाऊन या पत्राच्या उन्नतीसाठी व प्रसारासाठी प्राण पणाला लावून त्यांनी कष्ट केले. पैसा खर्चून कामासाठी नोकर ठेवण्याची सोय नव्हती आणि स्वामीजींचा वर हुकूम होता की पत्रासाठी जमलेल्या पैशांतून एक पै देखील पत्राखेरीज इतर कामावर खर्च करूं नये. म्हणून स्वामी त्रिगुणातीतानंद भक्तांच्या घरीं भिक्षा मागून पोटाची सोय लावून घेत व पैशांबाबतचा स्वामीजींचा हुकूम तंतोतंत पाळीत.

मासिकाची प्रस्तावना स्वामीजींनी लिहून दिली व असेंहि ठरलें की ठाकुरांच्या गृहस्थ व संन्यासी भक्तांनी या मासिकांत लिहावें. कुठल्याहि प्रकारच्या अश्लील जाहिराती वा निवेदनें या मासिकांत येऊं नयेत असाहि दंडक स्वामीजींनी घालून दिला. संघटित स्वरूपांत परिणत झालेल्या रामकृष्ण संघाच्या सदस्यांना स्वामीजींनी या मासिकांतून लेख लिहून ठाकुरांच्या धर्मभावांचा सर्वसाधारण जनसमाजांत प्रचार करण्याची विनंती केली. मासिकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाल्यावर शिष्य मठांत गेला. स्वामीजींना नमस्कार करून तो बसल्यावर त्यांनी मासिकाबाबत बोलणें काढून त्याला विचारलें, (विनोदाने मासिकाच्या नांवाचा विकृत उच्चार करून) "काय रे, 'उद्‌बंधन' पाहिलेंस ?"

शिष्यः-- होय, फार सुंदर अंक निघाला आहे.

स्वामीजीः-- या मासिकांतील विचार व भाषाशैली हीं नव्या साच्यांतून घडवून तयार करावयास हवींत.

शिष्य:-- कशा रीतीने ?

स्वामीजी:-- ठाकुरांची भावधारा सर्वांपर्यंत पोहोचावयास हवी हें तर खरेंच पण याबरोबरच बंगाली भाषेंत एक नवा जोम उत्पन्न करावयास हवा. उदाहरणार्थ विशेषणांचा उपयोग करून क्रियापदांचा वापर कमी केला पाहिजे. जास्त क्रियापदें वापरल्यास भाषेचा जोर कमी होतो. अशा शैलीने लेख लिहिण्यास तूं सुरवात कर. लिहिलेलें आधी मला दाखव व मग तें उद्‍बोधनमध्ये प्रसिद्धीस दे.

शिष्य:-- महाराज, स्वामी त्रिगुणातीतानंद या मासिकासाठी जे परिश्रम घेत आहेत ते इतरांना साधणें शक्य नाही.

स्वामीजी:-- तुला काय वाटलें की ठाकुरांचे हे संन्यासी संतानगण फक्त झाडाखाली धुनी लावून स्वस्थ बसायला जन्मले आहेत ? त्यांच्यापैकी कुणीहि कोणत्याहि कार्यक्षेत्रांत जेव्हा पाय ठेवील तेव्हा त्याचें काम पाहून सारे लोक थक्क होऊन जातील. काम कसें करावें हें त्यांच्यापाशी शीक. माझ्या आदेशाचें पालन करण्यासाठी हा त्रिगुणातीतच पाहा ना कसा आपली ध्यानधारणा, साधनभजन सारें सोडून देऊन कामाला लागला आहे. हा काय कमी त्याग झाला ? या कर्मप्रवृत्तीमागे त्याचें माझ्याबद्दल केवढें प्रेम असेल पाहा बरें ? कामांत फत्ते होईल तेव्हा तो थांबेल. आहे तुमच्यांत असा दृढ निश्चय ?

शिष्य:-- पण भगवीं वस्त्रें धारण केलेल्या संन्याशांनी गृहस्थांच्या घरीं दारोदार हिंडावें हें निदान मला तरी बरें वाटत नाही.

स्वामीजी:-- कां बरें ? मासिकाचा प्रचार गृहस्थांच्या कल्याणासाठीच आहे ना ? देशांत होणाऱ्या या नवभावधारेच्या प्रचाराने कल्याणच साधणार आहे. हें फलनिरपेक्ष निष्कामकर्म

साधनभजनापेक्षा कमी असें का तुला वाटतें ? आमचा उद्देश आहे जीवांचें हित करणें. या मासिकाच्या खपांतून पैसा जमविणें हा कांही आमचा हेतु नाही. आम्ही आहोंत सर्वस्वत्यागी संन्यासी. आम्हांला मागे कांही बायकापोरें नाहीत की त्यांच्यासाठी कांही ठेवून जावें लागेल. साधलें तर हा सारा पैसा जीवसेवेसाठीच खर्च होणार आहे. जागोजाग मठ स्थापणें, सेवाश्रम उघडणें यांसारख्या लोकोपयोगी कामांतच शिलकी पैशाचा सदुपयोग होऊं शकेल. संसारी लोकांप्रमाणे स्वतःचे खिसे भरण्यासाठी तर कांही आम्ही विचार करकरून कामें करीत नाही ? शुद्ध परोपकाराच्या हेतूनेच आमचें हें काम होणार हें पक्कें ध्यानांत ठेव.

शिष्यः-- तसें जरी असलें तरी सारेच कांही तुमचा हा हेतु समजूं शकणार नाहीत.

स्वामीजीः-- न का समजेनात ! त्याचें काय मोठेसें ? आमचें काय नुकसान आहे त्यांत ? निंदा-स्तुतींचा हिशेब करून तर कांही आम्ही काम करायला निघालों नाही.

शिष्यः-- महाराज, हें पत्र पंधरा पंधरा दिवसांनी पाक्षिक स्वरूपांत निघणार त्यापेक्षा तें साप्ताहिक म्हणून काढलें तर बरें असें मला वाटतें.

स्वामीजीः-- तें कठीण आहे. पण तें करायला एकदम पैसा कुठे आहे ? ठाकुरांच्या कृपेने पैसा जर जमला तर पुढे तें दैनिक म्हणूनहि काढतां येईल. रोज लक्ष प्रती काढून कलकत्त्याच्या गल्लीगल्लींतून तें फुकटहि वांटतां येईल.

शिष्यः-- आपला हा संकल्प खूप छान आहे खरोखर.

स्वामीजीः-- माझी तर इच्छा आहे की हें मासिक एकदा ठीक चालू लागलें म्हणजे तुला मग त्याचा संपादक नेमावें म्हणून.

कोणत्याहि गोष्टीची सुरवातीला उभारणी करण्याची ताकद अजून तुमच्यांत नाही. तें सामर्थ्य आहे या सर्वत्यागी संन्यासी-वर्गांत. काम करतां करतां ते प्राण देतील पण मागे हटणार नाहीत. थोडी टीका झाली, थोडा विरोध झाला की लागलीच तुमच्या डोळ्यांपुढे अंधारी येते.

शिष्य:-- त्या दिवशीं पाहिलें, स्वामी त्रिगुणातीतानंदांनी छापखान्यांत काम सुरू होण्यापूर्वी ठाकुरांची पूजा केली व सिद्धि-लाभासाठी आपलेहि कृपाशीर्वाद लाभावे म्हणून प्रार्थना केली.

स्वामीजी:-- ठाकुर आहेत आम्हां सार्‍यांचें केंद्रस्थान. त्या केंद्रीय ज्योतीचा आम्हांपैकी प्रत्येकजण म्हणजे एक एक किरण. ठाकुरांची पूजा करून का त्याने कामाला आरंभ केला? ठीक केलें. पण मला कसें कुणीं सांगितलें नाही या पूजेबाबत?

शिष्य:-- महाराज, ते आपल्याला खूप भितात. स्वामी त्रिगुणातीतानंदांनी कालच मला सांगितलें, "तूं प्रथम जाऊन या पहिल्या अंकाबाबत स्वामीजी काय अभिप्राय देतात तें पाहा--नंतरच मी त्यांना भेटेन."

स्वामीजी:-- तूं सांग मग जाऊन त्याला की त्याचें काम पाहून मला खूपच समाधान वाटलें. त्याला माझे आशीर्वाद कळव खूप. आणि तुम्हीहि त्याला शक्य तितकी मदत करा. त्याला मदत करण्याने ठाकुरांचेंच काम केल्यासारखें होईल.

नंतर स्वामी ब्रह्मानंदांना बोलावून आणून गरज पडल्यास पुढे उद्बोधनसाठी स्वामी त्रिगुणातीतानंदांना अधिक पैसा द्या असें स्वामीजींनी त्यांना सांगितलें. रात्रीं जेवणानंतरहि शिष्याचें स्वामीजींशीं बोलणें झालें. आम्ही आता तेंच वाचकांना निवेदन करतों.

स्वामीजी:-- उद्बोधनमधून बहुजनसमाजापुढे विधायक व

भावात्मकच कल्पना ठेवावयास हव्यात. अभावात्मक (negative) विचार माणसाला दुबळा बनवितात. जे आईबाप मुलांमागे रात्रंदिवस अभ्यासाचा लकडा लावतात, जे म्हणतात 'हा असाच राहणार भीकमाग्या,' त्याच्या कानींकपाळीं जे सदा घोकतात, 'हा गधा, हा मूर्ख,' त्यांचीं मुलें अखेर तशींच निघाल्याचें आपण पाहतोंच ना ? मुलांना भले म्हटल्यास, त्यांना प्रोत्साहन दिल्यास पुढे तीं खात्रीने चांगलीं निघतात. हा जो नियम मुलांना लागू, तोच उच्च विचारांच्या बाबतींत जे लोक लहान मुलांसारखेच असतात त्यांनाहि लागू पडतो. विधायक कल्पना त्यांना देऊं शकल्यास बहुजन-समाज यथार्थ 'माणसांत' परिणत होईल, व आपल्या पायांवर उभा राहूं शकेल. भाषा, साहित्य, तत्त्वज्ञान, काव्य, कला या साऱ्या बाबतींत लोकांच्या विचारांत वा प्रयत्नांत ज्या चुका होत असतात त्याच फक्त दाखवीत न बसतां, याच गोष्टी आहेत त्यापेक्षा क्रमशः अधिक चांगल्या प्रकारें कशा करतां येतील हेंच सतत त्यांच्या निदर्शनास आणावयास हवें. चुकाच दाखविल्याने लोकांच्या भावना दुखावल्या जातात. ज्यांना आम्ही अगदी तुच्छ, तिरस्करणीय म्हणून टाकाऊ समजत होतों त्यांना देखील प्रोत्साहन देऊन त्यांच्या जीवनाचा मार्ग संपूर्णपणें बदलून टाकतांना आम्ही ठाकुरांना पाहिलें आहे. त्यांची शिकविण्याची पद्धत देखील अद्भुत होती.

नंतर कांही वेळ स्तब्ध बसून ते पुन्हा बोलूं लागले, "उठल्यासुटल्या ज्याच्या त्याच्या कडे पाहून नाक मुरडणें म्हणजे धर्मप्रचार असें कधीहि समजूं नकोस. शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक वा अन्य साऱ्याच बाबतींत विधायक विचार, भावात्मक विचार प्रसृत करावयास हवेत. आणि हें सारे करायला हवें कुणाची घृणा वा तिरस्कार न करतां. एकमेकांची घृणा कर-

करूनच तुमचा अधःपात झाला आहे. आता विधायक विचारांचा प्रसार करूनच आपल्याला लोकांना सहानुभूतीचा हात देऊन वर उठवावें लागेल. अशा रीतीने आधी साऱ्या हिंदु जातीचा व मग साऱ्या जगाचा उद्धार करावयास हवा. ठाकुरांचा अवतार आहे याचसाठी. त्यांनी कुणाच्याहि मनोभावावर कधीहि आघात केला नाही. अत्यंत अधःपतित माणसालाहि त्यांनी अभय देऊन, प्रोत्साहित करून वर आणलें. त्यांच्याच पावलांवर पाऊल टाकून आपल्यालाहि साऱ्यांना मदतीचा हात द्यावा लागेल, साऱ्यांना जागृत करावें लागेल.

"तुमचा इतिहास, तुमचें साहित्य, तुमचीं पुराणें वा अन्य शास्त्रग्रंथ माणसाला सर्वदा नुसतेच भेडसावीत असतात--सतत माणसाच्या कानींकपाळीं ओरडत असतात, 'तूं नरकांत जाशील, आता तुला दुसरी गति नाही!' म्हणूनच तर ही जीवघेणी हतबलता भारताच्या अगदी हाडींमासीं भिनली आहे. यावर तोडगा म्हणून वेद-वेदान्तांतील प्रभावशाली, चैतन्यदायी, उच्च उच्च विचार अगदी साध्या-सोप्या व सरळ भाषेंत लोकांना समजावून सांगावयास हवेत. सदाचार, सद्व्यहार, सद्विचार व सुविद्या देऊन चांडाललाहि ब्राह्मणाच्या बरोबरीस आणावयास हवें. उद्बोधनमध्ये हें सारें लिहून स्त्री, पुरुष, वृद्ध, बाल या साऱ्यांत जागृति निर्माण कर बघूं. तेव्हाच तुझ्या वेद-वेदान्त शिकण्याचें सार्थक झालें असें म्हणीन. काय, करूं शकशील हें?

शिष्य:-- आपल्या आदेशाने व आशीर्वादाने साऱ्याच गोष्टींत यशस्वी होईन असें वाटतें.

स्वामीजी:— आणखी एक गोष्ट. शरीर सुदृढ ठेवायला तुला शिकावें लागेल व इतरांना शिकवावें लागेल. पाहतोसच ना तूं, की अद्यापहि मी रोज डंबेल्सूनी व्यायाम घेतों तें? दररोज

सकाळसंध्याकाळ फिरायला जाण्याचा परिपाठ ठेवायला हवा. Body and mind must run parallel (शरीर आणि मन या दोहोंचा विकास बरोबरच व्हावयास हवा.) साऱ्याच गोष्टींत दुसऱ्यावर विसंबून राहून कसें निभेल ? शरीर सुदृढ असण्याचें महत्त्व पटलें की लोक मग आपोआपच त्या दिशेने प्रयत्न करतील. तें महत्त्व पटवून देण्यासाठीच आता आवश्यकता आहे शिक्षणाची.

---

# अध्याय २१ वा

**स्थळ— कलकत्ता**

**वर्ष— इ. स. १८९८.**

**विषय—** सिस्टर निवेदितासह स्वामीजींची अलिपूर येथील पशुसंग्रहालयाला भेट-- केन्द्र पाहतेवेळच्या गोष्टी व विनोद-- पाहणें झाल्यावर तेथील अधिकारी बाबू रामब्रह्म संन्याल यांचेकडे चहा व उत्क्रांतिवादासंबंधी चर्चा-- उत्क्रांतीचें कारण म्हणून पाश्चात्य पंडित जी मीमांसा करतात ती अखेरची नाही-- याविषयी महामुनि पतंजलींचें मत -- बागबाजारांत घरीं परत आल्यावर स्वामीजींनी उत्क्रांतीसंबंधी पुन्हा केलेली चर्चा-- पाश्चात्य पंडितांनी क्रमविकासाचीं म्हणून सांगितलेलीं कारणें मानवेतर प्राणिजगताला लागू पडत असलीं तरी मानवाच्या परिणतीचीं कारणें संयम व त्याग हींच होत-- सर्वांनी शरीर सुदृढ करावें या स्वामीजींच्या आदेशामागील हेतु.

आज तीन दिवस झालेत स्वामीजी बागबाजारांतील कै. बलराम बोस यांच्या घरीं राहत आहेत. दररोज असंख्य लोकांची गर्दी होत असते. स्वामी योगानंदांचेंहि वास्तव्य स्वामीजींबरोबर तेथेच आहे. आज सिस्टर निवेदिता यांना बरोबर घेऊन स्वामीजी अलिपूर येथील पशुसंग्रहालय पाहावयास जाणार आहेत. शिष्य आल्याचें पाहून त्याला व स्वामी योगानंदांना उद्देशून ते म्हणाले, ‘तुम्ही पुढे व्हा. मी निवेदिताला बरोबर घेऊन गाडीने थोडया वेळाने येतों.’

शिष्याला बरोबर घेऊन २॥ च्या सुमाराला स्वामी योगानंद ट्रामने रवाना झाले. त्या वेळीं घोडयांच्या ट्राम्स् असत. चारचे सुमारास पशुसंग्रहालयांत पोहोचून त्यांनी संग्रहालयाचे त्या वेळचे सुपरिन्टेन्डन्ट रा. ब. बाबू रामब्रह्म संन्याल यांची भेट घेतली.

स्वामीजी येणार असल्याचें ऐकून रामबाबूंना फार आनंद झाला व स्वामीजींचें स्वागत करण्यासाठी ते बागेच्या फाटकाशीं उभे राहिले. साडेचारच्या सुमारास निवेदितांसह स्वामीजी तेथे येऊन दाखल झाले. रामबाबूंनी मोठ्या आदराने स्वामीजी व निवेदिता यांचें स्वागत करून त्यांना प्राणिसंग्रहालयोद्यानांत नेलें व जवळ-जवळ दीड तास त्यांच्याबरोबर हिंडून बागेंतील अनेक प्रेक्षणीय गोष्टी त्यांना दाखविल्या. स्वामी योगानंदहि शिष्याला बरोबर घेऊन त्यांच्या मागून जात होते.

रामबाबू वनस्पतिशास्त्राचे कृतविद्य पंडित होते. बागेंत हिंडत असतां तेथील अनेक झाडें दाखवून वनस्पतिशास्त्रानुसार काल-क्रमाने झाडांमध्यें कसकसा क्रमविकास होत गेला ही माहिती ते सांगूं लागले. स्वामीजींनीहि तेथील विविध प्राणी पाहून त्या प्राण्यांत कसकसा क्रमविकास झाला याबाबत डार्विनच्या मताचा उल्लेख केला. शिष्याला अजून आठवतें की सापाच्या घरापाशी येऊन त्यांतील एकाच्या अंगावर चक्रचिन्हें पाहून त्यांनी म्हटलें, 'पाहा, याच्यापासूनच पुढे कालक्रमाने कासव निर्माण झाला. एकाच जागीं राहून राहून क्रमशः त्याची पाठ टणक झाली.'

नंतर सारी मंडळी वाघसिंहाच्या विभागाकडे जाऊं लागली. रामबाबूंच्या आदेशावरून तेथील गड्यांनी खूप मांस आणून ते आमच्या समोरच त्या वाघसिंहांना खाऊं घालावयास सुरवात केली. तें खात असतां त्यांनी आनंदाने केलेल्या गर्जना ऐकून व त्यांचें तें खाणें थोडा वेळ पाहून सारी मंडळी त्या बागेंतच असलेल्या रामबाबूंच्या घरीं आली. तेथे चहा-फराळाची व्यवस्था केलेली होती. स्वामीजींनी थोडासा चहा घेतला. एकाच टेबलावर बसून सिस्टर निवेदितांनी शिवलेले पदार्थ व चहा घेण्यास शिष्य

मागेपुढे पाहतो आहे हें लक्षांत आल्याने स्वामीजींनी पुन:पुन्हा आग्रह करून त्याला ते घ्यावयास लावले व स्वत: थोडें पाणी पिऊन राहिलेलें शिष्याला प्यावयास दिलें. नंतर डार्विनच्या क्रमविकासवादावरून कांही वेळ बोलणें झालें.

रामबाबू:-- डार्विनने मांडलेला क्रमविकासवादाचा सिद्धान्त व त्यासाठी दिलेलीं कारणें याबद्दल आपलें काय मत आहे ?

स्वामीजी:-- डार्विनचा सिद्धान्त सुसंगत असला तरी क्रमविकासाच्या कारणांबद्दल तो एक अन्तिम सिद्धान्त आहे असें मला वाटत नाही.

रामबाबू:-- आपल्या देशांतील प्राचीन विद्वानांनी या विषयासंबंधी कांही विवेचन केलें आहे काय ?

स्वामीजी:-- सांख्यदर्शनांत याबाबत सुरेख विवेचन आढळतें. भारताच्या प्राचीन तत्त्वज्ञांनी क्रमविकासाच्या कारणाबाबत मांडलेला सिद्धान्तच अन्तिम स्वरूपाचा आहे असें मला वाटतें.

रामबाबू:-- थोडक्यांत जर तो सिद्धान्त सांगतां येण्यासारखा असेल तर तो ऐकण्याची माझी इच्छा आहे.

स्वामीजी:-- खालच्या पातळीवरील प्राणी वरच्या पातळीवर उत्क्रान्त होण्यासाठी पाश्चात्त्यांनी Struggle for existence (टिकण्यासाठी धडपड), survival of the fittest (टिकण्यास सर्वांत योग्य असतात तेच टिकतात), natural selection (नैसर्गिक निवड ) वगैरे जे नियम कारणीभूत होतात म्हणून सांगितले आहेत ते आपल्याला खात्रीने माहीत असतील. पण पातंजल दर्शनांत वरीलपैकी एकालाहि क्रमविकासाचें कारण म्हणून मान्यता दिलेली नाही. पतंजलींच्या मतें एका species (जाती) मधून दुसऱ्या species ची परिणति 'प्रकृत्यापूरात्' म्हणजे प्रकृतीच्या पूर्तिक्रियेद्वारा होते. आलेल्या आवरणांशीं वा

Obstacles शीं रात्रंदिवस झगडून वरील परिणति साध्य होते असें नाही. माझ्या मतें तर जीवनसंग्राम किंवा प्रतिस्पर्धा या गोष्टी जीवाच्या पूर्णतालाभाला अनेकदा अडथळे आणतात. हजारो प्राण्यांचा नाश करून जर एखाद्या जीवाची उन्नति होणार असेल ( व या गोष्टीचें पाश्चिमात्त्य तत्त्वज्ञ समर्थन करतांना आढळतात ) तर असें म्हणावें लागेल की क्रमविकासाच्या द्वारें संसाराची कांही उन्नति होणार नाही. ऐहिक उन्नतीच्या दृष्टीने ही गोष्ट कदाचित् मान्य जरी केली तरी आध्यात्मिक विकासाच्या दृष्टीने ती फार मोठ्या अडथळ्यासारखी आहे. आमच्या देशांतील तत्त्वज्ञांच्या मतें सारे जीव पूर्ण आत्मस्वरूप होत. आत्मप्रकाशाच्या तारतम्यानेच विभिन्न स्वरूपांत प्रकृतीची अभिव्यक्ति व विकास या गोष्टी दिसून येतात. प्रकृतीच्या व्यक्त होण्याच्या व विकासाच्या मार्गांतील अडथळे ज्या क्षणीं संपूर्णपणें दूर होतात त्या क्षणीं पूर्ण स्वरूपांत आत्मविकास झाल्याचें आढळून येतें. प्रकृतीच्या अभिव्यक्त दशेंतील अगदी खालच्या पातळीवर कांहीहि असो, पण तिच्या उन्नत स्तरावरील समूहांच्या बाबतींत, त्यांना अडथळ्यांशीं दिवसरात्र युद्ध करूनच या अडथळ्यांपलीकडे जावें लागतें असें नाही. त्या उन्नत स्तरांवर तर आढळून येतें की ज्ञान, ध्यानधारणा, व प्रामुख्याने त्यागाद्वाराच ते अडथळे दूर होतात व त्यामुळेच अधिकाधिक आत्मविकास होतो. म्हणून या अडथळ्यांना आत्मप्रकाशाचें कार्य न मानता त्याचें कारण मानणें व त्यांना प्रकृतीच्या अभिव्यक्तीचे साहाय्यक म्हणणें हें तर्कसंगत वाटत नाही. हजारो पाप्यांची कत्तल करून जग पापमुक्त करण्याच्या प्रयत्नांनी जगांत पापाचीच वृद्धि अधिक होते. पण उपदेश-ज्ञानाद्वारा जर लोकांना पापापासून परावृत्त केलें तर जगांत पापच राहणार नाही. आता तुमच्या लक्षांत

येईल की पाश्चात्त्यांच्या struggle theory ने किंवा आपसांतील संग्रामाने वा स्पर्धेने उन्नतिलाभ होतो हें तत्त्व केवढें भयंकर रूप धारण करतें तें.

रामबाबू स्वामीजींचें बोलणें ऐकून आश्चर्यचकित झाले व म्हणाले, "आपल्यासारख्या पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाची माहिती असलेल्या व्यक्तींचीच खरोखर आज देशाला गरज आहे. असेच लोक एकांगी शिक्षण झालेल्या लोकांच्या डोळयांत अंजन घालून त्यांना त्यांच्या चुका दाखवून देऊं शकतील. आपण केलेलें क्रमविकासवादाचें हें विवरण ऐकून मला खूप आनंद झाला."

निरोप देण्यासाठी म्हणून रामबाबू स्वामीजींबरोबर फाटकापर्यंत आले व सवड सापडल्यास स्वामीजींशीं एकटयाशींच पुन्हा खाजगी बोलण्याची इच्छा दर्शवून त्यांनी स्वामीजींना निरोप दिला. रामबाबूंची ही इच्छा पूर्ण झाली वा नाही हें शिष्याला माहीत नाही. पण यानंतर लागलीच थोडया दिवसांनी रामबाबूंचें देहावसान झालें.

शिष्य रात्रीं ८च्या सुमारास ट्राममधून स्वामी योगानंदांबरोबर बागबाजारांत परत आला. स्वामीजी १५ मिनिटांपूर्वीच येऊन आराम करीत होते. सुमारे अर्ध्या तासाने ते पुन्हा आमच्या बैठकींत येऊन बसले. तेव्हा बैठकींत स्वामी योगानंद, कै. शरच्चंद्र सरकार, डॉ. शशिभूषण घोष, डॉ. बिपिनबिहारी घोष, शान्तिराम घोष वगैरे परिचित मंडळी, स्वामीजींच्या दर्शनासाठी आलेल्या अपरिचित अशा पांचसहा माणसांसह बसली होती. प्राणिसंग्रहालयांत रामबाबूंबरोबर स्वामीजींनी क्रमविकासावर नवीनच पद्धतीने विवेचन केल्याचें ऐकून त्याबाबत अधिक माहिती जाणण्यासाठी ही सारी मंडळी उत्सुक होती. त्यांची

इच्छा पाहून शिष्याने स्वामीजी आल्याबरोबर तोच विषय काढला.

शिष्यः— महाराज, त्या प्राणिसंग्रहालयांत क्रमविकासासंबंधीचें आपलें जें बोलणें झालें तें कांही नीटसें समजलें नाही. कृपा करून आपला तो मुद्दा थोडा सोपा करून सांगा ना?

स्वामीजीः— कां बरें ? काय नाही समजलें ?

शिष्यः-- हें की आपण अनेकदा आम्हांला सांगतां की बाह्य शक्तींशीं झगडा करण्याची क्षमता हेंच जीवनाचें चिन्ह आहे व तोच उन्नतीचा मार्ग आहे. आज तेथे तर आपण नेमकें याच्या उलट प्रतिपादन केलें ?

स्वामीजीः-- काय उलट प्रतिपादन केलें मीं ? तुलाच तें समजलें नाही. निम्न प्राणिजगतांत खरोखरच struggle for existence, survival of the fittest वगैरे नियम आपल्याला आढळून येतात. म्हणूनच डार्विनचा सिद्धान्त कांहीसा बरोबर असावा असें वाटतें. पण मानवीजगतांत (जिथे बुद्धीचा वा ज्ञानाचा विकास झाला आहे) या सिद्धान्ताच्या विरुद्धच गोष्टी आढळून येतात. असें पाहा की ज्यांना आपण खरोखर श्रेष्ठ वा आदर्श व्यक्ति म्हणून मानतों त्यांच्या जीवनांत हा बाह्य संघर्ष अजिबातच आढळून येत नाही. मानवेतर प्राण्यांत सहजप्रवृत्तींचें प्राबल्य असतें. पण माणूस जसजसा उन्नत होतो तसतसा बुद्धीचा वा ज्ञानाचा त्याच्यामध्ये विकास होतो. म्हणून प्राणिजगताप्रमाणे बुद्धियुक्त मानवी जगतांत दुसऱ्याचा नाश करून प्रगति होऊं शकत नाही. मानवाचा सर्वश्रेष्ठ विकास फक्त त्यागानेच होऊं शकतो. दुसऱ्यांसाठी जो जितका अधिक त्याग करील तितका तो मानवांत श्रेष्ठता पावेल. उलट प्राणिजगतांत जो प्राणी इतरांचा जास्तींत जास्त फडशा पाडील तितका तो अधिक

बलवान प्राणी गणला जाईल. म्हणूनच हा जीवन-संग्रामाचा सिद्धान्त प्राणी व मानव या उभयतांना सारखाच लागू होऊं शकत नाही. मानवाचा संघर्ष असतो मनांत. मनाला जो जितका अधिक काबूंत आणूं शकतो तितका तो अधिक थोर. मनाच्या संपूर्ण वृत्तिहीन अवस्थेंतच आत्म्याचा विकास होत असतो. मानवेतर प्राणिजगतांत स्थूल देहाचें रक्षण करण्यासाठी जो संग्राम आढळून येतो तोच मानवजगतांत मन ताब्यांत आणण्यासाठी किंवा सद्वृत्तिसंपन्न होण्यासाठी चालूं असतो. जिवंत झाड व त्याविरुद्ध त्याची तळयाच्या पाण्यांत पडणारी सावली यांच्यात जो भेद तोच मानवेतर प्राण्यांतील संग्रामांत व मानवांत चालूं असलेल्या संग्रामांत आढळून येतो.

शिष्य:— तर मग शारीरिक उन्नति साधण्यासाठी तुम्ही आम्हांला येवढचा आग्रहाने काय म्हणून सांगत असतां ?

स्वामीजी:— तुम्ही माणसें आहांत असें का वाटतें तुम्हांला ? तुमच्यांत बुद्धीची थोडीशी चमक आहे इतकेच ! शरीर जर धड सुदृढ नसेल तर मनाशीं झगडा करणार तरी कसा ? जगाने पूर्ण विकसित म्हणून मानलेला माणूस का तो तुम्ही आहांत ? आहार, निद्रा, भय, मैथुनादिकांपेक्षा तुमच्यांत अधिक तें काय आहे ? अजूनहि तुम्ही चतुष्पाद झालां नाहीत हें भाग्य समजा ! श्रीरामकृष्ण म्हणत, 'मान हूँस आछे जार से मानुष' अर्थात् आपल्या दैवी गौरवाची ज्याला जाणीव असते तोच खरा माणूस. 'जन्मले आणि मेले' असली पशुतुल्य अवस्था हेंच तुमच्या जीवनाचें सार. स्वदेशियांना द्वेष्य व परदेशियांना घृणास्पद झालें आहे तुमचें जीवन ! तुम्ही मानवेतर प्राणिजगतांतलेच आहांत' आणि म्हणूनच तुम्हांला बाह्य संग्रामार्थ सिद्ध व्हावयास मी सांगतों. तुझा सिद्धान्त वगैरे ठेव सारा बाजूला. आपले दैनिक

व्यवहार व जीवन हे शान्तपणें निरखून पाहाल तर मानव व पशु यांच्या कुठे तरी मधे आपण असल्याचें दिसून येईल ! आधी शरीर सुदृढ करा. तरच ना कुठे मनावर ताबा मिळवतां येईल?-- 'नायमात्मा बलहीनेन लभ्यः ।'— समजलें ?

शिष्यः-- पण 'बलहीनेन' याचा अर्थ 'ब्रह्मचर्यहीनेन' असा शंकराचार्यांनी केला आहे.

स्वामीजीः-- केला असेल. पण मी म्हणतों की शरीरानें दुर्बल असणाऱ्यांना आत्मसाक्षात्कार होणें शक्य नाही.

शिष्यः-- पण सुदृढ शरीराचे पुष्कळ लोक तर अगदी निर्बुद्ध असतात ?

स्वामीजीः-- अशांना जर तुम्ही चांगल्या कल्पना दिल्या तर ते त्या जितक्या लवकर आत्मसात् करूं शकतील तितक्या लवकर हे हतवीर्य, गलितगात्र दुबळे लोक करूं शकणार नाहीत. पाहत नाहीस, दुबळीं माणसें कामक्रोधांचे आवेग काबूंत ठेवूं शकत नाहीत तें ? रोगट, दुबळे लोक क्षणांत चटकन् रागावतात, क्षणांत अगदी कामविव्हल होतात.

शिष्यः-- पण या नियमांना कांही अपवादहि आढळतात.

स्वामीजीः— तें कोण नाकारतो ? मनावर एकदा पूर्ण ताबा आल्यावर मग शरीर शुष्क होवो वा सबळ राहो, त्याचें कांही विशेष नाही. ठोकळमानाने मात्र हें खरें की सुदृढ शरीर असल्याखेरीज माणूस आत्मज्ञानाचा अधिकारी होऊं शकत नाही. 'एवढासा जरी शरीरांत अयब असला तरी कुणी सिद्ध होऊं शकत नाही' असें ठाकुर म्हणत.

बोलण्याच्या भरांत स्वामीजी उत्तेजित झाल्याचें पाहून अधिक कांही बोलण्याचें धाडस शिष्याला झालें नाही. तो चुप बसला. कांही वेळाने थट्टेच्या सुरांत स्वामीजी म्हणाले,

"आणखी एक गोष्ट कळली का ? आज एका भटजीबुवाने निवेदितेचें उष्टें खाल्लें. तिने शिवलेली मिठाई खाल्ली यांत कांही विशेष हरकत नाही, 'पण (येथे शिष्याकडे वळून त्यांनी विचारलें,) 'पण तिने शिवलेलें पाणी तूं कसा काय प्यालास ?'"

शिष्य:-- तसें करायला तुम्हींच तर मला आज्ञा केली. गुरूच्या आदेशानुसार मी काय वाटेल तें करीन. तें पाणी पिण्याचें मात्र खरोखरच माझ्या जिवावर आलें होतें. आपण उष्टावूनच तेथे आपल्या हाताने मला दिलें म्हणूनच प्रसाद म्हणून तिने शिवलेलें तें पाणी मी प्यालों.

स्वामीजी:-- तुझी जात आज अगदी साफ बुडाली. आजपासून तुला कुणी ब्राह्मण, भटजी म्हणून मानणार नाही.

शिष्य:-- न का मानेना ! आपल्या आज्ञेवरून मी तर चांडाळाघरच्या मडक्यांत भातहि खावयास मागेपुढे पाहणार नाही !

शिष्याचें हें बोलणें ऐकून स्वामीजीसहित सारे लोक मोठमोठ्याने हसूं लागले.

बोलण्याच्या नादांत रात्रीचे १२॥ वाजून गेले. तेवढ्या रात्रीं शिष्य घरीं येऊन पाहतो तों दार बंद ! हाका मारूनहि कुणीं दार उघडलें नाही. म्हणून अखेर त्याला बाहेरच्या पडवींतच निजून ती रात्र काढावी लागली.

कठोर कालचक्राच्या परिवर्तनांत आज ते स्वामीजीहि नाहीत, ते योगानंदहि नाहीत व ती भगिनी निवेदिताहि नाही ! त्यांच्या जीवनाच्या परम पावन स्मृतिच काय त्या आज बाकी उरल्या आहेत. त्यांच्या बोलण्याचालण्याचा कांही भाग लिहून काढतां येतो आहे याच आनंदाने शिष्याला आज धन्य वाटतें !

## अध्याय २२ वा

**स्थळ-- बेलूर येथील मठाची भाड्याची जागा.**

**वर्ष-- इ. स. १८९८.**

विषय--- श्रीरामकृष्ण-मठाला एका अद्वितीय धर्मक्षेत्रांत परिणत करण्याची स्वामीजींची इच्छा--मठांतील ब्रह्मचाऱ्यांना कसल्याप्रकारें शिक्षण देण्याचा संकल्प होता--अन्नछत्रें व सेवाश्रम स्थापन करून ब्रह्मचाऱ्यांना संन्यासासाठी व ब्रह्मविद्यालाभासाठी सुयोग्य करण्याचा मानस--यामुळे सामान्य जनांचा काय लाभ होणें शक्य आहे--परार्थ केलेलें कर्म बन्धनकारक होत नाही—मायेचें आवरण दूर झाल्यावरच जीवांचे ठिकाणीं ब्रह्मविकास--या ब्रह्मविकासामुळेच सत्यसंकल्पत्व लाभतें— मठाला सर्वधर्मसमन्वय-केन्द्रांत परिणत करणें--शुद्धाद्वैताचा व्यवहार संसारांतील सर्व अवस्थांत करतां येतो हें दाखविण्यासच स्वामीजींचें आगमन--वेदान्तवाद्यांपैकी एका पंथाचें मत असें की संसारांतील सर्वजण जोंवर मुक्त होत नाहीत तोंवर तुम्हांला मुक्ति नाही--ब्रह्मज्ञान झाल्यावर स्थावर-जंगमात्मक समग्र जग, सारे जीव आपणच आहोंत अशी अनुभूति--अज्ञानाचा अवलंब केल्यानेच जगांतील सारे व्यवहार चालतात--अज्ञानाचा आदि व अन्त--शास्त्रें सांगतात की प्रवाहरूपाने अज्ञान नित्यसें भासतें पण तें आहे सान्तच--सारें ब्रह्माण्ड हें ब्रह्मावरील एक अध्यास--जें पूर्वी कधी पाहिलें नाही त्याचा अध्यास होतो वा नाही--ब्रह्मतत्त्वास्वादन हें मूकास्वादनाप्रमाणे आहे.

आज दुपारीं दोनच्या सुमारास शिष्य पायींच मठांत आला. मठ आता नीलांबरबाबूंच्या उद्यानगृहांत आणला असून मठाची सध्याची जागाहि थोड्या दिवसांपूर्वीच विकत घेण्यांत आली आहे. चारच्या सुमारास शिष्याला बरोबर घेऊन स्वामीजी मठाच्या नवीन जागेंत फिरावयास निघाले आहेत. मठाची जागा तेव्हा जंगलाने व्यापलेली होती. जागेच्या उत्तरेकडील कोपऱ्यांत

तेव्हा एक एकमजली पक्क्या बांधणीचें घर होतें. त्यांतच दुरुस्ती करून घेऊन सध्याचा मठ झाला आहे. मठाची जमीन ज्यांनी घेऊन दिली होती तेहि स्वामीजींबरोबर थोडें दूर येऊन मग निरोप घेऊन परतले. स्वामीजी शिष्याला घेऊन मठाच्या जागीं हिंडत असतां शिष्याला भावी मठाची रूपरेषा, नियम वगैरेबद्दल माहिती सांगू लागले.

त्या एकमजली घराच्या पूर्वेकडील व्हरांडयांत येऊन पोहोचल्यावर तेथे फिरतांना स्वामीजी म्हणाले, "येथे साधूंच्या राहण्याची जागा राहील. हा मठ साधनभजन व ज्ञानचर्चा यांचें प्रधान केंद्र व्हावा अशी माझी इच्छा आहे. येथून उदयाला आलेल्या शक्तीने सारें जग व्यापलें जाईल. तीमुळे मानवाची जीवनगतिच पालटून जाईल. ज्ञान, भक्ति, कर्म व योग यांच्या समन्वयांतून येथून मानवहितकर असें उच्च आदर्श निर्माण होतील. या मठांतील लोकांच्या नुसत्या इंगितानेच कालांतराने दिग्दिगंतरांत प्राणसंचार होईल. सारे यथार्थ धर्मपिपासु लोक कालांतराने येथे येऊन जमतील—या व असल्या अन्य किती तरी कल्पना माझ्या मनांत येतात.

"मठाच्या या दक्षिण भागीं ही जी जमीन आहे, तेथे विद्येचें केन्द्रस्थान होईल. व्याकरण, तत्त्वज्ञान, विज्ञान, काव्य, अलंकार, स्मृति, भक्तिशास्त्र आणि इंग्रजी भाषा शिकविण्याची सोय येथे राहील. प्राचीन पाठशालांच्या धर्तीवर या विद्यामंदिराची स्थापना होईल. बालब्रह्मचारी येथे राहून शास्त्राध्ययन करतील. त्यांच्या खाण्यापिण्याची सारी व्यवस्था मठांतूनच होईल. हे ब्रह्मचारी पांच वर्षांच्या शिक्षणानंतर वाटल्यास घरीं परत जाऊन संसारी होऊं शकतील. त्यांची इच्छा असल्यास मठांतील अधिकारी पुरुषांच्या अनुमतीने ते संन्यासहि घेऊं शकतील.

या ब्रह्मचाऱ्यांपैकी जे उच्छृंखल किंवा चारित्र्यहीन आढळून येतील त्यांना मठांतील अधिकारी तत्क्षणीं बाहेर घालवून देऊं शकतील. जातिवर्णनिर्विशेष स्वरूपाचें अध्ययन येथे होईल. या गोष्टीला ज्यांचा विरोध असेल त्यांना येथे प्रवेश देण्यांत येणार नाही. तरीहि जाति-वर्णाश्रमआचार सांभाळून राहण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांना खाण्यापिण्याची व्यवस्था आपल्या खर्चाने करून घ्यावी लागेल. पण त्यांचें अध्ययन मात्र साऱ्यांबरोबरच होईल. त्यांच्या चारित्र्यावर मठांतील अधिकारीवर्गाची बारीक दृष्टि राहील. येथे शिक्षण न घेतलेल्यांना संन्यासी होण्याचा अधिकार राहणार नाही. हळूहळू या मठाचें काम जेव्हा सुरू होईल तेव्हा तो कसा काय दिसेल सांग पाहूं ?"

शिष्य:-- तर मग काय प्राचीन कालाप्रमाणे गुरुगृहीं राहून ब्रह्मचर्याश्रमाचें पालन करण्याच्या पद्धतीचा देशांत पुन्हा प्रचार करण्याची आपली इच्छा आहे ?

स्वामीजी:— नाही तर काय ? आधुनिक शिक्षणपद्धतींत ब्रह्मविद्या-विकासाची कांहीहि सोय नाही. प्राचीन कालाप्रमाणेच ब्रह्मचर्याश्रमाची पुन्हा स्थापना करावयास हवी. पण आता तो कालोपयोगी होण्याच्या दृष्टीने त्याच्यांत कांही बदल करावयास हवेत. या दृष्टीने तें उदारमतसमूहांवर आधारावयास हवें. त्या साऱ्या गोष्टी मग सांगीन.

ते पुढे म्हणाले—"मठाच्या दक्षिणेकडे ही जी जमीन आहे तीहि कालान्तराने विकत घ्यावी लागेल. तेथे मठाचें अन्नछत्र राहील. तेथेच यथार्थ दीनदु:खितांची नारायणज्ञानाने सेवा करण्याची व्यवस्था राहील. हें अन्नछत्र श्रीरामकृष्णांच्या नांवावर स्थापिलें जाईल. अर्थात् जमणाऱ्या पैशाच्या मानानेच या उघड-

लेल्या अन्नछत्राचें स्वरूप राहील. सुरवातीला दोनतीन माणसांसाठीच तें सुरू झालें तरी हरकत नाही. उत्साही ब्रह्मचाऱ्यांना हें अन्नछत्र चालवायला शिकवून तयार करावयास हवें. कांहीहि करून साऱ्या गोष्टी जमवून, वेळीं भीकसुद्धा मागून त्यांना हें अन्नछत्र चालवावें लागेल. या बाबतींत मठ कांहीहिसुद्धा द्रव्यसाहाय्य करूं शकणार नाही. ब्रह्मचाऱ्यांनाच त्यासाठी पैसा जमवावा लागेल. अशाप्रकारें पांच वर्षें या धर्मार्थ अन्नछत्रांत काम करून तयार झाल्यावर त्यांना विद्यामंदिर विभागांत प्रवेश मिळण्याचा अधिकार प्राप्त होईल. एवंच अन्नछत्रांत पांच व विद्यामंदिरांत पांच अशी एकूण दहा वर्षांची शिकवणूक अंगीं बाणल्यावर मठांतील अधिकारी संन्याशांच्या अनुमतीने त्याला संन्यासदीक्षा घेतां येईल. अर्थात् हें त्याची संन्यास घेण्याची इच्छा असेल व मठांतील संन्याशांना तो संन्यासी होण्यास योग्य वाटत असेल तरच शक्य होईल. याउपरहि मठाध्यक्षांना वाटलें तर एखाद्या विशेष सद्‌गुणसंपन्न ब्रह्मचाऱ्याच्या बाबतींत ते हा नियम बाजूस ठेवून ते त्याला वाटेल तेव्हा संन्यासदीक्षा देऊं शकतील. परंतु सर्वसाधारण ब्रह्मचाऱ्यांना मात्र मीं पूर्वी सांगितलेल्या क्रमानेच संन्यासाश्रम स्वीकारतां येईल. माझ्या मनांत सतत याच साऱ्या कल्पना घोळत असतात."

शिष्य:-- मठांत हे तीन विभाग स्थापन करण्याची काय आवश्यकता ?

स्वामीजी:— तुझ्या नाही का लक्षांत आलें तें ? उद्देश हा की प्रथम अन्नदान, मग शिक्षणदान व अखेर ज्ञानदान. या तीन आदर्शांचा या मठांत समन्वय व्हावयास हवा. अन्नदान करण्याच्या प्रयत्नांनीं ब्रह्मचाऱ्यांच्या मनांत दुसऱ्यांकरता कार्य करण्याची इच्छा व शिवज्ञानाने जीवसेवा करण्याची जाणीव

दृढ होईल. यामुळे त्यांची चित्तशुद्धि होऊन त्यांच्या ठिकाणीं सात्त्विकभावाचा उदय होईल; व अशाने ब्रह्मचाऱ्यांना कालांतराने ब्रह्मविद्यालाभाची योग्यता व संन्यासाश्रम स्वीकारण्याचा अधिकार प्राप्त होईल.

शिष्य:— पण ज्ञानदान हेंच सर्वश्रेष्ठ असेल तर मग शिक्षणदान वा अन्नदानाची आवश्यकताच काय ?

स्वामीजी:— इतकें सांगितलें तरी तुझ्या लक्षांत ही गोष्ट आली नाही ? ऐक तर. अरे, या अन्नदुष्काळाच्या हाहाकारांत दीनदुबळ्या उपाशीपोटी माणसाला भीक मागून वा अन्य उपायाने दोन मुठी अन्न जर तूं दिलेंस तर त्याने त्याचें व तुझें मंगल तर होईलच, पण शिवाय या सेवेमुळे तुला साऱ्यांची सहानुभूतिहि लाभेल. या सत्कार्यासाठी तुझ्यावर विश्वासून कामकांचनांत गुरफटलेले संसारी लोक तुला मदत करायला पुढे येतील. तुझ्या शिक्षण वा ज्ञानदानाने जितके लोक तुझ्या प्रयत्नांकडे आकृष्ट होतील त्यापेक्षा शेकडो पटींनी अधिक लोक तुझ्या या अयाचितपणें केलेल्या अन्नदानाकडे आकर्षित होतील. या कार्यामुळे सामान्य लोकांची जेवढी सहानुभूति तुला मिळेल तेवढी अन्य कशानेहि लाभणार नाही. यथार्थ सत्कार्याला माणूसच काय पण भगवानहि साहाय्यक होतो. अशा तऱ्हेने तुझ्याकडे आलेल्या लोकांत तूं शिक्षण वा ज्ञानाची स्पृहा उत्पन्न करूं शकशील. येवढ्यासाठीच सुरवातीला अन्नदान सांगितलें आहे मीं.

शिष्य:— महाराज, अन्नछत्र सुरू करायचें म्हटलें तरी सुरवातीला पाहिजे जागा. मग पाहिजे घर. हें झाल्यावर पुढे काम चालूं करायला पाहिजे पैसा. ह्या साऱ्या गोष्टींसाठी पुरेसा पैसा आणावयाचा कोठून ?

स्वामीजी:-- मठाच्या दक्षिणभागाकडील ही जमीन मी आता देतों तुला व तेथे छपरी खोल्याहि बांधून देतों लागलीच त्या बेलाच्या झाडाजवळ. तूं एक दोन आंधळे व लुळेपांगळे शोधून आण व उद्याचपासून त्यांच्या सेवेला सुरवात करून दे. स्वतः भिक्षा मागून आण त्यांच्यासाठी. स्वहस्तें स्वयंपाक करून त्यांना खाऊं घाल. असें कांही दिवस केल्यावर पाहशील किती तरी लोक तुला मदत करायला पुढे येतात, आणि पैसाहि कसा जमतो तें. 'न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति ।'

शिष्य:-- तें खरें. पण असें सतत कर्म करीत राहिल्यास तेंच कर्म पुढे बंधनकारक नाही का होणार ?

स्वामीजी:-- कर्मफलावर जर तुझी दृष्टि नसेल, साऱ्या कामना-वासनांपलीकडे जाण्याची जर तुझी दुर्दम्य इच्छा असेल तर हें असलें सत्कर्म तुला कर्मबंधन तोडावयास मदतच करील. असलें सत्कर्म तुला बंधनांत टाकील हें तुझें म्हणणेंच केवढें धाष्टर्याचें आहे! उलट कर्मबंधनाचा समूळ नाश करण्याचा एकमात्र उपाय म्हणजे अशा प्रकारें परहितार्थ केलेलें कर्मच. 'नान्यः पन्था विद्यतेऽयनाय ।'

शिष्य:-- हें ऐकून अन्नछत्र व सेवाश्रम यांबद्दलच्या तुमच्या कल्पना आणखी तपशीलवार ऐकायची खूप इच्छा आहे महाराज.

स्वामीजी:-- गरीब, दुःखी अपंगांसाठी चांगल्या मोकळ्या हवेशीर लहान लहान खोल्या बांधायला हव्यात. या प्रत्येक खोलींतून दोघांची, फारच झालें तर तिघांची व्यवस्था हवी. त्यांना अत्यंत स्वच्छ गाद्या व स्वच्छ कपडे देण्यांत यावेत. त्यांच्यासाठी एखादा डॉक्टर नेमलेला असावा. त्याने सोईनुसार आठवड्यांतून एकदा, दोनदा त्यांना पाहून जावें. सेवाश्रम हा अन्नछत्राचा एक भाग म्हणून राहील, व त्यांत गोरगरीब, दुबळे-

पांगळे यांची सेवाशुश्रूषा होईल. पुढे जेव्हा पैसा जमेल तेव्हा मोठ्या प्रमाणावर एक स्वयंपाकगृह बांधावें लागेल. अन्नछत्रांत 'वाढा, घ्या' हा ध्वनि सतत गुंजत राहिला पाहिजे. भाताची पेज गंगेंत पडून पडून गंगेचें पाणी पांढुरकें व्हावयास हवें. असें अन्नछत्र झालें तरच माझे प्राण शान्त होतील.

शिष्य:— आपल्या मनांत ज्या अर्थी ही इच्छा उत्पन्न झाली आहे त्या अर्थी कालान्तराने ती निश्चितच साकार होईल.

शिष्याचें हें बोलणें ऐकून स्वामीजी कांही काळ स्तब्धपणें गंगेकडे पाहत राहिले. नंतर प्रफुल्ल वदनाने व मोठ्या प्रेमभराने ते शिष्याला म्हणाले, "कुणास ठाऊक, तुमच्यापैकी कुणामधील सिंहशक्ति केव्हा व कशी जागृत होईल ? तुमच्यापैकी कुण्या एखाद्यांत जरी मी अशी शक्ति जागवूं शकलों तर साऱ्या जगभर असलीं अन्नछत्रें उभीं राहतील. माहीत आहे ना की ज्ञान, शक्ति, भक्ति वगैरे साऱ्या गोष्टी साऱ्यांतच पूर्णस्वरूपाने विद्यमान असतात. त्यांच्या विकासाचें तारतम्य पाहूनच आपण कुणाला मोठा व कुणाला लहान म्हणून संबोधीत असतों. प्रत्येक जीवाच्या मनांत जणु एखादें आवरण असून तें त्याच्या पूर्ण विकासाच्या आड येत असतें. तें दूर झालें की झालें, सारें साधल्यासारखें होतें,— मग जी इच्छा कराल, जें व्हावें असें वाटेल तें होईल."

हें ऐकून आपल्या मनांतील तें आवरण दूर होऊन केव्हा आपल्याला ईश्वरदर्शन घडेल असा विचार शिष्याच्या मनांत आला.

स्वामीजी पुढे म्हणाले, "ईश्वरकृपेने हा मठ महासमन्वयक्षेत्रांत परिणत करावा लागेल. श्रीरामकृष्ण हे आपल्या साऱ्या भाव-आदर्शांची समन्वयमूर्तिच आहेत. ही समन्वयाची जाणीव

येथे जागृत राहिल्यास ठाकुरांचा भाव साऱ्या जगांत प्रस्थापित होईल. सारीं मतमतान्तरें, सारे पंथोपपंथ, आचांडाल सर्वजण येथे येऊन आपापला आदर्श प्राप्त करूं शकतील असें करावयास हवें. त्या दिवशीं या जागीं जेव्हा ठाकुरांची स्थापना केली तेव्हा वाटलें की येथून निघणाऱ्या त्यांच्या भावस्रोताने सारें जग व्यापून टाकलें आहे. मला जें शक्य आहे तें मी यथाशक्ति साध्य केलें व करीन, पण तुम्ही देखील ठाकुरांचा हा उदार आदर्श लोकांना पटवून द्या, नुसता वेद-वेदान्त अभ्यासून काय लाभ होणार आहे ? दैनंदिन व्यावहारिक जीवनांत शुद्ध अद्वैतवादाची प्रतीति आणून द्यावयास हवी. शंकराचार्य तो अद्वैतवाद पाहाडांत व अरण्यांत ठेवून गेले; जनसमाजांत व जगाच्या धकाधकीच्या व्यवहारांत तो आणण्यासाठीच मी आलों आहें. घरोघरीं, दऱ्याखोऱ्यांतून, पाहाडापर्वतांवरून, मैदानांतून-जंगलांतून, जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं ह्या अद्वैतवादाचा दुंदुभिनाद निनादावयास हवा. मला मदत करायला तुम्ही कंबर कसून पुढे या.

शिष्यः— या अद्वैतानुभवाची उपलब्धि ध्यानधारणेद्वारा व्हावी अशीच माझी आवड आहे. ही धांवपळ मला कांही आवडत नाही.

स्वामीजीः— तसें नुसतें बसणें म्हणजे नशेच्या अमलांत गुंगण्यासारखेंच आहे. असें नुसते हातपाय जोडून बसून काय पदरीं पडणार ? अद्वैतानुभूतीने कधी तांडव नृत्य कर, तर कधी बाह्य जग विसरून स्वस्थ बैस. चांगली वस्तु एकटयानेच खाऊन का कधी जीव सुखावतो ? ती तर दहाजणांत वांटून खाण्यानेच आनंद होणार ! अद्वैत-आत्मानुभूतिलाभाने तूं मुक्तहि होऊन गेलास समज, पण त्याने जगाची काय लाभ-हानि झाली ?

तिन्ही लोकांना मुक्त करावयास हवें. महामायेच्या साऱ्या साम्राज्याला जणु आग लावून द्यायला हवी, तेव्हा कुठे नित्य सत्यप्रतिष्ठा लाभणार! त्या आनंदाला मग कांही पारावार का असणार आहे रे? 'निरवधिगगनाभम्'-- आकाशासम, अमर्याद असणाऱ्या भूमानंदांत तूं प्रतिष्ठित होशील. जीव-जगतांत सर्वत्र, चोहीकडे आपलींच रूपें पाहून थक्क होऊन जाशील. स्थावर जंगम सारें कांही आपल्याच सत्तेने व्यापलेलें तुला आढळेल. त्या वेळीं आत्मौपम्य भावाने सर्वांची सेवा केल्याखेरीज तुझ्याने राहवणारच नाही. या अवस्थेलाच म्हणतात व्यावहारिक वेदान्त. समजलें? ब्रह्म एक असूनहि व्यावहारिक सत्तेंत तें बहुविध रूपें घेतें. या व्यावहारिक सत्तेची उभारणी नाम व रूप यांच्यावरच झाली आहे. घटाचें नाम व रूप जर बाद दिलें तर त्याचें वास्तविक रूप जें माती त्याखेरीज काय शिल्लक राहणार आहे? त्याचप्रमाणे मिथ्या भ्रमाने घट, पट, मठ हें सारें तुला दिसतें असें वाटतें. ज्याला वास्तविक सत्ता नाही असें हें जें ज्ञानप्रतिबंधकारी अज्ञान त्यावरच व्यवहाराचे सारे खेळ चालले असताब. बायका, मुलें, देह, मन हें सारेंकांही नाम-रूपाच्या साह्याने अज्ञानाच्या सृष्टींत भासमान होत असतें. अज्ञान सरतांच ब्रह्मसत्तेची अनुभूति आपोआपच होते.

शिष्य:-- पण हें अज्ञान आलें कोठून?

स्वामीजी:-- तें आलें कोठून हें मग सांगेन. पण जेव्हा तूं दोरीला साप मानून पळूं लागतोस तेव्हा ती दोरी काय साप होऊन गेलेली असते? की तुझ्या अज्ञानामुळे ती तुला सापासारखी भासून तूं पळायला सुरवात करतोस?

शिष्य:-- अर्थात्च अज्ञानामुळे मी तसें करतों.

स्वामीजी:-- मग सांग बरें विचार करून, की जेव्हा तुला

त्या दोरीचें दोरी म्हणून ज्ञान होईल तेव्हा तुला तुझ्या अज्ञानाचें हसूं येईल की नाही तें ? तेव्हा नाम-रूपें मिथ्या भासतील की नाही ?

शिष्यः-- होय तशीं तीं भासतील खरें.

स्वामीजीः-- तसें असल्यास नाम-रूप मिथ्या आहे हें सिद्ध झालें. याच रीतीने ब्रह्माचीच एकमात्र सत्ता सत्य म्हणून सिद्ध झाली. या अनंत विचित्र रूपधारी सृष्टीमुळे देखील त्या ब्रह्मस्वरूपांत कांहीहि बदल होत नाही. तूं फक्त या अज्ञानाच्या क्षीण प्रकाशांत ही बायको, हा मुलगा, हा मी, हा परका असें मानून सर्वप्रकाशक आत्म्याची सत्ता विसरून जातोस. जेव्हा सद्‌गुरूंच्या उपदेशाने व आपल्या दृढ विश्वासाद्वारा नामरूपात्मक जगताकडे न पाहतां त्याच्या मूळ आधारस्थानीं असणाऱ्या ब्रह्मसत्तेचाच अनुभव तूं घेशील तेव्हा आब्रह्मस्तंबपर्यंत सर्व वस्तुजातांत तुला आत्मानुभूतिच होईल. तेव्हाच ‘भिद्यते हृदय-ग्रन्थिः छिद्यन्ते सर्वसंशयाः’ ही अवस्था प्राप्त होईल.

शिष्यः-- महाराज, या अज्ञानाचें आद्यन्त स्वरूप जाणण्याची माझी इच्छा आहे.

स्वामीजीः-- जी वस्तु पुढे नाहीशी होते ती मिथ्या हें तर तुला पटलें ? ज्याला यथार्थ ब्रह्मज्ञान झालें तो हेंच विचारणार की अज्ञान आहेच कोठे ? त्याला दोरी दोरीच दिसणार सर्वदा. त्याला साप तर कुठेच आढळणार नाही. जे दोरीला साप मानतात त्यांचें भय, भयाने पळणें वगैरे पाहून त्याला तर हसूंच येईल. म्हणूनच अज्ञानाला वास्तविक स्वरूप कांहीच नाही. अज्ञानाला सत् हि म्हणतां येत नाही, असत् हि म्हणतां येत नाही. ‘सन्नाप्यसन्नाप्युभयात्मिका नो’-- जी वस्तु मुळांतच अशी मिथ्या म्हणून प्रत्ययाला येते तिच्याबाबत प्रश्न तरी काय

करावयाचा ? व उत्तर तरी त्या प्रश्नाचें काय द्यावयाचें ? तिच्यासंबंधी प्रश्न विचारणेंच तर्कसंगत नाही मुळी. कसें तें मी सांगतों, ऐक. हीं प्रश्नोत्तरेंहि त्या नामरूपांना, देशकालादिकांना गृहीत धरूनच केलीं असतात ना ? नामरूप-देशकालादिकांपलीकडे असलेली ब्रह्मवस्तु या असल्या प्रश्नोत्तरांद्वारा कशी काय समजावून सांगतां येणार ? म्हणूनच शास्त्र, मंत्र वगैरे साऱ्या गोष्टी व्यावहारिक दृष्टीने सत्य होत, पारमार्थिक दृष्टीने नाही. अज्ञानाला मुळांत जर कांही स्वरूपच नाही तर तें तुला आकलन होणार तरी कसें ? म्हणून ब्रह्मज्ञान झाल्यानंतर असल्या प्रश्नांना अवसरच राहणें शक्य नाही. ठाकुर सांगत ती 'चांभाराची गोष्ट' * माहीत आहे ना ? ठीक अगदी तसें. अज्ञानाची ओळख एकदा पटली की तें लागलीच पलायन करतें.

शिष्यः-- पण मुळांतच तें अज्ञान आलें कोठून ?

स्वामीजीः-- मुळांत जी वस्तु नाहीच तर तिचें 'येणें-जाणें' तरी कसलें ? ती मुळांत असेल तरच जाणार ना ?

---

* एक पंडित गावाला जावयास निघाला. त्याच्याजवळ नोकर नव्हता. रस्त्यांत भेटलेल्या एका चांभाराला त्याने नोकर म्हणून बरोबर घेतलें. चांभाराने आपली जात गुप्त ठेवावी व कुणाशीं कांहीहि बोलूं नये असें त्याला पंडितजीने शिकवून ठेवलें. गावीं पोहोचल्यावर नित्यक्रमानुसार स्नानादि आटोपून ते संध्येला बसले. चांभार जवळच बसला होता. गावचा एक दुसरा पंडित या पंडिताला भेटावयास आला. येण्यापूर्वी एका ठिकाणीं तो आपला जोडा विसरून आला होता. नोकर बसला आहे असें पाहून तो त्याला म्हणाला, 'जा बरें, माझा तो जोडा घेऊन ये.' तरी हा चुप. 'कसा रे तूं चांभार, सांगूनहि ऐकत नाहीस ?' असें रागावून म्हणतांच चांभाराला वाटलें, 'अरे याने तर आपली जात ओळखली' ! भिऊन तो जो पळाला तो फिरून आला नाही. मायेला ओळखतांच तीहि अशीच पळते, एक क्षणहि टिकत नाही.

शिष्यः-- मग या जीव-जगताची उत्पत्ति झाली कशी ?

स्वामीजीः-- मुळांत फक्त एक ब्रह्मसत्ताच आहे. तूं तिलाच नाना रूपांमधून व नाना नामांमधून पाहत असतोस.

शिष्यः-- हीं मिथ्या नामें व मिथ्या रूपें तरी कोठून आलींत?

स्वामीजीः-- शास्त्रांनी या नामरूपांच्या संस्काराला वा अज्ञानाला एखाद्या वाहत्या प्रवाहाप्रमाणे अनन्त मानलें आहे. पण त्याचाहि शेवट हा आहेच. आणि ब्रह्मसत्ता तर सापामागील दोरीप्रमाणे आत्मस्वरूपांत नित्य वर्तमान. म्हणून वेदान्ताचा असा सिद्धान्त आहे की हें विश्वब्रह्माण्ड ब्रह्मावर अध्यस्त असून तें एखाद्या इंद्रजालाप्रमाणे प्रतीत होत असतें. या अध्यासामुळे ब्रह्मस्वरूपांत कुठल्याहि प्रकारचें परिवर्तन होत नसतें. समजलें ?

शिष्यः-- एक गोष्ट नाही अजूनहि समजत.

स्वामीजीः-- ती कोणती ?

शिष्यः-- आपण आताच सांगितलें की सृष्टि-स्थिति-लय हीं सारीं ब्रह्मावर अध्यस्त आहेत, त्यांना मुळांत स्वरूपसत्ता अशी कोणतीहि नाही-- पण हें शक्य कसें आहे ? ज्याने जी गोष्ट पाहिलीहि नसते तिचा त्याला कधीच भ्रम होत नाही. ज्याने कधी साप पाहिलाच नाही त्याला दोरीवर सापाचा भ्रम कधीच होणें शक्य नाही. त्याचप्रमाणे ज्याने ही सृष्टि पाहिलीच नाही त्याला ब्रह्मावर या सृष्टीचा भ्रम होईलच कसा ? म्हणूनच सृष्टि होती किंवा आहे, आणि म्हणूनच सृष्टीचा भ्रम होतो. आणि हें मान्य केल्यास द्वैताची आपत्ति निर्माण होते.

स्वामीजीः-- तुझ्या या प्रश्नाचें एका शब्दांत ब्रह्मज्ञ उत्तर देतील की त्यांना सृष्टि वगैरेंचा मुळी प्रत्ययच येत नाही. त्यांना अनुभूति होते एकमात्र ब्रह्मसत्तेची. त्यांना दोरीचाच प्रत्यय येतो, सापाचा येतच नाही. जर तूं म्हणशील की मला

तर सापाचाच प्रत्यय येत आहे तर ते तुला तुझा दृष्टिदोष दूर करण्यासाठी दोरीचें स्वरूप समजावून देण्याचा प्रयत्न करतील. जेव्हा त्यांच्या उपदेशाने व स्वत:च्या विचाराद्वारा तूं दोरी वा ब्रह्मसत्ता समजावून घेशील तेव्हा हें भ्रमात्मक सर्पज्ञान--वा सृष्टिज्ञान नाहीसें होईल. त्या वेळीं या सृष्टि-स्थिति-प्रलयरूपी भ्रमात्मक ज्ञानाला ब्रह्मावर अध्यस्त म्हणण्याखेरीज काय म्हणूं शकशील तूं ? अनादि प्रवाहाप्रमाणे सृष्टीची ही प्रतीति होत आली असली तरी असो, तिच्या निर्णयाने नफानुकसान कांहीहि होणार नाही. ब्रह्मतत्त्वाची हातच्या आवळ्याप्रमाणे स्पष्टपणें उपलब्धि जोंवर होत नाही तोंवर या प्रश्नांची सांगोपाग मीमांसा होणें शक्य नाही; आणि ती उपलब्धि झाल्यावर हा प्रश्न उत्पन्नच होत नाही व त्याला उत्तर देण्याची आवश्यकताहि राहत नाही. त्या वेळीं ब्रह्मतत्त्वाचें आस्वादन 'मूकास्वादना'-प्रमाणे होत असतें.

शिष्य:-- तर मग इतक्या विचाराची तरी काय गरज ?

स्वामीजी:-- तो विषय समजावा म्हणून विचार आवश्यक आहे. पण सत्य वस्तु मात्र विचारांपलीकडे असते. 'नैषा तर्केण मतिरापनेया--'

अशा प्रकारें बोलत बोलत शिष्य स्वामीजींसह मठांत येऊन पोहोचला. मठांत आल्यावर स्वामीजींनी मठांतील संन्यासी व ब्रह्मचारी यांना आजच्या ब्रह्मचर्चेचा सारांश सांगितला व तेथून उठतां उठतां ते शिष्याला म्हणाले, 'नायमात्मा बलहीनेन लभ्य:।'

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ विः ......................
क्रमांक ........................ नोंः दिः ......................

## अध्याय २३ वा

**स्थळ-- बेलूर मठ ( बांधणीचा काळ ).**

**वर्ष-- इ. स. १८९८.**

**विषय--** भारताच्या उन्नतीचा उपाय काय ? परार्थ कर्म वा कर्मयोग.

शिष्य:-- स्वामीजी, आपण या देशांत व्याख्यानें कां देत नाही ? युरोप-अमेरिकेंत व्याख्यानें देऊन आपण खूप खळबळ उडवून दिलीत. पण भारतांत परत आल्यापासून त्याबाबत आपला उत्साह कां थंडावला कांही कळत नाही. पाश्चात्य देशांपेक्षा माझ्या मतें तर असल्या प्रयत्नांची याच देशांत अधिक गरज आहे.

स्वामीजी:-- या देशांत आधी सुरवातीपासून कार्याची भूमि तयार करायला हवी. नंतरच बी पेरण्याचा कांही उपयोग होणार. पाश्चात्य भूमिच सध्या बी पेरण्यासाठी तयार आहे, सुपीक आहे. त्या देशांतील लोक सध्या भोगाच्या अगदी चरमसीमेवर येऊन पोहोचले आहेत. भोग भोगून त्यांच्या मनाला त्यांत आता समाधान लाभत नाही. कसल्या तरी भयंकर अभावाची टोचणी त्यांना लागली आहे. तुमच्या या देशांत न आहे भोग, न आहे योग. भोग भोगून थोडी तृप्ति झालेले लोकच योगाच्या गोष्टी ऐकायला तयार होतात व सांगितलेल्या गोष्टी समजूं शकतात. उपासमारीने गळून गेलेलीं शरीरें, थकलीं-भागलेलीं मनें आणि रोग, शोक इत्यादि त्रिविध तापांची जणु जन्मभूमिच असलेल्या या भारतांत व्याख्यानें वगैरेंचा काय उपयोग होणार ?

शिष्य:-- कां बरें ? आपणच तर अनेकदा म्हणतां की हा देश म्हणजे धर्मभूमि, या देशांतील लोक धर्म जसा समजूं

शकतात किंवा व्यवहारांत उतरवूं शकतात तसें अन्य देशांतील लोकांचें नाही. मग आपल्या ऊर्जस्वल वाणीने कां नाही देश जागृत होणार ? कां नाही त्या व्याख्यानांना फळ येणार ?

स्वामीजी:-- अरे बाबा, धर्मकर्म करायच्या आधी करायला हवी कूर्मावताराची पूजा; अन् पोट म्हणजेच तो कूर्म जणु ! त्याला आधी तृप्त केल्याखेरीज तुझ्या धर्मकर्माच्या गोष्टी कुणीहि ऐकणार नाही. पाहतोसच ना तूं की पोटाच्या चिंतेने सारा भारत देश हैराण झाला आहे. परदेशांबरोबर स्पर्धा, व्यापाराने देशाच्या संपत्तीची सारखी निर्यात, आणि या साऱ्यांवर कळसच जणु म्हणजे गुलामांना शोभेशा आपसांतील ईर्ष्याद्वेषादिकांनी सारा भारत अगदी पोखरून निघाला आहे. धर्मकर्माच्या गोष्टी येथे सांगावयाच्या असतील तर या देशांतील लोकांच्या पोटापाण्याचा प्रश्न आधी सोडवावा लागेल. एरव्ही नुसत्या व्याख्यानादिकांचा कांहीहि उपयोग होणार नाही.

शिष्य:-- तर मग आता आम्हीं काय करायला हवें ?

स्वामीजी:-- जे आपल्या संसाराची पर्वा न करतां परसेवेसाठी प्राणहि वेचावयास तयार होतील अशा सर्वस्वत्यागी लोकांची आवश्यकता आहे सुरवातीला. मठ स्थापन करून कांही बालसंन्यासी मी तयार करतों आहें तें येवढ्याचसाठी. या संन्याशांचें शिक्षण झाल्यावर ते दारोदार हिंडून लोकांना त्यांच्या शोचनीय सद्यपरिस्थितीची जाणीव करून देतील, या अवस्थेंतून बाहेर कसें यावयाचें याबाबत उपदेश करतील व बरोबरच धर्माचीं महान् तत्त्वें अगदी सोप्या, सरळ व ओघवती भाषेंत लोकांना पटवून सांगतील. तुमच्या देशांतील प्रचंड बहुजनसमाज हा एखाद्या प्रचंड निद्रित अजगराप्रमाणे पसरला आहे. या देशांत विश्वविद्यालयीन शिक्षण फार तर शेकडा दोनच

लोकांच्या वांट्याला येत असेल. आणि ज्यांना या शिक्षणाचा लाभ होतो तेहि देशहिताच्या दृष्टीने कांहीच करूं शकत नाहीत. करूं तरी कसे शकतील बिचारे? अगदी कॉलेजांतून बाहेर पडतांच त्यांना आढळून येतें की ते पांचसात मुलांचे बाप झाले आहेत ! म्हणून मग धामधूम करून कशीतरी एखादी कारकुनी किंवा डेप्युटी मॅजिस्ट्रेटची जागा ते पदरीं पाडून घेतात. त्यांच्या साऱ्या शिक्षणाची फलश्रुति असते हीच ! नंतर तर मग त्यांना या संसाराच्या रामरगाडयांत उच्च विचार वा उदात्त कार्य करायला फुरसतच नाही होत. स्वतःचाच स्वार्थ साधतां येत नाही त्यांना, मग परार्थ साधण्यासाठी कांही करण्याची गोष्ट दूरच राहो.

शिष्यः— अशा स्थितींत मग आम्हांला काय कांही मार्गच नाही ?

स्वामीजीः— मार्ग खात्रीने आहे. हा आपला देश म्हणजे सनातन धर्माची भूमि. या देशाचें सध्या पतन झालें आहे हें खरें पण हा खात्रीने पुन्हा उभा राहणार आहे. आणि हा जेव्हा उठून उभा राहील तेव्हा त्याकडे पाहून सारें जग स्तिमित होईल. नदीच्या वा सागराच्या लाटा जितक्या मागे जातात तितक्याच प्रमाणांत त्या पुढे येतात हें काय आपण पाहत नाही? या देशाचेंहि तसेंच होणार आहे. डोळे सावधपणें उघडून पाहशील तर दिसेल की सारी पूर्व दिशा अरुणोदयाच्या रंगांनी उजळून निघाली आहे; सूर्योदयाला आता कांहीहि विलंब नाही. तुम्ही याच वेळीं कंबर कसून पुढे यायला हवें. नुसतें संसारांत गुरफटून पडल्याने काय होणार आहे ? या वेळीं तुमचें काम हेंच की देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत फिरून, खेडोपाडीं हिंडून साऱ्यांना समजावून सांगावयाचें की आता

आळस करून बसून राहिल्यास चालणार नाही. आजची शिक्षणहीन, धर्महीन अवकळा त्यांना समजावून देऊन त्यांना जागे करून सांगा-- "बंधूंनो, आता सारेजण उठा! जागे व्हा! आणखी किती दिवस झोपत पडणार आहांत असें?" शास्त्रांतील महान् तत्त्वें त्यांना पटवून द्या-- अगदी सोप्या भाषेंत. इतके दिवस ब्राह्मणवर्गानेच धर्मावर ताबा बसविला होता. कालप्रवाहांत त्यांचा तो अधिकार टिकला नाही. आता तो धर्म साऱ्यांच्या हातीं पडेल अशी व्यवस्था करावयास हवी. सर्वांना पटवून द्या की अगदी ब्राह्मणांइतकाच अधिकार धर्मावर तुमचाहि आहे. याच ज्वलंत अग्निमंत्राची आचांडाल साऱ्यांना दीक्षा द्या. याबरोबरच त्यांना सोप्या रीतीने व्यवहार, व्यापार, शेती वगैरे गृहस्थोपयोगी गोष्टींचेंहि शिक्षण द्या. नाही तर धिक्कार असो तुमच्या शिक्षणाला अन् धिक्कार असो तुमच्या वेद-वेदान्ताला.

शिष्य:-- पण महाराज, आमच्यांत तें सामर्थ्य कुठे आहे? तुमच्या शक्तीचा एक कण जरी आम्हांला लाभला असतां तर आम्ही धन्य झालों असतों व इतरांनाहि कृतार्थ केलें असतें.

स्वामीजी:-- वारे मूर्खा! शक्तिबिक्ति काय कुणी कुणाला देत असतो? ती तर असते तुमच्यांतच, अन् वेळ आली की ती आपोआप बाहेर येईल. तूं फक्त कामाला सुरवात तर कर आधी. मग पाहशील, इतकी शक्ति तुझ्यांत येईल की ती सावरतां सावरल्या जाणार नाही तुला. दुसऱ्यांसाठी येवढेसें जरी काम केलें तरी ती शक्ति जागृत होते, दुसऱ्यांबद्दल येवढा जरी विचार केला तरी हृदयांत सिंहबळाचा संचार होतो. तुमच्यावर माझें येवढें अलोट प्रेम आहे, पण तरीहि मला वाटतें की दुसऱ्यांसाठी तुम्हीं आपले प्राण वेचावेत. तें तुमचें मरण पाहून मला आनंदच होईल.

शिष्य:-- पण जे लोक आमच्यावर अवलंबून आहेत त्यांचें काय होणार ?

स्वामीजी:-- तूं जर परहितार्थ तळहातीं शिर घेऊन निघशील तर भगवान तुझी कांही ना कांही व्यवस्था जरूर करील. 'न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति ।' हें गीतेचें आश्वासन वाचलें आहेस ना ?

शिष्य:-- होय.

स्वामीजी:-- असल गोष्ट आहे त्याग. त्याग न करतां कुणीहि दुसऱ्यांसाठी सर्वस्वाचा होम करून कार्य करायला प्रवृत्त होऊं शकत नाही. त्यागी हा समदृष्टि असतो, सर्वांचीच सेवा करायला तो सज्ज असतो. सर्वांनाच समदृष्टीने पाहावें असें वेदान्तांत वाचलेंस ना ? मग आपल्याच पत्नीकडे वा मुलांकडेच आत्यंतिक ममत्वबुद्धीने काय म्हणून पाहावयाचें ? स्वयं भगवान तुझ्या दारीं उपाशीपोटी भिकाऱ्याच्या रूपाने मृत्युमुखीं पडला आहे. त्याला कांही न देतां आपले व आपल्या बायकामुलांचें पोट चांगलें स्वादिष्ट खाऊन भरणें हें तर फक्त पशूंनाच साजेसें होईल.

शिष्य:-- ही परसेवा करण्यासाठी तरी वेळोवेळीं पैसा लागणार. तो कोठून आणावयाचा ?

स्वामीजी:-- मी म्हणतों, जेवढें शक्य असेल तेवढें तरी आधी कर ना. आणि पैसा नसेल तर नको देऊं— पण चार गोड गोष्टी तर बोल, दोन प्रेमळ उपदेशाचे शब्द तर सांग त्यांना. का यालाहि तुला पैसा वेचावा लागणार आहे ?

शिष्य:--होय, येवढें मी करूं शकेन.

स्वामीजी:-- 'हो, हें करूं शकेन' असें बसल्या जागीं नुसतें तोंडाने म्हणून नाही चालणार. काय करतोस तें प्रत्यक्ष कृतीने

मला दाखव. तेव्हाच म्हणेन माझ्यापाशी येण्याजाण्याचें कांही सार्थक झालें. उठून कामाला लाग-- आयुष्य तरी किती दिवसांचें आहे? जगांत आलासच जर आहेस तर कांही नांव करून जा. एरव्ही वृक्षपाषाणहि निर्माण होतात, नष्ट होतात. त्यांच्यांत तुझ्यांत फरक तरी काय मग? असलें जीवन जगण्याची माणसाला का कधी इच्छा होईल? तुझें वेदान्त-अध्ययन सार्थकीं लागलें हें तूं आपल्या कृतीने दाखव मला. साऱ्यांना अगदी कानींकपाळीं ओरडून सांग, "तुमच्यांत अनंत शक्ति निहित आहे--त्या शक्तीला जागृत करा." स्वतःचीच मुक्ति घेऊन काय करतोस? असली मुक्तीची इच्छा म्हणजे तरी महास्वार्थीपणाच ना? फेक दूर ती तुझी मुक्ति. दूर सार तुझी ती ध्यान-धारणा आणि मी जें करतों आहें तेंच करायला सुरवात कर.

शिष्य स्तब्ध राहून ऐकूं लागला. स्वामीजी म्हणत होते, 'तुम्ही आधी हें कार्यक्षेत्र निर्माण करा. माझ्यासारखे हजारो विवेकानंद जन्म घेतील धर्मावर व्याख्यानें द्यायला, त्याची नको चिंता तुला. आम्हांपैकी (श्रीरामकृष्ण-शिष्यांपैकी) ज्यांना आधी वाटत होतें की त्यांच्यांत ताकद नाही कांही करायची, तेंच आता किती सेवाश्रम काढणें, किती दुष्काळ निवारक फंड जमविणें वगैरेसारखीं कामें करताहेत हें तर तूं पाहतोसच ना आपल्या डोळ्यांनी? पाहिलेंस ना की जन्माने इंग्रज स्त्री असूनहि निवेदिता तुम्हां लोकांची सेवा करायला पुढे सरसावली आहे तें? आणि तुम्ही तेवढेंहि तुमच्याच रक्तामांसाच्या लोकांसाठी करूं शकत नाही? जेथे सांथीच्या रोगांनी लोक मरताहेत, दुःख भोगताहेत, जेथे लोक अन्नान्नदशेने तडफडताहेत -- जा तेथे निकडीने धावून. तेथे जाऊन कष्टत्रासांनी फार तर मराल.

पण मेलां तरी काय झालें ? तुमच्या-आमच्यासारखे किती जीवजन्तु जन्मतात अन् मरतात. त्याने जगाचें काय नुकसान होतें ? पण यापेक्षा एखादा उदात्त आदर्श हृदयांत बाळगून मेलेलें काय वाईट ? मरणार तर आहेसच--मग असा उदात्त आदर्श पुढे ठेवून मेलेलें बरें. याच भावांचा घरोघर प्रचार कर. यांत तुझें व तुझ्याबरोबरच देशाचेंहि कल्याण होईल. तुमच्यावरच तर देशाची भिस्त, आशा; सारा भरवसा. तुम्हांला असें कर्मशून्य अन् कपाळीं हात ठेवून बसलेले पाहून माझ्या मनाला अनंत यातना होतात. जा, जा कामाला लागा. जा आता उशीर नको. दिवसादिवसाने मृत्यु जवळ येतो आहे. पुढे कांही करूं म्हणून आता स्वस्थ बसूं नका--तसें कराल तर कांहीहि साधणें शक्य नाही.

## अध्याय २४ वा

**स्थळ-- बेलूर मठ ( बांधणीचा काळ ).**

**वर्ष-- इ. स. १८९८.**

**विषय--** ज्ञानयोग व निर्विकल्प समाधि--अभी: --सर्वांनाच एक दिवस ब्रह्मवस्तूचा लाभ होईल.

शिष्य:--स्वामीजी, ब्रह्म जर एकमात्र सत्य वस्तु असेल तर मग जगांत येवढी विभिन्नता काय म्हणून आढळते ?

स्वामीजी:-- ब्रह्मवस्तु (सत्य असो की आणखी कांही असो) जाणतो कोण ? आपण जग पाहतों व तेंच सत्य असा आपला दृढ विश्वास असतो. तरीहि सृष्टिगत वैचित्र्य सत्य म्हणून मान्य करून विचारमार्गाचा अवलंब करून पुढे गेल्यास कालान्तराने आपण एकत्वाचें मूळ गाठूं शकतों. जर त्या एकत्वांत अवस्थित होऊं शकलास तर हें वैचित्र्य प्रत्ययास येणार नाही.

शिष्य:-- मी एकत्वांत अवस्थित होऊं शकलों असतों तर हा प्रश्नच कशाला केला असता ? वैचित्र्य पाहूनच ज्या अर्थीं मी प्रश्न करतों आहे त्या अर्थीं तें सत्य मानूनच माझा प्रश्न आहे.

स्वामीजी:-- ठीक आहे. सृष्टीचें वैचित्र्य पाहून तें सत्य मानून एकत्वाचें मूळ शोधून काढण्याच्या पद्धतीला शास्त्रांनी व्यतिरेक विचार असें म्हटलें आहे. व्यतिरेक विचार म्हणजे अभावात्मक वा असत्य वस्तूला भावात्मक वा सत्य मानून शेवटीं विचाराअंतीं असें दाखवावयाचें की ती भावात्मक नसून अभावात्मक वस्तु आहे. तूंहि अशा प्रकारें मिथ्या गोष्टीला सत्य मानून सत्य गांठावयाचें म्हणतोस, असेंच ना ?

शिष्य:-- होय. पण जें प्रत्यक्ष, भावात्मक आहे त्यालाच मी

सत्य मानतों व जें अप्रत्यक्ष—अभावात्मक आहे त्याला मी मिथ्या असें मानतों.

स्वामीजी:-- ठीक आहे. आता वेदांचें सांगणें आहे, 'एकमेवाद्वयम्'। वास्तविक एक ब्रह्मच जर अस्तित्वांत असेल तर मग तुझें हें नानात्व मिथ्या ठरलें; वेदांच्या सांगण्यावर तर तुझा विश्वास आहे ना ?

शिष्य:-- मी वेद मानतों हें खरें. पण वेदांवर ज्यांचा विश्वास नाही अशांचीं मतें तर खोडून काढावीं लागतील ना ?

स्वामीजी:-- तें सहज करतां येणें शक्य आहे. जडविज्ञानाच्याच साह्याने त्यांना नीट पटवून द्यावयास हवें की इंद्रियांना जें प्रत्यक्ष दिसतें त्यावरहि आमचा विश्वास बसूं शकत नाही. आपलीं इंद्रियेंहि आपल्याला खोटी साक्ष देऊं शकतात व यथार्थ सत्यवस्तु आपल्या इंद्रिय-मन-बुद्धीच्या अतीत असते. नंतर त्यांना समजावून सांगायला हवें की मन बुद्धि व इंद्रियांच्याहि पलीकडे जाण्याचा एक मार्ग आहे. त्या मार्गालाच ऋषिमुनींनी योग म्हणून संबोधिलें आहे. हा योग प्रत्यक्ष अनुष्ठानावर अवलंबून असतो. त्यामुळे त्याचें फळ प्रत्यक्ष हातोहात पाहतां येण्यासारखें आहे. तुमचा त्यावर विश्वास असो वा नसो, त्याचें अनुष्ठान केल्यास फळ मिळणार हें निश्चित. प्रत्यक्ष आचरून पाहा फळ मिळतें की नाही तें. ऋषि जें सांगतात तें सत्य आहे याचा मीं अनुभव घेऊन पाहिला. तूं ज्याला वैचित्र्य म्हणून संबोधितोस तें, एक वेळ अशी येते की तेव्हा पार लोपून जातें. त्याचा मुळी अनुभवच येत नाही. ठाकुरांच्या कृपाप्रसादाने या गोष्टींचा मीं माझ्या जीवनांत अनुभव घेतला आहे.

शिष्य:-- कधी घेतलांत आपण हा अनुभव ?

स्वामीजी:-- दक्षिणेश्वर-बागेंत एक दिवस ठाकुरांनी मला

स्पर्श केला. तो स्पर्श होतांच मला अनुभवास येऊं लागलें की घरदार, व्हरांडा, झाडेंझुडपें, चंद्रसूर्य ह्या साऱ्यांचा आकाशांत जणु लोप होतो आहे. पुढे तें आकाशहि मावळलें, व नंतर काय झालें तें आठवत नाही. पण येवढें मात्र आठवतें की हें असें व्हायला लागल्याबरोबर मला भय वाटलें व मी ओरडून म्हणालों, 'तुम्ही मला हें काय करतां आहांत? माझे आईवडील आहेत ना!' तें ओरडणें ऐकून हसत हसत ठाकुर म्हणाले, 'तर मग सध्या राहूं दे.' व असें म्हणून त्यांनी मला पुन्हा स्पर्श केला. त्या स्पर्शानें पुन्हा घरदार, खोल्या, व्हरांडा वगैरे जें जसें होतें तें ठीक तसेंच आहे असें मला दिसलें. अमेरिकेंत एका तलावा-कांठीं बसलों असतां पुन्हा एकदा ठीक असाच अनुभव मला आला होता.

हें सारें ऐकून शिष्य चुप झाला. नंतर थोड्या वेळाने तो पुन्हा म्हणाला, 'महाराज, डोक्याच्या विकृतीमुळें सुद्धा अशी अवस्था होणें शक्य आहे? दुसरें असें की आपल्याला त्या अवस्थेंत काय आनंद होत होता?

स्वामीजी:— डोक्यांत कुठल्याहि प्रकारचा बिघाड झालेला नाही, मादक पदार्थांचें सेवन केलेलें नाही की अमली पदार्थांच्या चिलमांचे दम मारले नाहीत अशा परिस्थितींत प्रकृति अगदी उत्तम असतांना आलेल्या या अनुभूतींना डोक्याचा भ्रम म्हणून कसें म्हणतोस? त्यांत पुन्हा ताडून पाहिलें तर माझी ही अनुभूति वेदांत वर्णिलेल्या अवस्थांशीं मिळती व पूर्वाचार्यांच्या आप्तवाक्यांशीं जुळती आहे. असें असतांना अखेर तूं मला (विनोदाने किंचित् हसून) भ्रमिष्ट म्हणून ठरविलेंस ना?

शिष्य:— नाही, नाही,—मी तसें म्हणालों नाहीं केव्हाच. शास्त्रांत जेव्हा असल्या एकत्वानुभूतीचीं शेकडों उदाहरणें आहेत,

आपण स्वतः जेव्हा सांगतां की करतलामलकवत् प्रत्यक्ष अनुभव येतो, आणि आपली अपरोक्षानुभूति ज्या अर्थी वेदादि शास्त्र-वाक्यांशीं जुळती आहे त्या अर्थीं ती मिथ्या म्हणण्याचें धाष्टर्च मी करणार नाहीं. शंकराचार्यांनी म्हटलें आहे, 'क्व गतं केन वा नीतम्. . . ।'

स्वामीजी:-- लक्षांत ठेव—तुमचीं शास्त्रें ज्याला ब्रह्मानुभूति म्हणतात तें हें एकत्व-ज्ञान झालेल्या माणसाला पुन्हा भय म्हणून राहत नाही कसलें--जन्ममृत्यूचे त्याचे पाश साफ गळून पडतात. पण या तुच्छ कामकांचनाच्या पाशांनी बद्ध झालेला जीव त्या ब्रह्मानंदाला मुकतो. त्या परमानंदाचा लाभ झाल्यावर या जागतिक सुखदु:खादिकांच्या माऱ्याने माणूस आदमुसा होत नाही.

शिष्य:-- आपण म्हणतां त्याप्रमाणे आम्ही जर यथार्थ पूर्णब्रह्मस्वरूपच आहोंत तर मग त्या समाधिसुखाचा लाभ व्हावा म्हणून आम्ही प्रयत्न कां करीत नाहीं ? क्षुद्र कामकांचनादिकांच्या मागे उरीं फुटेपर्यंत धावून आम्ही वारंवार मृत्युमुखीं कां म्हणून पडतों ?

स्वामीजी:-- तुझी अशी का कल्पना आहे की त्या शान्ति-लाभासाठी जीवांचे प्रयत्न नसतात ? पण थोडा विचार केल्यास दिसेल की ते जें कांही करतात तें त्या भूमानंदलाभासाठीच. येवढेंच की ही गोष्ट सर्वांच्याच ध्यानांत येत नसते. त्या परमा-नंदलाभाची जबरदस्त ओढ आब्रह्मस्तंबपर्यंत सर्वांनाच पूर्णपणें असते. तें आनंदस्वरूप ब्रह्म प्रत्येकाच्या ठायीं विद्यमान असतें. तूं देखील पूर्ण ब्रह्मच आहेस. ठीक विचार करून पाहशील तर अगदी या क्षणीं तुला मी म्हणतों त्या गोष्टीची अनुभूति येईल. या क्षणीं तुला ती अनुभूति नाही येवढाच काय तो फरक. नोकरी करून बायकोमुलांसाठी आज तूं जे कष्ट करतो

आहेस त्यांचा देखील हेतु आहे सच्चिदानंदलाभ. या मायामोहाचे तडाखे खातां खातां चांगला ठेचून निघशील तेव्हा धीरे धीरे स्वस्वरूपाकडे तुझी दृष्टि वळेल. वासना आहे म्हणूनच धक्के खातोस व पुढेहि खाशील. असे धक्के खाल्ल्यानेच माणूस अंतर्मुख दृष्टीने आपल्याकडे पाहूं लागतो. साऱ्यांनाच एक ना एक दिवस असें पाहावें लागणार आहे. एखादा याच जन्मीं अंतर्मुख होईल तर एखाद्याला तेवढ्यासाठी लाखो जन्म घ्यावे लागतील येवढाच काय तो फरक.

शिष्य:— आपला आशीर्वाद व ठाकुरांची कृपा असल्याखेरीज तें होणें शक्य नाही.

स्वामीजी:— ठाकुरांचा कृपासमीरण तर सर्वदा वाहतोच आहे. आपलें शीड तूं उघडून दे ना. जेव्हा जें करशील तेव्हा तें अगदी मन-प्राण लावून एकाग्र चित्ताने कर. रात्रंदिवस हीच भावना ठेव की आपण सच्चिदानंदस्वरूप, आपल्याला भय तें कसचें ? हा देह, मन, बुद्धि ह्या साऱ्या गोष्टी क्षणिक आहेत. यांच्या पलीकडे जें आहे तोच खरा मी.

शिष्य:-- असले विचार येतात, पण अगदी क्षणभरच व मग पुन्हा येरे माझ्या मागल्या--साऱ्या संसारचिंता मागे लागतात.

स्वामीजी:-- सुरवातीला हें असें होतच असतें. धीरे धीरे सारें ठीक होऊन जाईल. पण त्यासाठी मनांत खूप जबरदस्त ओढ, तीव्रता हवी. नेहमी विवेक करावा की आपण नित्य-शुद्ध-बुद्ध-मुक्तस्वभाव, आपल्या हातून कोणतेंहि अपकृत्य कसें घडेल ? आपण सामान्य माणसांप्रमाणे कामकांचनादिकांत कसें गुरफटून राहूं शकूं ? असा खूप ठाम विचार मनांत सतत बाळगावा. पाहशील, ठीक मंगल होईल अशाने.

शिष्य:--एखाद्या एखाद्या वेळीं खूप शक्तिसंचार होतो मनांत.

पण पुन्हा लगेच मनांत लोभ सुटतो की परीक्षा देऊन डेप्युटी मॅजिस्ट्रेट व्हावें; धन, मान, सारें मिळेल, आरामांत--मजेंत राहतां येईल.

स्वामीजी:-- अशा गोष्टी मनांत येतांच नीट विवेक करायला हवा. तूं तर वेदान्त वाचला आहेस ना? निजतेवेळीं देखील विचाराची तलवार उराशीं घेऊन निजायला हवें. अशासाठी की स्वप्नांत सुद्धा लोभ उत्पन्न होतां कामा नये. अशा रीतीने कठोर निश्चयाने वासनात्याग करतां करतां यथार्थ वैराग्याचा उदय होईल. तेव्हाच स्वर्गाचीं दारें मोकळीं झालेलीं पाहशील तूं तुझ्यासाठी.

शिष्य:-- स्वामीजी, भक्तिशास्त्रांत सांगितलें आहे की कठोर वैराग्याने भक्तिभावाची हानि होते. खरें आहे का हें?

स्वामीजी:-- दे फेकून तुझें तें भक्तिशास्त्र, त्यांत जर अशा गोष्टी सांगितल्या असतील तर. वैराग्य, संपूर्ण विषयवितृष्णा अंगीं बाणल्याशिवाय, कावळ्याच्या विष्ठेप्रमाणे कामिनी-कांचनाचा त्याग केल्याशिवाय 'न सिध्यति ब्रह्मशतान्तरेऽपि'-- ब्रह्मयाच्या कोटि कल्पांतहि सिद्धिलाभ होणें शक्य नाही. जप, ध्यान, पूजा, होम, तपस्या ह्या साऱ्या गोष्टी असतात तीव्र वैराग्य उत्पन्न व्हावें म्हणून. ह्या गोष्टी करूनहि ज्यांच्या ठिकाणीं वैराग्य उत्पन्न होत नसेल त्यांच्या बाबतींत समजावें की ते नाव नांगरून टाकून मग उगाचच वल्हीं मारण्याचा प्रयत्न करीत आहेत! 'न धनेन न चेज्यया त्यागेनैकेन अमृतत्व-मानशुः।'

शिष्य:-- मग काय कामिनीकांचनाचा त्याग करूनच सारें साध्य होईल?

स्वामीजी:-- या दोहोंच्या त्यागानंतरहि अनेकानेक अडच-

णींना तोंड द्यावयाचें असतें पुढे. उदाहरणार्थ, त्यानंतर सामना करावा लागतो नांवलौकिक व कीर्तीशीं. यांच्या तडाख्यांतून सामान्य माणूस वांचूं शकत नाही. लोक मान देत असतात, नाना प्रकारचे भोग समोर येऊन उभे राहतात. यांना त्यागी लोकांपैकी बारा आणे लोक बळी पडतात. हा जो मठ करतों आहें, नाना प्रकारचीं परहिताचीं कामें करतों आहें यांनी न जाणो मलाच पुन्हा बंधनांत पडावें लागावयाचें !

शिष्य:-- महाराज, आपण जर असें म्हणतां तर मग आमची काय अवस्था !

स्वामीजी:-- संसारांत आहेस म्हणून भय कसलें ? 'अभीः, अभीः, अभीः '--भय सोड. नागमहाशयांचा आयुष्यक्रम तर पाहिलासच ना ? संसारांत असूनहि संन्याशापेक्षा वरचढ. त्यांच्यासारखा दुसरा कुणी कुठे आढळून येत नाही. गृहस्थच जर कधी कुणाला व्हायचें असेल तर त्याने नागमहाशयांसारखें व्हावें. सारा पूर्वबंगाल नागमहाशयांच्यामुळे उजळून निघाला आहे. तुमच्या त्या भागांतल्या लोकांना सांगत जा त्यांच्याकडे जायला. त्यांतच त्यांचें कल्याण आहे.

शिष्य:-- आपण अगदी सत्य तेंच सांगितलें. श्रीरामकृष्ण-लीलेंत नागमहाशय म्हणजे जणु साक्षात् दीनता--विनय.

स्वामीजी:-- हें काय सांगायला पाहिजे ? मी त्यांच्या दर्शनाला म्हणून एकदा जाणार आहें. तूं येशील ? पाण्याने व्यापून टाकलेले विस्तीर्ण भू-प्रदेश पाहण्याची अनेकदा मला खूप इच्छा होते. मी जरूर जाऊन पाहून येईन ते एकदा. तूं तसें पत्र लिही त्यांना.

शिष्य:-- मी त्यांना अवश्य पत्र लिहितों. आपण देवभोगला त्यांच्या घरीं जाणार हें ऐकून ते तर आनंदाने अगदी वेडे होऊन

जातील ! फार पूर्वी जेव्हा आपण तिकडे जाणार असें त्यांना कळलें तेव्हा ते म्हणाले होते, 'सारा पूर्वबंगाल आपल्या चरण-धूलिकणांनी तीर्थक्षेत्र बनून जाईल.'

स्वामीजी:-- माहीत आहे ना तुला की ठाकुर नागमहाशयांना म्हणत असत 'जाज्वल्य अग्नि.'

शिष्य:-- होय, तें मीं ऐकलें आहे.

स्वामीजी:-- आता फार रात्र झाली आहे. तेव्हा ये आता तूं. पण जाण्यापूर्वी कांही खाऊन जा.

शिष्य:-- होय.

नंतर प्रसाद घेऊन शिष्य जेव्हा परत निघाला तेव्हा त्याच्या मनांत आलें, 'स्वामीजी काय अद्‌भुत पुरुष आहेत ! जणु साक्षात् ज्ञानमूर्ति आचार्य शंकर !'

---

# अध्याय २५ वा

स्थळ-- बेलूर मठ ( बांधणीचा काळ ).

वर्ष-- इ. स. १८९८.

विषय-- 'शुद्ध ज्ञान व शुद्ध भक्ति एक'-- पूर्ण ज्ञान असल्याखेरीज प्रेमानुभूति असंभव-- यथार्थ ज्ञान वा भक्ति जोंवर लाभत नाही तोंवरच विवाद— धर्मराज्यांत वर्तमानकालीं भारतांत कशा प्रकारचें धर्माचरण ठेवावयास हवें-- श्रीरामचंद्र, महावीर व गीताकार श्रीकृष्ण यांच्या पूजनाचा प्रसार करणें आवश्यक-- अवतार-महापुरुषांच्या आविर्भावाचा हेतु व श्रीरामकृष्णमाहात्म्य.

शिष्यः-- स्वामीजी, ज्ञान व भक्ति यांचा समन्वय कसा साधतां येईल ? असेंच नेहमी दिसतें की आचार्य शंकराचार्यांचें नांव घेतांच भक्तिमार्गी लोक कानावर हात ठेवतात, आणि जे ज्ञानमार्गी आहेत ते भक्तांचें व्याकुळ क्रंदन, त्यांचा उल्हास, नाचणें-गाणें पाहून त्या वेडपटांच्या लीला आहेत असें मानतात.

स्वामीजी:-- खरें म्हणजे गौण ज्ञान व गौण भक्ति यांच्यांतच हे झगडे चालू असतात. ठाकुर सांगत असत ती शिवाच्या भूतांची व रामाच्या वानरांची गोष्ट तर माहीत आहे ना ? *

शिष्य:-- होय, आहे माहीत.

स्वामीजी:-- पण अंतिम ज्ञान व भक्ति यांच्यांत कोणताहि फरक नाही. मुख्या भक्तीचा अर्थ हा की भगवंताची प्रेमस्वरूप म्हणून उपलब्धि करून घ्यावयाची. तूं सर्वत्र व सर्वांतच जर भगवंताचें प्रेमस्वरूप पाहूं शकलास तर मग रागद्वेष करायचा

---

* राम व शिवाचें युद्ध झालें. रामाचे गुरु शिव व शिवाचे गुरु राम. युद्ध संपतांच दोघांचें पुन्हा प्रेममीलन झालें. पण शिवाचे सैनिक भूतगण व रामाचे सैनिक वानर यांच्यांत तेव्हापासून चालू झालेला झगडा अद्याप कांही कमी झाला नाही वा थांबला नाही !

तरी कोणाचा ? ही अंतिम प्रेमानुभूति, एवढीशी जरी वासना बाकी असेल (ठाकुर म्हणत त्याप्रमाणे एवढीशी जरी काम-कांचनासक्ति उरली असेल) तर होणें सर्वथैव अशक्य. संपूर्ण प्रेमानुभूतींत देहबुद्धि देखील लोपून जाते. अंतिम ज्ञानाचें लक्षण म्हणजे सर्वत्र एकत्वानुभूति--आत्मस्वरूपाचें सर्वत्र, सर्वांच्या ठायीं दर्शन. आणि तेंहि एवढीशी जरी अहंबुद्धि असेल तर होणें शक्य नाही.

शिष्य:— तर मग आपण ज्याला प्रेम म्हणतां तेंच का परमज्ञान ?

स्वामीजी:-- नाही तर मग काय ? पूर्ण ज्ञान असल्याखेरीज कुणालाहि प्रेमानुभूति होणें शक्य नाही. वेदान्तशास्त्रांत ब्रह्माला सच्चिदानंद म्हटल्याचें वाचलें असशील. या सच्चिदानंद शब्दाचा अर्थ आहे--सत् म्हणजे अस्तित्व, चित् म्हणजे चैतन्य किंवा ज्ञान, आनंद म्हणजे प्रेम. भगवंताच्या सत् भावावरून भक्त व ज्ञानी यांच्यांत कोणताहि झगडा नाही. पण ज्ञानमार्गी ब्रह्माच्या चित् वा चैतन्य स्वरूपावर अधिक भर देतात व भक्तगण आनंदस्वरूपावरच सतत दृष्टि ठेवतात. पण चित् स्वरूपाची अनुभूति होतांच आनंदस्वरूपाचीहि उपलब्धि होते. कारण जें चित् तेंच आनंद.

शिष्य:-- असें असेल तर मग भारतांत नाना संप्रदाय एवढे प्रबळ कां म्हणून झाले आहेत ? व भक्तिमार्गांत व ज्ञानमार्गांत तरी एवढा विरोध काय म्हणून आढळतो ?

स्वामीजी:-- त्याचें असें आहे की, ज्या गौण भावांच्या आश्रयाने मनुष्य यथार्थ ज्ञानी वा भक्त होतो त्या गौणभावांवरूनच हे सारे झगडे उत्पन्न होतात. पण साध्य श्रेष्ठ की साधन ? तुझें काय मत आहे ? खात्रीनेच साध्यापेक्षा साधन कधीहि श्रेष्ठ

असूं शकत नाही. कारण अधिकारीभेदानुसार एकच साध्य नाना उपायांनी उपलब्ध होऊं शकतें. ध्यान, पूजा, होम-जप हीं धर्माचीं अंगें म्हणजे साधनें मात्र होत व पराभक्ति वा परब्रह्मस्वरूपाचें दर्शन हाच आहे मुख्य उद्देश. तेव्हा थोडचा विचाराने कळून येईल--- झगडा होत असतो तो कशाबद्दल तें. एकजण म्हणतो, 'पूर्वेकडे तोंड करून भगवानाची प्रार्थना केल्यास त्याचा लाभ होतो.' दुसरा म्हणतो, 'नाही. त्याचा लाभ होतो पश्चिमेकडे तोंड करून प्रार्थना केल्याने.' एखाद्याने बराच काल पूर्वेकडे तोंड करून प्रार्थना करून ईश्वरलाभ करून घेतला असेल, बस्, लागलीच त्याच्या शिष्यांनी प्रचाराला सुरवात केली की पूर्वाभिमुख होऊन प्रार्थना केल्याखेरीज ईश्वरलाभ होणें शक्य नाही. लागलीच दुसऱ्यांनी म्हणायला सुरवात केली की हें काय मत झालें ? आम्हीं ऐकलें की त्या अमक्या अमक्याला पश्चिमाभिमुख होऊन प्रार्थना केल्याने ईश्वरलाभ झाला, तेव्हा आम्हांला तुमचें हें मत मुळीच मान्य नाही. पक्षोपपक्ष होतात ते हे असे. असें झालें असेल की एखाद्याला हरिनाम जपून पराभक्तिलाभ झाला, बस् लागलीच शास्त्र तयार झालें-- 'नास्त्येव गतिरन्यथा।' कुणाला अल्ला, अल्ला म्हणून सिद्धिलाभ झाला असेल---त्यावरून आणखी एक मत प्रचारांत आलें. या पूजाजपादिकांचा मूळारंभ काय हें आपण पाहावयास हवें. तो आरंभ म्हणजे श्रद्धा. संस्कृतांतील 'श्रद्धा' शब्द समजावून देण्याजोगा प्रतिशब्द आपल्या भाषेंत नाही. उपनिषदें सांगतात की या श्रद्धेचा उदय नचिकेत्याच्या हृदयांत झाला होता. 'एकाग्रता' शब्दाने देखील श्रद्धा शब्दांतील साऱ्या अर्थच्छटा व्यक्त करतां येत नाहीत. 'एकाग्रनिष्ठा' हा शब्द संस्कृत श्रद्धा शब्दाचा अर्थ जवळपास व्यक्त करूं शकतो. कोणत्याहि का असेना, एखाद्या

तत्त्वावर एकाग्रनिष्ठेने जर विचार करीत राहिलें तर आढळून येईल की मनाची गति आपोआप एकत्वाच्या दिशेने जात आहे, सच्चिदानंदस्वरूपाकडे अनुभूतीसाठी वळत आहे. भक्तिशास्त्र काय किंवा ज्ञानशास्त्र काय दोन्हीहि अशा प्रकारची एखादी निष्ठा जीवनांत आणण्यासाठी मनुष्याला मोठ्या आग्रहाने उपदेश करीत असतात. युगानुयुगाच्या परंपरेने विकृत झालेल्या त्याच महान् सत्याची हळूहळू पुढे रूढींत परिणति झाली आहे. फक्त तुमच्या भारतांतच हें घडलें असें नाही तर पृथ्वीवरील साऱ्या समाजांत, साऱ्या जातींत हें आढळून येतें. आणि तेव्हा पासूनच विचारहीन माणसें या गोष्टींना उराशीं कवटाळून वाद कर-करून मरताहेत. मूळ मुद्दा बाजूला राहिल्यानेच ही लठ्ठालट्ठी चालूं दिसते.

शिष्य:-- महाराज, मग यावर उपाय काय ?

स्वामीजी:— पुरातन कालाप्रमाणे पुन्हा ठीक श्रद्धा निर्माण करावयास हवी. तिच्याभोवती जें व्यर्थ तण माजलें आहे तें समूळ उखडून काढावयास हवें. प्रत्येक मतांत, प्रत्येक मार्गांत देशकालातीत सत्यें आढळून येतातच येतात; पण कांही निरर्थक गोष्टींमुळे तीं झाकलीं गेलीं असतात. या साऱ्या व्यर्थ गोष्टी काढून टाकून हीं तत्त्वें लोकांसमोर मांडावयास हवींत. यानेच तुमच्या देशाचें, धर्माचें मंगल होईल.

शिष्य:-- पण हें सारें साधायचें कसें ?

स्वामीजी:-- कां ? त्यांत एवढें संकट पडण्यासारखें काय आहे ? सुरवात करावी लागेल महापुरुषांच्या पूजनप्रचारापासून. ज्यांनी तीं सारीं सनातन तत्त्वें प्रत्यक्ष जीवनांत उतरविलीं त्यांना सर्व लोकांसमोर आदर्श म्हणून ठेवावयास हवें. भारतापुरतेंच बोलावयाचें झालें तर श्रीरामचंद्र, श्रीकृष्ण, हनुमान व श्रीराम-

कृष्ण यांना आदर्श म्हणून लोकांपुढे ठेवतां येईल. देशांत श्रीरामचंद्रांची व हनुमंताची पूजा प्रचलित कर पाहूं. कृष्णाच्या वृंदावनलीला या घटकेला तरी ठेव बघूं बाजूला. गीतारूप सिंहगर्जना करणाऱ्या श्रीकृष्णांच्या पूजेला आता महत्त्व द्यावयाला हवें; शक्तिपूजेला आता प्राधान्य द्या.

शिष्य:— पण वृंदावनलीलेने काय बिघडविलें इतकें ?

स्वामीजी:-- श्रीकृष्णाच्या त्या लीलापूजनाने तुमच्या देशाचें भलें होणार नाही. बांसरी वाजवून देशाचें काय कल्याण होणार आहे ? आता निकड आहे महात्याग, महानिष्ठा, महाधैर्य व स्वार्थशून्य शुद्ध बुद्धीच्या बळावर कठोर प्रयत्न करून साऱ्या गोष्टी नीट समजावून घेण्यासाठी कटिबद्ध होण्याची.

शिष्य:-- वृंदावनलीला सत्य नाहीत असें का मग आपलें मत आहे ?

स्वामीजी:-- तसें कुठे मीं म्हटलें ? त्या लीलांची सुरवातीला नुसती धारणा व उपलब्धि करून घेण्यासाठीहि अत्यंत दुर्दम्य व कठोर साधनांची आवश्यकता असते. या घोर कामकांचनासक्तीच्या काळांत त्या वृंदावनलीलांच्या उच्च भावांची नुसती धारणा सुद्धा करून घेणें कुणाला शक्य नाही.

शिष्य:-- तर मग आज जे मधुर-सख्य-भावादिकांचा अवलंब करून साधना करतात त्यांपैकी कुणीहि योग्य साधना करीत नाहीत असें का आपल्याला म्हणावयाचें आहे ?

स्वामीजी:-- माझें तर ठीक तसेंच मत आहे. विशेषत: मधुरभावाच्या साधकांबद्दल तर मला तसें खास वाटतें. आता त्यांतहि योग्य मार्गाने साधना करणारे चार दोन लोक नसतीलच असें नाही. बाकी बहुतेक असतात भयंकर तमोगुणी, अत्यंत विकृत व अनैसर्गिक मानसिक दुबळेपणाने पछाडलेले. म्हणून

म्हणतों, देशांत जागृति करावयाची असेल तर हनुमंताची, शक्तीची, प्रभु श्रीरामचंद्राची पूजा घरोघर प्रचलित करावयास हवी. दुसरा मार्गच नाही कांही.

शिष्य:-- पण मीं ऐकलें आहे की ठाकुर साऱ्यांबरोबर संकीर्तन करण्यांत खूप आनंद मानीत असत.

स्वामीजी:-- त्यांची गोष्टच वेगळी. सामान्य जीवांची त्यांच्याबरोबर काय तुलना होऊं शकेल ? सारींच मतमतांतरें, सारे पंथोपपंथ एकाच सत्याप्रत नेतात हें प्रत्यक्ष दाखविण्यासाठी त्यांनी साऱ्या मतांच्या व पंथांच्या साधना केल्या. त्यांनी जें केलें तें काय तुम्ही-आम्ही करूं शकूं ? ते कोण व त्यांची खरी थोरवी तरी काय हेंच आम्ही कुणी अजून समजूं शकलों नाहीं. एवढ्याचसाठी त्यांच्यासंबंधी भलत्यासलत्या ठिकाणीं मी कधी चुकूनहि बोलत नाहीं. ते कोण होते तें एक फक्त त्यांनाच माहीत, त्यांचा देहच फक्त होता मानवाचा पण त्यांचें राहणें वागणें होतें सारें दैवी--अमानवी.

शिष्य:-- आपण त्यांना काय अवतार मानतां ?

स्वामीजी:-- 'अवतार' शब्दाचा तुझा अर्थ काय हें तर सांग आधी.

शिष्य:-- कां बरें ? श्रीराम, श्रीकृष्ण, श्रीगौरांग, बुद्ध, येशू वगैरेसारख्या व्यक्ति म्हणजेच अवतार.

स्वामीजी:-- ज्यांचीं नांवें आता तूं घेतलीस त्या सर्वांपेक्षा मी श्रीरामकृष्णांना श्रेष्ठ मानतों--मानतों म्हणणें म्हणजे कमीच झालें, तो माझा अनुभव आहे. बरें तें असो आता. एवढेंच फक्त आता ऐकून ठेव की समयाला व समाजाला उपयोगी असा एक एक महापुरुष योग्य वेळीं येत असतो--धर्मोद्धार करण्यासाठी. त्याला महापुरुष म्हणा की अवतार म्हणा--त्या म्हणण्याचें कांही

नाही विशेष. जगांत येऊन जीवांना त्यांचें जीवन घडविण्यासाठी ते आपला आदर्श ठेवून जातात. जो ज्या वेळीं येतो त्या वेळीं त्याच्या आदर्शानुसार मानवी जीवन घडत असतें, संप्रदाय प्रचलित होत असतात. कालान्तराने हे संप्रदाय विकृत झाले की त्यांच्यावर संस्कार करणारा दुसरा महापुरुष निर्माण होतो, आणि हें असें सतत एखाद्या प्रवाहाप्रमाणे चालूं असतें.

शिष्यः——तर मग ठाकुर अवतार होते असा आपण प्रचार कां नाही करीत? आपल्यांत तें सामर्थ्य व वक्तृत्व दोन्ही तर आहेत?

स्वामीजीः—— मी तसें करीत नाही एवढ्याचसाठी की मी त्यांना फारच थोडें समजूं शकलों. ते मला एवढे मोठे वाटतात की त्यांच्याबद्दल बोलायचें मला भय वाटतें. वाटतें की असें करण्यांत सत्याचा अपलाप तर होणार नाही ना? वाटतें आपली सारी शक्ति त्यांचें वर्णन करायला अपुरी पडेल——त्यांचा गौरव करावा म्हणून प्रयत्न करण्यांत आपल्याच रंगांनी त्यांचें चित्र रंगवून मी त्यांना कमीपणाच आणीन की काय असें भय वाटतें मला.

शिष्यः—— पुष्कळ जण तर आजकाल त्यांचा अवतार म्हणून प्रचार करतात.

स्वामीजीः—— ते खुशाल तसें करोत. ज्याला जसें समजतें तसें तो करतो. तुझाहि जर तसाच विश्वास असेल तर तूंहि तसा प्रचार कर.

शिष्यः—— मी आपल्यालाच तर नीट समजूं शकलों नाही तर मग ठाकुरांची गोष्ट कुठे? आपल्या कृपाकणानेच माझा हा जन्म सार्थकीं लागेल.

आजचें बोलणें येथेच संपलें व शिष्य स्वामीजींना वंदन करून घरीं परतला.

## अध्याय २६ वा

**स्थळ— बेलूर मठ ( बांधणीचा काळ ).**

**वर्ष-- इ. स. १८९८.**

**विषय—** धर्मलाभ करण्यासाठी कामकांचनासक्तीचा त्याग करणें गृहस्थ व संन्यासी या दोघांनाहि सारखेंच आवश्यक—कृपासिद्ध कोणाला म्हणतात--देश-काल-निमित्तांच्या अतीत असलेल्या साम्राज्यांत कोण कुणावर कृपा करणार ?

शिष्य:-- स्वामीजी, ठाकुर म्हणत असत की कामकांचनाचा त्याग केल्याखेरीज धर्ममार्गावर प्रगति होणें अशक्य. मग जे गृहस्थ असतील त्यांचें कार्य ? त्यांना तर रात्रंदिवस या दोन्ही गोष्टींना तोंड द्यावें लागतें ?

स्वामीजी:— कामकांचनावरील आसक्ति गेल्याखेरीज ईश्वराकडे मन वळत नाही--मग तुम्ही गृहस्थ असा की संन्यासी असा. या दोन गोष्टी मनांत असेपर्यंत ठीक अनुराग, निष्ठा किंवा श्रद्धा यांचा उदय होणेंच शक्य नाही.

शिष्य:-- मग अशा परिस्थितींत गृहस्थांनी काय करावें ?

स्वामीजी:-- त्यांना उपाय हाच की लहानसहान वासना पूर्ण करून घ्यायच्या आणि मोठ्यांच्या बाबतींत विवेक-विचार करून त्यांचा त्याग करायचा. त्याग केल्याखेरीज ईश्वरलाभ अशक्य--'यदि ब्रह्मा स्वयं वदेत्'--साक्षात् ब्रह्मदेव जरी म्हणाले तरी त्यागाखेरीज ईश्वरलाभ शक्य नाही.

शिष्य:-- पण संन्यास घेतल्यानेच का विषयत्याग होतो ?

स्वामीजी:-- असें होणें कसें शक्य आहे ? पण संन्याशाने कामकांचनाचा संपूर्णतया त्याग केला असतो--तसा त्याग करायची त्याची तयारी व प्रयत्न असतात. उलट गृहस्थ मात्र नांगर टाकून नाव हाकारण्यासाठी वल्हीं मारायचा प्रयत्न करीत

असतात हाच त्यांच्यांत भेद. भोगाची वासना कधीतरी तृप्त होते का ? 'भूय एवाभिवर्धते--' दिवसानुदिवस ती वाढतच असते.

शिष्य:— भोग भोगून अखेर विटून जाऊन तरी शेवटीं वितृष्णा उत्पन्न होईल त्यांच्याबद्दल ?

स्वामीजी:— दूर हो मूर्खा ! अशा मार्गाने वितृष्णा किती जणांच्या ठिकाणीं निर्माण झाल्याचें पाहिलेंस तूं ? सारखे विषय-भोग भोगीत राहिल्याने मनावर त्या विषयांची छाप पडते--त्या विषयांचाच घाट येतो मनाला, विषयांच्या रंगानेच मन रंगून निघतें. म्हणून त्याग, एकमात्र त्याग हाच मूळमंत्र.

शिष्य:-- असें कां म्हणतां महाराज ? ऋषींचींच तर वचनें आहेत ना ?--'गृहेषु पंचेंद्रियनिग्रहस्तप:' 'निवृत्तरागस्य गृहं तपोवनम् ।' गृहस्थाश्रमांत राहूनहि रूपरसादि विषय-भोगांपासून अलिप्त राहण्यालाच तप म्हणतात; विषयोपभोगांबद्दल असलेला अनुराग दूर झाल्यास घरच तपोवनांत परिणत होतें.

स्वामीजी:-- संसारांत राहूनहि जे कामकांचन-त्याग करूं शकतात ते धन्य होत. पण तो त्याग करूं शकतात मुळांत किती जण ?

शिष्य:-- आपण तर आधीच सांगितलें आहे की संन्याशांत देखील अनेक जण संपूर्ण कामकांचन-त्यागी नसतात म्हणून ?

स्वामीजी:-- कबूल, पण त्याचबरोबर मीं हेंहि सांगितलें की ते संपूर्ण त्याग-मार्गावरून जात असतात--कामकांचनादि विषयोपभोगांविरुद्ध युद्ध करण्याला ते दंड थोपटून सिद्ध असतात. कामकांचनासक्ति ही एक पायबंद घालणारी शक्ति, आपदा आहे हेंच मुळी अखेरपावेतो गृहस्थांना उमगत नाही. आत्मोन्नतीसाठी त्यांच्याकडून काडीचाहि प्रयत्न होत नाही. त्या विषयभोगां-

बरोबर सामना करण्याची साधी जाणीव, पुसट भावनाहि कधी त्यांच्या ठिकाणीं दिसत नाही.

शिष्य:-- या आसक्तीचा त्याग करावा म्हणून त्यांच्यांत देखील अनेक लोक प्रयत्न करतांना दिसतातच ना ?

स्वामीजी:-- असा प्रयत्न जे करतील ते अवश्य त्यागी होतील हळूहळू ; त्यांच्यांतील कामकांचनासक्ति धीरे धीरे जाईल अखेर. पण खरी गोष्ट ही आहे की 'आताच कशाला सोडा, सोडतों, सोडीन', 'इतक्यांत घाई कशाला ? होतेंच आहे, होईलच ठीक कालान्तराने' असल्या ढिल्या चालीने चालणाऱ्यांनी समजून असावें की आत्मदर्शन त्यांच्यासाठी अजून फार दूरची गोष्ट आहे ! 'या क्षणीं ईश्वरलाभ करून घेईन, या जन्मींच ही गोष्ट साधून घेईन' हीच असते वीरांची भाषा. त्यांनाच उद्देशून शास्त्रांनी सांगितलें आहे 'यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेत्'--'वैराग्याचा ज्या क्षणीं उदय होईल अगदी त्याच क्षणीं सारें सोडून निघून जावें'.

शिष्य:-- पण ठाकुर तर म्हणत असत की ईश्वराची कृपा झाल्यास, त्याची प्रार्थना केल्यास तो ही सारी आसक्ति एका क्षणांत नष्ट करून टाकील.

स्वामीजी:-- त्याची कृपा झाल्यास तसें खासच होईल, पण त्याची कृपा प्राप्त करून घेण्यासाठी आधी शुद्ध, शुचि, पवित्र व्हायला हवें सर्व दृष्टींनी; कायामनोवाणीकरून पवित्र व शुद्ध व्हायला हवें तेव्हा कुठे त्याची कृपा होते.

शिष्य:--पण कायामनोवाणीकरून संयम पाळूं शकल्यास मग त्याच्या कृपेची आवश्यकताच काय मुळी ? तसें झाल्यास मग मींच माझ्या कष्टपूर्ण प्रयत्नांनी आत्मोन्नति साधली असें होईल.

स्वामीजी:-- तूं प्राण पणाला लावून प्रयत्न करतोस हें

पाहूनच तो कृपा करतो. असा प्रयत्न न करतांच तूं नुसता बसून राहा, पाहशील त्याची कृपा कधीच लाभणार नाही.

शिष्यः— चांगलें व्हावें अशी बहुतेकांची इच्छा असते--पण कुठल्या अनाकलनीय शक्तीनें मन आधोगामी होऊन जातें कांही पत्ता लागत नाही. साऱ्यांच्याच मनांत आपण सन्मार्गगामी व्हावें, भलें व्हावें, ईश्वरलाभ करून घ्यावा अशी इच्छा होत नसेल काय ?

स्वामीजीः-- ज्यांच्या मनांत अशी इच्छा उत्पन्न होते त्यांच्या मनांत या आसक्तींशीं संग्राम करण्याचा प्रयत्नहि सुरू होतो हें पक्कें लक्षांत ठेव. आणि असा प्रयत्न करतां करतांच ईश्वराची दया लाभते. ,

शिष्यः--- पण अनेक अवतारांत तर असेंहि दिसून येतें की ज्यांना आपण भयंकर पापी, व्यभिचारी म्हणून समजतों तेहि साधन-भजन कांहीएक न करतां त्या अवतारी पुरुषांच्या कृपेने विनायास ईश्वरकृपेला पात्र झाले--याचा अर्थ काय मग ?

स्वामीजीः-- हें खरें. पण लक्षांत ठेव की त्यांच्या ठिकाणीं भयंकर अशान्ति उत्पन्न झाली असावी, भोग भोगतां भोगतां विटून जाऊन भयंकर वितृष्णा निर्माण झाली असावी आणि त्यामुळे त्यांचें हृदय अगदी जळूनपोळून होरपळून निघत असावें. हृदयांत अशा दारुण अभावाची जाणीव निर्माण झाली असावी की शान्तिलाभ झाल्याखेरीज त्यांचा देह तगूं शकला नसता. म्हणूनच भगवन्ताची करुणा त्यांना लाभली. तमोगुणाद्वारें हे सारे लोक धर्मपथावर आले होते.

शिष्यः-- तमोगुण असो वा अन्य कांही असो, याहि मार्गाने त्यांना वास्तविक ईश्वरलाभ झाला होता ना ?

स्वामीजीः — हो, आणि तो तसा होणार कां नाही ? पण पाय-

खान्याच्या मागील दारांतून घरांत प्रवेश करण्यापेक्षा समोरच्या मोठ्या दरवाज्यांतून घरांत प्रवेश करणें अधिक बरें नाही का ? आणि दुसरें असें की त्याहि मार्गावरून जातांना 'मनाची ही दारुण अशान्ति कशी दूर करूं' अशा प्रकारची भयंकर टोचणी व प्रयत्न या दोन्ही गोष्टी असतातच, नाही ?

शिष्य:-- तें ठीक आहे ! पण माझ्या मतें जे इंद्रियादिकांचें दमन करून व कामकांचनादिकांच्या त्यागाद्वारें ईश्वरलाभ करून घेतात ते प्रयत्नवादी, स्वावलंबी होत आणि जे फक्त भगवन्ताच्याच नांवाचा विश्वास व भरवसा धरून आहेत त्यांची कामकांचनासक्ति तोच कालान्तराने दूर करून अखेर त्यांना परमपद देतो.

स्वामीजी:--हो, पण असे लोक अत्यंत थोडे; ते सिद्ध झाल्यानंतर लोक त्यांनाच कृपासिद्ध म्हणतात. ज्ञानी आणि भक्त या दोघांच्याहि मतें मात्र त्याग हाच आहे मूलमंत्र.

शिष्य:-- त्यांत कांही संशय नाही. गिरीशचंद्र घोष मला एकदा म्हणाले होते, 'कृपेच्या बाबतींत कांहीहि नियम नाहीत-- असे नियम असतील तर मग तिला कृपाच म्हणतां येणार नाही. कृपा म्हणजे सारा बेकायदा कारभार !'

स्वामीजी:— तसें नाही रे, तसें नाही ! गिरीश घोष ज्या अवस्थेची गोष्ट सांगतात त्याहि अवस्थेंत आपल्याला माहीत नसलेला एखादा नियम-कायदा असेलच असेल. अगदी 'बे-कायदा कारभार' ही तर अगदी चरम अवस्था, देशकालनिमित्तांपलीकडील स्थिति. तेथे मुळी कार्य-कारण संबंधच नाही. मग अशा स्थितींत कोण कोणावर कृपा करणार ? तेथे तर सेव्यसेवक, ध्याता-ध्येय, ज्ञाता-ज्ञेय हीं सारीं एक होऊन जातात--सारे समरसून जातात !—सारे समरस, एकरस !

शिष्यः—बरें तर महाराज, आज आता येतों मी. आज आपलें बोलणें ऐकून वेद-वेदान्ताचें सारें सार उमगलें. आजपावेतो नुसते मोठमोठे शब्दच ऐकत आलों इतरत्र.

नंतर स्वामीजींची पदधूलि घेऊन शिष्य कलकत्त्याला जाण्यास निघाला.

# अध्याय २७ वा

**स्थळ-- बेलूर मठ ( बांधणीचा काळ ).**

**वर्ष-- इ. स. १८९८.**

**विषय--** खाद्याखाद्य विचार कसा करायला हवा -- मांसाहार कुणी करावा--भारतांतील वर्णाश्रमधर्माची कशा प्रकारें पुन्हा स्थापना व्हावयास हवी.

शिष्य:-- स्वामीजी, खाद्याखाद्याचा धर्माचरणाशीं कांही संबंध आहे का ?

स्वामीजी:-- थोडाफार आहे म्हणावें लागेल.

शिष्य:-- मांसमच्छी खाणें उचित व आवश्यक आहे का ?

स्वामीजी:-- तें खूप खा बाबा ! तें खाऊन जें पाप लागेल तें माझ्या माथीं ! * तुझ्या या देशांतल्या लोकांकडे एकदा डोळे उघडून तर पाहा. त्यांचे चेहेरे काळवंडलेले, अंगांत साहस-उद्यमाच्या नांवाने शून्य, पोटाचे नगारे झालेले, हातापायांच्या

---

* स्वामीजींच्या या उत्तरावरून कुणी अशी समजूत करून घेऊं नये की मांसाहाराबाबत ते अधिकाराचा विचार करीत नसत. योगासंबंधीच्या-त्यांच्या अन्य ग्रंथांत खाण्यापिण्याबाबत त्यांनी हाच साधारण नियम सांगितला आहे की पचावयास जड असल्याने ज्यामुळे अजीर्णादि रोग होतात किंवा तसें नसलें तरी ज्यामुळे शरीरांत अकारणच उष्णता वाढून मन व इंद्रियांत बेचैनी उत्पन्न होते असा आहार टाळावयास हवा. म्हणूनच आध्यात्मिक उन्नतीसाठी प्रयत्न करणाऱ्यांपैकी मांस खाण्याची प्रवृत्ति असणाऱ्यांना वरील दोन गोष्टी लक्षांत ठेवावयास त्यांनी सांगितलें आहे. नाहीतर मांस खाणें सोडून देण्यास ते सांगत. शरीरस्वास्थ्य व मानसिक पवित्रता लक्षांत घेऊनच ज्याने त्याने हा प्रश्न सोडवावा असें ते सांगत. पण भारतांतील सर्वसाधारण गृहस्थांनी मांसाहार ठेवावा असेंच त्यांचें मत असे. जगांतील इतर मांसाहारी लोकांशीं स्पर्धा करावयाची असल्याने वर्तमानकाळीं त्यांनी मांसाहार अवश्य करावा असें त्यांचें मत होतें.

काडचा, मुलखाचे भित्रे आणि डरपोक असेच आढळून येतील बहुतेक सारे !

शिष्यः— मांसमच्छी खाणें जर हितावहच असेल तर बौद्ध व वैष्णव धर्मी लोक 'अहिंसा परमो धर्म' असें काय म्हणून सांगतात ?

स्वामीजीः-- बौद्ध व वैष्णव धर्म यांत कांही भेद नाही. बौद्ध धर्माचा ऱ्हास झाल्यानंतर हिंदुधर्माने त्यांतील कांही तत्त्वें घेऊन पचवून टाकलीं. तोच भाग आता वैष्णव धर्म म्हणून प्रचलित आहे. 'अहिंसा परमो धर्मः' हें बौद्ध धर्मांचें तत्त्व मुळांत आहे फार चांगलें, पण अधिकारीभेदाचा विचार न करतां राजसत्तेच्या बळावर तें अगदी सर्वसामान्य लोकांच्याहि माथीं मारून बौद्ध धर्माने हिंदुस्थानचा अगदी सत्यानाश करून टाकला. त्याचा परिणाम अखेर हा झाला की लोक मुंग्यांना साखर खाऊं घालतात अन् इकडे मात्र स्वार्थासाठी भावांचे गळे कापतात ! असले 'बकः परम धार्मिकः' वृत्तीचे लोक माझ्या या जीवनांत मीं अनेक पाहिले आहेत. उलटपक्षीं वैदिक व मनुप्रणीत धर्मांत मांसमच्छी खाण्याचेंहि नियम आहेत आणि लागलीच अहिंसेचेंहि विवेचन आहे. अधिकारभेदानुसार हिंसा व अहिंसा या दोन्हीसाठी त्यांत व्यवस्था आढळते. श्रुति सांगते 'मा हिंस्यात् सर्वभूतानि ।' मनुहि सांगतो—'निवृत्तिस्तु महा फला ।'

शिष्यः-- पण धर्माकडे थोडाहि कल झाल्यास लोक मांसमच्छी खाणें सोडून देतांनाच आढळतात. व्यभिचारापेक्षाहि मांसमच्छी खाणें अधिक पापाचें असें पुष्कळांचें मत दिसतें. ह्या कल्पना कोठून आल्या ?

स्वामीजीः-- त्या कोठून आल्या हें समजावून घेऊन तुला काय फायदा ? पण या मतांमुळे तुमच्या समाजाचा व देशाचा

सर्वनाश होत आहे हें तर खरें ना ? तुम्ही पूर्व-बंगाली लोक मांस-मच्छी खातां, कासव देखील खातां. पण म्हणूनच प्रकृतीच्या दृष्टीनें तुम्ही पश्चिम बंगालमधील लोकांपेक्षा अधिक चांगले आहांत. तुमच्या पूर्वबंगालमधील धनिकवर्गानें देखील अद्याप रात्रीं पुऱ्या खाणें सुरू केलें नाही म्हणूनच आमच्यासारखा आम्लपित्ताचा अन् अपचनाचा उपद्रव तुम्हां लोकांना अजून नाही. मीं तर ऐकलें आहे की पूर्व बंगालमधील खेडयापाडयांतील लोकांना आम्लपित्ताचें नांव ऐकूनहि अद्याप माहीत नाही !

शिष्य:-- खरें आहे तें. आमच्या भागांत आम्लपित्ताचा उपद्रव अद्याप तरी कुणालाहि ठाऊक नाही. इकडे आल्यानंतरच प्रथम मीं या रोगाचें नांव ऐकलें. आमच्याकडे अगदी दोन्ही सांज आम्ही मच्छीभात खात असतों.

स्वामीजी:-- तें खूप खात जा. झाडपाला अन् गवत कडबा खाऊन खाऊन पोटरोगी झालेल्या लोकांनी सारा देश अगदी व्यापून टाकला आहे. तें खाणें कांही सत्त्वगुणाचें चिन्ह नव्हे. तें म्हणजे महातमोगुणाची, नव्हे मृत्यूचीच छाया ! सत्त्वगुणाचें चिन्ह म्हणजे मुखावर उज्ज्वल तेज, हृदयांत अदम्य उत्साह अन् तमोगुणाचें लक्षण म्हणजे आळस, जडता, मोह, निद्रा वगैरे.

शिष्य:-- पण मांसमच्छी यांनी तर रजोगुण वाढतो.

स्वामीजी:-- मला तेंच तर व्हायला हवें आहे. आज रजोगुणाचीच आवश्यकता आहे. देशांतील आज जे लोक तुला सत्त्वगुणी वाटतात त्यांतील रुपयांत पंधरा आणे तरी लोक आहेत घोर तमोगुणी. रुपयांत एक आणा लोक जरी सत्त्वगुणी आढळले तरी मी म्हणतों पुष्कळ झालें. आता हवी आहे रजोगुणाची प्रचंड उद्दीपना. कारण सारा देश घोर तमोगुणाने व्यापला आहे हें काय दिसत नाही ? आता देशांतील लोकांना मांसमच्छी खाऊं घालून

उद्योगतत्पर करायला हवें, जागृत करायला हवें, कार्यप्रवण करायला हवें. नाहीतर देशांतील सारे लोक जडमूढ होऊन जातील. अगदी वृक्षपाषाणादिकांप्रमाणे जड होतील. म्हणून म्हणतों की खूप मांसमच्छी खा.

शिष्य:-- पण मनांत जेव्हा प्रबळ सत्त्वगुण उत्पन्न होतो तेव्हा मांसमच्छी खाण्याची स्पृहा राहते काय ?

स्वामीजी:-- नाही, तेव्हा ती राहत नाही. सत्त्वगुणाचा खूप विकास झाल्यानंतर मांसाशनाची इच्छा राहत नाही. पण सत्त्वगुणाचीं लक्षणें आहेत-- परहितासाठी सर्व समर्पण, कामिनीकांचनाबद्दल संपूर्ण अनासक्ति, निरभिमानत्व आणि अहंबुद्धिशून्यता. हीं सर्व लक्षणें ज्याच्या ठिकाणीं विकसित स्वरूपांत असतात, त्याला मांसाशनाची इच्छा नसते. आणि मनामध्ये वरील गुणांचा तर उदय झाला नाही, पण अहिंसावाद्यांच्या टोळक्यांत तर जाऊन एखादा उभा राहिला आहे, तर अशा वेळीं खात्रीने समज की एक तर तो म्हणजे दांभिक आहे किंवा लोकदिखाऊ धर्माचरण करणारा आहे. खरीखरी सात्त्विक अवस्था होईल तेव्हा मग मांसाहार तूं सोडून दे.

शिष्य:--- पण छांदोग्य उपनिषदांत तर सांगितलें आहे, 'आहारशुद्धौ सत्त्वशुद्धिः।' शुद्धवस्तूंचा आहार केल्यानेच सत्त्वगुणाची वाढ होते. म्हणून सत्त्वगुण अंगीं बाणविण्यासाठी रज व तमोगुणोद्दीपक भोजनाचा आधीच त्याग करावयास हवा असा नाही का येथे श्रुतीचा अभिप्राय ?

स्वामीजी:— या श्रुतीचा अर्थ करतांना शंकराचार्य म्हणतात, 'आहार म्हणजे इंद्रियांचे विषय' आणि रामानुजाचार्यांनी आहार याचा अर्थ खाद्य असा केला आहे. माझ्या मतें या दोघांच्याहि अर्थांचा समन्वय करून घ्यावयास हवा. रात्रंदिवस केवळ खाद्या-

खाद्यांचा विचार करूनच का जीवन चालवायचें ? की इंद्रियसंयम करायचा ? इंद्रिसंयम हाच मुख्य उद्देश मानावयास हवा आणि या इंद्रियसंयमाच्या दृष्टीनेच साहाय्यक म्हणून भल्याबुऱ्या खाण्यापिण्याबाबत थोडाफार विचार करावयास हवा. शास्त्रें सांगतात--खाद्य त्रिविध दोषांनी दूषित व त्याज्य ठरतें. (१) जातिदोष--जसे कांदा लसूण वगैरे. (२) निमित्तदोष--जसे हलवायाच्या दुकानांतील पदार्थ. त्यांवर हजारो माशा घोंगावत असतात व रस्त्यावरील धुळीने ते माखून गेलेले असतात. आणि (३) आश्रयदोष---म्हणजे चारित्र्यहीन व्यक्तींनी स्पर्श केलेलें खाद्य. खाद्यपदार्थ जातिदोष व निमित्तदोष यांनी दूषित झाले आहेत किंवा नाही याकडे खूप लक्ष द्यावयास हवें. पण या देशांत या गोष्टींकडे अजिबात लक्ष देत नाही कुणीहि. लक्ष देतात ते फक्त अगदी शेवटीं सांगितलेल्या आश्रयदोषांकडे की जे योग्यांखेरीज इतर कुणाला उमगणेंहि शक्य नाही ! पण त्याच दोषावरून साऱ्या देशांत लठ्ठालठ्ठी चाललेली दिसते. 'शिवूं नका' म्हणून 'शिवूं नका-वादी' पंथाच्या लोकांनी सारा देश विनाशाच्या दरडीवर आणून उभा केला आहे. बरें हें करतांनाहि माणसाच्या चांगल्या-वाईट चारित्र्याचा विचार नाही. गळयांत एक जानव्याची दोरी असली की झालें ! त्याच्या हातचें खायला मग या 'शिवूं नका-वाद्यांना' कांही अडचण वाटत नाही. खाद्यांतील आश्रयदोष अगदी टिपून काढतांना एकमात्र ठाकुरांनाच पाहिलें. अशा अनेक घटना घडल्या की जेथे ते कांही कांही लोकांनी शिवलेले पदार्थ खाऊं शकले नाहीत. बारकाईने शोध केल्यानंतर मला आढळून आलें की खरोखरच त्या लोकांत कांही ना कांही फार मोठें चारित्र्यव्यंग होतें. आजचा तुमचा सारा धर्म जाऊन बसला आहे सैंपाकाच्या भांडयांत. दुसऱ्या जातीच्या लोकांनी शिवलेलें अन्न न

खाल्लें की जणु झाला भगवानलाभ. शास्त्रांतील महान् तत्त्वें सोडून देऊन वरचीं फक्त टरफलेंच घेऊन आज मारामारी चालली आहे.

शिष्य:-- तर मग आपलें असें का म्हणणें आहे की साऱ्यांनी शिवलेलें अन्न खाणें हें आमचें कर्तव्य आहे म्हणून ?

स्वामीजीं:-- तसें मी कशाला म्हणूं ? मला फक्त येवढेंच म्हणावयाचें आहे की तूं ब्राह्मण. दुसऱ्या जातीच्या लोकांनी शिवलेलें अन्न तूं न खाल्लेंस तरी चालेल, पण बाकी ब्राह्मणांच्या हातचें अन्न तूं कां खाऊं नयेस ? तूं राढी ब्राह्मण असलास तरी वारेन्द्र ब्राह्मणांच्या हातचें अन्न खाण्याला तुला काय हरकत ? आणि वारेन्द्रांनी तरी तुझ्या हातचें कां खाऊं नये ? महाराष्ट्रीय, तेलंगी आणि कनोजी ब्राह्मणांनी तुमच्या हातचें कां खाऊं नये ? कलकत्त्यांत तर या जातिविचारांची आणखी मजा आहे. पाहावें तर अनेक ब्राह्मण आणि कायस्थ हॉटेलांतून भात खाऊन येतात अन् लागलीच बाहेर येऊन तोंड पुसून समाजाचे नेते म्हणून मिरवतात. त्यांनीच दुसऱ्यांसाठी जाती आणि खाण्यापिण्याबद्दल नियम केलेले असतात. मी म्हणतों की या साऱ्या ढोंगी लोकांनी केलेल्या नियमांप्रमाणे काय समाजाने चालायला हवें ? त्यांनी केलेले हे नियम फेकून देऊन सनातन ऋषींच्या अनुशासनाचा अवलंब करावयास हवा. तरच देशाचें कांही कल्याण होईल.

शिष्य:— तर मग काय कलकत्त्यांतील आधुनिक समाज पुरातनऋषींच्या अनुशासनानुसार आज चालत नाही ?

स्वामीजी:-- फक्त कलकत्त्यांतीलच काय म्हणून ? मीं सारा भारतवर्ष अगदी कसोशीने हिंडून पाहिला. पण ऋषींचें अनुशासन ठीक चालल्याचें मला तरी कोठेहि आढळून आलें नाही. फक्त कांही देशाचार, लोकाचार व स्त्री-आचार यांच्या आधारानेच सारा समाज अनुशासित होतांना दिसला. नाही

कुणी कधी शास्त्रें वाचीत, नाही कुणी तीं वाचून तदनुसार समाजाला परिचालित करण्याचा कधी प्रयत्न करीत !

शिष्यः-- तर मग आता आम्हीं काय करावें ?

स्वामीजीः-- ऋषीमुनींचीं मतें प्रचलित करावयास हवींत. मनु-याज्ञवल्क्य वगैरे ऋषींच्या तत्त्वांची साऱ्या देशाला दीक्षा द्यावयास हवी. पण हें करतांना त्यांतहि कांही कालोपयोगी बदल करावयास हवेत. हेंच पाहाना की आज भारतांत कुठेहि चातुर्वर्ण्यव्यवस्था आढळून येत नाही. म्हणून सुरवातीला ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार जातींत देशांतील लोक विभागावयास हवेत. सारे ब्राह्मण एकत्र करून ब्राह्मणांची एक जात करावयास हवी. याचप्रमाणे सर्व क्षत्रिय, सर्व वैश्य, सर्व शूद्र त्या त्या जातीनुसार एकत्रित करून आणखी तीन जाती करून मग चारहि जातींना वैदिक मतप्रणालींत आणावयास हवें. एरव्ही काय फक्त 'तुम्हांला शिवणार नाही' असें घोकूनच देशाचें कल्याण होणार आहे कधी ? तें केव्हाहि शक्य नाही.

## अध्याय २८ वा

**स्थळ-- बेलूर मठ ( बांधणीचा काळ ).**

**वर्ष-- इ. स. १८९८.**

**विषय--** भारताच्या दुर्दशेचें कारण-- ती दूर करण्याचे उपाय-- वैदिक साच्यांत घालून देशाला पुन्हा घडविणें व मनु, याज्ञवल्क्यादिकां- प्रमाणे पुरुष तयार करणें.

शिष्य:-- आज आपल्या समाजाची, देशाची अशी ही दुरवस्था कां म्हणून झाली आहे महाराज ?

स्वामीजी:-- तुम्ही लोकच त्या दुरवस्थेला कारणीभूत आहांत.

शिष्य:-- काय म्हणतां हें आपण ? आम्ही कसे काय जबाबदार आहोंत ?

स्वामीजी:-- सुदीर्घ कालापासून खालच्या जातींतील लोकांची घृणा करतां करतां आता तुम्ही सारेच जगाच्या दृष्टीने घृणास्पद झालां आहांत.

शिष्य:-- आम्हीं कधी घृणा केली त्यांची ?

स्वामीजी:-- कां बरें ? तुम्हीं भटाभिक्षुकांनी वेदवेदान्तादि अमूल्य शास्त्रें ब्राह्मणेतर वर्गाच्या हातीं कधी लागूं दिलीं नाहीत. त्यांनी शिवल्याचा विटाळ मानला. त्यांना सतत पायतळीं दडपून टाकलें. आपल्या स्वार्थासाठीच ना तुम्ही त्यांना दीर्घकाळपर्यंत अशी वागणूक देत आलांत ? तुम्हीं ब्राह्मणांनीच धर्मशास्त्राचा मक्ता घेऊन विधि-निषेधाचें सारें तंत्र पक्केपणीं आपल्या हातीं घेतलें. भारतांतील अन्यान्य जातींना नीच म्हणून हिणवून हिणवून अखेर त्यांची खरोखरीच धारणा करून दिली की ते वास्तविकच हीन आहेत. उठतां बसतां, खातां पितां जर तूं एखाद्या माणसाला ‘तूं नीच, तूं नीच’ म्हणून सतत हिणवत राहशील तर कालां- तराने अखेर त्याला वाटूं लागेल की ‘आपण वास्तविकच नीच

आहोंत'. इंग्रजींत यालाच म्हणतात Hypnotise करणें, संमोहिनी विद्येचा प्रयोग करणें. पण आता ब्राह्मणेतर जातींचा हा भ्रम हळूहळू दूर होतो आहे. ब्राह्मणांच्या मंत्रादिकांवरील त्यांची आस्था क्रमशः आता घटते आहे. पुराने पद्मानदीचे कांठ खचावेत त्याप्रमाणे पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावानें आज ब्राह्मणांच्या कृत्यांचे सारे बांध आज ढासळून पडताहेत, हें तर तूं पाहतोसच ना ?

शिष्यः-- होय, आचारविचारांचीं बंधनें धीरे धीरे शिथिल होत आहेत आजकाल.

स्वामीजीः-- नाही होणार कशीं तीं ? ब्राह्मणांनी आस्ते आस्ते घोर अनाचार-अत्याचाराला प्रारंभ केला होता, स्वार्थानें अंध होऊन आपलें प्रभुत्व अबाधित राखण्यासाठी किती अद्‌भुत अवैदिक, अनैतिक, तर्कहीन मतमतांतरें प्रसृत केलीं त्यांनी. आता त्या साऱ्या करणीचें फळ अगदी हातोहात मिळतें आहे त्यांना.

शिष्यः-- आणखी कोणतीं फळें त्यांच्या पदरीं पडणार आहेत महाराज ?

स्वामीजीः-- तीं काय तुला दिसत नाहीत ? भारतांतील इतर जातींची तुम्हीं ब्राह्मणांनी जी घृणा केली तिचेंच फळ म्हणून आज हजार वर्षे गुलामी भोगतां आहांत. म्हणूनच तर विदेशी लोक तुमची घृणा करतात आणि स्वकीय लोक तुमची उपेक्षा, हेटाळणी करायला लागले आहेत.

शिष्यः-- पण अद्यापहि क्रियाकर्मादि साऱ्या गोष्टी ब्राह्मणांच्याच तंत्राने चालतात. गर्भाधानापासून तों तहत इतर साऱ्या क्रियाकर्मांत लोक अजूनहि ब्राह्मण सांगतील तेंच करतात. मग तुम्ही कां म्हणून असें म्हणतां ?

स्वामीजी:-- कुठे करतात लोक तूं म्हणतोस तसें? शास्त्रोक्त दशविधसंस्कार कुठे होतात आज ? मीं सारा भारतवर्ष पालथा घातला. मला तरी श्रुति-स्मृतींनी निषिद्ध मानलेल्या देशाचारांनीच सारा देश नियंत्रित होत असल्याचें आढळून आलें. लोकाचार, देशाचार व स्त्री-आचार ह्याच गोष्टी झाल्या आहेत आजच्या श्रुति-स्मृति. कोण कुणाचें ऐकायच्या मन:स्थितींत आहे आज ? पैसे दिले की वाटेल तो विधि-निषेध फिरवायला भटापुरोहितांची आता तयारी असते. किती भटजींनी वैदिक कल्प, गृह्य व श्रौत सूत्रें वाचलीं असतात ? बंगालमध्ये रघुनंदन स्मृति प्रमाण, तर थोडें वर गेल्यास मिताक्षरा व आणखी अन्यत्र गेल्यास मनुस्मृतीचें प्रामाण्य आढळतें. तुला वाटतें की सर्वत्र एकच स्मृति प्रमाण आहे ! यासाठीच मग लोकांत वेदांबद्दल आदर वाढवावा असें वाटतें. सर्वत्र लोकांनी वेदाध्ययन करावें, वेदांचेंच अनुशासन प्रमाण मानावें.

शिष्य:— पण वेदानुशासन पुन्हा प्रचलित होणें शक्य आहे काय ?

स्वामीजी:-- वेदकालीन सारे प्राचीन नियम आज व्यवहार्य ठरणार नाहीत हें खरें, पण ते समयोपयोगी करण्यासाठी त्यांच्यांत कांही काटछाट करून नवीन साच्यांत घालून घडवून घेऊन त्यांना स्मृतिस्वरूप देऊन जर ते लोकांना दिले तर कां नाही ते प्रचलित होणार ?

शिष्य:-- माझी कल्पना होती की आजहि साऱ्या भारतवर्षांत मनुस्मृतीचेंच प्रामाण्य आहे म्हणून.

स्वामीजी:-- कोण मानतो ती स्मृति ? तूं आपल्या प्रांताचीच गोष्ट पाहा ना. तुम्हां साऱ्यांच्या हाडींमांसीं तंत्रांतील वामाचार पक्के मुरले आहेत. इतकेंच काय पण बौद्धधर्माच्या

हाडांचा शिल्लक उरलेला सांगाडा जो आजचा वैष्णव धर्म, त्यांतहि घोर वामाचारांचा प्रवेश झाला आहे. या अवैदिक वामाचारांचा प्रभाव अगदी समूळ उखडून टाकावयास हवा.

शिष्य:-- हा गारा साफ करणें काय आता शक्य आहे ?

स्वामीजी:-- भित्रा कुठचा ! हें तूं काय म्हणतो आहेस ? 'अशक्य, अशक्य' असें म्हण-म्हणून तुम्हीं सारा देश अगदी बरबाद करून टाकला आहे. मानवी प्रयत्नाने साध्य होणें शक्य नाही असें काय आहे ?

शिष्य:--मनु-याज्ञवल्क्यांसारखे ऋषिमुनि देशांत पुन्हा जोंवर अवतीर्ण होत नाही तोंवर हें शक्य होईलसें कांही वाटत नाही.

स्वामीजी:--अरे ! पावित्र्य आणि निःस्वार्थ उद्यम यांमुळेच तर ना ते मनु आणि याज्ञवल्क्य झाले होते, की आणखी त्यांच्यांत कांही होतें ? प्रयत्न केल्यास आपण सुद्धा मनु-याज्ञवल्क्य यांच्यापेक्षा कितीतरी मोठे होऊं शकूं व तसें झाल्यास आपलें मतच मग कां नाही प्रचलित व प्रमाण होणार ?

शिष्य:-- आपणच तर सांगितलें ना की प्राचीन आचारव्यवहारादि गोष्टी आता देशांत प्रसृत करावयास हव्यात म्हणून ? मग मनु वगैरेंना आपल्यासारखेच मानून त्यांचा अधिक्षेप करून कसें निभेल ?

स्वामीजी:—माझ्या म्हणण्याचा काय हा विपर्यास केलास तूं ? माझें म्हणणें तुझ्या नीट लक्षांतच येत नाही. माझें म्हणणें आहे की, प्राचीन वैदिक आचारव्यवहारांत समाजोपयोगी व कालोपयोगी फेरबदल करून नवीन साच्यांत त्यांना घडवून घेऊन मग या नव्या स्वरूपांत त्यांचा देशांत प्रचार करावा. होय ना ?

शिष्य:-- होय.

स्वामीजी:-- तर मग मघा काय बडबडत होतास ? तुम्हीं

लोकांनी शास्त्रें वाचलीं आहेत—म्हणूनच तुमच्यावर माझा भरवसा आहे. माझें म्हणणें नीट समजावून घेऊन तदनुसार मग ठीक कामाला लागा.

शिष्य:-- आमचें म्हणणें ऐकतो कोण ? देशांतील लोक तें स्वीकारतील तरी काय म्हणून ?

स्वामीजी:-- तूं जर त्यांना नीट समजावून देऊं शकलास व बोलल्याप्रमाणे त्यांना प्रत्यक्ष प्रत्यंतर दिलें तर ते तुझें म्हणणें अवश्य स्वीकारतील. आणि याउलट तूं जर पोपटाप्रमाणे नुसती पोपटपंची करून पाठ केलेले श्लोक त्यांना म्हणून दाखविशील, शब्दपांडित्य दाखवीत राहून एखाद्या नेभळटासारखा दुसऱ्यांचीं मतें जर त्यांच्या पुढे रटत बसशील आणि प्रत्यक्ष आचरण मात्र काडीचें करणार नाहीस तर तुझें म्हणणें कोण ऐकेल बरें ?

शिष्य:-- समाजसुधारणेबाबत कांही सूचना द्या ना महाराज.

स्वामीजी:-- उपदेश तर तुला दिला आहे खूप. त्यांतला थोडाफार तरी भाग प्रत्यक्ष कृतींत उतरवून दाखव ना ! जगाला जरा पाहूं दे की मीं केलेला उपदेश ऐकल्याचें व तूं केलेल्या शास्त्राध्ययनाचें कांही चीज झालें. मनुस्मृति वगैरे शास्त्रें व अन्यहि ग्रंथांचें हें जें तूं अध्ययन केलेंस त्या साऱ्यांचा मूळ पाया वा हेतु काय आहे याचा एकदा नीट विचार करून पाहा बरें ! तो मूळ पाया कायम ठेवून अन्य महत्त्वाच्या गोष्टी प्राचीन ऋषींप्रमाणे संग्रहीत कर व त्यांतून समाजोपयोगी व कालोचित गोष्टी सुसंबद्ध रीतीने ग्रथित कर. हें मात्र लक्षांत ठेव की या नियमांचें पालन भारतांतील साऱ्या जातींना, संप्रदायांना कल्याणप्रद व्हावयास हवें. लिहून तयार कर बरें असली एखादी स्मृति. मी ती तपासून पारखून देईन.

शिष्यः-- हें काम कांही तितकेसें सोपें नाही--आणि अशी स्मृति लिहिली तरी तिचा प्रसार कसा होईल ?

स्वामीजीः-- कां नाही होणार ? तूं लिही तर आधी ! 'कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ।' जर तूं योग्य तऱ्हेने लिहिशील तर एक ना एक दिवस तिचा प्रसार होईलच होईल. थोडा तर आत्मविश्वास बाळग. तुम्हीच तर पूर्वकालांत ऋषिमुनि होतां ना ? शरीर बदलून आता या रूपाने आलांत याखेरीज तर कांही एक फरक झाला नाही ना ? माझ्या दिव्य दृष्टीला स्वच्छ दिसतें आहे की तुमच्यांत अपरंपार शक्ति वास करीत आहे. त्या शक्तीला जागृत करा. उठा, उठा, अदम्य चिकाटीने कामाला लागा. कंबर कसून सुरवात करा. दो दिवसांचें धन, मान ह्या साऱ्या गोष्टी घेऊन काय करणार आहेस ? माझी भावना काय आहे ठाऊक आहे ? मुक्ति-बिक्तीची मला जरूर नाही. तुम्हां लोकांत हे भाव जागृत करणें हेंच माझें काम. एक यथार्थ 'माणूस' घडवायला मला लाखो जन्म जरी घ्यावे लागले तरी त्याला माझी तयारी आहे.

शिष्यः-- अशा प्रकारें कामाला लागून तरी काय फायदा ? मृत्यु तर मागे उभा आहेच !

स्वामीजीः-- दूर हो मूर्खा ! मरायचें असेलच तर एकदाच मर. भित्रटासारखा रात्रंदिवस मरणाची काळजी करून वारंवार कशाला मरतोस ?

शिष्यः-- मृत्युचिन्ता समजा मीं नाही केली, पण या अनित्य संसारांत कर्म कर-करून तरी काय मोठेसें फळ पदरीं पडणार आहे?

स्वामीजीः-- अरे, मृत्यु जर अटळच असेल तर क्षुद्र किडयांप्रमाणे मरण्यापेक्षा वीरोचित मरण कवटाळणें अधिक बरें नाही का ? या अनित्य संसारांत दोन दिवस अधिक जगून तरी काय

लाभ ? It is better to wear out than to rust out. जराजीर्ण होऊन झिजत खितपत पडण्यापेक्षा अल्पकालच का होईना पण परकल्याणार्थ झटून चटकन् मरून जाणें बरें नाही का ?

शिष्यः-- होय महाराज. आज प्रश्न विचार-विचारून आपल्याला खूप त्रास दिला मीं.

स्वामीजी:-- यथार्थ जिज्ञासु असेल तर दोन रात्री बोलूनहि मला थकवा नाही वाटायचा. खाणेंपिणें सारें सोडून देऊन सारखें बोलत बसायची देखील माझी तयारी आहे. इच्छाच असली तर काय मी हिमालयाच्या गुहागव्हरांत समाधि लावून बसूं शकणार नाही ? आणि मा भगवतीच्या दयेने आजकाल तर पोटाला कसें मिळेल याचीहि चिंता नाही; कसें ना कसें तरी तें तर मिळतेंच मिळतें. पण मी तसें कां नाही करीत? या देशांत येऊन तरी कशाला राहिलों ? या देशाची दशा पाहून स्वस्थ बसून राहतां येणें मला शक्य नाही. समाधि वगैरे गोष्टी अगदी तुच्छ वाटूं लागतात. 'तुच्छं ब्रह्मपदं--' अशी भावना होते. तुमची मंगल-कामना हेंच आहे माझें जीवनव्रत. ज्या दिवशीं हें व्रत सरेल त्या दिवशीं देह सोडून देऊन सरळ निघून जाईन.

मंत्रमुग्ध झाल्याप्रमाणे स्वामीजींचें बोलणें स्तंभित हृदयाने ऐकत राहून निःशब्दपणें शिष्य त्यांच्या मुखाकडे पाहत राहिला. नंतर परत घरीं जाण्याच्या हेतूने त्यांना नमस्कार करून तो म्हणाला, 'बरें, येतों तर महाराज आता ?'

स्वामीजी:-- पुन्हा येतो बितो कशालारे ? मठांतच राहून जा ना ! संसारी मंडळींत गेल्याने मन पुन्हा मलिन होऊन जाईल. नाही तर येथे पाहा ! कशी सुंदर हवा आहे. गंगेचा शांत, पवित्र किनारा, साधु लोक साधनभजनांत मग्न. किती

मूल्यवान गोष्टींची सतत चर्चा होत आहे येथे. कलकत्त्याला जाऊन पुन्हा व्यर्थ गोष्टींत मन घालशील.

शिष्य मोठ्या आनंदाने म्हणाला, ‘बरे तर महाराज, आज येथेच राहतों.’

स्वामीजी:-- ‘आज’ काय म्हणून रे? कायमचाच येथे राहूं नाहीस शकत? पुन्हा संसारांत जाऊन तरी काय लाभ होणार आहे?

स्वामीजींचें हें बोलणें ऐकून शिष्य नतमस्तक होऊन स्तब्ध बसला. नाना प्रकारच्या चिंता-भावना एकदमच मनांत उभ्या राहिल्याने तो कांहीहि उत्तर देऊं शकला नाही.

---

# अध्याय २९ वा

## स्थळ—बेलूर मठ (बांधणीचा काळ).

### वर्ष-- इ. स. १८९८.

**विषय**-- स्थल-कालादिकांच्या शुद्धतेचा विचार कोठवर ?— आत्मप्रकट-नाच्या मार्गातील विघ्नाचा नाश करते तीच साधना--' ब्रह्मज्ञानांत कर्माचा लवलेश मात्र नाही ' या शास्त्रवाक्याचा अर्थ--निष्काम कर्म कशाला म्हणतात ?--कर्मद्वारें आत्मलाभ होत नाही, तरीहि स्वामीजी देशांतील लोकांना कर्मप्रवृत्त करतात तें कां ?--भारताचा भावी काल कल्याणमय आहे हें निश्चित.

स्वामीजींची प्रकृति सध्या बरीच चांगली आहे. मठाच्या नवीन जागेंत जें एक जुनें घर होतें त्याची डागडुजी करून तें राहण्याजोगें व्हावें म्हणून त्यांत सुधारणा चालल्या आहेत. हें काम अद्याप पुरें झालेलें नाही. माती टाकून सभोवारची सारी जमीन सारखी करून घेण्यांत आली आहे. आज दुपारीं शिष्याला बरोबर घेऊन ते या मठाच्या जागेवरच फिरताहेत. स्वामीजींच्या हातीं एक काठी होती; अंगांत फ्लॅनेलचाच पण भगव्या रंगाचा मोठा सदरा--डोक्यावर कांही नाही. शिष्याशीं बोलत दक्षिणेकडील फाटकापर्यंत जात व पुन्हा उत्तरेकडे वळून मागे फिरत--अशा रीतीने मठापासून फाटकापर्यंत व फाटकापासून मठापर्यंत फेऱ्या चालून ते पाय मोकळे करीत होते. दक्षिणेकडील बेलाच्या झाडाचा पार बांधून झाला होता. या पारापासून जवळच उभे राहून स्वामीजी मंद-गंभीर स्वरांत गाऊं लागले. गाणें गातां गातां ते शिष्याला म्हणाले, ' येथे किती दंडी, योगी, जटाधारी येतील. समजलें ! कालांतराने किती तरी साधूंचा येथे समागम होईल.' बोलतां बोलतां ते त्या बिल्वतरुतळीं बसून म्हणाले, ' बिल्वतरुतळ

अत्यंत पवित्र स्थान. येथे बसून ध्यानधारणा केल्यास लवकर उद्दीपना होते. ठाकुर असें नेहमी म्हणत.

शिष्य:-- महाराज, जे आत्मानात्मविचारांत मग्न असतात त्यांना स्थान-अस्थान, काल-अकाल, शुचि-अशुचि वगैरे विचारांची आवश्यकता असते का ?

स्वामीजी:-- जे आत्मज्ञानांत स्थित, आत्मज्ञान-निष्ठ झाले असतील त्यांना या साऱ्या गोष्टींचा विचार करावयाचें तसें पाहिलें तर कांहीच प्रयोजन नाही. पण ही निष्ठा काय अशी सहजा-सहजी येते ? किती दीर्घ साधना करावी लागते तिच्यासाठी ! म्हणूनच सुरवातीला थोडाफार बाह्य आधार घेऊन आपल्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करावयास हवा. पुढे मग आत्मनिष्ठालाभ झाल्यावर कोणत्याहि बाह्य अवलंबनाची गरज राहत नाही.

"शास्त्रांत नानाप्रकारचे जे साधनामार्ग सांगितले आहेत ते सारे या आत्मज्ञानलाभासाठी. पण अधिकारीभेदानुसार साध-नाहि भिन्न भिन्न असतात. पण या साधनादि गोष्टी म्हणजेहि एक प्रकारचें कर्मच होय. आणि जोंवर कर्म तोंवर आत्मदर्शन नाही. आत्मज्ञानमार्गातील अडथळे शास्त्रोक्त साधनारूप कर्माने ओलांडून जातां येतात, पण आत्मसाक्षात्काराची शक्ति कर्मांत नाही. कर्म कांही अडथळे बाजूस सारूं शकतें इतकेंच. नंतर स्वयंज्योति आत्मा आपल्याच प्रभेने प्रकाशित होतो. म्हणूनच भाष्यकार आचार्य शंकरांनी म्हटलें आहे--'कर्माचा ब्रह्मज्ञानाशीं लेशमात्रहि संबंध नाही.'"

शिष्य:-- कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत कर्म केल्याखेरीज जर आत्मप्रकाशाच्या मार्गातील अडथळे दूर होणार नसतील तर परोक्षपणें कर्मच ज्ञानाचें कारण होतें असें म्हणावें लागेल.

स्वामीजी:-- कार्यकारणपरंपरेच्या दृष्टीने वरवर पाहतां असें भासतें हें खरें. मीमांसाशास्त्रांत या दृष्टीचा अवलंब करूनच काम्यकर्म निश्चित फळ देतें असें सांगितलें आहे. परंतु निर्विशेष आत्मदर्शन मात्र कर्माद्वारा होत नाही. कारण आत्मज्ञानलाभाची इच्छा असणाऱ्यांसाठी 'कर्म करा, पण फळाबाबत उदासीन राहा' असें विधान आहे. यावरून हेंच दिसतें की हीं सारीं साधनादि कर्में साधकाला चित्तशुद्धीसाठीच फक्त साहाय्यभूत होतात. नाही-तर, याच साधनादि कर्मांनी जर आत्मसाक्षात्कार होणार असता तर शास्त्रांनी या साऱ्या साधनांच्या फळांचा त्याग करावयास सांगितलें नसतें. तेव्हा मीमांसाशास्त्रांत सांगितलेल्या 'फलप्रद कर्मवादा'चें खंडन करण्यासाठीच गीतेंतील निष्काम कर्मयोगाचा जन्म झाला आहे. समजलें ?

शिष्य:-- कर्माच्या फळाची कुठलीच प्रत्याशा जर ठेवली नाही तर कष्टकर कर्म करण्याची प्रवृत्ति कुणालाहि होईलच काय म्हणून ?

स्वामीजी:-- शरीर धारण केल्यानंतर प्रतिक्षणीं कांही ना कांही कर्म केल्याखेरीज कुणीहि राहूंच शकत नाही. आणि जर कर्म केल्याखेरीज कांही गत्यंतरच नाही तर ज्या कर्माने आत्म-दर्शन होऊन मुक्ति लाभेल अशाच प्रकारचें कर्म करावयास निष्काम-कर्मयोगाने सांगितलें आहे. आणि 'प्रवृत्ति कुणाला काय म्हणून होईल' असें जें तूं विचारलेंस त्याचें उत्तर हेंच की जें कांही कर्म केलें जातें तें सारें प्रकृति-मूलकच असतें. पण जेव्हा कर्म करतां करतां एका कर्मांतून दुसऱ्या कर्मांत, एका जन्मबंधांतून दुसऱ्यांत असा सतत माणूस पुढे ढकलला जातो तेव्हा कालांतराने मानवाची विचारशक्ति आपोआप जागृत होऊन विचारूं लागते, 'या कर्माचा अंत आहे तरी कुठे ? ' तेव्हाच त्याला गीतामुखाने भगवन्तांनी

'गहना कर्मणो गतिः' असें जें म्हटलें आहे त्याचें मर्म उमजतें. यामुळेच कर्म करूनहि जेव्हा शान्तिलाभाची आशा दिसत नाही तेव्हाच साधक कर्मत्यागी होतो. पण देह असेपर्यंत निदान कांही ना कांही कर्म करावयास, कसला तरी आश्रय घ्यावयास हवाच ना ? कशाचा घेणार आश्रय ? म्हणून चार दोन सत्कर्मे करून जातो तो, आणि या सत्कर्मांच्या फळाची कांहीहि आशा तो ठेवीत नाही. कारण तेव्हा त्याच्या पूर्ण लक्षांत येऊन गेलें असतें की या कर्मफलाच्या आशेंतच जन्ममृत्यूचे नानाविध अंकुर सुप्त असतात. येवढ्याचसाठी ब्रह्मज्ञ सर्वकर्मत्यागी असतात. लोकांना ते कर्म करीत असतांना दिसत असले तरी त्या कर्मांबाबत त्यांचा कसलाच आग्रह नसतो, कसलीच आसक्ति नसते. यांनाच शास्त्रांत निष्काम कर्मयोगी म्हणून संबोधितात.

शिष्यः-- तर मग निष्काम ब्रह्मज्ञांचें उद्देशविरहित कर्म हें काय वेड्यांच्या उन्मत्त, निरर्थक चेष्टितांप्रमाणेच असतें की काय ?

स्वामीजीः-- तसें काय म्हणून असेल तें ? आपल्या स्वतःच्या शरीर-मनादिकांच्या सुखस्वास्थ्यासाठी कर्म न करणें म्हणजेच कर्मफलत्याग करणें. ब्रह्मज्ञ स्वतःच्या सुखासाठी कर्म करणार नाही, पण म्हणून त्याने दुसऱ्यांच्या कल्याणासाठी किंवा यथार्थ सुखलाभासाठी कर्म करूं नये असें कुठे आहे ? फलसंगनिरपेक्ष ते जें कर्म करतात त्याने जगाचें हितच होतें. तें सारें कर्म 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय'च होत असतें. ठाकुर म्हणत असत--'त्यांचें पाऊल कधीहि बेताल पडत नाही.' ते जें जें करून जातात तेंच अखेर सार्थ व सारगर्भ होतें. उत्तररामचरितांत वाचलें नाहीस--'ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति।' ऋषिवचनांना अर्थ हा असतोच असतो. त्यांचें वचन कधीहि व्यर्थ वा मिथ्या होत नाही. मन जेव्हा आत्मलीन होऊन त्यांतील

साऱ्या वृत्ति प्राय: लोपून जातात तेव्हा 'इहामुत्रफलभोगविराग' उत्पन्न होतो. याचा अर्थ असा की ऐहिक संसारांत वा मृत्यूनंतर पारलौकिक स्वर्गादि वगैरेंच्या बाबतींत कोणत्याहि प्रकारचा सुखोपभोग घेण्याची वासना राहत नाही. मनांत मग आणखी संकल्पविकल्पांचे तरंगच शिल्लक राहत नाहीत. पण व्युत्थान-कालीं म्हणजे समाधींतून किंवा या वृत्तिहीन अवस्थेंतून उतरून मन जेव्हा पुन्हा 'मी, माझें'च्या मायाराज्यांत येतें, तेव्हा पूर्वकृत कर्म किंवा अभ्यास यांनी अथवा प्रारब्धजनित संस्कारां-मुळे देहादि कर्मं चालू राहतात. अशा वेळीं मन नेहमीच ज्ञानातीत (Superconscious) अवस्थेंतच असतें. न खाल्ल्यास चालत नाही म्हणूनच खाणेंपिणें चालू असतें, इतकी देहादिबुद्धि क्षीण होऊन जाते. या अवस्थेस पोहोचून जें जें केलें जातें, तें योग्यच असतें. या अवस्थेंतील सारीं कर्में जीवांच्या व जगताच्या हिता-र्थच असतात. कारण या अवस्थेंत कर्त्याचें मन स्वार्थपरतेने किंवा स्वत:च्या लाभालाभाच्या विचारांनी दूषित झालेलें नसतें. ईश्वर या ज्ञानातीत भूमीवर अधिष्ठित होऊनच ही जगद्रूप विचित्र सृष्टि निर्माण करतो. म्हणनच या सृष्टींत कोठेहि अपूर्णता दिसून येत नाही. म्हणूनच मी म्हणालों होतों की आत्मज्ञ जीवाने फलासक्ति-विरहित केलेलें कर्म अपूर्ण वा सदोष असूंच शकत नाही. त्या त्याच्या कर्माने जीव आणि जगताचें यथार्थ कल्याणच साधलें जातें.

शिष्य:-- आपण यापूर्वी सांगितलें की ज्ञान आणि कर्म पर-स्परविरोधी. ब्रह्मज्ञानांत कर्माला तिळमात्र स्थान नाही, कर्मा-द्वारें ब्रह्मज्ञान वा दर्शन होणें शक्य नाही. असें असतां आपण महा रजोगुणाला उद्दीपक असा उपदेश काय म्हणून देतां मधून मधून ? त्या दिवशीं आपण मलाच सांगितलें,--'कर्म, कर्म, कर्म, नान्य: पन्था विद्यतेऽयनाय.'

स्वामीजी:-- मी सारें जग पालथें घालून आलों. पण या देशांतील लोकांसारखे तमःप्रवृत्तीचे लोक साऱ्या पृथ्वीच्या पाठीवर मला कोठेंहि आढळले नाहीत. बाहेरून पाहावें तर सत्त्वगुणाचें सारें अवडंबर व ढोंग, आंत मात्र भरलें असतें दगडाधोंड्यांसारखें जडत्व. अशांच्या हातून जगाचें काय बरें काम होणार आहे ? अशी कर्महीन, आळशी व फक्त शिश्नोदरपरायण जात किती दिवस आणखी टिकून राहील बरें ? पाश्चात्त्य देशांतून एकदा फेरफटका करून ये आणि तेथील जीवन पाहूनसवरून आल्यावर मगच विरोध कर माझ्या या म्हणण्याला. त्यांच्या जीवनांत केवढा उद्यम, केवढी कर्मतत्परता, केवढा प्रचंड उत्साह आणि रजोगुणाचा विकास तरी केवढा आढळून येतो ! तुमच्या या देशांतील लोकांचें रक्त जणु हृदयांतल्या हृदयांतच गोठून गेलें आहे. नसा-धमन्यांतून रक्ताचा जणु संचारच होत नाही. सारें अंग जणु पक्षाघाताच्या झटक्याने लुळेंपांगळें झालें आहे. म्हणूनच मी या लोकांत रजोगुणाची वाढ करून कर्मतत्परतेच्या द्वारें त्यांना ऐहिक जीवनसंग्रामासाठी उद्युक्त करावयाचा प्रयत्न करीत आहें. शरीरांत बल, सामर्थ्य नाही, हृदयांत उत्साह नाही आणि डोक्यांत प्रतिभा नाही. या जडमूढ पिंडांच्या द्वारा होणार तरी काय आहे ? त्यांना हलवून, धक्के देऊन मी त्यांच्यांत चैतन्य निर्माण करूं इच्छितों. माझे प्राण पणाला लावून हें करावयाचा माझा निश्चय आहे. वेदान्ताच्या अमोघ मंत्रांनी मी त्यांना जागे करीन. ‘ उत्तिष्ठत, जाग्रत ’ ही अभयवाणी ऐकविण्यासाठीच माझा जन्म. तुम्ही सारे या कार्यांत मला मदत करा. जा--खेडोपाडीं, प्रांतोप्रांतीं ही अभयवाणी आचांडाल--ब्राह्मणादिक साऱ्यांना ऐकवा. साऱ्यांना सांगा--तुम्ही सारे अमितवीर्य --अमृताचे वारसदार, अधिकारी. याप्रकारें आधी त्यांच्यांतील

रजोगुण उद्दीपित करा. जीवनसंग्रामासाठी त्या साऱ्यांना समर्थ बनवा. त्यानंतर मग पारलौकिक मुक्तिलाभाच्या गोष्टी त्यांना सांगा. आधी त्यांच्यांतील आंतरिक शक्ति जागृत करून देशांतील लोकांना आपल्या स्वतःच्या पायांवर उभे करा. उत्तमोत्तम खाद्यपेयांचा, कपडचालत्त्यांचा उपभोग घ्यावयास त्यांना शिकूं द्या. आणि नंतरच मग या साऱ्या भोग-बंधनांपासून मुक्त कसें व्हावें हें त्यांना सांगा. आळशीपणा, हीनबुद्धि, कपटाचरणादिकांनी सारा देश व्यापून टाकला आहे. बुद्धिमान लोक काय या साऱ्या गोष्टी पाहून स्वस्थ बसूं शकतील? त्यांचे डोळे काय आसवांनी भरून येणार नाहीत? मद्रास, मुंबई, पंजाब, बंगाल कोणत्याहि बाजूला नजर टाकून पाहा. कुठेहि जीवनशक्तीचें चिन्ह दिसावयाचें नांव नाही. तुम्हांला वाटतें, आपण शिक्षित आहोंत. काय शिकलां आहांत आपलें डोंबलें? दुसऱ्यांच्या कांही भाषांतरित गोष्टी पाठ करून मेंदूंत अगदी कोंबून परीक्षा देतां व पास झाल्यानंतर मानूं लागतां की आपण शिक्षित झालों! छे, छे, याला का शिक्षण म्हणायचें? तुमच्या शिक्षणाचा उद्देश काय तर जमल्यास कारकुनी नाही तर एखादा दुष्ट वकील होणें! अगदी हद्द झाली तर कारकुनीचेंच दुसरें रूपांतर असलेलें डेप्युटी मॅजिस्ट्रेटचें पद मिळविणें! येवढेंच ना! यामुळे तुमचें तरी काय भलें झालें आणि देशाचें तरी काय कल्याण साधलें? एकदा नीट डोळे उघडून पाहा, या सुवर्णभूमि म्हणून नावाजलेल्या भारतवर्षांत मूठभर अन्नाच्या गोळ्यासाठी काय भयंकर हाहाकार माजला आहे तो. तुमच्या शिक्षणाने हा अभाव काय भरून निघणार आहे? कदापिहि नाही! जमीन नांगरायला पाश्चात्त्य विज्ञानाचें साहाय्य घ्या, अन्नधान्याची उपज वाढवा. नोकरी-बिकरी करून नाही, तर स्वप्रयत्नांनी पाश्चात्त्य विज्ञानाच्या

साहाय्याने नित्य नव-नवीन मार्ग शोधून काढून. ही पोटापाण्याची विवंचना मिटविण्यासाठीच मी लोकांना रजोगुणतत्पर व्हायला सांगतों. अन्नवस्त्रादिकांच्या अभावीं पोटापाण्याची चिंता कर-करून सारा देश उध्वस्त झाला आहे. त्यासाठी तुम्ही करतां आहांत तरी काय ? दे फेकून तुझीं तीं सारीं शास्त्रेंफिस्त्रें गंगेच्या पाण्यांत. आधी देशांतील लोकांना पोटाला मिळवायचा उपाय दाखवा, मग मांडा त्यांच्या पुढे भागवताचे पाठ ! कर्मतत्परतेने ऐहिक अभाव मिटल्याखेरीज तुमचा धर्मोपदेश कुणी कानावरहि घेणार नाही. म्हणून म्हणतों आधी आपल्यांतील अंतर्निहित आत्मशक्ति जागृत करा, नंतर यथाशक्य देशांतील सामान्य लोकांत त्यांच्यांतील शक्तीवर विश्वास उत्पन्न करा,—आधी त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था करा व मगच त्यांना धर्मलाभ कसा करावा ह्या गोष्टी सांगा. आता नुसतें बसून भागण्यासारखें नाही. मृत्यूची झडप केव्हा कुणावर पडेल हें काय कुणी सांगू शकतो ?

या मर्मस्पर्शी गोष्टी बोलत असतां क्षोभ, दुःख, करुणादि भावनांच्या अपूर्व तेजाने स्वामीजींचें वदनमंडळ उद्भासित झालें. त्यांच्या नेत्रांतून जणु अग्निस्फुल्लिगांचा वर्षाव होऊं लागला. त्यांच्या त्या दिव्य रूपाकडे पाहून भय आणि विस्मयाने शिष्याच्या तोंडून शब्द फुटेना. कांही वेळाने स्वामीजी पुन्हा म्हणाले, "अशा प्रकारची कार्यपरायणता व आत्मनिर्भरता कालांतराने लोकांत निर्माण होईलच होईल. मला तर अगदी स्पष्ट दिसतें आहे की याखेरीज दुसरा मार्ग नाही. जे बुद्धिमान असतात ते भावी तीन युगांचें स्पष्ट चित्र आपल्यासमोर पाहूं शकतात.

"ठाकुरांच्या जन्मापासूनच पूर्वदिशा नवयुगाच्या अरुणोदयाने उजळून निघाली आहे. योग्यकालीं माध्यान्हीच्या सूर्यप्रकाशाने सारें जग प्रकाशमय होऊन जाईल."

---

## अध्याय ३० वा

**स्थळ— बेलूर मठ ( बांधणीचा काळ ).**
**वर्ष—- इ. स. १८९९.**

**विषय**—- ब्रह्मचर्यरक्षणाचे कठोर नियम—- सात्त्विक प्रवृत्तीचे लोकच ठाकुरांचा भाव घेऊं शकतील—- फक्त ध्यानधारणादिकांतच मग्न राहणें हा या युगाचा धर्म नव्हे—- आता गरज आहे त्यांच्या जोडीला गीताप्रणीत कर्मयोगाची.

सध्याचा मठ जवळजवळ बांधून झाला आहे, आणि जें थोडें-फार बांधकाम शिल्लक राहिलें आहे तें स्वामी विज्ञानानंदांच्या देखरेखीखाली पुरें करण्यांत येत आहे. स्वामीजींची प्रकृति तितकीशी चांगली नाही म्हणून डॉक्टर मंडळींनी त्यांना सकाळ-संध्याकाळ नौकेंतून गंगाप्रवाहांत फिरावयास जाण्याचा सल्ला दिला आहे. नडाल येथील रायबाबूंची नौका कांही दिवसांसाठी स्वामी नित्यानंदांनी मागून आणली आहे. मठासमोरील प्रवाहांतच ती नांगरून पडली असते. स्वामीजी आपल्या आवडीनुसार या नावेंतून फेरफटका करून येतात.

आज रविवार. शिष्य मठांत आला आहे. जेवणखाण आटोपल्यावर स्वामीजींच्या खोलींत बसून स्वामीजींशीं गप्पागोष्टी चालू आहेत. मठांतील संन्यासी व बालब्रह्मचारी यांच्या अध्ययनासाठी स्वामीजींनी या सुमारास कांही नियम तयार केले आहेत. गृहस्थांपासून शक्य तों दूर असावें हाच या साऱ्या नियमांचा मूळ अभिप्राय. उदाहरणार्थ, त्यांच्यापासून भोजनाची निराळी व्यवस्था, विश्रान्तीसाठी निराळी व्यवस्था, वगैरे. याचबाबत सध्या बोलणें चालू आहे.

स्वामीजी:—- गृहस्थांच्या कपडचालत्त्यांना आजकाल मला कसा एक प्रकारचा संयमहीनतेचा दुर्गंध येतांना आढळून येतो.

म्हणूनच मठांत नियम केला आहे की त्यांनी साधूंच्या बिछान्यांवर बसूं नये, झोपूं नये. पूर्वी शास्त्रांत गृहस्थांच्या कपड्यालत्त्यांना येणाऱ्या या वासाबद्दल मीं वाचलें होतें, आणि संन्यासीलोक तो वास सहन करूं शकत नसत. आता अनुभवावरून तें खरेंच होतें असें दिसतें. या साऱ्या नियमांचें पालन करून आचरण ठेवल्यास हे बाल-ब्रह्मचारी यथार्थ संन्यासी होतील. संन्यासनिष्ठा दृढ झाल्यानंतर सम भावाने गृहस्थांबरोबर मिळूनमिसळून वागण्यांतहि कांही हानि होणार नाही. पण आज जर यांना नियमांच्या बंधनांत ठेवलें नाही तर या ब्रह्मचारी-संन्याशांचीं जीवनें पार बिघडून जातील. यथार्थ ब्रह्मचाऱ्यांना सुरवातीसुरवातीला संयमाबाबत कठोर नियम पाळावे लागतात. स्त्रियांच्या नाम-गंधांपासून तर दूर असावयास हवेंच, पण स्त्रीसंग करणाऱ्या लोकांचा संसर्गहि त्यांनी टाळावयास हवा.

गृहस्थाश्रमी शिष्य हें ऐकून स्तंभित झाला व आता यापुढे मठांतील संन्यासी-ब्रह्मचाऱ्यांशीं पूर्वीप्रमाणे आपुलकीने मिळूनमिसळून वागतां येणार नाही या विचाराने मनाला अत्यंत वेदना होऊन तो म्हणाला, ‘पण महाराज, हा मठ व यांतील लोकांबद्दल तर मला स्वतःचें घर व स्त्री-पुत्रादिकांपेक्षा अधिक आत्मीयता वाटते. हे सारे म्हणजे जणु किती काळचे माझे आत्मीयजन. या मठांत मला जेवढें स्वातंत्र्य आहे तेवढें उभ्या जगाच्या पाठीवर अन्यत्र कुठेहि नाही.’

स्वामीजी:— जे शुद्धसत्त्व लोक आहेत त्या साऱ्यांनाच अशी अनुभूति येथे येते. ज्यांना अशी अनुभूति होत नाही त्यांनी समजून असावें की ते येथील लोक नाहीत. भावनेच्या भरांत बरेच लोक येथे येतात पण अखेर ते परत फिरतात, याचें कारण तरी हेंच होय. ब्रह्मचर्यहीन, रात्रंदिवस पैसा पैसा करीत हिंडणारे

हे लोक येथील भावधारा कधीच समजूं शकणार नाहीत, मठांतील लोकांबद्दल त्यांच्या मनांत कधीच आपुलकी निर्माण होऊं शकणार नाही. येथील संन्यासी कांही जुन्या जमान्यांतील संन्याशांप्रमाणे अंगाला राख फासणारे, जटांचा भार डोक्यावर बाळगणारे, हातीं चिमटा ठेवणारे व रोग्यांना जडीबुटी देणारे नाहीत. म्हणून पाहून-सवरूनहि लोकांना येथील कांहीहि उमजत नाही. आमच्या ठाकुरांचे आचारव्यवहार, चालचलन, भावधारा हें सारेंच नव्या धर्तीचें होतें, म्हणून आम्हीहि सारे नव्या वळणाचेच आहोंत. कधी सभेंत 'व्याख्यानें' देतों, तर कधी 'हर हर ॐ, ॐ' म्हणून साऱ्या अंगाला राख माखून निबिड जंगलांत घोर तपस्येंत तल्लीन होतों.

"आज पुराण्या जमान्याप्रमाणे पोथ्यापुस्तकांचे आधार देऊन काय लाभ होणार आहे रे? पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रबल प्रवाह मोठ्या वेगाने आता देशांतून वाहतो आहे. त्याच्या उपयोगितेकडे संपूर्ण दुर्लक्ष करून रानावनांत बसून राहिल्याने काय आता काम भागणार आहे? आता गीतेंत भगवन्तांनी सांगितल्याप्रमाणे 'प्रबल कर्मयोग' हवा. हृदयांत अदम्य साहस, अमित बल ह्या गोष्टी असतील तरच ना देशांतील लोकांत जागृति होणार? एरव्ही ज्या अंधारांत ते, त्याच अंधारांत तुम्हीहि चाचपडत राहाल."

दिवस आता मावळायला आला आहे. गंगाप्रवाहांत फिरायला जाण्यासाठी स्वामीजी कपडे घालून खाली आले व मठाच्या मोकळ्या मैदानांत जाऊन पूर्वेकड जेथे आता पक्का घाट आहे तेथे पाय मोकळे करण्यासाठी कांही वेळ फिरूं लागले. नंतर नौका आल्यावर स्वामी निर्भयानंद, नित्यानंद व शिष्य यांच्यासह ते नौकेंत जाऊन बसले.

स्वामीजी नौकेच्या छपरावर बसले व शिष्याने त्यांच्या पायाशीं जागा घेतली. जान्हवीजलोत्थित मंदोर्मिमाला किंचित् आवेगाने नौकेवर आपटून कलध्वनि करीत आहे, मृदुमंद मलयानिल वाहतो आहे, आकाशाचा पश्चिमदिग्भाग अद्यापि संध्यारागरंजित झालेला नाही, भगवान् मरीचिमाली अस्ताचलाला जाऊन पोहोचावयास अजूनहि सुमारे अर्ध्यातासाचा अवधि आहे. नौका उत्तरेच्या बाजूने निघाली. स्वामीजींच्या मुखमंडलावर प्रफुल्लता, नयनांत सुकोमलता, बोलण्यांत औदासीन्य व हावभावांत जितेन्द्रियता परिस्फुट होत आहे. तें एक अपूर्व भावपूर्ण चित्र होतें. ज्यांनी तें प्रत्यक्ष पाहिलें नाही त्यांना तें समजावून देणें अशक्य.

आता दक्षिणेश्वर मागे टाकून अनुकूल वाऱ्याच्या झोताने नौका आणखी उत्तरेकडे सरकली. दक्षिणेश्वरचें कालीमंदिर येतांच शिष्यासह इतरांनी त्याला उद्देशून वंदन केलें. स्वामीजी मात्र एका सुगभीर आत्मविस्मृत भावांत अस्ताव्यस्त बसले होते. शिष्य व अन्य संन्यासी दक्षिणेश्वराबद्दल आपसांत बोलत असलेल्या गोष्टी स्वामीजींच्या कानींहि गेल्या नाहीत. पाहतां पाहतां नौका पानिहाटीच्या दिशेने निघाली. पानिहाटीला कै. गोविंदकुमार चौधरी यांच्या उद्यानगृहाच्या घाटावर नौका कांही वेळ थांबविण्यांत आली. हेंच उद्यान एकदा मठासाठी म्हणून भाड्याने घेण्याचीं बोलणीं चाललीं होतीं. स्वामीजी खाली उतरले आणि ती बाग व तो घाट बारकाईने पाहून ते म्हणाले, ‘बाग खरोखरीच सुंदर आहे. पण कलकत्त्यापासून फार दूर पडेल; येथे येण्याला ठाकुरांच्या भक्तांना फार त्रास झाला असता. मठ इथे झाला नाही हें एका अर्थीं बरेंच झालें.’

आता नौका पुन्हा परत मठाकडे निघाली, आणि प्राय: एका तासानंतर मठांत येऊन पोहोचली.

---

# अध्याय ३१ वा

**स्थळ-- बेलूर मठ.**

**वर्ष-- इ. स. १८९९, सुरवातीचा काळ.**

विषय-- स्वामीजी व नागमहाशय यांची भेट-- परस्परांची परस्परांबद्दल उच्च धारणा.

शिष्य आज नागमहाशयांना बरोबर घेऊन मठांत आला आहे.

स्वामीजी-- ( नागमहाशयांना अभिवादन करून ) आपण खुशाल आहांत तर ?

नागमहाशय-- आपल्या दर्शनासाठी आलों. जय शंकर, जय शंकर. आज साक्षात् शिवाचें दर्शन झालें.

असें म्हणत म्हणत नागमहाशय हात जोडून उभे राहिले.

स्वामीजी— आपली प्रकृति कशी काय आहे ?

नागमहाशय-- 'व्यर्थ हाडामांसाच्या या पिंजऱ्याची काय चौकशी करतां आपण ? आपल्या दर्शनाने आज धन्य धन्य झालों.' असें म्हणून नागमहाशयांनी स्वामीजींना साष्टांग नमस्कार केला.

स्वामीजी-- हें काय आरंभलें आहे आपण ?

नागमहाशय-- माझ्या अंतर्दृष्टीला दिसतें आहे—आज साक्षात् शिवदर्शन घडल्याचें. जय भगवान श्रीरामकृष्ण.

स्वामीजी-- (शिष्याला उद्देशून) पाहिलेंस, यथार्थ भक्तीने माणूस कसा होतो तें ? नागमहाशय तर अगदी तन्मय होऊन गेले आहेत, देहबुद्धीची यत्किंचितहि जाणीव नाही. यांच्यासारखा दुसरा कांही कुठे आढळत नाही. (स्वामी प्रेमानंदांना उपलक्षून) जा, नागमहाशयांसाठी प्रसाद घेऊन ये.

नागमहाशय-- प्रसाद! प्रसाद!! (स्वामीजींना हात जोडून) आपल्या दर्शनाने आज माझी भवक्षुधा मिटली.

मठांतील बालब्रह्मचारी व संन्यासी मंडळी उपनिषदांच्या अध्ययनांत गुंतली होती. त्यांना उद्देशून स्वामीजी म्हणाले, 'आज ठाकुरांचे हे एक महान् भक्त आले आहेत. नागमहाशयांच्या शुभ आगमनामुळे आज अनध्याय राहील.' तेव्हा सर्वांनी आप-आपलीं पुस्तकें बंद केलीं व ते नागमहाशयांच्या भोवती जमले. स्वामीजीहि नागमहाशयांच्या समोर बसले.

स्वामीजी-- (सर्वांना उद्देशून) पाहिलेत? नागमहाशयांकडे पाहा जरा--ते गृहस्थ आहेत, पण जग आहे की नाही याचेंहि त्यांना भान नाही. सर्वदा भावतन्मय असतात. (नागमहाशयांना उद्देशून) या साऱ्या ब्रह्मचाऱ्यांना व आम्हांला ठाकुरांच्या कांही गोष्टी सांगा ना?

नागमहाशय-- काय म्हणतां आपण हें? काय म्हणतां-- मी कांही सांगूं? मी आपल्याला पाहायला आलों. ठाकुरांच्या लीला-साहाय्यक महावीरांचें दर्शन घ्यायला आलों. ठाकुरांची वाणी आता कुठे लोकांना कळूं लागेल. जय रामकृष्ण, जय रामकृष्ण.

स्वामीजी-- ठाकुरांना आपणच काय तें यथार्थ जाणलें. आम्ही फुकटच भटकून भटकून हैराण झालों

नागमहाशय-- छे, छे, आपण हें काय बोलतां! आपण तर ठाकुरांचीच छाया--दोघेहि जणु एकाच नाण्याच्या दोन बाजू. डोळे ज्यांना असतील त्यांनाच दिसेल हें.

स्वामीजी-- हा जो मठबिठ होतो आहे, हें सारें काय ठीक चाललें आहे?

नागमहाशय-- मी अगदी क्षुद्र, अल्पमति--मला काय यांत कळतें? आपण जें करतां आहांत त्याने जगाचें कल्याणच

होईल, मंगलच घडेल अशी माझी खात्री आहे.

पुष्कळजण नागमहाशयांची पदधूलि घेण्यास पुढे होतांच त्यांना अगदी संकोचल्यासारखें झालें. त्यामुळे स्वामीजी सर्वांना म्हणाले, "त्यांना ज्याने त्रास होईल असें कुणी कांहीहि करूं नका." त्यामुळे सर्वजण चुप बसले.

स्वामीजी-- आपण येऊन मठांत कां नाही राहत ? आपल्याकडे पाहून हीं मुलें साऱ्या गोष्टी शिकतील ?

नागमहाशय-- ठाकुरांना याबाबत मीं एकदा विचारलें होतें. त्यांनी सांगितलें, "घरींच राहा." म्हणून घरींच असतों. अधूनमधून आपल्या दर्शनाला येतों आणि धन्य होतों.

स्वामीजी-- आपल्या भागांत एकदा यायची माझी इच्छा आहे.

आनंदाने अगदी वेडावून जाऊन नागमहाशय म्हणाले, "काय ? असा सुमंगल दिन कधी उगवेल काय ? आमचा देश काशी होऊन जाईल काशी ! ही गोष्ट घडावी इतकें माझें भाग्य आहे काय ?"

स्वामीजी-- माझी तर खूप इच्छा आहे. याउपर मा भगवती जेव्हा घेऊन जाईल तेव्हा खरें.

नागमहाशय-- आपल्याला कोण समजूं शकेल ? कोण समजून घेऊं शकेल आपणाला ? दिव्यचक्षु उघडल्याखेरीज आपणाला ओळखायची कुणाचीहि ताकद नाही. एकमात्र ठाकुरच आपल्याला ओळखूं शकले. बाकी सारे त्यांच्याच शब्दांवर विसंबून आहेत. कुणीहि आपल्याला समजूं शकले नाही.

स्वामीजी— सारा देश जागृत करायचा ही एकच इच्छा आहे माझी आता. महावीर जणु आपली शक्ति विसरून जाऊन स्वस्थ घोरत पडला आहे. जाग येण्याचें कांहीहि चिन्ह दिसत नाही. सनातन धर्मभावाने जर मी याला जागवूं शकलों तरच

समजेन की ठाकुरांच्या व आमच्या येण्याचें सार्थक झालें. फक्त हीच एक इच्छा आहे. मुक्ति-बिक्ति तर अगदी तुच्छ वाटतात. आपण आशीर्वाद द्या म्हणजे मी कृतार्थ होऊं शकेन.

नागमहाशय-- आशीर्वाद ठाकुरांचा. आपल्या इच्छेची गति फिरवूं शकेल, तिला बाधा आणूं शकेल असा तर कुणी दिसत नाही. आपल्या इच्छेप्रमाणेच साऱ्या गोष्टी होतील.

स्वामीजी-- कुठे ? कांही तर होत नाही. त्यांच्या इच्छे-शिवाय कांहीहि होत नाही.

नागमहाशय-- त्यांची इच्छा व आपली इच्छा अगदी एक होऊन गेल्या आहेत. आपली इच्छा तीच ठाकुरांची इच्छा. जय रामकृष्ण, जय रामकृष्ण.

स्वामीजी-- कांही कार्य करायचें म्हटलें तर शरीर सुदृढ पाहिजे. हेंच पाहा ना, या देशांत आल्यापासून प्रकृति अगदी खालावून गेली आहे. त्या देशांत (युरोप, अमेरिकेंत वगैरे) तब्यत कशी छान असे.

नागमहाशय-- शरीर धारण केलें की ठाकुर म्हणत त्याप्रमाणे 'घराचा टॅक्स द्यावाच लागतो !' रोग, शोक, म्हणजेच तो टॅक्स (कर). आपलें शरीर म्हणजे जणु मोहरांनी भरलेली पेटी. खूप काळजीने जतन करायला हवी. पण कोण सांभाळणार ? कुणाला कळणार ? समजूं शकले एकमात्र ठाकुरच. जय रामकृष्ण, जय रामकृष्ण.

स्वामीजी-- मठांतले हे सारे लोक माझी खूप काळजी घेतात.

नागमहाशय-- आपली काळजी जे घेत असतील त्यांचें कल्याणच होईल—त्यांना समजो वा न समजो. या काळजी घेण्यांत जर कांही कमी पडलें तर शरीर टिकणें कठीण.

स्वामीजी-- नागमहाशय ! मी काय करतों, काय नाही

कांही कळत नाही. एखादे वेळीं एखादी गोष्ट करायची खूप प्रबळ इच्छा होते. तदनुसार मी आपला काम करीत जातों. होतें तें भलें की बुरें कांही कळत नाही.

नागमहाशय-- ठाकुरांनी सांगितलें आहे, "(खजिन्याचें) कुलूप किल्ली लावून बंद केलें आहे." म्हणूनच ते कांही उमजू देत नाहीत. ज्या क्षणीं तें समजेल त्या क्षणीं ही आपली लीला संपेल.

अगदी एकटक नजरेने पाहत स्वामीजी कसला तरी विचार करीत होते. इतक्यांत स्वामी प्रेमानंद प्रसाद घेऊन आले व तो त्यांनी नागमहाशयांना व इतरांना दिला. दोन्ही हातांनी घेऊन नागमहाशयांनी तो प्रसाद मस्तकीं धारण केला आणि आनंदाच्या भरांत 'जय रामकृष्ण, जय रामकृष्ण' म्हणत ते नाचूं लागले. सारे लोक तें पाहून आश्चर्याने थक्क झाले. प्रसाद घेणें आटोपल्यावर सारे लोक बागेंत इतस्ततः फिरूं लागले. येवढ्यांत एक कुदळ घेऊन स्वामीजी मठांतील तलावाच्या पूर्वकडेवरील कांही भाग खोदूं लागले. तें नागमहाशयांनी पाहतांच स्वामीजींचा हात धरून ते म्हणाले, "आम्ही सारे असतांना आपण स्वतः हें काय करतां आहांत ?" स्वामीजींनी कुदळ ठेवली व मोकळ्या जागेंत ते फिरूं लागले. फिरतांना त्यांचें बोलणें चालूंच होतें. एका शिष्याला स्वामीजी सांगत होते, "ठाकुरांच्या देहत्यागानंतर एक दिवस ऐकलें की आपल्या कलकत्त्यांतील खोलींत नागमहाशय उपाशीतापाशी चारपांच दिवसांपासून नुसते पडले आहेत. हें ऐकतांच मी, हरि (स्वामी तुरीयानंद) आणि आणखी एकजण असे आम्ही तिघे त्यांच्या घरीं जाऊन हजर झालों. आम्हांला पाहतांच अंगावरील पांघरूण फेकून देऊन ते उभे राहिले. आज आम्ही आपल्याकडे भिक्षेसाठी (भोजनासाठी)

आलों आहोंत असें आम्हीं त्यांना सांगितलें. लागलीच नाग-महाशयांनी बाजारांतून तांदूळ, भांडींकुंडीं, लाकडें वगैरे साहित्य आणलें व सैपाकाला सुरवात केली. मनांत आम्ही विचार केला होता की आपणहि जेवूं व त्यांनाहि जेवायला लावूं. सैपाक झाल्यावर आम्हांला त्यांनी वाढलें. त्यांच्यासाठी साऱ्या जिनसा ठेवून आम्ही जेवायला बसलों. आमचें आटोपल्यावर त्यांना जेवण्यासाठी आग्रह करतांच लागलीच त्यांनी सारीं मडकीं वगैरे फोडून टाकून कपाळ पिटून घेत म्हणायला सुरवात केली, 'ज्या शरीराने भगवानलाभ झाला नाही त्याला काय पुन्हा मी खाऊं घालून पोसूं ?' आम्ही तर अगदी थक्क झालों. नंतर खूपच आग्रह करून, अगदी गळीं पडून त्यांना थोडेंफार खाऊं घातल्यावर मगच कुठे आम्ही परत फिरलों."

स्वामीजी-- नागमहाशय आज मठांत राहणार आहेत का ?

शिष्य-- नाही, कांही निकडीचें काम असल्यामुळे त्यांना आज गेलेंच पाहिजे.

स्वामीजी— तर मग एखादी नौका ठरव. आता संध्याकाळ होत आली आहे.

नौका आली. शिष्याने व नागमहाशयांनी स्वामीजींना प्रणाम केला व ते नौकेने कलकत्त्याकडे जाण्यास निघाले.

---

# अध्याय ३२ वा

**स्थळ-- बेलूर मठ.**

**वर्ष— इ. स. १८९९**

विषय-- ब्रह्म, ईश्वर, माया व जीव यांचें स्वरूप— सर्वशक्तिमान व्यक्तिविशेष म्हणून ईश्वराची धारणा करून साधनेंत प्रगति केल्यास क्रमाने त्याचें यथार्थ स्वरूप समजूं शकतें— 'अहं ब्रह्म' हा बोध न झाल्यास मुक्ति नाही— कामकांचनभोगाची स्पृहा सोडल्याखेरीज व महापुरुषांच्या कृपेचा वरदहस्त न लाभल्यास हा बोध होणें शक्य नाही-- आंतरिक व बाह्य संन्यासानेच आत्मज्ञानलाभ-- 'होईल, पुढे पाहूं' असला ढिलेपणाचा भाव सोडून द्यावयास हवा-- कशा प्रकारच्या विचाराने आत्मज्ञानलाभ होतो-- मनाचें स्वरूप, मनः-संयम कशा प्रकारें करावयास हवा— ज्ञानमार्गी साधकाने आपल्या यथार्थ स्वरूपालाच ध्यानाचा विषय म्हणून स्वीकारावयास हवें-- अद्वैतावस्थालाभानंतर अनुभव-- ज्ञान, भक्ति, योग वगैरे साऱ्याच मार्गांचें उद्दिष्ट, जीवाला ब्रह्मज्ञ करणें— अवतारतत्त्व--आत्मज्ञान-लाभासाठी प्रोत्साहन-- आत्मज्ञ पुरुषाचें कर्म 'जगत्-हिताय' असतें.

सध्या स्वामीजींची प्रकृति पुष्कळच बरी आहे. रविवारीं शिष्य मठांत आला आहे. स्वामीजींचें दर्शन घेतल्यावर खाली येऊन त्याने स्वामी निर्मलानंदांबरोबर वेदान्तशास्त्राची चर्चा आरंभिली. तेवढ्यांतच स्वामीजीहि खाली आले व शिष्याला उद्देशून म्हणाले, "काय रे, तुलसीबरोबर तुझी कसली चर्चा चालू आहे ?"

शिष्य-- महाराज, तुलसीमहाराज म्हणताहेत, 'वेदान्ताचा ब्रह्मवाद फक्त तुझ्या स्वामीजींना आणि तुलाच काय तो समजतो. पण आम्ही मात्र 'कृष्णस्तु भगवान स्वयम्' येवढेंच काय तें जाणतों.

स्वामीजी-- मग तुझें काय म्हणणें आहे ?

शिष्य-- मी म्हणालों, एक आत्माच सत्य. कृष्ण फक्त ब्रह्मज्ञ पुरुष होते. तुलसीमहाराज आंतून आहेत वेदान्ती. बाहेरून मात्र द्वैतवाद्यांचा पक्ष घेऊन वाद करीत असतात. ईश्वर म्हणजे एक व्यक्तिविशेष असें म्हणून वादाला सुरवात करून हळूहळू वेदान्ताचा पाया दृढपणें सिद्ध करणें हाच त्यांचा हेतु असावा असें मला वाटतें. पण त्यांनीं मला वैष्णव म्हणून छेडतांच मी हें सारें विसरून जातों व वादाला आरंभ करतों !

स्वामीजी-- तुलसीचें तुझ्यावर प्रेम आहे किनई ? म्हणून तो तुला असें बोलून चिडवितो. तूं तरी चिडतोस कशाला ? तूंहि त्यांना म्हणत जा, 'आपण शून्यवादी नास्तिक आहांत !'

शिष्य-- महाराज, उपनिषदादि दर्शनशास्त्रांत ईश्वर हा एक शक्तिमान् व्यक्तिविशेष आहे असा कोठे उल्लेख आढळतो काय ? लोक मात्र अशाच ईश्वरावर विश्वास ठेवतात.

स्वामीजी-- सर्वेश्वर हा कधी विशिष्ट व्यक्ति असूं शकत नाही जीव म्हणजे व्यष्टि आणि साऱ्या जीवांची समष्टि म्हणजे ईश्वर. जीवांत अविद्या प्रबल असते; विद्या व अविद्या यांच्या समष्टिभूत मायेला वशीभूत करून घेऊन ईश्वर स्वाधीन भावाने स्थावरजंगमात्मक जगाला आपल्यांतूनच बाहेर क्षेपित करतो. परंतु ब्रह्म मात्र या व्यष्टिसमष्टींच्या अथवा जीव-ईश्वराच्या अतीत. ब्रह्मांत कसलेहि भाग नाहीत. समजण्याच्या दृष्टीनेच त्याचे त्रिपाद, चतुष्पाद इत्यादि कल्पित वर्णन केलें आहे. ज्या पादावर सृष्टि, स्थिति, प्रलयादींचा अध्यास केला जातो त्यालाच शास्त्रांत ईश्वर म्हणून संबोधिलें जातें. बाकी त्रिपाद 'कूटस्थ' म्हणजेच ब्रह्म. त्यांत कोणत्याहि प्रकारची द्वैत कल्पनेची छटाहि नसते. पण याचा अर्थ असा नकोस समजूं की ब्रह्म हें जीव-जगतां-

पासून भिन्न अशी एक स्वतंत्र वस्तु आहे. विशिष्टाद्वैतवादी लोक म्हणतात की ब्रह्मच जीवजगत्‌रूपांत परिणत झालें आहे. अद्वैतवाद्यांना हें मान्य नाही. त्यांच्या मतें जीव-जगत् हे ब्रह्मावर फक्त अध्यस्त आहेत, पण वास्तविकपणें यामुळे ब्रह्मावर कुठल्याहि प्रकारचा कांहीहि परिणाम होत नाही. अद्वैतवाद्यांच्या मतें जगत् हें केवळ नामरूपात्मक आहे. नामरूप असेंपर्यंतच जगाचें अस्तित्व. ध्यानधारणादि साधनांच्या द्वारें नामरूपांचा जेव्हा विलय होऊन जातो तेव्हा ब्रह्माशिवाय कांहीच असत नाही. तेव्हा तुझ्या-माझ्या वा जीवजगताच्या स्वतंत्र सत्तेचा पुन्हा अनुभव येत नाही, या वेळीं बोध असतो. मीच नित्यशुद्धबुद्ध प्रत्यक् चैतन्य वा ब्रह्म हा. जीवाचें स्वरूपच आहे ब्रह्म. ध्यानधारणादिकांनी नामरूपांचें आवरण अपसारित होऊन या भावाचा प्रत्यक्ष अनुभव येतो येवढेंच. शुद्धाद्वैतवाद्यांच्या म्हणण्याचें हेंच आहे थोडक्यांत सार. हीच गोष्ट वेदवेदान्तादि शास्त्रें नाना तऱ्हांनी पुनः पुनः समजावून देत असतात.

शिष्य-- असें असल्यास ईश्वर म्हणजे सर्वशक्तिमान् व्यक्तिविशेष हें कसें सिद्ध होईल ?

स्वामीजी-- मनरूप उपाधीनेच माणूस हा माणूस होतो. मनाच्या द्वारेंच माणसाला सारे विषय समजून घ्यावे लागतात. परंतु मन ज्याचा विचार करतें तें सीमितच असणार. यामुळे आपल्याच व्यक्तित्वाच्या कल्पनेवरून ईश्वराच्या व्यक्तित्वाची कल्पना करणें ही माणसाच्या बाबतींत अगदी स्वाभाविक गोष्ट आहे. मनुष्य आपल्या आदर्शाची कल्पना मनुष्यस्वरूपांतच करूं शकतो. या जरामरणपरिपूर्ण संसारांत येऊन माणूस दुःखानें अगदी ठेचून निघाल्याने 'मेलों, मेलों' असें रुदन करीत करीत अशा एखाद्या व्यक्तीचा आश्रय शोधत असतो की जीवर सारा

भार घालून तो अगदी निश्चिंत राहूं शकेल. पण असा आश्रय आहे कुठे ? कुणावरहि अवलंबून नसलेला सर्वव्यापी आत्मा हाच एकमात्र तें आश्रयस्थान होय. सुरवातीला ही गोष्ट माणसाच्या लक्षांत येत नाही. विवेक-वैराग्य अंगीं बाणल्यावर ध्यान-धारणा करतां करतां हळूहळू ही गोष्ट त्याला उमजते. परंतु कोणत्याहि भावाने साधना करा ना का, सारेजण अगदी नकळत आपल्यांतच असणाऱ्या ब्रह्मभावाला जागृत करीत असतात. अर्थातच याबाबत उपाय मात्र भिन्न भिन्न असूं शकतील. ज्यांचा सगुण ईश्वरावर विश्वास असेल त्यांनी त्या भावाच्या आश्रयानेच साधनभजन करावयास हवें. तनमनधनें करून त्यांनी एकाग्र भावाने साधना केल्यास कालांतराने त्यांच्यांतील ब्रह्मसिंह जागृत होईलच. व्यक्तिमात्रांचें एकमात्र लक्ष्य असतें ब्रह्मज्ञान. असें असलें तरी नाना मतमतांतरें हीं त्याच एका चरम ध्येयाचे मार्ग होत. पारमार्थिक दृष्टीने जीवमात्राचें स्वरूप ब्रह्मच असलें तरी मनरूप उपाधीने, अभिमानामुळे त्याला नाना संदेह, संशय, सुखदुःखें या साऱ्यांचा भोग भोगावा लागतो. पण आपल्या स्वरूपोपलब्धीसाठी आस्तंबब्रह्मपर्यंत सारेच सतत प्रयत्नशील असतात. 'अहं ब्रह्म' या तत्त्वाची उपलब्धि जोंपर्यंत होत नाही तोंपर्यंत जन्ममृत्यूच्या फेऱ्यांतून कुणाचीहि सुटका होत नाही. मानवजन्म लाभून मुक्तीची कामना प्रबल झाल्यास व महापुरुषांची कृपा लाभल्यासच मनुष्यांत आत्मज्ञानाची ऐकान्तिक इच्छा मोठ्या उत्कटतेने निर्माण होते. एरव्ही कामकांचनादिकांत गुरफटलेल्या लोकांचें मन त्या गोष्टींकडे वळतच नाही. बायको, मुलें, धन, मान मिळविण्याचा ज्यांनी मनोमन संकल्प केला असतो त्यांच्यांत कधी काय ब्रह्मज्ञानेच्छा निर्माण होणें शक्य आहे ? सुखदुःखांच्या, बऱ्यावाईटांच्या या द्वंद्वमय वेगवान् प्रवाहांत जो धीर, स्थिर,

शान्त व समचित्त असतो तोच आत्मज्ञान मिळविण्यासाठी प्रयत्नपर होतो. तोच ' निर्गच्छति जगज्जालात् पिंजरादिव केसरी '-- तोच महाबलाने ह्या जगज्जालाचीं बंधनें तोडून सिंहाप्रमाणे मुक्त होऊन बाहेर पडतो.

शिष्य— तर मग काय महाराज, संन्यासाशिवाय ब्रह्मज्ञान लाभणें शक्यच नाही ?

स्वामीजी-- तें काय पुनः सांगायला हवें ? अंतर्बाह्य दोन्ही प्रकारें संन्यासाचा अवलंब करावयास हवा. उपनिषदांतील 'तपसो वाप्यलिंगात्' या पदावर भाष्य करतांना आचार्य शंकरांनी म्हटलें आहे की लिंगहीन अर्थात् संन्यासाच्या बाह्यस्वरूप निदर्शक असणाऱ्या भगवीं वस्त्रें, दंड-कमंडलु इत्यादि वस्तूंचा स्वीकार न करतां केलेल्या तपश्चर्येने दुरधिगम्य ब्रह्मतत्त्वाचा लाभ होणें शक्य नाही. वैराग्य अंगीं न बाणतां, सर्वस्वाचा त्याग न करतां, भोगस्पृहा संपूर्णपणें विसर्जित न झाल्यास काय कांही होण्याची शक्यता आहे जीवनांत ? ब्रह्मज्ञान काय भोळ्याभाबड्या मुलाच्या हातची मिठाई आहे रे, की जी कांहीतरी सांगून त्याच्या हातून काढून घेतां येईल ?

शिष्य-- पण साधना करतां करतां क्रमाने त्यागवृत्ति तर निर्माण होईलच ना ?

स्वामीजी-- ज्यांना असा हळूहळू त्याग करावयाचा असेल ते तो तसा खुशाल करोत. पण तूं त्यासाठी स्वस्थ कपाळावर हात देऊन काय म्हणून बसून राहणार ? या क्षणीं "पाट खोदून पाणी आणण्याच्या उद्योगाला लाग." ठाकुर म्हणत, "होत आहे, होईल, या साऱ्या झाल्या ढिलाईच्या गोष्टी." तहान लागल्यावर कुणी कधी कशाची वाट पाहत थांबेल ? की तो पाण्यासाठी वेड्यागत चोहोकडे धावेल ? तहानच लागली नाही. म्हणूनच

तर ह्या थंडपणें बसून गोष्टी सुचतात! विविदिषा प्रज्वलित झालेली नाही म्हणूनच बायकापोरें घेऊन संसारांत गुरफटून पडला आहेस.

शिष्य-- खरोखरच, काय म्हणून अजून सर्वस्वत्यागाची बुद्धि होत नाही हेंच कांही कळत नाही. कृपा करून आपणच कांही तोड सांगा ना यावर ?

स्वामीजी-- साध्य व साधन हीं सारीं एका तुझ्याच हातीं आहेत. मी फक्त ह्या तुझ्यांतील गोष्टींना चालना देऊं शकतों. हीं तूं सारीं सत्‌शास्त्रें अभ्यासतोस, असल्या ब्रह्मज्ञ साधूंची सेवा करतोस, त्यांच्या सत्संग-छायेंत वावरतोस, हें सारें असूनहि जर त्यागाची वृत्ति तुझ्या अंगीं बाणली नाही तर सारा जन्म वृथा वाया गेला म्हणून समज. अर्थातच अगदीच वृथा गेला असें म्हणतां यायचें नाही--कालांतराने या साऱ्यांचें फळ दिसेलच दिसेल कांहीहि झालें तरी.

शिष्य अधोमुख होऊन आपलें पुढे कसें होणार या विचाराने कष्टी होऊन खिन्नपणें पुन्हा स्वामीजींना म्हणाला, "महाराज, मी आपल्या चरणीं शरण आलों आहें. माझ्या मुक्तीचा मार्ग मोकळा करून द्या; याच देहीं मला तत्त्वलाभ होईल यासाठी माझा मार्ग खुला करून द्या."

शिष्य अगदी खिन्न झाला आहे असें पाहून स्वामीजी म्हणाले, "भय कसचें आलें आहे? सर्वदा विचार करावा--देह, गेह, जीव-जगत् सारें संपूर्णतया मिथ्या—स्वप्नवत्. नेहमी मनांत विचार बाळगावा की हा देह म्हणजे एक जड यंत्र--यांतच आत्माराम पुरुषाचा अधिनिवास. तेंच आपलें यथार्थ स्वरूप. मनरूप उपाधि हें त्या पुरुषाचें पहिलें सूक्ष्म आवरण, व नंतर हा देह म्हणजे त्याचें स्थूल आवरण. निष्कल, निर्विकार, स्वयंज्योति तो

परमपुरुष या साऱ्या मायिक आवरणांनी आच्छादित असल्याने तूं तुझें स्वरूप जाणूं शकत नाहीस. रूपरसादि प्रलोभनांकडे प्रधावित होणाऱ्या मनाच्या गतीला आंत आत्म्याकडे फिरवून द्यावयास हवें. हें मनच मुळांत मारावयास हवें. हा देह तर स्थूल आहे, मेल्यानंतर पंचतत्त्वांत मिसळून जातो तो. पण साऱ्या संस्कारांची गाठोडी असणारें हें मन मरतां मरत नाही. कांही काळ बीजरूपाने पडून राहिल्यासारखें वाटतें तें, पण लागलीच तें पुन्हा प्रचंड वृक्षाचा आकार धारण करतें. पुनश्च तें देहधारण करून जन्ममृत्यूच्या मार्गावर अनवरत फेऱ्या घालूं लागतें. आणि हें चालूं असेंपर्यंत आत्मज्ञान होत नाही. म्हणून सांगतों की ध्यान-धारणा व विचारशक्तीच्या बळावर मनाला सच्चिदानंदसागरांत बुडवून टाक. मन मेलें की साऱ्या उपाधि सरल्या, मगच तूं ब्रह्मसंस्थ झालास."

शिष्य-- महाराज, या उद्दाम, उन्मत्त मनाला ब्रह्मविलीन करणें महाकठीण कर्म आहे.

स्वामीजी-- वीरांना काय कोणती गोष्ट कठीण असते ? नेभळट माणसांच्याच तोंडीं या गोष्टी शोभतात. "वीराणामेव करतलगता मुक्तिः न पुनः कापुरुषाणाम् ।" सतत अभ्यास व वैराग्यबलाने मनाला संयमित करावयास हवें. गीतेचें सांगणें आहे, 'अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ।' चित्त आहे जणु एखाद्या स्वच्छ, निर्मल तलावाप्रमाणे. रूपरसादिकांच्या आघातांनी त्यावर जे तरंग उठतात त्यांचेंच नांव मन. यामुळेच मनाचें स्वरूप असतें संकल्पविकल्पात्मक. या संकल्पविकल्पांतूनच वासनांचा जन्म होतो. नंतर हेंच मन क्रियाशक्तींत परिणत होऊन स्थूलदेहरूप यंत्राद्वारा कार्य करतें. तसेंच कर्म ज्याप्रमाणे अनन्त त्याचप्रमाणे त्याचें फलहि असतें अनन्त. म्हणून अनन्त,

असंख्य कर्मफलरूपी तरंगांवर मन सदा हिंदोळत असतें. याच दोलायमान मनाला वृत्तिशून्य करावयास हवें,--स्वच्छ, निर्मल, निस्तरंग तलावस्वरूपांत त्याला रूपान्तरित करावयाचें असतें. त्यांत मग पुन्हा कुठल्याहि वृत्तीचा कसलाहि तरंग शिल्लक नको राहावयाला. तरच मग कुठे ब्रह्मप्रकाश लाभेल. शास्त्रकारांनी याच अवस्थेचा आभास दिला आहे 'भिद्यते हृदयग्रन्थिः' इत्यादि वचनांतून. समजलें ?

शिष्य-- होय. पण ध्यान तर कुठल्यातरी विषयाच्या आधारानेच साधणार ना ?

स्वामीजी-- तूं स्वतःच स्वतःच्या ध्यानाचा विषय. तूं सर्वग, सर्वस्थित आत्मा या भावाचें सतत मनन व ध्यान कर. मी देह नाहीं, मन नाहीं, बुद्धि नाहीं, स्थूल नाहीं, सूक्ष्म नाहीं अशा प्रकारें 'नेति, नेति' मार्गानें विचार करून प्रत्यक् चैतन्यरूप स्वस्वरूपांत मन निमग्न करून टाक. अशा प्रकारें या मनाला वारंवार बुडवून बुडवून अखेर मारून टाक. तरच बोधस्वरूपाची जाणीव वा स्वस्वरूपीं अवस्थान लाभेल. ध्याता, ध्येय हीं मग एक होऊन जातील. ज्ञाता, ज्ञेय हीं एक होतील. निखिल अध्यासाची निवृत्ति होऊन जाईल. शास्त्र यालाच म्हणतात 'त्रिपुटिभेद.' या अवस्थेंत संबंध-स्वरूपाचें ज्ञानाज्ञान बाकी राहत नाही. या अवस्थेंत एकमात्र आत्माच विज्ञाता, त्याला मग कसें जाणावयाचें ? आत्माच ज्ञान, आत्माच चैतन्य, आत्माच सच्चिदानंद. जिचा सत् वा असत् अशा कुठल्याच स्वरूपांत निर्देश करतां येत नाही त्या अनिर्वचनीय मायाशक्तीच्या प्रभावानेच जीवरूप ब्रह्मांत ज्ञाता-ज्ञेय-ज्ञान इत्यादि भावांचा उदय होतो. याच अवस्थेला साधारण माणसें ज्ञानाची वा जाणिवेची अवस्था म्हणून संबोधितात. आणि ज्या अवस्थेंत हा द्वैतसंघात शुद्ध

ब्रह्मतत्त्वांत एक होऊन जातो तिला शास्त्र समाधि अवस्था म्हणून संबोधितात; व तिचें 'स्तिमितसलिलराशिप्रख्यमाख्या-विहीनम्' असें वर्णन करतात.

स्वामीजी ह्या गोष्टी जणु यथांग ब्रह्मानुभूतींत निमग्न होऊनच बोलत होते.

स्वामीजी— या ज्ञाता-ज्ञेय वा ज्ञानाज्ञानाच्या जाणिवेंतूनच तत्त्वज्ञान, दर्शनें, शास्त्रविज्ञानादिकांचा उद्‌भव होतो. पण मानवी मनाचा कोणताहि भाव वा भाषा या ज्ञानाज्ञानापलीकडे असलेल्या वस्तूला संपूर्णतया प्रकाशित करूं शकत नाही ! तत्त्वज्ञान-विज्ञान हीं सारीं आहेत आंशिक सत्यें. म्हणूनच तीं परमार्थतत्त्वाचें संपूर्ण प्रकाशन कधीच करूं शकत नाहीत. यामुळेच परमार्थदृष्टीनें पाहिलें असतां सारेंच मिथ्या वाटतें. धर्म मिथ्या, कर्म मिथ्या, मी-तूं मिथ्या, सारें जगत् मिथ्या. आणि मगच बोध होतो की सारें मीच आहें. मीच सर्वगत आत्मा, मीच माझ्या अस्तित्वाचें एकमेव प्रमाण. माझ्या अस्तित्वाला आणखी पुन्हा वेगळ्या प्रमाणांची आवश्यकताच कुठे उरते ? मी म्हणजे, शास्त्र म्हणतात त्याप्रमाणे 'नित्यमस्मत्प्रसिद्धम् ।' ही अवस्था खरोखरीच मीं पाहिली, अनुभवली आहे. तुम्हीहि पाहा, अनुभव घ्या आणि जीवांना ब्रह्मतत्त्व सांगा; तेव्हाच कुठे शान्तिलाभ होईल तुम्हांला.

बोलतां बोलतां स्वामीजींचें मुखमंडल गंभीर झालें व त्यांचें मन कुठल्यातरी अज्ञात प्रदेशांत स्थिरावलें. कांही वेळानंतर ते म्हणाले, "या सर्व मतांना ग्रासून टाकणाऱ्या, सर्व मतमतांतरांचा समन्वय करणाऱ्या ब्रह्मविद्येचा स्वतः अनुभव घ्या व जगांत प्रचार करा. यांतच तुमचें मंगल आहे, जगाचें कल्याण आहे. आज अगदी सर्व सत्याचें जणु सारच मीं तुला सांगितलें. यापरतें श्रेष्ठ जगांत अन्य कांहीहि नाही."

शिष्य— महाराज, आपण आता ज्ञानाची महती सांगत आहांत, कधी भक्तीची सांगतां, तर कधी कर्माची वा योगाची. यामुळे समजुतींत गोंधळ माजतो.

स्वामीजी-- असल गोष्ट आहे ब्रह्मज्ञ होणें; तोच आहे परमपुरुषार्थ. समजलें ना! पण माणूस तर कांही सदासर्वदा ब्रह्मस्थित राहूं शकत नाही! व्युत्थानकालीं कशाचा तरी आश्रय तर घ्यायलाच हवा ना? त्या वेळीं मग असें कर्म करावयास हवें की ज्यायोगें लोकांना श्रेयोलाभ होईल. यासाठीच मी तुम्हांला सांगत असतों की अभेदबुद्धीने जीवसेवारूप कर्म करा म्हणून. पण बाबा, कर्माची गति अशी गहन आहे की मोठमोठे महापुरुष तेथे अडकून पडतात. म्हणूनच फलाकांक्षा संपूर्णतया सोडून देऊन कर्म करावयास हवें. गीतेंतहि हेंच तत्त्व सांगितलें आहे. पण पक्कें ध्यानांत ठेव की ब्रह्मज्ञानाचा कर्माशीं कांहीहि संबंध नाही. सत्कर्माने फारच फार तर चित्तशुद्धि होईल. याकरताच तर भाष्यकार शंकराचार्यांचा ज्ञानकर्मसमुच्चयावर एवढा भयंकर कटाक्ष आहे, इतके दोष त्यांनी त्यांत दाखविले आहेत. निष्काम कर्माने एखाद्याला ब्रह्मज्ञान होऊं शकेल. तोहि एक साधनामार्ग आहेच; पण मूळ उद्देश आहे ब्रह्मज्ञानलाभ. विचार-विवेक मार्ग असो वा अन्य कोणतीहि साधना असो-- या साऱ्यांचें ध्येय आहे ब्रह्मज्ञानलाभ. ही गोष्ट अगदी पक्केपणीं लक्षांत ठेव.

शिष्य-- महाराज, आता मला भक्ति व राजयोग यांच्या उपयोगितेबद्दल कांही सांगा ना?

स्वामीजी-- या साऱ्या मार्गांचा अवलंब करूनहि साधना करतां करतां अनेकांना ब्रह्मज्ञानलाभ होतो. भक्तिमार्ग ध्येय-लाभाच्या दृष्टीने दिरंगाईचा असला तरी तो सहजसाध्य मार्ग

आहे. योगमार्ग नाना विघ्नांनी भरलेला. मन नाना विभूतींकडे आकर्षित झालें की झालें संपलें सारें ! मग कांही तें स्वस्वरूपलाभापर्यंत जायला नको. एकमात्र ज्ञानमार्गच शीघ्रफलदायी व सर्वमतपोषक असल्याने सर्वत्र सारखाच मान्यता पावला आहे. पण विचारमार्गाने जाण्यांतहि मन अनंत तर्कजालांत अडकून पडण्याची भीति आहेच. यासाठी त्याच्या जोडीलाच ध्यानधारणा करावयास हवी. विचार व ध्यान यांच्या बलाने आपलें उद्देश्य--ब्रह्मतत्त्वलाभ--साध्य करून घ्यावयास हवें. अशा रीतीने साधना केल्यास इष्ट स्थळीं जातां येईलच. हाच माझ्या मतें शीघ्रफलदायी व सहज मार्ग आहे.

शिष्य-- आता मला अवताराबद्दल कांही माहिती सांगा ना ?

स्वामीजी-- साऱ्या गोष्टी अगदी एका दिवसांतच हस्तगत करायचा तूं तर अगदी चंग बांधलेला दिसतो !

शिष्य-- मनाचे सारे संशय एका दिवसांतच जर फिटले तर तुम्हांला वारंवार त्रास देण्याचें कांही कारणच उरणार नाही !

स्वामीजी--ज्या आत्म्याचें महिम्नस्तोत्र शास्त्रें सतत गात असतात त्याचें ज्ञान ज्यांच्या कृपालेशमात्रें एका क्षणांत प्राप्त होतें तेच, जणु चालत्याबोलत्या तीर्थक्षेत्रांप्रमाणे असणारे थोर पुरुष, अवतार होत. ते जन्मापासूनच ब्रह्मज्ञ असतात. ब्रह्मांत व ब्रह्मज्ञांत भेद नाही--कांही तफावत नाही. 'ब्रह्मवेद ब्रह्मैव भवति ।' आत्म्याला तर कांही जाणतां येणें शक्य नाही, कारण हा आत्माच विज्ञाता, मनन करणारा असतो हें मीं आधीच सांगितलें आहे. तेव्हा माणसाच्या कळण्यासवरण्याची धांव असते, जे आत्मसंस्थ असतात त्या अवतारांपर्यंत. मानवीबुद्धि ईश्वराबाबत जी सर्वश्रेष्ठ कल्पना करूं शकते ती फक्त येथपर्यंतच. यापलीकडे मग जाणण्या न जाणण्याची भाषाच

उरत नाही. हे असले ब्रह्मज्ञ या अवनीतलावर क्वचितच अवतीर्ण होतात, आणि फारच थोडे लोक त्यांचा महिमा समजूं शकतात. तेच साऱ्या शास्त्रांचें प्रमाणस्थल, भवसागरांतील ते जणु दीपस्तंभच. या अवतारी पुरुषांच्या सान्निध्याने, कृपाकटाक्षाने एका क्षणांत हृदयांतील अंधकार नाहीसा होतो, एकाएकी ब्रह्मज्ञानाचें स्फुरण होतें. हें कां व कसें होतें याचा कांही उलगडा होत नाही. पण तें होतें व तें तसें होतांना मीं पाहिलें आहे. आत्मसंस्थ होऊनच भगवान श्रीकृष्णांनी गीता सांगितली आहे. गीतेंत ज्या ज्या ठिकाणीं 'अहं' असा उल्लेख आहे त्या त्या ठिकाणीं त्याचा अर्थ 'आत्मा' असाच आहे. 'मामेकं शरणं व्रज' म्हणजे 'आत्मसंस्थ' व्हा. हें आत्मज्ञानच गीतेचें चरमलक्ष्य आहे. गीतेंत योगादिकांचा उल्लेख या आत्मतत्त्वलाभाच्या अनुषंगानेच केला आहे. हें आत्मज्ञान ज्यांना होत नाही तेच 'आत्मघ्न,'--'विनिहन्त्यसद्ग्रहात् ।' रूपरसादि बंधनांच्या गळफासाने त्यांचा प्राणान्त होतो जणु. तुम्हीहि तर माणसासारखीं माणसेंच आहांत ना? दो दिवसांच्या या दुनियेंतील तुच्छ भोगाची काय तुम्ही उपेक्षा करूं शकत नाही? जन्मले आणि मेले यांच्याच मालिकेंत उभे राहणार? जें 'श्रेयस्' त्याचाच अंगीकार करा, 'प्रेयस्'चा कटाक्षाने परित्याग करा. हें आत्मतत्त्व आचांडाल साऱ्यांना मुक्तकंठाने सांगा. हें सांगण्यानेच तुमची बुद्धि शुद्ध होईल. सतत 'तत्त्वमसि,' 'सोऽहमस्मि,' 'सर्वं खलु इदं ब्रह्म' वगैरे मंत्र जपत जा आणि हृदयांत सिंहसदृश बळ बाळगा. भिण्याचें काय कारण आहे? भय म्हणजेच मृत्यु, भय हेंच मुळी महापातक. नररूपी अर्जुन भयग्रस्त झाला म्हणन आत्मसंस्थ भगवान् श्रीकृष्णांनी त्याला गीता सांगितली. तरीहि त्याचें भय काय कमी झालें? अखेर जेव्हा

विश्वरूपदर्शनाने अर्जुन आत्मसंस्थ झाला तेव्हाच ज्ञानाग्नीने त्याचीं कर्में दग्ध होऊन त्याने युद्ध केलें.

शिष्य--आत्मज्ञानलाभ झाल्यानंतरहि काय कर्म बाकी उरतें ?

स्वामीजी--ज्ञानलाभानंतर सामान्य लोक ज्याला कर्म म्हणतात त्या अर्थाने कर्म बाकी उरत नाही. नंतर होणारें हें कर्म 'जगत् हिताय' स्वरूपाचें असतें. आत्मज्ञान्यांचें सारें आचरण, सारा व्यवहारच मुळी जीवांच्या कल्याणसाधनेसाठी. ठाकुरांना पाहिलें आहे--'देहस्थोऽपि न देहस्थः' हीच त्यांची अवस्था होती. या पुरुषांच्या कर्महेतूसंबंधी फक्त 'लोकवत्तु लीलाकैवल्यम्' येवढेंच म्हणतां येतें.

## अध्याय ३३ वा

**स्थळ-- बेलूर मठ**

**वर्ष— इ. स. १९०१**

**विषय**— कलकत्ता येथील ज्युबिली आर्ट ॲकॅडेमींतील अध्यापक श्री. रणदाप्रसाद दासगुप्त यांच्याबरोबर स्वामीजींचें शिल्पकलेसंबंधी बोलणें-- कृत्रिम पदार्थांद्वारा मनोभावना व्यक्त करणें हेंच शिल्पकलेचें उद्दिष्ट असावयास हवें-- भारतांतील बुद्धयुगीन शिल्प या बाबतींत जगांत सर्वोत्कृष्ट-- फोटोग्राफीचें साहाय्य घेतल्याने युरोपमधील शिल्पाची भावप्रकटनाबाबत झालेली अवनति— भिन्न भिन्न जातींच्या शिल्पाचें वैशिष्टय असतें-- जडवादी युरोपच्या व अध्यात्मवादी भारताच्या शिल्पांतील वैशिष्टय-- शिल्पाची वर्तमान भारतांत झालेली अवनति-- देशांतील सर्वच विद्यांत व भावांत प्राणसंचार करण्यासाठीच श्रीरामकृष्णांचें आगमन.

कलकत्ता ज्युबिली आर्ट ॲकॅडमीचे संस्थापक व अध्यापक बाबू रणदाप्रसाद दासगुप्त यांना बरोबर घेऊन शिष्य आज मठांत आला आहे. रणदाबाबू शिल्पकलानिपुण, विद्वान् व स्वामीजींच्या गुणांचे चहाते होते. परिचय करून दिल्यानंतर स्वामीजींचें रणदाबाबूंबरोबर शिल्पशास्त्रासंबंधी बोलणें सुरू झालें. रणदाबाबूंना प्रोत्साहित करण्यासाठी ज्युबिली आर्ट ॲकॅडेमीला एकदा भेट देण्याची इच्छाहि त्यांनी व्यक्त केली. पण पुढे नाना कारणांनी स्वामीजींचें तेथे जाणें झालें नाही.

स्वामीजी त्यांना म्हणाले-- पृथ्वीवरील साऱ्या सुसंस्कृत देशांतील शिल्पसौंदर्य मी पाहून आलों, पण बुद्धकालांत या देशांत शिल्पकलेचा जसा विकास झालेला दिसतो तसा अन्यत्र कुठेहि आढळून येत नाही. मोगल बादशहांच्या वेळींहि या कलेचा विकास झाल्याचें आढळून येतें. त्यांच्या कलेचीं स्मारकें म्हणून

आजहि ताजमहाल, जुम्मामशीद वगैरे कृति भारतांत विद्यमान आहेत.

माणूस जें जें निर्माण करतो त्या निर्मितींत कुठली तरी मनोभावना व्यक्त करणें म्हणजेच कला. त्या निर्मितींत ही भावना जर नसेल तर रंगवैचित्र्य वा अन्य गोष्टी व्यवस्थित असूनहि त्या कृतीला कला मानतां येणार नाही. भांडींकुंडीं, प्याले असल्या नित्यव्यवहारोपयोगी वस्तूदेखील असला कांहीतरी भाव व्यक्त करणाऱ्या असाव्यात. पॅरिस येथील प्रदर्शनांत दगडावर कोरलेली एक अद्‌भुत मूर्ति मीं पाहिली. मूर्तीचा परिचय देणारें 'Art Unveiling Nature' असें एक वाक्य खाली लिहिलेलें होतें. अर्थ हा की कला स्वहस्तें याप्रकारें निसर्गावरील आवरण दूर करून आंतरिक सौंदर्य व्यक्त करते. मूर्ति अशी की अद्यापहि प्रकृतिदेवीच्या रूपच्छटा व्यक्त झालेल्या नाहीत; पण ज्या छटा अभिव्यक्त झाल्या होत्या त्या पाहूनच जणु कलावन्त मुग्ध होऊन गेला आहे. ज्या कलावन्ताने ही कल्पना अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न केला त्याची तारीफ केल्याखेरीज राहवत नाही. अशा प्रकारचा मौलिक भाव व्यक्त करण्याचा प्रयत्न व्हावयास हवा.

रणदाबाबू-- माझ्याहि मनांत अनेकदा असें येतें की आपणहि मौलिक भाव दर्शविणाऱ्या मूर्ति तयार कराव्या. पण देशांत असल्या गोष्टींना प्रोत्साहन मिळत नाही. पैसा नाही आणि गुणग्राहक लोक तरी कुठे आहेत ?

स्वामीजी-- आपण जर मन-प्राण ओतून एखादीच अस्सल मूर्ति घडवूं शकाल, कलेद्वारा एखादाच का होईना यथातथ्य भाव व्यक्त करूं शकाल तर खात्रीने कालांतराने त्याचें गुणग्रहण होऊन चीज होईल. अस्सल वस्तूंचा जगांत कधीहि अनादर होत नाही. मरून हजार वर्षें लोटल्यानंतर कुठे कुणाकुणा

कलावन्ताच्या कलेचा रसिकांनी गौरव केला असेंहि आपण ऐकतोंच ना ?

रणदाबाबू— तें ठीक. पण आज आमची जी अगदी शोचनीय दुरवस्था झाली आहे तीमुळे घरचें खाऊन लष्करच्या भाकरी भाजण्याची हिंमत होत नाही. या पांच वर्षांत आता कुठे मला थोडे हातपाय हालवतां येऊ लागले आहेत. माझी तपस्या फुकट जाणार नाही असा मला आशीर्वाद द्या.

स्वामीजी-- आपण प्राणपणाने जर काम कराल तर खात्रीने यशस्वी व्हाल. जो जें काम अगदी तनमनधनप्राण अर्पण करून एकाग्रतेने करतो त्यांत तर तो यशस्वी होतोच पण अशा तन्मयतेने त्याला ब्रह्मलाभदेखील होऊं शकतो. बाब कोणतीहि का असेना, प्राणपणाने एकाग्र होऊन काम केल्यास ईश्वरहि अशा वेळीं साहाय्यभूत होतो.

रणदाबाबू— या देशांतील व पाश्चात्य देशांतील कलेंत आपल्याला काय फरक आढळून आला ?

स्वामीजी--बहुतेक गोष्टी तर सर्वत्र सारख्याच आहेत. मौलिकता प्रायः कुठे आढळून येत नाही. त्या देशांतून आजकाल तर कॅमेऱ्याच्या साह्याने फोटो घेऊनच चित्रें तयार करण्याची प्रथा पडलेली दिसते, पण यंत्राचें साह्य घेतांच मौलिकतेचा लोप होतो, आपल्या कल्पना यथार्थपणें चित्रित करतां येत नाहीत. पुराकालीन कलाकार आपल्या कल्पकतेंतून नाना भाव निर्माण करीत व तेच चित्रांत परिणत करण्याचा त्यांचा प्रयत्न असे. आता फोटोप्रमाणेच चित्रें चितारण्याच्या पद्धतीमुळे कल्पकतेचा व विकास करण्याच्या प्रयत्नांचा लोपच झालेला दिसतो. पण प्रत्येक जातीचें कांही तरी वैशिष्टय असतें. आचारव्यवहारांत, आहारविहारांत, कलाशिल्पादिकांत त्या त्या

वैशिष्टयाचा विकास आढळून येतो. संगीत-वाद्य-नृत्य ह्यांचेंच उदाहरण घेतल्यास पाश्चात्त्य देशांत या साऱ्यांच्या बाह्य आविष्कारांत एक प्रकारचा अणकुचीदारपणा-तीव्रपणा-आढळून येतो. त्यांचें नृत्य पाहतांना वाटतें, जणु ते हातपाय आपटून राहिले आहेत, त्यांच्या वाद्यवादनामुळे जणु संगिनीचीं टोंकें कानांत खुपसलीं जात असल्याचा भास होतो. त्यांच्या संगीताबाबतहि हीच गोष्ट आढळूत येते. याउलट आपल्या देशांतील नृत्य जणु हालत्याडोलत्या लाटांच्या लोळण्यासारखें वाटतें. संगीतांतील गमक-मूर्च्छना देखील चक्राकार अनुवर्तनांनी गतिमान झालेल्या आढळतात. वाद्यांतहि हीच गोष्ट आढळते. म्हणून कलेमध्ये देखील विभिन्न जातींचीं विभिन्न वैशिष्टयें व्यक्त झालेलीं दिसतात. जडवादी व ऐहिक हेंच सारसर्वस्व मानणारे लोक नैसर्गिक नामरूपसादृश्यालाच परमोच्च आदर्श मानून तदनुरूप भावांचाच विकास आपल्या कलेंत करण्याचा प्रयत्न करतात; याउलट जे लोक प्रकृतीच्या अतीत असलेल्या एखाद्या भावप्राप्तीलाच आपल्या जीवनाचें परमोद्दिष्ट मानतात ते तोच भाव प्रकृतिगत शक्तींच्या मदतीने कलेंत ओतण्याचा प्रयत्न करीत असतात. पहिल्याने सांगितलेल्या लोकांच्या बाबतींत नैसर्गिक, सांसारिक भावांचें व वस्तूंचें यथातथ्य चित्रण करणें हाच असतो कलेचा मूळ पाया, पण द्वितीय वर्गांतील लोकांच्या बाबतींत मात्र निसर्गातीत कोणत्यातरी आदर्शभूत भावांनाच अभिव्यक्त करणें ही असते कलेच्या विकासाची पायाभूत कल्पना. अशा रीतीने दोघेहि दोन विभिन्न उद्देश घेऊन जरी कलानिर्मितीला लागले असले तरी दोघेहि आपापल्या मार्गाने पुढे गेले आहेत, दोघांनीहि आपापल्या ध्येयानुसार कलेंत उन्नति करून घेतली आहे. त्या देशांतील एकेक चित्र पाहून तें खरो-

खरीच प्राकृतिक दृश्य आहे असा भ्रम होईल तुम्हांला. या देशांतील कलेचेंहि तसेंच. पुरातनकालीं जेव्हा शिल्पकलेचा खूप विकास झाला होता तेव्हाची एखादी मूर्ति पाहिल्यास तुम्ही या प्राकृतिक जड जगाला विसरून जाल, ती मूर्ति तुम्हांला एखाद्या नवीन भावराज्यांत घेऊन जाईल. त्यांच्याकडे जशीं आजकाल पूर्वीप्रमाणे चित्रें निर्माण होत नाहीत त्याचप्रमाणे आपल्याकडील कलावन्तहि कलेच्या प्रांतांत नवनवीन भावनिर्मितीचा आजकाल प्रयत्न करीत नाहीत. हेंच पाहाना की आपल्या आर्टस् स्कूलमधील चित्रांत भाव जणु कुठलेच आढळून येत नाहीत. पुराकालीन भावोद्दीपक सूचकता हिंदूंच्या नित्य ध्यानमूर्तींत ओतण्याचा तुम्हीं जर प्रयत्न केलांत तर बरें होईल.

रणदाबाबू--आपल्या ह्या गोष्टी ऐकून मला खूप धीर आला आहे. आपण म्हणतां त्याप्रमाणे काम करून पाहण्याचा मी प्रयत्न करीन.

स्वामीजी--कालीमातेच्याच चित्राचें उदाहरण घ्या. त्यांत एकदमच भयंकर उग्र व मंगलमय अशा दोन्ही भावांचा समावेश झालेला आहे. पण मिळणाऱ्या कुठल्याच चित्रांत या दोन्ही भावांचा आविष्कार यथायोग्यपणें झाल्याचें आढळत नाही. हें तर दूरच राहो, पण या दोहोपैकी एक एक घेऊन तो देखील यथार्थपणें चित्रित करण्याचा कुणीं प्रयत्न केलेला दिसत नाही. कालीमातेच्या रौद्र मूर्तीची कांही कल्पना Kali the Mother (कालीमाता) या माझ्या इंग्रजी कवितेंत देण्याचा मीं प्रयत्न केला आहे. आपण तो भाव आपल्या एखाद्या चित्रांत चित्रित करूं शकाल का ?

रणदाबाबू--कृपा करून आपण म्हणतां तो भाव मला समजावून सांगा ना ?

स्वामीजींनी शिष्याला ती आपली कविता वरून आणावयास सांगितली. कविता आणल्यावर स्वामीजींनी ती रणदाबाबूंना वाचून दाखविली. स्वामीजी ती कविता वाचीत असतां जणु त्यांच्या कल्पनाचक्षूंपुढे महाप्रलयकालीन कालीची संहारमूर्ति नृत्य करून राहिली असावी असें शिष्याला वाटलें. रणदाबाबूहि कविता ऐकून कांही वेळ चुप बसले. आपल्या कल्पनाचक्षूंनी तें चित्र पाहून भयभीत झाल्याप्रमाणे सचकित नयनांनी ते नंतर स्वामीजींकडे पाहूं लागले.

स्वामीजी-- काय, आपण ही कल्पना चित्रित करूं शकाल ?

रणदाबाबू-- होय महाराज, प्रयत्न करून पाहीन. पण या भावाच्या नुस्त्या कल्पनेनेच डोकें गरगरूं लागतें !

स्वामीजी-- चित्र काढून झाल्यावर तें मला दाखवा, म्हणजे तें सर्वांगपूर्ण करण्यासाठी जें कांही आवश्यक असेल तें मी आपणांस सांगीन.

नंतर स्वामीजींनी रामकृष्ण मिशनच्या शिक्क्यासाठी कमल-दलविकसित तलावामध्ये हंसविशोभित व सर्पपरिवेष्टित असें जें चित्र तयार करविलें होतें तें रणदाबाबूंना दाखवून त्यासंबंधी त्यांचें मत विचारलें. त्या चित्राचें मर्म सुरवातीला रणदाबाबूंच्या लक्षांत आलें नाही, म्हणून त्याचा अर्थ त्यांनी स्वामीजींना विचारला. तेव्हा चित्रांतील तरंगमय सलिलराशि कर्मसूचक, कमल भक्तिद्योतक व सूर्य ज्ञानव्यंजक होय असें त्यांनी सांगितलें. चित्रपरिवेष्टित सर्प योग आणि कुंडलिनी शक्तीचा निदर्शक होता. चित्रांतील हंसाचा अर्थ होता परमात्मा. म्हणजे कर्म, भक्ति व ज्ञान यांचें योगाशीं मीलन झाल्यावरच परमात्मदर्शनलाभ होतो असा या चित्राचा अर्थ होता.

चित्राचें तें विवरण ऐकून रणदाबाबू अगदी थक्क झाले.

कांही वेळाने ते म्हणाले, "आपल्या जवळ जर मीं कलेचे धडे घेतले असते तर माझी खरोखरच कांही उन्नति झाली असती." नंतर स्वामीजींनी पुढे तयार होणाऱ्या रामकृष्णमंदिराचा व मठाचा आपल्या कल्पनेनुसार काढलेला नकाशा आणवून तो रणदाबाबूंना दाखविला. तो नकाशा स्वामीजींच्या सूचनांनुसार स्वामी विज्ञानानंदांनी तयार केला होता. नकाशा रणदाबाबूंना दाखवितांना ते म्हणाले, "भावी मठ व मंदिर निर्माण करण्यांत पौर्वात्य आणि पाश्चिमात्त्य कलेंत जें जें म्हणून उत्कृष्ट आहे त्यांचा समावेश करण्याचा माझा मनोदय आहे. सारी पृथ्वी पालथी घालून वास्तु-शिल्पशास्त्रादिकांच्या कल्पना मीं संकलित करून आणल्या आहेत. त्या साऱ्या हें मंदिर निर्माण करण्यांत परिणत करण्याचा मी प्रयत्न करीन. खोदकामाने विशोभित असणाऱ्या अनेक खांबांवर एक प्रार्थनामंदिर बांधण्यांत येईल. त्याच्या भिंतींवर शेकडो प्रस्फुटित कमलें चित्रित करण्यांत येतील. तें प्रार्थनामंदिर एवढें मोठें असेल की त्यांत एकत्र बसून हजार लोक जप-ध्यान करूं शकतील. हें रामकृष्णमंदिर व प्रार्थनागृह अशा रीतीने एकत्र सांधण्यांत येईल की दूरून पाहिलें असतां ठीक ॐकाराची आकृति दिसेल. मंदिरांत एका राजहंसावर ठाकुरांची मूर्ति राहील. एक सिंह व एक बकरा प्रेमाने एकमेकांचें अंग चाटताहेत असें चित्र दोन्ही दारांच्या बाजूने राहील. चित्रांचा हेतु हाच की महाशक्ति व महानम्रता दोन्ही येथे एकत्र निवास करताहेत. मनांत तर अशा नाना कल्पनांची गर्दी आहे, जगलोंवांचलों तर त्या साऱ्या प्रत्यक्षांत उतरविण्याचा मी प्रयत्न करीन. नाही तर भावी पिढीला शक्य झाल्यास तिने या गोष्टी प्रत्यक्षांत उतरविण्याचा प्रयत्न करावा. या देशाच्या साऱ्या विद्या-कला व भाव-भावनांतून प्राण संचारित करण्या-

साठीच ठाकुर आले होते असें मला वाटतें. म्हणूनच हा मठ धर्म, कर्म, विद्या, ज्ञान, भक्ति या साऱ्यांचें केन्द्र होऊन येथून या गोष्टी सर्व जगांत प्रसृत होतील अशा तऱ्हेने घडवावयास हवा. आपण सारे या कामीं मला मदत करा.

रणदाबाबू व उपस्थित असलेले सारे ब्रह्मचारी, संन्यासी स्वामीजींचें बोलणें ऐकून अगदी स्तब्ध झाले. ज्यांचें महदुदार मन समस्त विषयांच्या सर्व भावसमूहांची एक अपूर्व क्रीडाभूमि होतें त्या स्वामीजींविषयीच्या आदरभावनेने ते सारे जणु एका अव्यक्त भावाने परिपूर्ण होऊन स्तंभित झाले. थोडचा वेळाने स्वामीजी पुन्हा रणदाबाबूंना म्हणाले, "आपण या कलाविषयांबाबत चांगले जाणकार आहांत म्हणूनच येवढचा सविस्तरपणें या गोष्टी मीं आपल्यापुढे मांडल्या. आजपर्यंत कलाविषयक जो कांही अभ्यास आपण केला असेल त्याचें थोडक्यांत सार आता आपण आम्हांला सांगा."

रणदाबाबू--- याबाबत मी आपल्याला नवीन काय सांगूं शकणार? आपणच आज या विषयाबाबत मला नवी दृष्टि दिलीत. कलेसंबंधी इतक्या ज्ञानपूर्ण गोष्टी माझ्या उभ्या जीवनांत मीं आजवर ऐकल्या नव्हत्या. आपणाकडून आज या ज्या नव्या गोष्टी ऐकल्या त्या साऱ्या मला जीवनांत उतरवितां येतील येवढाच आशीर्वाद आपण मला द्या.

नंतर तेथून उठून स्वामीजी मैदानांत पाय मोकळे करण्यासाठी फिरत असतां शिष्याला म्हणाले, "हा मुलगा आहे मात्र खूप तेजस्वी."

शिष्य--आपलें बोलणें ऐकून तो तर थक्कच झाला.

शिष्याच्या या विधानावर कांही एक न बोलतां स्वामीजी आपल्याशींच 'परमधन से परशमणि' (अंतर्मुख मन हा परिस होय) हें ठाकुरांचें आवडतें गाणें गुणगुणूं लागले.

अशा रीतीने कांही वेळ फिरणें झाल्यावर हातपाय धुऊन स्वामीजी शिष्यासह आपल्या खोलींत परतले व एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकामधील कलेसंबंधीच्या लिखाणाचा भाग कांही वेळ त्यांनी चाळला. वाचन संपल्यावर पूर्व बंगालमधील लोकांच्या बोलण्याच्या पद्धतीची थोडा वेळ नक्कल करून ते शिष्याची विनोदपूर्वक थट्टा करूं लागले.

---

# अध्याय ३४ वा

**स्थळ-- बेलूर मठ**

**वर्ष— इ. स. १९०१**

**विषय**-- श्रीरामकृष्णांच्या शक्तींचा स्वामीजींत संचार— पूर्वबंगालसंबंधी बोलणीं— नागमहाशयांच्या घरीं स्वामीजींना पाहुणचार— आचार व निष्ठा यांचें प्रयोजन— कामकांचनासक्तीचा त्याग केल्याने आत्मदर्शन.

कांही दिवस झालेत स्वामीजी पूर्वबंगाल व आसामकडील आपला दौरा संपवून परत आले आहेत. त्यांची प्रकृति खराब होती, पाय सुजले होते. मठांत येतांच वर जाऊन शिष्याने स्वामीजींना नमस्कार केला. स्वामीजींची प्रकृति खराब असली तरी त्यांचें सहास्यवदन व स्नेहपूर्ण प्रेमळ दृष्टि पाहून सारे लोक आत्मविस्मृत होऊन आपलें दुःख विसरीत.

शिष्य— आपली प्रकृति कशी काय आहे महाराज ?

स्वामीजी— आता बाबा प्रकृतीचें काय बरेंवाईट विचारतोस ? शरीर तर दिवसानुदिवस खंगत चाललें आहे. बंगाल प्रांतीं शरीर धारण केलें आहे, मग रोगांना काय कमी ? या भागांत शरीरसुदृढता कशी ती नाहीच. थोडें जरी काम अधिक पडलें तरी तें शरीराला सोसत नाही. तरीहि जोंवर हें शरीर टिकून आहे तोंवर मी तुमच्यासाठी कष्टतच राहीन. असें करीत असतांनाच एक दिवस देहत्याग करीन.

शिष्य-- आपण आता कांही दिवस हें सारें कामकाज बंद करून स्वस्थ विश्रान्ति घ्या. त्यामुळे आपली प्रकृति निश्चित सुधारेल. आपलें हें शरीर सुरक्षित राहण्याने जगाचें कल्याणच साधणार आहे.

स्वामीजी-- बाबा, बसून राहणें हें काय माझ्या हातीं आहे ? ठाकुर 'काली, काली' म्हणून जिला साद घालीत ती त्यांच्या देहावसानापूर्वी दोनतीन दिवस आधी या माझ्या शरीरांत प्रविष्ट झाली. तीच मला इकडेतिकडे हिंडवीत असते. स्वस्थ म्हणून कांही एक क्षण बसूं देत नाही. मला माझ्या सुखदुःखांकडे नजरसुद्धा टाकूं देत नाही.

शिष्य-- शक्तिप्रवेशाची ही गोष्ट आपण काय एखादें रूपक म्हणून सांगतां आहांत ?

स्वामीजी— नाही रे, देहत्यागापूर्वी तीनचार दिवस आधी ठाकुरांनी मला एकट्याला एकान्तांत बोलाविलें. मला समोर बसवून घेऊन त्यांनी अगदी एकटक माझ्याकडे बराच वेळ पाहिलें व नंतर ते समाधिमग्न झाले. त्या वेळीं मला अगदी स्पष्ट जाणवत होतें की त्यांच्या शरीरांतून निघालेलें एकप्रकारचें सूक्ष्म तेज विद्युत्‌प्रवाहाप्रमाणे माझ्या शरीरांत प्रविष्ट होत आहे. हळहळू माझीहि बाह्य संज्ञा लोपली व मी अगदी निश्चल झालों. तसा मी किती वेळ होतों हें कांही मला आता आठवत नाही, पण जेव्हा माझी बाह्यसंज्ञा परत आली तेव्हा ठाकुर रडत असल्याचें मला आढळून आलें. त्यांना रडण्याचें कारण विचारतांच ते म्हणाले, "आज माझ्यापासचें सारें, सारेंकांही तुला देऊन टाकून मी खरोखरच फकीर झालों आहें. या तुला दिलेल्या शक्तीद्वारा जगत्कल्याणाचीं बरींच कामें केल्यानंतरच तूंहि मग परत फिरशील." मला तर वाटतें की ती शक्तिच मला नाना कर्मकर्मान्तरांतून घुमवून राहिली आहे. आरामांत स्वस्थ विश्रान्ति घेत बसून राहण्यासाठी कांही हा माझा देह झालेला नाही.

विस्मयचकित होऊन शिष्य तें बोलणें ऐकत असतां म्हणाला, "सर्वसामान्य लोक ह्या साऱ्या गोष्टी कोणत्या अर्थाने घेतील

कुणास ठाऊक !" नंतर दुसऱ्याच गोष्टी काढून तो म्हणाला, "महाराज, आमचा पूर्वबंगाल कसा काय वाटला आपल्याला ?"

स्वामीजी-- तो भाग तसा कांही वाईट नाही. शेतें पिकांनी भरलीं होतीं. तेथलें हवापाणीहि कांही वाईट नाही. पहाडांलगतची शोभा तर खूपच मनोरम होती. ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्याचें सौंदर्य तर अगदी अतुलनीयच आहे. आमच्या इकडल्या लोकांपेक्षा तुमच्याकडचे लोक शरीराने दणकट आणि कामाला तरी किती विलक्षण तत्पर आहेत ! अन् ते जें काम करतात तेंहि करतात खूप मन लावून अन् चिकाटीने. खाण्याच्या पदार्थांतून तेल खूप वापरतात, तें मात्र कांही बरें नाही. तेल, चर्बी अधिक खाण्याने मेद खूप वाढतो शरीरांत.

शिष्य-- आमच्याकडील लोकांत धर्मभाव कसा काय आढळून आला ?

स्वामीजी-- धर्मभावनेबाबत ते लोक आहेत खूप सनातनी वृत्तीचे. उदार धर्मभाव आचरतों म्हणतां म्हणतां अनेक पुन्हा एककल्ली आणि हेकट झालेसें वाटतात. ढाक्याला मोहिनीबाबूंकडे असतां एका मुलाने कुणाचासा एक फोटो माझ्याकडे आणला दाखवायला आणि विचारलें, 'ओळखा बरें महाराज हा कुणाचा फोटो तें ? अवताराचा आहे की नाही ?' मीं त्याला खूप सांगितलें की 'बाबा, हें मला काय माहीत असणार ?' तीनचारदा सांगूनहि तो पोरगा कांही आपला हट्ट सोडायला राजी होईना. तेव्हा अखेर नाइलाजाने त्याला सांगावें लागलें, 'बाबा, जरा घरीं जाऊन चांगलें चोखट अन् पुष्टिकर अन्न खा. पोषक अन्नाच्या अभावीं तुझा मेंदू साफ सुकून गेला आहे.' माझें म्हणणें ऐकून तो मुलगा खासच नाराज झाला असावा. पण त्याला काय उपाय ? मुलांना जर असें सांगितलें नाही तर त्यांचीं डोकीं फिरून जातील !

शिष्य-- आमच्या पूर्वबंगालमध्ये आजकाल अवतारांचें तर अगदी अमाप पीक झालें आहे !

स्वामीजी-- गुरूला लोक अवतार मानूं शकतात, येवढेचसें काय पण त्याच्याबद्दल ते वाटेल ती धारणा ठेवूं शकतात. पण भगवन्ताचा अवतार कांही उठल्यासुटल्या ज्या त्या ठिकाणीं होत नसतो. मीं तर ऐकलें की एका ढाक्यांतच एकदम चार अवतार आहेत म्हणून !

शिष्य-- आमच्याकडील स्त्रीसमाजाबद्दल काय कल्पना झाली आपली ?

स्वामीजी-- स्त्रिया चोहीकडे असतात बहुधा सारख्याच. ढाक्यांत वैष्णवभावाचें प्राबल्य मला आढळून आलें. ह--ची बायको खूप बुद्धिमान वाटली. ती खूप काळजीपूर्वक सैपाक करून खाण्याच्या वस्तु पाठवून देत असे.

शिष्य-- मीं ऐकलें की आपण नागमहाशयांच्याहि घरीं गेला होतां म्हणून ?

स्वामीजी-- हो. येवढा थोर पुरुष, इतकें त्यांच्या घराजवळ जाऊन त्यांचें जन्मस्थान पाहणार नाही ? त्यांच्या पत्नीने केवढ्या कळकळीने स्वयंपाक करून आम्हांला जेवूं घातलें ! घरहि त्यांचें काय मनोरम आहे. वाटलें जणु शान्तीचें आश्रय-स्थानच ! तेथे एका तलावांत आम्ही पोहायला उतरलों. नंतर येऊन असा गाढ झोपलों की २॥ वाजून गेल्यावरच उठलों. माझ्या साऱ्या जीवनांत मला चांगली गाढ झोप लागल्याचे जे कांही चारदोन प्रसंग आहेत त्यांपैकी नागमहाशयांच्या घरच्या झोपेचा हा एक अनुभव मानावा लागेल. उठल्यानंतर खूप जेवण झालें. नागमहाशयांच्या पत्नीने मला एक वस्त्र दिलें. मीं तें फेटयासारखें मस्तकीं धारण केलें --नंतर आम्ही ढाक्याला गेलों.

नागमहाशयांच्या फोटोची तेथे पूजा होते असें मला कळलें. त्यांचें समाधिस्थान मोठ्या काळजीपूर्वक जतन करून सुव्यवस्थित ठेवावयास हवें. तें जसें राखलें जावें तसें अद्यापिहि राखलें जात नाही.

शिष्य-- आमच्याकडील लोकांना नागमहाशयांची कांही तितकीशी ओळख पटली नाही.

स्वामीजी— सामान्य लोक तसल्या महापुरुषांना काय ओळखूं शकणार? ज्यांना त्यांच्या सत्संगाचा लाभ झाला त्यांनाच पटली तर पटायची त्यांची ओळख--तेच धन्य होत.

शिष्य— कामाख्यामंदिर कसें काय वाटलें आपल्याला?

स्वामीजी-- शिलाँग पहाड अत्यंत सुंदर आहे. तेथील चीफ् कमिशनर कॉटन साहेब यांच्याशीं माझा परिचय झाला होता. त्यांनी मला विचारलें, "स्वामीजी, युरोपअमेरिका वगैरे खंडांतून फिरून आल्यानंतर या इतक्या दूरच्या पर्वतमय प्रदेशांत काय पाहायला आलांत आपण?" कॉटनसाहेबांसारखीं सज्जन माणसें क्वचितच भेटतात. माझी प्रकृति बरी नाही हें ऐकतांच लगेच त्यांनी सरकारी डॉक्टर पाठवून दिला. दोन दोन वेळां दिवसांतून माझी विचारपूस करीत. त्या भागांत कांही व्याख्यानें वगैरे देतां आलीं नाहीत. प्रकृति अगदी खराब होऊन गेली होती. वाटेंत निताईने खूप सेवा-शुश्रूषा केली माझी.

शिष्य-- धर्मभाव कसा काय आढळला तिकडे?

स्वामीजी-- तो आहे तंत्रप्रधान देश. त्या भागांत अवतार म्हणून पूजिल्या जाणाऱ्या एका 'हंकर' देवाचें नांव मीं ऐकलें. त्याच्या नांवावर प्रचलित असणारा फार मोठा संप्रदाय आहे एक तिकडे. 'हंकर' हें शंकराचार्यांच्याच नांवाचें रूपान्तर आहे की नाही कांही कळलें नाही. ते लोक आहेत त्यागी, तांत्रिक

संन्यासी. किंवा शंकराचार्यांच्याच संप्रदायाची एखादी शाखा असावी ती.

शिष्य-- आमच्या भागांतील लोकांना नागमहाशयांप्रमाणेच आपलीहि ओळख पटली नाही असें मला वाटतें.

स्वामीजी-- त्यांना माझी ओळख पटो वा न पटो; या भागांतील लोकांपेक्षा त्यांच्यांत रजोगुण अधिक आहे हें मात्र खरें. कालांतराने त्याचा अधिकाधिक विकास होईल. ज्या आचार-व्यवहारांना आज शिष्टाचार, सभ्यता, संस्कृति म्हणून संबोधितात त्यांचा या भागांत अद्याप प्रवेश झालेला नाही. हळूहळ तोहि होईल. राज्याच्या राजधानींतून साऱ्या प्रकारच्या राहणींचा, आचारव्यवहारांचा अवतीभवती प्रचार होत असतो. ज्या देशांत नागमहाशयांसारखे महापुरुष जन्मतात त्या देशाबद्दल चिंता करायचें कारणच काय मुळी? त्यांच्या जीवनप्रकाशानेच सारा पूर्वबंगाल देश उजळून निघाला आहे!

शिष्य— पण सामान्य लोकांना त्यांची कांहीच माहिती नाही. लोकांच्या नजरेआड, स्वतःला अगदी लपवून टाकूनच त्यांनी आपलें जीवन व्यतीत केलें.

स्वामीजी-- तुमच्याकडचे लोक माझ्या खाण्यापिण्याचा फार बाऊ करीत; सारखें त्यांचें चाललें असे की 'अमकें ते काय म्हणून खातील, अमक्यातमक्याच्या हातचें काय म्हणून चालेल त्यांना?' त्यामुळे मला वारंवार सांगावें लागे की मी म्हणजे संन्यासी माणूस. माझ्या खाण्यापिण्याचा येवढा आचारविचार कसला? तुमच्या शास्त्रांतच ना सांगितलें आहे 'चरेन्माधुकरीं वृत्तिम् अपि म्लेंच्छकुलादपि?' तरीहि बाह्य आचार हे सुरवातीला आंतरिक अनुभूतींसाठी आवश्यक असतातच. शास्त्रज्ञान आपल्या जीवनांत परिणत करण्यासाठी त्यांची आवश्यकता असतेच.

'पंचांगांत कितीहि पाऊस लिहिला असला तरी पंचांग पिळून मात्र पाण्याचा एक थेंबहि मिळत नाही' ही ठाकुर सांगत असत ती गोष्ट तर ठाऊक आहे ना? आचारविचार हे सारे माणसांतील आंतरिक शक्तींना उत्स्फूर्त करण्यासाठी उपाय म्हणून उपयोगी असतात फक्त. माणसांतील आंतरिक शक्ति जागृत करणें, त्याच्या यथार्थ स्वरूपाची ओळख त्याला पटवून देणें हाच असतो साऱ्या शास्त्रांचा हेतु. बाकी सारे उपाय असतात विधि-निषेधात्मक स्वरूपाचे. मुख्य हेतु बाजूस टाकून फक्त उपायांबद्दल झगडा करीत बसण्यांत काय अर्थ आहे? जेथे जेथे जातों तेथे तेथे या साधनोपायांवरूनच लठ्ठालट्ठी चालली असल्याचें आढळून येतें. मूळ मुद्याकडे लक्षच नाही कुणाचें. हें दाखवून देण्यासाठीच ठाकुरांचा अवतार होता. साऱ्याचें सार आहे 'अनुभूति.' हजारों वर्षें गंगास्नान कर, हजारों वर्षें मांस खाणें सोडून दे,-- पण या साऱ्यांमुळे जर आत्मविकासाला मदत होत नसेल तर व्यर्थ आहेत तुझे हे सारे प्रयत्न. याउलट जर कुणी हे सारे आचार सोडून देऊन आत्मदर्शनलाभ करून घेईल तर त्याचा तो अनाचार देखील सर्वश्रेष्ठ आचार मानावा लागेल. असें जरी असलें तरी आत्मदर्शनानंतरहि लोकसंग्रहासाठी कांही कांही आचार पाळणेंच इष्ट असतें. महत्त्वाची व मुद्याची गोष्ट म्हणजे मन एकाग्र होणें. एकाच विषयावर निष्ठा असल्यास मनाची एकाग्रता होते, मनांतील अन्य वृत्ति लोपून जाऊन तें एकाच विषयाशीं एकतानतेने तल्लीन होतें. पुष्कळजणांचा तर सारा वेळ बाह्य आचार वा विधिनिषेधांच्या जाळयांतच नष्ट होतो-- आत्मचिंतन करायला सवडच होत नाही त्यांना. रात्रंदिवस तुम्ही जर विधि-निषेधांच्या मर्यादाबंधनांतच राहणार असाल तर आत्माविष्कार होणारच कसा? ज्याला ज्या प्रमाणांत

आत्मानुभूति होते त्या प्रमाणांत त्याच्या बाबतींत विधिनिषेध आपोआप कमी होतात. आचार्य शंकरांनी तर म्हटलेंच आहे, " निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः।" म्हणून सर्वांत महत्त्वाची गोष्ट असते अनुभूति. तेंच आहे आपलें चरम लक्ष्य. भिन्न भिन्न मतें वा पंथ हे सारे मार्ग होत. कोणाची किती उन्नति झाली हें ठरविण्याची कसोटी आहे त्याग. कामकांचनासक्ति ज्यांत कमी आढळेल तो कोणत्याहि मताचा, कोणत्याहि पंथाचा असेना का, त्याची शक्ति जागृत झाली आहे असें निश्चित समज. आत्मानुभूतीचा त्याचा मार्ग खुला झाला. नाहीतर हजारो आचारांचें कर्मठपणें पालन कर, हजारो श्लोक पाठ म्हण--पण त्यागाची भावना जर अंगीं बाणली नसेल तर सारा जन्म वृथा गेला म्हणून समज. या आत्मानुभूतीसाठी मोठ्या तत्परतेने व चिकाटीने प्रयत्न कर. शास्त्रें वगैरे तर खूप झालींत तुझीं आता वाचून. सांग बरें प्रामाणिकपणें त्यांचा काय फायदा झाला आतापर्यंत ? पै-पैशाची चिंता कर-करून कुणी कुबेर होतो, शास्त्रें वाचून वाचून तूं पंडित झालास. दोन्ही एकच ! दोघेहि आहांत बंधनांतच. पराविद्येचा लाभ करून घेऊन विद्या-अविद्या दोहोंच्याहि पलीकडे जा.

शिष्य— आपल्या कृपेने आपण म्हणतां तें सारें कळतें पण कर्मगतीने प्रत्यक्ष कृतींत मात्र कांही वळत नाही.

स्वामीजी-- तुझ्या कर्माबिर्माच्या साऱ्या भाकडकथा दे फेकून दूर. तूंच ना आपल्या पूर्वकर्मांनी हा देह मिळविलास ? हें जर खरें तर मग कर्माने कर्माला छेद देऊन तूं पुन्हा कां नाही याच देहीं याच डोळा जीवन्मुक्त होणार ? लक्षांत ठेव, आत्मज्ञान, मुक्ति या साऱ्या गोष्टी तुझ्याच हातीं आहेत. ज्ञानांत कर्माचा लेशमात्रसुद्धा अंश नसतो. पण जीवन्मुक्त होऊनहि जे

कर्म करतात ते 'परहिताय'च कर्म आचरितात हें पक्कें समज. ते भल्याबुऱ्या फलांकडे नजरहि टाकीत नाहीत, कोणतेंहि वासनाबीज त्यांच्या मनोभूमींत मूळ धरीत नाही. गृहस्थाश्रमांत राहून अशा प्रकारें 'परहितार्थ' कर्म करणें वास्तविकपणें अशक्य आहे हें पक्कें समजून अस. संपूर्ण हिंदुशास्त्रांत एक राजा जनकाचेंच उदाहरण या बाबतींत आढळून येतें. तुम्ही मात्र दरवर्षी मुलांना जन्म देऊन घरोघरीं 'विदेही जनक' होण्याची इच्छा करतां! याउलट राजा जनकाला देहाचीहि शुद्ध नसे!

शिष्य— महाराज, याच देहीं आत्मानुभव लाभेल असा अनुग्रह करा माझ्यावर.

स्वामीजी-- तुला कसली रे भीति? मनाची एकाग्रता असल्यास, मी खात्रीने सांगतों, या जन्मींच तुला आत्मानुभव लाभेल. पण आटोकाट प्रयत्न करावे लागतात त्यासाठी. हे प्रयत्न कसे असावयास हवेत ठाऊक आहे? आत्मज्ञान लाभ करून घेईनच घेईन, मार्गांत कितीहि जरी संकटें आलीं तरी त्यांना जुमानणार नाहीं--अशा प्रकारचा दृढ प्रयत्न म्हणजेच खरा पुरुषार्थ. आई-बाप, भाऊ, बहिणी, पुत्र, मरतील मरोत, देह जावो अथवा राहो कांहीहि झालें तरी मला जोंवर आत्मज्ञान होत नाही तोंवर मी मागे फिरणार नाहीं, अशा दृढ प्रयत्नाने साऱ्या गोष्टींची उपेक्षा करून अगदी एकाग्र मनाने आपल्या इष्ट ध्येयाकडे जाण्यालाच म्हणतात पुरुषकार. नाहीतर नुसतें जगण्यासाठी तर पशुपक्षी देखील प्रयत्न करीतच असतात. माणसाला हा देह मिळाला आहे आत्मज्ञानासाठी. संसारांतील सामान्य लोक ज्या मार्गाने जातात त्याच मार्गाने तूंहि काय जाणार आहेस एखाद्या प्रवाहपतिताप्रमाणे? असें असल्यास तुझी मग काय बहादुरी? मार्गावर तर पाय ठेवलाच आहेस! अरे तूं मृत्यूवर

विजय मिळवायला आला आहेस ना ? महावीराप्रमाणे पुढे हो. इतर कशाकडेहि दृष्टि वळूं देऊं नकोस. अरे या शरीराची काय शाश्वती ? या सुखदु:खांचा भोग तरी किती दिवस ? माणूस म्हणूनच जन्माला आला आहेस तेव्हा अंतरींच्या आत्म्याला जागव--म्हण, मला अभयपद लाभलें आहे; म्हण, मी तोच आत्मा की ज्यांत माझा क्षुद्र अहंकार लोपून गेला आहे. सिद्ध होऊन जा अशा प्रकारें. नंतर मग जितके दिवस देहधारणा करावी लागेल तितके दिवस साऱ्यांना ही महावीर्यप्रद निर्भय-वाणी ऐकव--'तत्त्वमसि' 'उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्नि-बोधत।' हें दाखव करून तेव्हाच म्हणेन की तूं खरा, चिकाटीचा पूर्वबंगाली आहेस म्हणून.

---

## अध्याय ३५ वा

**स्थळ— बेलूर मठ.**

**वर्ष— इ. स. १९०१**

विषय— स्वामीजींचा मनोनिग्रह-- स्त्रियांसाठी मठ स्थापण्यासंबंधी शिष्याशीं बोलणें-- एकच चित्‌सत्ता स्त्री-पुरुषांत समभावें विद्यमान-- प्राचीनकालीं स्त्रीला शास्त्रांत कितपत अधिकार होता— स्त्रीच्या यथोचित गौरवाखेरीज कोणत्याहि देशाची उन्नति होणें शक्य नाही— तंत्रोक्त वामाचाराचा दूषित भावच फक्त त्याज्य; एरव्ही त्यांतील स्त्रीजातीचा सन्मान व पूजाभाग ग्राह्य व अनुष्ठेय-- भावी स्त्री-मठाची नियमावली-- या मठांतील शिक्षित ब्रह्मचारिणींद्वारा समाजाचें कसें अपूर्व कल्याण साधेल — परब्रह्माच्या ठिकाणीं स्त्री-पुरुष भेद नाही-- हा भेद आढळतो फक्त 'मी-तूं'च्या राज्यांत-- म्हणूनच स्त्रिया ब्रह्मज्ञ होणें अशक्य नाही-- प्रचलित स्त्री-शिक्षणांत अनेक दोष जरी असले तरी तें संपूर्ण टाकाऊ नाही-- शिक्षणाचा पाया म्हणून धर्म योजावयास हवा-- मानवाच्या आंतरिक ब्रह्मविकासाला साहाय्यक कार्यच सत्कार्य-- वेदान्त-प्रतिपादित ब्रह्मज्ञानांत कर्माचा संपूर्ण अभाव असला तरी तें मिळविण्यासाठी कर्माचा उपयोग गौरवास्पद, कारण कर्मामुळेच चित्तशुद्धि शक्य होते व चित्तशुद्धि झाल्याखेरीज ज्ञान अशक्य.

आज शनिवार. शिष्य दुपारींच मठांत आला आहे. स्वामीजींची प्रकृति ठीक नाही. तब्येत बिघडल्यामुळे शिलाँगच्या पर्वतराजींतून परत येऊन कांही दिवस झाले आहेत. त्यांच्या पायांवर सूज आली आहे. स्वामीजींचे सारेच गुरुबंधु अत्यंत सचिंत. बऊबाजारांतील श्रीयुत महानंद कविराजांचें औषध स्वामीजींना चालू आहे. स्वामी निरंजनानंदांच्या आग्रहावरून वैद्याचें औषध घ्यावयास स्वामीजींनी मान्यता दिली आहे. येत्या मंगळवारपासून

मीठ व पाणी अजिबात वर्ज्य करून नियमित औषध घेण्याचें पक्कें झालें आहे. आजचा रविवार.

शिष्य-- महाराज, आधीच तर उन्हाळा हा असा. त्यांत आपल्याला तासांतून चारदा पाणी लागतें. अशा स्थितींत पाणी अजिबात वर्ज्य करून औषध घेणें आपल्याला अगदी असह्य होईल.

स्वामीजी— तूं हें म्हणतो आहेस तरी काय ? औषध सुरू करण्याच्या दिवशीं सकाळीं मी दृढ निश्चय करीन की आता पाणी घ्यावयाचें नाही. त्यानंतर काय मजाल आहे की माझ्या घशाखाली पाण्याचा एक थेंबहि उतरेल ! एकवीस दिवसपर्यंत पाण्याचा एक थेंब देखील तोंडांत जाणार नाही. शरीर कितीहि झालें तरी मनाची एक खोळच ना ? मन जें ठरवील तें त्याला ऐकणें भागच आहे. मग कशाला फिकीर करायची ? निरंजनच्या आग्रहाखातर मला हें करावयासच हवें. त्यांचा (साऱ्या गुरुबंधूंचा) आग्रह तर टाळतां येणें शक्यच नाही ना ?

आता दहा वाजायला आले आहेत. स्वामीजी वरच बसले आहेत. स्त्रियांसाठी पुढे जो मठ व्हावयाचा आहे त्याबाबत मोठ्या उत्साहाने ते शिष्याशीं बोलत आहेत.

स्वामीजी— माताजींना (श्रीरामकृष्णांची लीलासहधर्मिणी) केन्द्र करून गंगातटाकीं पूर्वेला स्त्रियांसाठी एक मठ व्हायला हवा. या सध्याच्या मठांत ज्याप्रमाणे ब्रह्मचारी साधु तयार होतील त्याचप्रमाणे त्याहि मठांत ब्रह्मचारिणी, साध्वी स्त्रिया तयार होतील.

शिष्य— फार प्राचीन काळीं देखील भारतांत स्त्रियांसाठी मठ होते असा दाखला इतिहासांत मिळत नाही. बौद्ध कालांतच स्त्रियांसाठी मठ होते असें आढळतें. पण त्यामुळे कालान्तराने नाना व्यभिचार उत्पन्न झाले व सारा देश वामाचारांनी व्यापून टाकला.

स्वामीजी—स्त्री-पुरुषांत या देशांत येवढा भेद कां करतात कांही कळत नाही. वेदान्तशास्त्र तर सांगतें की एकच चित्सत्ता सर्वाभूतीं विराजमान आहे. स्त्रियांची तुम्ही नुसती निंदा करतां पण त्यांच्या उन्नतीसाठी तुम्हीं काय केलें आहे सांगा पाहूं ? स्मृति वगैरे लिहून नीतिनियमांनी अगदी जखडून टाकून पुरुषांनी त्यांना केवळ प्रजोत्पादक यंत्र करून ठेवलें आहे ! महामायेच्या साक्षात् प्रतिमा असणाऱ्या स्त्रियांची उन्नति केल्याखेरीज का कांही उपाय आहे ?

शिष्य— महाराज, स्त्रिया म्हणजे साक्षात् मायेच्या मूर्ति ! माणसाच्या अध:पातासाठीच जणु त्यांचा जन्म. स्त्रियाच मोह-मायेने पुरुषांचें ज्ञानवैराग्यादि आच्छादून टाकतात. म्हणूनच की काय शास्त्रें सांगतात की त्यांना ज्ञान-भक्ति वगैरेंचा कधीहि लाभ होणार नाही.

स्वामीजी— कुठल्या शास्त्रांत सांगितलें आहे की स्त्रिया भक्तिज्ञानादिकांच्या अधिकारी नाहीत म्हणून ? भारतीय अध:-पतनकालांत ब्राह्मणेतरांबरोबरच स्त्रियांचाहि वेदपठनाचा अधि-कार भटाभिक्षुकांनी काढून घेतला. वैदिक कालांत, उपनिषत् कालांत मैत्रेयी, गार्गी वगैरे प्रात:स्मरणीय स्त्रियांना ऋषितुल्य माहात्म्य प्राप्त झाल्याचें आढळून येतें हें खरें ना ? हजार वेदज्ञ ब्राह्मणांच्या भर सभेंत गार्गीने मोठ्या आत्मप्रत्ययपूर्वक याज्ञ-वल्क्याला ब्रह्मचर्चेसाठी आव्हान दिलें होतें. या साऱ्या आदर्श स्त्रियांना जर अध्यात्मज्ञानाचा अधिकार होता तर आताच स्त्रियांना तो अधिकार कां असूं नये ? एकदा जें होऊं शकलें तें पुन्हा होऊं शकेलच. History repeats itself. इतिहासाची पुनरावृत्ति होत असते. स्त्रियांना योग्य सन्मान देऊनच सारे देश उन्नत झाले आहेत. ज्या देशांत, ज्या जातींत स्त्रियांचा योग्य

सन्मान होत नाही तो देश, ती जात कधीहि उन्नतावस्थेस पोहोचूं शकत नाही, कधी पोहोचूंहि शकणार नाही. त्या साऱ्या शक्तिमूर्तींची अवमानना हेंच आहे तुमच्या अधःपाताचें मुख्य कारण. मनूने म्हटलें आहे, 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः। यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः।' जेथे स्त्रियांना आदराची वागणूक नाही; निरानंद, दुःखीकष्टी जीवन जेथील स्त्रिया जगतात त्या संसाराची, त्या देशाची उन्नति होण्याची कधीहि आशा नाही. यासाठीच मदतीचा हात देऊन त्यांना वर आणायला हवें. त्यांच्यासाठी एक मठ स्थापायला हवा.

शिष्य-- विलायतेहून परत आल्यावर सुरवातीला स्टार थिएटरमध्ये व्याख्यान देतांना आपण तंत्रांना शिव्यांची लाखोली वाहिली. आणि आता मात्र तंत्रसमर्थित स्त्री-पूजनाचा गौरव करून आपण आपलेंच म्हणणें बदलत आहांत.

स्वामीजी-- मीं निंदा केली ती वामाचारांतील आजच्या स्वरूपाची, तंत्रांतील मातृभावाची नव्हे. यथार्थ वामाचाराची देखील मीं निंदा केलेली नाही. साक्षात् भगवतीज्ञानाने स्त्रियांचें पूजन करणें हाच आहे तंत्रांचा अभिप्राय. बौद्धधर्माच्या अधःपतन-कालीं वामाचारांना अत्यंत विकृत स्वरूप आलें. तेंच विकृत स्वरूप आजच्याहि वामाचारांत आढळून येतें. आजहि तंत्रशास्त्रावर या विकृत भावाचाच प्रभाव दिसून येतो. याच बीभत्स क्रियांची मीं तेव्हा निंदा केली व आजहि करतों. जिच्या रूपरसात्मक बाह्य आविर्भावाला भुलून माणूस अगदी उन्मत्तप्राय होऊन अडकून पडतो पण जिच्या ज्ञान, भक्ति, विवेक, वैराग्यादि आंतरिक प्रकाशाने तो सर्वज्ञ, सिद्धसंकल्प, ब्रह्मज्ञ होतो त्या मातृरूपिणी, जगदंबा-स्वरूपिणी स्त्रीची पूजा वर्ज्य करायला मीं कधीच सांगितलें नाही. 'सैषा प्रसन्ना वरदा नृणां भवति मुक्तये'--या महामायेला पूजा-

वंदनादि द्वारा जोंवर प्रसन्न करून घेत नाहीत तोंवर काय मजाल आहे ब्रह्माविष्णुमहेशादिकांची की ते तिच्या हातून सुटून मुक्त होऊं शकतील. म्हणूनच या गृहलक्ष्मींची पूजा व्हावी आणि त्यांच्यांत ब्रह्मभाव विकसित व्हावा या हेतूने मी हा मठ स्थापन करीन.

शिष्य-- हा आपला संकल्प उत्तम असेल, पण मठासाठी स्त्रिया कोठून येणार ? समाजांतील आजचीं कठोर बंधनें शाबूत असतांना कोण आपल्या घरांतील कुलवधूंना स्त्री-मठांत राहावयास पाठवील ?

स्वामीजी-- कारे बाबा ? अद्यापहि तर ठाकुरांच्या कितीतरी स्त्री-भक्त आहेत. त्यांच्या करवीच स्त्री-मठाचा आरंभ करवीन. माताजी त्यांच्या केंद्रस्थानीं राहतील. ठाकुरांच्या भक्तांच्या स्त्रिया व मुली सुरवातीला या मठांत राहतील. त्यांना असल्या या स्त्री-मठाचें महत्त्व सहजच उमगेल. नंतर त्यांचें पाहूनच मग इतरहि कितीतरी गृहस्थ या महान् कार्याला हातभार लावतील.

शिष्य— ठाकुरांचे भक्त या कार्याला खात्रीने हातभार लावतील, पण इतर लोक मात्र या कार्याला मदत करतील असें वाटत नाही.

स्वामीजी-- जगांतील कुठलेंहि महत्कार्य त्यागाशिवाय साध्य होत नाही. वटवृक्षाचें बीज पाहून कुणाला कधीतरी वाटेल का की यांतून पुढे येवढा विस्तीर्ण वृक्ष निर्माण होईल म्हणून ? आता तर मी हा मठ नुसता स्थापन करीन. एकदोन पिढ्यांच्या कालावधींतच पाहशील की देशाला याचें महत्त्व पटतें आहे. या ज्या विदेशी स्त्रिया माझ्या शिष्या म्हणून आल्या आहेत त्या हेंच कार्य करतां करतां मृत्यूला कवटाळतील. भय, नेभळटपणा हीं सारीं सोडून देऊन तुम्ही या महत्कार्याला हातभार लावा.

हाच उच्च आदर्श साऱ्या लोकांसमोर ठेवा. तूं पुढे पाहशील की सारा देश त्याच्या प्रकाशांत उजळून निघेल.

शिष्य-- स्त्रियांसाठी अशा प्रकारचा जो मठ करणार आहांत त्यासंबंधी थोडें विस्ताराने सांगा ना मला? तें ऐकण्याची माझी खूप इच्छा आहे.

स्वामीजी— गंगेच्या त्या किनाऱ्यावर खूप मोठी जमीन घेतली जाईल. तेथे अविवाहित कुमारिका व विधवा ब्रह्मचारिणी म्हणून राहतील. भक्तिमती व सद्‌गुणी कुलवधू अधूनमधून तेथे वसतीला येतील. या मठाशीं पुरुषांचा कुठल्याहि प्रकारें संबंध राहणार नाही. पुरुष-मठांतील वयोवृद्ध साधु दुरूनच स्त्री-मठाचें कार्य चालवितील. स्त्री-मठांत मुलींसाठी एक शाळाहि राहील. त्या शाळेंत धर्मशास्त्र, साहित्य, संस्कृत, व्याकरण, येवढेंच नव्हे तर थोडेंफार इंग्रजीहि शिकविण्यांत येईल. शिवणकाम, पाकशास्त्र, गृहकृत्याचीं सारीं अंगोपांगें, शिशुसंगोपनाचे स्थूल नियम वगैरे गोष्टीहि तेथे शिकविल्या जातील; आणि जप, ध्यान, पूजा हीं तर सारीं शिक्षणाचींच अंगें राहतील. ज्या स्त्रिया घरादाराचा संपूर्ण त्याग करून येथे राहतील त्यांच्या अन्नवस्त्रादिकांचा सारा खर्च मठच चालवील. ज्यांना राहणें शक्य होणार नाही त्या विद्यार्थिनी म्हणून येणेंजाणें करतील व शिक्षण घेतील, येवढेंच नव्हे तर मठाध्यक्षांच्या परवानगीने त्या मधूनमधून हवे तितके दिवस तेथे राहूं शकतील व त्यांच्या खाण्यापिण्याचीहि सारी सोय मठांतच होईल. वयाने ज्येष्ठ ब्रह्मचारिणी मुलींना ब्रह्मचर्यजीवनाचें वळण लावण्यासाठी त्यांच्या शिक्षणाचा भार आपल्यावर घेतील. या मठांत ४–५ वर्षांचें शिक्षण झाल्यानंतर त्या मुलींचे पालक त्यांचीं लग्नें करून देऊं शकतील. त्यांच्यापैकी जर योग-धर्मादिकांच्या अधिकारिणी

अशा कांही मुली असतील तर त्या पालकांच्या परवानगीने चिरकुमारीव्रताचा अवलंब करून येथे राहूं शकतील. ज्या हें कौमार्यव्रत अंगिकारतील त्याच कालांतराने शिक्षिका व प्रचारिका यांचीं कामें करतील. त्या खेडोपाडीं, शहरोशहरीं अशींच शिक्षण-केन्द्रें उघडून स्त्री-शिक्षणप्रसाराचा प्रयत्न करतील. या चारित्र्य-वान्, धर्मभावापन्न प्रचारिकांद्वाराच देशांत यथार्थ स्त्री-शिक्षणाचा प्रसार होईल. विद्यार्थिनींचा मठाशीं जोंवर संबंध आहे तोंवर त्यांनी ब्रह्मचर्य पालन करावें ही गोष्ट मठाचा मूलभूत पाया म्हणून मानली जाईल. धर्मपरता, त्याग व संयम याच गोष्टी येथील विद्यार्थिनींचे अलंकार असतील व सेवाधर्म हें राहील त्यांचें जीवनव्रत. त्यांचें असलें आदर्श-जीवन पाहून कोण त्यांना सन्मान देणार नाही ? कोण त्यांच्यावर अविश्वास करूं धजेल ? देशांतील स्त्रियांचें जीवन अशा धर्तीने घडल्यासच त्यांच्यांत सीता, सावित्री, गार्गी वगैरे पुनः निर्माण होतील. देशा-चाराच्या कठोर बंधनांनी प्राणहीन, चैतन्यहीन झाल्याने तुमच्या देशांतील स्त्रियांची काय अवस्था झाली आहे हें तूं जर पाश्चात्य देश पाहून येतास, तर तुला कळलें असतें. स्त्रियांच्या या भीषण दुर्दशेला कारण आहांत सर्वस्वी तुम्ही. म्हणूनच सांगतों की निदान आता तरी अगदी कंबर कसून कामाला लागा. वेदान्त नुसता पाठ करून काय होणार आहे माती ?

शिष्य-- येथे शिक्षण घेतल्यानंतरहि मुली जर लग्नच कर-णार असतील तर त्यांच्या जीवनांत आदर्श चारित्र्य तें काय पाहावयाला मिळणार आहे लोकांना ? येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींनी पुढे विवाह करूं नये असा नियम केल्यास बरें नाही का होणार ?

स्वामीजी — या साऱ्या गोष्टी एकदमच साधतां येतात

काय रे ? योग्य शिक्षण देऊन त्यांना मोकळीक द्यायला हवी. तरच ना त्या स्वतःला जें योग्य वाटेल तें करूं शकतील ? लग्न करून संसारी झाल्यानंतरहि अशा सुशिक्षित स्त्रिया आपापल्या पतींना उच्च भावांची प्रेरणा देतील व वीरमाताहि त्या होऊं शकतील. पण याबरोबरच असाहि नियम राहील की स्त्री-मठांत शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या पालकांनी त्या मुली १५ वर्षांच्या होईपावेतों त्यांच्या लग्नाची गोष्ट सुद्धा काढतां कामा नये.

शिष्य-- असें झाल्यास सारा समाज त्या मुलींविषयी निंदा-प्रवाद पसरवील, त्यांच्याशीं लग्न करण्याला कुणी देखील पुढे येणार नाही.

स्वामीजी— कां नाही येणार ? समाजांतील वेगवेगळ्या प्रवाहांची अद्याप तुला जाणीवच झाल्याचें दिसत नाही. या विदुषी व कार्यतत्पर मुलींना योग्य वर मिळण्याची कांहीच अडचण पडणार नाही. 'दशमे कन्यकाप्राप्तिः' या असल्या शास्त्रवचनांवर समाज आज कांही चालत नाही, पुढेहि तो चालणार नाही. या गोष्टी तुझ्या अद्यापहि काय लक्षांत आल्या नाहीत ?

शिष्य-- आपण कांहीहि म्हणा, पण सुरवातीला तरी निदान याविरुद्ध खात्रीने भयंकर आंदोलन होईल.

स्वामीजी-- तें होऊं दे. त्याचें काय भय आहे ? सात्त्विक अनुष्ठानावर आधारलेल्या सत्कार्याला जर बाधा आली तर तें करणाऱ्यांची शक्ति अधिकच वाढतें. ज्यांत कांही अडथळे नाहीत, कांही प्रतिकूलता नाही तें कार्य तर माणसाला मृत्युमार्गावरच नेतें. अडथळे, विघ्न-बाधादिकांवर मात करणें हेंच तर मुळी आहे जिवंतपणाचें लक्षण. समजलें ?

शिष्य— होय.

स्वामीजी-- परब्रह्मतत्त्वांत कुठलाच लिंगभेद नाही! 'तूं-मीं'च्या द्वैतभूमीवरच आपल्याला हा लिंगभेद आढळून येतो; व मन जितकें अन्तर्मुख होतें तितकें हें भेदज्ञान विलुप्त होतें. अखेर मन जेव्हा अखंड ब्रह्मतत्त्वांत मग्न होतें तेव्हा हा पुरुष, ही स्त्री असली जाणीवहि शिल्लक राहत नाही. ही गोष्ट ठाकुरांमध्ये आम्हीं प्रत्यक्ष आमच्या डोळ्यांनी पाहिली आहे. म्हणून म्हणतों की स्त्री-पुरुष हे असले बाह्यभेद असले तरी स्वरूपतः मात्र कुठलाच भेद मुळांत नाही. मग पुरुष जर ब्रह्मज्ञ होऊं शकत असले तर स्त्रिया कां नाही होऊं शकणार? येवढ्याचसाठी म्हणत होतों की स्त्रियांत जर एखादी ब्रह्मज्ञ स्त्री निपजेल तर तिच्या व्यक्तिमत्वाच्या प्रभावबलाने हजारो स्त्रिया जागृत होतील व त्यामुळे देशाचें व समाजाचें कल्याण होईल. आलें ध्यानांत?

शिष्य-- आपल्या या विचारांनी माझे खरोखरच डोळे उघडले.

स्वामीजी-- अद्याप काय उघडलें? सर्वावभासक आत्मतत्त्वाचा जेव्हा साक्षात्कार होईल तेव्हा आढळून येईल की हें स्त्री-पुरुष भेदज्ञान अजिबात समूळ लुप्त झालें आहे; तेव्हा कुठे ब्रह्मरूपिणी म्हणून तूं स्त्रियांकडे पाहूं शकशील! ठाकुरांच्या बाबतींत आम्हीं आमच्या डोळ्यांनी पाहिलें आहे साऱ्या स्त्रियांबद्दल त्यांच्या ठिकाणीं मातृभावाची जाणीव असल्याचें--मग ती स्त्री कोणत्याहि जातीची, कशीहि असेना का! आम्हीं प्रत्यक्ष पाहिल्या आहेत की नाही या गोष्टी! म्हणूनच तुम्हांला तसें व्हायला सांगतों, गावोगाव स्त्रियांसाठी शाळा उघडून त्यांना शिक्षित करून वर आणायला सांगतों. स्त्रिया शिकूनसवरून जर माणसांत आल्या तरच ना तुमच्या मुलांबाळांकरवी देशाचें

मुख उज्ज्वल होणार ? तरच ना देशांत विद्या, ज्ञान, शक्ति, भक्ति वगैरेंची जागृति होणार ?

शिष्य-- पण आधुनिक स्त्रीशिक्षणाची विपरीत अशींच फळें पाहावयास सापडतात. अर्धेकच्चें थोडेंफार शिक्षण होतांच मुली झगे वगैरे घालून पाश्चात्त्यांचें अनुकरण करूं लागतांना दिसतात. पण त्यांच्या ठिकाणीं त्याग, संयम, तपस्या, ब्रह्मचर्यादि ब्रह्मविद्यालाभाला उपयुक्त असणाऱ्या गोष्टींची किती वाढ होते हें कळायला कांही मार्ग नाही.

स्वामीजी-- सुरवातीला असें होणारच ! सुरवातीला एखादा नवीन भाव बरेचसे लोक योग्य प्रकारें ग्रहण न करूं शकल्याने असल्या कांही विपरीत गोष्टी घडतात. पण त्यामुळे विराट समाजाची काय लाभहानि होते ? पण सध्या प्रचलित असलेल्या सामान्यच का होईना स्त्रीशिक्षणासाठी ज्यांनी प्रयत्न केले त्यांच्या थोरवीबद्दल व उदारहृदयाबद्दल तर कांही संशयाला जागा नाही ना ? खरी गोष्ट मुळांत येथे ही आहे की शिक्षण म्हण, दीक्षा म्हण या गोष्टी जर धर्मभावविरहित असतील तर त्यांत चुका ह्या होणारच. आता धर्माला केन्द्रस्थानीं ठेवून स्त्रीशिक्षणाचा प्रसार व्हावयास हवा. धर्माखेरीज इतर सारें शिक्षण गौण मानावयास हवें. धर्मशिक्षण, चारित्र्यगठन, ब्रह्मचर्यव्रतग्रहण यांचीच गरज आहे आज शिक्षणांत. आतापर्यंत भारतांत स्त्रीशिक्षणाचा जो प्रचार झाला आहे त्यांत धर्मच लेखला गेला आहे गौण. त्यामुळेच तूं म्हणतोस ते सारे दोष त्या शिक्षणांत प्रविष्ट झालेले दिसतात. पण त्यांत त्या स्त्रियांचा काय बरे दोष ? सुधारक स्वतः ब्रह्मचारी, ब्रह्मज्ञ नसतां स्त्रीशिक्षणाच्या कामांत पुढे आले व म्हणूनच अशीं चुकीचीं पाऊलें त्यांनी टाकलीं. साऱ्याच सत्कार्यांच्या प्रवर्तकांनी इच्छित कार्याला प्रारंभ करण्या-

पूर्वी कठोर तपश्चर्या करून आत्मज्ञ व्हावयास हवें. नाही तर त्यांच्या कार्यांत चुका ह्या होणारच. आलें ध्यानांत.

शिष्य-- होय. महाराज, पुष्कळशा शिक्षित स्त्रिया फक्त नाटकें-कादंबऱ्या वाचूनच आपला वेळ बरबाद करतात. आमच्या पूर्वबंगालमध्ये मात्र शिक्षित स्त्रियाहि नाना व्रत-वैकल्यें करीत असतात. या भागांत काय असलीं अनुष्ठानें वगैरे करतात त्या ?

स्वामीजी-- चांगलें-वाईट हें तर सर्वत्रच आढळून येतें. सत्कृत्यें करून लोकांसमोर आदर्श ठेवणें येवढेंच आपलें काम. दुसऱ्यांना तुच्छ लेखून, त्यांची निंदा करून कोणतेंहि कार्य कधी सफळ होत नाही. अशाने लोक मात्र बिथरून जातात. कोणी कांहीहि म्हणो--त्याला प्रतिवाद करून त्याचें म्हणणें खोडून काढायचा प्रयत्न करूं नकोस. या मायेच्या राज्यांत तूं जें म्हणून करायला जाशील त्या प्रत्येकांत कांही ना कांही दोष हा राहणारच. 'सर्वारम्भा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृता:'-- जेथें अग्नि तेथे धूर हा असणारच. पण म्हणून काय त्या भीतीने नुसतें कपाळाला हात लावून स्वस्थ बसावयाचें ? यावत्‌शक्य सत्कर्म करण्याचा प्रयत्न करावयास हवा.

शिष्य-- कोणतें सत्कर्म ?

स्वामीजी-- ब्रह्मविकासाला साहाय्यक होतें तेंच सत्कर्म. प्रत्येकच काम प्रत्यक्ष जरी नाही तरी अप्रत्यक्ष रीतीने आत्मतत्त्व-विकासाला पोषक अशा पद्धतीने करतां येणें शक्य आहे. त्यांतहि ऋषिमुनी-प्रणीत मार्गाने गेल्यास हें आत्मज्ञान लवकर होतें. याउलट शास्त्रकार ज्याला अनुचित कर्म म्हणून संबोधितात तीं केल्यास आत्मबंधनें वाढतात, आणि कधीकधी तर जन्मजन्मांतरीं देखील हीं बंधनें तुटत नाहीत. हें खरें असलें तरीहि सर्व देशांत, सर्वकाळीं जीवांना मुक्तिलाभ होणार हें निश्चित. कारण जीवांचें

वास्तव स्वरूप आत्माच होय. आपलेंच वास्तव स्वरूप काय कुणी कधी सोडून देऊं शकेल ? हजारो लाखो वर्षें सतत झटून देखील काय कुणाला आपली सावली कधी नाहीशी करतां येईल ? ती तर सदासर्वदा तुझ्याबरोबर राहणारच !

शिष्य-- पण महाराज, आचार्य शंकरांच्या मतें कर्म हें ज्ञान-विरोधी आहे. ज्ञान-कर्मसमुच्चयाचें त्यांनी जागोजाग खंडन केलें आहे. असें असतां ज्ञानाच्या अभिव्यक्तीला कर्म कसें साहाय्यक होणार ?

स्वामीजी-- असें सांगून झाल्यानंतर देखील आचार्य शंकरांनी कर्माला ज्ञानाच्या अभिव्यक्तीस अप्रत्यक्ष साहाय्यक म्हणून निर्दिष्ट केलें आहे व चित्तशुद्धीचा उपाय म्हणून ते कर्माला मान्यता देतात. पण शुद्ध ज्ञानाशीं कर्माचा संबंध नाही, तेथे कर्माला प्रवेश नाही या भाष्यकार शंकराचार्यांच्या सिद्धान्ताला माझा मुळीहि विरोध नाही. क्रिया, कर्ता व कर्मबोध हीं जोंवर माणसांत आहेत तोंवर काय मजाल आहे त्याची की तो कर्म न करतां स्वस्थ बसून राहूं शकेल ? तेव्हा या अर्थाने कर्म करणें हाच जर माणसाचा स्वभाव असेल तर मग असेंच कर्म कां करूं नये की ज्याने आत्मज्ञानलाभाला मदत होईल ? पारमार्थिक दृष्टीने सारेच कर्म जरी भ्रममूलक असलें तरी व्यावहारिक दृष्टीने कर्माची उपयोगिता फार मोठी आहे. तुला जेव्हा आत्मज्ञानलाभ होईल तेव्हा कर्म करणें वा न करणें हें तुझ्या इच्छेवर अवलंबून राहील. त्या अवस्थेंत जें तूं करशील तें सत्कर्मच असेल, त्यामुळे जीव-जगताचें कल्याणच होईल. ब्रह्मज्ञानलाभानंतर तुझ्या श्वासोच्छ्वासाच्या साऱ्या छटा देखील जीवांना उपकारकच होतील. मग कांही तुला कार्यक्रम आखून काम करीत बसावें लागणार नाही. समजलें ?

शिष्य-- वाहवा ! वेदान्तांतील कर्म व ज्ञानाचा समन्वय घडवून आणणारी काय सुरेख मीमांसा आहे ही !

नंतर जेवणाची घंटा झाल्यामुळे स्वामीजींनी शिष्याला प्रसाद घ्यावयास जाण्यास सांगितलें. जाण्यापूर्वी भक्तिभावाने स्वामीजींच्या चरणकमलीं प्रणत होऊन शिष्य म्हणाला, 'महाराज ! आपल्या प्रेमाशीर्वादाने याच जन्मीं मला ब्रह्मज्ञान होवो हेंच मागणें.' शिष्याच्या मस्तकीं प्रेमाने हात ठेवून स्वामीजी म्हणाले, 'भय कसलें बाबा ! अरे, तुम्ही काय या लोकींचीं माणसें आहांत ?--ना गृहस्थ, ना संन्यासी,--तुमचा म्हणजे, बाबांनो, नवीनच प्रकार.'

---

# अध्याय ३६ वा

**स्थळ-- बेलूर मठ**

**वर्ष-- इ. स. १९०१**

**विषय**-- स्वामीजींचा असाधारण इंद्रियसंयम— त्यांचें शिष्यप्रेम व असाधारण मेधा-- राय गुणाकार भारतचंद्र व मायकेल मधुसूदन दत्त यांच्यासंबंधी त्यांचें मत.

स्वामीजींची तब्यत तितकीशी ठीक नाही. स्वामी निरंजनानंदांच्या खूपच आग्रहावरून ते ६-७ दिवसांपासून वैद्याचें औषध घेत आहेत. या औषधाचें पथ्य म्हणजे पाणी पिणें अजिबात वर्ज्य ! स्वामीजींना दूध पिऊनच आपली तहान भागवावी लागे.

शिष्य सकाळींच मठांत आला. असलें औषध स्वामीजींनी सुरू केलें हें त्याला ठाऊक नव्हतें. आज ६-७ दिवसांपासून ते नुसत्या दुधावरच आहेत. शिष्याला पाहून ते मोठ्या प्रेमानें म्हणाले, " आलास ? बरें झालें, तुझीच आठवण करीत होतों."

शिष्य-- ६-७ दिवसांपासून आपण नुसत्या दुधावर आहांत म्हणून ऐकलें ?

स्वामीजी-- निरंजनच्या खूप आग्रहावरून वैद्याचें औषध घ्यायला सुरवात करणें भागच पडलें. त्यांच्या म्हणण्याला तर कांही मोडता घालतां येत नाही.

शिष्य-- एका तासांत आपणाला तर चारदा पाणी लागतें. कसें काय तें आपण एकदम सोडून दिलें ?

स्वामीजी-- तें औषध घ्यावयाचें असल्यास पाणी पितां येणार नाही असें जेव्हा ऐकलें तेव्हाच दृढनिश्चय केला की पाणी प्यायचें नाही. आता नुसती आठवण सुद्धा होत नाही पाण्याची.

शिष्य-- कांही आराम आहे त्या औषधानें ?

स्वामीजी-- आराम वगैरे मला कांही माहीत नाही. मी आपला गुरुबंधूंच्या आज्ञेचें पालन करतों आहें.

शिष्य-- देशी आयुर्वेदिक वैद्यांचीं औषधें आपल्या या देशाच्या लोकांच्या प्रकृतीला मानवतात असें वाटतें.

स्वामीजी-- माझ्या मतें तर आधुनिक चिकित्साविज्ञान-विशारदाच्या हातून मरण आलें तरी पुरवलें, पण जे आधुनिक चिकित्सेसंबंधी कांही जाणत नाहीत अशा वैदूंच्या हातून बरें होणें नको. असले हे लोक पोथ्यापुस्तकांच्या आधारावरच अंधारांत नुसत्या उड्या मारीत असतात अनुमानधबक्याने! त्यामुळे चारदोन रोगी कदाचित् त्यांनी बरे केले असोत.

वैद्याचें औषध चालूं म्हणून स्वामीजींना खूप कडक नियम पाळावे लागत असल्याने त्यांना जेवणखाण जवळजवळ नाहीच. बरेच दिवसांपासून निद्रादेवीचीहि त्यांच्यावर अवकृपाच आहे. पण असें असूनहि त्यांच्या परिश्रमांना कांही विराम नाही. कांही दिवस झाले, मठांत एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकाचे खंड विकत घेण्यांत आले आहेत. ते सर्व नवेकोरे चकचकीत खंड पाहून शिष्य स्वामीजींना म्हणाला, "हे सारे खंड एका जन्मांत तरी वाचणें अशक्य आहे." शिष्याला हें माहीत नव्हतें की त्यांपैकी आतापर्यंत दहा खंड वाचून संपवून स्वामीजींनी अकरावा खंड वाचावयास घेतला होता!

स्वामीजी-- काय म्हणतोस तूं हें? या दहा खंडांतून तुला जें वाटेल तें विचार. मी सांगतों.

शिष्याने आश्चर्यचकित होऊन विचारलें, "आपण काय हे सारे खंड वाचून संपविले?"

स्वामीजी-- मग काय न वाचतांच सांगतों आहे तुला वचारायला?

नंतर स्वामीजींच्याच अनुमतीने शिष्याने त्यांना अगदी निवडक निवडक कठीण कठीण भाग त्या खंडांतून विचारावयास सुरवात केली. आश्चर्याची गोष्ट ही की स्वामीजी त्या विषयाबाबत त्या खंडांतील मुद्दे तर सांगतच पण अनेक ठिकाणीं तर ते त्या त्या खंडांतील अवतरणेंहि पाठ म्हणून दाखवीत ! शिष्याने त्या दहाहि खंडांतील प्रत्येकांतून एकदोन, एकदोन निवडक प्रश्न स्वामीजींना विचारले व त्यांची असामान्य धारणा व स्मृतिशक्ति पाहून चकित झाल्याने ते खंड बाजूस ठेवून म्हटलें, 'हें मानवी शक्तीच्या बाहेरचें काम आहे.'

स्वामीजी— पाहिलेंस, एकमात्र यथार्थ ब्रह्मचर्यपालनाने समस्त विद्या एका क्षणांत हस्तगत करतां येतात, माणूस श्रुतिधरस्मृतिधर होतो. या ब्रह्मचर्यपालनाच्या अभावींच आमचा सारा देश उध्वस्त झाला आहे.

शिष्य-- आपण कांहीहि म्हणा पण फक्त ब्रह्मचर्यपालनानेच अशा अतिमानुषी शक्तीचें स्फुरण होणें कधीहि शक्य नाही. त्या जोडीला आणखी कांहीतरी असलें पाहिजे.

यावर स्वामीजी कांहीच बोलले नाही.

नंतर स्वामीजींनी अगदी सोप्या भाषेंत शिष्याला साऱ्याच तत्त्वज्ञानांतील वेगवेगळ्या कठीण कठीण कल्पना समजावून देण्यास सुरवात केली. हीं सारीं तत्त्वें त्याच्या अगदी हृदयावर बिंबविण्यासाठीच जणु इतकें स्वच्छ व सुबोध विवेचन करावयास त्यांनी प्रारंभ केला. हें बोलणें चालूं असतां स्वामी ब्रह्मानंद हे स्वामीजींच्या खोलींत येऊन शिष्याला म्हणाले, "तूंहि तर भलाच दिसतोस रे ! आधीच स्वामीजींची तब्यत ठीक नाही,— इकडच्या तिकडच्या गप्पागोष्टी करून त्यांचें मन प्रसन्न ठेवायचें तें राहिलें एका बाजूला, अन् असले हे गहन प्रश्न त्यांना

विचारून तूं बोलणें भाग पाडतोस वाटतें त्यांना ?" शिष्य मनांत अगदी वरमून गेला व त्याची चूक त्याच्या लक्षांत आली. पण स्वामीजी ब्रह्मानंदांना म्हणाले, 'दे फेकून ते तुझ्या वैद्याचे नियम. हीं सारीं माझीं मुलें. यांना उपदेश करतां करतां माझा प्राण जरी गेला तरी काय पर्वा ?" शिष्याने मात्र पुढे कोणताच तत्त्वज्ञान-विषयक प्रश्न न विचारतां पूर्व बंगालकडील बोली भाषेबद्दल मौजेचें बोलणें काढून विनोदाने साऱ्यांना हसविण्यास सुरवात केली. स्वत: स्वामीजीहि शिष्याच्या या थट्टामस्करींत सामील झाले. कांही वेळाने बंगाली साहित्यांत भारतचंद्रांच्या स्थानाबद्दल प्रश्न निघाला. त्या वेळच्या बोलण्यांतलें जें कांही स्मरणांत आहे तेंच येथे देतोः-- सुरवातीपासूनच स्वामीजींनी भारतचंद्रांची थट्टा करावयास प्रारंभ केला. तत्कालीन आचारव्यवहार, विवाह-संस्कारादि गोष्टींची त्यांनी खूपच हुर्रेवडी उडविली. "समाजांतील बालविवाहाचें समर्थन करणाऱ्या भारतचंद्रांचें हीन अभिरुचीचें व अश्लीलतापूर्ण काव्य बंगालखेरीज कोणत्याहि अन्य सभ्य समाजांत आश्रय मिळवूं शकणार नाही" असें आपलें मत दिलें. "मुलाबाळांच्या हातीं हीं पुस्तकें पडणार नाहीत अशी काळजी घ्यावयास हवी," असेंहि त्यांनी सुचविलें. नंतर मायकेल मधुसूदन दत्तांबद्दल ते म्हणाले, "हा एक असामान्य प्रतिभेचा माणूस तुमच्या देशांत जन्मला; मेघनादवधासारखें अन्य काव्य बंगालींत तर नाहीच, पण युरोपमध्येहि असें काव्य सध्या आढळणें कठीण."

शिष्य-- पण मायकेलांना शब्दावडंबराचा फार भयंकर सोस होता असें मला वाटतें.

स्वामीजी-- तुमच्या देशांत कुणीं कांही थोडेसें नवीन केलें की लागलीच तुम्ही त्याच्या मागे लागतां. आधी तो काय म्हणतो हें नीट समजून तर घ्या. तें राहिलें एकीचकडे. कांही गोष्टी जर

पूर्वीप्रमाणे झाल्या नाहीत तर लोक त्याच्या मागे लागतात. तुमच्या बंगालीभाषेंत हें मेघनादवध काव्य म्हणजे अगदी मुकुटमणि. पण त्याची टवाळी करण्यासाठी चिचुंद्रीवध म्हणून एक विडंबन-काव्य लिहिलें गेलें ! त्या भुरटयांना जसें वाटेल तसें करूं द्या ना, त्याने काय होणार आहे ? हिमालयाप्रमाणे तें मेघनादवध काव्य अद्यापहि अगदी निश्चळ उभें आहे. उलट त्यांत दोष काढण्यांत मग्न असणाऱ्या छिद्रान्वेषी टीकाकारांचीं मतें आणि लिखाण कुठल्याकुठे लोपून गेलें आहे कालोदरांत ! नवीन छंदांत, ओजस्वी भाषेंत मायकेल जें काव्य लिहून गेला तें सामान्य लोकांना काय उमजणार ? हे गिरीशचंद्र घोष नवनवीन छंदांत, काय अद्भुत अद्भुत पुस्तकें आजकाल लिहिताहेत, पण त्यावरहि तुमचे ते अति बुद्धिमान पंडित टीका खरडताहेत, त्यांतहि दोषच दाखवीत आहेत! जी. सी. (गिरीशचंद्र घोष) काय त्यांच्याकडे लक्ष देतो, म्हणतोस ? पुढे लोक याच पुस्तकांचें रसिकतेने गुणग्रहण करतील.

मायकेल दत्तांबद्दल हें बोलणें चाललें असतां ते म्हणाले, 'जा, खालून लायब्ररींतून मेघनादवधाचा तो खंड घेऊन ये.' शिष्याने तो खंड आणतांच ते म्हणाले, "वाच पाहूं कसें काय वाचतोस तें?"

पुस्तक उघडून शिष्याने जमेल तसें पहिल्या सर्गांतून थोडेंफार वाचलें. पण त्याचें वाचन स्वामीजींना न आवडल्याने त्यांनी तें स्वतः वाचून दाखवून शिष्याला पुन्हा वाचावयास सांगितलें. या वेळीं मात्र शिष्याला बरेंच यश आल्याचें पाहून प्रसन्नवदनाने त्यांनी विचारलें, "सांग बरें, या काव्यांत कोणता भाग सर्वोत्कृष्ट आहे तो ?"

कांहीच सांगतां येत नसल्याने शिष्य चुप बसल्याचें पाहून स्वामीजी म्हणाले, "इंद्रजित युद्धांत मारला गेला आहे, शोकविव्हल झाल्याने वेडावून गेलेली मंदोदरी रावणाला युद्धास जाऊं

नका म्हणून सांगते आहे. पण रावण मात्र मनांतील पुत्रशोक साफ बाजूला सारून, महावीराप्रमाणे युद्धाचा दृढसंकल्प करून, सूड व क्रोध यांनी पेटून, स्त्री-पुत्रांचा मोह झिडकारून बाहेर पडावयास निघतो तोच भाग या काव्यांतील सर्वश्रेष्ठ कल्पकतेचा होय. 'जें व्हायचें तें होवो, मी माझें कर्तव्य सोडणार नाही--मग ही दुनिया तरो, बुडो, काय वाटेल तें होवो ! --' हें झालें महावीराचें बोलणें. याच भावनेने उत्स्फूर्त होऊन मायकेलने तें काव्य लिहिलें आहे."

असें म्हणून तो भाग काढून स्वामीजींनी वाचून दाखवावयास सुरवात केली. स्वामीजींची ती वीरदर्पद्योतक पठणशैली अद्यापहि शिष्याच्या हृदयांत ज्वलंत, जागृत नादाने निनादत आहे.

## अध्याय ३७ वा

**स्थळ-- बेलूर मठ**

**वर्ष— इ. स. १९०१**

विषय—आत्मा इतका जवळ असूनहि त्याची अनुभूति सहजासहजी होत नाही असें कां ?— अज्ञान अपसारित झालें, ज्ञानोदय झाला की जीवाच्या मनांत नाना प्रकारचे संशय, प्रश्न उत्पन्न होणें थांबतें—स्वामीजींची ध्यानतन्मयता.

स्वामीजींची प्रकृति अद्यापहि ठीक नाही. वैद्याच्या औषधाने त्यांच्या प्रकृतीला पुष्कळच आराम आहे. जवळपास महिनाभर नुसत्या दुधावरच राहिल्याने त्यांच्या साऱ्या शरीरावर जणुं चंद्रोज्ज्वल कान्ति पसरलीशी वाटते आणि त्यांच्या सुविशाल नयनांतील तेज अधिकच उज्ज्वल झाल्याचा भास पाहणाऱ्याला होतो.

आज दोन दिवस झाले शिष्य मठांतच असून यथासाध्य स्वामीजींच्या सेवेचा भार त्याने आपल्याकडे घेतला आहे. आज अमावस्या. स्वामी निर्भयानंदांबरोबर स्वामीजींची रात्रीं सेवा करण्याची जबाबदारीहि त्याने आपल्याकडे घेतली आहे. आता सायंकाळची वेळ.

स्वामीजींचे पाय दाबतां दाबतां त्याने विचारलें, " महाराज, जो आत्मा सर्वग, सर्वव्यापी, अणुपरमाणूंत ओतप्रोत भरलेला व जीवांच्या प्राणांचाहि प्राण असल्याने त्याच्या अगदी निकट आहे याची अनुभूति कां होत नाही ?

स्वामीजी-- आपल्या नुसत्या डोळयांनी तूं आपल्याला डोळे असल्याचें कधी पाहिलें आहेस का ? जेव्हा लोक तुझ्या डोळयांबद्दल बोलतात तेव्हा तुला 'आपल्याला डोळे आहेत' याची जाणीव होते, किंवा जेव्हा तुझ्या डोळयांत वाळूचा एखादा कण जातो,

खुपूं लागतो तेव्हाच तुला जाणवतें की आपल्याला डोळे आहेत. त्याचप्रमाणे हृदयाच्या अगदी अंतरतम प्रदेशांत असणारा हा विराट आत्मा सहजासहजी बोधगम्य होत नाही. शास्त्रें अभ्यासून वा गुरुमुखाने ऐकूनच त्याची थोडीफार धारणा होते. पण जेव्हा संसाराच्या तीव्र शोकदुःखाच्या कठोर प्रतोदाघातांनी हृदय भयंकर व्यथित होतें, जेव्हा स्वजनवियोगदुःखाने कातर होऊन जीवाला संपूर्णपणें निराधारता जाणवूं लागते, जेव्हा भविष्यकालीन जीवनाच्या दुरतिक्रम, दुर्भेद्य अंधारांत प्राण अगदी व्याकुळ होऊन जातात तेव्हाच जीव आत्मदर्शनासाठी तळमळूं लागतो. यासाठीच आत्मानुभवाला दुःख साहाय्यक असतें, पण ह्या गोष्टीची जाणीव मात्र सतत असावयास हवी. दुःख भोगतां भोगतां कुत्र्यामांजराप्रमाणे जीं मरतात तीं काय माणसें म्हणावींत ? माणूस तोच की जो या सुखदुःखाच्या घातप्रतिघातांचा अनुभव घेऊनहि विचारबलाने या साऱ्यांना क्षणभंगुर, नश्वर मानून आत्मानंदांत निमग्न होऊन जातो. माणसांत व अन्य प्राणिमात्रांत हाच काय तो फरक. वस्तु जितकी जवळ तितकेंच तिच्याकडे आपलें लक्ष कमी. आत्मा अंतरांतीलहि अंतरतम, त्यामुळेच असंयत, चंचल चित्ताला त्याची जाणीवहि असत नाही. पण मन वशीभूत असलेला शान्त, जितेन्द्रिय आणि विचारशील माणूस बाह्य जगताची उपेक्षा करून अंतर्जगतांत प्रवेश करतो व कालान्तराने या आत्ममहिम्याची उपलब्धि करून घेतो आणि अखेर त्या पदावर अधिष्ठित होतो. तेव्हाच त्याला आत्मज्ञान लाभतें व 'मी तोच आत्मा आहें', 'तत्त्वमसि श्वेतकेतो' वगैरे महावाक्यांची त्याला प्रत्यक्ष अनुभूति होते. आलें ध्यानांत ?

शिष्य-- होय. पण आत्मज्ञानलाभाचा हा मार्ग दुःखकष्ट वेदनादिकांमधूनच काय म्हणून जातो ? यापेक्षा ही सृष्टिच उत्पन्न

झाली नसती तर बरें झालें असतें. केव्हा ना केव्हा आम्ही सारे ब्रह्मांत लीन होणारच. मग ही सृष्टि निर्माण करण्याची इच्छा तरी ब्रह्माला काय म्हणून झाली ? आणि या द्वंद्वमय आघात-प्रत्याघातांतून साक्षात् ब्रह्मस्वरूप असणाऱ्या जीवाला तरी या जन्ममरणसंकुल मार्गाने गमनागमन कशाला ?

स्वामीजी-- दारू पिऊन उन्मत्त झालेल्या लोकांना कितीतरी भ्रामक गोष्टी दिसतात, भासतात, जाणवतात. पण नशा उतरली की त्या म्हणजे आपल्या भ्रमिष्ट डोक्याचे चाळे होते हें त्यांना उमजतें. अनादि पण सान्त अशी ही अज्ञानप्रसूत सृष्टि वगैरे तूं जें पाहतोस तें सारें आहे तुझ्या उन्मत्त अवस्थेंत दिसणारें एक दृश्य. तुझी ही नशा उतरली की तुझ्यापुढे हे प्रश्नच उद्भवणार नाहीत.

शिष्य-- तर काय मग ह्या सृष्टि-स्थिति-प्रलयादिकांपैकी कांहीच सत्य नाही ?

स्वामीजी-- नाही कसें रे ? जोंवर तूं ही देहबुद्धि पक्की धरून 'मी, मी' करतोस तोंवर हें सारें आहेच. जेव्हा तूं विदेह, आत्मरति, आत्मक्रीड होशील तेव्हाच तुझ्या त्या दृष्टीने ह्या साऱ्यांतलें कांहीच असणार नाही, आणि सृष्टि, जन्म, मृत्यु वगैरे आहेत किंवा नाहीत या प्रश्नांनाहि तेव्हा कांही जागा उरणार नाही. तेव्हा तूं उद्गारशील---

क्व गतं केन वा नीतं कुत्र लीनमिदं जगत्
अधुनैव मया दृष्टं नास्ति किं महदद्भुतम् ।

शिष्य-- जगाचें ज्ञान अजिबातच जर असणार नसेल तर 'कुत्र लीनमिदं जगत्' असें तरी कसें म्हणतां येईल ?

स्वामीजी-- भाषेद्वारा ही गोष्ट सांगावी वा समजावून द्यावी लागत असल्याने असें म्हटलें आहे. जेथे भाव, विचार वा भाषा पोहोचूं शकत नाही त्या अवस्थेचें भाव, विचार व भाषेद्वारा

वर्णन करण्याचा ग्रंथकार प्रयत्न करीत आहे; म्हणूनच जगत् ही गोष्ट संपूर्णपणें मिथ्या आहे हें अशा तऱ्हेने व्यावहारिक रूपाने त्याने सांगितलें आहे--जगाला पारमार्थिक सत्ता नाहीच. ती आहे फक्त 'अवाङ्‌मनसगोचरम्' ब्रह्मालाच. बोल तुला आता काय बोलावयाचें आहे तें. आज तुझे सारे तर्कवितर्क मी दूर करतों.

श्रीरामकृष्णमंदिरांत आरतीची घंटा निनादूं लागली. मठांतील सारेच लोक मंदिराकडे निघाले. शिष्य स्वामीजींच्या खोलींतच बसून राहिला. त्याला तेथेच बसलेला पाहून स्वामीजींनी विचारलें, "काय रे ! मंदिरांत नाही का गेलास ?"

शिष्य-- येथेच थांबणें मला बरें वाटतें.

स्वामीजी-- थांब तर मग येथेच.

कांही वेळानंतर शिष्य खोलीबाहेर पाहून म्हणाला, "आजची अमावस्या. अंधाराने चाऱ्ही दिशा अगदी घेरून टाकल्या आहेत. आज कालीपूजनाचा दिवस."

शिष्याच्या या बोलण्याकडे लक्ष न देतां खिडकींतून कांही वेळ पूर्वेकडे टक लावून पाहत स्वामीजी म्हणाले, "पाहिलीस अंधकाराची ही काय विलक्षण अद्‌भुतगभीर शोभा आहे ती !" असें म्हणून त्या निबिड तमोराशीकडे स्तिमित होऊन ते तिकडे पाहतां पाहतां उभे राहिले. सारें वातावरण निःशब्द, फक्त दूर अंतरावरून ठाकुरमंदिरांतील भक्तगणकंठांतून येणारे रामकृष्णस्तवाचे स्वरच काय ते शिष्याच्या कानावर येत आहेत. स्वामीजींचें हें अदृष्टपूर्व गांभीर्य व निबिड तिमिरावगुंठनांत दिसणारें बाह्य प्रकृतीचें निःस्तब्ध स्थिररूप पाहून शिष्याचें मन एका अपूर्व, अव्यक्त, अज्ञेय भयाने व्याकुळ झालें. अशाच स्थितींत कांही वेळ गेल्यावर स्वामीजी मंदगभीर स्वरांत गाऊं लागले, 'निबिड आंधारे मा ! तोर चमके अरूप राशी.'

गीत पूर्ण झाल्यावर स्वामीजींनी हळूहळू खोलींत प्रवेश केला. अधूनमधून ते, 'मा, मा' 'काली, काली' असें तुटक नामोच्चारण करूं लागले. खोलींत कुणीच नव्हतें. स्वामीजींनी कांही आज्ञा केल्यास तिचें पालन करण्यासाठी फक्त शिष्य अगदी सावधपणें तेथे बसला होता.

त्या वेळचें स्वामीजींचें मुखमंडल पाहून स्वामीजी अद्यापहि कुठल्यातरी सुदूरवर्ती भावसाम्राज्यांतच जणु वावरताहेत असें शिष्याला वाटलें. स्वामीजींचा त्या वेळचा तो गभीर भाव पाहून व्याकुळ, भयचकित झालेला शिष्य त्यांना म्हणाला, "महाराज, आपण आता कांही बोला ना."

शिष्याची ती स्थिति लक्षांत आल्याने मृदुमधुर हास्य करीत ते म्हणाले, "ज्याची बाह्यलीला इतकी मधुमधुर आहे त्या आत्म्याचें सौंदर्य व गांभीर्य किती गहन-गूढ असेल सांग पाहूं?" त्यांचा तो सुदूर-विलीन भाव अद्यापहि गेला नाही असें पाहून तो म्हणाला, "त्या साऱ्या गोष्टींचें सध्याच कांही प्रयोजन नाही; कुणीकडून आज आपल्याला अमावस्या व कालीपूजेची गोष्ट सांगितली कुणास ठाऊक! तें ऐकल्यापासून आपल्यांत कसें एक संपूर्ण परिवर्तन होऊन गेलें."

शिष्याची ती मानसिक कातरता लक्षांत आल्याने स्वामीजी पुन्हा गाऊं लागले—"कखन कि रंगे थाक मा श्यामा सुधा-तरंगिणी—" गाणें संपल्यावर ते म्हणाले, "ही कालीच लीला-रूपी ब्रह्म. 'चालणारा साप आणि तोच वेटोळें घालून बसलेला साप' ही ठाकुर सांगत असत ती गोष्ट तर ऐकली आहेस ना?"

शिष्य— होय.

स्वामीजी— आता या वेळीं बरा झालों की माझ्या हृदय-रुधिराने कालीमातेची पूजा बांधीन. रघुनंदनाने सांगितलें आहे—

"नवम्यां पूजयेत् देवीं कृत्वा रुधिरकर्दमम्—" आता या खेपेला मी असेंच करीन. हृदयरुधिराने देवीची पूजा करावयास हवी—तरच कुठे झाली तर ती प्रसन्न होईल. (काली) मातेचे पुत्र वीर-महावीर असावयास हवेत. दुःखांत, कष्टांत, प्रलयमहाप्रलयांत कालीमातेचे पुत्र निर्भय-निडरच राहतील.

अशा गोष्टी होत असतांनाच खाली प्रसाद घेण्याची घंटा वाजली. ती ऐकून स्वामीजी म्हणाले, "जा, खाली जाऊन प्रसाद घे व पुन्हा लवकर परत ये." त्यांच्या आज्ञेनुसार शिष्य खाली निघून गेला.

## अध्याय ३८ वा

**स्थळ— बेलूर मठ**

**वर्ष— इ. स. १९०१**

**विषय—** आपल्या इच्छेनुसार कार्य होत नाहीसें पाहून स्वामीजींना झालेलें दुःख-- प्राप्त परिस्थितींत देशासमोर कोणता आदर्श ठेवणें कल्याणप्रद होईल-- महावीराचा आदर्श— देशांत वीरांच्या कठोरजीवनाला उपयुक्त अशा साऱ्या गोष्टींबद्दल आदर प्रचलित व्हावयास हवा-- कोणत्याहि स्वरूपातील दुर्बलतेचा त्याग करावयास हवा-- स्वामीजींच्या वाणींतील अद्‌भुत शक्तीचा प्रत्यय-- लोकशिक्षणार्थ शिष्याला प्रोत्साहन— सर्वांची मुक्ति झाल्याखेरीज व्यक्तीला सुटका नाही या मताची आलोचना-- सतत जगाची कल्याणकामना करून जगत्‌कल्याण साधणें.

स्वामीजी आजकाल मठांतच असतात. प्रकृति तितकीशी चांगली नाही, तरीहि सकाळसंध्याकाळीं फिरायला म्हणून ते बाहेर पडतात. आज शनिवार, शिष्य मठांत आला आहे. प्रणामानंतर स्वामीजींना तो प्रकृतीबद्दल कुशल विचारतो आहे.

स्वामीजी-- या माझ्या शरीराची अवस्था तर ही अशी पाहतोसच. तुम्हांपैकी कुणाचीहि मला मदत करायला पुढे येण्याची तयारी नाही. एकटा मी काय करूं शकणार ? बंगाल प्रांताच्या मातींतून या वेळीं घडलेलें हें शरीर आता यापेक्षा काय अधिक ताण सहन करूं शकेल ? तुम्ही सारे येथे आहांत-- शुद्ध आधार, तुम्हीं लोकांनी जर या कार्याला हातभार नाही लावला तर एकटा मी काय करूं बरें ?

शिष्य-- हे सारे ब्रह्मचारी त्यागी लोक आपल्या पाठीशीं उभे आहेत; मला तर खात्री आहे की आपल्या कार्यासाठी त्यांच्यापैकी प्रत्येकजण प्राणसुद्धा देईल. तरीहि आपण असें कां म्हणतां ?

स्वामीजी— खरोखर मला हवें आहे बंगाली तरुणांचें एक दल. तेच आहेत देशाचें आशास्थान. चारित्र्यवान्, बुद्धिवान्, परार्थ सर्वस्वाचा होम करणारे व आज्ञापालनतत्पर अशा युवकांवरच माझा आता भरवसा आहे. तेच माझ्या कल्पना प्रत्यक्ष जीवनांत उतरवून आपलें व देशाचें कल्याण साधण्यासाठी प्राण देखील देऊं शकतील. एरव्ही कितीतरी मुलांच्या झुंडीच्या झुंडी जातात-येतात. त्यांचे चेहरे असतात तमोगुणाने व्यापल्यामुळे आळसावलेले, हृदय असतें उद्योगशून्य, शरीर दुबळें व मनांत उत्साहाचा लवलेश नसतो त्यांच्या. अशांच्याकडून काय कांही काम होणार आहे ? नचिकेत्याप्रमाणे श्रद्धा-विश्वास असलेलीं १०–१२ मुलें जरी मला लाभतील तर देशाचा सारा विचार-प्रवाह, सारा उद्यम एका नवीन दिशेने मी संचालित करून टाकीन.

शिष्य-- महाराज, आपल्याकडे येणाऱ्या या इतक्या मुलांत काय आपल्याला हवे असणारे कुणीच नसतात ?

स्वामीजी-- जे मला योग्य आहेत असें वाटतें त्यांच्यापैकी कांही आधीच लग्न करून बसले असतात, तर कांहींनी मान, धन, यश मिळविण्याच्या खटपटींत स्वत:ला अगदी विकून घेतलें असतें. बाकी राहिलेल्यांपैकी कांही असतात अगदी अशक्त, दुर्बळ. यांखेरीज इतर जे असतात त्यांच्या अंगीं उच्च व उदात्त भाव समजण्याची मुळांतच कुवत नसते. माझ्या उच्च कल्पना ग्रहण करण्याची तुम्हां लोकांत ताकद आहे. पण तुम्हीहि कांही त्या प्रत्यक्ष कार्यांत आणायला अद्याप समर्थ नाही. या साऱ्या कारणांमुळे मन पुष्कळदा कष्टी होतें. वाटतें, हें मनुष्यशरीर धारण करून कांहीहि करून जाऊं शकलों नाही. कांहीहि असो, मी अजून कांही संपूर्णपणें हताश झालों नाही. ठाकुरांची इच्छा

असल्यास माझ्या कल्पनांनुसार कार्य करूं शकतील अशी महा-धर्मवीर, कर्मवीर मुलें कालांतराने याच साऱ्या मुलांतून निघतील—कुणीं सांगावें ?

शिष्य-- मला तर खात्री आहे की एक ना एक दिवस आपली ही उदार भावधारा साऱ्यांना स्वीकारावी लागेलच लागेल. आपली ही भावधारा साऱ्या विषयांना स्पर्श करून सर्व दिशांना प्रवाहित होत असल्याचें दृश्य मला आताच स्पष्ट दिसतें आहे. जीवसेवा असो, देशकल्याणव्रत असो, ब्रह्मविद्या-चर्चा असो वा ब्रह्मचर्यपालन असो आपले भाव या साऱ्यांत प्रवेश करून त्यांच्यांत एक प्रकारचें अभिनवत्व उत्पन्न करताहेत. आणि आज देशांतील लोकहि कांही उघड आपल्या नांवावर व कांही आपलें नांव वगळून आपलेच विचार स्वतःच्या नांवावर खपवतांना आढळतात.

स्वामीजी-- माझें नांव नाही जरी घेतलें त्यांनी तरी त्यांत काय मोठेसें ? माझे भाव, विचार घेतले त्यांनी की पुरें ! कामकांचनत्यागी होऊनहि शेकडा ९९ लोक नामयशादिकांतच बद्ध होऊन पडतात. Fame—that last infirmity of noble mind (कीर्तीची आकांक्षा हीच उच्च अंतःकरणाची शेवटची दुर्बलता असते) हें वाचलें आहेस ना तूं ? संपूर्णपणें फलकामना-त्याग करून काम करावयास हवें. चांगलें-वाईट, लोक तर दोन्ही-कडून बोलणारच. पण उच्च आदर्श समोर ठेवून आपण मात्र सिंहाप्रमाणे पराक्रम करावयास हवा, कर्म करावयास हवें. मग "निंदन्तु नीतिनिपुणाः यदि वा स्तुवन्तु—" विद्वान् लोक निंदा करोत वा स्तुति करोत तिकडे पाहण्याचें प्रयोजनच नाही कांही.

शिष्य-- आम्हीं स्वतःपुढे आता कोणता आदर्श ठेवावयास हवा ?

स्वामीजी-- महावीर हनुमन्ताचें चरित्र तुम्हीं डोळ्यासमोर आदर्श म्हणून ठेवावयास हवें. रामाची आज्ञा पालन करण्यासाठी तो सागरहि उल्लंघून गेला. जिण्या-मरण्याकडे दृष्टि नाही--महाजितेन्द्रिय, महाबुद्धिमान्. दास्यभावाच्या या परमोच्च आदर्शानुसारच तुम्हीं आपलीं जीवनें घडवावयास हवींत. असें करण्यानेच दुसऱ्या भावांचा उदय तुमच्या ठिकाणीं आपोआप होईल योग्य वेळीं. धरसोडीच्या द्विधावृत्तीचा त्याग व ब्रह्मचर्य-पालन यांतच यशाचें रहस्य आहे; नान्यः पन्था विद्यतेऽयनाय। दुसरा मार्ग नाही. हनुमन्तांत एकीकडे जसा सेवाभाव तसाच दुसरीकडे त्रैलोक्य ग्रासून टाकणारा सिंहपराक्रमहि आढळतो. प्रभु रामचंद्रांसाठी प्राण सुद्धा देण्यांत तो मागेपुढे पाहत नाही. रामाच्या सेवेपुढे त्याला सारें तुच्छ वाटे, अगदी शिवत्व, ब्रह्मत्व-लाभ देखील! फक्त रघुरायाची आज्ञा पाळणें हेंच होतें त्याचें जीवनव्रत. अशी एकाग्र निष्ठा असावयास हवी. झांजा, मृदंग, टाळ वाजवून कीर्तनाच्या नशेंत नाचतां नाचतां सारा देश अधोगतीला लागला आहे. आधीच तर सारे dyspeptic—अपचनाचे रोगी--त्यांतच हें नाचणें उडणें--हें काय मानवणार त्यांना? कामगंधहीन उच्च साधनेचें अनुकरण करूं जाऊन सारा देश तमोगुणांत बुडून गेला आहे अगदी. प्रान्तोप्रान्तीं, गावोगावीं, खेडोपाडीं कुठेहि जा हे झांज मृदंग ऐकूं येतील तुम्हांला. ढोल, दुंदुभी आता काय हिंदुस्थानांत तयारच होत नाहीत? भेऱ्या, तुताऱ्या भारतांत काय मिळणेंच बंद झालें आहे? या साऱ्यांचा गुरुगंभीर ध्वनि मुलाबाळांच्या कानांवर आदळूं द्या. अगदी पोरवयापासून बायकी वाद्यें ऐकूनऐकून, नाजूक संकीर्तनें श्रवण करूनकरून सारा देश अगदी स्त्रैण होऊन गेला आहे. यापरता अधिक अधःपात तो कोणता? या अधःपाताचें

चित्र रंगवितांना कविकल्पनेलासुद्धा हार खावी लागेल. डमरू, शिंग यांचा नाद निनादावयाला हवा, ढोल-नगाऱ्यांतून ब्रह्मरुद्र-तालाचा दुंदुभिरव गर्जू द्यायला हवा. ‘महावीर, महावीर’ या जयघोषाने व ‘हर हर ॐ ॐ’ या ध्वनीने दशदिशा प्रकंपित करून टाकावयास हव्यात. माणसाच्या कोमल-कोमलतर वृत्तींना चाळवणारें संगीत आता कांही काळ बंद करावयास हवें. ख्याल, टप्पा असले बायकी गाण्यांचे प्रकार बंद करून लोकांत ध्रुपद इत्यादींची आवड निर्माण करावयास हवी. वैदिक छंदांच्या घनगंभीर नादाने साऱ्या देशांत प्राणसंचार करावयास हवा. साऱ्याच गोष्टींत वीरत्वाचा कठोर महागौरव आणावयास हवा. या आदर्शाचें अनुसरण केल्यानेच लोकांचें, देशाचें कल्याण होईल. तूं एकटा जरी या आदर्शाचें पालन करून तो कार्यान्वित करूं शकलास तरी तुझें पाहून हजारों लोक तसें वागूं लागतील. पण लक्षांत ठेव, या ध्येयापासून एक पाऊलहि ढळावयास नको. कधीहि, कशाहि परिस्थितींत धीर सोडूं नकोस. खाणेंपिणें-पेहेरणें--गाणेंबजावणें, रोगभोग या साऱ्या अवस्थेंत तूं नैतिक धैर्य दाखवावयास हवें. तेव्हाच तर कुठे आशा आहे महाशक्तीची कृपा होईल ही ?

शिष्य-- एखाद एखाद वेळीं अगदी हतोत्साह झाल्यासारखें कां वाटतें ?

स्वामीजी-- अशा वेळीं स्मरण करीत जा ‘मी संतान कुणाचें? त्यांचा आश्रय लाभूनहि ही असली हीन बुद्धि, हा असला हतोत्साह माझ्या ठिकाणीं ?’ हीन बुद्धि, निरुत्साह वगैरेंना पायतळीं तुडवून ‘मी वीर्यवान्, मी मेधावान्, मी ब्रह्मविद्, मी प्रज्ञावान्’ असें म्हणून उठून उभा राहा. ‘मी अमक्याचा शिष्य, कामकांचन-जयी ठाकुरांच्या सहचरांचा साथी,’ अशा प्रकारें खूप अभिमान

धर. त्यामुळे तुझें कल्याणच होईल. असला अभिमान ज्याला नाही, त्यांत ब्रह्मजागृति होणें शक्य नाही. रामप्रसादांचें तें गाणें ऐकलें आहेस ना? ते म्हणत, 'ज्याची रक्षणकर्ती मा महेश्वरी आहे, तो मी या जगांत कुणाला भिणार?' अशा प्रकारचा अभिमान सदासर्वदा मनांत बाळगावयास हवा. अशाने हीन बुद्धि, निरुत्साह वगैरे गोष्टी जवळहि येणार नाहीत. दुर्बलतेला मनांत केव्हाहि थारा देऊं नकोस. महावीराचें, महामायेचें स्मरण कर, पाहशील सारी दुर्बलता, नेभळटपणा तत्काळ पळून जाईल.

असें बोलत बोलत स्वामीजी खाली आले. मठाच्या विस्तीर्ण मैदानावर जो आम्रवृक्ष आहे त्याच्या खाली अनेकदा खाट टाकून ते बसत, आजहि तेथे येऊन ते पश्चिमाभिमुख होऊन बसले. महावीर-भाव अद्यापहि जणु त्यांच्या नेत्रांतून ओसंडून बाहेर येत होता. बसल्यावर शिष्याला हजर असलेले ब्रह्मचारीसंन्यासी दाखवून ते म्हणाले, 'हेंच तर साक्षात् ब्रह्म! यांची उपेक्षा करून अन्य विषयांकडे तुमचीं मनें जातात? धिक्कार असो तुम्हांला. करतलामलकवत् हेंच तर ब्रह्म! दिसत नाही? हें--हें--!'

अशा हृदयस्पर्शी आवेगाने स्वामीजींनी वरील शब्द उच्चारले की ऐकतांच हजर असलेले सारे 'चित्रार्पितारंभ इवावतस्थे!'-- चित्राप्रमाणे तटस्थ झाले; जणु सारे गभीर ध्यानांतच मग्न. कुणाच्याहि तोंडन शब्द निघत नव्हता. स्वामी प्रेमानंद तेव्हा गंगेंतून कमंडलु भरून घेऊन ठाकुरमंदिरांत जात होते. त्यांच्या-कडे पाहून 'हेंच प्रत्यक्ष ब्रह्म, हेंच प्रत्यक्ष ब्रह्म' असें स्वामीजी म्हणूं लागले. तें ऐकून त्यांच्याहि हातांतील कमंडलु हातींच राहिला, जणु एखाद्या महानशेच्या प्रभावाने प्रभावित झाल्या-प्रमाणे तेहि तात्काळ समाधिमग्न झाले. अशीं १५ मिनिटें गेलीं. मग स्वामीजी प्रेमानंदांना म्हणाले, 'जा, आता ठाकुरपूजेला जा.'

तेव्हा कुठे स्वामी प्रेमानंदांना बाह्यसंज्ञा प्राप्त झाली. हळूहळू साऱ्यांची मनें 'मी-माझें'च्या राज्यांत आलीं व मग सर्वजण आपआपल्या कामाला निघून गेले.

त्या दिवशींचें तें दृश्य शिष्य यावज्जीव विसरूं शकणार नाही. स्वामीजींच्या कृपेने व शक्तिबलाने त्याचेंहि चंचल मन त्या दिवशीं अनुभूति-साम्राज्याच्या अगदी सन्निकट जाऊन पोहोचलें होतें. या घटनेला साक्षीभूत असणारे संन्यासी अद्यापहि बेलूर मठांत विद्यमान आहेत. स्वामीजींची त्या दिवशींची ती अद्भुत क्षमता पाहून सर्वंच लोक विस्मित होऊन गेले होते. एका क्षणांत त्यांनी साऱ्यांचीं मनें जणु समाधिसलिलांत निमग्न करून टाकलीं.

त्या शुभ दिवसाचें स्मरण झाल्यास शिष्य अद्यापहि भावविव्हल होतो. त्याला वाटतें पूज्यपाद आचार्यांच्या कृपेने ब्रह्मभाव प्रत्यक्ष अनुभवण्याचें सौभाग्य त्यालाहि लाभलें.

त्यानंतर कांही वेळाने शिष्याला बरोबर घेऊन स्वामीजी फिरावयास निघाले. जातांना ते शिष्याला म्हणाले, 'पाहिलेंस आज कसें झालें तें ? साऱ्यांना ध्यानस्थ व्हावें लागलें. हे सारेजण रामकृष्णांचेंच पुत्र की नाही, म्हणून म्हणतांक्षणीं त्यांना तात्काळ अनुभूति झाली !

शिष्य— माझ्यासारख्यांचें मन देखील निर्विषय होऊन गेलें, मग त्यांचें झालें असल्यास काय नवल ? आनंदाने माझें हृदय तर अगदी दाटून गेलें होतें ! आता मात्र त्या भावाची किंचित् छटाहि मनांत नाही—जणु एखादें स्वप्नच विरून गेलें !

स्वामीजी— वेळ येतांच सारें होईल. आता मात्र कामाला लागा. या महामोहग्रस्त जीवांच्या कल्याणासाठी कोणत्या तरी कार्याला चिकाटीने वाहून घ्या. पाहशील, यामुळे तो अनुभव पुन्हा आपोआप येईल.

शिष्य-- महाराज, असल्या कर्मप्रवाहांत निमग्न होण्याचें भय वाटतें. तेवढी ताकद नाही. शास्त्रेंहि सांगतात, 'गहना कर्मणो गतिः।'

स्वामीजी-- मग तुला काय आवडतें ?

शिष्य-- आपल्यासारख्या सकलशास्त्रार्थपारंगत व्यक्तीबरोबर निवास व तत्त्वचर्चा आणि श्रवण-मनन-निदिध्यासनाद्वारें याच देहीं ब्रह्मतत्त्वाचा प्रत्यक्ष लाभ यांखेरीज अन्य कोणत्याच विषयांत मला उत्साह वाटत नाही. अन्य कांहीहि करण्याचें सामर्थ्य आपल्यांत नाही असेंच मला वाटतें.

स्वामीजी— अशीच जर तुझी आवड असेल तर तेंच कर. तुझे सारे शास्त्र-सिद्धान्त लोकांना सांग. यामुळे अनेकांना लाभ होईल. शरीर असेंपावेतों काम न करतां तर कुणीहि राहूं शकत नाही. तेव्हा ज्या कर्माने इतरांना फायदा होईल तेंच करावें. तुझ्या स्वतःच्या अनुभूति व शास्त्रीय सिद्धान्तविवेचन यांच्याद्वारा पुष्कळ जिज्ञासूंना लाभ होईल. या साऱ्या गोष्टी लिहून ठेव. त्याहि लोकांना लाभदायकच होतील.

शिष्य— आधी मला कांही अनुभूति होऊं द्या, मग पुढे लिहिण्याचें पाहतां येईल. 'अधिकारदर्शक बिल्ला मिळाल्याखेरीज --आदेश मिळाल्याखेरीज--कुणीहि कुणाचें ऐकत नाही' असें ठाकुरच सांगत असत.

स्वामीजी— तूं ज्या साधना व वैचारिक अवस्थांतून जात आहेस तसे पुष्कळ लोक जगांत असतील. पुढचा मार्ग दिसत नसल्याने पुढे जाणें त्यांना जमत नसेल. तूं आपल्या अनुभूति व विचार लिहून काढल्यास त्यांना फायदा होण्यासारखा आहे. मठांतील साधूंबरोबर तूं जी 'चर्चा' करतोस ती सोप्या भाषेंत लिहून काढल्यास लोकांना लाभदायक होईल तें लिखाण.

शिष्य-- आपल्या आज्ञेनुसार असा प्रयत्न मी करून पाहीन.

स्वामीजी-- ज्या साधन-भजन वा अनुभूतींद्वारा परहित साधत नाही, महामोहग्रस्त जीवांचें कल्याण होत नाही, कामकांचनादिकांच्या कर्कश बंधनांतून बाहेर पडण्याला माणसाला मदत मिळत नाही त्या साधनभजनादिकांचा उपयोगच काय मुळी ? एखादाहि जीव बंधनांत असेपावेतों तुला मुक्ति लाभेल असें का तुला वाटतें ? जोंवर व जितके जन्म त्याचा उद्धार होत नाही तोंवर तुला जन्म घ्यावाच लागेल--त्याला मदत करण्यासाठी, त्याला ब्रह्मानुभूति घडवून देण्यासाठी. प्रत्येक जीव हा तुझाच भाग--अंगच तुझें. यामुळेच परहितार्थ कर्म अत्यावश्यक. आपल्या स्त्रीपुत्रादिकांना परम आत्मीय मानून त्यांच्या सर्वांगीण मंगलाची कामना जशी तूं सतत करतोस तशीच व त्याच ओढीने प्रत्येक जीवासाठी तूं केली पाहिजेस. तरच समजेन ब्रह्मजागृति होत आहे तुझ्या ठिकाणीं म्हणून. यापूर्वी एक क्षणहि मी तें मानावयास तयार होणार नाही. ही जातिवर्णनिर्विशेष मंगलकामना तुझ्या ठायीं जागृत झाल्यावरच तूं आदर्शाकडे जात आहेस असें मी म्हणेन.

शिष्य— साऱ्यांची मुक्ति झाल्याखेरीज व्यक्तिगत मुक्ति होणें शक्य नाही ही तर महाकठीण गोष्ट आहे ! असला अद्‌भुत सिद्धान्त मीं तर कधी कुठे ऐकला नाही.

स्वामीजी-- वेदान्तवाद्यांपैकी एका पक्षाचें असें मत आहे. ते म्हणतात--“ व्यष्टिगत मुक्ति हें मुक्तीचें यथार्थ स्वरूपच नव्हे. समष्टिगत मुक्ति हीच खरी मुक्ति.” अर्थातच या सिद्धान्तांतील उघड दोष दाखविणें सहज शक्य आहे.

शिष्य-- वेदान्ताच्या मतें व्यष्टिभाव हा तर बंधनाचें कारण आहे. तीच उपाधिगत चित्सत्ताच काम्यकर्मादिकांच्या योगें बद्ध

म्हणून प्रतीत होते. विचारबलाने उपाधिशून्य झाल्यास, निर्विषय होऊं शकल्यास प्रत्यक्ष चिन्मय आत्म्याला बंधन राहणार तरी कोठून ? ज्याला जीवजगतादिकांची जाणीव असते त्याला एक वाटूं शकेल की साऱ्यांना मुक्ति मिळाल्याखेरीज आपल्यालाहि मुक्ति नाही म्हणून. पण श्रवणमननादिकांद्वारा मन निरुपाधिक झाल्याने जेव्हा तें प्रत्यग्ब्रह्ममय होतें तेव्हा त्याच्या दृष्टीने अन्य जीव तरी कुठले वा जगत्‌हि तरी कुठलें ? यांतलें तेव्हा तर कांहीहि उरणार नाही. त्याच्या मुक्तीला बाधा आणणारे कांही मग असूंच शकत नाही.

स्वामीजी— तूं म्हणतोस तोच बहुतेक वेदान्तवाद्यांचा सिद्धान्त आहे, आणि तो निर्दोषहि आहे. त्यामुळे व्यक्तिगत मुक्तीला बाधाहि येत नाही. पण आबद्धजगताला बरोबर घेऊनच मी मुक्त होईन असें जो म्हणतो त्याच्या महदुदार हृदयाची एकदा नुसती कल्पना तर करून पाहा बरे मनाशीं.

शिष्य— ही त्याची भावना त्याच्या महदुदारतेची निदर्शक असेलहि, पण ती शास्त्रविसंगत आहे असेंच वाटतें.

अन्यमनस्कतेने दुसऱ्याच गोष्टींचा विचार करीत असल्याने शिष्याचें म्हणणें स्वामीजींच्या कानीं गेलें नसावेसें वाटतें. कांही वेळाने ते एकाएकी म्हणाले, "काय रे ! आपण कशाबद्दल बोलत होतों रे ?" जणु पूर्वीचें सारें बोलणें ते अजिबात विसरून गेले होते. त्या गोष्टींचें स्मरण करून दिल्यावर स्वामीजी म्हणाले, "रात्रंदिवस ब्रह्मचिंतनच कर. अगदी तद्‌गतचित्त होऊन एकाग्र मनाने ध्यान कर. आणि व्युत्थानकालीं जमल्यास एकतर लोकहितकारी काम कर किंवा मनांत चिंतन कर— "जीवांचें, जगताचें कल्याण होवो, सदैव मंगल होवो." "सर्वांचीच दृष्टि ब्रह्मावगाही होवो," अशा प्रकारें संतत केलेल्या

चिंतनतरंगांद्वाराच जगाचें मंगल होत असतें. जगांतील कोणतीहि चांगली गोष्ट कधी वाया जात नाही, मग ती गोष्ट म्हणजे एखादें सत्कार्य असो वा सद्विचार असो. तुझ्या चिंतनप्रवाहाने एखाद्या अमेरिकेंतील माणसालाहि चैतन्यलाभ होणें शक्य आहे.

शिष्य-- महाराज, माझें मन यथार्थपणें निर्विषय होईल असा मला आशीर्वाद द्या. अगदी इहजन्मीं हें घडावें.

स्वामीजी-- अरे कां नाही होणार तसें ? तुझी सोळा आणे इच्छा असेल तर खात्रीने तसें होईल.

शिष्य-- आपण मन एकाग्र, तन्मय करून देऊं शकतां. मला माहीत आहे, आपणांत तें सामर्थ्य आहे. आपण तें करून द्या एवढीच माझी प्रार्थना आहे.

असें बोलत बोलत स्वामीजी शिष्यासह मठांत येऊन पोहोचले. दशमीच्या चंद्रप्रकाशाने मठाचें उद्यान जणु रजतस्नात होऊन निघत होतें. उल्हसित चित्ताने स्वामीजींमागून मठ-मंदिरांत हजर होऊन शिष्य आनंदाने फिरूं लागला. स्वामीजी आराम करण्यासाठी म्हणून वर निघून गेले.

## अध्याय ३९ वा

**स्थळ-- बेलूर मठ**

**वर्ष-- इ. स. १९०१**

**विषय**— मठासंबंधी कर्मठ हिंदूंच्या पूर्वकल्पना-- मठांत साजरा झालेला दुर्गोत्सव व या कल्पनांचें खंडन-- आपल्या जन्मदात्या आईसह स्वामीजींनी घेतलेलें कालीघाट-दर्शन व त्या ठिकाणीं असलेल्या उदार भावासंबंधी त्यांनी व्यक्त केलेलें मत-- स्वामीजींसारखे ब्रह्मज्ञ पुरुष देवदेवीपूजन करतात ही विचारांत घेण्यासारखी गोष्ट-- धर्मरक्षणासाठीच महापुरुषांचें जन्मग्रहण-- देवदेवतांचें पूजन करूं नये असें कुणी प्रतिपादिल्यास स्वामीजी तें कधीहि मान्य करीत नसत-- स्वामीजींसारखा सर्वगुणसंपन्न ब्रह्मज्ञ महापुरुष या युगीं अन्य झाला नाही-- त्यांनी दर्शविलेल्या मार्गानें जाण्यांतच जीवांचें व देशाचें कल्याण होणार हें निश्चित.

बेलूर मठ स्थापन होण्याचे वेळीं नैष्ठिक सनातनी हिंदूंपैकी बरेचसे लोक मठांतील आचार-व्यवहारांवर कटु टीका करीत असत. विलायतेंतून फिरून आलेल्या स्वामीजींनी स्थापलेल्या मठांत हिंदूंच्या आचारनिष्ठेचें पालन होणें शक्य नाही, खाण्यापिण्याबाबत कांहीच विधिनिषेध तेथे पाळले जात नाहीत, या असल्या गोष्टींवरच टीकाकारांचा प्रामुख्यानें रोख असे, व या गोष्टींवरच विश्वास ठेवून शास्त्रज्ञानाचा गंधहि नसलेले केवळ नामधारी लहानमोठे हिंदू लोक सर्वस्वत्यागी संन्याशांच्या कार्यप्रणालीवर व्यर्थ व निराधार आक्षेप घेत असत. चालत्या नौकेंतून जाणारे कांही कुत्सित प्रवासी लोक मठाकडे बोट दाखवन नाना प्रकारची थट्टा करीत, इतकेंच नव्हे तर वेळप्रसंगीं खोटयानाटया, अश्लील व कुत्सित कंडयांचा छद्मी उल्लेख करून स्वामीजींच्या गौरवोज्ज्वल, धवल चारित्र्यावर शिंतोडे

उडविण्यासहि कमी करीत नसत. असल्या प्रकारचे कुत्सित व जघन्य प्रलाप नौकेंतून येत असतां शिष्याने स्वत: ऐकले आहेत. त्याच्या तोंडून हें गरळ कधी कधी ऐकून स्वामीजी म्हणत, 'हाथी चले बजारमें कुत्ता भौंके हजार। साधुनको दुर्भाव नहीं, जो निंदै संसार.' कधी ते म्हणत, 'देशांत कोणतीहि नवीन भावधारा प्रसृत होतेवेळीं तिच्या विरुद्ध बुरसट सनातनी लोकांनी गिल्ला करावा हा तर सनातन नियमच आहे. जगांतील प्रत्येक धर्मसंस्थापकाला असल्या परीक्षांना तोंड द्यावें लागलें आहे.' किंवा इतर एखादे वेळीं ते म्हणत, 'छळणूक, अत्याचार झाल्याखेरीज जगाला हितकर असणारी भावधारा समाजाच्या हृदयाला सहजासहजी जाऊन भिडत नाही.' या भावनेमुळे समाजाने घेतलेल्या या कटु कठोर आक्षेपांना वा हीन टीकांना स्वामीजी आपल्या नवभावधारेच्या प्रसाराला साहाय्यकच मानीत, स्वत: कधीहि त्याविरुद्ध एक चकार शब्दहि काढीत नसत किंवा गृहस्थ वा संन्यासी भक्तांना काढूं देत नसत. उलट ते सर्वांना सांगत, "फलाभिलाषा संपूर्णपणें सोडून देऊन आपलें कार्य करीत जा; एक ना एक दिवस त्याचें फळ मिळेलच मिळेल हें निश्चित." स्वामीजींच्या तोंडीं "न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति" हा गीतेंतील श्लोकार्ध नेहमी ऐकूं येत असे.

कर्मठ हिंदु-समाजाने चालविलेली ही कठोर टीकामोहीम स्वामीजींच्या महाप्रयाणापूर्वीच कशी बंद झाली याबाबतच कांही माहिती आता देण्याचें योजिलें आहे. १९०१ चा मे किंवा जून महिना असेल. शिष्य असाच एक दिवस मठांत आला होता. शिष्याला पाहतांच स्वामीजी म्हणाले, "अरे माझ्यासाठी रघुनंदनाच्या 'अष्टाविंशति तत्त्वा'ची एक प्रत शक्य तों लवकर मिळवून आण बरें."

शिष्य-- ठीक आहे. पण जिची कुसंस्कार व अंधश्रद्धात्मक भोळसट कल्पनांचा साठा म्हणून आधुनिक सुशिक्षित लोक हेटाळणी करतात ती रघुनंदनस्मृति घेऊन आपण काय करणार आहांत ?

स्वामीजी-- कां बरें ? स्वतःच्या वेळीं रघुनंदन एक दिग्गज पंडित मानला जात असे. त्याने साऱ्या प्राचीन स्मृतींचा संग्रह करून त्यांतून देशकालोपयोगी नित्यनैमित्तिक क्रियाकलाप निवडून संग्रहित करून ठेवले. त्याच्या या स्मृतीला धरूनच ना आजच्या साऱ्या बंगाली समाजाच्या हालचाली होत असतात ? पण त्याने हिंदुसमाजाला घालून दिलेल्या गर्भाधानापासून श्राद्धापर्यंतच्या साऱ्या कठोर आचारविचारांनी समाज अगदी त्रस्त होऊन गेला होता. मलमूत्रत्याग, खाणें, पिणें, चालणें इत्यादींची तर गोष्टच सोडा पण इतर प्रत्येक गोष्ट त्याने आपल्या कठोर नियमांनी बांधून काढण्याचा प्रयत्न केला होता. समाजांतील परिवर्तनामुळे अर्थातच ते नियम चिरस्थायी होऊं शकले नाहीत. सर्वदेशीं सर्वकालीं समाजांतील आचारप्रणाली--क्रियाकांड--नेहमीच बदलत असतें. बदल होत नसतो फक्त ज्ञानकांडांत. वैदिक कालांतहि कर्मकांडांत क्रमशः परिवर्तन झाल्याचेंच आढळून येतें. पण याउलट उपनिषत्प्रणीत ज्ञानकांड मात्र अद्यापहि तसेंच अखंड व अपरिवर्तित स्वरूपांत कायम आहे. त्यावर भिन्न भिन्न मतप्रणालींची वेगवेगळीं भाष्यें मात्र अनेक झालीं आहेत.

शिष्य-- पण रघुनंदनस्मृतीचें आपल्याला काय काम पडलें ?

स्वामीजी-- यंदा मठांत दुर्गोत्सव करावयाची माझी इच्छा आहे. खर्चाची जर कांही व्यवस्था झाली तर महामायेची पूजा करावयाची इच्छा आहे माझी. म्हणून दुर्गोत्सवाचे सारे विधि नजरेखालून घालावयाचे आहेत मला. पुढल्या रविवारीं जेव्हा येशील तेव्हा ती पोथी मात्र जरूर घेऊन ये.

शिष्य – जरूर आणीन.

सांगितल्याप्रमाणें रविवारीं शिष्य रघुनंदनकृत ‘अष्टाविंशति तत्त्व’ विकत घेऊन मठांत आला. तें पुस्तक अद्यापहि मठांत आहे. पुस्तक पाहून स्वामीजींना खूप आनंद झाला, व तें वाचण्याला त्या दिवसापासूनच प्रारंभ करून ४।५ दिवसांतच त्यांनी तें अथपासून इतिपर्यंत वाचून संपविलें. आठवडयाच्या शेवटीं शिष्याची भेट झाल्यावर ते म्हणाले, “तूं आणलेलें रघुनंदनाचें तें पुस्तक मीं सारें वाचून संपविलें. शक्य झाल्यास आता ( मठांत ) दुर्गापूजा करावयाची. रघुनंदनाने म्हटलें आहे ‘नवम्यां पूजयेत् देवीम् ।’ देवी भगवतीची इच्छा असल्यास तेंहि करीन.”

दुर्गापूजेपूर्वी दोन तीन महिने आधी शिष्याबरोबर स्वामीजींचें वरील बोलणें झालें होतें. पण नंतर मात्र याबाबत ते मठांतील इतर कुणाशींहि एक चकार शब्द बोलले नाहीत, व त्यांच्या वागण्या-बोलण्यांतील याबाबतचा मुग्धपणा पाहून शिष्यालाहि कधी वाटलें नाही की त्यांच्या मनांत याविषयी कांही विचार चालूं असतील. पूजेच्या अगदी १०।१२ दिवस अगोदरपर्यंत मठांत प्रतिमा आणून यंदा पूजा व्हावयाची आहे याबाबत चर्चा किंवा प्रत्यक्ष पूजेची तयारी अशी कांहीच नव्हती. याच सुमारास स्वामीजींच्या एका गुरुबंधूंना दशभुजा देवी दक्षिणेश्वरहून गंगे-वरून मठाकडे चालत येतांना दिसली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मठांत दुर्गापूजा करावयाची असें जेव्हा स्वामीजींनी साऱ्यांसमोर सुचविलें तेव्हा त्या गुरुबंधूंनी आपण आदल्या रात्रीं पाहिलेल्या त्या स्वप्नाचा वृत्तान्त त्यांना सांगितला. तो स्वप्नवृत्तान्त ऐकल्याने आनंदून जाऊन स्वामीजी म्हणाले “कशीहि का होईना पण यंदा मठांत दुर्गापूजा करायचीच.” यानंतर पूजा करावयाचें

निश्चित झालें. स्वामीजी, स्वामी प्रेमानंद व ब्रह्मचारी कृष्णलाल त्या दिवशीं नौकेंतून बागबाजाराकडे गेले. जाण्यांत त्यांचा हेतु होता बागबाजारांत त्या वेळीं राहत असलेल्या श्रीरामकृष्ण-भक्तजननी माताजींकडे * ब्रह्मचारी कृष्णलाल याला पाठवून पूजेसाठी त्यांची अनुज्ञा आहे किंवा नाही हें पाहणें व पूजेचा संकल्प त्यांच्या नांवें सोडण्यांत येईल हें त्यांना कळविणें. कारण सर्वस्वत्यागी संन्यासी मंडळींना कुठल्याहि क्रियेचा "संकल्प" सोडण्याचा अधिकार नसतो.

माताजींनी पूजेला अनुमति दिली व संकल्पहि त्यांच्याच नांवाने सोडण्याचें निश्चित झालें. परवानगी मिळाल्याने स्वामीजींना अत्यंत आनंद झाला व त्याच दिवशीं कुंभारआळींत प्रतिमेसाठी आगाऊ पैसे देण्याची व्यवस्था करून ते मठांत परत आले. स्वामीजींनी ठरविलेल्या पूजेची ही गोष्ट सर्वांच्या कानीं गेली व ठाकुरांच्या गृहस्थभक्तांनीहि या पूजेंत मोठ्या आनंदाने भाग घेण्याचें ठरविलें.

पूजासाहित्य जमविण्याची सारी जबाबदारी स्वामी ब्रह्मानंदांवर पडली. पूजकपद ब्रह्मचारी कृष्णलाल यांच्याकडे सोपविण्यांत आलें. तंत्रधारकपदीं स्वामी रामकृष्णानंदांचे वडील साधकाग्रणी श्रीयुत ईशानचंद्र भट्टाचार्य यांची नियुक्ति करण्यांत आली. मठांत आनंद तर मावत नव्हता. सध्या मठांत जेथे ठाकुरउत्सव होतो त्याच ठिकाणीं मांडव उभारण्यांत आला होता. षष्ठीबोधनाचे एकदोन दिवस आधी कृष्णलाल, निर्भयानंद वगैरे ब्रह्मचारी-संन्यासी मंडळींनी जाऊन नौकेंतून देवीप्रतिमा मठांत आणली. ठाकुरमंदिराच्या खालच्या भागांत प्रतिमा ठेवतांच

---

* श्रीरामकृष्णांच्या लीलासहधर्मिणी श्रीसारदामणि देवी.

मुसळधार पाऊस सुरू झाला. देवीप्रतिमा निर्विघ्नपणें मठांत येऊन पोहोचली, आता पाऊस आला तरी हरकत नाही या विचाराने स्वामीजी अगदी निश्‍चिंत होते.

इकडे स्वामी ब्रह्मानंदांच्या प्रयत्नांनी मठांत साऱ्या वस्तु जमल्या होत्या, त्यांत कसलीहि कमतरता नव्हती हें पाहून स्वामीजी स्वामी ब्रह्मानंदांची खूप प्रशंसा करीत होते. पूर्वी नीलांबरबाबूंच्या ताब्यांत असलेलें मठाच्या दक्षिणेकडील उद्यान-गृह एक महिन्यासाठी भाड्याने घेऊन पूजेच्या आदल्या दिवशीं माताजींना तेथे आणविण्यांत आलें. अधिवासाची सायंपूजा सध्या स्वामीजींचें जें समाधिमंदिर आहे त्यांच्या समोरील बिल्ववृक्षा-खाली करण्यांत आली. त्या बिल्ववृक्षतळीं बसून पूर्वी एक दिवस त्यांनी "बिल्ववृक्षमूले पातिये बोधन, गणेशेर कल्याणे गौरीर आगमन" हें जें गाणें म्हटलें होतें तें आज अगदी अक्षरशः खरें झालें.

माताजींची अनुमति घेऊन ब्रह्मचारी कृष्णलाल महाराजांनी सप्तमीच्या दिवशीं पूजकाचें आसनावर उपवेशन केलें. कौलाग्रणी तंत्रकोविद ईश्वरचंद्र भट्टाचार्यांनी माताजींच्या आदेशानुसार देवगुरु बृहस्पतीप्रमाणे तंत्रधारकाचें आसन ग्रहण केलें. यथाशास्त्र देवीपूजन संपन्न झालें. माताजींच्या सांगण्यावरून फक्त पशुबली देण्याचें टाळण्यांत आलें. बळीऐवजी साखरेचा नैवेद्य व मिठाईचे ढीग मूर्तीच्या दोन्ही बाजूंना शोभत होते.

गरीब, दुःखी, कंगाल, दरिद्री लोकांना ईश्वरज्ञानाने भोजन देऊन संतुष्ट करणें हेंच पूजेचें महत्त्वाचें अंग ठरलें. याखेरीज बेलूर, बाली, उत्तरपाडा येथील परिचित-अपरिचित अशा अनेक ब्राह्मण पंडितांना निमंत्रण देण्यांत आलें होतें व त्यांनीहि येऊन उत्सवांत मोठ्या आनंदाने भाग घेतला. यावेळेपासून त्यांच्या

मनांत मठाबद्दल असलेला भ्रममूलक, अकारण द्वेष दूर झाला व मठांतील संन्यासी हे यथार्थ हिंदुसंन्यासी होत याची त्यांना पूर्ण कल्पना आली.

तें कांहीहि असो पण या तीन दिवसांच्या महोत्सवाने मठ आनंदाने भरून गेला होता. नौबतखान्यांतील सुललित स्वरतरंग गंगेच्या परतीरावर प्रतिध्वनित होऊं लागले. ढोल नगाऱ्यांच्या रुद्रगंभीर तालावर कलकलनिनादिनी जान्हवी हर्षाने जणु नृत्य करूं लागली. 'वाढा, घ्या, खा' ह्या शब्दांखेरीज मठांतील संन्याशांच्या तोंडीं त्या तीन दिवसांत अन्य कांहीहि ऐकूं येत नव्हतें. पूजासमारंभाला साक्षात् माताजी उपस्थित होत्या. जी पूजा स्वामीजींकडून संकल्पित केली गेली, देवतुल्य देहधारी महापुरुषगणांनी ज्या पूजेचा सारा कार्यभाग आपल्या शिरावर घेतला होता ती पूजा अगदी संपूर्णतया निर्दोष स्वरूपांत यथासांगपणें पार पडली यांत आश्चर्य तें कोणतें? गरीब-दु:खी दरिद्रीनारायणांच्या भोजनपरितृप्त शब्दांनी मठ तीन दिवस अगदी भरून गेला होता.

महाष्टमीच्या आदल्या रात्रीं स्वामीजी तापाने निजले. त्यामुळे दुसऱ्या दिवशीं ते पूजासमारंभांत सामील होऊं शकले नाहीत. पण संध्याकाळीं उठून जास्वंद, मोगरा, वगैरेंचा अर्घ्य तीनदा त्यांनी महामायेच्या चरणीं अर्पण केला व ते आपल्या खोलींत परत फिरले. नवमीच्या दिवशीं त्यांच्या तब्यतीला थोडा आराम पडला व म्हणून नवमीच्या रात्रीं ठाकुर स्वत: जीं पदें गात त्यांतली एक दोन त्यांनी स्वत: गाइलीं. मठांत तर त्या रात्रीं आनंदाचें जणु नुसतें तुफान उठलें होतें.

नवमीच्या दिवशीं पूजा आटोपल्यावर माताजींकडून होमसमाप्ति करविण्यांत आली. यज्ञाचा टिळा ललाटीं लावल्याने व

संकल्पित पूजा समाप्त झाल्याने स्वामीजींच्या मुखमंडलावर दिव्यभावतेज विलसत होतें. दशमीच्या दिवशीं सायंकाळीं देवी-प्रतिमेचें गंगेंत विसर्जन झालें. नंतर दुसऱ्याच दिवशीं माताजीहि स्वामीजी व इतर संन्यासी वगैरे मंडळींना आशीर्वाद देऊन बागबाजारांतील आपल्या निवासस्थानीं परत गेल्या.

याच वर्षीं स्वामीजींनी प्रतिमा आणवून मठांत श्रीलक्ष्मी व श्यामादेवी पूजन यथाशास्त्र करविलें. याहि वेळीं तंत्रधारकपदावर श्रीयुत ईशानचंद्र भट्टाचार्य व पूजकपदावर कृष्णलाल महाराज यांचीच योजना करण्यांत आली होती.

श्यामापूजन आटोपल्यावर एक दिवस स्वामीजींच्या आईचा मठांत निरोप आला की फार पूर्वी ते लहान असतांना तिने एक नवस केला होता की स्वामीजींना कालीघाटावर नेऊन महामाया देवीची पूजा करीन. -- आणि तो पूर्ण करणें आता आवश्यक होतें. आईच्या खूप निकडीच्या आग्रहावरून मार्गशीर्ष महिन्याच्या शेवटीं तब्यत ठीक नसतांनाहि ते एक दिवस कालीघाटावर गेले. त्या दिवशीं कालीघाटावरील पूजा आटोपून मठांत फिरतेवेळीं त्यांची शिष्याशीं गाठ पडली व मग तेथे पूजा वगैरे कशी काय झाली हें सांगत सांगत ते शिष्यासह मठांत येऊन पोहोचले. तेंच त्यांचें बोलणें आता पुढे देतों.

स्वामीजी लहान असतांना एकदा खूप आजारी पडले. त्या वेळीं त्यांना बरें वाटावें म्हणून त्यांच्या आईने नवस केला होता की मुलाला बरें वाटलें तर त्याला कालीघाटावर नेऊन त्याच्या-करवी देवीची विशेष पूजा बांधीन व देवीमंदिरांत त्याला देवीपुढे लोटांगण घालण्यासाठी घेऊन येईन. या नवसाची कुणालाहि आठवणच नव्हती. आता स्वामीजी पुन्हा आजारी पडल्याचें ऐकून त्यांच्या आईला त्या नवसाचें स्मरण झालें व तो

स्वामीजींना सांगून ती त्यांना कालीघाटावर घेऊन गेली. कालीघाटावर गंगास्नान आटोपून आईच्या सांगण्याप्रमाणे ओल्या कपड्यांनिशीच ते देवीमंदिरांत गेले व कालीमातेसमोर त्यांनी तीनदा लोटांगण घातलें. नंतर बाहेर येऊन मंदिराला त्यांनी सात प्रदक्षिणा घातल्या. हें आटोपल्यावर सभामंडपाच्या पश्चिमेकडील खुल्या चबुतऱ्यावर बसून त्यांनी स्वतःच तेथे होम केला. अमित बलशाली तेजःपुंज संन्याशाने केलेला तो होम पाहण्यासाठी त्या दिवशीं देवीच्या मंदिरांत खूपच गर्दी लोटली होती. शिष्याबरोबर अनेकदा स्वामीजींकडे गेलेले शिष्याचे कालीघाटनिवासी मित्र श्रीयुत गिरीन्द्रनाथ मुखोपाध्याय यांनी तो होम स्वतः डोळ्यांनी पाहिला होता. होमांत वारंवार घृताहुती टाकतांना स्वामीजी त्या दिवशीं जणु ब्रह्मदेवच आहेत की काय असें वाटल्याचें ते सांगतात. आधी सांगितल्याप्रमाणे शिष्याला सारी हकीगत सांगून स्वामीजी शिष्याला अखेर म्हणाले, " कालीघाटच्या मंदिरांत आज काय उदार भाव आढळन आला. मी 'विलायतेहून समुद्रयात्रा करून आलेला विवेकानंद' आहे हें ठाऊक असूनहि मंदिराध्यक्षांनी मला देवळांत जाऊं देण्याबाबत कोणतीच हरकत घेतली नाही, इतकेंच नव्हे तर मंदिरांत नेऊन मनाप्रमाणे पूजा करण्याला त्यांनी मला आनंदाने खूपच मदत केली.

अशा रीतीने जीवनाच्या शेषभागीं स्वामीजींनी हिंदूंच्या पूजापद्धतीबद्दल आंतरिक व बाह्य असा बहुमान व्यक्त केला. स्वामीजींना फक्त वेदान्तवादी म्हणून ओळखणाऱ्या लोकांनी त्यांनी केलेलें हें पूजानुष्ठान विशेषेंकरून लक्षांत ठेवण्यासारखें आहे. 'I have come to fulfil and not to destroy"— " मी शास्त्रमर्यादांचें रक्षण–पूरण करण्यासाठी आलों आहें,

त्यांचा ध्वंस करण्यासाठी नव्हे " या विधानाची सार्थकता त्यांच्या जीवनांत अनेकदा आढळते. वेदान्तकेसरी श्रीशंकराचार्यांनी आपल्या वेदान्त-उद्घोषाने सारा भूलोक प्रकंपित करूनहि ज्याप्रमाणे ते हिंदूंच्या देवदेवतांना मान द्यावयास चुकले नाहीत, भक्तिभावप्रेरित होऊन ज्याप्रमाणे त्यांनी या देवदेवतांना उद्देशून नाना स्तोत्रें रचिलीं त्याचप्रमाणे स्वामीजींनीहि सत्य व कर्तव्य पालन करण्यासाठी उपरिनिर्दिष्ट अनुष्ठानाचरण करून हिंदु-धर्माबद्दल आपला बहुमानच प्रदर्शित केला. रूपगुणांत, विद्या-वक्तृत्वांत, शास्त्रविवेचनांत, लोककल्याणकामनेंत, साधना व जितेन्द्रियतेच्या बाबतींत स्वामीजींच्या तोडीचा सर्वज्ञ सर्वदर्शी महापुरुष या शतकांत अन्य कुणीहि झाला नाही. भारतांतील भावी पिढ्यांना ही गोष्ट हळूहळू कळेल. त्यांच्या सत्संगाने आम्ही धन्य व मुग्ध झालों आहोंत व या शिवतुल्य महापुरुषाला समजून घ्या, त्याच्याच आदर्शानुसार आपआपलीं जीवनें घडवून घ्या एवढ्यासाठी आम्ही जातिनिर्विशेष समस्त भारतवर्षीयांना आवाहन देत आहोंत. ज्ञानांत शंकर, सहृदयतेंत बुद्ध, भक्तींत नारद, ब्रह्मज्ञतेंत शुकदेव, तर्कनैपुण्यांत बृहस्पति, रूपवंतांत मदन, साहससामर्थ्यांत अर्जुन व शास्त्रज्ञानांत जणु प्रतिव्यासदेवच असणाऱ्या स्वामीजींना पूर्णपणें आकलन करून घेण्याची वेळ आता आली आहे. बहुमुखी व सर्वस्पर्शी प्रतिभा असलेल्या स्वामीजींचेंच जीवन या वर्तमानयुगाचा एकमात्र अवलंबनीय आदर्श आहे यांत कांहीहि शंका नाही. या महासमन्वयाचार्याच्या सर्वमतसमन्वयकारी ब्रह्मविद्येच्या तमोध्वंसी किरणांनी ससागरा पृथ्वी उद्भासित झाली आहे. बंधूंनो ! पूर्व–गगनभागीं दिस-णाऱ्या या नवोदित अरुणछटांच्या दर्शनाने आता जागे व्हा व नवजीवनाच्या संजीवक प्राणस्पंदनांचा अनुभव घ्या.

# अध्याय ४० वा

**स्थळ--बेलूर मठ**

**वर्ष--इ. स. १९०२**

विषय—भविष्यकालीं ठाकुरांचा जन्मोत्सव कशाप्रकारें साजरा होणें उचित--शिष्याला दिलेला आशीर्वाद--'इथे ज्या अर्थी येऊन पोहोचला आहेस त्या अर्थी निश्चित ज्ञानलाभ होईलच' --गुरु शिष्याला कितपत व कोठवर साहाय्य करूं शकतात—अवतारपुरुष एका क्षणांत जीवाचीं सारीं बंधनें तोडून, खंडून टाकू शकतात—कृपातत्त्व--ठाकुरांनी शरीर सोडून दिल्यानंतर त्यांचें झालेलें दर्शन--पवहारी बाबा व स्वामीजी यांचा संवाद.

स्वामीजींनी आपल्या हयातींत पाहिलेला असा हा शेवटचा ठाकुर-जन्मोत्सव दिन आहे. याच उत्सवानंतरच्या बंगाली तिथीप्रमाणे आषाढांतील २० व्या तारखेस रात्रीं ९ च्या सुमाराला त्यांनी आपली इहलोकींची लीला संपविली. उत्सवापूर्वी कांही दिवस अगोदरपासूनच त्यांची प्रकृति खालावली आहे. वरून खाली येणें त्यांचें जवळजवळ बंद झालें आहे--चालणेंच अशक्य, दोन्ही पायांवर सूज आली आहे. फारसें बोलणेंचालणें करावयालाहि डॉक्टरांनी मनाई केली आहे.

शिष्याने एक रामकृष्णस्तोत्र संस्कृतांत रचून तें छापून घेऊन दाखवावयास आणलें आहे. येतांच स्वामीजींच्या दर्शनासाठीं म्हणून तो वर गेला. स्वामीजी खाली फर्शीवरच किंचित् लवंडले आहेत. येतांच शिष्याने प्रणाम केला व तो त्यांच्या पायांवरून हात फिरवूं लागला. शिष्याने आणलेलें स्तोत्र वाचून पाहण्यापूर्वी स्वामीजी त्याला म्हणाले, "पाहा, अगदी सावकाश हात फिरव पायांवरून. फारच दुखताहेत पाय माझे." शिष्य अगदी हळूहळू पायांवरून हात फिरवून देऊं लागला.

स्तोत्र वाचून झाल्यावर स्वामीजी म्हणाले, " वा ! फार सुरेख साधलें आहे हें !" हाय ! शिष्याला तेव्हा काय माहीत होतें की यापुढे त्याच्या स्तोत्रांची प्रशंसा करावयाला स्वामीजी राहणार नाहीत म्हणून.

स्वामीजींची तब्यत इतकी ढासळल्याचें पाहून शिष्याचा चेहेरा म्लान झाला व हृदय शतशः विदीर्ण होऊन त्याला रडें कोसळलें.

शिष्याची ती मनोवेदना लक्षांत येतांच स्वामीजी म्हणाले, "कसला रे येवढा विचार करतो आहेस ? जन्माला आलेलें हें शरीर कधी ना कधी तरी जाणारच. माझी भावधारा जर मी तुमच्यांत प्रविष्ट करूं शकलों असेन तरच समजेन या माझ्या देहधारण करण्याचें कांही सार्थक झालें."

शिष्य--आम्ही काय आपल्या दयेला पात्र आहोंत ? आपण आपल्या दयाबुद्धीने जी कृपा केली तिनेच मी स्वतःला भाग्यवान समजतों.

स्वामीजी--नेहमी लक्षांत ठेव की त्याग हाच आहे मूलमंत्र. या त्यागमंत्राची दीक्षा घेतल्याखेरीज ब्रह्मादिकांनाहि मुक्तीची आशा नाही.

शिष्य--महाराज, आपल्या तोंडून सदोदित ही गोष्ट ऐकूनहि इतके दिवसांत ती उमजली नाही, माझी संसारासक्ति गेली नाही ही काय कमी खेदाची गोष्ट आहे ? आपल्या या आश्रित दीनावर कृपा करा, आशीर्वाद द्या मला की हा मंत्र मला प्राणोप्राण उमजेल.

स्वामीजी--त्याग तर खात्रीने येईलच, पण माहीत आहे ना--'कालेनात्मनि विन्दति ?'-- सुयोग्य वेळ आल्याखेरीज कांहीहि होत नाही. गतजन्मांचे कांही संस्कार नष्ट झाले की त्यागवृत्ति अंकुरित होईल.

हें ऐकून अगदी व्याकुळ भावाने स्वामीजींचे पाय धरून शिष्य म्हणाला, "महाराज, या दीनातिदीन दासाला जन्मोजन्मीं आपल्या पायाशीं आसरा द्या येवढीच माझी प्रार्थना. आपल्या संगतींत ब्रह्मज्ञानाचीहि इच्छा मला होत नाही.

कांहीहि उत्तर न देतां स्वामीजी अन्यमनस्कपणें दुसऱ्याच कशाचा तरी विचार करूं लागले. शिष्याला वाटलें ते जणु सुदूर भविष्यांतील आपल्या जीवनाचें चित्र निरखीत असावेत. कांही वेळाने ते म्हणाले, "बाहेर जाऊन लोकांची नुसती गर्दी पाहून काय लाभ? आज आता येथेच माझ्याजवळ थांब. निरंजनला दाराशीं थांब म्हणावें. कुणीहि आंत येऊन त्रास नको द्यायला." धावतच जाऊन शिष्याने निरंजनानंदांना स्वामीजींचा निरोप कळविला. स्वामी निरंजनानंदहि हातचीं बाकी सारीं कामें टाकून देऊन, डोक्याला पटका बांधून व हातीं मोठी काठी घेऊन स्वामीजींच्या खोलीच्या दाराशीं येऊन बसले.

नंतर खोलीचें दार बंद करून शिष्य पुन्हा स्वामीजींजवळ येऊन बसला. अगदी मनाप्रमाणे स्वामीजींची सेवा करतां येईल या विचाराने त्याचें हृदय आनंदाने भरून गेलें होतें. पाय दाबतां दाबतां तो अगदी लहान मुलाप्रमाणे मनांतल्या साऱ्या गोष्टी स्वामीजींना मोकळेपणीं सांगूं लागला. स्वामीजीहि सहास्यवदनाने त्याच्या त्या प्रश्नादिकांचीं उत्तरें देऊं लागले. अशा रीतीने तो दिवस जाऊं लागला.

स्वामीजी-- आता साजरा होतो आहे तसा न होतां आणखी कांही वेगळ्या प्रकारें जर ठाकुर-उत्सव होईल तर बरें असें मला वाटतें. एकाच दिवसांत न संपतां हा उत्सव चांगला चारपांच दिवस चालायला हवा. पहिल्या दिवशीं शास्त्रपाठ व चर्चा ठेवावी. दुसऱ्या दिवशीं जमल्यास वेद-वेदान्त विचार व मीमांसा

घडवून आणावी. तिसऱ्या दिवशीं एखादा प्रश्नोत्तर-वर्ग आयोजित करावा. शक्य झाल्यास यानंतरच्या दिवशीं एखादें व्याख्यान व अखेरच्या दिवशीं आता जसा महोत्सव होतो तसाच तो साजरा करावा. दुर्गापूजा होते ना चार दिवस, तसाच हाहि उत्सव व्हावा. असा उत्सव केल्यास शेवटचा दिवस खेरीज करून अन्य दिवशीं ठाकुरांच्या भक्तांशिवाय बहुधा इतर कोणीहि लोक येणार नाहीत. आता समज ते नाहीहि आले, तरी त्याचें काय एवढें मोठेसें मानायचें ? खूप लोकांनी गर्दी केल्यानेच कांही ठाकुरांच्या मतांचा प्रसार होणार आहे असें नाही.

शिष्य-- अतिशय सुंदर आहे महाराज आपली ही कल्पना. पुढल्या खेपेला हा उत्सव असाच साजरा व्हावयास हवा. आपली इच्छा असल्यास सारें योग्य प्रकारें होईल.

स्वामीजी— बाबा, आता स्वतः या साऱ्या गोष्टी करायची मला कांही इच्छा होत नाही. यापुढे तुम्ही या साऱ्या गोष्टी सांभाळा--करा.

शिष्य-- या खेपेला संकीर्तनाच्या पुष्कळच दिंडया आल्या आहेत.

हें ऐकून त्या पाहण्यासाठी म्हणून स्वामीजी खोलीच्या दक्षिणेकडील मधल्या खिडकीचा कठडा धरून उभे राहिले व उपस्थित असंख्य भक्तमंडळींकडे पाहूं लागले. थोडा वेळ उभ्यानेच पाहून झाल्यावर ते बसले. उभे राहून त्यांना त्रास झाला असावा अशा भावनेने शिष्य त्यांना पंख्याने वारा घालूं लागला.

स्वामीजी-- तुम्ही आहांत ठाकुरलीलेंतील नट. यापुढे आमची तर गोष्टच सोड, लोक तुमचेंहि नांव घेतील. हीं जीं स्तोत्रें तूं लिहिलीं आहेस, तीं लोक यापुढे भक्ति-मुक्तिलाभासाठी पठन करतील. लक्षांत ठेव--आत्मज्ञानलाभच परमोच्च साध्य.

अवतारपुरुषरूपी जगत्‌गुरूवर भक्ति झाल्यास हें ज्ञान योग्य वेळीं आपोआपच प्रस्फुटित होईल.

हें सारें बोलणें शिष्य विस्मयचकित होऊन ऐकत होता.

शिष्य-- महाराज, हा ज्ञानलाभ मला होईल ना ?

स्वामीजी-- ठाकुरांच्या आशीर्वादेंकरून तुला ज्ञान-भक्ति यांचा लाभ होईल, पण सांसारिक जीवनांत तुला विशेष सुख-समाधान लाभणार नाही.

स्वामीजींच्या या बोलण्याने शिष्य विषण्ण झाला व आपल्या बायको-मुलाबाळादिकांची काय अवस्था होईल याचा विचार करूं लागला.

शिष्य-- आपण दया करून जर माझ्या मनाचीं बंधनें तोडून टाकाल तरच कांही उपायाची आशा आहे. एरव्ही या दासाला अन्य कांही मार्ग नाही. आपण वचन द्या याच जन्मीं मला मुक्तिलाभ होईल असें.

स्वामीजी -- अरे, भय कसचें रे ? ज्या अर्थीं तूं येथे येऊन पोहोचला आहेस त्या अर्थीं खात्रीने सारे कांही होऊन जाईल.

शिष्य स्वामीजींचे पाय धरून रडत रडत म्हणाला, 'या खेपेला माझा उद्धार केलाच पाहिजे.'

स्वामीजी-- कोण कोणाचा उद्धार करूं शकतो सांग बरें ? गुरु फक्त कांही आवरणें दूर करूं शकतात. हीं आवरणें अपसारित झाल्यावर आत्मा स्वयंज्योतिप्रभावाने व आपल्या परिपूर्ण गौरवमहिम्याने सूर्याप्रमाणे प्रकाशमान होतो.

शिष्य-- तर मग शास्त्रें 'कृपे'बद्दल इतकें सांगतात तें काय म्हणून ?

स्वामीजी-- कृपा म्हणजे तरी काय माहीत आहे ? आत्म-साक्षात्कार झालेल्या व्यक्तींच्या ठिकाणीं एका महाशक्तीचा

उदय होतो. तिच्या आश्रयाने, तिला केंद्र करून विशिष्ट त्रिज्येचें जणु एक वर्तुळच तयार होतें व त्या वर्तुळांत जे येतात ते या महात्म्याच्या प्रभावाने अनुप्राणित होतात. याचाच अर्थ असा की या आत्मवित् महापुरुषाच्या प्रभावाने ते प्रभावित होतात. यामुळेच साधन-भजन न करतां देखील ते अपूर्व आध्यात्मिक फळाचे अधिकारी होतात. यालाच जर तुला 'कृपा' म्हणून संबोधावयाचें असेल तर संबोध तूं.

शिष्य-- याखेरीज कृपेचा अन्य कांही प्रकार नाही का महाराज ?

स्वामीजी-- तसाहि आहे. जेव्हा अवताराचें आगमन होतें तेव्हा अवतारलीलेल्या पुष्टीसाठी म्हणून त्याचेबरोबर मुक्त, मुमुक्षु पुरुषहि शरीर धारण करून येतात. कोटिकोटि जन्मांचा (अज्ञान) अंधकार घालवून लावून एकाच जन्मीं मुक्ति देणें हें एकमात्र अवतारालाच शक्य आहे. यालाच म्हणतात कृपा. आलें ध्यानांत ?

शिष्य-- होय. पण ज्यांना त्यांचें दर्शन लाभत नाही त्यांच्यासाठी काय उपाय ?

स्वामीजी--त्यांच्यासाठी उपाय म्हणजे त्या अवताराची करुणा भाकणें. त्याची प्रार्थना करतां करतां, करुणा भाकतां भाकतां त्याचें दर्शन लाभतें,-- ठीक आता जसा तूं मला पाहतो आहेस तसेंच सशरीर दर्शन होतें त्याचें व त्याची कृपा लाभते.

शिष्य-- महाराज, ठाकुरांनी देहत्याग केल्यावर आपल्याला त्यांचें कधी दर्शन झालें होतें का ?

स्वामीजी-- ठाकुरांच्या लीला-समाप्तीनंतर कांही दिवस मी गाझीपूर येथे पवहारी बाबांच्या सहवासांत होतों. त्यांच्या आश्रमाजवळीलच एका बागेंत तेव्हा माझें वास्तव्य होतें.

'भुताटकीचा बाग' म्हणूनच लोक त्या बागेचा उल्लेख करीत. मला मात्र तेथे कसलेंहि भय वाटत नसे. तूं तर जाणतोस की ब्रह्मदैत्य, भुतेंखेतें वगैरेंची मला मुळीच भीति वाटत नाही. या बागेंत लिंबाचीं खूप झाडें होतीं-- फळांनी लदबदलेलीं अगदी. त्या वेळीं मला पोटाची खूप व्यथा होती अन् त्यांतच तेथे पोळ्यांशिवाय अन्य कसलीहि भिक्षा मिळत नसे. म्हणून त्या पोळ्या पचण्यासाठी खूप लिंबें खात असे मी. पवहारी बाबांकडे सतत जाणेंयेणें केल्यामुळे ते मला खूपच आवडूं लागले होते. त्यांचेंहि माझ्यावर खूप प्रेम होतें. एक दिवस माझ्या मनांत विचार आला की ठाकुरांपाशी इतके दिवस राहूनहि हें रोगी शरीर निरोगी करण्याचा कांही उपाय तर आपल्याला लाभला नाहीच कांही. पवहारी बाबांना हठयोग येतो असें ऐकलें होतें. तेव्हा त्यांच्याजवळून हठयोगाच्या थोड्या फार क्रिया शिकून घेऊन शरीर सुदृढ करण्यासाठी कांही दिवस साधना करण्याचें मीं ठरविलें. तुला तर माहीत आहेच की पूर्वबंगाल्यांसारखाच मीहि जिद्दी आहें,--मनांत येईल तें करून टाकल्याखेरीज मी कधीच सोडत नाही. ज्या दिवशीं दीक्षा घ्यावयाचें मीं ठरविलें होतें त्याच्या आदल्या दिवशीं एका खाटेवर पडून असाच विचार करीत असतां दिसलें की ठाकुर माझ्या उजव्या बाजूला उभे आहेत, माझ्याकडे अगदी एकटक दृष्टीने पाहत आहेत. ते जणु विशेष कष्टी झाले असावेत असें मला वाटलें. स्वतःला एकदा त्यांच्या चरणीं अर्पण केल्यावर मग पुन्हा दुसऱ्या कुणाला गुरु करणार या विचाराने लज्जित होऊन त्यांच्याकडे पाहत राहिलों. अशा अवस्थेंत २–३ तास गेले. तोंडून मात्र माझ्या एक चकार शब्दहि निघाला नाही. त्यानंतर मग ते एकदमच अदृश्य झाले. ठाकुरांना पाहिल्यावर मनांत मला कसेसेंच होऊं लागलें व मग

अर्थातच त्या दिवशीं दीक्षा घेण्याचा माझा संकल्प स्थगित झाला. दोन तीन दिवसांनी पुन्हा पवहारी बाबांकडून दीक्षा घेण्याचा माझा निश्चय झाला. पण त्या रात्रींहि ठाकुर पुन्हा येऊन उभे राहिले. अगदी आदल्या वेळेप्रमाणेच. अशा प्रकारें सतत २१ दिवस ठाकुर-दर्शन झाल्यावर दीक्षा घेण्याचा संकल्प मीं पूर्णतया सोडून दिला. मनाने मीं ठरविलें की ज्या अर्थीं दीक्षा घेण्याचा विचार मी मनांत आणतांच त्यांचें दर्शन होतें त्या अर्थीं दीक्षा घेऊन झालें तर अनिष्टच होईल, इष्ट होण्याची तर कांही आशा नाही.

शिष्य---ठाकुरांच्या शरीरत्यागानंतर त्यांच्याशीं आपलें कधी बोलणें झालें आहे काय ?

या प्रश्नाचें कांहीहि उत्तर न देतां स्वामीजी अगदी स्तब्ध बसून राहिले. थोडया वेळाने ते शिष्याला म्हणाले, " ठाकुरांचें दर्शन ज्यांना घडलें ते धन्य होत, त्यांच्या बाबतींत, ' कुलं पवित्रं जननी कृतार्था---' हेंच खरें. तुम्हांलाहि त्यांचें दर्शन घडेल. तुम्ही सारे येथलेच लोक म्हटलें पाहिजे, म्हणूनच ना सारे येथे येऊन पोहचतात ? ' श्रीरामकृष्ण ' नांव धारण करून कोण आले होते याची कुणालाच ओळख पटली नाही ! हे जे त्यांचे अंतरंग, त्यांचे सहचर त्यांनाहि त्यांचा कांही पत्ता लागला नाही. कुणा-कुणाला थोडेंफार कळलें आहे एवढेंच. नंतर साऱ्यांनाच कळेल. हे जे राखाल वगैरे त्यांच्याबरोबर आले आहेत त्यांचीहि कधी-कधी चूक होते, मग इतरांच्याबद्दल तर बोलणेंच नको.

अशीं बोलणीं चाललीं असतां स्वामी निरंजनानंदांनी दार वाजविल्याने शिष्याने त्यांना ' कोण आहे ?' म्हणून विचारलें. ' भगिनी निवेदिता व अन्य इंग्रज महिला आल्या आहेत ' असें त्यांनी सांगितलें. शिष्याने तें स्वामीजींना सांगतांच ते म्हणाले,

'माझा तो मोठा सदरा दे बरें ?' दिलेला सदरा घालून ते सारें अंग झाकून घेऊन बसल्यावर शिष्याने दार उघडलें. भगिनी निवेदिता व इतर इंग्रज स्त्रिया आंत येऊन खाली जमिनीवरच बसल्या व स्वामीजींच्या प्रकृतीची चौकशी करून थोडीं इतर बोलणीं होतांच लवकरच निघून गेल्या. मग स्वामीजी शिष्याला म्हणाले, "पाहिलेंस, या बाया कशा सुसंस्कृत व सभ्य आहेत त्या ? या जर बंगाली असत्या तर माझी प्रकृति खराब असल्याचें पाहूनहि कमींतकमी अर्धा तास त्यांनी मला बडबडायला लावलें असतें." शिष्याने पुन्हा दरवाजा अडकवून घेतला व तो स्वामीजींची सेवा करूं लागला.

आता दुपार, अडीच वाजण्याची वेळ. लोकांची खूपच गर्दी झालेली. मठाच्या जागेंत तर कुठे तीळ ठेवायला जागा नाही. कीर्तनें किती झालींत, प्रसाद किती वांटला गेला याला कांही सीमा, कांही मोजमाप नाही ! शिष्याचा हेतु लक्षांत येतांच स्वामीजी म्हणाले, "जा, वाटलें तर एकदा सारें पाहून ये. पण परत यायला उशीर मात्र नको करूंस मुळीच !" यावर मोठ्या आनंदाने उत्सव पाहाण्यासाठी म्हणून शिष्य बाहेर पडला. स्वामी निरंजनानंद मात्र पूर्वीप्रमाणेच दाराशीं बसून राहिले.

दहा मिनिटांतच परत येऊन शिष्य स्वामीजींना जमलेल्या गर्दीची वार्ता देऊं लागला.

स्वामीजी--किती लोक आले असतील अंदाजें ?

शिष्य--असतील पन्नास एक हजार.

शिष्याचें उत्तर ऐकून स्वामीजींनी स्वतः उठून जमलेल्या गर्दीवर नजर टाकली व म्हटलें, "फार फार झालें तर तीस एक हजार लोक असतील सारे."

नंतर उत्सवाची गर्दी ओसरूं लागली. ४॥ चे सुमारास

स्वामीजींच्या खोलीचीं सारीं खिडक्यादारें उघडून देण्यांत आलीं पण त्यांची प्रकृति ठीक नसल्याने त्यांच्या जवळ मात्र कुणालाहि जाण्याची बंदी होती.

---

# अध्याय ४१ वा

**स्थळ—बेलूर मठ.**

**वर्ष--इ. स. १९०२**

विषय—जीवनाच्या शेषभागीं स्वामीजी कोणत्या भावाने मठांत राहत असत—त्यांची दरिद्रनारायणसेवा—देशांतील दुःखी गरीबांबद्दल त्यांना वाटणारी ज्वलंत सहानुभूति.

पूर्वबंगालचा प्रवास आटोपून परत आल्यावर स्वामीजी प्रायः मठांतच वास्तव्य करून होते व मठांतील लहानसहान कामावर नजर ठेवून, तर कधी तसलींच कामें स्वतःच्या हातांनी करून ते आपला बराचसा वेळ घालवीत असत. कधी ते मठांतील जमीन स्वतः हाताने खोदून काढीत, कधी झाडपाला-फळ-फुलादिकांच्या बी-पेरणीचें काम करीत, तर कधी नोकरचाकर आजारी असल्या-मुळे मठ झाडला गेला नसल्यास झाडू घेऊन तो स्वतः झाडून काढीत. त्यांना झाडतांना पाहून जर कुणी ‘आपण कशाला करतां हें काम’ असें म्हटलें तर उत्तर देत, “मीं झाडलोट केली तर बिघडलें कुठे ? मठांत घाण साचून राहिली तर साऱ्यांच्याच तब्यती बिघडायच्या !” याच सुमारास त्यांनी मठांत कांही गायी, बदक, कुत्रीं व बकऱ्या पाळल्या होत्या. एका मोठ्या बकरीचें नांव त्यांनी ठेवलें होतें ‘हंसी’—तिला ते ‘हंसी’ म्हणून साद घालीत व त्यांचा सकाळचा चहा तिच्याच दुधाचा केलेला असे. एका लहानग्या बोकडाला त्यांनी नांव दिलें होतें ‘मटरू’ व मोठ्या प्रेमाने त्या नांवाने ते त्याला हाका मारीत. त्याच्या गळयांत घुंगरांची एक माळहि अडकवून देण्यांत आली होती. प्रेमळ वागणुकीने तो बोकडहि स्वामीजींच्या सतत पायांत पायांत घोटाळत राही, आणि स्वामीजीहि एखाद्या पांच वर्षांच्या

बालकाप्रमाणे त्याच्या मागे सारखी धांवपळ करीत खेळत फिरत असत. मठांत नव्यानेच आलेल्या लोकांना जेव्हा ते कोण हें कळे तेव्हा त्यांचे ते खेळ पाहून ते लोक थक्क होऊन जात व म्हणत, "हेंच का ते विश्वविजयी स्वामी विवेकानंद ?" कांही दिवसांनी 'मटरू' मेला तेव्हा अत्यंत खिन्न मनाने स्वामीजी शिष्याला म्हणाले, 'पाहा, मी ज्याच्या ज्याच्यावर ममता करतों तो असाच मरून जातो.'

मठाच्या जमिनीवरील जंगल कापून काढण्यासाठी व जमीन खोदून सपाट करण्यासाठी दरवर्षींच कांहीं संताळ बाया-माणसें मजुरीने कामावर लावण्यांत येत असत. त्या मजुरांबरोबर स्वामीजी केवढ्या आनंदाने थट्टाविनोद करीत, त्यांचीं सुखदुःखें आत्मीयतेने ऐकून घेण्यांत त्यांना केवढी आपुलकी वाटे हें पाहण्यासारखें होतें. एक दिवस कांही ख्यातनाम लोक कलकत्त्याहून स्वामीजींच्या दर्शनासाठी म्हणून मठांत आले होते. त्या वेळीं स्वामीजी या संताळांबरोबर गोष्टी करण्यांत एवढे मग्न झाले होते की ते लोक आले आहेत हें सांगायला आलेल्या स्वामी सुबोधानंदांना ते म्हणाले, "आता कांही मी कुणाला भेटायला येऊं शकत नाही. या लोकांबरोबर मी बरा आपला आनंदांत आहें येथे" आणि खरोखरच त्या दीन-दुःखी संताळांना सोडून ते त्या दिवशीं कांही त्या बड्या मंडळींकडे भेटीसाठी म्हणून वळले नाहीत !

त्या संताळांपैकी एकाचें नांव होतें 'केष्टा.' त्या केष्टावर स्वामीजींची भारी ममता. गोष्टी करायला म्हणून स्वामीजी आले की कधी कधी हा केष्टा त्यांना म्हणे, "अरे बापा स्वामी, तूं आमच्या कामाच्या वेळीं इथे नको येत जाऊस, तुझ्याबरोबर गप्पा मारण्यांत आमचं काम पडून राहतें अन् मग बुढाबाबा

येऊन आम्हांला दम भरतो !" त्यांचें तें सरळ, प्रांजळ अन् हृदय हलविणारें बोलणें ऐकून स्वामीजींचे डोळे पाण्याने भरून येत व ते म्हणत, "नाही रे नाही, बुढाबाबा कांही नाही दाटणार. तूं आपल्या देशच्या चार दोन गोष्टी सांग आता मला," आणि असें म्हणून ते त्यांच्या सुखदुःखाच्या गोष्टींबद्दल बोलणें काढून त्यांना बोलते करीत.

एक दिवस स्वामीजींनी केष्टाला विचारलें, "का रे, तुमच्या जेवायचें येथे जर केलें तर जेवाल तुम्ही ?" केष्टाने उत्तर दिलें, "आम्ही आता तुमचें शिवलें खाऊं नाही शकत, लग्न झालं आहे माझं, तुमच्या हातचं मीठ खाल्लं तर जात जाईल ना बापा !" स्वामीजी पुन्हा म्हणाले, "मीठच कशाला खायला हवें ? मीठ न टाकतांच साऱ्या भाज्या तयार करूं. मग तर खायला कांही हरकत नाही ना ?" या वेळीं मात्र केष्टा तयार झाला. मग स्वामीजींच्या आदेशानुसार साऱ्या संताळ मजुरांसाठी पुऱ्या, भाज्या, मेवा-मिठाई, मठ्ठा, दही वगैरे साऱ्या जिनसांची मठांत तयारी करण्यांत आली व मग त्यांना जेवावयास बसवून स्वतः स्वामीजी त्यांना आग्रह करकरून खाऊं घालूं लागले. खातां खातां केष्टा म्हणाला, "अरे स्वामी बापा, तुला या साऱ्या जिनसा कुठे मिळाल्या ? आम्हीं अशा तर कधी नाही खाल्ल्या !" तृप्त होईपावेतों त्यांना खाऊं घालून स्वामीजी म्हणाले, "तुम्ही तर साक्षात् नारायण ! आज मला नारायणाला नैवेद्य दाखविणें घडलें." दरिद्री-नारायणाचे सेवेबद्दल स्वामीजी जें वारंवार सांगत ती त्यांनी या रीतीने प्रत्यक्ष करून दाखविली.

जेवणखाण झाल्यावर ते सारे संताळ आराम करायला गेल्यावर स्वामीजी शिष्याला म्हणाले, "यांना पाहून वाटलें, हे जणु साक्षात् नारायण. असल्या सरळ मनाचे, असलें निष्कपट

अकृत्रिम प्रेम नि मायाममता करणारे लोक कुठे कधी आढळले नाहीत." नंतर मठांतील साऱ्या संन्यासीवर्गाला उद्देशून ते म्हणाले, "पाहा तर खरी हे लोक कसे निष्कपट सरळमार्गी आहेत! त्यांचें दुःख कांहीसें तरी कमी करूं शकाल? एरव्ही नुसतीं भगवीं वस्त्रें धारण करून काय उपयोग? 'परहितार्थ' सर्वस्व समर्पण म्हणजेच यथार्थ संन्यास. कुठल्याहि चांगल्या, चोखट गोष्टींचा भोग त्यांना त्यांच्या जन्मांत कधी मिळाला नाही! अनेकदा तर इच्छा होते की मठफठ सारें विकून टाकावें-- या साऱ्या गरीब दीन-दुःखी-कष्टी दरिद्री-नारायणांना तो आलेला सारा पैसा वांटून टाकावा. आपण लोकांनी आपलें आश्रयस्थान म्हणून 'तरुतल' तर निवडलें आहेच! आहा! देशांतले हे दुःखी-कष्टी लोक खाऊं लेऊं शकत नाहीत कांही--मग आम्ही कोणत्या तोंडाने अन्न गिळावें? पाश्चात्य देशांत जेव्हा गेलों तेव्हा भगवती मातेची किती प्रार्थना केली--काकुळतीला येऊन म्हणालों, 'माते! येथले लोक तर पुष्पशय्यांवर लोळताहेत, नाना प्रकारचीं खाद्यपेयें यांना मिळतात--कुठलाहि भोग मिळायचा म्हणून बाकी नाही यांना! आणि आमच्या देशांतील लोक मात्र कांही खायला प्यायला न मिळाल्याने उपाशीपोटीं मरून जाताहेत, मा! त्यांच्या उद्धाराचा काय कांही मार्गच नाही?' त्या पाश्चात्य देशांत जाऊन धर्मप्रचार करण्यांत माझा हा उद्देश होता की या आपल्या देशांतील लोकांच्या पोटाला अन्न देण्याची कांही व्यवस्था करतां यावी.

"देशांतील लोकांना दोन वेळां दोन मुठी अन्न खायला मिळत नाहीसें पाहून अनेकदा मनांत येतें--द्यावें फेकून दूर तुमचें शंख वाजवणें, घंटा बडवणें, द्यावें फेकून तुमचें लिहिणेंवाचणें आणि आपल्याच मुक्तीचे प्रयत्न--साऱ्यांनी मिळून गावोगाव हिंडून

आपल्या चारित्र्याने व साधनाबलाने श्रीमंतांना, थोरामोठ्या लोकांना समजावून सांगावें, पै, पैसा करून धन जमवून आणावें व दरिद्रीनारायणांची सेवा करावी--जीवन त्यांच्या सेवेंतच व्यतीत करावें.

"आहा! गरीब, दुःखी-कष्टी लोकांसाठी देशांतील कुणी कांही विचारहि करीत नाहीत रे! जे साऱ्या देशाच्या, उभ्या राष्ट्राच्या पाठीचा कणा--ज्यांच्या निथळत्या घामांतून, काबाड-कष्टांतूनच देशाच्या अन्नाची पैदास--ज्या मेहेतर मुर्देफरास मजुरांनी एक, फक्त एकच दिवस राबायचें थांबवलें तर शहरा-शहरांतून हाहाकार माजतो, हाय! त्यांना सहानुभूति दाखवील, त्यांच्या सुखदुःखांत त्यांना सान्त्वना देईल असा देशांत काय कुणी नाहीच का रे? हेंच पाहाना, हिंदूंची सहानुभूति न मिळा-ल्याने मद्रासकडील हजारो अस्पृश्य ख्रिश्चन होताहेत. तुमचा भ्रम आहे की फक्त पोट जाळण्यासाठीच ते ख्रिश्चन होतात. पण तसें नाही. ते ख्रिश्चन होतात, आमची सहानुभूति त्यांना मिळत नाही म्हणून. रात्रंदिवस आम्ही त्यांच्या कानींकपाळीं ओरडत असतों फक्त, 'शिवूं नका, आम्हांला शिवूं नका' म्हणून. देशांत आता कांही दया-धर्म बाकी राहिला आहे का रे बाबा? आहे काय ती फक्त 'शिवूं नका वाल्यांची' भरती! असल्या आचारांच्या पाठींत मार झाडू, मार लाथ! मनांत येतें, आत्ता जावें--शिवाशिवीचीं हीं सारीं बंधनें फेकून देऊन 'कोण कुठे पतित कंगाल, दीनहीन, दरिद्री पडलां आहांत रे तुम्ही, या--या सारे या—' म्हणून त्यांना ठाकुरांच्या नांवावर बोलावून आणावें. हे जोंवर उठून उभे राहत नाहीत तोंवर मा भगवती जागृत होणें अगदी अशक्य. आम्ही जर यांच्या अन्न-वस्त्राची सोय नाही लावूं शकलों तर काय उपयोग आमचा,

काय साधलें मग आम्हीं ? ह्या बापड्यांना छद्मी दुनियेचे डावपेच अवगत नाहीत कांही; म्हणूनच रात्रंदिवस उरीं फुटेपर्यंत ढोरां-जनावरांसारखे राबूनहि त्यांना पोटभर खायला अन् अंगभर ल्यायलाहि मिळायची मारामार ! द्या, तुम्ही सारे मिळून त्यांचे डोळे उघडून द्या. माझ्या दिव्य दृष्टीला तर सूर्यप्रकाशाइतक्या स्पष्टपणें दिसतें आहे की यांच्यांत आणि माझ्यांत एकच ब्रह्मसत्ता विराजत आहे, एकच शक्ति खेळते आहे; फरक आहे काय तो अभिव्यक्तींत, विकासाच्या तारतम्यांत. साऱ्या अंगोपांगांत रक्त-संचार झाल्याखेरीज कुठल्या तरी देशाचें उत्थान झाल्याचें पाहिलें आहे का कधी ? शरीराचें एक अंग लुळें पडल्यावर दुसरें अंग सुदृढ असूनहि त्या शरीराकडून कोणतेंहि मोठें काम होणें शक्य नाही--पक्कें लक्षांत ठेव हें अगदी."

शिष्य— महाराज, देशांतील लोकांत धर्मपंथाबाबत, भिन्न भिन्न भावधारांच्या दृष्टीने इतके मतभेद आहेत की त्या साऱ्यांना एकात्मभावनेने एकत्र आणणें अशक्यच वाटतें.

स्वामीजी-- (संतापून) तुला जर कुठलीहि गोष्ट करणें अशक्य वाटत असेल तर पुन्हा इथे येत जाऊं नकोस. ठाकुरांच्या इच्छेने सारे मार्ग सहज, सोपे होतील. तुझें काम आहे दीन-दु:खितांची सेवा करणें--अगदी जातिनिर्विशेषभावाने सेवा करणें--त्या सेवेचें फळ मिळेल किंवा नाही या पंचायती करीत बसण्याची तुला गरजच काय मुळी ? तुझें काम आहे कार्य करून जाणें, बाकी साऱ्या गोष्टी होतील आपोआप. माझ्या कार्याची पद्धत आहे नित्य नवनिर्मिति करणें--घडविणें--असेल त्याचा ध्वंस करणें माझें काम नाही. जगाचा इतिहास उघड्या डोळ्यांनी जरा वाचून पाहा--केवळ एकच महापुरुष वेळप्रसंगीं एखाद्या एखाद्या देशांत साऱ्या देशाचें केंद्रस्थान म्हणून उभा झालेला

दिसेल. त्याच्या प्रभावाने प्रभावित होऊन हजारो लोक जगाचें हित करून गेलेले आढळतील. तुम्ही सारेजण बुद्धिमान मुलें आहांत--इतके दिवस सतत येणेंजाणें करतां, येथे येऊन काय साधलें बरें? परहितार्थ काय एक जन्म नाही देऊं शकत तुम्ही? पुढल्या जन्मीं हवा तेवढा वेद-वेदान्त अन् तत्त्वज्ञान वाच. या जन्मीं परसेवेसाठी तर आपला देह देऊन जा? तरच म्हणेन की माझ्याकडे येण्याचें कांही सार्थक झालें.

असें बोलून स्वामीजी कसल्यातरी गंभीर विचारांत मग्न झाले. कांही वेळ अशा तऱ्हेने गेल्यावर ते म्हणाले, "इतकी तपश्चर्या करून मला सार येवढेंच कळलें की प्रत्येक जीव-मात्राच्या ठिकाणीं भगवंताचें अधिष्ठान आहे. याखेरीज ईश्वर-बीश्वर आणखी कांहीहि नाही. जीवसेवा हीच ईशसेवा. या भावाने जीवांची सेवा जो करतो तोच ईशसेवा करीत असतो."

दिवस संपून आता संध्याकाळ व्हावयास आली आहे. स्वामीजी वरच्या मजल्यावर जाऊन आपल्या बिछान्यावर पडून शिष्याला म्हणाले, "माझे दोन्ही पाय जरा दाबून दे बरें." आजचें स्वामीजींचें बोलणें ऐकून भीत व विस्मित झाल्याने आपण होऊन पुढे धजण्याची शिष्याला कांही हिंमत होत नव्हती. स्वामीजींच्या आताच्या सूचनेने धीर आल्याने मात्र मोठ्या आनंदाने त्याने स्वामीजींचे पाय दाबावयास सुरवात केली. कांही वेळाने त्याला उद्देशून स्वामीजी म्हणाले, "आज सांगितलेल्या साऱ्या गोष्टींची मनांत अगदी खूणगांठ बांधून ठेव. त्यांपैकी एका अक्षराचेंदेखील विस्मरण होऊं देऊं नकोस."

## अध्याय ४२ वा

**स्थळ-- बेलूर मठ.**

**वर्ष-- इ. स. १९०२ (सुरवातींचा काळ)**

**विषय--** श्रीरामकृष्णांच्या संन्यासी शिष्यांची वराहनगर मठांतील साधना-- मठाच्या प्रारंभीचा काल-- स्वामीजींच्या जीवनांतील कांही दुःखकष्टांचे दिवस— संन्यासाचे कठोर नियम.

आज शनिवार. सायंकालापूर्वीच शिष्य मठांत आला आहे. सध्या मठांत साधनभजन, जप-तपस्यादि गोष्टी खूप जोरांत चालू आहेत. स्वामीजींनी हुकूमच सोडला होता की संन्यासी, ब्रह्मचारी कुणीहि असो, प्रत्येकाने भल्या पहाटे उठून ठाकुर-मंदिरांत जाऊन जपास बसलेंच पाहिजे. स्वामीजींची झोप तर जवळपास अजीबात उडूनच गेली होती. रात्रीं तीनलाच ते बिछाना सोडून उठून बसत. एक घंटीहि विकत आणण्यांत आली होती--मोठ्या पहाटे सार्‍यांना जागे करण्यासाठी मठांतील प्रत्येक खोलीपाशी ती खूप जोराने वाजविण्यांत येई.

शिष्याने मठांत येऊन प्रणाम करतांच स्वामीजी त्याला म्हणाले, "अरे, मठांत आजकाल खूप साधनभजन चालतें, सर्वजण मोठ्या पहाटे व सायंकाळीं खूप वेळ जप करण्यांत घालवितात. पाहिलीस ही, तेवढ्यासाठीच एक घंटी आणविली आहे. ही वाजवून सार्‍यांना जागे करण्यांत येतें. सार्‍यांना सूर्योदयापूर्वीच उठावें लागतें. ठाकुर म्हणत, "सकाळ संध्याकाळ मन खूप सत्त्वभावपूर्ण असतें--त्याच वेळीं ध्यान करावयास हवें."

"ठाकुरांच्या देहत्यागानंतर वराहनगर मठांत आम्ही कितीतरी जप-ध्यान करीत असूं. सकाळीं तीनलाच आम्ही सारे उठत असूं. शौचमुखमार्जन व स्नान आटोपून इतर कांही न करतां

देवघरांत जाऊन जपध्यानांत अगदी मग्न होऊन जात असूं. त्या वेळीं आम्हां सर्वांतच केवढा प्रबळ वैराग्यभाव जागृत होता! जग आहे की नाही याचीहि आम्हांला शुद्ध नव्हती. शशी (स्वामी रामकृष्णानंद) दिवसाचे चोवीसहि तास ठाकुर-पूजा-सेवादिकांत मग्न असे. एखाद्या सुगृहिणीप्रमाणे तो आमचें सारें करी. भिक्षा मागणें, ठाकुरांना नैवेद्य दाखविणें, आणि आम्हां साऱ्यांची जेवणाखाण्याची कांही ना कांही सोय करणें हें सारें तोच करायचा. सकाळीं थोडेंफार कांही खाल्लें की ४-५ वाजेपावेतों जपध्यानांत सारे मग्न, असेहि कांही दिवस गेले. खूप वेळ वाट पाहून कंटाळून गेल्यावर शशी अखेर जुलूम-जबरदस्ती करून आम्हांला जपध्यानांतून उठवून चारदोन घास खाऊं घाली. केवढी निष्ठा पाहिली तेव्हा आम्हीं शशीची."

शिष्य— मठाचा खर्च वगैरे कसा काय भागत असे महाराज तेव्हा?

स्वामीजी— कसा भागत होता म्हणजे काय? आम्ही साधु-संन्यासी लोक. भिक्षा मागून जें येई त्यांतच निभत असे आमचें सारें. आजच्या घटकेला सुरेशबाबू, बलरामबाबू हे दोघेहि नाहीत, नाही तर हा मठ पाहून केवढा आनंद झाला असता त्यांना! सुरेशबाबूंचें नांव तर ऐकलें आहेस ना? एका अर्थी हा मठ स्थापला त्यांनीच. वराहनगर मठाचा सारा खर्च तेच चालवीत असत. आम्हां साऱ्यांची काळजी असे तेव्हा या सुरेश मित्रांना. त्यांच्या भक्तिविश्वासाला तर कुठे तोड नाही सापडणार!

शिष्य-- मीं ऐकलें आहे की त्यांच्या मृत्युकालीं आपली अन् त्यांची विशेष गांठभेट होऊं शकत नसे?

स्वामीजी-- त्यांचे आप्तेष्ट भेटूं देतील तेव्हाच तर भेटणार ना? सोड त्या साऱ्या जुन्या झाल्या गेल्या गोष्टी आता.

संसारांत तूं जगलास काय अन् मेलास काय, तुझ्या नात्या-गोत्याच्या लोकांचें त्याने कांही कमी होत नाही हें अगदी निश्चित समज. तूं जर कांही पै-पैसा, सोनेंनाणें जमविलें असेल तर पाहशील की तूं मरायच्या आंतच त्याबद्दल तुझ्या नातेवाइकांत भांडणें सुरू झालीं आहेत म्हणून. अगदी तुझ्या मृत्युशय्येवर देखील तुला शांति-समाधान देतील असे कुणी उरणार नाही—तुझी बायकोमुलें सुद्धा ! अन् याचेंच नांव तर संसार ! !

मठाच्या सुरवातीच्या परिस्थितीबद्दल स्वामीजी पुढे म्हणाले, "हातीं पैसाअडका नसल्याने अनेकदा तर त्रासून मठ बंद करायचा म्हणून मी भांडण करीत असे. पण शशीला मात्र हें पटवून देणें कधी कांही जमलें नाही मला. शशी म्हणजे आमच्या मठांतील केंद्रीय व्यक्ति--आमच्या मठाचा कणा. एखाद्या एखाद्या दिवशीं तर मठांत अजीबात कांहीच नसायचें. भीक मागून तांदूळ आणले तर मिठाची सोय नसायची. एखादे दिवशीं नुसता मीठ-भातच असायचा ! पण लक्षच नसायचें कुणाचें तिकडे. ध्यान-जपाच्या प्रबळ आवेगांत आम्ही सारे जणु वाहून जात होतों तेव्हा. कित्येकदा तर उकडलेलीं तोंडल्याचीं पानें, मीठ अन् भात खाऊनच महिना महिना जायचा आमचा ! कसे गेले ते दिवस ! आमची ती आचारांतील कठोरता पाहून भुतें पळून गेलीं असतीं--माणसांची तर काय गोष्ट मग ! पण येवढें मात्र खरें की तुमच्यांत मुळांतच जर कांही सार असेल तर परिस्थिति जितकी विरुद्ध असेल तितकी तुमच्या ठिकाणची शक्ति अधिक विकसित होईल. आता मठांत खाटा, बिछाने, खाणेंपिणें यांची जी व्यवस्था केली आहे त्यामागे हेतु हाच की आम्ही जे कष्ट सहन केले ते काय आता संन्यासी व्हायला आलेले हे नवीन लोक

सहूं शकतील ? आम्हीं ठाकुरांच्या पादपद्मीं आपलीं जीवनें समर्पित केलीं होतीं. दुःखकष्टांची गोष्टच आमच्या मनांत उद्भवत नसे. आजकालच्या मुलांना येवढी कठोरता झेपणें शक्यच नाही. म्हणूनच त्यांच्या राहण्याची अन् दोन मुठी अन्नाची ही व्यवस्था. ओलेंसुकें अन्न अन् जाडेंभरडें कापड यांची व्यवस्था झाली की हीं मुलें साधनभजन करूं शकतील--बहुजन-हिताय आपलें जीवन समर्पण करायला शिकतील.

शिष्य-- पण मठांत खाटा-बिछाने पाहून बाहेरचे लोक काय वाटेल तें बोलतात.

स्वामीजी-- खुशाल बोलूं दे. निदान थट्टा करण्यासाठी तरी येथल्या गोष्टी त्यांच्या मनांत खेळतील. विरोधभक्तीने तर आणखीनच लवकर मुक्ति लाभते. ठाकुर म्हणत, 'लोक म्हणजे पोक (किडे)'-- हा काय म्हणतो, तो काय म्हणतो, असें प्रत्येकाच्या तोंडाकडे पाहून का कधी काम करायचें असतें ? छे—छे--.

शिष्य-- महाराज, आपण कधी म्हणतां--"सारे लोक नारायण,—दीनदुःखी मला नारायणस्वरूप वाटतात," आणि याच्या उलट नेमकें कधी सांगतां--"लोक म्हणजे पोक (किडे)." या दोहोंचा अर्थ काय हें कांही उमजत नाही मला ?

स्वामीजी-- सारेच लोक नारायणस्वरूप आहेत यांत तर काडीमात्र शंका नाही, पण सारेच नारायण तर कांही टीका करीत नाहीत ना मठांतील सामानावर ? दीनदुःखी, गोर-गरीब तर येऊन मठांतील खाटाबिछान्यांवर टीका करतांना आढळत नाहीत कुठे ? सत्कार्य करीत राहीन, टीका करतील त्यांच्याकडे नुसतें वळून देखील पाहणार नाही या अर्थानें म्हटलें मीं 'लोक म्हणजे पोक.' अशा नेटाची ज्यांची वृत्ति असते त्यांनाच सारें

कांही साधतें. कांहींना हें लवकर तर कांहींना उशीरा साधतें येवढाच काय तो फरक. पण साधणार आहे हें साऱ्यांनाच. माझ्यांत अशीच जिद्द होती म्हणूनच हें काय जें साधलेलें दिसतें आहे तें साधलें. नाही तर पाहिलेंसच की काय भयंकर दुःखाचे दिवस आम्हीं काढले तें. एकदा तर उपाशीपोटीं भुकेने मूर्च्छित होऊन एका घरासमोर पडलों होतों; अंगावर पावसाची एक सर पडून गेली तेव्हा कुठे शुद्ध आली ! आणखी एक दिवस सारा दिवस पोटांत अन्नाचा कण नसतां साऱ्या कलकत्ताभर हें काम, तें काम असें करीत सारखा हिंडत होतों. रात्रीं १०-११ वाजतां जेव्हा मठांत आलों तेव्हा कुठे खायला मिळालें--आणि ही कांही केवळ दिवसा-दोन दिवसांचीच गोष्ट नव्हती !

इतकें बोलून स्वामीजी कांही वेळ अगदी विमनस्कपणें बसून राहिले. थोड्या वेळाने ते म्हणाले, "यथार्थ संन्यास काय सहजासहजीं साधतो रे ? संन्यासाप्रमाणे कठीण आश्रम अन्य कोणताहि नाही. जरा इकडे तिकडे वाकडें पाऊल पडलें की कडेलोट झाल्यागत पर्वतशिखरावरून माणूस खोल गर्तेंत पडतो--हातापायांचा अगदी चक्काचूर होऊन जातो त्याच्या. यथार्थ संन्यासव्रताचें पालन फार कठीण गोष्ट आहे. बोलण्याबोलण्यांत देखील एक तसूभर इकडे तिकडे होतां येत नाही.

शिष्य--आपण कधी गृहस्थाचा तर कधी त्यागाचा आदर्श आमच्या पुढे ठेवतां, आता आमच्यासारख्यांनी त्यांतला कोणता स्वीकारावा ?

स्वामीजी--सारें ऐकून घेत असावें, व मग त्यांतलें जें रुचेल पटेल तें घ्यावें व एखाद्या बुलडॉगप्रमाणे तेंच मग अगदी पक्कें धरून ठेवावें.

असें बोलत बोलत स्वामीजी शिष्यासह खाली आले व पाय

मोकळे करण्यासाठी म्हणून हिंडूं लागले. हिंडतांना ते कधी 'शिव शिव' असें नामोच्चारण करीत तर कधी आपल्याशींच 'कखन कि रंगे थाको मा, श्यामा सुधातरंगिणी' हें गाणें गुणगुणत. अशाप्रकारें त्यांचें फिरणें चालू होतें.

## अध्याय ४३ वा.

**स्थळ—बेलूर मठ**

**वर्ष—इ. स. १९०२**

विषय--बेलूर मठांतील ध्यान-जप-अनुष्ठान--विद्यारूपिणी कुलकुंडलिनीचें जागरण झाल्यावर आत्मदर्शन—मनाची सविकल्प व निर्विकल्प अवस्था --कुलकुंडलिनीच्या जागृतीचा उपाय—भावसाधनेच्या मार्गांतील अडथळे--कीर्तनादिकानंतर अनेकांत पाशवी प्रवृत्ति प्रबळ झालेल्या दिसतात असें कां?— ध्यानाचा आरंभ कसा करावयास हवा-- ध्यानादिकांबरोबरच निष्काम कर्माचें अनुष्ठान करण्याचा उपदेश.

काल रात्रीं शिष्य स्वामीजींच्या खोलींतच झोपला होता. रात्रीं चारच्या सुमारास शिष्याला उठवून स्वामीजी म्हणाले, "जा, घंटी वाजवून साऱ्या साधु-ब्रह्मचाऱ्यांना जागे कर." स्वामीजींच्या आज्ञेनुसार घंटी वाजवून प्रथम शिष्याने वर झोपलेल्या साधूंना जागे केलें. ते जागे झाल्यावर मग खाली जाऊन घंटी वाजवून त्याने तेथील साऱ्या साधु-ब्रह्मचाऱ्यांना उठविलें. साऱ्यांनी शौचमुखमार्जनादि आटोपून तर कांहींनी स्नान करून व कांहींनी तर नुसतेच कपडे बदलून देवघरांत प्रवेश केला व जपध्यानास सुरवात केली.

स्वामीजींच्याच सांगण्यावरून शिष्याने स्वामी ब्रह्मानंदांच्या कानाशीं खूपच जोराने घंटी वाजविली. तेव्हा ते उठून म्हणाले, "या 'बांगाल' च्या तापाने तर आता मठांत राहणें देखील मुश्कील झालें आहे." शिष्याने हें जेव्हा स्वामीजींना सांगितलें तेव्हा खूप हसून ते म्हणाले, "अगदी ठीक केलेंस तूं."

नंतर हातपाय धुऊन स्वामीजीहि शिष्यासह मंदिरांत येऊन बसले.

स्वामी ब्रह्मानंदादींसह संन्यासीवर्ग मंदिरांत ध्यानस्थ बसला आहे. स्वामीजींसाठी वेगळें एक आसन टाकून ठेवण्यांत आलें होतें; ते त्यावर उत्तराभिमुख होऊन बसले व समोरचेंच एक आसन शिष्याला दाखवून म्हणाले, "जा, त्या आसनावर बसून ध्यान कर." ध्यानासाठी बसल्यावर कुणी सुरवातीला मंत्रजप करीत होते तर कुणी अंतर्मुख होऊन स्तब्ध बसले होते. मठांतील सारें वातावरणच स्तब्ध झालेंसें भासे ! अजून अरुणोदय देखील झाला नव्हता, आकाशांत तारा चमकत होत्या.

आसनावर बसतांच अगदी थोडयाच वेळांत स्वामीजी एकदम स्थिर, शांत, निःस्पंद होऊन सुमेरुवत् अचल झाले. त्यांचा श्वासोच्छ्वास मंद मंद होऊं लागला. शिष्य तर स्तंभित होऊन त्या निर्वात-निष्कंप दीपज्योतीप्रमाणे स्थिर बसलेल्या मूर्तीकडेच अनिमेष नेत्रांनी पाहूं लागला. स्वामीजी आसनावरून उठल्या-खेरीज कुणीहि आसनावरून उठायचें नाही असा नियम होता. म्हणून कांही वेळाने पायाला मुंग्या आल्याने उठायची इच्छा असून देखील तो न उठतां तसाच जागचे जागीं बसून राहिला.

प्रायः दीड तासांनी स्वामीजी 'शिव शिव' म्हणत ध्यान संपवून उठले. त्यांचे नेत्र तांबूस व मुख गंभीर व शांत होतें. ठाकुरांना वंदन करून ते खाली उतरले व मोकळ्या मैदानांत फेऱ्या घालून पाय मोकळे करूं लागले. कांही वेळाने ते शिष्याला म्हणाले, "पाहिलेंस, आजकाल सारे साधु कसें ध्यान-भजन करतात तें ? ध्यान गभीर झालें की कितीतरी अनुभूति येतात, कितीतरी दर्शनें घडतात. वराहनगरला ध्यानाला बसलों असतां मला इडा व पिंगला या नाड्या दिसल्या होत्या. थोडा प्रयत्न केला की पाहणें शक्य होतें. त्यानंतर सुषुम्नेचें दर्शन झाल्यावर तर जें पाहावयाची इच्छा असेल तें पाहतां येतें. दृढ गुरुभक्ति

असल्यास साधन, भजन, ध्यान, जप सारें आपोआप घडतें; मग प्रयत्नाचेंहि कारण उरत नाही. 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।'

नंतर स्वामीजी म्हणाले, "अंतरीं नित्य-शुद्ध-बुद्ध-मुक्त आत्मा-रूप सिंह विद्यमान, त्याचें दर्शन झाल्यास मायेचें हें विश्वब्रह्माण्ड कुठल्या कुठे नाहीसें होतें. आत्मा साऱ्यांच्याच ठिकाणीं सम-भावाने विराजमान. जो जितकें साधनभजन करील त्या प्रमाणांत कमी अधिक कालांत त्याचे ठिकाणीं कुण्डलिनी शक्ति जागृत होईल. या शक्तीने शीर्षप्रदेशीं प्रवेश केला की दृष्टि उन्मुक्त होते--आत्मदर्शन लाभतें.

शिष्य-- शास्त्रांत हें सारें वाचलें आहे; प्रत्यक्षानुभूति मात्र कांही नाही.

स्वामीजी-- 'कालेनात्मनि विन्दति--' वेळ येतांच साऱ्या गोष्टी होतील. येवढेंच की कांहींच्या बाबतींत या लवकर घडतात तर कांहींना उशीर लागतो ! प्राण गेला तरी सोडणार नाही अशा दृढ भावनेने चिटकून राहायला हवें. यालाच म्हणतात पुरुषकार. अखंड तेलधारेप्रमाणे मन अखंडितपणें एखाद्या विषया-कडे लागायला हवें. सामान्य माणसाचें मन नाना विषयांत गुरफटलेलें असतें--अगदी ध्यानकालीं सुद्धा तें सैरावैरा भटकत असतें. मनांत तेव्हा कोणतीहि इच्छा उठे ना का, कसकशी ती उत्पन्न होते हें स्वस्थ बसून पाहायला हवें. असें पाहतां पाहतांच मन स्थिर होतें व मग मन असें तरंगायित होत नाही. हे तरंग म्हणजेच मनाच्या 'संकल्पवृत्ति.' पूर्वी ज्या विषयांचें मोठ्या आवेगाने चिंतन केलें असतें त्या साऱ्यांचा एक मानसिक अन्तः-प्रवाह निर्माण झालेला असतो--त्यामुळेच ध्यानकालीं त्या साऱ्या गोष्टी मनांत येतात. या गोष्टी उत्पन्न होणें, ध्यानकालीं मनांत

येणें हें साधकाचें मन क्रमशः स्थिर होत आहे याचेंच प्रमाण होय. कुठल्यातरी एखाद्या भावावर कधी कधी मनाच्या एकाग्र होण्यालाच सविकल्प समाधि म्हणतात. आणि जेव्हा मन सर्व-वृत्तिशून्य होतें तेव्हा तें जणु एका निराधार बोधरूप प्रत्यग् चैतन्यांत वितळून जातें. यालाच म्हणतात वृत्तिशून्य निर्विकल्प समाधि. समाधीचे हे दोन्ही प्रकार ठाकुरांच्या ठिकाणीं आम्हांला वारंवार पाहावयास सापडले आहेत. त्यांना प्रयत्नपूर्वक कांही या अवस्था आणाव्या लागत नसत. सहजासहजी, आपोआप अन् एकदम ते त्या अवस्थांत जात. ती म्हणजे एक आश्चर्यकारकच घटना होती. त्यांना पाहूनच तर या साऱ्या गोष्टी योग्यपणें शिकतां आल्या. दररोज एकटयानेच ध्यान करीत जा. साऱ्या गोष्टींचीं कवाडें याने आपोआप खुलतील. विद्यारूपिणी महा-माया अंतरीं सुप्त आहे---म्हणूनच साऱ्या गोष्टी आता उमगत नाहीत तुला. ती म्हणजेच कुण्डलिनी. ध्यान करण्यापूर्वी नाडी-शुद्धि करतेवेळीं मनोमन मूलाधारस्थ कुण्डलिनीवर जोराने आघात करून म्हणत जा, "जागृत हो मा, जागृत हो !" हळू-हळू हा सारा अभ्यास करावा लागेल. भावनाप्राबल्याची बाजू ध्यानसमयीं अगदी दाबून टाकावयास हवी. जे खूपच भावना-शील असतात त्यांची कुण्डलिनी चट्‌चट् वर चढते खरी, पण जशी वर चढते तशीच चटकन् खालीहि येते ती ! आणि जेव्हा ती खाली येते तेव्हा ती साधकाला तितक्याच घोर अधःपाताकडे नेऊन सोडते. यामुळेच भाव-साधनेला उपकारक असणाऱ्या संकीर्तनादिकांत एक फार मोठा दोष असतो. तालसुरांत नाचून गाऊन क्षणिक उत्तेजनेने ही शक्ति ऊर्ध्वगामी होते खरी, पण तिथे ती फार काळ टिकून राहूं शकत नाही. आणि जेव्हा ती निम्नगामी होते तेव्हा त्या माणसांत कामप्रवृत्ति फार भयंकर

प्रमाणांत बळावतें. अमेरिकेंत माझीं व्याख्यानें ऐकतांना अनेक स्त्री-पुरुषांना सामयिक उत्तेजनामुळे भाव होत असत, त्यांतले कांही तर काष्ठवत् जड होऊन जात ! मागून शोध घेतल्यानंतर मला आढळून आलें की या अवस्थेनंतर अनेकांत कामप्रवृत्ति अत्यधिक प्रमाणांत बळावली होती. चिकाटीने सतत ध्यानधारणा न केल्यानेच या असल्या गोष्टी घडतात.

शिष्य-- साधना-रहस्याच्या गूढ गोष्टी या स्वरूपांत कुठे ग्रंथांत वाचल्या नाहीत, आज अगदी नव्यानेच ऐकावयास सापडल्या.

स्वामीजी-- साधनांचीं असलीं रहस्यें काय तुला शास्त्रग्रंथांतून आढळणार आहेत ? गुरुशिष्य-परंपरेंतून गुप्तपणें या गोष्टी चालत येत असतात. खूपच सावधानपणें ध्यानधारणा करीत जा. समोर अशा वेळीं सुगंधी फुलें ठेवावींत, धूप जाळावा. मन पवित्र राहील अशाच गोष्टी सुरवातीला कराव्यात. गुरूंच्या व इष्टदेवतेच्या नामाचा जप करतांना म्हणत जा, "जीव जगत् साऱ्यांचेंच मंगल होवो !" पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण, अधः, ऊर्ध्व साऱ्याच दिशांना मंगल कामना प्रेरित करून मग ध्यानाला बसत जा. सुरवातीला हें प्रयत्नपूर्वक करावें लागतें. नंतर स्थिर होऊन बसल्यावर ( कोणत्याहि दिशेला मुख करून बसल्यास हरकत नाही ) मंत्र देतांना सांगितल्याप्रमाणे ध्यान करीत जा. एकहि दिवस यांत कधी कुठे खंड पडूं नको देऊस. कामाचा खूप तगादा असला तरी दहा पंधरा मिनिटें या गोष्टी करायलाच हव्यात. कांही ना कांही निष्ठा असल्याखेरीज का कांही साधतें बाबा ?

असें बोलतां बोलतां वर चढत असतांना स्वामीजी म्हणाले, "अगदी थोडक्या साधनांनीच तुमची आत्मदृष्टि उन्मुक्त होईल.

इथे आलां आहांत तेव्हा मुक्ति वगैरे तर तुमच्या हातच्या गोष्टी आहेत. ध्यानधारणेखेरीज आणखी एक गोष्ट कर. दु:खपूर्ण किंकाळचांनी भरलेल्या या जगाचे कष्ट थोडचा प्रमाणांत का होईना कमी करण्याचा प्रयत्न करायला लाग. कठोर साधना कर-करून हा देह तर मीं नष्ट केला. या हाडामांसाच्या पिंजऱ्यांत आता जणु कांहीच शिल्लक नाही. तुम्ही आता कामाला पुढे या, म्हणजे मी थोडा आराम करूं शकेन. अधिक कांही नाही साधलें तर निदान हीं जीं सारीं शास्त्रें वगैरे वाचलीं आहेस तींच सांग लोकांना. यापरता मोठें दान आणखी नाही कोणतें. ज्ञानदान हेंच सर्वोच्च दान !

---

## अध्याय ४४ वा.

**स्थळ—बेलूर मठ**

**वर्ष—इ. स. १९०२**

**विषय**— मठांत कठोर नियमांची स्थापना— 'आत्माराम-कुंभ' व त्याच्या शक्तीची पारख— स्वामीजींच्या माहात्म्याबाबत शिष्याचें स्वामी प्रेमानंदांबरोबर बोलणें— पूर्वबंगालमध्ये अद्वैतवादाचा प्रसार करण्यासाठी स्वामीजींनी शिष्याला दिलेलें प्रोत्साहन व तो विवाहित असूनहि त्याला धर्मलाभ होईल असें त्यांनी त्याला दिलेलें अभयदान— ठाकुरांच्या संन्यासी शिष्यवर्गाबद्दल स्वामीजींच विश्वास— नागमहाशयांचा सिद्ध-संकल्प.

सध्या स्वामीजींचें वास्तव्य मठांतच आहे. शास्त्राध्ययनासाठी मठांत दररोज एक प्रश्नोत्तरांचा वर्ग घेण्यांत येतो. प्रश्न विचारणारे आहेत मुख्यत: स्वामी शुद्धानंद, विरजानंद व स्वरूपानंद. अशा प्रकारच्या शास्त्र-आलोचनेला स्वामीजींनी नांव दिलें होतें "चर्चा." या चर्चेंत भाग घेण्यासाठी ते संन्यासी-ब्रह्मचारी यांना खूप प्रोत्साहन देत. कधी गीता, कधी भागवत, कधी उपनिषदें तर कधी ब्रह्मसूत्रें--यांच्या भाष्याधारें ही चर्चा होई. स्वामीजी स्वत: बहुतेक चर्चांना उपस्थित राहत व अनेक प्रश्नांची मीमांसा करीत. एकीकडे स्वामीजींच्या आदेशानुसार कठोर नियम-परिपालनपूर्वक ध्यानधारणा तर दुसरीकडे शास्त्र-विवरणासाठी दररोज हा वर्ग चालू असे व त्यांनी घालून दिलेले नियम शिरोधार्य मानून सर्वजण वागत. मठवासियांची आहार-निद्रा, ध्यान- अध्ययन यांसारखी प्रत्येक लहान-मोठी गोष्ट कठोर विधि-नियमांनी बांधून काढली होती त्यांनी. कुणाच्या हातून एखाद्या दिवशीं जरी या नियमांचें उल्लंघन झालें तर त्याला त्या दिवशीं मठांत कांही जेवण मिळत नसे ! त्याला त्या दिवशीं

बाहेरून भिक्षा आणून मठांत ती शिजवून आपलें जेवण उरकावें लागे. हें मठ-संघटन करण्यासाठी स्वामीजींची दूर-दृष्टि मठवासियांसाठी कांही दैनिक नियम करूनच थांबली नाही तर भावी मठाची कार्यप्रणाली व रीतिनीति यांचाहि संपूर्ण विचार करून त्याबाबत एक विस्तृत पत्रकहि त्यांनी लिहवून तयार केलें होतें. त्याची ती हस्तलिखित प्रत मठांत अद्यापहि खूप काळजीपूर्वक जतन करून ठेवण्यांत आली आहे.

स्नानानंतर स्वामीजी दररोज मंदिरांत जाऊन तीर्थ घेव व ठाकुरपादुकांना शिरस्पर्श करून त्यांच्या भस्मास्थिपूर्ण कलशापुढे साष्टांग नमस्कार घालीत. या कुंभाला ते ''आत्मारामाचा कलश" म्हणून संबोधीत. याच कांही दिवसांत या "आत्मारामाच्या कलशा"बाबत एक विशेष उल्लेखनीय घटना घडली. एके दिवशीं या कुंभाला नमस्कार करून बाहेर येत असतां अचानकच त्यांच्या मनांत विचार आला, "खरोखरच का या कलशांत आत्माराम ठाकुरांचा निवास असेल? मी याचें प्रत्यंतर पाहतों." असा विचार करून त्यांनी मनोमन प्रार्थना केली— "ठाकुर! आज जर तुम्ही कलकत्त्यांत हजर असलेल्या अमुक अमुक महाराजांना येथे घेऊन याल तरच समजेन की खरोखरच तुम्ही वास्तव्य करून आहांत येथे म्हणून." असा मनोमन विचार करून ते मंदिराबाहेर आले. यांतलें सांगितलें मात्र नाही कांहीच कुणाला त्यांनी. नंतर कांही वेळाने ती गोष्ट ते स्वत:हि पार विसरून गेले. नंतर कामासाठी कांही तासांकरता दुसरे दिवशीं त्यांना कलकत्त्यास जावें लागलें. दुपारीं मठांत खरोखरच ते महाराज ग्रँड ट्रंक रोडने जात असतां वाटेंत गाडी थांबवून स्वामीजी मठांत आहेत का अशी चौकशी करून गेले असें त्यांना कळलें. पण ते (स्वामीजी) मठांत नसल्याचें

ऐकून ते मठांत मात्र आले नाहीत! बातमी ऐकतांच त्यांना आपल्या विचारांची आठवण झाली--आश्चर्याने त्यांचे डोळे विस्फारित झाले. मग त्यांनी सारीची सारी हकीकत आपल्या गुरुबंधूंना सांगितली व त्या "आत्माराम कलशाची" विशेष काळजीपूर्वक पूजा करण्याची साऱ्यांना सूचना दिली.

आजचा शनिवार. दुपारीं शिष्य मठांत येतांच त्याला स्वामीजींच्या वरील कलश-परीक्षेचें वृत्त कळलें. स्वामीजींना प्रणाम करून बसतांच, त्याला ते फिरायला निघण्याच्या तयारींत आहेत असें कळलें. निघण्याची तयारी करायला त्यांना स्वामी प्रेमानंदांनी सुचविलें. त्यांच्याबरोबर जाण्याची शिष्याला तर खूप इच्छा होती, पण त्यांची अनुमति नसल्यास जायचें नाही असें म्हणून तो चुप बसला. सदरा, भगवी कानटोपी घालून व हातीं एक काठी घेऊन ते बाहेर पडले. स्वामी प्रेमानंद मागून निघाले. जाण्यापूर्वी शिष्याला उद्देशून त्यांनी विचारलें, "चल, येतोस?" यामुळे कृतार्थ वाटून शिष्य स्वामी प्रेमानंदांच्या मागोमाग निघाला.

विचारमग्न स्वामीजी रस्त्याने चालूं लागले. नंतर ग्रँड ट्रंक रोडने ते पुढे निघाले. स्वामीजी विचारमग्न असल्याचें पाहून व त्यांची ती तंद्रा भंग करण्याचें साहस न झाल्याने स्वामी प्रेमानंदांबरोबर बोलणें काढून शिष्य त्यांना विचारूं लागला, "महाराज, स्वामीजींच्या थोरवीबद्दल ठाकुर आपल्याजवळ काय बोलत असत तें सांगा ना?" (या वेळीं स्वामीजी कांहीसे पुढे निघून गेले होते.)

स्वामी प्रेमानंद--ते काय आणि किती बोलत त्यांच्यासंबंधी, हें मी तुला एका दिवसांत कसें सांगूं? कधी म्हणत, "नरेन् अखंडाचें घरून आला आहे," कधी सांगत, "तो माझी सासुरवाडी." एखादे वेळीं म्हणत, "असा जगांत आजवर कधी

(कुणी) आला नाही—असा पुढे कधी होणार नाही." एक दिवस म्हणाले, "महामाया त्याच्याजवळ जायला (देखील) भिते." खरोखरच ते (स्वामीजी) कधी कुण्या देव-देवतेसमोर मस्तक नमवीत नसत. ठाकुरांनी तर एकदा मिठाईमधून त्यांना जगन्नानाथाचा महाप्रसाद खायला दिला होता! अखेर ठाकुरांच्या कृपेने, सारें पाहूनसवरून मग कुठे हळूहळू ते सारें मानूं लागले.

शिष्य-- माझ्याबरोबर ते नेहमी किती थट्टामस्करी करतात, पण आता ते इतके गंभीर वाटतात की त्यांच्याशीं बोलायचाहि धीर होत नाही!

प्रेमानंद-- असले महापुरुष केव्हा कोणत्या भावांत असतात हें कळणें आपल्यासारख्यांच्या मनबुद्धीला अगोचर असतें. ठाकुर असतांना आम्ही पाहत होतों की नरेन्‌ला दूरून पाहूनच ते समाधिस्थ होऊन जात. ज्यांनी शिवलेल्या वस्तु कुणालाहि खाण्याला ते मनाई करीत त्यांच्या हातचें नरेन्‌ने खाल्ल्यास ते अवाक्षर बोलत नसत. कधी कधी ते म्हणत, "मा, त्याचें अद्वैत-ज्ञान झाकून, दाबून ठेव,--माझें खूप काम व्हायचें बाकी आहे अजून." या साऱ्या गोष्टी समजतील असा आता आहे तरी कोण? अन् त्या सांगायच्या तरी कुणाला?

शिष्य-- महाराज, खरोखरीच अनेकदा वाटतें की ते मनुष्य-कोटींतील खास नाहीत! पण त्यांच्याशीं बोलतांचालतां, तर्कविचार करतांना वाटतें की हे तर आपल्यासारखेच माणूस! कित्येकदा वाटतें की या गोष्टी करतेवेळीं ते कोणत्या तरी आवरणाखाली आपलें यथार्थ स्वरूप झाकून टाकताहेत, कांही कुणाला उमजूं देत नाहीत!

प्रेमानंद-- ठाकुर म्हणत, "त्याला जेव्हा कळेल आपण कोण

आहोंत तेव्हा तो येथे अधिक राहणार नाही--येथून निघून जाईल." म्हणूनच कामकाजांत नरेन्‌चें मन गुंतलेलें असलें की आम्ही निश्चिन्त असतों. तो फार वेळ ध्यानधारणेंत घालवूं लागला की आम्हांला भय वाटूं लागतें.

एव्हाना परत फिरून स्वामीजी मठाकडे जायला निघाले होते· शिष्य व स्वामी प्रेमानंद यांना जवळ जवळ राहून बोलतांना पाहून त्यांनी विचारलें, "काय रे, कसल्या एवढ्या कानगोष्टी चालल्या आहेत तुमच्या ?"

शिष्य-- आम्ही ठाकुरांसंबंधी बोलत होतों.

उत्तर ऐकतांच स्वामीजी पुन्हा आपल्याच विचारांत मग्न होऊन चालूं लागले. मठांत पोहोचल्यावर त्यांच्यासाठी आम्र-तरुतळीं जी खाट टाकून ठेवली असे तीवर ते जाऊन बसले. थोडा वेळ विश्रांति घेतल्यावर हातपाय धुवून वरील व्हरांड्यांत फेऱ्या घालीत असतां ते शिष्याला म्हणाले, "तूं आपल्या पूर्व-बंगालमध्ये वेदान्ताचा प्रचार करायला सुरवात कां नाहीस करीत ? त्या भागांत तंत्रमताचें प्राबल्य दिसतें. अद्वैतवादाच्या सिंहनादाने तुमच्या त्या पूर्वबंगालमध्ये सारी उलटापालट करून टाक पाहूं· तरच म्हणीन की तूं खरा वेदान्तवादी आहेस म्हणून. तेथे जाऊन आधी एक वेदान्त पाठशाला काढ. त्या पाठशाळेंत उपनिषदें, ब्रह्मसूत्रें वगैरे ग्रंथ शिकव. मुलांना ब्रह्मचर्यव्रताची दीक्षा दे, व वादविवाद करून तंत्रमतवाल्यांचीं मतें खंडून काढन त्यांचा पराभव कर. मीं ऐकलें आहे की तुमच्या भागांतील लोक न्यायशास्त्रांतील किचकट कटकटी अभ्यासीत असतात म्हणून ? त्या न्यायांत येवढें आहे तरी काय ? व्याप्तिज्ञान व अनुमान यांच्यावरच नैयायिक महिनोगणती विचार करत असतील ! आत्मज्ञानलाभासाठी काय मदत होते या साऱ्या कटकटींची ?

वेदान्तप्रतिपादित ब्रह्मतत्त्व सिद्धान्ताच्या अध्ययन-अध्यापनाखेरीज तुमच्या पूर्वबंगालला वांचवायचा अन्य कांही उपाय आहे तरी का रे? तुझ्या गावीं किंवा नागमहाशयांच्या घरांत एक पाठशाळा काढ. तींत साऱ्या सत्शास्त्रांची आलोचना व ठाकुरचरित्राचें परिशीलन व्हावयास हवें. असें केल्यास तुझ्याबरोबरच इतर अनेकांचें कल्याण होईल. तुझीहि कीर्ति होईल याबरोबरच.

शिष्य— नांवलौकिकाची कांही अपेक्षा नाही मला. पण आपण म्हणतां तसें करायची अनेकदा मलाहि इच्छा होते. पण संसारांत पडून मी असा पक्केपणीं गुरफटून गेलों आहें की मनांतल्या या साऱ्या गोष्टी मनांत राहून जातील असें भय वाटतें!

स्वामीजी— अरे लग्न केलें म्हणून त्यांत इतकें बिघडलें कुठे? आई-वडील, भाऊ बहिणी यांच्या खाण्यापिण्याची, कपडचालत्त्याची व्यवस्था करून त्यांचें जसें पालनपोषण करतोस तसेंच पत्नीच्या बाबतींतहि करीत जा म्हणजे झालें! धर्मोपदेश करून तिला देखील तुझ्या कार्यांत सहभागी करून घे. महामायेची एक अंशभूत विभूति अशा दृष्टीने तिच्याकडे आदराच्या दृष्टीने पाहा. धर्मपालनाबाबत तिला 'सहधर्मिणी' म्हणून मान, पण एरव्ही इतर जसे दहाजण तशीच तीहि एक. अशा विचारांनी तुझ्या मनाची चंचलता साफ लोपून जाईल. उगीच बाऊ करून भय काय म्हणून बाळगतोस?

स्वामीजींची ही अभयवाणी ऐकून शिष्याला थोडा धीर आला.

जेवणानंतर स्वामीजी आपल्या बिछान्यावर बसले आहेत. इतरांच्या जेवणाची वेळ अद्याप झालेली नाही. म्हणून स्वामीजींचे पाय दाबून देण्याची संधि शिष्याला आता मिळाली आहे.

शिष्याची मठांतील सर्वांवरच श्रद्धा असावी यासाठी गोष्टींच्या भरांत त्याला ते सांगताहेत,--"हीं जीं ठाकुरांचीं सारीं अद्भुत

त्यागी मुलें पाहतोस तूं, त्यांची सेवा करण्याने लोकांची चित्त-शुद्धि होईल, त्यांना आत्मतत्त्वलाभ होईल. 'परिप्रश्नेन सेवया' ही गीतेंतील ओळ लक्षांत आहे ना? त्यांची मनोभावाने सेवा कर. साऱ्या गोष्टी ठीक होतील अशाने. तुझ्यावर त्यांची किती ममता आहे माहीत आहे ना?

शिष्य-- महाराज, यांना समजून घेणें फार कठीण काम, पण यांच्यापैकी प्रत्येकाचा एक एक भिन्न भाव आहे.

स्वामीजी-- ठाकुर एखाद्या अत्यंत कुशल माळ्यासारखे होते. म्हणून तर भिन्न भिन्न सुबक फुलांचा त्यांनी हा संघरूपी सुरेख गुच्छ तयार केला आहे! जेथें कुठे ज्या कांही सत्कल्पना होत्या, जे कांही सत्भाव होते ते सारे येथे गुंफले गेले आहेत आणि पुढेंहि असेच ते येथे समीलित होतील. ठाकुरांचें म्हणणें असे, "अगदी निष्कपट व आर्त मनाने ज्याने एक दिवसच का होईना भगवन्ताला आळवलें आहे त्याला येथे यावेंच लागेल." येथे जो आला आहे तो प्रत्येकच जण म्हणजे जणु एक महासिंह. हे सारे विनयभावाने माझ्यापुढे दबून असतात म्हणून त्यांना सामान्य समजूं नकोस. हेच जेव्हा येथून बाहेर पडतील तेव्हा यांना पाहूनच लोकांना चैतन्य लाभेल. हे सारे म्हणजे अनंत-भावसमष्टिस्वरूप ठाकुरांच्या शरीराचा एक एक अंशच आहेत हें ध्यानांत ठेव. या भावनेनेच मी यांच्याकडे पाहत असतों. हा राखाल जो येथे आहे त्याच्यासारखी आध्यात्मिकता तर माझ्याहि ठिकाणीं नाही. ठाकुर तर त्याला आपला मुलगा मानून मांडीवर घेत, स्वहस्तें भरवत व आपल्याबरोबर निजवीत. तो आमच्या मठाचें भूषण, आमचा राजा! बाबूराम, हरि, सारदा, गंगाधर, शशी, सुबोध यांच्यासारखे ईश्वरश्रद्धासंपन्न लोक सारी दुनिया फिरून शोधूं म्हटल्यास सापडण्याची वानवा. यांच्यापैकी प्रत्येक-

जण अध्यात्मशक्तीचें एक एक केंद्रच! कालांतराने यांच्या शक्तीचा अधिकाधिक विकास होईल.

शिष्य अगदी स्तब्धपणें हें ऐकत होता. स्वामीजी पुढे म्हणाले, "एक नागमहाशय सोडल्यास तुमच्या पूर्वबंगालमधून आणखी कुणी आलें नाही. त्यांच्याखेरीज आणखी एकादोघांनी ठाकुरांना पाहिलें होतें, पण ते कांही त्यांना समजूं शकले नाहीत." नागमहाशयांच्या आठवणीने स्वामीजी कांही वेळ स्तब्ध झाले. चार-पांच महिन्यांपूर्वीच नागमहाशयांनी देहत्याग केला होता. नागमहाशयांच्या घरांत एकदा गंगाप्रवाह अवतीर्ण झाला होता असें स्वामीजींनी ऐकलें होतें. ती गोष्ट आठवून त्यांनी शिष्याला विचारलें, "खरेंच का रे, तेव्हा काय झालें होतें सांग पाहूं ?"

शिष्य-- मीं ही गोष्ट ऐकली आहे फक्त, प्रत्यक्ष मीं ती कांही पाहिली नाही. असें म्हणतात की महावारुणी योगाचे दिवशीं वडिलांना बरोबर घेऊन एकदा नागमहाशय कलकत्त्याला जायला निघाले. पण गर्दीमुळे गाडींत जागा न मिळाल्याने चार दिवस नारायणगंजला पडून राहून अखेरीस घरीं परत फिरावें लागलें. कांही उपायच हातीं नसल्याने कलकत्त्याला जाण्याचा विचार सोडून देऊन ते वडिलांना म्हणाले, "मी जर निखालस शुद्ध, पवित्र असेन तर गंगामाता येथेहि येईल." नंतर महावारुणी योगाचे वेळीं घराचें अंगण फोडून पाण्याचा एक प्रवाह उत्पन्न झाला असें म्हणतात. तो स्वतः पाहणाऱ्यांपैकी कांही लोक अद्याप हयात आहेत. मला त्यांच्या सत्सगतीचा लाभ होण्याच्या बऱ्याच अगोदर ही घटना घडून गेली होती.

स्वामीजी-- यांत आश्चर्य तें काय आहे येवढें ? ते एक सिद्धसंकल्प महापुरुष होते--त्यांच्या बाबतींत असें कांही घडणें यांत मला मुळीच आश्चर्य वाटत नाही.

बोलतां बोलतां स्वामीजी कड फिरवून निजले व त्यांना झोपेची थोडी गुंगी आली.

तें पाहून शिष्य जेवणासाठी म्हणून खाली निघून गेला.

---

## अध्याय ४५ वा.

स्थळ— कलकत्ता ते मठ, नौकेंत.

वर्ष--इ. स. १९०२

विषय— स्वामीजींची निरभिमानता— कामकांचनाचा त्याग केल्याखेरीज ठाकुरांना समजणें अशक्य— ठाकुरांचे अन्तरंग भक्त कोण-- सर्वस्वत्यागी संन्यासी भक्तांनीच नेहमी अवतारांच्या भावांचा प्रचार केलेला आहे— गृहस्थ भक्त ठाकुरांबद्दल जें म्हणतात तेंहि कांही अंशीं सत्यच-- महान् ठाकुरांच्या बिंदुमात्र भावानेहि माणूस धन्य होतो-- संन्यासी भक्तांना ठाकुर विशेष उपदेश देत— कालांतराने सारी पृथ्वी ठाकुरांचा उदार भाव स्वीकारील-- ठाकुरकृपेला पात्र झालेल्या साधूंची सेवा केल्यास मानवाचें कल्याण होईल.

आज दुपारच्या वेळीं गंगातटाकीं सहज फिरतां फिरतां शिष्याला दिसलें की दूर अंतरावरून एक संन्यासी अहिरीटोला घाटाकडे येत आहे. जवळ जाऊन पाहतो तों तो संन्यासी अन्य कुणी नसून त्याचेच गुरुदेव स्वामी विवेकानंद आहेत असें त्याला दिसून आलें. त्यांच्या डाव्या हातीं तळल्या हरबऱ्यांचा एक द्रोण असून एखाद्या निरागस बालकाप्रमाणे ते मोठ्या आनंदाने ते चणे खात खात रस्त्याने पुढे चालले होते! विश्वविख्यात, त्रिभुवनजयी स्वामीजी रस्त्याने ते चणे खात येतांना पाहून शिष्य स्तिमितपणें त्यांच्या निरभिमानतेबद्दल आश्चर्य व्यक्त करूं लागला. ते समोर येतांच त्यांना नमस्कार करून अगदी आकस्मिकपणें कलकत्त्याला कसे आलांत म्हणन शिष्याने त्यांना विचारलें.

स्वामीजी-- एका कामासाठी म्हणून आलों होतों. चल, चलतोस का तूं मठांत? यांतले थोडे चणे खा ना. छान तिखट मीं टाकलें आहे.

शिष्याने हसत हसत तो प्रसाद मोठ्या आनंदाने घेतला व मठांत जाण्याचेंहि त्याने मान्य केलें.

स्वामीजी— तर मग आता एखादी नाव ठरव.

शिष्य नाव ठरविण्यासाठी गेला. भाड्यासाठी नावाड्याशीं त्याची हुज्जत चालू असतांच स्वामीजी तेथे आले. नावाडी आठ आणे सांगत होता तर शिष्य दोन आणे घे म्हणून म्हणत होता. "त्याच्याशीं काय भाड्यासाठी हुज्जत घालत बसला आहेस ?" असें म्हणून त्यांनी शिष्याला बाजूला सारलें व "ठीक आहे आठच आणे देतों" असें नावाड्याला सांगून ते नावेंत जाऊन बसले.

जोराची ओहोटी असल्याने नाव अगदी आस्ते आस्ते पुढे जात होती. म्हणून मठांत पोहोचायला जवळपास दीड तास लागला. नावेंत स्वामीजी अगदी एकटेच असल्याने शिष्याला त्यांना अनेक विषयांवर निःसंकोच मनाने प्रश्न विचारण्याची चांगली संधि मिळाली. बंगाली सनाच्या या वर्षीच्या २० आषाढ रोजीं स्वामीजींनी आपली इहलोकींची लीला संपविली होती. या आजच्या दिवशीं स्वामीजींशीं गंगाप्रवाहीं शिष्याचें जें बोलणें झालें तेंच आता येथे देतों.

ठाकुरांच्या गत-जन्मोत्सवप्रसंगीं शिष्याने त्यांच्या भक्तांचा महिमा वर्णन करणारें जें एक स्तोत्र छापलें होतें त्यासंबधी बोलणें काढून स्वामीजींनी विचारलें, "तूं ज्यांचीं नावें आपल्या स्तोत्रांत गुंफलीं आहेत ते सारे ठाकुरांचे अंतरंग लीला- सहचरच आहेत हें कसें कळलें तुला ?"

शिष्य-- ठाकुरांच्या संन्यासी व गृही भक्तांकडे इतके दिवस माझें येणेंजाणें आहे. त्यांच्याच तोडून ऐकलें की हे सारे ठाकुरांचे भक्त होत म्हणून.

स्वामीजी-- ठाकुरांचे ते भक्त असतील, पण सारेच भक्त कांही ठाकुरांचे अंतरंग लीलासहचर नव्हत. काशीपूर येथील उद्यानगृहांत ठाकुरांनी आम्हांला सांगितलें होतें, "आईने दाखवून दिलें की हे सारेच कांही येथले (माझे) अंतरंग भक्त नाहीत." स्त्री-पुरुष दोन्ही भक्तांबद्दल ठाकुरांनी त्या दिवशीं असें सांगितलें होतें.

आपल्या भक्तांमध्ये ज्याप्रकारें ठाकुर थोरलहान हा भेद करीत तो सांगत असतां हळूहळू स्वामीजींनी गृहस्थ व संन्यासी यांच्यांत केवढा भेद असतो तें शिष्याला स्पष्ट करून सांगण्यास सुरवात केली.

स्वामीजी-- कामिनी-कांचनाची गुलामीहि करायची आणि ठाकुरांना समजूनहि घ्यायचें हें कधी काय साधणार आहे? की हें कधी काळीं साधण्याची शक्यता आहे? असल्या गोष्टींवर कधी विश्वास ठेवूं नकोस. ठाकुरांच्या भक्तांपैकी आताच कांही-जण आपण 'ईश्वरकोटी' 'अंतरंग' असल्याचा स्वत:बद्दल प्रचार करूं लागले आहेत! त्यांच्या त्याग-वैराग्यापैकी तर हे लोक कांहीच घेऊं शकले नाहीत, आणि सांगत सुटतात काय तर म्हणे आम्ही ठाकुरांचे अंतरंग भक्त! या साऱ्या भाकडकथा फडचाने झाडून लोटून दे. ते होते त्यागयांचे 'बादशाहा', त्यांची कृपा लाभल्यावर काय कुणी पुन्हा काम-कांचनांची गुलामी करून जीवन घालवूं शकेल?

शिष्य-- तर मग काय जे दक्षिणेश्वरीं ठाकुरांजवळ येत ते सारे काय त्यांचे भक्त नाहीत?

स्वामीजी-- तसें कोण म्हणतो? ठाकुरांकडे जाणेंयेणें केल्याने धर्मानुभूतीबाबत साऱ्यांची प्रगति झाली, होत आहे व होईल. ते सारे ठाकुरांचे भक्त आहेत यांत शंका नाही. पण मूळ मुद्दा

हा की ते सारेच कांही त्यांचे अंतरंग भक्त नव्हत. ठाकुर म्हणत, "अवतारांबरोबर कल्प-कल्पान्तरींचे सिद्ध ऋषि देह धारण करून येत असतात." तेच भगवंताचे खरे सहचर (पार्षद). त्यांच्या करवींच भगवान् कार्य करितात, जगांत धर्मभावाचा प्रसार करतात. हें अगदी पक्कें लक्षांत ठेव की भगवंताचे एक-मात्र अंतरंग तेच की जे परार्थ सर्वस्वत्याग करतात, भोगसुखाचा काकविष्ठेप्रमाणे त्याग करून जे 'जगत् हिताय', 'जीव हिताय' जीवन समर्पण करतात. भगवान् येशू ख्रिस्ताचे सारेच शिष्य संन्यासी होते. शंकर, रामानुज, श्रीचैतन्य व बुद्धदेव यांच्या प्रत्यक्ष कृपेचा लाभ झालेले त्यांचे सहचर हे सर्वचे सर्व सर्वस्व-त्यागी संन्यासी होते. हे सर्वत्यागी संन्यासीच गुरुपरंपरेद्वारा जगतांत ब्रह्मविद्येचा प्रचार करीत आले आहेत. काम-कांचनाचा बंदा गुलाम असूनहि माणूस माणसाचा उद्धार करूं शकला किंवा त्याला ईश्वरलाभाचा मार्ग दाखवूं शकला असें कधी कुठे ऐकलें आहेस ? आपण स्वतःच मुक्त नसतांना दुसऱ्या कुणालाहि कोण कसा बरें मुक्त करूं शकेल ? वेद-वेदान्त, इतिहास-पुराणें या साऱ्यांत दिसून येईल की संन्यासी हेच सर्वकालीं, सर्वस्थलीं लोक-गुरुरूपाने धर्माचे उपदेशक आहेत. History repeats itself अर्थात् इतिहासाची पुनरावृत्ति होत असते. तेव्हा आताहि होणार आहे हेंच पुन्हा. महासमन्वयाचार्य ठाकुरांचे कर्तव्यदक्ष संन्यासी शिष्यच लोकगुरुरूपाने जगांत सर्वत्र पूजिले जात आहेत व जातील. त्याग्याखेरीज इतरांचें बोलणें पोकळ आवाजाप्रमाणे शून्यांतच विलीन होणार. मठांतील यथार्थ त्यागी संन्यासीच धर्म-रक्षण करूं शकतील व प्रचाराचें महाकेन्द्रहि होतील तेच. समजलें ?

शिष्य-- तर मग ठाकुरांचे गृहस्थ भक्त त्यांच्या वाणीचा व उपदेशांचा नानाप्रकारें जो प्रसार करतात तो काय खरा नाही ?

स्वामीजी-- तो अजीबातच खरा नाही असें नाही, पण ठाकुरांबद्दल ते जें सांगतात तें सारें असतें मात्र आंशिक सत्य, जो तो आपल्या कुवतीप्रमाणे ठाकुरांबद्दल चर्चा करीत असतो. असें करणेंहि कांही वाईट नाही. पण त्यांच्या भक्तांपैकी, आपल्याला जें समजलें तेंच वा आपण म्हणतों तेवढेंच सत्य असें जर कुणाला वाटत असेल तर अशाची कीवच करायला हवी. कांहींच्या मतें चैतन्य देवच त्यांच्या रूपाने नारदीय भक्तीचा प्रचार करावयास आले होते, कांहीच्या मतें आपण साधना करणें हें आपल्या त्यांच्याबद्दलच्या अवतारभावनेला विरोधी आहे, कांहीजण सांगतात की संन्यास घेणें हें कांही ठाकुरांना मान्य नव्हतें. असल्या किती तरी गोष्टी तुला गृहस्थ भक्तांच्या तोंडून ऐकूं येतील. पण त्या गोष्टी कानीं देखील घेऊं नकोस. ठाकुर कोण—किती पूर्वगामी अवतारांच्या पुंजीभूत भावराज्याचे ते राजे होते यांतलें अणुमात्र देखील आम्हांला सारें जीवन कठोर तपस्या कर-करून देखील कळलें नाही. म्हणूनच त्यांच्याबद्दल बोलावयाचें झाल्यास फार सांभाळून बोलावयास हवें. ज्याची त्याची शक्ति, वकुब व कुवत पाहून तदनुसार त्याला हवें तें देऊन त्यांनी त्यांचीं जीवनें परिपूर्ण केलीं. त्यांच्या भावसागर-तरंगांतील एका बिंदूची जरी धारणा होऊं शकली तरी माणूस देवता होऊन जाईल. सर्व भावांचा असा हा विलक्षण समन्वय साऱ्या जगाच्या इतिहासांत तरी शोधून सापडेल का ? यावरूनच समज की त्यांच्या रूपाने देह धारण करून कोण आले होते तें. अवतार म्हणून त्यांना गौरवणें म्हणजे देखील त्यांना कमीपणा आणणें आहे. ते जेव्हा आपल्या संन्यासी संतानांना विशेष उपदेश देत तेव्हा स्वत: उठून चारी बाजूंना पाहून खात्री करून घेत, जवळपास कुणी गृहस्थ ऐकत नाहीना याची ! कुणीहि गृहस्थ जवळपास नसल्यास

व येण्याची शक्यताहि नाही असें दिसल्यास मगच ते अगदी ज्वलंत भाषेंत त्याग-तपस्येचा महिमा वर्णन करून सांगत. त्या प्रखर संसार-वैराग्याच्या अतिप्रबल उद्दीपनेमुळेच तर आम्हीं सर्व-संगपरित्याग केला व संसाराबाबत असे उदासीन झालों !

शिष्य--गृहस्थ व संन्यासी यांच्यांत येवढा प्रभेद करीत असत ते!

स्वामीजी-- त्यांच्या गृहस्थ भक्तांनाच हें विचारून खात्री करून घे ना तूं. तूं स्वतःच विचार करून पाहाना आपल्याशीं की त्यांच्या ज्या संतानगणांनी ईश्वरलाभासाठी ऐहिक जीवनांतील समस्त भोगादिकांचा आमूलाग्र त्याग करून पहाडपर्वतांवर, तीर्थस्थानीं, आश्रमादिकांत प्राण पणाला लावून तपस्या केली ते श्रेष्ठ की जे त्यांची सेवा करतात, त्यांना वंदन करतात, त्यांचें स्मरण-मनन करतात पण इतकें असूनहि सांसारिक माया-ममता, मोहादिकांचा त्याग करूं शकत नाहीत ते श्रेष्ठ ? ज्यांनी आत्म-ज्ञानाने जीवसेवेसाठी प्राण देण्याची सिद्धता केली, जे आकुमार ऊर्ध्वरेते ब्रह्मचारी राहिले, जे त्यागवैराग्यादिकांचे जणु चालते-बोलते पुतळेच, असे संन्यासी श्रेष्ठ की जे सामान्य माशांप्रमाणे कधी फुलांवर तर कधी विष्ठेवर बसतात ते संसारी श्रेष्ठ ? तूंच एकदा या साऱ्याचा आपल्याशीं विचार करून पाहा.

शिष्य-- पण महाराज, ज्यांना त्यांची (ठाकुरांची) कृपा लाभली त्यांचा पुन्हा संसार म्हणून कसला आला ? ते गृहस्थ म्हणून राहोत वा संन्यास घेवोत दोन्ही गोष्टी समानच असें मला वाटतें.

स्वामीजी-- त्यांची कृपा ज्यांना खरोखर लाभली त्यांचीं मनें, बुद्धि कांही कधीहि पुन्हा संसारांत आसक्त होणें शक्य नाही. कृपेची कसोटी आहे कामकांचनांच्या ठिकाणीं अनासक्ति. ती कामकांचनांच्या ठायींची संपूर्ण अनासक्ति ज्यांना लाभली नाही

त्यांना ठाकुर-कृपाहि कधी यथार्थपणें लाभली नाही हें निश्चित समज.

हा मुद्दा येथे संपल्याने दुसरी गोष्ट काढून शिष्याने त्यांना विचारलें, "महाराज, आपण जें नाना देश-विदेशांतून परिभ्रमण केलें त्याची फलश्रुति काय ?"

स्वामीजी-- ती तुम्हांला थोडी फार दिसेलच. कालान्तराने जगाला ठाकुरांच्या उदार भावांचा स्वीकार करावाच लागेल. आता तर नुसती कुठे त्याची सुरवात आहे या प्रबल भाव-महापुरांत सांपडून साऱ्यांनाच वाहून जावें लागणार आहे.

शिष्य -- ठाकुरांबद्दल आपण आणखी कांही सांगा ना ? आपल्या तोंडून त्यांच्याबद्दल ऐकायला मला खूप आवडतें.

स्वामीजी-- तें तर तूं रात्रंदिवस ऐकतोसच आहेस. त्यांना उपमा फक्त एक त्यांचीच. त्यांच्या तोडीचा दुसरा कोण आहे रे ?

शिष्य-- महाराज, आम्हांला तर कांही त्यांचें दर्शन घडलें नाही. आम्हांला काय उपाय आहे आता असल्या स्थितींत ?

स्वामीजी-- प्रत्यक्ष त्यांच्या कृपेचा लाभ झालेल्या साधूंच्या सत्संगतींत तर तूं आहेसच ना ? मग तूं त्यांना पाहिलें नाहीस असें कसें म्हणतोस ? ते आपल्या या त्यागी संतानांमध्ये विराजमान आहेत. त्यांची यथोचित सेवा केल्यानेच ते तुझ्या हृदयांत प्रकाशमान होतील. कालान्तराने या साऱ्या गोष्टी पाहूं शकशील तूं.

शिष्य-- ठाकुरांची कृपा लाभलेल्या इतर साऱ्या लोकांबद्दलच फक्त आपण बोलतां, आपल्याबद्दल ठाकुर जें म्हणत त्यासंबंधी तर कधीच कांही सांगितलें नाही आपण ?

स्वामीजी-- माझ्याबद्दल तें काय सांगूं ? मी त्यांच्या दैत्य-दलापैकीच कुणीतरी असलों पाहिजे. त्यांच्या तोंडावरच मी अनेकदा त्यांना कठोर शब्द बोलत असे--ऐकून ते फक्त हसत.

बोलतां बोलतां स्वामीजींचें मुखमंडल स्थिर-गंभीर झालें. गंगाप्रवाहाकडे शून्यमनस्कतेने पाहत कांही काळ ते अचल-गंभीर भावाने बसून राहिले. पाहतां पाहतां संध्याकाळ झाली. नौकाहि धीरे धीरे मठाजवळ पोहोचली. स्वामीजी तेव्हा आपल्याशींच गुणगुणूं लागले--

(भावार्थ)-- 'आता संध्याकाळ झाली आहे आता मुलाला घरीं परत घेऊन चल.'

गाणें ऐकून विस्मित झालेला शिष्य स्वामीजींच्या मुखमंडलाकडे पाहूं लागला.

गाणें संपल्यावर ते म्हणाले, "तुमच्या पूर्वबंगालमध्ये सुमधुर कंठाचा गायक जन्मलेला कांही दिसत नाही. या गंगामातेचें पाणी पोटांत गेल्याखेरीज आवाजांत कांही मिठास गोडवा येत नाही."

नावेचें भाडें देऊन स्वामीजी खाली उतरले व सदरा काढून मठाच्या पश्चिमेकडील व्हरांडयांत आले. स्वामीजींच्या गौर-कांतीला व भगव्या कपडयांना सायंकालीन दीप प्रकाशांत एक अपूर्व अद्भुत शोभा आली होती.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र
अनुक्रम २०९७० वि: ...
क्रमांक ११७० नों: दि: ...

## अध्याय ४६ वा

## अखेरचें दर्शन.

स्थळ--बेलूर मठ

वर्ष--इ. स. १९०२

विषय—आपला देशीय आहार, पोषाख व आचार सोडणें दूषणास्पद—कुणाहिपासून विद्या शिकतां येते, पण ज्या शिक्षणाने देशीय वैशिष्ट्यें लोपतात तें शिक्षण सर्वथा परित्याज्य—स्वच्छतेसंबंधी शिष्यांशीं बोलणें—ध्यान-एकाग्रता लाभावी म्हणून शिष्याची स्वामीजींना प्रार्थना—स्वामीजींनी शिष्याला दिलेला आशीर्वाद—निरोप.

आज बंगाली पंचांगाप्रमाणे आषाढ १३. सायंकालपूर्वीच शिष्य बालीहून मठांत आला आहे. त्याचें ऑफीस बालीला असून ऑफिसांतील कपड्यांनिशीच तो मठांत आला. कपडे बदलायला कांही आज त्याला सवड झाली नाही. येतांच प्रणाम करून त्याने स्वामीजींजवळ त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली.

स्वामीजी-- "तब्यत ठीक आहे माझी तशी. (शिष्याचा पोषाख पाहून)-- तूं कोट पॅन्ट वापरतोस, मग कॉलर कां नाहीस वापरीत?" असें म्हणून जवळच असलेल्या स्वामी सारदानंदांना हाक मारून ते म्हणाले, "माझ्या ज्या कॉलर्स आहेत त्यांतल्या दोन याला दे बरें उद्या सकाळीं." देण्याचें स्वामी सारदानंदांनी कबूल केलें.

नंतर दुसऱ्या खोलींत जाऊन शिष्याने वर सांगितलेले आपले कपडे बदलले, व मग हात-पाय धुऊन तो स्वामीजींपाशी आला. तो आल्याचें पाहून स्वामीजी म्हणाले, "खाणेंपिणें, कपडेलत्ते व देशीय आचारव्यवहार यांचा त्याग केल्याने हळूहळू देशभावनेचा लोप होतो. विद्या साऱ्यांपासूनच शिकतां येते पण ज्या विद्या-लाभाने देशीय वैशिष्टयांचा लोप होतो त्या विद्येनें माणसाची उन्नति कधीच होत नाही--ती माणसाच्या अध:पताचेंच मूळ असते.

शिष्य-- साहेबांनी मान्यता दिलेला पोषाख ऑफिसांत न वापरून चालत नाही महाराज कुणाचेंहि.

स्वामीजी-- ऑफिसांत तो पोषाख घालूं नकोस असें कोण म्हणतो? नोकरीच्या दृष्टीने कामाच्या वेळीं तो पोषाख वापरावा. पण घरीं येतांच मात्र अगदी बंगाली बाबू व्हायला हवें. तो मोकळा लोंबता काष्टा, बंगाली सदरा अन् अंगावर ती शाल हें सारें वापरायला हवें. समजलें?

शिष्य-- होय महाराज.

स्वामीजी--तुम्ही आजकाल फक्त एक सदरा अंगांत अडकवून याच्या त्याच्या घरीं जातां, पाश्चात्य देशांत असें गेल्यास नग्न म्हणून संबोधितात व असें जाणें अत्यंत असभ्यपणाचें मानलें जातें. त्यांच्याकडे सदऱ्यावरून कोट नसल्यास तुम्हांला कुणीहि सभ्य माणूस घरांतच येऊं देणार नाही. पोषाखाच्या बाबतींत हें काय बेंगरूळ अनुकरण करायला शिकलां आहांत तुम्ही? आजकालचीं पोरेंबाळें जो पोषाख करतात तो म्हणजे एक विलक्षण खिचडीच आहे, तो धड ना आपल्याकडला, धड ना त्यांच्याकडला.

यानंतर स्वामीजी गंगाकिनारीं पाय मोकळे करण्यासाठी गेले. एकटा शिष्यच काय तो त्यांच्याबरोबर होता. साधनांसंबंधी एक प्रश्न आता स्वामीजींना विचारावा किंवा नाही याबद्दल शिष्य विचार करूं लागला.

स्वामीजी-- इतका काय विचार करतोस? एकदा काय तें विचारून टाक ना? (जणु माझ्या मनांतील गोष्ट त्यांना कळली असावी.)

यावर मोठ्या सलज्जभावाने शिष्याने विचारलें, " महाराज, विचार करीत होतों की आपण जर असा एखादा उपाय सांगाल की ज्याने मन शीघ्र स्थिर होऊन जाईल, ज्यायोगें खूप शीघ्र

ध्यान साधेल तर फार उपकार होतील. सांसारिक कटाकटींनी साधन-भजनादिकांचे वेळीं मन कांहीकेल्या स्थिर होत नाही."

शिष्याची ती दीनता पाहून त्यांना बरें वाटलें. ते म्हणाले, "थोड्या वेळाने वर मी जेव्हा अगदी एकटा असेन तेव्हा तूं ये. मग बोलूं या बाबतींत."

आनंदाने वेडावून जाऊन शिष्य स्वामीजींना वारंवार प्रणाम करूं लागला. स्वामीजी, 'पुरे, आता पुरे,' असें वारंवार त्याला म्हणूं लागले.

कांही वेळाने स्वामीजी वर निघून गेले.

येवढ्यांत खाली शिष्याने एका साधूबरोबर वेदान्तचर्चा सुरू करून दिली व मग द्वैताद्वैताच्या वितण्डवादाने सारा मठ कोलाहलमय होऊन गेला. हा गलबला ऐकून स्वामी शिवानंद येऊन म्हणाले, "अरे, जरा हळू वाद घाला--स्वामीजींना ध्यानांत त्रास होईल." हें ऐकतांच शिष्य चूप झाला व वाद संपवून वर स्वामीजींकडे निघून गेला.

वर जाऊन पाहतो तों शिष्याला दिसलें की जमिनीवर पश्चिमाभिमुख होऊन स्वामीजी ध्यानस्थ बसले आहेत. त्यांच्या मुखावर एक अपूर्व भाव विलसत होता--जणु चंद्रोज्ज्वलकान्ति ओसंडून बाहेर फांकत आहे ! त्यांचें सारें शरीर निष्कंप, जणु 'चित्रार्पितारंभ इवावतस्थे !' स्वामीजींची ती निश्चल ध्यानस्थ मूर्ति पाहून स्तंभित झालेला शिष्य जवळच उभा राहिला व बराच वेळ झाला तरी त्यांच्या ध्यानभंगाचें कांही लक्षण न दिसल्याने तो मुकाट्याने तेथेच बसून राहिला. मग अर्ध्या तासाने कुठे स्वामीजींना बाह्यसंज्ञा आल्याचा किंचित् भास झाला. त्यांचे जोडलेले हात किंचित् प्रकंपित झाल्याचें शिष्याला दिसले. पांचसात मिनिटें अशींच

गेल्यावर मग कुठे त्यांनी डोळे उघडले व शिष्याकडे पाहून विचारलें, "केव्हा आलास तूं ?"

शिष्य-- हा थोड्या वेळापूर्वीच.

स्वामीजी-- बरें झालें. एक ग्लास पाणी आण पाहूं.

लगबगीने जाऊन शिष्याने स्वामीजींसाठीच भरून ठेवलेल्या सुरईतून एक प्याला पाणी आणलें. थोडें पाणी प्याल्यावर ग्लास जागच्या जागींच ठेवायला त्यांनी शिष्याला सांगितलें. ग्लास जागीं ठेवून शिष्य पुन्हा स्वामीजींजवळ येऊन बसला.

स्वामीजी-- आज खूप छान ध्यान साधलें होतें.

शिष्य-- ध्यानाचे वेळीं मन याप्रमाणेच त्यांत मग्न होऊन जाईल असा कांही उपाय मला सांगा.

स्वामीजी-- सारे उपाय तर तुला आधीच सांगितले आहेत. दररोज तदनुसार ध्यान करीत जा. कालांतराने मग तुलाच त्याचा अनुभव येईल. बरें, सांग पाहूं, कसल्या प्रकारची साधना तुला आवडते ?

शिष्य-- आपण सांगितल्याप्रमाणे तर मी करतों, पण अद्याप मला ध्यान कांही साधत नाही. पुष्कळदा मनांत येतें की काय होणार आहे ध्यान करून ? म्हणूनच मला वाटतें की ध्यान साधणें कांही शक्य नाही मला; तेव्हा सतत आपल्यापाशी राहता यावें येवढीच इच्छा आहे माझी आता.

स्वामीजी— तें सारें आहे (मनाच्या) दुर्बलतेचें लक्षण, नेहमी नित्यप्रत्यक्ष आत्म्यांत निमग्न होण्याचा प्रयत्न करीत जा. एकदा आत्मदर्शन झालें की सारें साधलें. त्याने जन्ममृत्यूचे पाश गळून पडतील.

शिष्य— कृपा करून तसें होईल असें आपण कांही करून द्या. आज आपण एकान्तांत भेटायला सांगितलें म्हणून आलों आहे

मी. माझें मन स्थिर होईल असें कांही करून द्या.

स्वामीजी-- वेळ मिळतांच ध्यान करीत जा. मन एकदा सुषुम्नामार्गावर गेलें की आपोआप साऱ्या गोष्टी ठीक होऊन जातील. मग आणखी कांही करावें लागणार नाही.

शिष्य-- आपण तर कितीतरी प्रोत्साहन देतां ! पण मला सत्यवस्तूची उपलब्धि होईल का ? यथार्थ ज्ञान होऊन मी मुक्त होऊं शकेन का ?

स्वामीजी-- न व्हायला काय झालें ? आब्रह्मकीटकापर्यंत सारेच मुक्त होणार आहेत योग्य वेळीं--मग तू मुक्त न व्हायला काय झालें ? असल्या दुबळेपणाला मनांत मुळीच थारा देऊं नकोस.

नंतर ते म्हणाले, "श्रद्धावान् हो, वीर्यवान् हो, आत्मज्ञान प्राप्त करून घे, आणि 'परहिताय' जीवितसर्वस्व अर्पण कर हीच माझी इच्छा. हाच आहे माझा आशीर्वाद."

इतक्यांत जेवणाची घंटी झाल्याने स्वामीजी शिष्याला म्हणाले, "जा, जेवायची घंटी झाली आहे आता."

शिष्याने त्यांच्या पायीं मस्तक ठेवून कृपेची याचना केल्यावर त्याच्या मस्तकीं हात ठेवून त्यांनी त्याला आशीर्वाद दिला व ते म्हणाले, "माझ्या आशीर्वादानेच जर तुझें कल्याण होणार असेल तर मी आशीर्वाद देतों--भगवान् श्रीरामकृष्ण तुझ्यावर कृपा करोत. यापेक्षा मोठा आशीर्वाद माझ्यापाशी नाही."

नंतर शिष्य मोठ्या आनंदाने खाली आला व स्वामीजींनी दिलेल्या आशीर्वादाची गोष्ट त्याने स्वामी शिवानंद महाराजांना सांगितली. ती ऐकून स्वामी शिवानंद म्हणाले, "जा, तुला सारें कांही लाभलें. स्वामीजींच्या आशीर्वादाचें फळ तुला यापुढे कळून येईल."

जेवण आटोपल्यावर त्या रात्रीं शिष्य पुन्हा कांही वर गेला नाही, कारण झोपण्यासाठी म्हणून आज स्वामीजींनी लवकरच अंग टाकलें होतें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं कामासाठी म्हणन शिष्याला कलकत्त्याला जावयाचें होतें. म्हणून हातपाय धुऊन तो घाईघाईने स्वामीजींकडे गेला.

स्वामीजी-- अगदी इतक्यांतच निघालास ?

शिष्य-- होय महाराज.

स्वामीजी-- येत्या रविवारीं तर येणार आहेस ना ?

शिष्य-- हो, अगदी निश्चितपणें.

स्वामीजी-- तर ये मग आता. ती एक नौकाहि येते आहे पाहा आताच.

शिष्याने स्वामीजींच्या चरणांचा या जन्मींचा अखेरचा निरोप घेतला. त्या वेळीं त्याला कळलें नाही की त्याच्या इष्टदेवतेचें त्या स्थूल शरीरांत हें त्याचें अखेरचें दर्शन होतें. प्रसन्नवदनाने त्याला निरोप देऊन स्वामीजी पुन्हा पुन्हा म्हणाले, "ये मग आता रविवारीं." "येईन" म्हणन शिष्य खाली निघून गेला.

तो जायला निघाल्याचें पाहून स्वामी सारदानंद त्याला म्हणाले, "अरे, त्या दोन कॉलर्स घेऊन जा. नाही तर उगाचच स्वामीजींचीं बोलणीं खावीं लागतील."

शिष्य-- आज गडबडींत आहें मी खूप. पुन्हा एखाद्या दिवशीं घेऊन जाईन. स्वामीजींना सांगा आपण तसें.

भाड्याने ठरविलेल्या नावेचा नावाडी सारखा हाका मारतो आहे. म्हणून वरच्याप्रमाणे बोलत बोलतच शिष्य घाईघाईने नावेकडे निघाला. नावेंत बसून शिष्याने पाहिलें तों स्वामीजी वरील व्हरांड्यांत फिरतांना त्याला दिसले. त्यांना उद्देशून

नमस्कार करून तो जागीं जाऊन बसला. ओहोटीच्या जोराने अर्ध्या तासांतच नाव आहिरीटोला घाटाला लागली.

नंतर सातच दिवसांनी स्वामीजी स्वस्वरूपीं लीन झाले. असें कांही होईल याची शिष्याला आधी कांही कल्पनाच आली नाही. त्यांच्या देहत्यागानंतर दुसऱ्या दिवशीं बातमी कळतांच शिष्य मठांत आला. त्यामुळे जीवित दशेंत स्वामीजींचें दर्शन त्याला पुन्हा लाभलें नाही.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

REFBK-0009787

REFBK-0009787

# आमचें अन्य प्रकाशन

## मराठी विभाग

१-२. **श्रीरामकृष्ण-चरित्र**—प्रथम भाग (तिसरी आवृत्ति)
पृ. सं. ३३०+३० ४।
द्वितीय भाग (दुसरी आवृत्ति) पृ. सं. ३८५+१४ ४।=

३. **श्रीरामकृष्ण-वचनामृत**—(अंतरंग शिष्यांशीं व भक्तांशीं झालेलीं भगवान श्रीरामकृष्णांचीं संभाषणें) पृ. सं. ७०१+१२ ५॥

४. **विवेकानंद-चरित्र**—पृ. सं. ५७३+१८ ... ५।

५. **पूर्व आणि पश्चिम**—स्वामी विवेकानंद ... १।

६. **कर्मयोग**--(दुसरी आवृत्ति)--स्वामी विवेकानंद १॥=

७. **महापुरुषांच्या जीवनकथा**-(सहावी आवृत्ति)-स्वामी विवेकानंद १॥=

८. **भक्तियोग**--स्वामी विवेकानंद ... ... १।

९. **माझे गुरुदेव**--(तिसरी आवृत्ति)-स्वामी विवेकानंद ॥=

१०. **हिंदुधर्माचें नव-जागरण**-(दुसरी आवृत्ति)-स्वामी विवेकानंद ॥-

११. **शिक्षण**--स्वामी विवेकानंद ... ... ॥-

१२. **पवहारी बाबा**--(दुसरी आवृत्ति)—स्वामी विवेकानंद ॥

१३. **शिकागो-व्याख्यानें**--(तिसरी आवृत्ति)--स्वामी विवेकानंद ॥=

१४. **स्वामी विवेकानंदांच्या आठवणी** ... ... १।

१५. **विवेकानंद-वाणी**-(दुसरी आवृत्ति) ... ... ।॥=

१६. **श्रीरामकृष्ण-वाक्सुधा**-(चवथी आवृत्ति)-(भगवान श्रीरामकृष्णांच्या निवडक उपदेशांचें त्यांच्याच एका अंतरग शिष्यानें केलेलें संकलन) ॥=

१७. **साधु नागमहाशय-चरित्र**-( दुसरी आवृत्ति )
(भगवान श्रीरामकृष्णांचे सुप्रसिद्ध शिष्य)- २ रु.

१८ **वेदान्त आणि जीवन**—स्वामी विवेकानंद ... १।

याशिवाय आमच्या आश्रमाने हिंदी भाषेंतूनहि समग्र रामकृष्ण-विवेकानंद साहित्य प्रकाशित केलें आहे. त्यासाठी विस्तृत सूचीपत्र मागवावें.

**श्रीरामकृष्ण आश्रम, धंतोली, नागपूर - १.**